म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
सं. क्र. ३५३६

# दलित चळवळ

३५३१९



REFBK-0026417

संपादन
**शरणकुमार लिंबाळे**

संदर्भ
निबंध
३४३८
२६४१८
१०।८।९७

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध ३४३८
२६४१८
१०।८।९७

# दलित चळवळ

संपादन

शरणकुमार लिंबाळे

REFBK-0026417

प्रचार प्रकाशन
कोल्हापूर

प्रकाशन क्रमांक / १५९

**प्रकाशक**
सौ. नंदिनी तु. गवळी
५१३ ब, प्लॉट नं. ४/अ,
नलवडे कॉलनी, सम्राटनगर
सागरमाळ, कोल्हापूर–४१६ ००८
फोन : २०६६८

**मुद्रक**
श्रीपाद सीताराम गोसावी
राजहंस प्रिंटिंग प्रेस,
नागाळा पार्क,
कोल्हापूर–४१६ ००३
फोन : २३९०६

© प्रकाशकाधीन

**मुखपृष्ठ**
अनिल डेंगळे
C/o व्ही. जी. नगरकर
गुरुद्वारामागे, पंजाबी गल्ली,
कामटी रोड, नागपूर–४०० ००४

**प्रमुख वितरक**
मे. सिद्धार्थ बुक सेंटर
१३ ई, महालक्ष्मी चेंबर्स,
सेंट्रल एस. टी. स्टॅंडसमोर,
कोल्हापूर–४१६ ००१

**ब्लॉक**
मे. उदय प्रोसेस
खर्डेकर गल्ली,
कोल्हापूर–४१६ ०१२

प्रथम आवृत्ती, एप्रिल १९९१

मूल्य रुपये १५०/–

# दलित चळवळ

# Dalit Chalawal

**संपादन**
**शरणकुमार लिंबाळे**

**Edited**
**Sharankumar Limbale**

निबंध 3836
२६४१८
११८९

" क्रांतीचे चाक अर्धेच फिरले. आसासह चाक पूर्ण फिरल्याशिवाय खरी क्रांती होऊच शकत नाही, ते चक्र आम्हीच फिरवू. "

– डॉ. बाबासाहेब आंबेडकर

नामदेव ढसाळ
राजा ढाले
रामदास आठवले
अरुण कांबळे
जोगेंद्र कवाडे
प्रकाश आंबेडकर
व
लक्ष्मण माने
यांच्या हरेक प्रयत्नांना
ज्यांच्यामुळे चळवळी मांडल्या–मोडल्या.

– शरणकुमार लिंबाळे

# अनुक्रमणिका


● प्रस्तावना

कोठे होतो . . . कोठे गेलो ! — नामदार सुशीलकुमार शिंदे

दलित पँथरची गणगौळण — नामदेव ढसाळ

लढाई वहिवाटीसाठी — लक्ष्मण माने

असा न्याय दिला अन्यायग्रस्तांना — ज. वि. पवार

भटक्या–विमुक्तांची चळवळ — बाळकृष्ण रेणके

‘ रिपब्लिकन ऐक्य आणि मी ’ — प्रा. जोगेंद्र कवाडे

दलित स्त्री संघटना आणि मी — उर्मिला पवार

मातंग चळवळ आणि मी — प्रा. मच्छिंद्र सकटे

एकटा चलो रे — मल्लिकार्जुन बनसोडे

भटक्याविमुक्तांच्या शोधयात्रेचे दर्शन — लक्ष्मण गायकवाड

दलित विद्यार्थी चळवळ — संजय लांडगे

लोहार, गाडीलोहार संघटना — वैजनाथ कळसे

अत्तदीपभव — बाबूराव कांबळे

बातमी आणि मी — भीमराव शिरवाळे

चळवळ व मी — रमेश जाधव

चर्मकार चळवळ आणि मी — ना. म. शिंदे

मंडल आयोग व बामसेफची चळवळ — के. के. चौदंते

माझी सांस्कृतिक यात्रा — चंद्रशेखर रामटेके

धम्मचळवळ आणि मी — मीनाक्षी मून

मी शंकर बोऱ्हाडे — शंकर बोऱ्हाडे

कार्यकर्ता कलावंत म्हणून — लोकनाथ यशवंत

होलार समाज चळवळ व मी — प्रा. रघुनाथ आ. केंगार

कोरडा — मारुती बनसोडे

मागण्या अशा मांडतो — प्रकाश बन्सोड

# कार्यकर्त्यांच्या संदर्भातलं आत्मगत

सहा डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महानिर्वाण झाले. याच वर्षी माझा जन्म झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मरणोत्तरकाळातील एक दलित अपत्य म्हणून मी माझ्या समग्र जीवनाकडे पाहातोय.

आम्हाला मिळालेले स्वातंत्र्य, स्वातंत्र्यातही आमचे कुठलेच न सुटणारे प्रश्न, निवडणुका येतात-जातात फरक काहीच पडत नाही. कुठलेच सरकार क्रांतीचे चक्र पूर्ण 'आसासह' फिरवत नाही. आमच्यावरचे अत्याचार वाढतात, आम्ही सर्व ताकदीनिशी लढतो, काही मिळवतो, काही हरवतो पण आमचे आंबेडकरी स्वप्न साकार होत नाही. परत परत चळवळी बांधल्या जातात. कार्यकर्त्यांची फळी निर्माण होते. चळवळ गतिमान होते. नेतृत्वाची स्पर्धा, परत गटबाजी, चळवळीचं खच्चीकरण, कार्यकर्त्यांत नाराजी व निराशा, कार्यकर्ते, समाज, चळवळी व विचार गटागटात विभागले जातात. हे ऋतुचक्र मी पाहातोय, अनुभवतोय. ऐक्य होतेय, फिसकटतेय, चळवळी बरखास्त होतात. पुन्हा पुनर्जीवन होते, वेगळ्या चुली मांडल्या जातात. हे कुठंवर चालायचं ?

गावपातळीवर मागास जातीजातीत असलेल्या दुफळ्या शिवाय एकाच जातीत असलेले दोन गट आणि या सर्व मागासजातीवर असलेलं गावकऱ्यांचं निरंकुश प्रभुत्व यामुळे मी खूप अस्वस्थ व्हायचो. गावाच्या विरोधात काही करावं म्हटलं तर गावाच्या विरोधात जावं लागायचं. हा विरोध इतका सीमित स्वरूपाचा असता तर खूप बरे झाले असते. पण गावविरोधी लढ्याला आमच्याच समाजाचा पाठिंबा नसायचा. " आम्हाला इथं जगायचं आहे, आपण पायरीनं वागलं पाहिजे, गावकरी आपल्याला गाव बंद करतील, गावाच्या विरोधात आपण कसं टिकणार, आपण गावाचं मीठ खाल्लंय " अशा भावनेने तमाम समाज आम्हाला डाफरायचा. गावाची भीती आणि आपल्याच समाजाचा रोष पत्करायला नको म्हणून घरही विरोधीच वागायचं. "आम्हाला इथं राहायचंय, आम्हाला जगू देतो की नाही, सर्वजण आमची गाढवावरून धिंड काढतील, दहा जणांच्या विरोधात जाणं चांगलं नाही. असा उपदेश व शिव्यांची लाखोली ऐकावी लागायची. अशा अवस्थेत आपलं लाचार वागणं आवडायचं नाही. मन बंड करून उठायचं आणि याच मनात विस्तवाचं वादळ शिवशिवू लागायचं. या वादळाचं नाव असायचं डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

गाव सोडून शिक्षणाच्या निमित्ताने शहरात आलो तर इथंही वेगळाच गुंता होता. शहरी विरुद्ध ग्रामीण नेतृत्व हे जसं होतं, तसं महारविरुद्ध महारेतर अशी अंतर्गत दुहीही नांदत होती. कार्यकर्त्यांची स्पर्धा, चढाओढ, चळवळीतील गटबाजी याचं जवळून दर्शन झालं. आपण कुठं काम करावं ? हा प्रश्न खूप अस्वस्थ करणारा वाटे. संपूर्ण दलित समाजाची एक अभेद्य संघटना असावी असा विचार मी साधनेच्या १८ जुलै १९८१ च्या अंकात मांडला होता.

दलित पँथर, भारतीय दलित पँथर, मासमुव्हमेंट, दलित मुक्ती सेना, समता सैनिक दल, दलित युवक आघाडी अशा कितीतरी नवबौद्ध तरुणांच्या संघटना काम करत होत्या. डी. एस. फोर, बामसेफ बहुजन समाज पार्टी, रिपब्लिकन पक्षाचे गट, महाविद्यालयीन दलित तरुणांच्या संघटना, बौद्ध धम्माच्या संघटना व त्यांचे कार्यक्रम यात कुठं कसं शिरावं हा भेडसवणारा प्रश्न वाटे. बौद्ध, महार समाजाचं हे चित्र होतं तर महारेतर समाज चळवळीपासून उदासीन होता.

दलित चळवळ म्हणजे केवळ नवबौद्धांची चळवळ नव्हे,नवबौद्धांशिवाय दलित समाज आहे, त्यांचेही प्रश्न आहेत. पण हा समाज आपापल्या जातीच्या चळवळी बांधण्यात, नवबौद्धांच्या विरोधी उभा राहाण्यात व काँग्रेसधार्जिणा होण्यात धन्य मानत होता. नवबौद्ध समाज प्रत्येक प्रश्नावर लढायला तयार पण इतर दलित समाज वेगळा पडे. म्हणून नवबौद्ध तरुणांत या समाजाविषयी मत्सराची भावना वाढायची. '(बंदुकीच्या)गोळीला आम्ही, पोळीला ते' अशी म्हणच रूढ होत होती तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आमच्यासाठी काहीच केलं नाही. सर्व सवलती महारांनाच मिळतात अशी मत्सराची भावना महारेतर समाजात फोफावत असायची. आमचे प्रश्न केवळ सामाजिक आहेत असे नव्हे तर आर्थिकही आहेत याची जाणीव होऊ लागली. महारेतर समाज चळवळीत आला पाहिजे असं प्रकर्षानं वाटू लागलं.

महार, मांग, चांभार व ढोर अशा बहिष्कृत जातींना गावाबाहेर का होईना स्थान आहे. वेगळा का होईना पाणवठा आहे, स्मशानभूमी आहे. पण जे भटकत आहेत, जगण्यासाठी चोरी करणं, भीक मागणं हाच ज्यांचा व्यवसाय आहे अशा भटक्या विमुक्तांचीही चळवळ, त्यांचे प्रश्न, त्यांचे मोर्चे, त्यांची शोभायात्रा आणि कार्यकर्ते जवळून पाहिले. त्यांच्यात मिसळलो. या चळवळींचं महत्त्व आणि मोठेपण कळालं. या चळवळींतही नेतृत्वस्पर्धा आणि गटबाजीनं पाय रोवले, चळवळ संपली.

रिपब्लिकन पक्षाचं ऐक्य झालं. समाजाची तशी उत्स्फूर्त इच्छा होती. सर्व संघटना लयाला गेल्या. एकसंघ रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली. ही पक्षबांधणी केवळ नवबौद्धांपुरती सीमित होती. नवबौद्धांशिवाय ज्या चळवळी आहेत त्याही संघटीत होण्यासाठी धडपडू लागल्या पण कुणीच संघटीत झालं नाही.

रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्यासाठी अनेक सामाजिक प्रश्नांवर लढणाऱ्या दलित तरुणांच्या संघटना बरखास्त करण्यात आल्या. केवळ राजकीय हेतूने रिपब्लिकन पक्षाची एकजूट झाली. निवडणूक हे या ऐक्याचे एकमेव उद्दिष्ट होते. पण या निवडणुकीत एकही जागा जिंकता आली नाही. या मोबदल्यात रात्रन्दिवस राबणाऱ्या कार्यकर्त्यांच्या संघटना काढून घेण्यात आल्या. जे कार्यकर्ते लोकांचे प्रश्न घेऊन कचेरी, कार्यालयात मांडत होते, ते कार्यकर्ते, काँग्रेस कार्यकर्ते व काँग्रेस कार्यालयाभोवती फिरताना दिसू लागले. सामाजिक कार्यकर्ते व सामाजिक प्रश्न यांच्याकडे या ऐक्याच्या प्रक्रियेत पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले होते.

रिपब्लिकन ऐक्यामुळे केंद्र सरकारकडून नवबौद्धांना सवलती मिळाल्या, असाही प्रचार झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतरत्न ही पदवी मिळाली.

चळवळीत आशेचं वातावरण निर्माण झालं. पॅन्थरचे टी. एम. कांबळे व भटक्यां विमुक्त चळवळीचे लक्ष्मण माने यांना विधान परिषदेचे सदस्यत्व मिळाले. रामदास आठवले यांना शरद पवारांनी समाज कल्याण मंत्रीपद दिले, प्रकाश आंबेडकरांना राज्यसभेचे सदस्यत्व मिळाले, अरुण कांबळे यांना जनता दलाचे सेक्रेटरीपद मिळाले तर काही दलित लेखकांना महराष्ट्र सरकारने शासकीय मंडळावर नेमले. काही जणांनी फुले–आंबेडकर विशेषांक काढले, परिसंवाद व व्याख्याने झाली. सांस्कृतिक सभासंमेलनांचं आयोजन झालं. पण कार्यकर्ता अनिश्चितपणे या भाऊगर्दीत चिरडला जातोय.

कार्यकर्ते रस्त्यावरून मंत्रालयात गेले.

पण प्रश्न ?

प्रश्न आहेत तसेच आहेत.

लोकांच्या प्रश्नासाठी प्रामाणिकपणे लढणाऱ्या कार्यकर्त्यांची कोंडी झाली आहे. ही कोंडी फोडण्याचा, निदानपक्षी आत्मटीका तरी करण्याचा आमचा हा संपादकीय प्रयत्न आहे. अनेक पातळ्यांवर, थरांवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची मनोगतं या संपादनात मांडली आहेत.

ऐक्य व्हावं म्हणून सर्व समाज झपाटून जागा झाला. पण ऐक्य बिघडल्यावर कुणीच काही बोललं नाही. सगळे चिडीचूप, हा प्रकारच कळत नाही. रामदास आठवले यांच्या नागपूर व सोलापूर इथल्या पँथर गटानं पँथरचं अस्तित्व कायम राखलं, नामदेव ढसाळांनी बंडखोर दलित पँथरचं पुनरुज्जीवन केलं. पुनश्च हरी ओम. या रहाटगाडग्यात सामान्य कार्यकर्त्याचं काय होणार ?

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळातल्या जुन्या कार्यकर्त्यांचा ताफा अजूनही समाजात वावरतो आहे. या जुन्या कार्यकर्त्यांची आंबेडकरी विचारावर प्रचंड निष्ठा आहे. बाबासाहेबांचा विचार व संघटना प्रमाण मानून ते कार्य करतात हा कार्यकर्ता साधन वंचित आहे. आयुष्यभर कार्य करून तो उभा राहू शकला नाही. कारण त्याने निःस्वार्थ भावनेने सेवा केली. तो कुठल्या पक्षाला विकला गेला नाही. तो सहकार क्षेत्र व शासकीय योजना यापासून दूर राहिला. त्यामुळे तो दुर्बल बनला. शिवाय तो अल्पशिक्षित आहे. या जुन्या कार्यकर्त्यांची दलित समाजाने उपेक्षाच केली आहे. या जुन्या कार्यकर्त्यांनी नवं काही घडवलं नाही. केवळ निवडणुकीच्या युतीपुरतेच यांचे कार्य राहिले. पण काळाच्या ओघात नवी पिढी आली, नव्या समस्या झाल्या. या नव्या आव्हानापुढे जुने कार्यकर्ते थिटे पडले. त्यांच्या नेतृत्वाची ही मर्यादाच होती.

महात्मा फुले आणि आंबेडकरांचं नांव घेऊन इथं नवा जातीयवाद वाढत आहे. सवर्णांत दलित विरोधी भावना खूप जोमाने काम करते आहे. या नव्या परिस्थितीला जुन्या कार्यकर्त्यांना सामोरे जाणे जमले नाही. नवशिक्षित तरुणांची कोंडी झाली. ते हतबल नेतृत्वाविरुद्ध उभे राहिले. प्रत्येकाने आपल्या कुवतीप्रमाणे चळवळ सुरू केली. आपल्यापरीने ते आंबेडकरी विचार मांडू लागले.

या दोन वर्गाच्या कार्यकर्त्यांशिवाय दुसरा एक कार्यकर्त्यांचा वर्ग आहे तो म्हणजे कॉंग्रेसधार्जिणा वर्ग होय. सत्तेतल्या पक्षात या कार्यकर्त्यांनी प्रवेश करून माया कमवली आहे. सहकारात व शासकीय मंडळावर अशा कार्यकर्त्यांची वर्णी लागली आहे. समाज व चळवळ स्वतःच्या स्वार्थासाठी राबवणारा हा कार्यकर्ता आहे. सत्तेत असल्यामुळे आर्थिक सुबत्ता व मनुष्यबळ या कार्यकर्त्यांकडे उपलब्ध आहे. कार्यकर्ता अनेकवेळा समाजावर व चळवळीवर लादला जातो. त्यामुळे चळवळी क्षीण होतात आणि कार्यकर्त्यांत नाराजी पसरते. नेता आपली 'री' ओढणाऱ्या कार्यकर्त्यालाच उभा करतो. 'री' ओढणाऱ्या कार्यकर्त्यांची एक लॉबी असते. आज कार्यकर्ता होण्यासाठी त्याच्या कामापेक्षा त्याला गॉड फादर असणे महत्त्वाचे असते. हा गॉड फादर आपल्या फॅनवर चळवळ सोपवतो. हा कार्यकर्ता समाजाच्या कामापेक्षा गॉड फादरचीच कामं करतो. त्याला प्लीज करतो. त्याचे दौरे, त्याचा खर्च त्याचा मुक्काम व खाना याची सोय करतो.

राजकीय पुढारीही कार्यकर्त्यांना आपले 'एजंट' म्हणून वापरतात. जो दुबळा आहे, उद्या आपला प्रतिस्पर्धी होणार नाही अशा दुय्यम दर्जाच्या कार्यकर्त्याला हाताशी धरून त्या मोहल्ल्यात आपलं नेतृत्व टिकविण्याचा प्रयत्न करतात.

पोलिसखातेही कार्यकर्त्याला आपला 'मध्यस्थ' म्हणून वापरतात. कुठलेही प्रश्न आपल्या मर्जीतल्या कार्यकर्त्याच्या सल्ल्यानेच पोलिसखाते सोडवत असते. कार्यकर्ताही हस्तेपरहस्ते पोलिसांना मदत करत असतो. त्यांच्या बदल्या, हप्ते, त्यांना हवी असलेली माहिती या मध्यस्थ कार्यकर्त्यांकडून विनातक्रार पार पडत असते. अशा कार्यकर्त्याचं 'सोशल स्टेटस' पोलिसांकडून निश्चित केलं जातं.

दैनंदिन जीवनात भेडसावणारे लोकांचे काही प्रश्न असतात. उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, संजय गांधी स्वावलंबन योजना व निराधार योजना, मागासवर्गीयांच्या विकासाची महामंडळं, बँक कर्ज प्रकरणे अशा प्रकरणात कार्यकर्ता गरजू व्यक्ती व संबंधित अधिकारी यांच्यात 'दलाल' म्हणून काम करतो. गरजू व्यक्तीकडून कार्यकर्त्याला पैसे मिळतात. कार्यकर्त्याकडून अधिकाऱ्याला कामाचे कमिशन मिळते. अधिकारीही आपल्या मर्जीतल्या कार्यकर्त्याची प्रकरणं हातावेगळी करत असतो. अशा प्रकारे शासकीय कार्यालयातून कार्यकर्ते निर्माण केले जातात.

दोन नंबर धंदेवाल्याकडूनही काही कार्यकर्ते पेरले जातात. त्यामुळे चळवळीत 'माफिया गँग 'येते. लंपेन इलेमेंटचा फैलाव होतो. चळवळीत गुन्हेगार कार्यकर्त्यांची गँग वाढते. कमीटमेंटपेक्षा डिनर पार्टीला महत्त्व प्राप्त होतं. आयडॉलॉजी ॲन्ड प्रिन्सिपाल यापेक्षा स्ट्रॅटजीचा डाव खेळला जातो. दबावाचे राजकारण सुरू होते. सुरामाऱ्याची भाषा अवतरू लागते. रचनात्मक कामापेक्षा पोलीस चौकी व कोर्ट हेच कार्यकर्त्यांचे केंद्र बनू लागते. गुन्हेगार कार्यकर्त्यांच्या गँगमुळे चळवळीत एक हिंसक वातावरण व तणाव नांदू लागतो. गुंडांना पोलिसांपासून त्रास होतो पण हेच गुंड कार्यकर्ते बनले की पोलिसांपासून त्यांची सुटका होते व त्यांच्या गुन्हेगारीला रान मोकळे होते. पोलिसांचा त्रास वाचावा म्हणून दोन नंबर धंदेवाले

कार्यकर्त्यांना हाताशी धरतात. चळवळीच्या कार्यक्रमांना पैसा पुरवतात. पत्रके छापणे, मंडप घालणे, देणगी देणे अशाप्रकारे पैसा पुरवून ही मंडळी जाहीर कार्यक्रमातून समाजात वावरतात. प्रतिष्ठा पावतात. ही मंडळी आपल्याला हवा असलेलाच कार्यकर्ता जवळ करतात. व त्याला पैसा देतात.

संस्थानिक कार्यकर्त्यांचा एक संच नव्याने पुढे येत आहे. ही मंडळी समाजसेवा एक व्यवसाय म्हणून स्वीकारत आहेत. शासकीय योजना राबवणं, अनुदान मिळवणं, परकीय पैसा पदरात पाडून घेणे. अशाप्रकारे पैसा मिळवणारा एक नवाच कार्यकर्ता प्रस्थापित होत आहे. 'मिळवणं' व 'मिरवणं' हा याचा हेतू असतो. चळवळी रजिस्टर करून कार्यालये थाटून यांचा समाजसेवेचा रचनात्मक उद्योग चालू असतो.

या सर्वांनाच कार्यकर्ता म्हणता येईल ?

* * *

आजचं सामाजिक जीवन खूपच गुंतागुंतीच झालं आहे. सर्व प्रश्न राजकारणाशी निगडीत आहेत. त्यामुळे आपले प्रश्न धसास लावण्याची नवीनच रीत पुढे येत आहे. सत्याग्रह, उपोषण ही हत्यारे आता बोथट झाली आहेत. घेराओ, निदर्शने, रस्ता रोको,अधिकाऱ्यांना पळवणे, दगडफेक करणे, सक्तीने बंद पाळावयास लावणे, आक्रमक भाषणे, आत्मदहन अशा पद्धतीने चळवळी वाढत आहेत. सर्वच पातळीवर आक्रमक आक्रोश व तणावपूर्ण संताप वाढत चालला आहे. सांसदीय चौकटीत आपले प्रश्न सुटू शकत नाहीत. असांसदीय मार्गानेच आपले प्रश्न सोडवले पाहिजेत ही भावना उत्तरोत्तर वाढत आहे. दलित चळवळ मात्र मोर्चांच्या माध्यमातूनच आपले प्रश्न मांडते आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

दलित कार्यकर्त्यांतही दोन प्रकारचे कार्यकर्ते आहेत. एक पांढरपेशा तर दुसरा अल्पशिक्षित असा. सुशिक्षित कार्यकर्त्यांची नेहमीच समन्वयाची भूमिका असते. खरं तर उच्च शिक्षित माणूस कार्यकर्ता अपवादानेच होताना दिसतोय. ज्यांना नोकरी मिळत नाही, जे बेकार आहेत तेच चळवळीत पडत आहेत. सामान्य कार्यकर्ता एका आत्यंतिक ओढीनं चळवळीत स्वतःला झोकून देतो. हा त्याचा उमेदीचा काळ असतो; त्याची नेतृत्वावर निष्ठा असते. पण खूप काळ गेल्यानंतर त्याला आपण वापरले गेलो आहोत याची जाणीव होते.

निवडणुकीपुरते काही कार्यकर्ते निर्माण होतात. ते कार्यकर्ते असण्यापेक्षा पगारी नोकरच म्हणून वावरतात. हा त्याचा कमवण्याचा काळ असतो. सरळ सरळ मताचा लिलाव होतो. आपला वेळ, पैसा आणि कार्य भांडवलासारखं चळवळीत गुंतवून पुढे याचा फायदा कसा करून घेता येईल असा विचार करणारेही कार्यकर्ते आहेत. ते लांबचा विचार करून आपली स्ट्रॅटेजी आखतात. त्यांच्याकडे कामाचे नियोजन असते. कार्यकर्ते वापरण्याची कला असते.

समाज कार्यकर्त्याकडे उपेक्षेनेच पाहातो. ज्या कार्यकर्त्याकडे फोन, बंगला व गाडी आहे त्याच्यामागे समाज जातो. जो रोज भेटतो,जो त्यांची कामं करतो असा

कार्यकर्ता त्यांना पटत नाही. ज्या समाजाचं काम कार्यकर्ता करत असतो तो समाजच त्याला जवळ करत नाही.राजकीय कार्यकर्त्यांशिवाय इतर सामान्य कार्यकर्त्याला काम करणं म्हणूनच अवघड होतं. सामान्य कार्यकर्त्याची कुचंबणा होते. शासन दरबारी त्याचे काम होत नाही. काही कार्यकर्ते याला अपवाद होऊ शकतील. पण सामान्य कार्यकर्त्याचं काय ? काही कार्यकर्ते प्रसिद्धी व प्रतिष्ठेसाठी चळवळीत येतात.

कार्यकर्त्याला उपजीविकेची हमी नसते तरी तो काम करत असतो. तो संबंध आयुष्य जाळतो पण त्याला त्या मोबदल्यात काहीच मिळत नाही. उलट अशा कार्यकर्त्याला संपवण्याचीच व्यापक मोहीम सदैव सुरू असते. नव्या कार्यकर्त्याच्या सामाजिक जीवनाचा खून केला जातो. त्याला आयुष्यातून उठवण्याचा प्रयत्न हितसंबंधी कार्यकर्ते करत असतात. एखाद्या कार्यकर्त्याचे शासकीय काम न होऊ देणे, त्याची बदनामी करणे, तो चारित्र्यहीन आहे, भ्रष्टाचारी आहे, आपल्या विचाराचा नाही अशा पद्धतीचा अपप्रचार केला जातो. एखादा कार्यकर्ता शारीरिकदृष्ट्या कमकुवत असेल तर त्याच्याशी दादागिरी करून त्याला हुसकावले जाते. त्याच्या उपजीविकेच्या साधनांवर हल्ला केला जातो. वरच्या नेत्यांचे त्याच्या विरोधात कान भरले जातात. कार्यकर्त्याला कार्यक्रमाच्या सूचना न देणे, त्याला भाषण न करू देणं, त्याचं नाव प्रसिद्धीस न देणं असेही प्रकार केले जातात. यामुळे नवा कार्यकर्ता निर्माण होऊ शकत नाही. नव्याची कोंडी केली जाते. त्याला संधी दिली जात नाही. त्याच्यावर वैचारिक दादागिरी करून त्याला दडपले जाते.

नवा येणारा कार्यकर्ता तरुण असतो. त्याच्याकडे संघर्ष करण्याची धमक असते. त्याच्या हाती नेतृत्व जाऊ नये म्हणून जुना कार्यकर्ता काळजी घेत असतो. नव्या उगवणाऱ्या नेतृत्वाकांक्षी कार्यकर्त्यापासून इतर कार्यकर्त्यांना तोडले जाते व त्याला एकाकी पाडले जाते.

दलित चळवळीतला कार्यकर्ता सवर्ण पुरोगामी संघटनेत मान्य केला जात नाही. त्याच्याकडे नेतृत्व दिले जात नाही. त्याला दुय्यम ठेवले जाते. त्याला तोंडी लावायला वापरले जाते. त्याच्या कार्याचा वापर करून घेतला जातो. त्याची आंबेडकरनिष्ठा त्यांना सलत असते. पुरोगामी मंडळी गांधी, लोहिया, जयप्रकाश व नेहरूंचा विचार मांडत असतात. घरातलं सनातन वास्तव त्यांनी राखलेलं असतं. सत्यनारायणाची पूजा, गृहशांती, व्रतवैकल्ये, पूजाअर्चा चालूच असते. घरात शंकराचार्यांचा कायदा चालू असतो, घराबाहेर पुरोगामी विचार घेऊन ही मंडळी वावरतात. स्वतःच्या घराचा, समाजाचा बदल करणे यांना अशक्य असते. पण हे दलित उद्धाराची भाषा बोलत असतात. अशा कार्यकर्त्याबरोबर काम करताना दलित कार्यकर्त्याची खूप गोची होती. त्याची जात त्याला सदैव गतीरोधक ठरत असते. दलित कार्यकर्त्याला पद्धतशीर टाळलं जातं.

चळवळी जगण्याचं साधन बनत आहेत. कार्यकर्ता चळवळीबाहेर फेकला गेला की त्याची ससेहोलपट होते. तो चळवळीत व आघाडीवर राहण्याचा प्रयत्न करतो. नेतृत्व टिकविण्याचा प्रयत्न करतो. आपल्या नेतृत्वाचा उपयोग तो वैयक्तिक

स्वार्थासाठी करतो. पोलिसांकडून पैसे घेणे, रेशन दुकानदाराकडून पैसे मिळविणे, पोलीस केसमध्ये तडजोड घडवून पैसे खाणे, एखाद्याचे काम करण्यासाठी पैसे घेणे असे प्रकार रूढ होतात.

कार्यकर्त्यांना पैशाची अत्यंत गरज असते. सारी सोंगं करता येतात पण पैशाचं सोंग करता येत नाही. कार्यकर्ता पैशाशिवाय काम करू शकत नाही. घरचं खाऊन तो लष्कराच्या भाकरी भाजत असतो. त्याला रिक्षाभाडे, पत्रव्यवहार, स्टँप, टायपिंगचा खर्च हा दिलाच पाहिजे. त्याचे शोषण होऊ नये. त्याचा उत्साह, उमेद वापरली जाऊ नये. तो आपला नोकर नाही याची जाणीव सतत असली पाहिजे. कार्यकर्त्यानेही सेवाभावानेच काम केले पाहिजे. एखाद्याला अडवून धरू नये. कार्यकर्ता कामासाठी पैसा मागू लागला की गरजू व्यक्ती जो कमी पैशात काम करेल त्याच्याकडे धाव घेते.

कार्यकर्त्याने इतर कार्यक्रमाचे व कार्यकर्त्यांचे निरीक्षण केले पाहिजे. सतत आत्मपरीक्षण केले पाहिजे व आपल्या कार्याची पद्धती ठरवली पाहिजे, तरच त्याच्या नेतृत्वगुणाचा विकास शक्य आहे. इतरांच निरीक्षण, आत्मपरीक्षण व वाचन, चर्चा, चिंतन यामुळे कार्यकर्त्याचा व्यक्तिमत्व विकास आपोआप होतो.

कार्यकर्ता जसा वस्तीत राहाणरा असतो तसा वस्तीबाहेरून येणाराही असतो. वस्तीत राहाऱ्या कार्यकर्त्याला लोकांच्या दैनंदिन समस्यांना नेहमीच सामोरं जावं लागतं. त्यामुळे एक पक्ष दुखावतो व एक पक्ष सुखावतो. दुखावला पक्ष कार्यकर्त्याच्या विरोधात प्रचार करतो. त्याला बदनाम करतो. वस्तीबाहेरून येणाऱ्या कार्यकर्त्याला याचा उपसर्ग पोहचत नाही. पण समाजात राहणाऱ्या कार्यकर्त्याला चोवीस तास वेठबिगारासारखे काम करावे लागते. नळावरची भांडणं असोत की नवरा बायकोची तक्रार असो अशा प्रकरणातही कार्यकर्त्याला भाग घ्यावा लागतो.

एखादा प्रश्न आपल्याकडे आला तर तात्काळ निर्णय घेऊ नये. भावनाविवश होऊ नये. प्रश्न घेऊन येणारी व्यक्ती खोटी असू शकते. ती ज्या भागातून आली त्या भागातल्या आपल्या कार्यकर्त्याशी संपर्क साधून सदर प्रश्नांची सविस्तर माहिती मिळवली पाहिजे. त्या भागात आपला कार्यकर्ता नसेल तर चार चौघांचा सल्ला घेतला पाहिजे. दोन्ही पक्षाचं ऐकून घेतलं पाहिजे. मगच पुढच्या कृतीचा योग्य निर्णय घ्यावा. हा निर्णय घेतानादेखील आपल्या सहकारी कार्यकर्त्याचा विचार घ्यावा. तो एकट्याचा निर्णय होऊ नये याची काळजी घ्यावी. एकदा निर्णय घेतला की तो लावून धरला पाहिजे.

लोकांचे प्रश्न एकदम पोलीस चौकीत घेऊन जाऊ नयेत. ते स्थानिक पातळीवर मिटवणे खूप हिताचे असते. प्रश्न जर स्थानिक पातळीवर मिटत नसेल तरच पोलिसांच्या हवाली करावा. प्रश्नाच्या स्वरूपावरून त्याच्या सोडवणुकीचा मार्ग ठरवता येतो. त्यासाठी प्रश्न व प्रश्नाच्या परिणामाचा अभ्यास केला पाहिजे.

प्रश्न सुटो वा न सुटो काही काळच लोकांना बरे वाटत असते. नंतर सर्वसामान्य जनता चळवळीना विसरून जाते, चळवळीचा विचार ते स्वीकारत

नाहीत. पूर्ण समाज चळवळमय होत नाही. जो आपले प्रश्न सोडवेल त्याच्यामागे समाज धावतो. कुठल्याही प्रश्नांना काही ना काही सोल्यूशन असतेच. किमान समाधान तरी पदरी पडते हे नाकारता येत नाही.

कार्यकर्ता लोकांना गुंड म्हणून हवा असतो.
कार्यकर्ता लोकांना नोकर म्हणून हवा असतो.
कार्यकर्ता लोकांना पुढारी म्हणून हवा असतो.
कार्यकर्ता लोकांना मध्यस्थ म्हणून हवा असतो.
कार्यकर्ता लोकांना मित्र म्हणून हवा असतो.

कार्यकर्ते पूर्णवेळ काम करणारे असतात तसे अर्धवेळ काम करणारेही असतात. आपली नोकरी, धंदा व्यवसाय व घर सांभाळून काम करणाऱ्याची पूर्ण वेळ कार्यकर्त्याकडून टर उडवली जाते. पू. वे. का. स्वतःला 'हिरो' ठरवत असतो.

सार्वजनिक जीवनात चारित्र्याइतकाच चहा महत्त्वाचा आहे. चहा हे सर्व सामान्य जनतेचं पेय आहे. रांगेतल्या शेवटच्या माणसाच्या आदराचे ते प्रतिक आहे. आपण त्याचा चहा घेतला नाही तर त्याच्यात मिसळू शकत नाही. ज्या समाजात काम करावयाचे त्याची भाषा वेगळी असेल तर प्रॉब्लेम निर्माण होतात पण भाषापेक्षा प्रश्न महत्त्वाचे असतात. वेदना महत्त्वाची असते. त्यामुळे ग्रास रूट लेव्हलवर काम करताना इतके अवघड जात नाही.फिल्डवर्क करताना मदत करणारे आपोआप भेटतात. त्यासाठी आपली वृत्ती माणूस संग्राहाची, आपलेपणाची असली पाहिजे. अशा समाजात येणारी माणसं एकतर पैसा जमा करायला येतात किंवा पैसे द्यायला येतात तेव्हा 'आम्हाला काय देणार?' तुम्हाला किती पैसे मिळतात?' असे प्रश्न प्रत्येकाच्या नजरांनी विचारलेले असतात. त्यांना विश्वासात घ्यावे लागते. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावा लागतो. त्यांच्या पाठीशी उभे रहावे लागते. कार्यकर्त्यांत जरूर स्पर्धा असावी. या स्पर्धेतून चांगले व्हावे. पण स्पर्धा सदोष होते आहे. अशा स्पर्धेत कार्यकर्त्यांपेक्षा समाजाचेच जास्त नुकसान होते.

महिला कार्यकर्त्यांचे शोषण केले जाते. 'कार्यकर्ता' म्हणून तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्व फुलू दिले जात नाही. ती कायम आपल्या पाठीमागे कशी राहील याचाच विचार केला जातो. ती सूज्ञ झाली तर इतरांच्या पाठी लागेल हा अविश्वास असतो. समाजकार्य करणाऱ्या स्त्रियांची घरातून व चळवळीतूनही मुस्कटदाबी केली जाते. केवळ स्त्रीचा उत्साह व श्रम याचा खुबीने वापर करून घेतला जातो. स्त्री-कार्यकर्ती चळवळीत काम करताना एखाद्या समविचारी कार्यकर्त्याशी अधिक बोलू लागते म्हणून तिच्या चारित्र्यावर संशय व्यक्त केला जातो. नवे नवे कार्यकर्ते निर्माण होणे हे चळवळ जिवंत ठेवण्यासाठी गरजेचे आहे. सर्वत्र एकट्यानेच फिरणे अवघड असते. एकखांबी तंबू केव्हाही कोसळू शकतो, नेता संपला की चळवळ संपू नये. नेतृत्व ठराविक काळानंतर फिरतं असावं ती एकाची मक्तेदारी होऊ नये. कार्यकर्त्यांचं जाळं तळागाळापर्यंत विणलेलं असावं तरच चळवळ टिकते.

आजचा कार्यकर्ता नव्यानव्या प्रश्नांचा शोध घेत नाही. लोकच त्याच्याकडे आपले प्रश्न घेऊन येतात. कार्यकर्ता केवळ निवेदने देणे व वर्तमानपत्रात बातम्या प्रसिद्ध करणे एवढ्यातच धन्यता मानत आहे. बातम्यासाठी तो काम करू लागला. निवेदन व बातम्या टाईप करणे हा त्याचा एक कलमी कार्यक्रम बनतो. स्टंट करण्यासाठी काही धडाकेबाज कार्यक्रम घेतले जातात. यातून केवळ धूळ उडते. प्रश्न तसेच राहतात.

कार्यकर्त्याची पत्नी मिळवती असावी. तिने आपल्या नवऱ्याची समाजसेवा खुल्या दिलाने स्वीकारावी. एखाद्या कार्यकर्त्याला त्याच्या कुटुंबाने जगवावे. त्याच्या ऐतखाऊपणावर टोमणे मारू नयेत. तरच कार्यकर्ता जोमाने कार्य करू शकतो. कार्यकर्त्याला खासगी जीवन नसते, तो कुटुंबावर व स्वतःवर अन्यायच करत असतो.

खरा कार्यकर्ता कधी एकटा पडत नाही. कार्यकर्त्याने नवे कार्यकर्ते निर्माण केले पाहिजेत. सिगारेट आण, दारू आण, चहा सांगून ये ही कामे सामाजिक नाहीत. अशी कामं ज्यांची त्यांनीच केली पाहिजेत. अशा कामासाठी कार्यकर्त्याला वापरू नये. कार्यकर्त्याच्या जीवनात विसंगती असू नये. कार्यकर्ता हा घरात कार्यकर्ता नसतो. तो समाजाचं प्रबोधन करतो, पण घराचं नाही. बाहेर समतेची भाषा बोलतो, पण घरात इतरांना समता नाकारतो.

कार्यकर्ता व नेता यांचे संबंध तात्त्विक व सैद्धांतिक पातळीवरचे असावेत. जर हे संबंध व्यक्तिगत झाले तर व्यक्तीपूजा बळावते व एकखांबी नेतृत्व निर्माण होते. सर्व कार्यकर्त्यांना मान्य होणारे नेतृत्व असावे. चळवळीची समग्र अभिव्यक्ती असणारं नेतृत्व हवं. चळवळ व कार्यकर्त्याचं नातं एका व्यापक कुटुंबाप्रमाणे असावं पण त्यात व्यक्तिनिष्ठा असावी. कार्यकर्ता व नेता यात सतत संवाद असावा न तर कार्यकर्त्यात गैरसमज होतात, त्यांची नाळ तुटते.

राजकीय कार्यकर्ता व सामाजिक कार्यकर्ता यांच्या महत्वाकांक्षा आणि हेतू यात खूप तफावत असते. समाजव्यवस्था बदलणारे कार्यकर्ते आपण समाजाचे देणे लागतो म्हणून काम करताना तर राजकीय कार्यकर्ते चळवळी व संस्था यांना आपल्या हितासाठी व हेतूसाठी वापरत असतात. त्यांचं काम व्यापारी तत्त्वावर चाललेलं असतं. कार्यकर्ता सामाजिक प्रश्नापेक्षा वैयक्तिक प्रश्नांना महत्त्व देऊ लागला की तो वाईट मार्गाला लागतो. कार्यकर्ता सुखवस्तू बनतो. त्याचा सामाजिक स्तर बदलला की तो आपल्या मर्यादा सांगू लागतो. त्याची कार्यकर्त्याची परिभाषा पूर्णपणे बदलते. ती त्याच्या सोयीची असते.

कार्यकर्त्यांच्या मनात जेव्हा नेतृत्वाचा अंकुर फुटतो तेव्हा स्पर्धेला सुरुवात होते. कार्यकर्त्याची बांधिलकी हीच त्याची योग्यता असते. कार्यकर्त्याची पूर्ण बुद्धी, जिद्द, त्याची उर्मी चळवळीत पूर्णपणे वापरली जात नाही. कार्यकर्त्यांचा तात्कालिक व अंशतःच वापर करून घेतला जातो. कार्यकर्त्याचा उत्साह व उमेद तशीच वाया जाते. दूरगामी विचार करून कार्यकर्त्याला घडवलं जात नाही. यासाठी वर्कशॉप घेतला जात नाही. यासाठी योग्य व निर्णायक दिशेने कार्यक्रम राबवले

पाहिजेत. प्रश्नाचा चिकाटीने पाठपुरावा केला पाहिजे. विचार व कार्यावर निष्ठा आहे पण त्या प्रमाणात प्रतिसाद मिळत नसेल तर कार्यकर्त्यात नाउमेद, निरुत्साह व निराशा पसरू शकते. हे फ्रेस्ट्रेशन टाळणं महत्त्वाचं आहे.

कार्यकर्त्याला अंधारात ठेऊन नेता जेव्हा निर्णय घेऊ लागतो तेव्हा चळवळीत अविश्वासाचं नातं निर्माण होतं. नेता जेव्हा कार्यकर्त्याला टाळू लागतो तेव्हा तो कार्यकर्ता खचू लागतो. त्याला असं तोडणं म्हणजे त्याला सार्वजनिक जीवनातून एक प्रकारे उठवणेच असते. सौद्यात अडकलेला नेता कुठलेही प्रश्न ताकदीने धसास लावू शकत नाही. कारण त्यात त्याचे हितसंबंध गुंतलेले असतात. पण निर्भय; नि:स्वार्थ व नि:स्पृह कार्यकर्ता प्रश्न धसास लावू लागतो आणि त्याच्यात व नेतृत्वात दरी वाढू लागते. कार्यकर्ता जर चळवळविरोधी असेल तर त्याला गुन्हेगार ठरवले जावे. पण वैयक्तिक हेवेदाव्यातून त्याला बदनाम करू नये. गुन्हेगारांना चळवळीने प्रतिष्ठा देऊ नये. कारण यामुळे चळवळ बदनाम होण्याचा धोका असतो. संघटना, ऐक्य, विचार व कार्याशी फारकत झाली की कार्यकर्ता अप्रामाणिक बनतो. तो सर्वच पातळीवर भ्रष्ट ठरतो. त्याची सामाजिक उंची वाढली की तो चळवळीचा ठेकेदार बनतो. फुले–आंबेडकरांच्या नावाने शोषण सुरू करतो.

कार्यकर्त्याची सतत तळातल्या लोकांशी बांधिलकी असायला हवी. त्या लोकांशी त्याचे नाते बरोबरीचे असावे. त्यांच्याशी वागताना बोलताना साहेबी थाट नसावा. आपण ज्या लोकांचे प्रतिनिधी म्हणवून घेतो. त्यांच्यात व आपल्यात अंतर पडता कामा नये. सामान्य माणसाला सदैव समजून घेण्याची तत्परता असावी तरच लोकांशी असलेली नाळ तुटणार नाही. बुद्धी आणि मनाला जर समाजकार्य पटलेलं असेल तर तो कार्यकर्ता माघार घेत नाही. कार्यकर्ता मनाने व विचाराने पूर्ण तयार झालेला असवा,

स्वत:च्या हितसंबंधासाठी लढणे म्हणजे चळवळ नव्हे. दुसऱ्यासाठी लढणे म्हणजेच बांधिलकी होय. सर्वोच्च त्यागाला कार्यकर्त्याने सदैव तयार असायला हवे. कातडी बचावू धोरण असणारा कार्यकर्ता असू शकत नाही. कार्यकर्त्याच्या मनात सतत विचार करण्याची प्रक्रिया सुरू असायला हवी. त्याची बुद्धी सतत जागृत असायला हवी. तो सतत अन्यायात हस्तक्षेप करणारा असावा. तो उघडच्या डोळ्याने दुसऱ्याचे शोषण पाहू शकत नाही. दुसऱ्यासाठी जगणं हे त्याचं आयुष्य असतं. विचार, नेतृत्व, प्रश्न व साधनं ही कार्यकर्त्यांना शक्ती देणारी चेतनाकेंद्रे असतात.

ज्या कार्यकर्त्यावर एक दोन पोलीस केसेस होत नाहीत. जो दहावीस वेळा तुरुंगात जात नाही, जो दहापाच आंदोलनात भाग घेत नाही तो कार्यकर्ता म्हणून गणला जात नाही. कार्यकर्ता एकदा तुरुंगात गेला की मग त्याला निवृत्ती नाही. त्याला सदैव चळवळीत राहून लढावे लागते. तो पोलिसाच्या ब्लॅक लिस्टला जातो.

संघटना चालवणं एक शास्त्र आहे. बैठका बोलावणं, अजेंडा ठरवणं, सर्क्युलर काढणं, प्रोसेडिंग लिहिणं, बातम्या तयार करणं, निवेदन तयार करणं, पत्राचं ड्रॉफ्टींग करणं, पॉईन्टस घेणे, कामाच्या नोटस् ठेवणं, डायरी बाळगणं,

पत्त्याची व फोनची यादी जवळ ठेवणं, कामाची नोंद ठेवणं, वेळा पाळणं, वेळा देणं, भेटणं, चर्चा करणं, सल्ला देणं-घेणं, चळवळीची व कार्यकर्त्यांची काही खासगी रहस्य जोपासणं, कामातला चोख व प्रामाणिकपणा, स्वभावातली मैत्री व स्पष्टपणा, खोटी आश्वासने न देणे, थापा व लंब्याचवड्या वलगना न करणे, अडीअडचणीला मदत करणे सहानुभूती, क्षमा व संयम ही वृत्ती अंगी असणे या बाबी चळवळ व कार्यकर्त्याला स्थिर व स्थैर्य देणाऱ्या आहेत. बैठकीत कोण काय बोलतो, कसा बोलतो याकडे सतत लक्ष असले पाहिजे. हॉटेल्स हे चळवळीचे अड्डे बनू नयेत. पार्टीपेक्षा प्रश्नात रस असावा.

चळवळीसाठी निधी जमवणं हे फार महत्त्वाचं काम असतं. लोक खुल्या दिलाने पैसे देतात. हे पैसे चळवळीपेक्षा कार्यकर्त्याच्या प्रतिमेला पाहून देतात. त्यांचा कार्यकर्त्यावर विश्वास असतो. लोक निष्ठेने पैसे देतात. ज्या कारणासाठी पैसा गोळा केलेला असतो त्याच कारणासाठी पैसा खर्च केला पाहिजे. पैशाच्या व्यवहारात गोंधळ झाला तर लोकांचा विश्वास संपतो. लोक पुन्हः पुन्हा फसत नाहीत. 'तुम्ही धंदा मांडला आहे' असं सुनवायला कमी करत नाहीत.

सार्वजनिक पैशाचा हिशोब ठेवणं हे चळवळ व समाजाच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. निधी उत्सवासाठी जमा केला जातो. निधीचा योग्य विनियोग न करता मंडप, लाऊडस्पीकर, रोषणाई यात पैसा खर्च केला जातो. यापेक्षा व्याख्याने, परिसंवाद, शिबीर व स्पर्धा भरवून वेगळा कार्यक्रम देता येतो. जयंतीच्या नावावर पैसे उकळले जातात. त्यात गैरप्रकार होतो. याचा चळवळीवर वाईट परिणाम होतो. निर्ढावलेलें कार्यकर्ते हिशोब ठेवत नाहीत. हिशोब देत नाहीत. त्यामुळे इतर कार्यकर्त्यांची पुढे गोची होते. वर्गणी देणाऱ्याला हिशेब विचारण्याचा हक्क आहे. केवळ उत्सवप्रसंगी जमा करण्यापेक्षा सभासद वर्गणी जमा करावी. वर्गणी देणाऱ्यानेही विधायक दृष्टिकोन ठेवावा. निमूटपणे पैसे देऊ नयेत. निधीतून रचनात्मक कार्य उभे करता येतं हे कुणाच्या लक्षात येत नाही.

कार्यकर्त्याला बदनाम करणारी एक टोळी असते. जो टीकेला भीत नाही तोच पाय रोवून उभा राहू शकतो. हळवा असेल तर दूर जाऊ शकतो. त्यामुळे चळवळीची हानी होते. समाजात काम करायचे म्हटले की हार व प्रहार स्वीकारण्याची तयारी ठेवावी लागते. ही कसोटी असते. आव्हाने असल्याशिवाय उभं राहण्यातही मजा नसते. निर्णयाचे परिणाम भोगण्याची तयारी ठेवूनच काम केले पाहिजे, टीका झाल्याशिवाय आपली परीक्षा आपल्याला घेता येत नाही.

प्रत्येक निवडणूक काही कार्यकर्त्यांना बरबाद करण्यासाठीच येते. निवडणुकीच्या राजकारणात अनेक कार्यकर्त्यांचा बळी दिला जातो. निवडणुकीत नष्ट होणं ही अत्यंत वाईट घटना आहे. पैशासाठी मते देणारा समाज आपला खराखुरा प्रतिनिधी निवडून देऊ शकत नाही. लोकांसाठी आयुष्य झिजवणारा प्रामाणिक कार्यकर्ता निवडणुकीत हरतो व ज्याच्या सत्तर पिढ्या शोषणावर जगत असतात तो निवडून येतो. खरा कार्यकर्ता बळीचा बकरा बनतो.

कार्यकर्त्यांचेही काही प्रश्न असू शकतात. त्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. एखादा कार्यकर्ता त्याच्या व्यक्तीगत समस्येत जखडला असेल तर त्याला समजून घेणं गरजेचं आहे. त्याच्या अडीअडचणीतून तो वेळ काढून येतोय याची जाणीव असायला हवी. कार्यकर्त्याचा अवमान होईल असे वागणे, बोलणे बंद झाले पाहिजे. कार्यकर्त्यांमध्ये मैत्रीचे वातावरण असले पाहिजे. मेळावे, परिषदा, शिबीरे व सत्याग्रहातून कार्यकर्ते घडवले जावेत. सतत नव्या नव्या प्रश्नांचा शोध घेऊन चळवळ बळकट केली पाहिजे. कार्यकर्त्याने कुठेही जाताना एकटे जाऊ नये. चार कार्यकर्त्यांना सोबत घेऊन गेले पाहिजे. एकटयाने फिरणे, एकटयाने गाठीभेटी घेणे टाळले पाहिजे. चार कार्यकर्ते एकत्र असले की गैरसमज होत नाही. चार कार्यकर्ते एकत्र असले की त्यांचे शिक्षण होते. कुठे कसे वागावे, बोलावे हे त्यांना कळते.

कार्यकर्ता म्हणजे यंत्रमानव नाही. तोही माणूस आहे. त्याच्या हातूनही चुका घडू शकतात. समाजाने कार्यकर्त्याकडे उदार दृष्टीने पाहिले पाहिजे. पाठीमागे निंदानालस्ती करण्यापेक्षा समक्ष बोलून प्रश्न सोडवून घ्यावेत. आपल्या चूका कबूल करण्याची प्रवृत्ती असावी. दुसऱ्यासाठी जगायचे असेल तर आधी स्वतःसाठी जगायला शिकले पाहिजे. कारण स्वतः जगल्याशिवाय दुसऱ्यासाठी जगता येत नाही. म्हणून कार्यकर्त्यांनी आहार व निद्रेत नियमितपणा आणावा.

कार्यकार्याच्या जीवनात अनेक वीण असतात. मी इथं मोकळेपणाने काही गोष्टी मांडल्या आहेत. कार्यकर्त्यातील भल्याबुऱ्याची सूची मी इथे दिली आहे. हे लिहिताना सर्वच कार्यकर्ते डोळयांपुढे ठेवले आहेत. हे माझं वैयक्तिक मत आहे. ते एकांगीही असू शकते. पण या मताचीही दखल घेतली जावी. ही प्रामाणिक इच्छा आहे. या संपादनात कार्यकर्त्यांची आत्मनिवेदने दिली आहेत. ती उद्याच्या प्रवासासाठी मैलाचा दगड बनतील अशी आशा आहे. माझ्या या संपादकीय प्रवासात सूचना करणारे व चर्चा करणारे सोलापूर इथले कार्यकर्ते स्नेही शंकर पाटील, अशोक जेटीथोर, दत्ता गायकवाड व भाई संजीव चारमगोळ यांचा उल्लेख होणे जरूरीचे आहे. या संपादनाची मुद्रण प्रत जिव्हाळयाने करणारे अभिराम सराफ व सर्व भार पेलणारे माझे स्नेही हृषीकेश अयाचित यांच्या मदतीमुळेच हे काम सुलभ झाले आहे. शताब्दिवर्षातला उपक्रम म्हणून प्रचार प्रकाशनाचे श्री. टी. ए. गवळी व प्रशांत गवळी यांनी हे संपादन प्रकाशित केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. या संपादनात सहभागी असलेल्या कार्यकर्त्यांच्या अनुभवानीच या ग्रंथाला मोल प्राप्त झाले आहे हे विसरता येणार नाही. या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

**शरणकुमार लिंबाळे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
जन्मशताब्दि वर्ष १९९०
आकाशवाणी केंद्र, सोलापूर ४१३ ००६

# कोठे होतो . . .
# कोठे गेलो !

**– नामदार सुशीलकुमार शिंदे**

आम्ही शिंदे मूळचे मराठवाड्यातल्या उस्मानाबाद जिल्ह्याच्या परांडा तालुक्यातले. तिथे माझे पणजोबा राहत असत. माझे आजोबा सोलापूरला आले व तिथे आम्ही स्थायिक झालो. माझे तीन चुलते सोलापुरातच आहेत. माझे आजोबा शिवराम राणोजी आणि वडील संभाजी शिवराम. त्यांचा कातडी रंगवण्याचा धंदा होता. खेडेगांवात गुराचे कातडे चिरल्यावर ते आणून त्यावर टॅनिंग करायचे असा हा धंदा होता. कच्च्या मालापासून कातडे तयार करून ते चर्मकारांना विकायचे किंवा त्याच्या मोटा बनवून शेतकऱ्यांना विकायच्या. माझे आजोबा हुन्नरी होते. या धंद्यापासून विशेष फायदा होत नाही असे पाहून त्यांनी चामड्यांच्या बॅगा तयार करण्याचा धंदा सुरू केला व त्यासाठी म्हशीच्या कातड्याऐवजी शेळीचे कातडे वापरण्यास सुरुवात केली. ही गोष्ट ८० वर्षांपूर्वीची. पूर्वापारच्या धंद्यात कालमानानुसार बदल करणे हा विचार एका हरिजनाच्या मनात यावा हे विशेष म्हटले पाहिजे.

आजोबा वारल्यानंतर माझे वडील आणि तीन चुलते वेगळे झाले, तरी प्रत्येकजण आजोबांनी सुरू केलेला धंदाच करीत असे. १९१० पासून मुंबईस

'स्वदेशी स्टोअर्स' नावाचे एक खरेदी–विक्री केंद्र होते, त्याला आमचा माल पुरविण्यात येत असे. आमचा हा धंदा स्वदेशीला उत्तेजन देणारा होता. महात्मा गांधींच्या हस्ताक्षरातील एक प्रमाणपत्र आमच्याकडे आहे. हरिजनांना स्वाभिमानाने जगता येईल असा हा धंदा आहे.

आमच्या घरात माझे वडील हयात होते तोपर्यंत हा धंदा चालू होता. माझ्या वडिलांनी चार बायका केल्या. पहिलीला मूल झाले नाही म्हणून दुसरी केली. दुसरीलाही मूल झाले नाही म्हणून तिसरी केली. तिसरी बायको निवर्तली म्हणून चवथी केली, ती माझी आई. माझ्या आईला मी आणि आणखी तीन मुले झाली. तिन्ही भावंडे वारली व मी एकटा राहिलो. त्यामुळे मूल होत नाही व झाले तर जगतही नाही ही माझ्या वडिलांना सतत धास्ती लागून राहिलेली असायची.

माझे आई–वडिलानी ठेवलेले नाव ज्ञानेश्वर व मला ग्यानबा म्हणत पण नंतर मी नाटकात काम करायला लागल्यावर सुशिलकुमार हे नाव घेतले आणि मग सर्वजण मला त्याच नावाने हाक मारायला लागले. मी लहान होतो तेव्हा घरची खूप श्रीमंती होती. तशात माझे वडील मोठे रसिक. त्यांनी १९२० साली सोलापुरास घर बांधले. त्या घराच्या खिडक्या–दरवाजांना रंगीबेरंगी काचांची तावदाने होती. वडील मद्यपान करीत. घरी अजूनही त्यांच्या काळचे हरतऱ्हेचे पेले आहेत. त्यांचे पिण्याचे मेजही आहे. संध्याकाळी या मेजपाशी बसून ते मद्यपान करीत, ते मला अद्यापही आठवते. ते अंगात जाकीट आणि डोकीला फेटा घालीत. त्यांच्या या वस्तू मी जपून ठेवल्या आहेत.

मी सहा वर्षांचा असेन तेव्हा मला वडिलांनी शाळेत पाठविले, मला काही शाळेची गोडी लागली नाही. मी गणितात फार कच्चा होतो. पाढे तर मला अजिबात यायचे नाहीत. म्हणून वडील माझ्याकडून पाढे तयार करून घेत. मी शाळेत जायची टाळाटाळ करी पण वडील आग्रहाने मला शाळेत पाठवीत. कधी कधी त्यासाठी चार आणेही देत.

वडिलांच्या मृत्यूनंतर माझ्यावर कुणाचाच धाक राहिला नाही. वास्तविक पाहता ते गेले तेव्हा आमची परिस्थिती चांगली होती. पैसा अडका होता. कपडेलत्ते होते. माझ्या शिक्षणाच्या बाबतीत कोणतीच अडचण नव्हती. पण मलाच शिकायची आवड उत्पन्न न झाल्यामुळे व त्यात वडिलांचा धाक आता न राहिल्यामुळे मी उनाड झालो. आई मला मारून शाळेत पाठवी. पण मी बुट्टी मारायचो. जेमतेम ५ वी पर्यंत शाळेत गेलो असेन. पुढे शाळेत जाण्याचे बंदच केले. मुलाबरोबर गोट्या खेळाव्यात, मारामाऱ्या कराव्यात, फालतू भटकत रहावे हे उद्योग मी सुरू केले. तशात आणखी एक वाईट सवय लागली. मित्रांबरोबर मी चोऱ्या करू लागलो. शहरात भांडी गल्ली म्हणून भांड्याच्या दुकानाची गल्ली आहे. तिथले दुकानदार आमावास्येला दुकान धुवून साफ करीत असत. त्यासाठी

दुकानातली भांडी, वजन, तराजू वगैरे सामान ते रस्त्यावर बाहेर काढून ठेवीत. रात्रीच्या काळोखात आम्ही यातली भांडी वगैरे हातात येईल ते सामान चोरीत असू आणि लक्ष्मी मार्केटच्या नाक्यावर एक माणूस बसत असे त्याला ते विकत असू. या चोरीच्या पैशाचे आम्ही पाणीपुरी व भेळपुरी खात असू आणि एक आण्याचा सिनेमा पहात असू.

पाच–सहा महिने आम्ही हा चोरीचा धंदा केला आणि एके दिवशी आमचं बिंग फुटलं. आमच्या घराच्याजवळ भांडे गल्लीचा कोपरा आहे. या कोपऱ्याशी एक झवेरी जमातीची बाई टोपलीत पत्त्याचे कॅट, कात्र्या, गुंड्या वगैरे माल ठेवून तो विकायला बसायची. एक दिवस दुपारी ती बाई टोपलीवर चादर घालून जेवायला गेली असता मी टोपलीतले दोन–तीन पत्त्याचे कॅट आणि तीन–चार कात्र्या घेऊन पळालो. पण ही उचलेगिरी करीत असताना आजूबाजूच्या भांडेवाल्यांनी मला पाहिले आणि ती बाई परत आल्यावर ढोराच्या घाऱ्या डोळ्यांच्या मुलाने चोरी केली म्हणून तिला सांगितले. ती बाई तशीच रडत रडत आमच्या घरी आली आणि म्हणाली, ‘ अरे, बापाविना पोरगा तू. मी तुला चांगला समजत होते. तू माझा माल चोरलास. ’ मी म्हटलं, ‘ मी चोरी केली नाही. ’ पण आईने मला बेदम मारलं आणि देवापुढे उभे करून चोरी केल्याचे कबूल करायला लावलं. मी तो चोरीचा माल दोन रुपयांना विकला होता. आईने, मी ज्या माणसाला तो माल विकला होता त्याला दोन रुपये देवून माल परत घेतला आणि त्या बाईला देवून टाकला.

भांडे गल्लीतल्या आमच्या चोऱ्या जरी आता थांबल्या तरी आम्ही आता निराळा उद्योग सुरू केला. बाजारपेठेच्या मिठाईच्या दुकानात दिवसभर लोक खायला येत. खाऊन झाल्यावर त्याचे कागद ते एका टोपलीत टाकत. आम्ही त्या टोपल्या घेवून जायचो. कागदाच्या बोळ्यावर उरलेली मिठाई खायचो आणि रिकाम्या टोपल्या, परत दुकानदाराला आणून द्यायचो. तिथे पुणेकर आणि थळंगे नावाचे दोन हलवाई होते. ते माझ्या वडिलांना ओळखत असत. एकदा पुणेकर मला म्हणाले, “ पोरा, तुझा बाप चांगला श्रीमंत म्हणून होता. तुझी आई घर सांभाळून आहे आणि तू भिकाऱ्यासारखी उष्टी मिठाई खातोस ? ” असे म्हणून त्यांनी मला दोन थोबाडीत मारल्या आणि हाकलून लावले. मग आमचा हा उद्योगही थांबला.

दिवसेंदिवस आमची घरची स्थिती खालावत गेली. घराचे भाडे ६० रुपये येत होते. त्यात भागेना आईचे ८०–९० तोळे सोन्याचे दागिने होते, ते हळूहळू मोडून चरितार्थ चालवावा लागला. नातेवाईकांकडे मात्र गेलो नाही. माझ्या दोन आया होत्या. पण मला लळा होता तो सावत्र आईचा आणि तिनंच माझं आयुष्य घडविले. ती मला नेहमी आमच्यासमोर रहाणाऱ्या एका मामलेदाराची गोष्ट सांगायची. आधी तो कारकून होता आणि मग स्वतः शिकत शिकत वरच्या

हुद्यावर चढत गेला. त्याच्याप्रमाणे मी शिकावे आणि मोठे व्हावे अशी तिची इच्छा. एक तीळ सात भावांनी वाटून घेतला हेही ती मला नेहमी सांगे. आईच्या या उपदेशाने माझ्या वृत्तीत हळूहळू पालट घडू लागला. शिरीषकुमारच्या गोष्टींचा तर माझ्या मनावर फार परिणाम झाला. आपण देखील त्याच्याप्रमाणे लाडू वळण्यास मदत करावी. त्याच्याप्रमाणे उदबत्त्या व गोळचा विकून पैसे मिळवावे, घरखर्चाला मदत करावी, असे विचार माझ्या डोक्यात येऊ लागले. त्याप्रमाणे दिवाळी; दसरा वगैरे सणांच्याप्रसंगी मी उदबत्त्या विकू लागलो, शाळेतही पुन्हा जाऊ लागलो.

नंतर एका गोळचांच्या कारखान्यात मी कामाला लागलो. पगार महिना १० रुपये. या वेळी माझे वय ११ वर्षांचे होते. कारखान्याचे मालक बाबूराव म्हणून होते. त्यांनी मला शर्ट व पायजमा शिवला. ही नोकरी मी शाळा करून करीत असे. सकाळी शाळा असली तर दुपारी कामावर जायचं, दुपारी असली तर सकाळी कामावर जायचं. पगाराचे १० रुपये मी प्रथम आईकडे देत असे व त्यातून फक्त १ रुपया खाऊसाठी घेत असे. या रुपयातून बर्फाचा गोळा किंवा बुढ्ढीके बाल घेऊन खाताना आपल्याच कमाईतून आपण खातो आहोत याचा अभिमान वाटे. कपडे म्हणजे एक विजार व एक बुशकोट. तेच धुवून घालायचे. कधी कधी कपडे फाटलेले असत, त्याची लाज वाटे.

वडिलांचे एक मित्र डॉ. वैशंपायन यांनी असेच एकदा ' मुले सांभाळण्याचे काम करशील का' म्हणून विचारले. डॉक्टरसाहेबांच्या घरी काम करण्याची कल्पना मला मोठी आकर्षक वाटली आणि तावडतोब होकार दिला, पगार १२ रुपये वाडिया हॉस्पिटलमध्ये कामावर जायला लागलो. डॉक्टरसाहेबांची सोनुबाई आवटे म्हणून मैत्रीण होती. त्यांच्या मुलींना सांभाळण्याचे काम होते. त्यांची एक मुलगी एम. ए. आहे आणि दुसरी एक पोलीस अधिकाऱ्याची पत्नी आहे. या मुलींना मी अंगाखांद्यावर खेळविले आहे. पांढरपेशा वर्गाच्या जीवनाशी पहिली ओळख मला येथे झाली. श्रीखंड हा काय पदार्थ आहे हे मला या घरात प्रथमच समजले. माझ्या पानात ते प्रथमच वाढले तेव्हा हे पिवळे पातळ काय आहे असे मी विचारले होते. याला श्रीखंड असे म्हणतात असे तेव्हा कळले. तसेच कोशिंबीर ही काय चीज आहे हे तिथे कळले. चपातीला पोळी म्हणतात हेही तिथेच प्रथम समजले. आम्ही फक्त पुरणपोळीला पोळी म्हणतो. आमचे जेवण भाकरी आणि मटनाचं कोरडयास. आता या नवीन पदार्थांची ओळख झाली. रोज दुपारी १२ वाजता सगळेजण जेवायला घरात बसायचे. माझ्याबरोबर कामाला एक मोलकरीण होती. तीसुद्धा जेवायला आत बसे. मला मात्र जर्मन–सिल्व्हरच्या ताटात वाढप करून बाहेर बसायला लावत. मी विचार करायचो, आपल्याला एकटयालाच बाहेर का बसावे लागते ? तेव्हा प्रथम आपण अस्पृश्य आहोत या भावनेचा स्पर्श मला झाला !

त्यापूर्वी आपण हरिजन आहोत हे माहीत होते. पण सवर्णांत मिसळण्याचा क्वचितच प्रसंग आल्याने त्याची मुद्दाम अशी जाणीव कधी होत नसे. कुलकर्णी नावाचा माझा मित्र होता. त्याच्या घरी मी जेवत असे आणि तोही माझ्या घरी जेवत असे; त्याचे वडील काही बोलत नसत. फक्त त्याच्या घरात–देवघरात जाण्यास मला मज्जाव होता. ही शिवाशिवीची परिस्थिती सर्वत्र आहे असे कळून आल्यावर मन व्यथित होई. पण त्यावर माझा काहीच इलाज नव्हता. तथापि, आवटेबाईकडे अशा काही मनाला लागणाऱ्या गोष्टी होत्या तरी काही संस्कारही माझ्यावर तिथं झाले. पहिली गोष्ट म्हणजे माझी वाणी अशुद्ध होती ती शुद्ध झाली. घरची टापटीप कशी असावी,स्वच्छता कशी ठेवावी हे मी तिथे शिकलो. आयुष्याला नवीन वळण मिळाले.

नंतर आवटेबाईंनी मला लेडीज क्लबमध्ये अर्धवेळ कामाला लावले. तिथे झाडलोट करणे वगैरे कामें असत. मी बॅडमिंटन हा खेळ तिथेच शिकलो. तसेच खेळामध्ये मला जो रस निर्माण झाला तो तिथेच. यावेळी मी बारा–तेरा वर्षाचा होतो. सुशिक्षित महिलांच्या सान्निध्यात मी तेथे आलो. त्यांचे वागणे, बोलणे, त्यांची राहणी, शिष्टाचार याचा माझ्या मनावर पुष्कळच परिणाम झाला. क्लबाच्या चाव्या माझ्याकडेच असल्यामुळे रात्री चार–पाच मित्रांना घेऊन मी तिथे अभ्यास करीत असे. शिकण्याची इर्ष्या आता निर्माण झाली होती. पण योग्य मार्गदर्शनाच्या अभावी नीट मार्ग सापडत नव्हता. आईलाही वाटत होते, मी शिकावे पण कुठेतरी एखादी छोटीशी नोकरी मिळण्याइतपत शिकले की पुरे. एवढीच तिची मर्यादित अपेक्षा होती.

वाडिया हॉस्पिटल ते आमचं घर जवळजवळ चार मैलाचे अंतर मी रोज चालत जात-येत असे. त्या रस्त्यावर एक नाईट हायस्कूल होते. हे हायस्कूल जेव्हा मी प्रथम पाहिले तेव्हा मला माझ्या शिक्षणाचा मार्ग सापडल्याचा आनंद झाला. परंतु माझ्या शिक्षणात मधेमध्ये बराच खंड पडला असल्याने या नाईट स्कूलमध्ये प्रवेश मिळण्यास अडचणी आल्या. पण मी बरीचशी खटपट करून शेवटी एकदाचा प्रवेश मिळवला. सकाळी सात वाजता हॉस्पिटलमध्येच काम सुरू करायचे ते संध्याकाळी सात वाजता संपायचे. नाईट हायस्कूल रात्री ७ ते १० असायचे. म्हणजे सकाळी ६ ला घर सोडले की रात्री ११ वाजता परतायचो. कामाला जाताना जेवणासाठी बरोबर फडक्यात भाकरी बांधून घ्यायची. माझ्या शिक्षणाची गाडी आता रुळाला लागली.

माझी ८ वी ची परीक्षा नुकतीच झाली होती. त्या सुमारास वृत्तपत्रात सोलापूरच्या कोर्टात ऑफिस बॉयच्या जागा भरायच्या आहेत अशी जाहिरात वाचली. मी अर्ज केला. उद्योग–विनिमय केंद्रात माझे नाव नोंदवले होते. त्यांनी माझे नाव पाठविले होते. मला कोर्टाकडून मुलाखतीसाठी बोलावणे आले. त्यावेळी श्री. व्ही. एन. पालेकर म्हणून डिस्ट्रिक्ट जज्ज होते. त्यांनी माझी मुलाखत घेतली.

त्यांना मी माझी परिस्थिती सविस्तरपणे सांगितली. हा मुलगा चुणचुणीत आहे असे त्यांचे मत झाले. पण त्यांनी एक अट घातली की डॉ. वैशंपायनाची तू चिट्टी आणीत असशील तरच तुला घेईन. मी तसाच धावत-पळत डॉक्टरांकडे गेलो आणि त्यांनीही मला तावडतोब चिट्टी दिली. मी दुसऱ्याच दिवसापासून कामावर लागलो. शिरस्तेदाराचा शिपाई म्हणून माझी नेमणूक झाली. वकिलांना पुकारायचे मला काम असे. ' अर्जदार हजर आहे ? ' असे तीन वेळा मोठ्याने पुकारायचे. असा पुकारा करायचा म्हणजे आपण कोणीतरी आहोत, असे वाटायचे. मी तो मान समजत असे. अंगात पांढरे स्वच्छ कपडे आणि खांद्यावरून कमरेपर्यंत लाल पट्टा असा माझा गणवेष.धावतपळत काम करायचा आणि जज्जसाहेबासाठी ट्रेमधून चहा घेऊन जायचा. सगळीच नवलाई. ऑफिसबॉयचा पहिल्या महिन्याचा ७०रुपये पगार जेव्हा हातात आला तेव्हा केवढा आनंद झाला म्हणून सांगू ! अगदी हवेत तरंगत घरी आलो. बारा–पंधरा रुपये पगार घेणारा मी आज ७० रुपये मिळविले होते.

शाळेचा अभ्यासही मी मन लावून करीत असे. एक ना एक दिवस आपण कोणीतरी होणार आहोत ही आकांक्षा मी सतत जोपासत होतो. यावेळी आणखी एका क्षेत्रात माझ्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याची मला संधी मिळाली. मी दिसायला गोरागोमटा असल्यामुळे आमच्या नाईट स्कूलचे एक शिक्षक कासेगावकर यांनी मला एके दिवशी विचारलं की, नाटकात काम करशील का ? नाटकात काम करण्याच्या कल्पनेने मी मोहरून गेलो आणि मी कासेगावकर सरांना तिथल्यातिथं होकार दिला. नाटक होतं. ' मुंबईची माणसं ' आणि त्यात मला शांताची भूमिका देण्यात आली. म्हणजे स्त्री पार्ट. त्यावेळी पुरुष नाटकातून स्त्री भूमिका करीत असल्याने मला त्यात चमत्कारिक वाटण्याचे काही कारण नव्हते. माझे काम चांगले झाले. त्यानंतर ' करायला गेलो एक ' या नाटकात मी गुलाबाची भूमिका केली आणि मग नाटकात काम करणे हे शाळा–कॉलेजातील माझ्या जीवनाचे एक अंग झाले. कामगार कल्याण केंद्राच्या रंगभूमीवरही मी काम केले.

मी १९६१ साली शालांत परीक्षा उत्तीर्ण झालो. पण ही परीक्षा मी एका दमात उत्तीर्ण झालो नाही. तीनदा वाऱ्या केल्या. पहिल्या खेपेस नापास झालो तेव्हा इंग्रजी घेतले नव्हते.दुसऱ्या खेपेस इंग्रजी घेऊन बसलो आणि नापास झालो.तिसऱ्या खेपेस इंग्रजी घेऊन पास झालो. नापास झालो तरी प्रयत्न सोडायचे नाही ही जिद्द तेव्हापासून वृत्तीत बाणावली आहे. म्हणून हात धुऊन इंग्रजीच्या मागे लागलो.

शालेय शिक्षण करीत असताना कोर्टातील माझी नोकरी चालूच होती. कोर्टात मी एकूण साडेनऊ वर्षे नोकरी केली. प्रथम ऑफिस बॉय म्हणून नोकरीला लागलो. ऑफिस बॉयचा प्यून, प्यूनचा रिजनल सेक्शन रायटर आणि रिजनल

सेक्शन रायटरचा बेंच क्लार्क अशा बढत्या मला मिळत गेल्या. मी कोर्टाच्या नोकरीचा राजीनामा दिला तो बेंच क्लार्क म्हणून यावेळी मी बी. ए. झालो होतो. म्हणजे ९ वी पास ते बी. ए. पर्यंत मी कोर्टात नोकरी केली.

मी राजीनामा दिला त्यावेळी मला १५० रुपये पगार होता. सध्या हायकोर्ट जज्ज असलेले श्री. सप्रे हे माझे वरिष्ठ होते. तसेच आता श्री. एन. बी. नाईक हायकोर्ट जज्ज आहेत त्यांच्या हाताखाली मी शिपाई म्हणून काम केले आहे.

शालांत परीक्षा झाल्यानंतर मी सोलापूरच्या संगमेश्वर कॉलेजमध्ये दाखल झालो. कॉलेजमध्ये जाण्यात माझा उद्देश नाटकात कामे करण्यास आपल्याला अधिक वाव मिळावा हा होता. जब्बार पटेलांचे नाव सोलापूरच्या नाट्यक्षेत्रात त्यावेळी दुमदुमत होते. दयानंद कॉलेजच्या 'वेड्याचं घर उन्हात' मधल्या त्यांच्या कामाची सगळीकडे वाखाणणी झाली होती. यावेळी कामगार कल्याण केंद्राच्या रंगभूमीवर मी कामे करीत होतो. जब्बार पटेलचा व माझा स्नेह होता. त्याच्याप्रमाणे आपणही या क्षेत्रात नाव मिळवावे या आकांक्षेने मी कॉलेजात गेलो.

संगमेश्वर कॉलेजात डॉ. निर्मलकुमार फडकुले व श्री. दु. का. संत हे आमचे मराठीचे प्राध्यापक होते. पहिल्या वर्षी आग्रहाखातर मी वार्षिक स्नेहसंमेलनाच्या निवडणुकास वर्ग प्रतिनिधीच्या जागेसाठी उभा राहिलो. पण एका मताने पडलो. परंतु जो मुलगा निवडून आला होता, त्याने संमेलनाच्या धामधुमीत एका मुलीबरोबर काही गडबड केल्यामुळे प्रिन्सिपॉलनी त्याला कॉलेजमधून काढून टाकले. त्याच्या जागी मी प्रतिनिधी झालो. या घटनेचा उल्लेख मी एवढ्यासाठीच करतो आहे की माझ्या नेतृत्वाची सुरुवात तिथून झाली. त्यासाठी कॉलेजमध्ये मी भरपूर लोकप्रियता मिळविली. 'लग्नाची बेडी' मध्ये डॉ. कांचन, ' प्रेमा तुझा रंग कसा ' मध्ये बच्चू आणि ' करायला गेलो एक ' मध्ये काकाजी या भूमिका मी केल्या. कॉलेजात नाटकात काम करणारा ताबडतोब लोकप्रिय होतो. तसा मी झालो. मी सहली काढल्या, सोशल सर्व्हे केले. 'इकॉनॉमिक फोरम्' चा मी जनरल सेक्रेटरी होतो. महाविद्यालयीन व आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेत मराठी, हिंदी, इंग्रजी भाषांत मी पारितोषिके मिळविली.

मला वाचनाची आवड असल्याने मी भरपूर वाचन करीत असे. डॉ. फडकुले यांनी मराठी आणि डॉ. पुंडे यांनी राज्यशास्त्र या विषयात बहुमोल मार्गदर्शन केले. त्यामुळे या दोन विषयात मी चांगली प्रगती करू शकलो. हे वय असे होते की कुणातरी मुलीवर प्रेम करावे असे तीव्रतेने वाटे, परंतु एखाद्या मुलीशी बोलायला गेलो की, माझे हातपाय कापायचे, मग प्रेम करण्याची गोष्ट दूरच राहिली. मी वर्गीकृत जातीचा असल्याने मला फी माफ होती, आणि मी कोर्टात शिपायाची नोकरी करतो हे फक्त प्रिन्सिपॉल व प्राध्यापकांनाच माहिती होते. मी कोर्टात शिपाई असलो तरी कॉलेजला अगदी टापटिपीच्या कपड्यात व टाय लावून येत

असे. सकाळी मधल्या सुटीत कोर्टाचे टपाल आणायला जायचे तेव्हा कॉलेजच्या बाहेर पडल्यावर डोक्यावर टोपी घालीत असे. या सुमारास सोलापूरच्या कोर्टात ' माधव काजी ' हा खटला उभा राहिला.

पहिल्या दिवशी कॉलेजच्या मुलामुलींची कोर्टात गर्दी उसळली होती. तिथे शिपायांच्या वेषात गळयात तो लाल पट्टा अडकवून उभा असलेल्या माझ्याकडे माझ्या वर्गातील मुलींच्या चकीत नजरा वळल्या. त्यावेळी मी शरमलो. मला अतिशय वाईट वाटले. आणि आपण येथून केव्हा दूर निघून जातो असे झाले. पण मग मी स्वत:ला म्हटले, अरे तू चोरी तर करीत नाहीस ना ? लबाडी करीत नाहीस ना ? मग कशासाठी शरम बाळगायची ?

१९६५ साली मी राज्यशास्त्र हा विषय घेऊन बी.ए. परीक्षा उत्तीर्ण झालो. दयानंद कॉलेजात मी पहिला क्रमांक मिळविला. मी संगमेश्वर कॉलेजचा विद्यार्थी पण शेवटच्या वर्षी दयानंदमध्ये गेलो होतो. वकील होण्याचा बेत असल्याने मी त्या वर्षी कोर्टातील माझ्या नोकरीचा राजीनामा दिला आणि कायद्याच्या अभ्यासासाठी पुण्यात येऊन तिथल्या लॉ कॉलेजात प्रवेश घेतला. त्याचवेळी आय. पी. एस. ( इंडियन पोलीस सर्व्हिस ) आणि आय. ए. एस. ( इंडियन ॲडमिनीस्ट्रेटिव्ह सर्व्हिस ) या परिक्षांसाठी बसण्याचे मनात योजून त्याची तयारीही सुरू केली.

पुण्यास आल्यावर माझ्या स्वभावानुसार मी विद्यार्थी चळवळीत भाग घेऊ लागलो. या चळवळीत श्री. शरद पवार आघाडीवर होते. त्या निमित्ताने माझी त्यांच्याशी पहिली गाठभेट झाली. यावेळी काकासाहेब गाडगीळ पुणे विद्यापीठाचे कुलगुरु होते. पाकिस्तानच्या युद्धाची धामधूम चालू होती. पाकिस्तानी आक्रमणाचा निषेध करण्याकरिता काकासाहेबांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांचा एक मोठा मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात मी हिरिरीने भाग घेतला.

पण या सुमारास अशी एक घटना घडली की, कायद्याच्या माझ्या अभ्यासात खंड पडून माझ्या आयुष्यास अनपेक्षितरित्या एक वेगळे वळण मिळाले. सोलापूरचा माझा एक मित्र विळेकर मला भेटण्यासाठी पुण्यास आला.

यावेळी पोलिस सब इन्स्पेक्टरच्या जागासाठी वर्तमानपत्रात जाहिरात आली होती. विळेकर मला म्हणाला की, तू आय. पी. एस. चा अभ्यास करतो आहेस तर सब इन्स्पेक्टरच्या जागेसाठी अर्ज का करीत नाहीस ? त्यानेच अर्ज लिहून पाठवूनही दिला. माझ्या सुदैवाने म्हणा, दुर्दैवाने म्हणा, मला मुलाखतीसाठी मुंबईला बोलावणे आले.

मी मुंबईला गेलो. आय. जी. पी. मजिदुल्लांनी यांनी माझी मुलाखत घेतली त्यांनी मला बरेच प्रश्न विचारले. त्यातले काही अर्थशास्त्रावरचे होते. मी त्यांना म्हणालो की, मी राज्यशास्त्राचा विद्यार्थी असताना आपण मला अर्थशास्त्रावरचे प्रश्न का विचारता ? मला वाटले मी उलट बोलल्याबद्दल माझी निवड होणार

नाही. पण निवड झाली आणि मुंबईलाच त्या जागेचे तीन महिन्यांचे प्रशिक्षण मला देण्यात आले. प्रशिक्षण आटोपल्यानंतर ६ डिसेंबर १९६५ रोजी मुंबई सी. आय. डी. विभागात माझी सब इन्स्पेक्टर म्हणून नेमणूक झाली. सुरुवातीला मी अमेरिकन विंग बघत असे. पगार ३५० रु., दादरला हिंदू कॉलनीजवळच्या पोलिस क्वॉर्टरमध्ये रहायला जागा. आई फार खूष झाली. पण मुंबईला दूर राहतो याची तिला खंत. बाहेर राहिल्याखेरीज माणसाची प्रगती होत नाही अशी मी तिची समजूत काढीत असे.

पोलिसखात्यात नोकरी मिळाली तरी एल. एल. बी. होण्याचे डोक्यातले वेड काही जात नव्हते. पुण्यास जाऊन काकासाहेबांना भेटलो आणि एल. एल.बी. च्या टर्म ठेवण्यासाठी परवानगी मागितली. ती त्यांनी मोठ्या आनंदाने दिली. फर्स्ट एलएल. बी. ला बसलो आणि नापास झालो. दुसऱ्या खेपेस पास झालो. माझे एक आहे, नापास झालो तरी मनाला लावून घेत नाही. पुन्हा नेटाने प्रयत्न करतो. सेकंड एलएल. बी. साठी मुंबईच्या लॉ कॉलेजात प्रवेश घेतला. १९६९ साली एलएल. बी. पदवी प्राप्त केली. त्यावेळी मी सब इन्स्पेक्टर होतो. त्या जागेचा सर्व मानसन्मान मिळत होता. मंत्र्यांच्या सुरक्षिततेसाठी त्यांच्या मागे गाडीतून फिरत होतो. लाल दिव्याची गाडी होती पण ज्या कोर्टात शिपाई होतो त्या कोर्टात वकील होण्याची महत्त्वाकांक्षा जिरली नव्हती. ती डोके वर काढून काढून मनाला अस्वस्थ करीत असे. एलएल. बी. झाल्यावर मार्ग मोकळा झाला होता. पोलिस खात्याच्या नोकरीचा राजीनामा देण्याचे विचार डोक्यात येत होते. पण निर्णय होत नव्हता.

अशाच एका बैठकीमध्ये राजकारणाचा विषय निघाला असताना शरदरावांनी तू पार्लमेंटला उभा राहशील का म्हणून विचारले. माझे वकिली करण्याचे उद्दिष्ट आहे व त्यासाठी मी नोकरी सोडण्याच्या विचारात आहे असे मी त्यांना सांगितले.

६ नोव्हेंबर १९७१ ला मी नोकरीतून मुक्त झालो आणि ९ नोव्हेंबर १९७१ ला सोशॅलिस्ट फोरमचा निमंत्रक म्हणून कामास सुरुवात केली. त्या दिवसापासून माझ्या राजकीय जीवनाचा प्रारंभ झाला. १९७२ मध्ये विधानसभेच्या निवडणुकीसाठी सोलापूर ( करमाळा तालुका ) मतदार संघाचे तिकीट महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस समितीने मला देण्याचे मुक्रर केले. पण प्रदेश कॉंग्रेसच्या मध्यवर्ती संसदीय मंडळाने फिरविला आणि तायप्पा सोनावणे यांना तिकीट दिले कारण त्यापूर्वी ते संसदेचे सभासद होते. माझी परिस्थिती त्यामुळे चमत्कारिक झाली. नोकरी गेली आणि तिकीटही गेले. आता पुढे काय करावयाचे हा प्रश्न माझ्यापुढे उभा राहिला. वकिली करण्याचा माझा निश्चय मात्र पक्का होता. मी वकिली सुरु केली. सोलापूरला नव्हे तर मुंबईला दादरला गणेशपेठेत माझे ऑफिस उघडले. थोड्याच अवधीत माझा जम बसला आणि भरपूर काम व

भरपूर पैसा मिळू लागला. मी तीन मदतनीस ठेवले. पैसा तर इतका मिळू लागला की एवढ्या पैशाचे काय करावे असा प्रश्न मला कधी कधी पडू लागला. गुन्हेगारी कायद्याखालचे खटले मी मुख्यत: चालवित असे.

सोलापूरच्या करमाळा तालुका मतदार संघातून विधानसभेवर निवडून आलेले तायप्पा सोनावणे वर्षाने निधन पावले आणि १९७३ ला या मतदार संघात पोटनिवडणूक जाहीर करण्यात आली. या खेपेस मात्र काँग्रेस पक्षाने मला तिकीट देऊन माझी उमेदवारी निश्चित केली. २३ एप्रिल १९७३ रोजी निवडणूक झाली आणि माझ्या नजिकच्या प्रतिस्पर्धी उमेदवारापेक्षा २५ हजार मते जास्त घेऊन मी निवडून आलो. ९ नोव्हेंबर १९७३ रोजी माझा राज्यमंत्री म्हणून शपथविधी झाला. युवक कल्याण आणि वाहतूक हे विभाग माझ्याकडे देण्यात आले.

मी आंतरजातीय विवाह केला आहे. माझी पत्नी ही पूर्वाश्रमीची उज्वला वैद्य. वैद्य हे कायस्थ प्रभू. उज्वला सोलापूरला आपल्या नातेवाईकाकडे आली असता माझी तिच्याशी प्रथम ओळख झाली. तिच्या बहिणीचा दीर सुभाष विळेकर हा माझा दोस्त. १९६५ साली माझी सबइन्स्पेक्टर म्हणून मुंबईस नेमणूक झाल्यावर दादरला मी सुभाष विळेकराकडे जात असे. त्याच्यामुळे माझा वैद्य कुटुंबाशी संबंध वाढला. उज्वलाचा मोठा भाऊ सतीश वैद्य हा माझा अगदी जिवाभावाचा मित्र झाला. यावेळी माझे दुसऱ्या एका मुलीशी लग्न ठरण्याच्या बेतात होते. पण खरेतर मी उज्वलाच्या प्रेमात पडलो होतो.मी तिच्याबरोबर हिंडाफिरायलाही जात होतो. एकदा तर तिच्याशी लग्न करण्याची माझी इच्छा मी तिला बोलून दाखविली होती. दरम्यान एक अत्यंत दु:खद घटना घडली. तिचा थोरला भाऊ आणि माझा मित्र सतीश याला बसच्या अपघातात मृत्यू आला. त्यामुळे वर्ष सहा महिने लग्नाची गोष्ट काढणे शक्य नव्हते,शिवाय तिच्या भावाचा आंतरजातीय विवाह झाला होता आणि आंतरजातीय विवाह लाभदायक ठरत नाहीत अशी समजूत तिच्या घरच्या लोकांनी करून घेतली. आमच्या विवाहाला या कारणासाठी त्यांची संमती नाही असं मला उज्वलानं सांगितले. माझे वैद्य कुटुंबाशी संबंध फार जिव्हाळ्याचे होते. मला ते मुलाप्रमाणे मानत. तेव्हा त्यांच्या मनाविरुद्ध उज्वलाशी लग्न करून त्यांना दु:खात टाकण्याची माझी तयारी नव्हती म्हणून मी तो विचार सोडून दिला.

यानंतर आमच्या जमातीच्या एका श्रीमंत कुटुंबातील मुलीशी मी लग्न ठरविले. साखरपुडा झाला. आम्ही दहा–पंधरा दिवस बरोबर फिरलो. लग्नाची तारीख ठरली. तिच्या वडिलांनी तिला खूप दागिने दिले होते. लग्नाची खरेदी झाली, मुलीकडील लोकांनी ५० हजार रुपयांची खरेदी केली. लग्नपत्रिका छापल्या आणि मग मुलगी अकस्मात आजारी पडली आणि त्यात तिचा अंत झाला. मी फार नाराज झालो. एवढे झाले तरी मला मुली येतच राहिल्या. यात काही कोकणस्थांच्या होत्या. पण लग्न करण्याच्या मन:स्थितीत मी नव्हतो.

एक दिवस मी बसमधून जात असता उज्वलाची एक मैत्रिण मला भेटली आणि उज्ज्वलाची तुम्हाला भेटण्याची इच्छा आहे, असे तिने मला सांगितले. त्याप्रमाणे मी उज्वलाला भेटलो. मी तिला म्हणलो, " मी आता लग्न करणार नाही. मला माझ्या आयुष्यात कुणी जोडीदार मिळण्याचा योग नाही. आजपर्यंत तीन वेळा लग्न ठरले आणि तिन्ही वेळा या ना त्या कारणाने मोडले. नुसतीच वाऱ्यावरची वरात. म्हणून मीच आता लग्न करायचे नाही असे ठरविले आहे. " माझे हे त्राग्याचे बोलणे ऐकूण ती हसायला लागली. मी म्हटलं, " हसायला काय झालं ? तू करणार आहेस माझ्याशी लग्न ! " ती म्हणाली, " अहो, त्यासाठी तर मी तुम्हाला भेटायला बोलावलं. माझी लग्न करण्याची तयारी आहे. " मला हवं होतं ते मिळाले. मग मी थांबलोच नाही. त्यादिवशीच मंगळसूत्राची ऑर्डर दिली. आठ दिवसात लग्नाची सर्व खरेदी केली. मंगल कार्यालय ठरविले आणि लग्नाची तारीख निश्चित केली.

लग्न उज्वलाच्या घरच्या लोकांना न सांगता लग्न करायचे असल्याने लग्नाचा व्यूह रचावा लागला. त्याप्रमाणे लग्नाच्या तारखेस उज्वलाच्या मैत्रिणीच्या घरी सकाळी सहा वाजता गेलो आणि काही कारण सांगून तिला आपल्या घरी घेऊन आलो. मैत्रिणीच्या आईला आमचा बेत ठाऊक नसल्याने तिने उज्वलाला हिरवा चुडा भरला आणि इतर जे काही सोपस्कार करायचे ते केले. मी अगोदर १०-१२ गाड्या ठरविल्या होत्या. त्या गाड्यातून आम्ही सर्व मंडळी कार्यालयात गेलो आणि आमचे शुभमंगल झाले. त्या दिवशी तार करून तिच्या घरी कळविले. तिचे वडील थोडेसे रडले. नंतर दुसऱ्या दिवशी आम्ही उभयता तिच्या घरी गेलो. नमस्कार केला आणि तुमची परवानगी मिळणार नाही म्हणून तुम्हास कळविले नाही असा खुलासा केला. वडिलांची क्षमा मागितली आणि आशीर्वाद द्या म्हणून म्हटले. त्यांनी मला जवळ घेतले आणि साश्रू नयनांनी आशीर्वाद दिला. तिच्या माहेरची माणसे मोठ्या मनाची आहेत हा अनुभव या प्रसंगाने पुन्हा एकदा आला.

**– नामदार सुशीलकुमार शिंदे**
नगरविकास, न्याय व विधी मंत्री
महाराष्ट्र राज्य, मुंबई

निवडक 3836
28896
7/1/69

# दलित पँथरची गणगौळण

**– नामदेव ढसाळ**

'पँथर' जन्मास आले त्याची मोठी हकिगतच आहे. ती हकिगत अशी की बासष्ट त्रेसष्टपासून मी प्रजासमाजवादी पक्षात होतो. तिथं प्राथमिक राजकीय बाळकडू मला मिळालं. ताडदेवचं जनता केंद्र दंडवते आणि कंपनीच्या नेतृत्वाखाली चालायचं. मी विद्यार्थी असताना जनता केंद्राच्या बांधकामात मदत केली आहे. अगदी भक्तिभावाने केली. त्या विद्यार्थी दशेत माझ्यावर विशिष्ट संस्कार झाले होते. तेथे त्या दरम्यान प्रचंड वाचन झाले होते. जनता केंद्रात लायब्ररीत मराठी वाङ्मयातील प्रतिष्ठित लेखकांची पुस्तकं होती. ना. सी. फडके, खांडेकर यांचं वाङ्मय मला प्रचंड स्वरूपात वाचायला मिळालं. १९५६ नंतर वाङ्मयात 'लिट्ल मॅगझिन्स'ची लाट आली. त्यामुळे वाङ्मयातील बंडखोरांची बंडखोरी पहाता आली. १९५८ पूर्वी मी गावी होतो. १९५६ नंतरच्या दरम्यान दलित चळवळीची लाट पुण्यामध्ये आली. दलित चळवळीचे लोण, वैचारिक संकल्पना आमच्याकडे पुण्याला उशिरा आली. त्यावेळी जोहार, येसकरी, भाकरी मागण्याचे काम–म्हारकी आमच्याकडे आली. मामलेदार, रेव्हेन्यूचे लोक सारा वसूल करण्यासाठी आले तेव्हा त्यांनी गावातील काम केले. त्याचवेळी आपण अस्पृश्य आहोत. महार आहोत, म्हणजे नक्की काय आहोत ? हे प्रश्न मनात आले. आपण विहिरीवर जाऊन स्पर्श

करीत का नाही. जीवाची काहिली झाली तर पाणी मागायचे, त्या माणसाला वेळ असला तर वाढणार नाही तर मी कामात आहे असे म्हणून पुढे जाणार अशी एक परिस्थिती होती. शाळकरी वयात असे तीव्र जाणवले की मराठ्यांची व इतर स्पृश्य मुले मास्तरांच्या समोर बसत. आम्ही अस्पृश्य मुले लांब बसत असू. माझी चूक झाली तर ' ढसाऽऽळ ' असे जोराने ओरडणार ! असे ते दुर्धर चित्र होते. ते मी प्रत्यक्ष जवळून पाहिले. मी शहरात आल्यानंतर प्रजासमाजवादी पक्षाचे काम करू लागलो. राजकारणातले संस्कार त्यावेळी माझ्यावर झाले. मधू दंडवते आणि मंडळीचा माझ्यावर लोभ होता. समाजवादी मंडळी थोडी फार का होईना दलितांचे काम करीत होती. मी कामाठीपुऱ्यात जयराजभाईलेनमध्ये ढोरचाळीत राहात असे. येथे प्रामुख्याने महारांची वस्ती त्यावेळी मला रोमांटिक फिल्मस्‌ची आवड झाली. असे विचित्र मन तयार झाले. त्या वयात मी एका मुलीच्या प्रेमात पडलो. आणि ते प्रकरण लिकेज झालं. मला आठवतं ६७–६८ च्या सुमारास ' गाईड ' सिनेमा लागला होता, त्यावेळी बॉम्बे सेंट्रल झोपडपट्टीला आग लागली होती. जनता केंद्रामध्ये आमच्यावर संस्कार झालेलेच होते. आणि त्या मुलीच्या घरासमोरच आग लागली होती. मग काय मधुकर सोनावणे आणि मी आग विझवायला गेलो. पूर्ण दिवस काम केलं. त्या गडबडीत पुष्कळ वेळ ती माझ्याबरोबर होती. ती घरी जायला तयार नव्हती. मी तिघांची समजूत घालता घालता वैतागून गेलो. मला तर फार मोठी प्रचंड शिकायची इच्छा होती. ती मुलगी ऐकेना. मग मी काय केलं. कामाठीपुऱ्यातील घरी तिला घेऊन गेलो. माझे वडील हे सर्व पाहात होते. चाळीतील लोकांना ही मुलगी इथली नाही. ही मुलगी इथं कशी काय आली हे काही प्रकरण केलेलं दिसतंय, असा ओरडा केला. या मुलीशी मी लग्न करीन असे मी वडिलांना सांगितले. नामदेव ढसाळ नावाच्या अस्पृश्याने अल्पवयीन मुलीला पळवून नेले. मी रामायण केलं माझ्या वडिलांच्या मते मी स्वत:च्या पायावर उभा राहिलो पाहिजे असं त्याचं मत होतं. मी त्या मुलीला गावी घेऊन गेलो. या प्रकरणामुळे एक गोष्ट झाली. शिक्षणाने संपून गेले. मी खरोखरी हादरून गेलो. शहाण्यासुरत्या माणसांना लफडे वाटले. मी माझ्या मावस बहिणीच्या घरी गेलो पण इतर लोकांनी त्यांना अक्षरश: जेरीस आणले. इकडे मुंबईत जनता केंद्राचे काम सुभाष सुर्वे पाहात असत. हे सर्व प्रकरण झाल्यानंतर ते आमच्या नातेवाईकांना भेटले. त्यांना नातेवाईकांनी सांगितले ! त्यांचे काही चुकले असेल. अज्ञानामुळे त्यांनी ते केले असेल. परंतु ते म्हणाले की, मुलगी अल्पवयीन असल्यामुळे तिला रिमांडहोममध्ये पाठवावे लागेल. पोलिसांना सांगावयाचे नाही. गाजावाजा करायचा नाही. असे हे प्रचंड संकट.

ती मुलगी आणि मी गावाला येताना चार तास एकत्र होतो. त्यावेळेस माझ्या मनात काही आले नाही. म्हणजे थोडक्या वेळात तरुण–तरुणी एकत्र आले

तर शरीराची खाज भागवून टाकतात. पण मला तसे मुळीच वाटले नाही मात्र मनात प्रचंड ओढ होती. मुलीच्या नातेवाईकांनी गाव गाठलं. मुलीचा भाऊ समजावयाला आला. तुमचं एकमेकांवर प्रेम आहे तुम्ही परत जा. मला हे भयानक वाटलं. मुंबईत गेलो तर मारतील या भयाने मी तिथेच राहिलो. मी एक्झिक्युटिव्ह इंजिनियरच्या ऑफिसमध्ये आयुष्यात शिपायचे काम केले. तिथे पाचशे–सहाशेंचा जथा होता. तेथे दांडेकर नावाचे रसिक अधिकारी होते. मला कविता करता यायची. मी त्यांना त्या वाचून दाखवायचो. त्या बहुधा त्यांना आवडत असत. कांबळे हेडक्लार्क मात्र माझ्यावर जळायचा. एका महिन्यात माझे सर्व प्रकरण दांडेकरांना सांगितले होते. त्यामुळे एकप्रकारची माणुसकी. माझ्यावर त्यांचे प्रेम होते. तेथे ट्रेसर बर्वे होता. त्याचं हाताखालच्या मुलीशी लफडं सुरू होतं. मला ते भयानक वाटलं. आयुष्यात मी त्याला पाणी दिलेलं नाही. मी मुंबईला गेलो तर नक्की घात होईल. अशा पार्श्वभूमीवर मी शेवटी मुंबई गाठली. मुंबईला आल्यावर वडलांना माहीत होतं दगा फटका होणार. त्यांनी घरात राहू दिलं नाही. मी रात्री टॅक्सी चालवायला शिकलो मला पुष्कळ बरसचा नाद होता.रात्री एक पासून ते सकाळी चार पर्यंत ससून डाक येथे टॅक्सी चालवित असे. त्यावेळी कोळणीकडून आठ आणे घेत असे. मी टॅक्सी चालवायला शिकलो आणि ती मुलगी लग्न करून गेली. नंतर मी तिला एकदाच भेटलो आणि तिला मी लिहिलेल्या कविता समर्पण केल्या आणि एक फूल देऊन–मजेशीर रोमँटिक प्रसंग – माझे ते प्रकरण तोडल–घर सोडलं. त्या मुलगी–प्रकरणामुळे मी अगदी बेफाम झालो. मी स्वतंत्ररीत्या टॅक्सी चालवायला लागलो मग पैसा यायला लागला वाङ्मयीन संस्काराचा उपयोग झाला. आमच्यावर लिट्ल् मॅगेझिनचे राजा ढाले, भाऊ पाध्ये यांचे आकर्षण होते. मी कविता करीत असे. एक दिवस मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयामध्ये कविसंमेलन झाले होते. त्याचे अध्यक्ष अनंत काणेकर होते. मी त्यावेळेस बंडखोर होतो. माझ्या भावना जातीयवादी असत असे उगीचच लोकांच्या डोक्यामध्ये होतं. मी कविता वाचून संमेलन गाजवून टाकलं. तेथं सत्यकथेचे प्रतिनिधी पटवर्धन होते त्यांनी मला बोलाविले. माझ्या तीन–चार हजार कविता होत्या त्या घेऊन गेलो होतो. त्यांनी तीन–चार दिवस त्या ठेवून घेतल्या. माझ्या पाच कविता सत्यकथेत घेतल्या. मग आम्ही 'दलित पँथर' कडे कसे आलो? या पार्श्वभूमीवर आम्ही चैत्यभूमी ते गांडू बगीच्या पर्यंत मोर्चा काढला. यात नारायण सुर्वे होते. सत्यकथेत कविता आल्यानंतर मी प्रसिद्ध होतोच. मी छंदात्मक कविता लिहिल्या होत्या. माझा तो फँटॅस्टिक काळ होता. आम्ही एक अनियतकालिक काढावयाचे ठरविले. वाङमयातील असा माझा प्रवास सुरू झाला. ज. वि. पवार माझा सहसंपादक होता. आम्हाला पैसा मिळू लागला. दलिताच्या परिस्थितीवर मी फार व्यथित होतो. आमचा दौरा होऊ लागला. सूचना येऊ लागल्या. नेरूरकर,

कमलाकर सुभेदार आमच्यात आले होते. समता मोर्चा आम्ही काढला. १००।२०० चा ' पँथर ' चा मोर्चा निघाला. बाबुराव बागूल पँथरचे सदस्य झाले. आम्ही ढालेकडे गेलो. इंदापूर-बावडयाच्या त्या वेळच्या प्रकरणावरून आम्ही व्यथित होतो. आम्ही दलित युवक आघाडी स्थापन केली. चर्नी रोडवर एक हजारची युवक आघाडी स्थापन केली.

मग दलित आघाडीचं प्रकरण तिथंच थांबलं आणि मग आम्ही फार अस्वस्थ झालो होतो आणि जोरदार अशी प्रतिक्रिया उमटायला पाहिजे होती असे वाटू लागले. ती दलित युवक आघाडीच्या बॅनरखाली उमटली पाहिजे. एका मोर्चात ती उमटलीच होती. परंतु कंटिन्यू झाली नाही. आणि त्याच दरम्यान आम्ही ढाले साहेबांचा लेख छापला. त्यांचं लिखाण चिक्कार गाजलं. त्याच्यामध्ये त्यांनी बाबुराव बागुलापासून ते सदा कऱ्हाडेपर्यंत थोर थोर लोकांना चिक्कार चोपून काढलं होतं आणि ही एक राजा ढालेची सुताच होती. या चळवळीत राजा ढाले असताना राजा दलितब्रिलित आहे हे बऱ्याच वाङमयातील लोकांना तोपर्यंत माहीत नव्हते. आणि लिटल मॅगझिनचा ग्रुपच इतका थोर होता की जातीचाफातीचा त्यामध्ये प्रादुर्भाव नव्हता. अशा तऱ्हेची ती जातीविहीन वाङमयीन चळवळ होती. जातपात धर्म यांच्यापेक्षा तुम्ही काय लिहिता आणि ते किती मोलाचं आहे असा तो संस्कार होता. मात्र ढाले यांनी आमच्या ' विद्रोह ' च्या निमित्ताने त्यांची पहिल्या प्रथम दलित म्हणून ओळख करून द्यायला सुरुवात केली. ते आम्हाला सांगत असत की मी विद्यार्थीदशेत असताना ' प्रबुद्ध भारत ' मध्ये अमुक जातक कथा लिहावयाचो. नंतर अण्णाभाऊ साठेच्या आठवणी सांगायचा की माझ्या जातीबद्दल अभिमान होता आणि त्या कॉन्शसनेच मी काम करावयाचो. वगैरे वगैरे ! असे ढाले त्यावेळी मला म्हणावयाचा. परंतु ढाले खरं म्हणजे लिटल् मॅगझिनच्या चळवळीत कुठल्या जातीचा आणि कुठल्या पातीचा आहे हे काही निश्चित नव्हतं आणि ढालेची भूमिकाही तशी नव्हती.जेव्हा ढालेच्या बरोबर मी दोस्ती करायला गेलो तेव्हा मला किती महद् कष्ट उपसावे लागले. ते मी प्रत्यक्ष अनुभवलेलं आहे. परंतु त्या ' विद्रोह ' च्या तिसऱ्या अंकाने मात्र त्याच्या जीवनात एक नवीन कायापालट झाला, हे कबूल करायला लाज वाटायला माझ्यासारख्याला तरी काहीच कारण नाही. मी त्याला म्हणायचो की आपण पुढे काहीतरी करू, तर तो म्हणे–जाऊ दे रे वाङमय वगैरे वाङमयात काहीतरी करावे असं त्याला त्यावेळी वाटत होतं. पहिलं की कुठलं संमेलन कुणास ठाऊक,ते साहित्य संमेलन महाडला होतं. बाबुराव बागूल आणि कंपनी यांनी भरविलेलं ते साहित्य-संमेलन ' होतं आम्ही उरापोटावर ' विद्रोह ' चे अंक बांधले. राजा ढाले मी, तसेच सिनकर माझ्याबरोबर होता की जयंता नेरूरकर होता ते मला आठवत नाही. भीमराव शिरवाळे हा सुद्धा ' सत्यकथे ' चा स्टोरी रायटर होता. तो राजा

ढालेच्या रुममध्येच राहावयाचा. असे आम्ही चार–पाच जण महाडला गेलो. लिट्ल् मॅगझिनमधले, दलित चळवळीतले लोक आले हे पाहिल्याबरोबर तेथे राजा ढाले आणि मला बाबुराव बागूल आणि कंपनीनं अस्पृश्यासारखीच वागणूक दिली. आमची टिंगल सुरू केली. परंतु मी यात वस्ताद होतो. जो बोलेल त्याला सवाई उत्तर द्यावयाचो आणि निरुउत्तर करून सोडावयाचो. ढाले मात्र विचित्रच होता. तो काहीही बोलायचा आणि खोड्याही काढण्यची त्याला सवय होती. त्यामुळे महाडच्या साहित्यसंमेलनावर तसा परिणाम आम्ही करून आलो. पण सर्वांच्या लेखी आम्ही टिंगलीचा विषय होतो. दया पवार वगैरे बाबुराव बागुलांची शागीर्द होती ती मंडळी टिंगलबाजच आमच्याकडे पाहावयाची. संमेलनाला पानतावणे आले होते. ते मला वाटतं राजा ढालेवर खूष होते. अशा त्या काळात २०४, चर्नी रोड, येथे जॉर्ज फर्नांडीस यांच्या पक्षात आम्ही नंतर काम करत होतो. त्यांना त्यावेळी मी म्हणालो की, इंदापूरबावड्याच्या प्रकरणी आपण काय करायचं ! तेव्हा ते म्हणाले की, आम्ही ट्रेडयुनियनवाले आहोत. आपल्याला जातीच्या प्रश्नावर डायरेक्ट काही करता येणार नाही. त्यावर मी म्हणालो की, आपल्या युनियनमध्ये बॅकवर्ड क्लासचेच तीन चतुर्थांश लोक आहेत. मग आपल्याला हा प्रश्न सोडवायला स्वतंत्र ऑर्गनायझेशनची गरज काय ? त्यावर ' आपली संयुक्त समाजवादी पार्टी ही लोहियांना मानते, लोहियांच्या ६० बाय ४० हा सिद्धांत जगप्रसिद्ध आहे. त्यात त्यांचा सप्तक्रांतिचा पॉइंट आहे, ' असे बोलून त्यांनी आम्हाला गप्प बसवलं. आम्ही समजलो की, साला ये गांडू दिखता हैं, असं रागाने मनातल्या मनात म्हटलं. त्यावेळेला तेथे मधू दंडवतेचे बंधू बाळ दंडवते, ते आम्हाला अत्यंत जवळ घेऊन आपलेपणाने समजावत असत. जाऊ द्या, जॉर्जला सध्या वेळ नाही. कधीतरी आपण एकत्र बसू. अण्णा साने हे गंभीर प्रकतीचे कार्यकर्ते होते आणि ट्रेड युनियन मधले जुने पुढारी होते. दिगंबर सातव, महाबळ शेट्टीसारखे तरुणही तेथे होते. रमेश समर्थ हे पात्र टायपिस्ट हे सुद्धा आमच्या लिट्ल् मॅगझिन ट्रेडयुनियनवालं मधलं पात्र होतं. ते फारच फँटास्टिक होतं. एकीकडे चरस लावणार, झुरके ओढणार आणि तिकडे टाईप करीत बसणार. ते करीत असताना हातात दोरे बांधणार आणि तोंडाने फँटास्टिक आवाज काढणार . . . . फा फू खा खू . . . . असे चमत्कारित आवाज काढणार. आम्ही वाङ्‌मयातील लोक गेल्यावर चिक्कार गप्पासप्पा मारणार, असं ते सर्व प्रकरण होतं.

हा सर्व प्रकार झाल्यानंतर मला काही पहावेना. ऑर्गनायझेशन पाहिजे असंच मला वाटलं होतं. ज. वि. पवारना मी म्हटलं, आपण त्यांचं पँथर पँथर सगळं ऐकतो आहोत तर आपण ' दलित पँथर ' काढू या का ? तर ज. वि. ने म्हटले की, आपल्याला रिस्पॉन्स किती मिळेल ? आपल्याला राजा पाहिजे पण तो

राजा दलित युवक आघाडीमध्ये आहे. तो आपला अट्टाहास सोडायला तयार नाही. मग मी म्हटलं, इतके उपद्व्याप आपण कशाला करावयाचे ?

मग आम्ही जॉर्जच्या इथे एक बैठक घेतली. त्या बैठकीला ज. वि. पवार पण हजर होता. जॉर्जवाले लोक आम्हाला प्रतिसाद देत नाहीत असे म्हटल्यानंतर त्या बैठकीस मी वैतागलो. ज. वि. पवार माझ्या 'विद्रोह'चा सहसंपादक होता. तसेच फायनान्सरही होता. त्यामुळे गिरगावच्या त्याच्या बँक ऑफ इंडियामध्ये फावल्या वेळात मी जात असे. तेथे मी एक दिवस त्याच्यावर जाम वैतागलो आणि दलितांवर अत्याचाराच्या घटना सध्या ज्या घडताहेत त्याला प्रतिक्रिया म्हणून 'दलित पँथर' स्थापन करतो आहे, असा मजकूर मला टाईप करून दे असे सांगितले. त्याने तो दिला आणि मी त्याच्या खाली माझं नाव टाकलं, नामदेव ढसाळ संपादक म्हणून. आणि मग नंतर ज. वि. पवारही नाव टाकलं आणि माझी सही केली. नंतर मी रमेश समर्थ बरोबर चहा पिऊन आलो आणि ज. वि. पवारलाही सांगितले सही कर म्हणून काही का असेना. त्यावेळेला तो एम. ए. झालेला पोरगा होता. परंतु त्याने आढेवेढे न घेता फाटकन सही केली हो. त्यावेळचं मला आठवतं. 'दलित पँथर'ची पहिली बातमी ही 'नवाकाळ' मध्येच दुसऱ्या दिवशी आलेली आहे.

समता मोर्चा काढल्यामुळे मला माहीत झालं होतं की, आपण काही राजकीय काम केलं की ते पेपरमध्ये येतं. ९ जुलै १९७२ हा तो दिवस असावा. मी काही डायरी केलेली नाही. मी आणि ज. वि. पवार दोघे संस्थापक होतो. मी ज्या ढोरचाळीमध्ये राहत होतो तेथे रामदास सोरटेबुवा ट्रेड युनियनमधील गिरणी कामगारांचे पुढारी होते. आणि आंबेडकरांचे सहकारी कामगार नेते मडकेबुवा यांच्या तालमीत तयार झालेले सोरटेबुवा असल्याने त्यांच्या मुलाला, रामदास सोरटेला राजकारणात बाळकडू मिळालं होतं. त्यांचे वडील मराठा मंदिराच्या मागे मैदानातील ट्रेड युनियनमध्ये होते. सोरटे नंतर लाल निशाण पार्टीत गेले. रामदास सोरटेला आम्ही आमच्यात घेतला. तो म्हणाला, मी येतो म्हणून. हा तीन नंबर. त्याने सांगितले की या ढोरचाळीतल्या लोकांची काही नावं घ्या. नंतर मारुती सोरटे याच्या चुलतभावाला आम्ही घेतले. कसबे खरात, उमाकांत रणधीर अशी सर्वांची नावे आम्ही जोडली.

प्रचाराला सुरुवात झाली. आम्ही याबाबत ट्रेन्ड असल्यामुळे काही दिवस आम्ही जॉर्ज फर्नांडीस यांच्या ट्रेडयुनियनमधले मॅगाफोन आणले. आयोजित सभेमध्ये कमलाकर सुभेदार, लतीफ खाटीक यात सामील होते. लतीफ खाटीक शिक्षक होता. समता मोर्चामुळे तो एकत्र आला होता. मी कविता करत असल्यामुळे तो फार माझ्या प्रेमात ओढवला गेला. तो राजा ढालेच्या बाजूला सिद्धार्थ हॉटेलमध्ये राहात होता. इकडे मला वैताग आला की मी तिकडे जाऊन

राहायचो. त्यामुळे पँथरच्या आक्टिव्हिटीजमध्ये तोही येऊ लागला. एवढेच लोक पुरे नाहीत, आणखी लोक घेतले पाहिजेत. म्हणून अर्जुन डांगळे, प्रल्हाद चेंदवणकर हे लोक अ‍ॅड केले. आमच्या आतेने जुन्या बाजारातून पावसाळ्यात एक रेनकोट आणला होता. आमच्या ढोरचाळीत २५–२५ माणसं एका खोलीत राहात असत. खुराडचालाही लाजवील अशा त्या खोल्या आणि त्या चाळीची बांधणी होती. पाठीमागे गटारघाण, सर्व नरकच होता. तिथं आम्ही काय केलं, प्रचाराला सुरुवात केली, मध्य मुंबईत प्रामुख्याने दलितांची जी वसतीस्थाने आहेत तेथे मग आम्ही बोलायची. मी ज. वि. पवार आणि रामदास सोरटे प्रामुख्याने बोलंत असू. मात्र उमाकांत रणधीर मयतांची नोंद करायचे काम म्युनिसिपालटीत करीत असे. खरातही नोकरीला होता. ते काही एवढे यात इंटरेस्ट घेत नसत. आम्ही त्यांना नेले तर ते येणार. रणधीर आता स्वतःला संस्थापक समजतो, परंतु तो त्यावेळेला पळून जायचा. आमची ती सर्व प्रकरणे चालू असता ज. वि. पवार मात्र पाच–साडेपाचला बँकेतून बाहेर पडल्यावर निष्ठेने येत असे. आम्ही तिघे-चौघेजण बाकीच्यांना वसती–वसतीमध्ये हाकवून न्यायची. खांद्यावर मॅगाफोन घेऊन फिरायचो. त्यात एक मॅगाफोन लाल निशाण पार्टीतून आणलेला होता. आम्ही काही पॉलिटिकली मॅच्युअर नव्हतो. तरी आम्ही बोलायचो. आम्ही कोणतीही पॉलिटिकल फिलॉसॉफी स्वीकारली नव्हती. अत्यंत त्राग्याने, अत्यंत करुण, अत्यंत हृदयद्रावक अशी भाषणे आम्ही तीन-चार लोकांनी त्यावेळी केली. मग आम्ही प्रचार करून टाकला की, ' आपल्या समाजावर अन्याय होतो आहे. ' आपला कोणी वाली नाही. विरोधी पक्षातले लोक असे असे आहेत. आपल्याच समाजातील संघटनांचे लोक सौदेबाजीत गुंतले आहेत, वगैरे आणि आता ' आपण काही तरी केले पाहिजे. ' ही भीमशक्ती आहे. ती जागरूक ठेवली पाहिजे. तिचे जग बदलले आहे आणि ती आता अशी थंड ठेवली तर . . . . असे सुरू झालं आणि त्याला प्रचंड प्रतिसाद मिळायला लागला. असा प्रचार करीत असताना पहिल्याप्रथम आम्ही कामठीपुऱ्यामधील वसतीस्थानं, त्यानंतर सातरस्त्यावरील सिप्लेक्स मिलजवळील चार चाळीमध्ये आलो. तेथील दोन नंबर चाळीत माझे भाषण प्रचंड प्रभावी झालं. तसंच ज. वि. पवारचंही प्रभावी झालं. त्यामध्ये अडीचशे तीनशे लोक होते. ही कॉर्नर मिटिंग म्हणायला हरकत नाही. पाठीमागून बाबासाहेब आंबेडकर झिंदाबाद वगैरे . . . . त्यामुळे आमचा हुरूप वाढायला लागला. . . . . आम्हाला प्रतिसाद मिळायला लागला. त्या सगळ्या धांदलीमध्ये तेथील भाई सांगारे हा पूर्वी कॉंग्रेसमध्ये बी. डी. झुटेंना मदत करीत असे, आमचं ते सगळं प्रकरण पाहून तो प्रभावित झाला. भाई सांगारेनी विचारलं, की आपण इथून पुढे कुठे जाणार ? तर, ' लव्हलेन ' ला जाणार. तर तो पुढे प्रचारासाठी आमच्याबरोबर आला, वास्तविक त्याच्याबरोबर आमचं काही बोलणं झालं

नव्हतं. एका सभेतील भाषण ऐकूनच तो लव्हलेनमध्ये आला. त्याला आम्ही बोलायला विनंती केली. आता बोला. हा हिरामण ऊर्फ भाई सागर पण तेथे बोलला तो फारच प्रभावी बोलला. लव्हलेनमध्ये भेटले आम्हाला अविनाश महातेकर. तिथे तर पाचशे-आठशे लोक आमच्या कॉर्नर मिटींगला होते. रात्री ७–८ ची वेळ होती. त्यांनी लायब्ररीत मिटिंग बोलावली. तिही आम्ही जिंकली. मग असं व्हायला लागलं की आम्ही प्रचार सभेला गेलो की लोक आम्हाला प्रश्न विचारायचे. ते असं कसं होईल ? हे तसं कसं होईल ? हे सर्व दलित पँथरच्या बॅनर खाली सुरू होतं. मुंबईत प्रचार फेरी झाली. मग आम्ही विचार केला. ज. वि. पवार राहतो तेथे वाप्टी रोड, कामाठीपुरा, गल्ली नंबर एक येथे कोकणकडल्या महारांची, बौद्धांची सिद्धार्थनगर नावाची वसती आहे. ही वसती म्हणजे फार भयानक प्रकार आहे. तेथे एक म्युनिसिपालटीचे सभागृह आहे. तेथे आम्ही एक मेळावा बोलावला. त्या मेळाव्यामध्ये तेथील सर्वांना बोलावलं, त्याची तारीख मजजवळ नाही, परंतु तो मेळावा प्रचंड गाजला. अनेक लोक तेथे आपल्या गोष्टी बोलले. त्यावेळी रिपब्लिकन क्रांती दल नावाची संघटना डॉ. नारायण गायकवाड नावाचा माणूस चालवित होता. हा आमच्या अगोदर पार फार्मात होता, परंतु आमच्या या प्रचंड रेटयापुढे ते गडबडले. आमची प्रचाराची पद्धत अशी होती की, थाळी वाजवून, कॉर्नर मिटींग. धो धो पावसात भिजत आहोत. तेथे कुणाकडे छत्री आहे, कुणाकडे नाही. मॅगाफोनवर ते प्रकरण केलं. त्यामुळे साहजिकच प्रचार वाढू लागला. त्या मेळाव्याला राजा ढालेलाही आम्ही निमंत्रण दिलं. ढाले आला होता की नाही, ते मला आठवत नाही, परंतु तो अंधुकसा येऊन गेला असावा. येथे आम्ही १३ जण संस्थापक म्हणून काही गोष्टी केल्या. प्रत्यक्ष कामाला हे कोणीच नव्हते. जगजीवनराम यांनी दलितांच्या चळवळीमध्ये सत्तेवर राहून काम केले. आंबेडकरानंतर दलितांचा मोठा पुढारी असे काही लोक त्यांना मानतात. या जगजीवनराम बाबूवर आमचा फार राग होता. कारण तसं पाहिलं तर बाबासाहेब आंबेडकरांचं टोटल राजकारण हे काँग्रेसच्या विरोधातलं राजकारण. जेथे कायदे आणि कानून केले तेथे काँग्रेसशी जवळीकही केली. त्याची कारणे वेगळी. पण ती आता यात मी देत नाही. परंतु जगजीवनरामबद्दल आम्हाला फार राग होता. दलित चळवळीचं सर्वांत जास्त नुकसान कोणी केलं असेल तर ते जगजीवनराम यांनी केलेलं आहे आणि या भडव्याला सबक शिकवायचा असं आमच्या त्यावेळी डोक्यात होतं. ज. वि. पवार, मी, रामदास सोरटे, कसबे यांनी तयारी केली. रणधीर हा यायचाच नाही. मला कामच आहे. मला वेळच नाही, असं एक्स्ट्रॉ ऑर्डनरी आपण आहोत असं भासवायचा. माशी पडली तरी जीव जाईल असा तो प्राणी. परंतु असा तो विचित्र होता. नेमका तोच पळून जायचा. आम्ही एक दिवस

प्रचारासाठी ताडदेवच्या झोपडपट्टीत गेलो आणि तिकडून येताना माझं आणि रामदास सोरटेचं भांडण झालं. काही तरी निघालं आणि मी म्हणालो, हलगर्जीपणा चालवला आहेस. असं मी त्याला फायर केलं आणि मागपुढं न पहाता त्यानं साट्कन माझ्या तोंडात मारली. मी प्रवृत्तीने अत्यंत जहाल. मी कुणाचा मार कधीच खाल्लेला नाही. मार खाण्याच्या वेळा ज्या ज्या वेळेला आल्या त्या त्या वेळेला प्रचंड काही तरी केलं आहे. मला ते भयानक फील झालं. भयानक राग आला. खून करू की मारू. परंतु ज. वि. पवार मिठी घालून मला म्हणाला, नामदेव, प्लीज, तू आता काही करायचं नाही, वगैरे. नाहीतर आपला खेळ इथंच संपून जाईल. पण काय झालं कुणास ठाऊक ? मी इतका रागीट माणूस पण त्यावेळेला मी आपला गप्प बसलो. मी म्हटलं, ठीक आहे, तुम्ही मला मारलेलं आहे, पण आपण ज्यासाठी काही करतो आहोत, त्यासाठी मार खातो, पण तुम्ही हे फार वाईट केलंत. नंतर त्या रामदास सोरटेला रिअलाईज झालं की, आपण साला काहीतरी चूक केली. पण पुढे त्याची नि आमची फार दोस्ती झाली. एवढा मवाली माणूस मार खाऊन गप्प बसला. आम्ही पँथरतर्फे जगजीवनरामला निदर्शने करावयाची ठरविले होते. टिळक भवनला ते आले होते. लोअर परेलला आम्ही उतरलो होतो. भाई संगारेची फौज आणि आमची कामाठीपुऱ्यातील फौज असे ६४ लोकांना त्या निदर्शनामध्ये पकडले गेले आणि पहिल्या प्रथम दलित पँथर्सची अटक झाली. भाई संगारेचा त्यावेळी सल्लागार मार्गदर्शक सातरस्त्याचा बावा आढाव होता. तो पोलीस खात्यात होता. गोपाळ फुलपगारी होता. ही सर्व जोरदार मंडळी ७२ च साल असावं. यात लतीफ खाटीक, कमलाकर सुभेदार यांचा समावेश होता. सातरस्त्यावरील चार चाळीमधील एका माणसानं मर्डर केली आणि सक्तमजुरी तो भोगत होता. तो वॉर्डन म्हणून होता. तेथे ६४ लोकांना आम्हाला बॅरॅकमध्ये टाकलं होतं. त्याची आणि आमच्या गँगमधील एकाची ओळख झाली. दुसरा एक जण वॉर्डन आला आणि विडी मागू लागला. आमच्यातील एक रागावला, म्हणाला, ' मा का चूत. तेरेको क्यों बिडी देना, हम ऐसा है, वैसा है; गव्हर्नमेंटको ऐसा करेंगे, उसको ऐसा करेंगे ' हे बोलणाऱ्याला माहिती नाही की हे वॉचमन, वॉर्डन हे गुन्हेगार असतात म्हणून. आणि जी मारामारी झाली आतमध्ये की विचारू नका. वॉर्डननं अलाराम केला. सर्व वॉर्डन आणि शिपाई गोळा झाले. ६४ लोकांचं आणि त्यांचं प्रचंड तुंबळ युद्ध झालं. तेथे क्षीरसागर नावाचे इंगळे म्हणून मोठे जेलर होते, त्यांनी मग मिटवामिटव केली. दोनचार दिवसांनी जामीन वगैरे झाला आणि सर्वांनी आम्हास सोडवून आणले. आमच्याकडे काही योजना नाही. जामीन नाही. काम सुरू केलं, सुरू झालं आणि त्याला जोरदार प्रतिसाद मिळाला. लोकांची तीव्रता ताणली होती. बाहेर आल्यानंतर मग मी काय केलं की, माझ्या डोक्यात राजा ढाले होताच. मी त्याच्याकडे गेलो. मी लोक

नव्हतं. एका सभेतील भाषण ऐकूनच तो लव्हलेनमध्ये आला. त्याला आम्ही बोलायला विनंती केली. आता बोला. हा हिरामण ऊर्फ भाई सागर पण तेथे बोलला तो फारच प्रभावी बोलला. लव्हलेनमध्ये भेटले आम्हाला अविनाश महातेकर. तिथे तर पाचशे-आठशे लोक आमच्या कॉर्नर मिटींगला होते. रात्री ७–८ ची वेळ होती. त्यांनी लायब्ररीत मिटिंग बोलावली. तिही आम्ही जिंकली. मग असं व्हायला लागलं की आम्ही प्रचार सभेला गेलो की लोक आम्हाला प्रश्न विचारायचे. ते असं कसं होईल ? हे तसं कसं होईल ? हे सर्व दलित पँथरच्या बॅनर खाली सुरू होतं. मुंबईत प्रचार फेरी झाली. मग आम्ही विचार केला. ज. वि. पवार राहतो तेथे वाप्टी रोड, कामाठीपुरा, गल्ली नंबर एक येथे कोकणकडल्या महारांची, बौद्धांची सिद्धार्थनगर नावाची वसती आहे. ही वसती म्हणजे फार भयानक प्रकार आहे. तेथे एक म्युनिसिपालटीचे सभागृह आहे. तेथे आम्ही एक मेळावा बोलावला. त्या मेळाव्यामध्ये तेथील सर्वांना बोलावलं, त्याची तारीख मजजवळ नाही, परंतु तो मेळावा प्रचंड गाजला. अनेक लोक तेथे आपल्या गोष्टी बोलले. त्यावेळी रिपब्लिकन क्रांती दल नावाची संघटना डॉ. नारायण गायकवाड नावाचा माणूस चालवित होता. हा आमच्या अगोदर पार फार्मात होता, परंतु आमच्या या प्रचंड रेटचापुढे ते गडबडले. आमची प्रचाराची पद्धत अशी होती की, थाळी वाजवून, कॉर्नर मिटींग. धो धो पावसात भिजत आहोत. तेथे कुणाकडे छत्री आहे, कुणाकडे नाही. मॅगाफोनवर ते प्रकरण केलं. त्यामुळे साहजिकच प्रचार वाढू लागला. त्या मेळाव्याला राजा ढालेलाही आम्ही निमंत्रण दिलं. ढाले आला होता की नाही, ते मला आठवत नाही, परंतु तो अंधुकसा येऊन गेला असावा. येथे आम्ही १३ जण संस्थापक म्हणून काही गोष्टी केल्या. प्रत्यक्ष कामाला हे कोणीच नव्हते. जगजीवनराम यांनी दलितांच्या चळवळीमध्ये सत्तेवर राहून काम केले. आंबेडकरानंतर दलितांचा मोठा पुढारी असे काही लोक त्यांना मानतात. या जगजीवनराम बाबूवर आमचा फार राग होता. कारण तसं पाहिलं तर बाबासाहेब आंबेडकरांचं टोटल राजकारण हे काँग्रेसच्या विरोधातलं राजकारण. जेथे कायदे आणि कानून केले तेथे काँग्रेसशी जवळीकही केली. त्याची कारणे वेगळी. पण ती आता यात मी देत नाही. परंतु जगजीवनरामबद्दल आम्हाला फार राग होता. दलित चळवळीचं सर्वांत जास्त नुकसान कोणी केलं असेल तर ते जगजीवनराम यांनी केलेलं आहे आणि या भडव्याला सबक शिकवायचा असं आमच्या त्यावेळी डोक्यात होतं. ज. वि. पवार, मी, रामदास सोरटे, कसबे यांनी तयारी केली. रणधीर हा यायचाच नाही. मला कामच आहे. मला वेळच नाही, असं एक्स्ट्रॉ ऑर्डनरी आपण आहोत असं भासवायचा. माशी पडली तरी जीव जाईल असा तो प्राणी. परंतु असा तो विचित्र होता. नेमका तोच पळून जायचा. आम्ही एक दिवस

प्रचारासाठी ताडदेवच्या झोपडपट्टीत गेलो आणि तिकडून येताना माझं आणि रामदास सोरटेचं भांडण झालं. काही तरी निघालं आणि मी म्हणालो, हलगर्जीपणा चालवला आहेस. असं मी त्याला फायर केलं आणि मागपुढं न पहाता त्यानं साट्‌कन माझ्या तोंडात मारली. मी प्रवृत्तीने अत्यंत जहाल. मी कुणाचा मार कधीच खाल्लेला नाही. मार खाण्याच्या वेळा ज्या ज्या वेळेला आल्या त्या त्या वेळेला प्रचंड काही तरी केलं आहे. मला ते भयानक फील झालं. भयानक राग आला. खून करू की मारू. परंतु ज. वि. पवार मिठी घालून मला म्हणाला, नामदेव, प्लीज, तू आता काही करायचं नाही, वगैरे. नाहीतर आपला खेळ इथंच संपून जाईल. पण काय झालं कुणास ठाऊक ? मी इतका रागीट माणूस पण त्यावेळेला मी आपला गप्प बसलो. मी म्हटलं, ठीक आहे, तुम्ही मला मारलेलं आहे, पण आपण ज्यासाठी काही करतो आहोत, त्यासाठी मार खातो, पण तुम्ही हे फार वाईट केलंत. नंतर त्या रामदास सोरटेला रिअलाईज झालं की, आपण साला काहीतरी चूक केली. पण पुढे त्याची नि आमची फार दोस्ती झाली. एवढा मवाली माणूस मार खाऊन गप्प बसला. आम्ही पँथरतर्फे जगजीवनरामला निदर्शने करावयाची ठरविले होते. टिळक भवनला ते आले होते. लोअर परेलला आम्ही उतरलो होतो. भाई संगारेची फौज आणि आमची कामाठीपुऱ्यातील फौज असे ६४ लोकांना त्या निदर्शनामध्ये पकडले गेले आणि पहिल्या प्रथम दलित पँथर्सची अटक झाली. भाई संगारेचा त्यावेळी सल्लागार मार्गदर्शक सातरस्त्याचा बावा आढाव होता. तो पोलीस खात्यात होता. गोपाळ फुलपगारी होता. ही सर्व जोरदार मंडळी ७२ च साल असावं. यात लतीफ खाटीक, कमलाकर सुभेदार यांचा समावेश होता. सातरस्त्यावरील चार चाळीमधील एका माणसानं मर्डर केली आणि सक्तमजुरी तो भोगत होता. तो वॉर्डन म्हणून होता. तेथे ६४ लोकांना आम्हाला बॅरॅकमध्ये टाकलं होतं. त्याची आणि आमच्या गँगमधील एकाची ओळख झाली. दुसरा एक जण वॉर्डन आला आणि विडी मागू लागला. आमच्यातील एक रागावला, म्हणाला, ' मा का चूत. तेरेको क्यों बिडी देना, हम ऐसा है, वैसा है, गव्हर्नमेंटको ऐसा करेंगे, उसको ऐसा करेंगे ' हे बोलणाऱ्याला माहिती नाही की हे वॉचमन, वॉर्डन हे गुन्हेगार असतात म्हणून. आणि जी मारामारी झाली आतमध्ये की विचारू नका. वॉर्डननं अलाराम केला. सर्व वॉर्डन आणि शिपाई गोळा झाले. ६४ लोकांचं आणि त्यांचं प्रचंड तुंबळ युद्ध झालं. तेथे क्षीरसागर नावाचे इंगळे म्हणून मोठे जेलर होते, त्यांनी मग मिटवामिटव केली. दोनचार दिवसांनी जामीन वगैरे झाला आणि सर्वांनी आम्हास सोडवून आणले. आमच्याकडे काही योजना नाही. जामीन नाही. काम सुरू केलं, सुरू झालं आणि त्याला जोरदार प्रतिसाद मिळाला. लोकांची तीव्रता ताणली होती. बाहेर आल्यानंतर मग मी काय केलं की, माझ्या डोक्यात राजा ढाले होताच. मी त्याच्याकडे गेलो. मी लोक

सोडवून आणलेत. तू जरी युवक आघाडीचा असलास तरी तू काहीतरी बोल. तुझ्या हस्ते हार–बिर घालायचे आहेत. सातरस्त्यावर आमचे हार घालण्याचं प्रकरणं झालं. तरी राजा ढाले आमच्यामध्ये येईना. राजा ढालेने एक लेख लिहिला होता. आम्ही काय ठरवलं, ‘ काळा ’ स्वातंत्र्यदिन करायचा. राजाने ‘ साधने ’ ला ‘ काळा स्वातंत्र्यदिन ’ नावाने लेख तयार केला होता. ‘ हे माझ्या लेखाचं टायटल आहे. ‘काळा स्वातंत्र्यदिन’ तो तुम्ही कसे कसे काय पाळता, वगैरे’ राजा म्हणाला. काय पाळायचं ते आम्ही ठरविणार. आमची संघटना आहे, तू आहेस का आमच्या संघटनेत ? मग तू बोलायचं नाय, मग नेमकं त्यानं झेंड्याबिंड्याचं लफडं काढलं. ‘ राष्ट्रध्वज गाडीत घाला ’ वगैरे. त्यामुळे त्याचा तो ‘ साधनेच्या १५ ऑगस्टच्या अंकातला ’ ( तो विशेषांक होता ) त्यातील तो लेख लई गाजला आणि आपल्या दुर्गाबाई ह्या ‘ साधने ’ च्या ट्रस्टी होत्या. त्या भयानक भडकल्याने त्यांनी लगेच ट्रस्टीचा राजीनामा दिला आणि हे लई मोठं प्रकरण गाजलं. नंतर वर्तमानपत्रात आलं की राजा ढालेच्या लेखावर खटला भरला आहे ! हा खटला झाल्यावर आम्ही १५ ऑगस्टला काय केलं, काळा स्वातंत्र्यदिन पाळला आणि त्यावेळी पुण्यामध्ये पावसाळी अधिवेशन भरत असे. त्यावेळी वसंतराव नाईक मुख्यमंत्री होते. आम्ही ‘साधने’मध्ये एक परिसंवाद आयोजित केला. त्या परिसंवादाला आम्ही पँथरवाल्या मंडळींनी जावयाचे ठरविले.राजा ढाले पण त्यावेळी आले. मुंबईतून साधनेला पँथरचे तीन हजार लोक नेले. साधनेवर शिबिरासारखे वादळ झाले. मी, राजा ढाले, ज. वि. पवार होतो. त्या साधनेच्या बैठकीमध्ये ना. ग. गोरे यांचे स्पेशल भाषण होतं. माझ्या अगोदर ना. ग. गोरे. बोलून गेले होते. आमची अती ‘कडक भाषणं’ आणि ध्वज गाडीत घालणे’ हे प्रकरण, वगैरे आमचं ते सर्व ऐकून होते, की पँथर सर्व भानगडीचे आहे. ते म्हणाले की हे सर्व ‘ एक्स्ट्रिमिस्ट ’ लोकांसारखं चाललं आहे. नक्षलवादी लोकांसारखं चाललं आहे आणि नक्षलवाद हा लोकशाहीच्या दृष्टीने किती भयानक आहे या विषयावर त्यांनी आमच्यासमोर व्याख्यान मारलं. ना. ग. गोरे नंतर मी बोलायला उठलो आणि ना. ग. गोरेंची मी हजामत करून टाकली पुरी. मग ना. ग. गोरे रडायला लागले तिकडे हो. आम्ही आयुष्यभर यासाठी काम केलं आणि आमचा हा . . . आणि त्यांची समजूत घालायला गेले. बाबा आढाव. अहो जाऊ द्या ओ, ती मुलं आहेत, प्रामाणिक आहेत. त्यांचं हृदय अमुक आहे तमुक आहे. नंतर आम्ही शनिवारवाड्याहून मिरवणूक काढली. त्यावेळेला पुण्यातील ब्राह्मण बिथरलेले होते ना ! शनिवारवाड्याजवळील ब्राह्मणांच्या वस्तीतून विचारा कोणीतरी चड्डी घातलेला आर. एस. एसवाला आला आणि राष्ट्रध्वजाला गांडीत घालता काय ? ते असे न तसे . . . आणि तो काठीबिठी . . . आणि एवढ्या तीन हजार लोकांवर काय काय करायला लागला की हो, तर पोलीस सांगायला लागले की अहो, ते तीन हजार लोक

आहेत, तुमचा राग आम्ही समजू शकतो. तुम्ही गप्प बसा–तरी तो ऐकेनाच हो, 'यांना अिकडनं जाऊ देणार नाही, आमच्या अिकडनं हे जाताच कामा नयेत' आणि पोरं तर अजून धमाल करायला लागली– असे ते विचित्रच घडलं. असे ते पुणे गाजवत गाजवत तीन हजार लोक त्या कौन्सिल हॉलवर गेलो. तिथे गेल्यावर काही लोक बोलले आणि मी फारच जहाल बोललो की वसंतराव नाईक हा मुख्यमंत्री कसा आहे. मग त्यांचं लफडं काढलं–त्यांचं आणि देवयानी चौबळचं झोपाझोपीचं एक लफडं काढलं–हे बोलायचं की नाही ते आम्हाला एवढं ज्ञान कुठं हो–असली लफडी व्यासपीठावर काढायची नसतात, ते मी काढून गेलो. नंतर मोर्चा 'डिसबर्स' झाला. आमचं निवेदन घ्यायचं नाही, काही तरी झालं. तिथं एल्. आय. बी. चे ( पोलीस ) लोक होते. वसंतराव नाईकांबाबत असं बोलल्यावर त्यांनी तिथल्या तिथे केस तयार केली. मोर्चा डिसबर्ग झाला–सर्व लोक गेले. मी आनंदात होतो–आज कैसी की मुख्यमंत्री की ! लतीफ खाटीकला बरोबर घेऊन असा चाललो होतो. नेमकं स्टेशनजवळ आलो तो एकाने विचारले की, तुमचं नुकतं पुस्तक आलं का ? बोले–आं, काय चांगल्या कविता करता हो–या ना आपण जरा बोलू–असं म्हणत म्हणत त्यांनी आम्हाला पोलीस स्टेशनला नेले-पोलिस स्टेशनला गेल्यावर म्हटलं बसा आता चहा मागवतो. च्यायला आम्हाला वाटलं खरंच काहीतरी कवितेबद्दल चाललेय– तुमचं भाषण ग्रेट होतं–परंतु असं ते मुख्यमंत्रींना म्हणालात ना, काय म्हणालात ते ? मी म्हणालो. काय नाय बा. ते असं तसं–ते म्हणाले. मग अशा तशा वरच खटला झालेला हाय. आता तुम्हाला अटक केलेली हाय. आता झालं का ? सर्व लोक निघून गेले. आणि दोघे तिथेच राहिले आणि नेमके मला उचललं आणि बंडगार्डन-मध्ये नेऊन टाकलं. माझ्याबरोबर मोरेश्वर वाणी होता. त्याने ते बाबा आढावला जाऊन सांगितलं. मग बाबा आढाव रात्री आला आणि रात्री जामिनावर सोडवून नेलं. अशी ती आमची पहिली अटक. ६४ लोकानंतर वैयक्तिक माझी अटक. १५३ अे आणि दोन चार कलम मला अटकेसाठी लावली. त्या प्रकरणानंतर ढाले अंतर्मग्न झाले. त्यानंतर आम्ही सभा आयोजित केल्या. आमच्या भागाभागातील सभा गाजू लागल्या. मग आमचं भक्ष्य सतत शोधीत राहिलो. बाळ ठाकरेना आम्ही त्या काळात मुंबईचा सर्वात मोठा पुढारी, अत्यंत जोरदार असा हिंदू पुढारी म्हणून त्यांचं आमचं सुरू झालं. आमच्या घोषणा असायच्या,चातुर्वर्णी अमुक अमुक करणाऱ्या गोष्टी. गीतेचं अमूक अमूक आहे. गीता ग्रंथचे आम्ही जाळणार. असं काय, काय सभेत जे येईल ते करायचो. त्याला काही मर्यादाच नव्हती. त्यानंतर पोरासोरांच्या सभा न होता लाखो लाखोंच्या सभा होऊ लागल्या. आणि हा हा म्हणता संबंध शहरभर पँथर पसरलं. जवळ जवळ १००शाखा झाल्या.त्याच गडबडीत आम्ही पुण्याला गेलो. त्यानंतर राजा ढालेचं आणि आमचं कंबाईन झालं आणि तो

पँथरमयच झाला. पुण्यालाही आम्ही मोदीखान्यामध्ये जिंकून टाकलं. सवाल जवाब होतात तसे सवाल जवाब झाले. तोपर्यंत पँथरचं जिकडे तिकडे नाव झालं होतं. मारामाऱ्या, शिवसेनेने पँथरच्या सभेवर हल्ले केले. वरळीला असं झालं, नायगावला असं झालं. प्रत्येक सभेत आमच्या मारामाऱ्या असायच्या. कोणीतरी काहीतरी प्रचंड बोलायचं आणि त्यांच्या रिॲक्शन्स म्हणून बाकीचा बहुजन समाज हा रिॲक्शन द्यायचा. सगळीकडे पेपरमधनं गाजावाजा सुरू झाला होता. पुण्याला सवाल-जवाबात आम्ही जिंकली. मग आठ दिवस मी मोदीखान्यामध्ये राहिलो.त्या मोदीखान्यामध्ये गंगाधर जाधव राहातो. तो आता आंबेडकर नाव लावतो. तो भारतीय दलित पँथरमध्ये आहे. मला लोक तेथे भाकरी वाढून आणायचे आणि मी भिक्षुकासारखा असायचो. तिथेच पुण्याचा अनिल कांबळे नावाचा रिक्षा ड्रायव्हर होता– तो प्रचंड स्पोर्टस्मन होता. या सर्व गोष्टींनी तो भारावून गेला होता– सगळे लोक भारावले होते. त्यापैकी तो एक– तो मला असं म्हणाला की, तुम्ही विहारामध्ये कशाला राहता ? तुम्ही माझ्याकडे चला. मी पँथर झालेलो आहे– त्याच्याकडे गेल्यावर त्याने माझं भावासारखं केलं– मग तीन महिन्यात पुण्यामध्ये पँथर बांधून टाकली– पुण्याच्या अरुण कांबळे आणि मी पुण्यासाठी फार कष्ट घेतले– त्याच्यानंतर पुण्याची गँग आमच्याकडे मोठी झाली. पुण्याचा अरुण कांबळे, चंद्रकांत काळे, राम आटले, तात्या खरात, सदा भोसले ही पुण्याची मंडळी घेऊन आम्ही पुढे नाशिकला गेलो नाशिकला जाताना इगतपुरीला मोटी मारामारी झाली. इगतपुरीला वडे लुटले म्हणून एक बातमी होती. पहा– नाशिकला सवाल जबाब झाले.नाशिकला आमचं प्रचंड स्वागत झालं हजारो संख्येने समाज खेडयापाडयातनं नाशिक येथे कुठनं कुठनं गोळा झाला. आमच्या त्या कौतुकाला सीमाच नाही ६०–६० / ७०–७० वर्षांचे म्हातारे येत असत आणि राजा ढालेच्या पाया पडत असत. राजा ढाले एम. ए. झालेला आहे. वाङ्मयातील थोर इसम आहे. तो तो सर्वात शेवटी बोलत असे. सेकंड लास्ट मी बोलत असे. माझ्या अगोदर भाई संगारे, भाई संगारेच्या अगोदर अविनाश महातेकर, महातेकरांच्या अगोदर ज. वि. पवार असे पांचजण लोक बोलत असू. बोलताना पंढरपूरच्या मंदिराच्या खांबावर बुद्ध नक्ष्या कशा होत्या. त्याच्यावर चांदीचे काही किंवा पत्र्याचे काम आहे. त्याच्या खाली असे होते. असे काही तरी निघत होतं. असं आम्ही लोकांच टेन्शन वर नेलं की राजा ढाले ते खाली आणायचे. लोकांना थ्रिल वाटायचं की पंढरपूर मंदिर पूर्वी बुद्धाचं होतं वगैरे लोकांना गमतीचे वाटायचं. मग नाशिक जिंकलं. शेवटी मध्यवर्ती निवडणुका आल्या. मला वाटते आर. डी. भंडारेची सीट होती. त्याकरिता रोझा देशपांडे, जनसंघाचे वसंतकुमार पंडित हे सर्व उभे राहिले होते. आमच्या पँथरचं जिकडं तिकडं नाव झालं होतं. ज्या ठिकाणी सभा घेऊ त्या ठिकाणी दुसऱ्या दिवशी आमच्यावर खटले. १५३ अे प्रक्षोभक भाषणाने किंवा

दंगलीचे असायचे. १०० सभा मुंबईत केल्यावर १०० खटले आमच्यावर मुंबईत होत असत. काही कारणं नसताना शंभर खटले. मग त्या कोर्टकचेऱ्या सुरू झाल्या. असे करता करता मी त्यावेळेला चिक्कार ठिकाणी वान्टेड होतो– मी त्याची कदरच केली नव्हती– खटला झाला तर जायचे नाही– पोलिसांच्या हातात सापडायचं नाही आणि फक्त सभेच्या वेळी जायचं तेव्हा पोलीस हात लावीत नाहीत. असं माझं नेहमीचं टेक्निक असायचं– पोलीस वैतागून गेले की, हा सर्वांत घाणेरडा बोलतो– हैराण करतो आणि नेमका सापडत नाही म्हणजे काय ? सर्व हिंदू अधिकारी होते. तुमचं चेंबूरचंच उदाहरण सांगतो, सुरेश मथुरे आता मोठा अधिकारी झालाय. तेव्हा कनिष्ठ निरीक्षक होता. तो पॉलिटिकल ब्रँचला होता, तुम्ही आमचे धर्म ग्रंथ जाळता काय ? बघतो तुमच्याकडे, हरामी ! असे काहीतरी बोलायचा. मग मी म्हणायचो : मिस्टर मथुरे, तुम्ही पोलिटिकल अॅक्शन घेतलेली आहे आणि अशा शिव्या बिव्या दिल्यात ना तर इथे तुमची आणि आमची फार मोठी मारामारी होईल. मी काय घाबरणार नाही. तुम्ही तुमचं काम करा. आमचं काम आम्ही केलेलं हाय ! त्यांनी पँथरच्या बाबतीत काय केलं होतं, २५३अे हा बेलेबल गुन्हा आहे. त्याला जामीन मिळतो. त्यांनी आयडिया काय केली की शनिवारी पकडायचा आणि रविवारी आत सोमवारी किंवा मंगळवारी सोडायचा. शिपाई असतात. तिच्याकडे न्याय संस्था असते. तिच्याकडे मनुष्यबळ असतं. तिच्याकडं उत्पादनाची साधनं असतात–आम्ही आपलं आंधळेपणाने जसं काय दोन मवाल्यात आपले मारामारी करतो आहोत जसे काय ! एवढे साधे समीकरण डोक्यात होते. मी विरोध निवडणुकीत केल्यावर राजाने सांगितलं की याला टाळायचं. त्याचं सर्व ठरलं. अेकीकडे आम्ही वरळीला बहिष्कार टाकायचं ठरवलं. आणि दुसरीकडे राजा ढालेने दुसरी बोलणी केली. ज. वि. पवारवर माझा विश्वास असायचा. माझा दांभिक लोकांवर पहिल्यापासून राग असे. अविनाश महातेकरला या प्रकरणावरून दोन–चार वेळेला अगदी सरळ केलं होतं. त्याच्या एका प्रेमप्रकरणाबद्दल मी बोललो होतो. तर मग ह्या सर्व प्रकरणातून मला टाळले. त्याचं काय झालं कोणास ठाऊक. त्यांच्या आणाभाका झाल्या आणि माझ्या उपरोक्ष राजा ढालेने मला क्रिटीसाईज करायला सुरू केले. राजाची माझ्यासमोर डायरेक्ट आव्हानात्मक भूमिका घेण्याची ताकद नव्हती तेव्हाही. परंतु राजा माझ्यावर प्रेमही तेवढाच करायचा आणि लोकांना सांगायचा हा आपल्यातला ग्रेट कवी आहे. कवी लोकांना काही खोडी असतात. कवी लोक अमूक असतात असं त्यांच नेहमी चाललेलं असायचं. नेहमी आपलं पुस्तकाच्या नादी लागणं आणि आपण फार विद्वान आहोत. हा विद्वानपणाच काय तो लोकांना दाखवत असे. प्रचंड जग आमचं उभं राहिलं होतं. काहीही साधनसामुग्री नसताना कुठलीही पाठीमागे राजकीय पुण्याई नसताना. अनुभव पदरी नसताना

एका बर्निग सिच्युएशनमुळे आम्ही नुसता ब्र काढला तर एवढा प्रचंड असा स्फोट झाला आणि या स्फोटाचा सर्वांत जो महत्त्वाचा इम्पॉर्टंट पॉइंट आहे तो वरळी दंगलीच्या प्रकरणाचा. त्या निवडणुकीच्या निमित्ताने ह्या सर्व लोकांचं बोलणं झालं होतं. अशा प्रकारची अॅरेंजमेंट केली परंतु आम्हाला त्याचं काहीच वाटायचं नाही. बाहेर असलं काय आणि आत असलं काय, अशी आमची अवस्था होती. मात्र सरकारी नोकरी करणाऱ्यांवर फार दहशत. आणि हे प्रकरण एवढे वाढत गेले की, त्याला सीमाच उरली नाही. मुंबई कॉंग्रेसचा रजनी पटेल अध्यक्ष होता. हे लोक एवढे हुशार होते की काकासाहेब मेंगदे कॉंग्रेसचा सेक्रेटरी होता–त्यांनी एक टूम काढली होती की पँथरचं सहकार्य घ्यावे. तोपर्यंत आम्ही एक निर्णय घेतला होता की, खेड्यापाड्यातील मागाससमाजावर अन्याय-अत्याचार होतो आणि निवडणुका हे माध्यम आपणा दलितांना न्याय देणारे नाय. कारण आपले प्रतिनिधी निवडून जाऊ शकत नाही. कारण आपलेच मनुष्यबळ हे तुटलेलं आहे आणि म्हणून आपण बहिष्कार टाकायचा आणि त्यातून आपलं महत्त्व काय आहे हे आपण दाखवून द्यायचं, असं आम्ही सर्वानुमते ठरविलं आणि त्याप्रमाणे वरळीला निवडणुकांवर बहिष्कार टाकायचा असं आमचं ठरलं. त्याचा मसुदा तयार करावयाचं काम ढालेकडे दिलं. त्यांनी एक निवेदनवजा एक मसुदा तयार केला. मस्तपैकी तो कसा तरी आम्ही छापून घेतला. हे असं सर्व झालं आणि त्या दरम्यान ढालेकडे डॉक्टर बनसोडे आणि प्रेमानंद आवळे ही मंडळी गेली आणि सांगितलं तुम्हाला काकासाहेब मेंगदे यांनी बोलावलेले आहे. काकासाहेब मेंगदे हे कॉंग्रेसचा मोठा पुढारी आणि मोठा वकील, कम्युनिस्ट चळवळीशी परंपरा असलेला असा. मग त्यांची काही बैठक झाली. तुम्ही अस्पृश्यतेबाबत काम करणारे आहोत, तर तुम्ही वेगळ्या पद्धतीने काम करावं. सत्ताधारी पक्ष हा काही दलितांच्या विरोधी नाही आहे. तुम्हाला मदत करण्याची आमची इच्छा आहे. तुमच्या केसीस काढून घेऊ. तुम्ही आम्हाला इकडे निवडणुकीत मदत करा. अशी काही तरी ती पहिली बैठक झाली. ही बैठक झाल्यानंतर ढाले वगैरे मंडळी म्हणाले की, नाम्याशिवाय हे चालणार नाही. बारगेनिंग करायचं किंवा काही बोलायचं म्हणजे नामदेव ढसाळ पाहिजेच. म्हणून माझ्याकडे सर्व मंडळी आली. त्यावेळी मी टोटल अॅटो गव्हर्नमेंट होती त्यावेळी म्हटलं, " तुम्ही जे काही करता ते फार वाईट आहे. ' या कृतीने आपण सर्व संपून जाणार आहोत. त्यांनी मला लाडीगोडी लावून त्यांच्याही एका बैठकीला नेलं. तेथे काकासाहेब मेंगदे यांची मी उलटीच हजेरी घेतली.मी म्हणालो, 'काका तुम्ही कम्युनिस्ट पार्टी सोडून आलात. आणि कॉंग्रेसमध्ये गेलात, तुमच्या राजकीय प्रवासाचं ठीक आहे हो, पण आम्ही अस्पृश्यतेवर काम करतो. आम्हाला कशाला या पापात ओढता आहात. ' नाही, नाही, नाही. तू जसा समजतोस तसे ते नाही आहे. ' माझी इमेज ढालेनी कशी केली होती–ढालेची एक वाईट खोड होती.

लोकांना नेहमी नावे ठेवायची की तुझ्यात हे कमी आहे, ते कमी आहे. असे ते तर मी त्यावेळी सर्रास सर्व व्यसनांचा अधिपतीच होतो. कंट्री असो, काही असो की घेतली, त्याच्यावर चरस, त्याच्यावर कोकिनचं पानं. अशा माझ्या भानगडी चालूच असायच्या– कामाठीपुरा आणि कंपनी– माझा त्यात उपदंश, व्हीडी, असं माझं एक मजेशीरच मिश्रण होत. परंतु ढाले एका रात्रीत काही सज्जन झालेला प्राणी ना ? हा ढाले हेलनचे चित्र पाहून मुठ्ठ्या मारणारे हे लोक. कंट्रीचे आणि याची त्याची वावडं नसणारे हे प्राणी. हा आमच्या मूव्हमेंटमध्ये आल्यापासून अगदी भयानकच स्वच्छ माणसासारखा वागायला लागला हो निर्व्यसनी आहे असं दाखवू लागला. आपण फार विद्वान आहोत असे त्याचं सुरू झालं आणि चार चौघामध्ये म्हणत असे की, 'अरे अे नाम्या, तू त्या बाईकडे गेला होतास ना भडव्या ? तुम्ही लोक साल्यानु सुधारणार नाय.– आता पंचनामाच ना. पाच–पंचवीस लोक बसलेले असायचं आणि मोठ्या आशेने आलेले आणि नामदेव ढसाळ मोठा बोलणारा वक्ता. किंवा भाई संगारे ग्रेट, त्यांच्यामधल्या काहीतरी गोष्टी फाटकन बोलून टाकायचा हो ' आता हे निवडणुकीचं सुरु झालं तेव्हा तिघाजणांनी ठरवलं की या व्यवहारात आपण नाम्याला काय घ्यायचं नाय. या नाम्याचं फार भयानक हाय वगैरे. त्याला काय कळू द्यायचं नाय. पण मला माझी तारच लागलेली ना अँटो गव्हर्नमेंटची. आपलं असलं. मी आपला वेडचासारखा झापायचो. मला एक प्रसंग अजूनही आठवतो. आम्ही एक मोर्चा काढला होता तो मोर्चा वसंतराव नाईकांसमोर नेल्यानंतर वसंतराव नाईक म्हणाले होते की,अरे अरे अरे काय तुम्ही हे माथेफिरूसारखे करताय हे ! तुम्हाला काय पाहिजे मला सांगा ? मला काही नको. मला एवढीच इच्छा आहे की, या विधानसभेला सुरुंग लावायचा आहे ! –आता ही केवढी बाळबोध गोष्ट हो ! नाईक आपला चिरुट ओढत हसायचे आपले मिस्कील. त्यावेळी त्याच्या हश्याचा अर्थ आम्हाला कळायचा नाय. स्टेटपॉवर ही किती असते. तिच्याकडे लष्कर असतं. तिच्याकडे दलित चळवळ. एक दिवस राजा ढाले आले. मला चल म्हटले. तू काय करतोस भेनचोद साला असं नेहमीच हसूनबिसून आपलं ऋणानुबंध जागविण्याची त्याची जी स्टाईल आहे. त्या स्टाईलने मला घेतले. आमचा तो पुढारीच तो. आम्ही त्याचे पुढारी आम्ही आपले बसलो त्याच्याबरोबर आणि मला ते घेऊन गेले टिळक भवन येथे. तिथे मला वाटतं त्यावेळी काँग्रेस पार्टीचे शरद पवार हे चिटणीस होते. आणि गृहमंत्री होते. त्या काळात आमच्या पँथरच्या भराच्या काळात तर बोलले चल, आपल्याला शरद पवारांनी बोलवलं आहे तू आलाच. पाहिजेस. ज. वि. पवार, मी ढाले मला वाटतं ज. वि. होता की नाही कोणास ठाऊक. पण ढालेने मला नेले. भाई संगारे होता तर गेलो बुवा आम्ही त्यावेळी आम्ही प्रचंड हिरो. महारा-मांगाचे पुढारी. अत्यंत फायरी आणि एक्स्ट्रिमिट असे लोक. अशी आमची इमेज

तयार झाली होती. सर्वार्थाने आम्ही दलित वाङ्मयातील लोक आहोत वगैरे. नवीन गोष्टी मानणारे लोक आहोत. मग काय, गेलो आम्ही टिळक भवनावर. मग राजा ढाल्यांनी तेथे गेल्यावर मला बाहेर ठेवलं. शरद पवार बसायचे तेथे राजा ढाले एकटा गेला, आम्हाला काही घेऊन गेला नाही. परंतु त्यावेळी पैशाची देवघेव नक्कीच झाली होती असं मी म्हटलं तर काहीच हरकत नाही. राजा ढालेला मी म्हटलं, काय रे काय कशाला आत मध्ये गेला होतास ? तर राजा ढाले म्हणाला, पवारांनी आपल्याला बोलावलं होतं. आपल्या वरील खटले काढावयाचे आहेत, असे तसे वगैरे. खटले काढायला कशाला तुझा विरोध असायला पाहिजे वगैरे आणि मग मी काय समजायचं ते समजलो. नंतर मी एकटाच पडलो होतो ना त्या प्रकरणात. ते मेजॉरिटीत गेले होते. आम्ही पाच पुढारी होतो. पाच पैकी चार त्याच्या बाजूला. मी एकटाच पडलो. पण तेरा मधील बाकीचे सर्व लोक गळले होते. आमच्या पुढल्या गडबडीत, संघटनावाढीच्या गडबडीत उमाकांत रणधीर आमच्याबरोबर नव्हता. तो कधीतरी आमची भाषणं ऐकायला येत असायचा. मग कसबे आमच्यातून गळाला, खरात गळाला. नंतर रामदास सोरटे गळाला आणि मधून मधून प्रल्हादशेट बनकर आणि अर्जुन डांगळे आवर्जून असायचे. परंतु राजा ढाले कमी वाङ्मयीन मूल्ये असलेल्याशी कमी दोस्ती करावयाचे. त्याच्यामुळे अर्जुन डांगळे आणि प्रल्हाद चेंदवणकर यांना आमच्या व्यासपीठावर फारसा वाव नव्हता. परंतु अर्जुन डांगळे व बाकीच्या लोकांशी माझी दोस्ती असायची. कारण मी काही माणूसघाणा माणूस नाही. पहिल्यापासूनच मला माणसे जमवणे, बोलणे हे फार आवडायचे तर आमची तशी निकोप मैत्री बाकीच्या लोकांशी. इतर लोकांशी निकोप डायलॉग असायचे. माझ्या डोक्यामध्ये असे काही नसायचे की, तुझे वाङ्मयीन मूल्य कमी आहे म्हणून तुझ्याशी कमी बोलायचं किंवा तुझ्याशी दोस्तीच ठेवायची नाही असं माझं काही नव्हतं. त्यामुळे त्याही काळामध्ये बाकीचे लोक माझे दोस्तच असायचे. परंतु हे टचमध्ये होते. विशेषत: अर्जुन डांगळे आणि प्रल्हाद चेंदवणकर. तर तिकडून आल्यानंतर मात्र मला वाटतं चार जानेवारीचा बहिष्कार. निवडणुकीवर, खेड्यातील लोकांवर तुम्ही बहिष्कार टाकता तर आम्ही निवडणुकीवर बहिष्कार टाकू. मला वाटतं जानेवारी १९७४ ची गोष्ट आहे. ४ की १० तारीख असावी. तर हे झाल्यानंतर ती सभा झाली. त्या सभेला मी वॉन्टेडच होतो. त्या सभेला म्हणण्यापेक्षा त्या सभेला येण्यापूर्वी माझ्यावर दोन–चार ठिकाणाच्या पोलीस स्टेशनची वॉरंटस् होती. एक चेंबूर पोलीस स्टेशनचं वॉरंट होतं, दुसरं भोईवाड्याचं होतं. तिसरं विक्रोळीचं होतं. मी गेलोच नाही. माझ्यावर खटले टाकले. माझ्याकडे अनेक पोलीस आले. मी मी पोलिसांना गुंगारा देऊन वगैरे. असं सर्व झालं बुवा. मग ते पॅम्फलेट छापून घेतले. मग फटाफट पैसे घेतले. पँथरला पहिल्यापासून पैशाची अडचण. कारण

आमची मेंबरशिप नव्हती. आम्ही काही डवे फिरवून पुस्तिका छापून त्यातून काही पैसे मिळवायचे. लोक देणग्या द्यायचे. त्याच्यातून तेव्हढंच आमचं सर्व. गंमत अशी झाली की, एकदम पैसे यायला लागले. छापलेली पॅम्फलेटस् पण आली. नंतर स्टेजपण जोरदार बांधलं गेलं. मला थोडा संशय आला की, साला इकडं कुठं तरी थोडसं पाणी मुरतंय. मी बोलायला सुरुवात केली की हे तिघे चवघे सर्व गुपित लपवायचे. यांची कोणाची हिम्मत नव्हती हे सांगायची की आपण पैसे घेतलेत कॉंग्रेसवाल्याकडून आणि ती सभा झाली. सभा आमची. . . त्या सभेमध्ये सेकंडलास्ट वक्ता मी होतो. त्या सभेत दुपारी आणखी एक गंमतीची गोष्ट. थत्ते नावाचा जो म्हातारा आहे. तो काय विजय तेंडुलकरांना छडीने फोडून काढलं तो करतारसिंग थत्ते. तो पँथरचा बोलवाला ऐकून, हिंदूंना शिव्या देतात वगैरे ऐकून ते आमच्या सभेला आमच्या व्यासपीठावर येऊन बसले. डायरेक्ट कोणाला न विचारता, तर आमची पोरं म्हणाली हा साला करतारसिंग थत्ते–आहे काय ? बुढ्ढयाला, साल्याला आता देऊनच टाकायची वगैरे. आता हे सर्व सुरू झालं. आम्ही सांगितलं वाळानो, तो काही करत नसेल विचारा तर आपण काही करायचं नाही. पण ते म्हातारं जे आलं ते फार चांगल्या भावनेने आलं. स्टेजवर, ते म्हणाले; वा, वा ! तुम्ही जे काही करता ते फार चांगलं काम करता आहात. मला फक्त दोन मिनिटं द्या भाषण करायला. मी तुम्हाला देणगी जाहीर करणार आहे. असं बरं का त्या करतारसिंग थत्तेचं. आता एवढं गोड बोलतोय, म्हातारा म्हटल्यानंतर कोणी त्यावर काही इन्सल्ट केला नाही. त्याला देखील आदरानं बसवलं त्याच दरम्यान ह्या अनिल बर्वेचं प्रकरण पुण्यात गाजलं होत पहा. नक्षलवादी म्हणून त्याला पकडलं होतं आणि तो नुकताच सुटून आला होता. मी पुण्यात सतत असायचो ना. तर अनिल बर्वेची व माझी तिथेच तुरूंगातून सुटून आला तेव्हा ओळख झाली. पेढे वगैरे वाटले. याच काळामध्ये मी मार्क्स लेनिन वगैरे वाचायला सुरुवात केली होती. मार्क्सवाद म्हणजे काय ? हे सर्व त्या पँथरच्या ऐन भानगडीच्या वेळी तर आमच्या त्या सर्व मोर्च्याच्या वेळी बाबा आढाव हे आवर्जुन दलित पँथरच्या प्रत्येक भानगडीच्या वेळी उपस्थित रहायचे. माझ्या आईकडे कामाटीपुऱ्यात येणार. काय साळूबाय, तुमचा मुलगा म्हणजे अमूक आहे ग्रेट आहे. वगैरे आणि बाबांचं बोलणं फार मायाळू परंतु त्यांची मूस मग मात्र वेगळीच पडली. बाबा आढाव आमच्या पुस्तकावर पण खूष. गोलपिठा उशाला घेऊन झोपायचे, असं म्हटल तर अतिशयोक्ती होणार नाही त्यांच्या बाबतीत. एवढं माझ्यावर प्रेम बाबा आढावचं. राजा ढालेचा सतत संपर्क. हुसेन दलवाई अमूक अमूक वगैरेंशी. हे त्याचे त्या काळचे सल्लागार तर हुसेनचा आम्हाला रागच. कारण आम्ही कामगार आघाडीत होतो. समाजवादी पार्टीत मी, कमलाकर सुभेदार–पक्षाचा त्यामुळे बाकीच्या लोकांच्याबद्दल आम्हाला कधी

काही किंमतच वाटली नाही. मग राजा हळूहळू समाजवादी लोकांमध्ये ओढला गेला संपूर्ण. तर हे सर्व त्या पार्श्वभूमीवर झालं. वरळीची भानगड, सभा आमची गाजली. मी इकडून अनिल बर्वेला पण घेऊन गेलो होतो. अनिल बर्वे ' रणांगण ' काढायचा त्यावेळी तो नुकताच अमरशेखांचा जावई झाला होता आणि म्हणाला की मला जरा हॉट हिट इश्यू पाहिजे तर नाम्या मी तुझ्या सभेला येतो. असं म्हणून तो माझ्या सभेला आला होता. मी तिथं गेलो तर मला पकडायला सर्वत्र पोलीस आले होते तिथं. तर मग राजा ढाले म्हणाला की, तू कर भाषण आणि जा निघून. बाकीचे जे लोक होते त्याना मी म्हणालो की मी जातो. कारण बाकीचे लोक तिथे होते. एकावेळी दोन–तीन पोलीस स्टेशन्समध्ये जायचं म्हणजे आठ–दहा दिवस जातील. ह्या पोलीस स्टेशनला जामीन द्या. त्या पोलीस स्टेशनला जामीन द्या असं करता करता मग तेव्हा सेकंडलास्ट मी बोललो. मी तिथं बोललो की, ह्या देशातले लोक असं असतात वगैरे की, खाली पण दाढी वाढवतात. वर पण दाढी वाढवतात. यांचे बापजादे हिमालयात जाऊन दुसरी वेषभूषा घालतात, असं काही तरी भयानक बोललो. परंतु माझ्यावेळी काही मारामारी झाली नाही. पण त्यावेळी वरळीत इकडे दलित, इकडे हे असं. त्या मैदानात टेन्शन निर्माण झालं. आंबेडकर मैदानात मी काय केले, मी भाषण केल्याबरोबर लगेच गायब झालो. मग अनिल बर्वेनी पण भाषण केले. शेवटचा वक्ता राजा ढाले. राजा ढालेनं बोलायला सुरुवात केल्यावर मग सर्वत्र सुरू झाली प्रचंड दगडफेक वगैरे. मी काय केलं. माझ्यावरील भानगडीमुळे मी अनिल बर्वेला म्हटलं मी तुझ्या घरी जातो. मग त्याच्याबरोबर मी इथं आलो. रात्री सासरवाडीमध्ये आणि इथंच झोपलो मी. मी रात्री सात–आठ लोकांना सांगून ठेवलं होतं की काही झालं तर मला कळवायला या म्हणून. तर नेमके अडीच–तीन वाजता मला सांगायला लोक आले, भाई सगारेच्या इकडे, की रात्री शेवटचा वक्ता राजा ढाले होता. आणि प्रचंड मारामारी झालेली आहे. त्याला पकडलेले आहे आणि तिकडे मारामारी चालू आहे. तर आम्ही गेलो तर तोपर्यंत राजा ढालेचा मुक्काम हलवला होता. रात्री मी अडीच–तीनला गेलो पण मी त्या कृतीने एवढा पेटलो होतो की साला आपला चान्स गेला मारामारीचा. मग राजा ढालेना पोलिसांनी काही मारझोड केली. मी त्यावेळी तेथे नव्हतो. त्यातलं डिटेल काही मला देता येणार नाही. परंतु त्याच्यामध्ये त्याला डोक्यामध्ये जखम झाली होती. करंगळीच्या बोटाला मार लागला होता. इतर काही झालं होतं. त्याला कोर्टात वगैरे नेलं तर आम्ही काय केलं, रात्रीच गेलो. पहातो तर प्रचंड लोकांनी मार खाल्लेला हो. मग मला तर रहावेना. मी पहाटे ४–५ वाजता गेलो व त्या मैदानावर. जेवढे सगळ्या पक्षाचे बूथ होते ते सर्व बूथ जाळून टाकले आणि मी आलो निघून. नंतर मग आम्ही एका गुप्त ठिकाणी भेटलो. त्यावेळी त्या गुप्त बैठकीला आमचा

साडू पण होता. त्याची नुकतीच बदली झाली होती. तो क्रांतिकारच मला वाटे. ती आम्ही शिवडी लेबरकँपमध्ये बैठक घेतली. तिथं आम्ही असं ठरवलं, राजा ढालेला आता सोडत नाहीत तर मग त्याच्या निषेधार्थ एक प्रचंड मोर्चा आयोजित करायचा. मग आम्ही सर्वजण वाँटेड राहिलो. त्या सभेत जेवढे लोक बोलले तेवढ्यावर खटले भरले होते. पण त्याच्यात सापडला राजा ढाले. मग मी, भाई सगरे, ज. वि. पवार आम्ही सर्व बाहेर राहिलो. बाहेरून आम्ही दहा जानेवारीचा मोर्चा आयोजित केला. तर मग आमची सर्व धावपळ सुरू झाली आणि तो मोर्चा नायगावहून सुरू झाला. नायगावहून मोर्चा सुरू झाल्यानंतर जेवढे वाँटेड होते ते सर्व एकेक जमा झालो व मोर्चाचे जे नायगावातलं काम होतं, मोर्चा आयोजित करण्याचं ते अर्जुन डागळेने फार चांगलं केले. प्रल्हाद चेंदवणकर आम्ही बाकीचे सर्व बाहेर होतो. त्यांनी पोस्टर्स लावणं वगैरे काम केलं. मी नंतर परळला जो नवीन ब्रीज झाला तिथं ती कोणती टॉकीज आहे हिंदमाता तर त्या पॉईंटला मी मोर्चात सामील झालो. मोर्चा मोठा निघाला. आम्ही जे केलं त्यात कोणतंही राजकारण नव्हतं. सरकार अत्यंत जातीयवादी आहे. त्या सभेला जी भाषणं झाली ती सर्व अगेनस्ट झाली. राजा ढालेनी जी काही कमिटमेंट केली असेल. शरद पवाराशी नेमकं त्याच्या अगेन्स्ट झालं ना. हिला कारण आम्ही जे बोललो, आम्ही जो सूर लावला. अविनाश महतेकरानी, भाई सगारेनी तसेच आणि मीपण तसेच त्याच्यामुळे. राजा ढाले पुढे बोलायला लागला. तो आमच्यापेक्षा चांगलाच बोलायला पाहिजे. त्यानं त्यानं तो सूर लावला तो सभा ऐकण्यासाठी. त्यावेळी दादासाहेब रुपवते मिनिस्टर होते ते आणि त्यांचे काही साथीदार चोरून तिकडे आले होते की हे काय बोलतात वगैरे वगैरे. नेमके त्यावेळी ते गव्हर्नमेंटच्या अगेन्स्ट झाले. शिवसेना व बाकीच्यांना सर्वांना झोडून काढण्याची क्रिया त्या सभेमध्ये पडली आणि मग ती मारामारी झाली व राजा ढाले एकटाच सापडला. त्याला पोलिसांनी बेदम मारलं व बंद पण केले. मग मोठी दंगलच पेटली ना. दंगलच सुरू झाली. दहा जानेवारीचा मोर्चा आयोजित केला. तो मोर्चा सुरू झाला. तो मोर्चा पुढे आला. मोर्चा पुढे आणायला नको होता पण पुढे आला कारण शिवसेनेचा बालेकिल्ला होता ना. परळ ते लालबाग म्हणजे शिवसेनेची प्रचंड मोठी ताकद. पण आमचा रागच मोठा होता. आम्हाला वाटलं. आम्हाला कोणी अडविणार नाही. पोलिसांनी काय आयडीया केली की पोलिसांनीच काही लोक आमच्या मोर्च्यामध्ये सोडले होते. तो ८–१० हजारांचा मोर्चा अत्यंत प्रक्षोभक असा होता. भयानक टेन्शन. प्रचंड संख्येने लोक जमले होते. नेमका मोर्चा सिग्नल पार करून इकडे पुढे आला. के. ई. एम. हॉस्पिटलच्या समोर मेनरोडला आंबेडकर रोडला. तिथं सुरू झाली मारामार. मग त्यातून तिथं भागवत जाधव हुतात्मा झाला म्हणतात ना तो तिथं झाला. माझ्या

हातामध्ये प्रचंड मोठा बांबू होता. लतीफ खाटीकच्या हातामध्ये काही नव्हतं. पण लतीफ खाटीक भयानक प्रक्षोभक झालेला आणि भयानक टेन्शन. जसजसा शिवसेनेचा एरिया येत चालला तसतसं सुरू झालं. मग पोलिसांनी तीन डिव्हिजन केल्या. तिकडून आमच्यावर प्रचंड दगडफेक. तिकडून वंडू शिगरेने ती आयोजित केली होती. नंतर ती आम्हाला कळली. त्या आयलँडवरून तो मोर्चा घ्या म्हणून मी सांगत होतो आणि तो नेमका कडेने घ्यायला लागले. मोर्चा कडेने चालला व दगडफेक सुरूच. आम्ही ठरवलं काही जरी झालं तरी आपल्याला याच रस्त्यानं जायचं. मनुष्यहानी होऊ न देता मधल्या आयलँडने जायचं. आपल्या मोर्चाचे संरक्षण करणं पोलिसांचं काम आहे. पण कसलं काय हो. ते सगळं असं विस्कळीत व्हायला लागलं आणि आमच्या मोर्चातील लोक तिकडे चाळीमध्ये घुसायला लागले. माझ्या हातामध्ये बांबू होता. पण एक माणूस किती आवरणार. आम्ही मुख्य अवघे पाच जणच होतो. त्या त्या स्पॉटला होतो. त्यांना समजावत होतो. पण कुणी ऐकेना. प्रचंड युद्धच सुरू जसं कुरुक्षेत्रावर काही झालं असेल तसं-लाच प्रत्यय होता. तो मुलगा आमच्यापासून १५–२० फुटांच्या अंतरावर त्या चाळीच्या खालून चालत होता. तो भागवत तो आमच्या पँथरच्या सभांना येत असेल. काही होत असेल. ज. वि. पवार त्याचा नातलग होता. तर नेमका कोणीतरी वरून पाटा की दगड टाकला. मी असं वाकून बघतोय आणि त्याच्यामध्ये १५–२० फुटांच अंतर असेल. पहातो तर त्याच्या डोक्यावर तो पाटा पडला आणि तो तिथल्या तिथंच अर्धमेला झाला. तर त्याच्या भावाने त्याला उचलून असं चालवल आहे तोपर्यंत मोर्चावर प्रचंड लाठीमार सुरू झाला. हजारो लोक चपला, पोरंबाळ जे काही असेल ते सोडून कुठे तिकडे काही मार्ग दिसेल तिकडं पळत सुटले. आम्ही काही मैदान सोडून पळणारे लोक नव्हतो. आमच्यातले अविनाश महातेकर, भाटेकर मात्र पळून गेले होते.पण मी,भाई सगारे ज. वि. पवार, लतीफ खाटीक आणि प्रल्हाद चेंदवणकर- आम्ही तेथे खंबीरपणे उभे होते. तर मी काही ऐकेना तेव्हा तेथे बलसारा नावाचा पोलीस ऑफीसर होता. त्याच्या हातात शिसवी दांडा. तो आला, नामदेव.नामदेव पण आम्ही बेभान झालेलो ना. मीही वैतागलेलो होतो की, आपण हे सर्व सोडून तिकडे जाण्याची काही गरज आहे का मारामारीत ? कारण त्यांचा सर्व तेथे होल्ड होता, कारण ते तर स्थाईक आहेत तिथं. सर्व मटेरिअल त्यांच्याकडे आहे. आणि आपल्याकडे मटेरियल म्हणजे नुसते बांबू आणि आपण काही वेलप्लँड काही केलेलेच नाही. तर आपण तसं कसं जायचं. पण ऐकतं कोण हो ? माझी तर दशा अशी होती की, नाही म्हटलं की, जाणार नाही. पण ते प्रचंड एवढं झालं होतं की, माझ्या आवाक्या बाहेरचं होतं. मी ते ऐकत नाही म्हटल्यावर माझ्यावर असा टोला टाकला त्या ए. सी. पी. ने की, त्याचा जो शिसवी दांडा होता तो मोडलाच एकच फटका

त्याने असा मारला. तो अजूनही दुखतोय माझा. त्याला किती वर्षे झाली ? १९७४–८४ दहा वर्षे झाली. अजून तो दुखतोय. एवढा प्रचंड फटका मारला. मला त्यावेळी दहा मिनिटं काही कळेना. मी मेलोय की, जगलोय इतका शॉक बसला. ब्रेनलाही प्रचंड धक्का बसला. त्यावेळी हातातला बांबू आपोआप गळला. शांतपणे त्या पोलीस ऑफिसरने मला उचलले. ज. वि. पवार व भाई संगारे तिकडे गाडीमध्ये बसलेले. त्या मोर्चाच्या निमित्ताने काही तरी मसलत करायची– तुम्हीपण; चला असं गोडीत बोलून. मीच शेवटचा राहिलेलो. मला घेऊन गेले आणि बसवलं गाडीमध्ये. त्या आधी ज. वि. पवार, भाई संगारे यांना घेरलेलं होतं आणि लतीफ खाटीकला तर असं आणलं बडवत ५–६ पोलिसांनी. ताशा बडवतात तसं तिकडून बडवत आणलं. त्याला तर प्रचंडच मार पडला त्यावेळी आणि मग आम्हाला नेलं पोलीस स्टेशनवर व चौघांना अटक केली. आमचे १६४ लोक व अधिक आम्ही चार पुढारी अशी आम्हाला अटक केली. अटक केल्यानंतर मग मला, भाई संगारेला व ज. वि. पवारला एका रुममध्ये ठेवले होते. तर पोलीस काय करतात. भयानक स्टेशन असेल किंवा भयानक एलीमेंट असेल तर ते आपले बंज काढून ठेवतात हे तुम्हाला माहीत आहे काय ? नावाच्या ज्या पट्टया असतात त्या काढून ठेवतात तशा त्यांनी त्यावेळी काढून ठेवल्या व नंतर तीन जण वरती आले आणि म्हणू लागले, तुमच्या आयला तुम्ही आमच्या धर्म ग्रंथांना शिव्या देता काय ? भोसडीच्यानो! मी त्यावेळी आपली सिगारेट चिनार नुकतीच बाजारात आली होती ती चिनार पेटवित होतो. लोक मला जेलमध्ये भेटायला आले की, माझ्यासाठी चिनार घेऊन येत. तर मी आपला चिनार पित बसलेलो. असा भाई उभाच राहिला होता आणि भाई असा उभा होता आणि पलीकडे ज. वि. बसलेला. पलीकडल्या बराकीमध्ये लतीफ वगैरे सर्व लोक आहेत. आले हो हो २-३ ऑफिसर व म्हणाले– मादरचोद बाजूला सर. पण मी काही बाजूला सरेना. आम्हाला पण मस्ती ना चिक्कार. लगेच त्यांनी बाजूला खेचला. तुम्हाला काय सागू माझ्यावर जवळजवळ ५०–६० काठया घातल्या त्यांनी. तेव्हा भाई संगारेला भयानक राग आला. भाई सगारे, ओ ओ काय लावलय असं म्हणल्या बरोबर त्याच्या छातीत आणि लाथ लगावली त्यांनी की, भाईंचे डोळे पांढरे झाले भाईंचा जीव जायला लागला. तो अअं हअंहअं करायला लागला एवढी प्रचंड लाथ ती त्याच्या वर्मी बसली भाईची ती अवस्था पाहिल्यानंतर ज. वि. पवार म्हणाला, ओ मला काही मारू नका. मला काही मारु नका. तो एवढा हादरला की, विचारू नका. मग आम्हा सर्वांना चोपून ते बाहेर गेले. हाणलं आम्हाला प्रचंड. मग आम्हाला खाली आणलं व एकत्र ठेवलं. रात्रीच्या ९॥–१० च्या नंतर मृणाल गोरे व ४–५ लोक भेटायला आले होते. आम्ही फार पेटलो होतो. कारण आम्ही मरणाचा मार खाल्ला होता ना.

त्याच्यामध्ये. पोलीस ऑफिसर म्हटला की, विरोधी पक्षाला ना किंमत, ना ते म्हणाले की वरून ऑर्डर आहे. गृहमंत्र्यांची की त्यांना आम्हाला भेटायला सोडता येणार नाही. तेव्हा मृणालनी चिक्कार काही तरी भानगडी केल्या वाटतं मग त्यांना आम्हाला कंपल्सरी सोडावं लागलं. मला तेवढाच चान्स मिळाला. ते आमदार, विमदार आहेत, अमुक-तमुक आहेत, तेव्हा लगेच आम्ही पोलिसांनी आमच्या सोललेल्या पाठी त्यांना दाखविल्या. मग ते म्हणाले की, यांना मेडिकल ट्रिटमेंटला तरी पाठवा. मग त्यांनी आम्हाला मेडिकल ट्रेटमेंटला नेऊन परत आणलं. मग रात्री बातमी फुटली की, ज्या मुलाला दगड लागला होता तो मेला. मग आमचं माथं भयानक पेटलं. मग आम्ही दोन दिवस काही खायला तयार नाही. मला अजून ही गोष्ट लक्षात आली नाही की, अन्टचबिलिटीच्या संदर्भात कम्युनिस्ट पार्टीने समाजात कधीच काही काम केलेल नाही पण समाजवादी पार्टी यांच्यात जेवढी इंटरेस्टेड त्याच्या पेक्षाही जास्त ते इंटरेस्टेड दिसले. विशेषत: जी. एल. रेड्डी तारा रेड्डी हे फारच. मग तारा रेड्डी येऊन आमची समजूत घालायला लागल्या, तुम्ही असं करू नका. जेवायला चला. पण आम्ही १६४ लोक जेवायला तयार नव्हतो. पण मग गेलो, जेवलो आणि बाहेर आलो. मग काय त्याची मोठी प्रेतयात्रा कुठून कशी काय वगैरे पण आम्हाला उशिराच सोडलं पोलीसांच्या बंदोबस्तात ती प्रेतयात्रा. त्याचे प्रेत जाळले वगैरे आणि तो झाला हुतात्मा. आमच्यातला तो पहिला हुतात्मा. वरळी दंगल तिकडे चालूच. चार तारखेला ती सुरू झाली. दहा तारखेला टेन्शन आलं तिकडे प्रचंड संख्येने लोक मरतच होते. गोळ्या घातल्या जात होत्या. सर्वत्र युद्धच सुरू होतं. मग पँथरची भागवत जाधवसाठी एक सभा झाली. सर्व विरोधी पक्षांनी अगदी जनसंघापासून सर्व विरोधी पक्षांनी त्याला आर्थिक मदत वगैरे केली. प्रचंड मदत. हजाराशिवाय दोन हजाराशिवाय बात नाही. सर्वच विरोधी पक्षानी पैसे आणून दिले. ते ज. वि. पवाराच्या हातामध्ये ठेवायला दिले. मग तिथून पँथर जगभर नावारूपास आली. तिची दशहत व बाकी सर्व त्या दरम्यान आम्ही इतर सर्व गोष्टी केल्या. बाळ ठाकरेवर, त्यांच्या अनेक सभांवर अटक करण्याच्या योजना आखल्या. एकदा तर आम्ही असे पेटलो की, वामनराव महाडिकांच्या घरी हजारो लोक चाललो होतो. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केला. आणि हे सर्व घडण्यापूर्वी कल्याणच्या नगरपालिकेमध्ये परिसंवाद झाला होता तिथे कोणी तरी शिवसेनेचे प्रतिनिधी आणि आम्ही व राजा ढाले बोलणारे असे होतो. ज्यावेळी तेथे आम्ही बाळ ठाकरेंना भयानक झोडून काढलं. बाहेर आलो ना तर कल्याणमध्ये आमच्यावरही क्रूर दगडफेक. आमच्या नशिबाने त्यावेळी तेथील रस्ता फुटलेला होता. कारण आम्ही हजारो लोक येथून नेले होते. मग त्यांनी जे काही हातात येईल त्याचा मारा केला. आणि कॅमेरे लावले होते की, यांची किती पॉवर आहे. तेव्हा तेथे त्यांनी

आमची पावर किती आहे ती पाहिली. तेव्हापासून ही काही तरी एक शक्ती आहे असे बाळ ठाकरेंच्या डोक्यामध्ये आलं. असं मला वाटतं. मग त्याच्यातून सुरूच झालं. मग ढालेनी त्यावेळी घोषणा केली की, सामुदायिकरित्या आम्ही गीतेचे दहन करू वगैरे. तेव्हा मी ढालेला म्हटलं होतं की, सिम्बॉलिक ज्या गोष्टी आहेत त्या अशाप्रकारे करण्यात काय अर्थ आहे. तर ते म्हणाले की, तू काही बोलू नको. नंतर तो माटुंगा लेबर कॅम्पमध्ये रहायला गेला. मी सतत पुण्यात असायचो. तोही इकडे असायचा. तेव्हा त्याने माझ्याविरुद्ध हळूहळू रान सुरु केलं की नाम्याला काही अक्कल नाही. तो अमुक आहे त्याने मला काय सांगितलं की, गीतेचा कार्यक्रम आपण घेतो आहोत. तेव्हा मी म्हटलं जर हिम्मत असेल तर २००–२५० लोकांत तो कार्यक्रम घ्यायचा नाही. ५ लाख किंवा १० लाख लोक आणायचे आणि त्यांच्या उपस्थितीत गीता जाळायची, तर माझी तयारी आहे. नाही तर २००–२५० लोकांना आणून हे कृत्य करायला तयार नाही, कारण ते सिम्बॉलिक आहे. ते तेवढं महत्त्वाचं नाही, तर त्याने म्हटलं. तुला काय कळतंय भडव्या. अमुक तमुक असं त्याने ते सुरु केलं. नंतर मग मी पुण्याला असतानाच हा कार्यक्रम इकडे अॅरेंज केला मुंबईत व मला तार पाठविली की, कम् फॉर गीता. एवढंच तर मी समजलो. यांनी काय केले तर मग आम्ही पुण्यातील एकही लोक आलो नाही त्या कार्यक्रमाला की नाही जायचं हे ढालेचं काय चाललंय, ऐकत नाही वगैरे. मग त्यांनी इकडे गीता जाळली व २००–२५० लोकांवर खटले झाले. मग मारामाऱ्या सुरू झाल्या आमच्या व शिवसेनेच्या. मरणाच्या मारामाऱ्या. शेवटी बहुसंख्यांक वर्ग तिथे अल्पसंख्यांक वर्ग. अल्पसंख्याक वर्ग बहुसंख्यांक वर्गास भारी ठरला. जिथं दलितांची वस्ती जास्त तिथं दलितांचं नुकसान झालं नाही. पण जिथं वस्ती विरळ आहे तिथं प्रचंड मार खाल्ला. म्हणजे १९८० पर्यंत बाळ ठाकरेंची व आमची दोस्ती झाली नव्हती तोपर्यंत मारामाऱ्या झाल्या. काही ठिकाणी असं वैमनस्य की क्रूर रीतीचं वैमनस्य. बाळ ठाकरेंच्या मागं केवढा तरी वैचारिक वारसा होता. त्यांचे वडील प्रबोधनकार ठाकरे केवढे ग्रेट. बाबासाहेब आंबेडकरांचे एकेकाळचे सहकारी आणि तेरा वर्षे त्या माणसाने अनवाणी पायाने अस्पृश्यांसाठी काम केलेले आहे. तर असा हा सर्व प्रकार झाला. मग ढालेमध्ये व आमच्यामध्ये वादंग सुरू झाला. त्याचवेळी गिरणी कामगारांचा ७४–७५ मध्ये संप सुरू झाला. तर त्याच्या अगोदर एक गोष्ट झाली होती. इंदिरा गांधी ह्या पुण्याला येणार होत्या. तर पुण्याची पॉलिटीकल सिच्युएशन वेगळी झाली होती. कुठल्याही कॉंग्रेसवाल्याला मंत्र्याला गावात येऊ द्यायचं नाही. आणि इंदिरा गांधींच्या बद्दलही अशीच भूमिका घेतली होती, इंदिरा गांधी डि. लिट. घ्यायला येणार म्हणून, वसंतदादा पाटबंधारे मंत्री होते आणि कॉंग्रेसचे अध्यक्षही, की काय ते होते, त्यांनी पेपरमध्ये असं दिलं होतं की, इंदिरा गांधी तिथं येतात आणि विरोधक तो आमचा सर्व डाव उधळून लावणार

आहेत. तर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी भरीव बाजू घेऊन यावेत. ' मराठा ' तेव्हा चालू होता. तर आम्हाला उचापती चिक्कार ना. 'मराठा' मध्ये आत्माराम सावंत, कवी नारायण पेडणेकर वगैरे आमच्या चळवळीशी संबंधितच होते. सुरुवातीला आम्ही गेलो मराठ्यामध्ये. मी लगेच दिलं मराठ्यामध्ये की, इंदिरा गांधी देशाच्या पंतप्रधान आहेतय. त्यांच्या कारकीर्दीबद्दल मत व्यक्त करण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला आहे. असा अधिकार जर कुणी हिरावून घेणार असेल तर दलित पँथरच्या लोकांनी हॉकी–स्टिक्स व भरपूर बांबू घेऊन यावेत. दुसऱ्या दिवशी आमची पण बॅनर लाईन पुण्यात गेल्यावर मधल्या काळामध्ये मी एवढी कामं केलं होतं की शांताराम दिवेकर सारखे ९६ कुळीवाले म्हणजे अत्यंत जातीयवादी लोक म्हणून अलीकडच्या काळात समजलं जातं. ते देशमुख वगैरे समजलं जात ते. राज्याकर्त्यांमधील ती जमात ना. तर तसला माणूस आमच्या चळवळीत आला होता तर आमचं पुण्यामध्ये ठरलं होतं की, इंदिरा गांधींची सभा उधळायची. त्याच्यात पँथरचा प्रामुख्याने वाटा होता. त्यावेळी संभाजीराव काकडे वगैरे संघटना काँग्रेसची मंडळी त्यात इंटरेस्टेड असायची ना. तो शांताराम दिवेकरचा गॉड फादर होता. आमच्या मुव्हमेंटमध्ये त्याने आम्हाला सपोर्ट करायचं ठरवलं. आणि रिपोर्टमध्ये पश्चिम महाराष्ट्राचा संपूर्ण दौरा केला. मी दिवेकरने आपल्याला इंदिरा गाधींचा कार्यक्रम संपूर्ण उधळून लावायचा. त्यासाठी आपल्याला लागेलंच पाहिजे, असं ठरवलं. प्रा. अरुण कांबळे विलिंग्डन कॉलेजला त्यावेळी तो बी. ए. ला की काय होता वाटतं. त्यावेळी तो कविता लिहावयाचा. त्यावेळी त्या त्या गाढवनं लेनिनवक कविता लिहिली होती. तर मी त्याला आपला शोधत शोधत गेलो. कारण माझा एक मित्र तिकडं रहायचा. प्रा. अरुण पाटील आपल्या लिट्ल् मॅगझिनवाला तर त्याने सांगितले की, अरुण कांबळे हा इथं राहतो. तर आमचा एक कार्यकर्ता झेंडे का धेंडे सांगलीचा होता. त्याला घेऊन मी अरुण कांबळेकडे गेलो व त्याला ८०० रुपये की २॥-३ हजार रुपये रोकड कॅश दिलेली होती की, तू लोक घेऊन ये पुण्याला. त्या लोकांच्या येण्या-जाण्यासाठी खर्च करायला हे पैसे घे. आमचा त्यावेळी सर्व खर्च केला फायनान्सर शांताराम दिवेकर शांतारामचा मोठा व्यापार होता पुण्यामध्ये जनावरांच्या खाद्याचा. तो महात्मा फुले, आंबेडकर यांच्यावर फार जोरदार बोलणारा, पण पोलीस खाक्या मागे ना. कारण इंदिरा गांधींची सभा उधळून लावणारा म्हणून तीन दिवस गायबच. टॅक्सी ड्रायव्हर म्हटल्यानंतर मी कशाचा सापडतो. हे सर्व लोक पोलिसांना आवर्जून सापडायचे. मग मात्र बोलायचे हा साला मादरचोद आहे. पोलिसांना घाबरतो. मी कशाला उगाच पोलीसांच्या हातात सापडतो ?– सापडलो असतो तर त्यांनी मला तीन दिवस बंदच केलं असतं. मग मी समजा ज्या दिवशी तो कार्यक्रम होता ना त्या दिवशी सकाळी १०॥ वाजता स्टार्ट घेतली. पूर्वी

बॉम्बे–पूना टॅक्सीचे १६ रुपये तिकीट होते ना त्याचे त्यावेळी २० की २२ रुपये भाडे झाले होते. तर मी तिथनं भाई संगारे, अविनाश महातेकर असे टॅक्सीतून त्या दिवशी गेलो. मला वाटतं ज. वि. पण होता. वाटत गेलो तर संचेती हॉस्पिटलच्या येथून गेलो. त्यावेळी तेथील कॉर्पोरेटर होते पाडोळे. भयानक तोंडाने वासका माणूस हो. तो पुणे कॉर्पोरेशनचा कॉर्पोटर. पण आंबेडकर चळवळीतला जुना माणूस त्याला बोलायला सांगितलं की बोला म्हणून. असा तो पाडोळे नावाचा माणूस. इंदिरा काँग्रेसवर बोला म्हटलं तर बोलणार. इंदिरा काँग्रेस नव्हती त्यावेळी सलग काँग्रेस होती. काँग्रेसवर बोलणार तर मग बोलणार ह्या बाईला मी अक्कलच शिकवीन. मी लय बेकार माणूस आहे. मी बोट घालीन नि असं फाडून टाकीन. हे जाहीर वक्तव्य आहे. बरं का त्या कार्पोटरचं म्हातारा माणूस. पण असा फँटास्टिक. तो रहायला दापोडीला. बॉम्बे–पूना रोडलाच लागून त्याचं घर आहे. तर पाहिलं आम्ही त्याच्याकडं गेलो काही कानोसा घेण्यासाठी टॅक्सी लावली जर तिथं पोलीस, इकडे नामदेव ढसाळ वगैरे आलेले आहेत. आम्ही आत शिरायला आणि आत तर पोलीस बसलेले. मला ते पाडोळेनी सांगितलं. मी समजलो. अर्रर्र पोलीस आहेत. अभी भागो. आम्ही लगेच तसे परत आलो. तर आम्ही ह्या वरळी दंगलीत सर्व केलेले होतं. पेट्रोल बॉम्ब जे आहेत, त्याला मॉलोटोव्ह कॉकटेल म्हणतात. ते सर्व आमच्या लोकांना माहीत होत की, बाटली घेतली की, त्यात पेट्रोल टाकायचं. नंतर त्यात वाळू आणि चुना टाकायचा. बंद करायची.हॅण्डग्लोव्हज घालायाचे आणि फेकून द्यायचं. २०० माणसं जरी आली तरी मागच्या मागं गायब नंतर आम्ही वरळी दंगलीत हे सुरु केले होतं. वरळी दंगलीत तर आम्ही हिरोच होतो. सर्वच लोक तर समजा आमच्या चाळीत कोणी येत असेल तर दरवाज्यात करंट सोडणं ह्या ज्या बचावाच्या गोष्टी होत्या त्या सर्व आम्ही केल्या होत्या. तर आम्ही हे सर्व ट्रेनिंग तिकडं पण फिरवलं, असं असं करायचं ठरवलं आणि आम्ही गेलो त्याच्यामध्ये सचेतीहून जायला लागलो तर तिकडून आमचे पँथर हजर. अनिल कांबळे पुण्याचे फार जोरदार माणूस. फारच स्ट्राँग, असे हे धावत येतात आणि इकडे यांचे सारे मंडईतील पहिलवान दादाचे सांगली बिंगली वरून बोलावलेले लोक. त्यांच्या प्रचंड गाड्या भरलेल्या तुम्हाला काय सांगू पाच लाखांचा मॉब आम्ही हजार लोकांनी त्या आकाशवाणीच्या इथं उधळून लावला. जी सुरू केली ना मारामारी. मधे गेलो आम्ही रस्त्याच्या आणि तुम्हाला काय सांगू १५ मिनिटांमध्ये खलास पाच हजार लोक. नावाचे डी. सी. पी. आले. ते येऊन पाया पडायचे अरे, हे तुम्ही वाईट करतात असं सांगायचे सर्वांना रक्तबंबाळ केलेले. मग त्यांनी अश्रुधुरांच्या नळकाड्याचं फायर केलं. फायर केलं तर लोकांना वाटल फायरिंग झालं. ते अश्रुधुराच नळकांडं चिक्कार लागतं माहीत आहे का तुम्हाला ? फायर केल्यानंतर जे रिकामं नळकांड

लागतं त्याने लोक जखमीपण होतात. एखाद्या वेळी अचूक ठिकाणी बसलं तर माणूस मरतो. पण मग काय सर्व पांगापांग. दीड एक मिनिटात ती गाडी त्या पुलावरून यावयाची होती. तो उबाळे नावाचा ऑफीसर इतका ग्रेट की तो गेला खाली उतरून त्यात रस्ता बदलला अशा प्रसारे पंतप्रधान बाईंच्या आयुष्यात पहिल्यांदा असा रस्ता बदलावा लागला असेल महाराष्ट्रात तो आम्ही पँथरवाल्यांनी तर मग हे असं प्रचंड हसं. तर मग अ संहे सर्व राजकारण पण त्याच्यानंतर मग राजा ढाले आमच्यावरच विस्फारला. तो म्हणाला की, इंदिरा गांधी ह्या बाईच आहेत. स्त्री ही दलितंच आहे वगैरे वगैरे. अशाप्रकारे मधे मधे विचित्र जे त्याला सोईस्कर वाटेल तो ते बोलणार. तर मग त्यावेळी विद्रोहाची पार्श्वभूमी आपल्याला होतीच. मग मी म्हटलं, आपल्याला मुखपत्र पाहिजे म्हणून दलित पँथरच मुखपत्र मी पुण्याहून सुरू केलं तर राजा ढालेला वाटलं मला न विचारता हे कसं काय झालं ? मग आम्ही अंक काढले ते त्याला मान्य नाही झाले. नंतर मग मी म्हटलं आता आपल्याला भूमिका घेण अगत्याचं आहे. कारण तोपर्यंत राजा ढालेनी बुद्धिझम. रिलीजन अमुक तमुक वगैरे सुरू केल होत. तर आम्ही सांगायचो की. भगवान बुद्ध एवढे ग्रेट होते की, त्यांनी कधी कोणावर हुकुमशाही गाजवली नाही. ऑर्डर केली नाही. जे डोळयाला दिसेल, कानाला ऐकू येईल आणि जगण्याला जे पूरक होईल ते ते स्वीकारण्याऐवजी फ्रीडम देणारा माणूस मग त्याचे जर आपण वारसदार आहोत तर मग आपण ऑर्डर कशी काय करायची ? पँथरमध्ये ? जो बुद्धिस्ट तोच पँथर आहे, तुझं हे चुकीचं आहे. मग तो सुरू करायचा की, हे नाम्या ढसाळचं काही तरी अगेन्स्ट चाललं आहे आणि त्याचं कारण म्हणजे तो मार्क्सवाद वाचतो. त्याचवेळी मी इकडे प्रेमात पडलो होतो. त्याचवेळी वरळीच्या दंगलीत मला अटक केल्यानंतर मला इथं आणून टाकलं होतं. त्यावेळी अनिल बर्वेची ओळख झाली होती. तेव्हा आमची कवितेची देवघेव सुरू झाली होती. मी माझ्या वायकोच्या प्रेमात पडलो होतो. तर ते लफडं सुरु झालं होतं. त्याचवेळी मग अनेक गोष्टी जाहीर झाल्या. यानं त्या कम्युनिष्टाच्या पोरीशी अमुक केलं तमुक केलं. परंतु माझं लग्न होईपर्यंत आमच्यात जराशीही फूट नव्हती. माझ्या लग्नाचं त्याला कळलं की मी लग्न करतोय, त्यावेळी माझ्या वायकोला इकडचे काही लोक सांगायचे की शुअॅरिटी नाही. काही नाही तेव्हा तसं काही करायचं नाही. तर तो माझ्या वायकोला सांगायचा – काय तुमचे लोक शुअॅरिटी मागतात काय ? असे ते ढालेचे डायलॉग नेहमीचेच झाले होते. मग मी इकडे त्याच दरम्यान लग्न उरकून घेतलं. सर्व लोक आले. शिरीष पै. विशेषतः अहिल्या रांगणेकर हे सर्व लोक आले होते. माझे लग्न म्हणजे फारच. जवळ अगदी पाच पैसे नव्हते. मी अगदी म्हणजे असा. मित्रांनी पैसे दिले. त्यांच्यातून भांडीकुंडी वगैरे आणलं. मग आमच्या आतेनं सांगितलं की तू लग्न

करतोयस तर तुला मी इथं ठेवणार नाही. मग मी पुन्हा कोणाकडून तरी दोन हजार रुपये आणून वांद्र्याला राहायला गेलो. लग्न केल्यावरोवर तेथे पोटभाडेकरू म्हणून राहिलो, सत्येनकडं. सत्येनचा इतिहास आपल्याला चिक्कार माहीत होता. पण हे फार मजेशीर होतं.फार रोमँटिक, अगदी भयानक जोरदार असं सॅक्रीफाईज होतं. पण ह्या सर्व दरम्यान आमचे जे वकील होते सर्व कम्युनिस्ट, सोशालिस्ट असे वकील आमच्या केसमध्ये. कमलाकर सामंत, त्यांच्यानंतर आता जो नक्षलवादी पार्टीचा अध्यक्ष आहे तो सुनील दिघे. तो माझा खास मित्र होता. तो माझ्याबरोबर नेहमी असायचा. त्या काळामध्ये तो नेहमी सेन्ट्रल लायब्ररीमध्ये बसत असे. त्यावेळी त्याच्यावर अनेक खटले झालेले होते. त्याचं पोलिसांना दर्शनी असं एक रूप होतं की, आता आम्ही त्या अॅक्टिव्हिटिजमध्ये नाही. पण तो आम्हाला सर्व सांगायचा आणि राजा ढालेला त्यावेळी सर्व वकील चालायचे, नंतर हे जे सुरु झालं अॅन्टीफोरम, कम्युनिस्ट, त्याचं कारण जसं आहे की, मला पकडून नेलं विक्रोळीच्या या चेम्बूरच्या प्रकरणात. नंतर मला सोडून दिलं त्याचं दिवशी ह्या गिरणी कामगारांचा जो संप झाला होता त्याची ओव्हल मैदानावर एक मोठी सभा होती. सर्व पक्षीय आणि त्या सभेमध्ये आम्हा पँथरवाल्यांना पण आमंत्रण दिलं होतं. राजा ढाल्यांना वाटत होतं की, नामदेव ढसाळ कामगारांच्याबद्दल लय बोलतो तेव्हा जास्त करून त्यालाच बोलू द्या वगैरे. मग मी गेलो सुटून तिथून. तसाच गेलो होतो. तर माझ्या अगोदर बरेच लोक बोलले होते. तर माझ्यानंतर डांगे बिंगे वगैरे बोलणार होते. त्या सभेमध्ये डांगेची ओळख गर्दीमध्ये कुणीतरी करून दिली. त्याचा फोटो खेचला पत्रकारांनी. मी हस्तांदोलन करताना वगैरे, असं ते सर्व विचित्र झालं व वरती गेलो तर स्टेजवर गेल्या नंतर मी बोललो. सर्वच डाव्याआघाडीचे लोक, लेफ्टिस्ट सिद्धांत सांगणारे म्हणून मी तिथं बोललो की, आम्ही दलितच खरे हाडाचे कम्युनिस्ट आहोत, असे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणाले ते एवढं झालं क्वीक की, मग कम्युनिस्ट होणं ही काही साधी गोष्ट नाही. ती अती अवघड गोष्ट आहे. म्हणजे आता जे ५० वर्षे कम्युनिस्ट म्हणून जगले त्यांना देखिल ते पाळता आलं नाही तर आपल्या सारख्या अंगठ्याच्या उंचीभर काम करणाऱ्या आणि सर्वांत मोठा दिग्विजय पुढारी जो सर्व मंडळीने मानला त्या पुढाऱ्याची वैचारिक थिंकिंग ही की हा प्रोकम्युनिस्ट आहे असं जेथे तेथे रूढ केलं होतं.त्याच्यामुळे मी काही बोललं म्हणजे भयानकच होतं. ते राजा ढालेने उगीचच उचलून धरलं व राजा ढाल्यानी सांगितलं की, हा कम्युनिस्ट आहे वगैरे. मग त्यानं सुरु केलं. मग त्याच्यानंतर आमची एक बैठक झाली सिद्धार्थ विहार येथे. मला बायाकडं जाण्याचा नाद होता. मला त्यावेळी व्ही. डी. झाला होता. तर पैसे सर्व राजा ढालेकडे व ज. वि. पवाराकडे हो. आम्ही उधळे, आम्ही अव्यवहारी किंवा आम्ही नालायक म्हणून

आमच्याकडे पैसे नाहीत. हजारो रुपये मिळाले. सर्व त्या ढालेकडे व ज. वि. पवाराकडे त्याचा हिशेब बाकीच्या लोकांना यांनी कधीच दिला नाही आणि दिला असेल तर तो तुटपुंजा तोंडावर, अंगावर फेकण्यापुरता. एवढा प्रचंड तर मला एक दिवस रहावलं नाही. मला एक गाठ झाली होती. मला ट्रिटमेंट करावयाची होती. मी म्हटलं, राजा, आम्ही कष्ट करायचे. सर्व काही करणार आणि तू पैसे देणार नाहीस हे कशासाठी ? तेव्हा एक दिवस मी गल्ला फोडून २४३ रुपये पँथरचे त्या राजा ढालेच्या खोलीतून नेले. त्याच्या नंतर मग आमची बैठक झाली. त्या बैठकीमध्ये त्यापूर्वी काय झालं. आम्ही राजा ढाले बरोबर भुसावळला गेलो. मी, भाई संगारे आणि राजा ढाले आणि तिथून आम्ही बुलढाण्याला गेलो. त्या बुलढाण्याला, भाई संगारेला आणि मला त्याने नोकरासारखेच वागवलं. आम्ही एवढं काम करतो, सर्व काही करतो आणि याचं मात्र काही बॉसिंग – हे करा, ते करा आणि पैसे गाडी खर्चाला ते त्याच्याकडे ठेवणार. पत्रव्यवहार करणार तो हा एकटाच करणार आणि सर्व आमच्या अपरोक्ष चाललेले असायचं. देणार सर्व स्वत:चं असं सर्व त्याने केंद्रीकरण सुरु केलं. मग मी त्याला सिद्धार्थ विहारच्या मिटींगमध्ये सांगितलं. हे चालणार नाही. तेव्हा तो म्हणाला, मादरचोद तू चालता हो चालता हो म्हटल्यावर कुलूपच होतं माझ्या हातात फाटकन मारलं त्याच्या व म्हटलं भोसडीच्या, असं काय म्हणतोस ? तुला एक तर आणला मी मेहरबानीत. पँथरमध्ये मोठे पुढारी आपण असं लोकामध्ये जनमत तयार झालं आहे. तेव्हा आपल्यात एकमेकांच्या बद्दल अशा पद्धतीची भावना काय कामाची ? मग त्याला मारल्यानंतर त्याच्या लक्षात आलं की, नामदेव ढसाळ हे प्रकरण काही तेवढं ईझी नाही. मग त्याने ते सुरुच केलं की हा कम्युनिस्ट आहे. त्या दरम्यान आम्ही काय केलं की, त्या दरम्यान मी एक जाहिरनामा अशी सर्वसाधारण भूमिका असावी म्हणून तो दलित पँथरचा जाहीरनामा लिहिला होता, तो मी सुनील दिघेच्या सहकार्याने लिहिला. १९७४ ची ही गोष्ट. त्याचं पहिलं वाचन झालं त्यावेळी राजा ढालेनी त्यास मान्यता दिली. आणि तो छापायला जाण्याच्या दरम्यान तो म्हणायला लागला की, हा जो जाहीरनामा आहे तो कम्युनिस्टिक पद्धतीचा आहे. तो मला चालणार नाही वगैरे, असं ते झालं. तेव्हा मी म्हटलं, अरे एकदा तू मान्यता दिलेली ही गोष्ट आहे तर मग ती कशी काय असणार. शेवटी दलित पँथर ही केवळ महारांची संघटना बनवून चालणार नाही. आज तुमच्याकडं द्रव्य बळ नाही. मनुष्य बळ नाही. ते तुटलंय आंबेडकरांच्या नंतर. मधल्या सर्व आंबेडकरांच्यानंतरच्या पुढाऱ्यांनी हे इंडिव्हिज्युअल बार्गेनिंग केलेलं आहे. गवईला ८० दारूची दुकाने कशी मिळतील याच्यात इंटरेस्ट होता, त्याच्या कार्यकर्त्यांसाठी. परंतु नाईन्थ शेड्यूलप्रमाणे ३ लक्ष एकर जमीन दलितांना मिळावी म्हणून हाऊसमध्ये जर कायदा पास करून घ्यायचा असेल तर सरकारची मनधरणी

करणे किंवा सरकारी पक्षामध्ये तो कांशसनेस तयार करण्यासाठी पाठबळ वापरणे याच्यासाठी त्यांनी काही केलं नाही. आणि असं असताना तू काय हे चालवलंयस म्हणून आपल्याला मनुष्यबळ जोडायला पाहिजे आणि मनुष्यबळ जर जोडायचं असेल तर पहिल्या प्रथम जेवढे अनटचेबल्स आहेत. महारेतर अस्पृश्य. त्यांना प्रथम ऑर्गनाइज्ड केलं पाहिजे. आजच्या काळाची ती मोठी गरज आहे. तेव्हा ते म्हणायचे की, हे मांग केव्हा आले ? चांभार केव्हा आले ? त्यांनी महात्मा गांधींचं नेतृत्व स्वीकारलं. ते बदमाष आहेत. ते अमुक आहेत. तमुक आहेत. मी म्हटलं, अरे. ते काही असतील मग ते अज्ञानापोटी असतील किंवा जातीचे त्यांना उत्पादनाचे साधन असेल आणि आंबेडकर हा माणूस हिंदू धर्माचा धर्मद्रोही, याच्या पाठीमागे गेलो तर आपल्याला काही मिळणार नाही अशी भीती वाटल्यापोटीच कदाचित ते आंबेडकरांच्या चळवळीत आले नसतील. परंतु आज सिच्युएशन वेगळी आहे. मातंगांच्या हातातील उत्पादनाचे साधन जातीचं साधन निघून गेलं, कारण त्यावेळची शेती करण्याची जी पद्धत होती, त्यावेळी नाडा आणि सौदर मातंगांनीच बांधायचे. त्यांनीच घायपात कापायचे व त्याचा काथ्या उपसायचा. त्यांनी जर केलं नाही वाक तयार व दोरखंड तयार तर मोट चालणारच नाही. जनावरांना पेंडकी लागणारच नाहीत. औतं बांधली जाणार नाहीत. पण आज गरवारे नायलॉन त्यांच्या दोरखंडापेक्षा चांगला आहे, म्हणजे मातंग मेला. चर्मकार पायताण बनवणार व मोटा बनवणार. आज त्याची गरजच नाही. बाटा स्वस्तिकचे लोक पायताण बनवत आहेत. असं असताना मोटेच्या ऐवजी किर्लोस्करचं इंजन लागतं. म्हणजे हा बदल जो झाला गेल्या २५–३० वर्षांत तर हा आपण लक्षात घेणार आहोत का ? तर तो म्हणायचा तू फार विद्वान आहेस, तुला काय अक्कल आहे मेनच्योत. तू अमुक त तमुक असं प्रत्येकाला हुशारी हो करायचा साला. एवढा अडेलतट्टू माणूस. बोलायच कारण त्यानं अशी इमेजच तयार करून घेनली ना की तो फार विद्वान आहे. अमुक आहे. तमुक आहे. पण तसं काहीच नव्हतं. त्याला नॉलेज नव्हतं. तो उत्तम संघटकही नव्हता. अत्यंत माणूसघाणा माणूस. सर्वत्र माणसं काही सद्‌गुणाचे पुतळे नसतात. त्याला सर्व पुतळे पाहिजे होते, तर असे कसे मिळणार ? माणसं काय पुतळसारखी थोडीच असतात. चांगला संघटक हा उणिवावर मात करायला लावतो माणसांना याचं तसं नव्हतं. हा त्यांचं वैगुण्य शोधायचा. आणि त्या वैगुण्याचा बाऊ करायचा. माणसाला नर्वस करून टाकायचा. हे सर्व सुरु झाल्यानंतर त्याने जाहीरनाम्याच्या बद्दल भूमिका घेतली. मी म्हटलं जाहीरनामा तू मान्य केल्यानंतर तो छापणारच एकदा मेजारिटीने मान्य केल्यानंतर परत तो रद्द करायला सांगणारा तू कोण ? मेजॉरिटीने तो छापायचा. मग मी तो छापून टाकला. 'विद्रोह' च्या मुखपत्रात तो छापला. मग त्याने ते सुरुच केला रिव्होल्ट. मग त्या रिव्होल्टमध्ये राजा

ढालेची जी एकाधिकारशाही व दादागिरी आहे त्याच्या बाबतीत हे बाकीचे लोक नाराज होते. त्या सर्वांनाच तो बोलत असे. ज. वि. पवाराला बोलायचा. मग आम्ही सर्वजण एकत्र बसलो व विचार करू लागलो की, राजा ढालेचे हे जे काही चाललंय ते आपण थांबवणार आहोत की नाही ? तर ह्या तिघा जणांनी मान्य केलं. मी, भाई संगारे, ज. वि. पवार, अविनाश महातेकर. तर राजा ढालेला चेक द्यायचा हे ठरल. त्या मिटींग नंतर पहातो तो ते त्याच्याकडे गेले, राजा ढालेकडे. पण दोन ग्रुप सरळ सरळ व्हायला लागले. पण फूट नाही त्यांनी मग अधिवेशन घेतलं. त्या अधिवेशनात मी गेलोच नाही. नागपूरचं ते पँथरचं पहिलं अधिवेशन. कारण राजा ढालेने तोपर्यंत एवढं काय उपद्व्याप केले होते व मी स्ट्राँगली त्याच्या अगेन्स्ट होतो मग जिकडं तिकडं माझ्याविरुद्ध सुरु झालं, हा लालभाई आहे. गंमत अशी की,लाखो लोक नामदेव ढसाळच्या शैलीवर, व्हलगरपणावर खूष असलेले. भयानक सुरु झालं. मी इकडनं चाललेलो असायचा तर तिकडनं लोक भाकरी फेकून मारायचे. त्याने सुरु केलं ते भयानक. त्याने मी डिस्टर्ब झालो. मी काही कुठलाही मार्क्सवादी पक्षाचा किंवा कम्युनिस्ट पक्षाचा अथवा त्या ग्रुपचा अजिबात नव्हतो. एकदम न्यूट्रल. परंतु पॉलिटिकल फिलासॉफी आपल्याला माहीत पाहिजे. त्यासाठी जे काही लागतं त्याचा अभ्यास केला. आता जी काही भूमिका आमची आहे ती आमच्या जाहीरनाम्यात आहे. तेव्हा ते जे गणित आहे ना ते बरोबर गणित आहे. आज जे मी बोलतो ना, सेम तसंच आहे. आता राजा ढालेचा तो बालिशपणा होता. तो सर्व गेलेला आहे आणि आता तो आमच्याच भूमिका वेगळ्या शब्दांत पण बोलतो आहे. त्याच्या आजही डोक्यात तेच आहे की, दलित पँथरच्या समस्या ह्या सुपरस्ट्रक्चरच्या आहेत. बेसिक प्रश्नावर बोलायला काही तयार नाही. दलितांचा सर्वांत मोठा प्रश्न हा आर्थिक प्रश्न आहे. त्याला जर आर्थिक स्थैर्य आणलं तर आज बाकीचं काय आहे. अनटचॅबिलिटीचं ? आज कायदाच झालेला आहे हो. १९५३ नंतर कायदाच झालेला आहे. त्यामुळं मला तेवढी भीती वाटत नाही. कायदा राबविला जात नाही. त्यातल्या उणिवा वेगळ्या आहेत. त्याच्यासाठी वेगळ्या पद्धतीनं काम करायला पाहिजे. परंतु घटनेच्या पूर्वीची दलितांची जी दारुण अवस्था होती, त्याच्या इतकी आज दारुण अवस्था नाही. एक नक्की, काही तरी संरक्षण आहे पण हे त्याच्या डोक्यामध्ये येतच नाही. तो म्हणतो, आता आपण धर्मांतर केलं पाहिजे आणि बौद्ध धर्मीय घेतले पाहिजेत. सर्व फिक्स त्याच्या डोक्यामध्ये आहे. मी म्हटलं असं कसं ? जेवढे इतर अनटचेबलस् आहेत ते सर्व हिंदूच आहेत. त्यांना जर आपल्या बरोबर कॉल केलं तर धर्माच्या नावावर ते आपल्याबरोबर येणार नाहीत. आर्थिक जे शोषण आहे त्यावरच ते आपल्या बरोबर येऊ शकतात. पण हे काय त्याच्या डोक्यात आलंच नाही. मग त्यांचं तिथं

अधिवेशन घेऊन नामदेव ढसाळांना दलित पँथरमधून काढलं म्हणून असं सुरु झालं. मग आम्ही काय केलं. पुण्याला एक वैठक घेतली. त्या वैठकीमध्ये मी पाच तास भाषण केलं. कन्टीन्यू. राजा ढाले काय आहे ते सर्व जोरदार बोललो. मग दोन ग्रुप झाले. नामदेव ढसाळ – दलित पँथर, राजा ढाले – दलित पँथर. मग त्यांनी फारच सुरु केलं. त्याला अंतच राहिला नाही. त्या दरम्यान गवई बंधूचं प्रकरण झालं. राजा ढाले आपल्या सभेतून त्या लोकांना घेऊन फिरायचा आणि प्रत्येक सभेतून भाषण. यांचे दोन डोळे काढले. चार डोळे काढले. चार डोळयांचा बदला घेईन. काही बदला कुठेच घेतला नाही. त्यांच्या नावावर चिक्कार डोनेशन वगैरे. मग त्यांना वसंतराव नाईकांनी जमीन दिली. किती विचित्रपणा आहे पहा. किळसवाणा प्रकार आहे. पहा, की त्यांच्यासाठी जमविलेल्या निधीतून काही लोक दारू प्यायचे. मी प्रो–कम्युनिस्ट ना त्यामुळे ते गवई बंधू आमच्याकडे आलेच नाहीच नाहीत. आम्ही त्यांच्याशी बोलायला गेलो तरी ते आमच्याशी नीट बोलायचे नाहीत. आंधळी मंडळी ती. अत्याचाराने बळी पडलेले. परंतु राजकीय प्रचाराचे विष किती असू शकते. असं बोलायला गेलो तर ते आमच्याशी बोलले नाहीत. तुम्ही ढसाळ का ? लालभाई लोकांना काय ? आमच्याबद्दल असं ते बोलत. एवढे विचित्र. मग काय झालं, मी तर काम करतच राहिलो मी मुळात हाडाचा काम करणारा कार्यकर्ता असल्यामुळे मी फार डिस्टर्ब्ड होतो व मी फार प्यायलां लागलो. माझी ही आटोक्यात आलेली व्यसनं पुन्हा चालू झाली. जामच्या घरातही कटकटी सुरु झाल्या. कारण घरात काही उत्पादनाचं साधन नाही. परत टॅक्सी चालवायची म्हटलं तर ती इच्छा नव्हती माझी. मा असा पेटून उठलो की, जजमेंटच नाही ना. की राजा ढाले असं करेल. हे जर मला माहीत असतं ना, तर अगोदरच मी डाव हाणून टाकले असते. परंतु आपले राजकारण कधी कपट कारस्थानाचं नव्हतं आणि तसा भावही कधी निर्माण झाला नाही. त्याचं कारण वाङमयीन गोष्टीतही कदाचित असावं. तर मला राजा ढालेच्या सुडाच्या पद्धतीचं राजकारण कधी आलं नाही. मी सतत कामाठीपुराच्या संस्कृतीशी अटॅचच राहिलो. तर ते आमचं जग राजा ढालेला कधी जिंकता आलं नाही. आमच्या मुंबईतल्या छावण्या त्याने माझ्या विरुद्ध केल्या. ती एकच छावणी राहिली. कामाठीपुरा व पुणे यांच्यावरच मी आतापर्यंत फाईट केली. आता आम्ही सॉलिड मेजॉरिटीमध्ये आहोत. नंतर राजा ढालेने वैतागून ७७–७८ ला असं सुरु केलं की नामदेव ढसाळमुळे दलित पँथर बदनाम झाली. 'पँथर'चं नावचं नको म्हणून मॉस मुव्हमेंट सुरु केली. आज राजा ढाले मॉस मुव्हमेंट मध्ये नोव्हेअरच आहे. अन्टचॅबिलिटीचा प्रश्न हा सुपरस्ट्रक्चरवरला प्रश्न आहे. नामांतराच्या प्रश्नावर आम्हीही वेगळी भूमिका घेतली होती. म्हणजे ढालेच्या प्रश्नावर आम्ही सफर झालोच वनवासी.

नंतर नामांतराच्या प्रश्नावर मी अत्यंत वास्तववादी भूमिका घेतली की, जेव्हा मेजॉरिटी आपल्या अगेन्स्ट जाते तेव्हा मायनॉरिटीच्या लोकानी ठरवलं पाहिजे की दोन पावलं आपण मागं आलं पाहिजे आणि मी कोकण विद्यापीठाच्या प्रस्तावाला मान्यता दिली. पण त्याही वेळेला आम्हाला फटका बसला. अशा ह्या सर्व गोष्टी झाल्या. आम्ही फार पॉवरफुल लोक होतो. नंतर जे पुढे आमचे सल्लागार होते, सुनील दिघेसारखी नक्षलवादी मंडळी वगैरे. तर सुनील दिघेचे व आमचे त्या जयप्रकाशच्या याच्यावरून पटलं नाही. त्या पक्षानं असं ठरवलं होतं की, जयप्रकाशच्या मुव्हमेंटमध्ये सामील व्हायचं. तर सुनीलने तो प्रस्ताव माझ्याकडे आणला. पँथरवाल्यांनी देखिल त्यांच्यात सामील व्हावं. मी म्हटलं की, जयप्रकाश नारायणच्याच समाजवादी पक्षात मी पूर्वी होतो. तर या पक्षामध्ये काही इंटरेस्ट नाही आणि जयप्रकाश नारायण प्रो– अमेरिकन माणूस आहे. तू कम्युनिस्ट माणूस असताना तुला जर प्रेम फुटलं असेल तर तुझं ठीक आहे. आम्हाला त्याच्यात इंटरेस्ट नाही. अनूटचॅबिलिटीच्या प्रश्नावर स्वतंत्र ऑर्गनायझेशन व्हावी. त्याच्यामध्ये आम्हाला काम करायचं आहे. आम्हाला इलेक्शन वगैरे याच्यामध्ये काय इंटरेस्ट आहे ? मी बघत नाही म्हटल्यानंतर त्यांनी माझी पाठ सोडली. पनिशमेंट मला एवढी भेटली, आमचा जो पॉवरफुल ग्रुप होता ना, इव्हन क्लॅशेश झाल्यानंतरही राजा ढालेला आम्ही चॅलेंज करू शकत होतो. एवढे पॉलिटिकल मॅच्युअर्ड लोक आमच्यामध्ये होते. त्यांना मार्क्सवाद, त्यांना समाजवाद, त्यांना डिक्टेटरशिप सर्व बेसिक माहिती. असे जोरदार लोक होते. पण नंतर सुनील दिघेचं व माझं भांडण झालं तेव्हा सुनील दिघेने त्या शांताराम दिवेकरला फोडलं एवढा फोडलं की त्याचं एक प्रकरण सांगतो. तिकिटाला जायची आमची मोताद ना. पण मनुष्यबळ चिक्कार. लोक पेटलेली. जिकडं जाईल तिकडं ऑर्गनाईझेशन. जिकडे जाईल तिकडं संघटन रेडी. काही साधनसामुग्री नसताना खटपटी, लटपटी करून आम्ही जात असू. त्यावेळेला आम्हाला शरद पवारांचे विरोधक संभाजीराव काकडे, सोमेश्वर फॅक्टरीचे त्यांचे बंधुराज बाबालाल काकडे हे चेअरमन. त्यांचे फार खानदानी वैर. त्या वैरामध्ये आम्हा पँथरला खेचलं हो. त्या दिवेकरांच्या याच्यामुळे आणि त्यांनी ऑफर आणली की,आम्ही तुमच्या दहा कार्यकर्त्यांना मोपेड देऊ. नंतर३-३ हजार रुपये पगार. तुम्ही शरद पवारांनी ज्या जमिनी लाटल्या त्याचा सर्वे करायचा आणि तो आम्हाला द्यायचा. असे काय करायचे. तर मी म्हणालो की, ही जी मागणी आलेली आहे ती लँडलॉर्डची आणि शुगर फॅक्टरीवाल्यांची आहे. ती स्वीकारली जाणार नाही. म्हणून मी गेलो सोमेश्वर फॅक्टरीवर सुनील दिघेला घेऊन. तर सुनील दिघेही बोलला, हे बरोबर आहे. भयानक आहे. परंतु गंमत अशी झाली की, हे जे वर्गीय प्रकरण आहे ती भूमिका कायम जिकडे तिकडे राहिली. सुनील दिघेच्या भूमिकेला मी प्लीज होत नाही असे म्हटल्यानंतर

त्याने तो आमचा ग्रुप फोडून टाकला आणि त्याने लगेच संभाजीराव काकडेचे काम करा म्हणून आमच्या काही लोकांना सांगितलं. म्हणून त्यावेळी अनिल कांबळे सारखा माणूस आमचा फुटला. परत संजीव चव्हाण. म्हणजे ती एक रिफ्ट. सतत आमच्यावर रिफ्टस् पडत गेल्या. नंतर ते थांबलं. मग तो आमचा ग्रुप चालूच राहिला. नंतर आणीबाणीच्या काळामध्ये एक मोठा प्रश्न उभा राहिला. रिव्हायव्हल की सर्वायव्हल ? असा प्रकार उभा राहिला. त्यावेळी माझ्या माहितीप्रमाणे माझ्यावर ४००-५०० च्या आसपास खटले होते. आमच्या सर्वांवर होते. ढालेवरही तेवढेच होते. माझ्यावरही तेवढेच होते. कारण माझी तर कम्युनिस्ट म्हणूनच नोंद होती ना. कम्युनिस्टांशी संबंधित अशी पोलिसांची नोंद. आणीबाणीच्या काळामध्ये आमचा काही इंटरेस्टच नव्हता. मी गेलो सरळ इंदिरा गांधीकडे. मी आणि लतीफ खाटीक मोठ्या दारुण अवस्थेमध्ये गेलो. इकडे आशुतोषही जन्माला आला. मी इकडे काही पाहिलं नाही. तिकडं गेलो निघून बांद्र्याचं सोडून इकडे आलो होतो. बांद्र्याच्या याच्यात तर आम्ही फार वाईट दिवस काढले होते. आम्ही रद्दी विकायची. अम्बॅसीमधून जे लिटरेचर येत ना ते घेऊन विकायचो व धान्य आणायचो. एवढी वाईट परिस्थिती एवढं आठवतं की, आमचे जे प्रशासक आहेत नारायण आठवले त्यांनी संघावर बंदी घालावी की न घालावी यावर ' प्रभंजन 'मध्ये आर्टिकल लिहायलं सांगितलं. त्यांना मी एक आर्टिकल दिलं. संघावर बंदी नको. सरकारवर बंदी घाला. त्याचे मला ७५ रुपये मिळाले. त्यावेळी दोन दिवस आम्ही अत्यंत उपाशी होतो. त्या ७५ रुपयांतून पुढे धान्य आणलं. माझ्या बायकोनं सुरुवातीला फार त्रास सहन केला. हे सर्व टोचत रहायचं. आपण सर्व हे उभं केलं. तिथे हे साला आपल्या विरुद्धचं सर्व लोक थुंकायचे ना तोंडावर जाता-येताना की. हे लालभाई आहेत म्हणून. कारण का तर माझीही काही स्पष्ट भूमिका आहे, थोडीशी ब्रॉड, त्यामुळे मी म्हणायचो की, आपल्याला समाजवाद असो की कुठलीही प्रागतिक राजकीय विचारसरणी असो तर पुढला फ्रंटवरचा तरी आपल्याला विचार करायला पाहिजे. जनप्रश्नावर जर काही फ्रंट उभ्या राहिल्या तर त्या डावलून चालणार नाही तुम्हाला मोस्टली याच्यामध्ये जावं लागेल. तेव्हा झालं हे असं सर्व प्रकरण झालं मग ढाले आणि मी पुन्हा ७८ ला पँथर डिझॉल केली. तर ढाले आणि पँथरचं जे रामायण आहे ते इथपर्यंत आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की, ही फाटाफूट झाल्यानंतर सुनील दिघे आमचा कायदेशीर वकील म्हणून ठेवला होता. सल्लागार चांगला मित्र. तर तो माझ्या अपरोक्ष नागपूरला गेला. नागपूरला आम्ही आमच्या गटाची सभा घ्यायची असं ठरवलं. तो गेला आणि तिकडं राजा ढालेने गेमच केली ही त्याच्या लोकांना सांगून. नामदेव ढसाळ हा या सभेला येणारच आहे असं सांगून त्याने अक्षरशः मारेकरी घातले. त्या भागात चंद्रपूरला अमरावतीच्या

एरियामध्ये आमचा सिन्हा नावाचा कार्यकर्ता हा सुनिल दिघेच्या पक्षाचा काम करायचा आणि त्याची बायको. मी गेलोच नाही नागपूरला. कारण माझी पैशाची अॅरेजमेंट झाली नाही. त्यावेळी शंकरराव शिवणेकर–दादू मारुती इंदुरीकरांचे सहकारी त्यांची मावशी की कुणी तरी आत्या ही बंगला चालवायची. येसूबाई की काय ? तर ती मला पैसे देणार होती ट्रेनला. ट्रेन गेली निघून. ती म्हणाली आता तू ट्रेनने नको जाऊस उद्या सकाळी विमानाने जा. विमानाचे पैसे देते तुला. तर मी म्हटलं ठीक आहे. पण तिने काय केलं, तिसऱ्या दिवशीही पैसे दिले नाहीत. माझ्या अगोदर सुनील दिघे तिथे जाऊन पोहोचला. रात्री त्याच्यावर गेम झाली. नागपूरला. नागपूरच्या झोपडपट्टीमध्ये त्याच्यावर गेम झाली. त्याचा पायच तोडून टाकला तलवारीने. त्याचा निम्मा पाय कापला. हे सर्व राजा ढालेने केले. त्याच्या लोकांनी सुनीलला विचारायला लागले की, सांग, नामदेव ढसाळ किधर है ? किधर है वह गांडू ? असं सर्व सुरु झालं. आता मी इकडेच. मी इथून पुण्याला निघून गेलो. आणि तुम्हाला काय सांगू, इकडे घरी माझ्या आईला बातमी पाठविली की, तुमच्या मुलाचा मर्डर झाला म्हणून. आणि त्या पॉईंटला माझी आई वेडी झाली. ती आजही वेडी आहे. त्या बांद्र्यांच्या बाजूला तळ आहे ना. गव्हर्मेंट कॉलनीत. जिथं पाणी साचतं, तिथं माझ्या पँट सारखीच एक पँट तरंगत होती. माझी आई तिकडे जायची तळयाकडे आणि ओरडायची, अरे माझ्या बाबा, तू इथंच मेलास का? असं काय काय करायची. असे ते सर्व राजा ढाले अत्यंत कपटी,कारस्थानी वाङमयातला माणूस असा असू शकतो का ? आणि बुद्धाचं तत्त्वज्ञान ? बुद्धाबद्दल जगामध्ये केवढं प्रेम आहे. वैरानं वैर मिटत नाही असं सांगणारा माणूस, अत्यंत भौतिक दृष्टिकोन घेणारा इंडियन फिलॉसॉफीमध्ये पहिला माणूस बुद्ध आहे. आणि त्यांचा स्वतःला अनुयायी समचतो तो परंतु त्यांचे धंदे हे सर्व असे. याला मारणे, त्याला मारणे, बदनाम करणे असा हा दलित पँथरचा इतिहास आहे. हा चिकार शिकण्यासारखा इतिहास आहे. हे जे मी सांगितलं ही माझी माहिती दुसऱ्याला एकांगी वाटेल. परंतु प्रमुख सर्व गोष्टींना मी साथीदार आहे. मी कुठल्याही मतलबीपणाने सांगितलं नाही जे सरळ सरळ आहे ते प्लेन सांगितलेलं आहे. राजा ढाले परत आता भेटतो. त्याची अन् माझी परत मैत्री मी निर्लज्ज मी कित्येक वेळा त्याच्याकडे गेलो मी जातो हे सर्व संपून टाकू. आपण काही तरी चांगलं करू. आता चांगलं बोलतो. मधे तो म्हणत होता आपण एकत्र काम करू.सर्व सोडू वगैरे पण मी पँथर कशी सोडणार? कारण ती सुरूच केलेली आहे. आम्ही राजा ढालेने पँथरची जी बरखास्त केली ! राजा ढालेचा निर्णय ज्या लोकांना मान्य नव्हता त्या लोकांनी त्याचीच लाईन पुढे कॅरीऑन केली. ते भारतीय दलित पँथरवाले. तो गंगाधर गाडे आणि शेगावकर हे जे मराठवाड्यातील फेमस आहेत. त्या गंगाधर गाडेची मला अजून

आठवण आहे. ७३ साली कुमार सप्तर्षीने त्या मराठवाड्यामध्ये शिष्यवृत्तीच्या प्रश्नाला हात घातला होता. गंगाधर गाडे रिपब्लिकन स्टुडंट फेडरेशनमध्ये होता. त्याला कुमारने नेस्तनाबूत केलं होतं. कारण औरंगाबाद हे मराठवाड्यातलं सेंटर आहे. तिथं पिपल्स एज्युकेशन सोसायटीचं मिलींद कॉलेज आहे व वसतिगृह पण आहे. किमान ३–४ हजार विद्यार्थी तिथं असतात. तर मला व राजा ढालेला त्या गंगाधर ढालेनं तिथं नेलं होतं. ह्या गंगाधर गाडेला दोन वेळच्या रोटीची मोताद होती तर त्याने दोन झोपडपट्ट्या त्याच्या ताब्यात घेतल्या. २५ रुपयांपासून २५ हजार रुपयांपर्यंत विकण्याचं काम त्यानं केलं. त्या गंगाधर गाडेकडं आता २–३ लॉऱ्या, पिठाच्या गिरण्या, कुठं तरी ४०–५० एकर जमीन घेऊन ठेवली. तर त्याने दोन मर्डर्स केलेल्या आहेत. एक लोखंडे नावाचा कोणी तरी प्राध्यापक आहे त्याची. नंतर एका मर्डरमध्ये तर तो सध्या आहेच. शिंदे नावाच्या इसमाची. असली लोकं राजा ढोलेने वापरली माझ्या विरुद्ध. मी काय, मी तर मवालीच होतो. जन्माला आलेला माणूस कधी तरी मरणारच. मी मरणाला – कुणालाही घाबरलो नाही. आजही घाबरत नाही. आम्ही काय काळ त्यांना भीक घातली नाही. गंमत अशी झाली की राजा ढालेने ज्या कुठल्या उद्देशासाठी केले तो त्यामुळे मेस्तनाबूत झाला. आज त्याच नोव्हेअर आहे. आज त्याचं ते चालूच आहे की, सामाजिक चळवळ आहे म्हणजे नेमकं काय ते मला अजून कळत नाही. दलितांचे सर्वच प्रश्न तसेच आहेत. गेल्या ५० वर्षांमध्ये आंबेडकरी संज्ञेने ज्या माणसाचा कायापालट झाला, ७ कोटी जनतेचं भाग्य आणि आयुष्य उजळलं असं सांगितलं जातं त्या ७ कोटींची आत्ता संख्या २८ कोटी झाली. त्या लोकांपैकी २० टक्के समाज हा शिक्षित आहे, त्या शिक्षित समाजापैकी जो आहे तो प्रामुख्याने सरकारी नोकरीत. बाकीचा ८० टक्के समाज तो आहे तो तसाच आहे. त्याला जमीन नाही. उत्पादनाची साधनं नाहीत. त्याचे सर्व तऱ्हेचे प्रश्न आहेत. तो खेड्यापाड्यातनं आजही तसाच विखुरलेला आहे. महाराष्ट्रामध्ये थोडसं वेगळं जरी दृश्य किंवा शहरामध्ये जरी दलित असले तरी इतर ठिकाणी ते तसेच आहेत. मग ते उत्तर प्रदेशाचे चित्र पहा. आज गंमत अशी आहे की, ही लढाई जी आहे त्याबाबत पार्लमेंटरी संरक्षण सर्व तऱ्हेने कायद्याने आंबेडकरांनी दिलेले आहे. आता खरं भौतिक शोषणाविरुद्ध लढणं हे महत्त्वाचं आहे. आंबेडकर घटना मसुदा समितीचे जरी अध्यक्ष होते तरी घटना ही समाजवादी तंत्राची असावयास पाहिजे असे जे त्यांच्या डोक्यामध्ये होते, की सामाजिक समतेची संकल्पना ही घटनेत यावी असे त्यांना वाटायचं ते काही आलंच नाही. कारण ज्या काँग्रेस पक्षाचं राज्य होतं त्याच पक्षाचे लोक मेजॉरिटीने घटना समितीत होते त्यामुळे आंबेडकरांनी केलेल्या सजेशन्स ह्या काही जशाच्या तशा घटनेमध्ये येऊ शकल्या नाहीत. त्याही दृष्टीने घटनेत काही गोष्टी राहिल्यात. आजही आपली भारतीय घटना तुम्हा

आम्हाला सर्वांच्या दृष्टीने स्वातंत्र्य देते. मूठभरांच्या हातातच उत्पादनाच्या नसा ठेवाव्यास अशा तऱ्हेची आजही तिची रचना आहे. त्याच्यामुळे टाटा बिर्लांचे घेतलेले सरकारी तिजोरीत बारा आणे आणि त्याचे फक्त चार आणे. त्याच्यावर तो कारखाना काढणार आणि तिथं मालकी मात्र आपली लावणार हे अशा तऱ्हेचं सर्व राजकारण आहे. तर ह्या सर्व पार्श्वभूमीवर आम्ही दलित मंडळी विघटनवादी पद्धतीने विचार करणार की आम्ही स्वतः एकदा तपासायला पाहिजे. आणि अल्पसंख्यांचा प्रश्न शेवटी भांडवली लोकशाहीमध्ये डॉ. आंबेडकरांच्या समोरही उभा राहिला की, नेहमीच बहुसंख्यांक, अल्पसंख्यांक अशा तऱ्हेची रिफ्ट वर्षानुवर्षे लोकशाहीच्या शासनसंस्थेत चालणं हे चूक आहे. मग कधी न कधी अल्पसंख्यांक वर्गाने मिनिस्ट्रीमध्ये गेलं पाहिजे, किंवा बहुसंख्य वर्गानं अल्पसंख्यांक वर्गाला मिनिस्ट्रीमध्ये ओढलं पाहिजे. ही क्रिया लोकशाहीत व्हायला पाहिजे. परंतु आपल्याकडे आज ज्या संकल्पना आहेत लोकशाहीच्या त्या भांडवली शासन संस्थेच्याच आहेत. तर हे होईल, आज ना उद्या. कारण आता काय झालंय सर्व विरोधी पक्ष निष्प्रभ आहेत. जनमाणसात त्यांचं काहीच राहिलेलं नाही. सर्व क्रांतिकारक पक्ष राजकारण करणाऱ्या लोकांनी परिवर्तनाचे माध्यम हे निवडणुकाच आहेत असे धरून बसलेले. त्याच्यामुळे हा जो सर्व काही बट्ट्याबोळ व घोळ आहे त्या घोळाच्या पार्श्वभूमीवर दलित मंडळींना सर्वात मोठं आव्हान आहे कारण सर्वात मोठी बार्गेनिंग प्रॉब्लेम, सर्वात मोठी चॅलेंजीस आहेत. सर्वात मोठे दारिद्र्य सर्वात मोठी दु:ख दलित माणसाकडे जास्त आहेत. तेव्हा त्याच्याबरोबर काम करताना डोळसपणानं काम केलं पाहिजे आणि आपलं मनुष्यबळ वाढवलं पाहिजे. पार्लमेंटरी ढाच्यामध्ये तुमच्याकडे मनुष्यबळ नसेल तर तुम्हाला कोण विचारतो." महाराष्ट्रामध्ये विधानसभेच्या २८८ सीटस् आहेत. त्याच्यामध्ये तुमचे २–४ प्रतिनिधी गेले तर तुम्हाला तिथं व्हॅल्यू नाही. किमान तुमच्या लोकसंख्येच्या प्रमाणात तरी तिथं तुमचे लोकप्रतिनिधी जाऊद्यात. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या १/६ लोक अनटचेबल म्हणून येथे आहेत. त्याच्यामध्ये ८५ लाख नुसते बौद्ध आहेत. त्या बौद्धांमध्ये किती रिफ्टस् आहेत ! विदर्भातील बौद्ध वेगळे. त्यांच्यामध्ये पण लाडवण आणि बावणे म्हणजे खोब्रागडे वेगळे व गवईवाले वेगळे. हे आमच्या पश्चिम महाराष्ट्रामध्ये जे महार आणि पाणमहार सोमवंशी व बिगर सोमवंशी. ही त्या बौद्धांमध्येही रिफ्ट आहे आणि बौद्धधर्म घेतल्यानंतर ही केवढी मोठी गोष्ट आहे की, दु:खाच्या गोष्टीबद्दल बोलणारा बुद्ध आंबेडकरी बुद्धचं तत्त्वज्ञान आहे. म्हणजे हिनयान व महायान या पंथांत आंबेडकर अडकवत नाहीत. आंबेडकरांचा बुद्ध तो आहे की जिथं दु:ख आहे त्या दु:खाचं निराकरण करता येऊ शकतं. त्याची कारणं शोधा

व ती नाहीशी करा. अशा संकल्पना असताना कोणी लोक काही करत नाहीत. ह्या लोकांना इंटरेस्ट काय आहे तर शंकराचार्याला हाणलं पाहिजे. हिंदूंची संस्कृती जाळली पाहिजे. ह्या ज्या वरवरच्या गोष्टी आहेत, ज्या संपत येत चालल्या आहेत. त्याचाच आम्ही पुनः पुन्हा पुर्नविचार करतो आहोत. आंबेडकरांनी मनुस्मृती जाळली त्याला काही तरी त्यावेळी सिम्बॉलिक कारणं होती. आंवेडकरांच्या अशा कितीतरी गोष्टी आहेत ज्या त्यांनी त्यावेळी केल्या. त्या आज करावयाचे काही कारण नाही. आंवेडकरांनी आम्हाला एका विशिष्ट पॉईंटला आणून दिलेलं आहे की, तुमच्या हातामध्ये वेसण दिलेली आहे व तुम्हाला पद्धती दाखविली आहे की, ही तुमचे शोषण करणारी सिस्टीम आहे तेव्हा ती ब्रेक केली पाहिजे ना. ती ब्रेक न करता, ब्रेक करण्याकरिता तिची जी जुळणी होत आहे तिला आम्ही कापतो. आंवेडकरांनी धर्मांतर केल्यानंतर त्यांनी रिपब्लिकन पक्षाची घोषणा केली आणि त्यांनी कष्टकरी व मजूरवर्गाचा पक्ष पाहिजे होता. खऱ्या अर्थाचा विरोधी पक्ष, रुलिंग पार्टीला जो अपोज करेल. म्हणजे त्या माणसाला केवढं मोठं आव्हान आहे हो. हेच आंवेडकर इंडिपेडेंट लेबर पार्टीचे पुढारी होते. १९३७ साली जो ब्लॅक ॲक्ट झाला, कामगाराविरुद्धचा काळा कायदा—त्याच्यामध्ये डांगेनंतर आंबेडकरांचं काम आहे. आंवेडकरांनी त्यावेळी ह्या लोकांना खडसावून सांगितलं आहे की, ब्लॅक ॲक्टला तुम्ही विरोध केलात परंतु, केवळ राजकीय महत्त्वाकांक्षेसाठीच जर तुम्ही सत्याग्रह करणार असाल तर मला तो मान्य नाही. म्हणून आंबेडकराचं व डांगेचं रिलेशन त्यावेळी तुटलेलं आहे. परंतु बाबासाहेब आंबेडकर कुठल्याही प्रागतिक विचारांच्या अगेन्स्ट नाहीत. कम्युनिझमबद्दल देखील त्याना शंका तेवढयाच होत्या. कारण त्यावेळी तो प्रयोग होता. बाबासाहेब जे राजकारणामध्ये येताहेत ते शिक्षित होऊन १९२२ सालामध्ये येतात. १९१७ मध्ये रशियाची क्रांती झाली. तो प्रयोगच होता. पाश्चिमात्य विचारवंतांच्या दृष्टीने तो प्रयोग होता व त्याबद्दल प्रत्येक विचारवंत संशय घेणाराच होता. आंबेडकरांनी कम्युनिझमबद्दल जो संशय घेतला तो फार व्यावहारिक दृष्टींनं घेतलेला आहे आणि तो फार लक्षणीय आहे. कम्युनिस्टांनी देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भांडवली सनदेचा पुढारी म्हटलेलं आहे. त्यांनी अनटचॅबिलीटीचा प्रश्न कधी सिरियस मानलाच नाही. त्यांचं एवढंच म्हणणं होतं की, वर्गलढयात अटनचॅबिलिटी तुटून जाईल. खरं म्हणजे ते एवढं घट्ट आहे. जातीप्रधानव्यवस्था की, त्या जाती तोडता तोडताच वर्ग होणं दुरापास्त आहे. हे ५० वर्षे कम्युनिस्टांनो चळवळ झाल्यानंतर आजही कळू नये हे दुर्दैव आहे. इकडं डायलेक्टिकबद्दल डांगे शिकवणार लोकांना हिस्टॉरिकल मटेरियलबद्दल शिकविणार, पॉलिटीकल इकॉनॉमीबद्दल शिकविणार आणि घरी जाऊन गणपती पुजणार. वर आमच्या कम्युनिस्टांचं जग बदललं

आहे. ज्याला स्वतःचं नीट करता येत नाही तो जगाला काय अक्कल शिकविणार. म्हणजे सर्व विरोधी पक्ष हे आज पंथहीन आहेत, दिशाहीन आहेत, दिशाभ्रष्ट आहेत ते अनटचॅबिलिटीच्या प्रश्नावर काय काम करणार आहेत ?आजही अनटचॅ-बिलिटीच्या प्रश्नावर स्वतंत्ररित्या काम केलं पाहिजे, ते दयेच्या व सहानुभूतीच्या पोटी नाही. तर त्याचं मूल्यात्मक व सर्व जीवनात मूलभूत फरक व्हावा ह्यादृष्टीनं. खऱ्या अर्थाने दलित व सवर्ण या दोघांमधील जी माध्यमं आहेत ती शोधली पाहिजेत. म्हणून मी नेहमी म्हणतो ना की दलित व सवर्ण या दोघांच्या सद्सदविवेक बुद्धीला जागृत करून सोडवावयाचा हा प्रश्न अस्पृश्यतेचा प्रश्न आहे. ती जागृती कशासाठी करायची तर या दोघांच जे भौतिक शोषण होत आहे, त्याच्याविरुद्ध हे दोघं लढायला लागणार. यापुढं चांगला पक्ष, चांगली संघटना जर असेल तर तिच्याशी देखील आम्ही पँथरवाले काम करायला तयार आहोत. पण ते आज वैराच्या भावनेनं एस्टीमेट पद्धतीने आणि विवेचनाच्या पद्धतीने अनटचॅबिलीचा प्रश्न सुटणार नाही. आता दलित चळवळीमध्ये तर विकृत गोष्टी उभ्या राहिल्या. दलितस्थानची मागणी उभी राहिली. परवा त्या हाजिमस्तान आणि कंपनीने केलेली दलित-मुस्लीम ऐक्याची घोषणा आंबेडकरी सेनेला जोडणाऱ्या आहेत. डॉ. आंबेड-करांच्या टोटल सर्व तऱ्हेच्या चळवळीचा,सामाजिक,राजकीय सांस्कृतिक ज्या काही गोष्टी त्यांनी केल्या किंवा लिहिल्या त्या सर्वांचा धागा तुम्ही पहा.या देशावर त्यांचं नितांत प्रेम. या देशात त्यांच्या हया तीत चिक्कार गोष्टीबाबत त्रास सहन करावा लागला. पण ते कधी सुडाने पेटले नाहीत. त्या माणसांचं देशावर केवढं प्रेम आहे.मग एवढा चांगला नेता, चांगल्या विचारांचा वारसा आम्हा मंडळीला लाभला असताना आज आम्ही आंधळ्यासारखं वागतोय आणि परत एखाद्या नवीन प्रेपिताची वाट पाहातोय हे कशासाठी? सर्व आमच्याकडे आहे. फक्त आम्ही झोपेतून उठायला पाहिजे. जनता इतिहास बदलते हा आजपर्यंतचा इतिहास आहे. सज्ञानी झालेली जी मंडळी आहे तिने खऱ्या अर्थाने समस्यांना तोंड फोडलं पाहिजे. पण हा जातीयवाद धार्मिक पद्धतीने सुटणार नाही. अपृश्यतेचा प्रश्न तर धर्माच्या पातळीवर नेऊन कधीच सुटणार नाही. धर्मांतर केल्यानंतर किती एक नवीन कॉन्शसनेस तयार झाला याचा आढावा कधी कोणी घ्यायला पाहिजे ना. बुद्धधर्माचा प्रसार करण्यासाठी येथे कुठलंही सेंट्रल केंद्र, संस्था नाही. सेंट्रल इन्स्टिटयुट कुठेच नाही आणि भिक्षुक संघ जो आहे, त्याची जी रचना गणराज्य टाईप, माणसाच्या इतिहासाच्या ट्राईजचा जो काळ आहे. त्या काळातील ती गणसंप्रदायाची कल्पना आहे. तर त्यावेळची जी भिक्षुची पद्धती आहे ती आज चालणार नाही. आज जग केवढं तरी बदललंय. अणुबाँब व सूर्यावर जाण्याच्या संकल्पना जेथे सुरु झाल्यात तिथं नवीन पद्धतीनं काही गोष्टी क्रिएट केल्या पाहिजेत व त्याचा प्रसार केला पाहिजे. तुमची सेंट्रल इन्स्टिटयूट पाहिजे व

सर्वसामान्य माणसाच्या जीवनाला व प्रश्नांना भिडू शकेल अशा तऱ्हेचे भिक्षुच्या संघाचं काम पाहिजे. पण तसं येथे काही दिसत नाही. म्हणून मला असं वाटतं की धर्मांतर झाल्यानंतर २५ वर्षानंतर जी माणसं आज आम्ही पहातो ती पुन्हा देव, धर्म, पूजा वगैरे करू लागली. जे कोणी करत नाहीत त्यांनी दुसराच एक प्रकार सुरु केला की भगवान बुद्धाच्याच पुढे नारळ फोडणे, त्याला उदबत्त्या लावणं. हे काय आहे ? आंबेडकरांच्या नंतर कुणीही त्यांनी घेतलेल्या धर्मांतराचा अन्वयार्थ लावणारी अभ्यासू माणसं आमच्यात अजिबात नाहीत. आंबेडकराचं चरित्र प्रामुख्याने ज्या माणसानं लिहिलं ते धनंजयराव कीर, त्यांचे दोन हिरो आहेत. इकडे सावरकर पण आहेत. सावरकरांचा प्रथमार्ध जो आहे त्यांच्या आयुष्यातला तो अत्यंत विज्ञाननिष्ठ आहे नंतर ट्रॅडिशनल आहे. तर त्याचे हिरो आंबेडकरही होतात आणि सावरकरही होतात बरं. आंबेडकर होतात खरं ओरिजनल आंबेडकर त्यांच्या चरित्रलेखनात येतच नाहीत मग बाकीची जी दलित मंडळी आहे, त्यांनी त्यावर रिसर्च केला पाहिजे की, ह्या माणसाने काय केलं ह्याची व्यवस्थितरित्या मांडणी कोणीच केलेली नाही. ती करायची म्हणजे वर्षानुवर्षांचं काम आहे कित्येक तपाचं काम आहे. तर असं हे सर्व एकंदर पँथरच आहे. राजकारण म्हणा, मानगड म्हणा, गंमत म्हणा, पण गंमत म्हटली तर ते फार टिंगलवजा होईल. तर ते तसं नाही. तसं पाहिलं तर अगदी पोलिटिकल मॅच्युरिटी नसताना, कुंठला अनुभव नसताना देखील आम्ही प्रचंड काम केले आहे. आज त्याचं असं झालं की, पँथरमध्ये चिक्कार विचित्र गोष्टी आल्या. विशेषतः सुपरस्ट्रक्चरवरच्या चळवळी पटकन उभ्या राहतात. नामांतरची गोष्ट तुम्ही पाहिली. एखाद्या वास्तूला आंबेडकरांचं नाव दिलं की ती मोठं होईल असं नाही. कारण ते एवढं मोठ झालेलं आहे की, ते कोणी कोणत्या वास्तूला दिलं किंवा न दिलं काय त्याच्यामध्ये फारसा काही फरक पडत नाही. म्हणून पार्लमेंटरी पद्धतीने तुम्हाला प्रश्न सोडवत जावयाचे असेल तर मनुष्य बळाची जुळणी केली पाहिजे आणि एस्टीमेट पद्धतीने जायचं तर स्टेटला आव्हान द्यायचं, खाद्यावर बंदूक घेऊन व एज्युकेशन वापरून सर्व गोष्टी करावयाच्या म्हणलं तर त्या साध्या गोष्टी नाहीत. प्रपंच व अमूक तमूक गोष्टी सांभाळत जाणारी आणि ३ हजार वर्षांचे सर्व नष्टचर्य संपत आलेली जी मंडळी होती ती आता कोठे सिव्हिल लाईफ जगायला लागली तर ती लगेच समर्पणाच्या गोष्टीकडेही जाणार नाही. आंबेडकरांचं जे तत्त्वज्ञान आहे ते हे आहे की जागृत केलेलं मनुष्यबळ आहे. ते तुटता कामा नये. ब्लडशेड याच्याबद्दल त्यांना तिरस्कार होता. रक्त न सांडता काय चेंज करता येतो, मग तो माणसाच्या मनामध्ये, शिस्तीमध्ये, याच्यावर यांचा जास्त भर होता. त्याच्यामुळे आमच्यासारखे जे क्रांतिची भाषा बोलतात ते मार खातात. मी स्वतः दलित पँथरचा संस्थापक जरी

असलो तरी ८–९ वर्षांत वनवासात होतो. तर ह्या संज्ञा आहेत. आंबेडकरांच्या निर्वाणानंतर जे लोकांचे पोलोरायझेशन व्हायला पाहिजे ते कुणी केलं नाही. दलित पँथरनं चिक्कार काम केलं. परंतु ते फक्त प्रेशर ग्रुप म्हणून काम केलं. प्रश्नावर काम केलं नाही. प्रश्नावर काम करावयाचं म्हटलं तर मनुष्यबळ पाहिजे. मनुष्य-बळ जोडावयाचं असेल तर सर्वच अनटचेबल्स् एकत्र करणे आणि सवर्णांमधले जे असे आहेत की ज्यांचा रोजी रोटीचा प्रश्न दलितांसारखा आहे. अशा सवर्णाला बरोबर घेतो ही जी क्रिया व्हायला पाहिजे ती झाल्याशिवाय पार्लमेंटरी राजकारणात आमची पत वाढणार नाही. आपलं प्रतिनिधीत्व वाढणार नाही किंवा क्रांतिकारक पद्धतीने जावयाचं म्हटलं तर तिकडंही जाता येणार नाही. हे महत्त्वाचं आहे. यादृष्टीने यापुढे विचार होणं महत्त्वाचं आहे. तसं जर केलं नाही तर मग प्रगती काहीच होणार नाही. आज ना उद्या तो विचार कोणी तरी करेल. आजपर्यंत निसर्गाचा इतिहास असा आहे व आजपर्यंतच्या माणसाचा इतिहासही तसाच आहे की माणसांना जे जे काही जाचक होतं ते तो फेकून देतो आणि त्याला जे जगावयाला पूरक असतं, त्याचा तो स्वीकार करतो. हा जो सर्वात महत्त्वाचा बेसिक स्थायीभाव माणसाच्या प्रकृतीतला आहे त्याबाबतीत मी फार आशावादी आहे. आज दलित चळवळीने कम्युनिस्टिक होणं किंवा सोसालिस्टिक होणं ह्या गोष्टी बाजूला ठेऊन पहिल्या प्रथम मनुष्यबळ कसं जोडता येईल हे पाह्यला पाहिजे. त्याच्यासोबत विधायक कामाची जोड पाहिजे. आमच्या सोबत दलित पँथरचं जे भजं झालं त्याचं कारण असं की आम्ही प्रेशर पॉलिटिक्सचं काम जास्त केलं. आम्ही विधायक काम काहीच केलं नाही. कारण आज २० टक्के शिक्षित आपले लोक सरकारी नोकरीत आहेत तर पाच टक्के लोक क्लास–१ मध्ये आहेत. दीड टक्का लोक क्लास–२ मध्ये आहेत. १३–१४ टक्के लोक क्लास–३ मध्ये आहेत आणि ३४ टक्के प्रमाण हे क्लास–४ मध्ये आहे. म्हणजे तुम्ही पूर्वायुष्यात पण तेच होतात. आताही तेच व्हा, झाडूवाले. तर ह्या सर्व गोष्टींचा आत्यंतिक गंभीर पातळीवर विचार व्हायला पाहिजे.

– **नामदेव ढसाळ**

८८, हाजी कासम चाळ, शाहीर अमरशेख मार्ग,
संत गाडगे महाराज चौक, मुंबई–४०० ०११

●

# लढाई वहिवाटीसाठी

— लक्ष्मण माने

'उपरा'च्या प्रकाशनानंतर महाराष्ट्रभर हिंडू लागलो, बोलू लागलो. वर्तमानपत्रात ते छापून येऊ लागलं. आणि एका नव्या वर्गाला जाणिवा येऊ लागल्याचे महाराष्ट्र बोलू लागला. तसा मी पूर्वीपासूनच चळवळचा. अनेक ठिकाणी सत्कार चालू असतात, आणि पुण्याच्या मुंढवा सेट्लमेंटमधला सत्कारही असाच लक्षात राहून गेला. त्याचं कारणही मोठं मजेशीर आहे. त्या दिवशीच्या वर्तमानपत्रात बातमी छापून आली होती की, पुण्याच्या भरवस्तीत दिवसाढवळ्या चार बायांनी एका बाईच्या गळ्यातलं मंगळसूत्र लंपास केलं आणि चारही बायांना पोलिसांनी तत्काळ अटकही केली. पण माल काही सापडेना. पोलिस चक्रावून गेले. हातोहात माल गेला म्हणावं तर कुणीही पाचवा माणूस आलेला नव्हता. महिला पोलिसांनी झडती घेतली. अगदी बालंबाल खात्री करून घेतली. या चौघी माल न मिळाल्यानं सोडून देण्यात आल्या. बातमी नेहमीचीच. या चारही महिला मुंढवा सेट्लमेंटमध्ये राहणाऱ्या. माझ्याबरोबर त्यांचाही सत्कार होणार असतो. का तर, बायांनी बहाद्दुरीनं पोलिसांचा मार खाल्ला म्हणून सत्कार आणि या सत्काराला एक तरुण मुलगा तावातावाने विरोध करीत होता. अखेर माझाच सत्कार रद्द झाला. तो तरुण समजावीत होता, आता आपला हा

तिरगायचा धंदा बंद केला पाहिजे. तिरगायला एक माणूस जातो आणि बाकी निरपराध माणसंच पोलिसांच्या छळाला बळी पडतात. लोक माना हलवीत असतात. आता कुणीही खिसा कापणे असो, चोरीमारी करणे असो, बंद केलं पाहिजे वगैरे. मी ना. वा. माने या आमच्या कार्यकर्त्याबरोबर सेट्लमेंटमध्ये गेलो होतो. त्यानेच ह्या तरुणाची ओळख करून दिली.हा शिवलाल जाधव टकारी भामटा समाजातला. एम्. ए. पर्यंत शिकलाय. विद्यापीठात एम्. फिल. करतोय. मला फार बरं वाटलं. गुन्हेगारांच्या वसाहतीत एम्. फिल. करणं सोप नाही. घरोघर दारूच्या भट्टया चालवणारा हा समाज. इथं ज्ञान कधीच आलं नव्हतं. आता तो सांगू लागला. त्याची आई समाजकल्याण खात्यात नोकरीला असते; सोलापूरच्या सर्टिफाईड स्कूलमध्ये. त्यामुळे हा शिकला. याच वस्तीत राहून शिकला. बी. ए. पर्यंतचं सारं शिक्षण मिळेल तो कामधंदा करून केलेलं. बरोबरची मुलंही कुणी शिकत होती. कुणी अर्ध्यावर शाळा सोडून जुगार, दारू, मटका आणि पिढीजात धंदा करून जगत होती. अनेक मोह चारी बाजूला असताना हा नाकासमोर जाऊन शिकला. तो आईच्या मायेनं आणि धाकानंही. नोकरी कुठे करता म्हणून विचारलं तर म्हणाला, नोकरी नाही करीत. शिकत शिकतच एका मित्राबरोबर कार्डबोर्डापासून कागदी नळ्या तयार करण्याचा स्वत:चा उद्योग आहे. पोट कसंबसं भरतं. हडपसरला एके ठिकाणी त्याचा कारखाना म्हणजे शेड असते. या न झालेल्या सत्कारानं फार मोठं काम झालं होतं. एक नवा मित्र मिळाला होता. तेव्हापासून याला मी पाहतोय. नाकासमोर जाणारा शिवलाल हळूहळू चळवळीत ओढला जाऊ लागला. डॉक्टर बाबा आढाव म्हणजे आम्हा परिवर्तनवादी चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचं चालतं बोलतं विद्यापीठ. बाबांशी त्याची गाठ घालून दिली, आणि मी निश्चिंत झालो. शिवलाल म. फुले समता प्रतिष्ठानच्या बैठकांना येऊ लागला. तसं त्याच्यात खूपच बदल होत होता. घरातले देवादिकांचे फोटो गेले. तेथे माणसांचे फोटो आले. सेट्लमेंट म्हणजे त्याचा विक् पॉईंट. दोन–अडीच हजार लोकवस्ती असलेला हा ब्रिटिशांनी तयार केलेला त्या वेळचा गुन्हेगार जमातींचा उघडा, वाघडा तुरुंग. १९३०–३१ साली सोलापुरातून काही गुन्हेगारांना इथं आणून खुल्या मैदानात कोंबलं ती ही जागा. कैकाडी, पारधी, टकारी, भामटा, रजपूत भामटा, कंजारभाट या प्रमुख जातींचे लोक येथे पत्र्याच्या शेडमध्ये ठेवण्यात आले. त्यांच्या भोवती तारेचे कुंपण आले. तीन वेळा हजेरी आली आणि शेजारी एक पेपरमिल होती. डेक्कन मिलमध्ये लोक कामाला जाऊ लागले. समाजकल्याण खात्याचा कुणी अधिकारी यांना घेऊन जाई. काम झाले की आणून सोडी. पोलिसांच्या जागसूद पहाऱ्यात यांचे वंश वाढू लागले. पुढे यांना राहायला पत्र्याच्या शेड बांधल्या. सेट्लमेंटचा कायदा असल्याने पोटाला मिळत होतं इतकंच. सोलापूरच्या कार्यकर्त्यांनी उठाव केला का त्याचे पडसाद इथे

उठायचे. वडोदा, अहमदाबाद,धारवाड, बेळगाव,अंबरनाथ अशी कैद्यांची अदलाबदल चाले. त्याचे वारे या टोकाचे त्या टोकाला जात असे. तर असे हे सेट्लमेंट १९५२ ला मुक्त झाले आणि याच्या गुन्हेगार वसाहतीचेही नामांतर झाले ' सर्वोदय को. ऑप. हौसिंग सोसायटी '. दादासाहेब म्होपे, भिमराव गुरुजी, नगरकर गुरुजी या चळवळचा तरुणांनी त्या वेळी नेहरूंना सोलापूरला आणलं होतं. मुंढव्यातली सारी मंडळी गेली होती तेथून परत आली. आणि शासनाने यांना पुनर्वसनासाठी दोनशे एकर जमीन शेतीसाठी दिली. यांनीही उत्साहाने फार्मिंग सोसायटी स्थापन केली. 'सर्वोदय को. ऑप. फार्मिंग सोसायटी'त सुरुवातीला बावीस सभासद झाले. ते शेती सामुदायिक करू लागले. परंतु कमालीचं आडाणीपण आणि उपेक्षेनं, अज्ञानानं, गुन्हेगारी जीवनाची सवय झाल्यानं आपसातल्या भांडणांना अंतच राहिला नाही. सगळेच सभासद आडाणी, आंगठेबहाद्दर. कुणी कुणाला जुमानीत नव्हता आणि अशाच आपसातल्या कलागतीत दोन खून झाले. सोसायटी बुडाली. ऑडिटरने शेरा मारलाच. यांच्यात कुणीही शिकलेले नाही. शिवाय गुन्हेगारी मनोवृत्तीचे लोक आहेत. त्यामुळे यांना संस्था चालविता येत नाही. झाले सरकारला फावले. त्यांनी ती संस्था गुंडाळली. पण कागदोपत्री काय झाले कुणास ठावूक हे लोक शेती करीतच होते. अगदी १९६० पासून ते आजतागायत.

शिवलालने सारी सेट्लमेंटची माहिती दिली. आटकर बांध्याचा ठेंगणासा शिवलाल बोलताना फार धीमेपणाने समजावीत बोलणार. मध्ये मध्ये तंबाखूची पिचकारी मारीत घरात जेवणाची व्यवस्था करायला मदत करीत बोलत होता. लोक आणि त्यांची हलाकी. शंभर सव्वाशे पोरं शिकलेली. त्यातली चार–दोन नोकऱ्यांना बाकी बेकार, मग त्यांचे उद्योग, रिकामा वेळ आणि रिकामं डोकं म्हणजे राक्षसाचं निवासस्थान. चोऱ्यामाऱ्या, बोंबाबोंब म्हणजे सेट्लमेंट. रोजीरोटीचा वांदा. त्यात घरोघरी भट्ट्या. कुणी कुणाला का केव्हा कधी मारावं याला हिशोब नाही. पोलीस, तुरुंग क्रिमिनल प्रोसिजर कोडातली कलमं इथं रोज पाणी भरत असतात. यांच्यासाठी आजही पोलिस चौकी आहे. तर अशा लोकांत शिवलाल काम करीत असतो. मालतीबाई बेडेकरांच्या ' बळी ' कादंबरीतला नायक आणि शिवलाल.माझं मन सारखं शिवलालकडे या कादंबरीतल्या पात्रासारखंच पाहात असतं. हा सरळ, याचे संस्कार सरळ. मनाने पापभीरू. अभिरुची चांगली. त्यात पोट भरण्याचा उद्योग. त्यानं हा कसं काम करील याची मला सतत चिंता. आज आठ–दहा वर्षं झाली मी त्याला पाहतोय. याच्या सामुदायिक शेतीचं वांगं झालेलं असतंच. पण याला वाटत राहतं की ही जमीन तरुण मुलंही तसं म्हणत असतात. आता जमीन कसली जाते परंतु ज्याच्या मनगटात ताकद आहे ते कसतात. बळी तो कान पिळी. ज्याला जेवढी ताकद तेवढी जमीन तो कसत असतो. बाकीच्यांनी नादच सोडून दिलाय. मग कुणी लहर

आली की शेती करणार, पाऊस–पाणी चांगलं झालं की शेती करणार. बाकी वेळेला सोडून देणार. मुळामुठेच्या काठावरची ही जमीन म्हणजे सोनं आहे सोनं. पण दैव देतं आणि कर्म न्हेतं तसं याचे झालेले. घरात नाही दाणा, बायको करी ठणाणा आणि हा दारू ढोसून उताणा. कष्टाची माहिती नाही. सवय नाही. कुणीच शेती केलेली नाही. त्यात प्रत्येकाची शेती वळवाच्या पावसासारखी. धुक्यानं भिजवायची आन् चांदण्यात वाळवायची. पण ही जमीन होती. एकदा शिवलाल व मी सारी दोनशे एकर जमीन पाहून आलो. पोटात गोळा उठला. काळीभोर जमीन. कोरडवाहू. काही पाटाच्या पाण्याखाली. काही ओढ्याच्या पाण्यावर. उघडा बोडका मोठा माळच माळ. काही जमीन काळी, शेती करण्यासारखी तर काही नुसत्या दगडगोट्यांनी भरलेली तर काही ठिकाणी चक्क काळा कुळकुळीत पाषाण. सारं हिंडून आलो. शिवलालनं फलाटावरची वस्ती दाखवली. तिथं रमेश, जिनार लक्ष्मणची वस्ती. नऊ–दहा पारध्यांची वस्ती. सगळ्यांना भेटून आलो.

शिवलाल आता चळवळीत वेगानं ओढला जात होता. कारखाना नावापुरता चाले. कसंबसं भागे. नोकरी करायची नाही. आपण लोकांसाठी काहीतरी करायचं असं याचं म्हणणं असतं.

शिवलालचा योगही मोठा. ही संधी त्याला अनायसे मिळाली. सर्वोदय को. ऑप. फार्मिग सोसायटीची जमीन मधल्या काळात ७/१२ च्या उताऱ्यावर कोरी कशी झाली हे एक सरकार जाणो. पण झाली आणि सरकारनेही २२७ एकर जमीन पुणे महानगरपालिकेला गावातल्या मोकाट गुरांच्या गोठ्यासाठी दान देऊन टाकली. तसा ठराव झाला आणि पेपरात छापूनही आला. जसा तो पेपरात छापून आला तसा सेट्लमेंटमध्ये एकच कालवा झाला. जमिनीत पिकं उभी होती. त्यांचे तर हातपायच गळाले. सरकारने दिलेली जमीन गेलीच कशी म्हणून बोलवा उठली आन् शिवलालच्या मनातल्या साऱ्या ऊर्मी उफाळून आल्या. तो सातारला पळून आला. डॉ. बाबा आढाव, मी सगळ्यांना भेटलो. समजुती घातल्या. शेतीफार्मवर गेलो. तिथं गंगाराम हा सेट्लमेंटचा जुना पुढारी भेटला. हा कैकाडी, काटक, तुकतुकीत काळ्या कातडीचा. ऐंशीचा म्हातारा. त्यानं बाबाला सारं सांगितलं. बाबा आम्हाला कागदं कशी लावीत हे दाखवीत होते. सात–बारा, पाण्याच्या पट्ट्या आणि अभिताभ–रेखाच्या हिंदी पिक्चरमधला कुठलासा फोटो, रेशनिंग कार्ड सारं वळचणीला गुंडाळून खोवलेलं. सारं उलगडता उलगडता दोन तास गेले. म्हातारा चिडलेला म्हणत होता लवड्याला लुंगी लावली तरी ह्यो फट्ट्या कुणाला पाय टाकू द्याचा न्हाय. ह्या जमिनीपाय लय खस्ता खाल्याती. सौवज्या रामा शेटींना बाजीराव, फकिरा सारी लढलो तवा जमीन दिली. तवा कुठं झुबेरी कलेक्टरानं जमीन दिली इंग्रज सायबापासनं जमीन

आम्ही करतूया. आन् कोण काढलं तेच वघतो. ह्यानं अगदी बाबा आढावापासून सगळ्यांची आयमाय उद्धारली.

सारी कागदपत्रं वघून झाली. आणि गुरांना न्याय देण्यासाठी माणसांवर झालेला अन्याय दूर करण्याचं काम केल्याशिवाय जमीन मिळवल्याशिवाय थांबायचं नाही, असा निर्धार पोरांनी केला आणि शिवलाल कामाला लागला. बैठका सुरू झाल्या पण प्रतिसाद मिळेना, जमीन परत मिळेल असेच कुणाला वाटंना. तर करणार काय ? विश्वासच गेलेला. त्यात जमिनीसाठी मारामाऱ्या झालेल्या. लोकांच्या प्रचंड मरगळ असते. शिवलाल लढाई नेटाने सुरू ठेवतो. आम्ही पत्रकारांना सारी माहिती दिली. कागदपत्रं दाखविली. पुण्याच्या सर्व वर्तमानपत्रांनी बातम्या छापल्या. पुण्याच्या 'सकाळ'मध्ये मी 'बंद दरवाजा' सदर चालवीत होतो. त्यात ' जनावरांना न्याय, माणसांचं काय ? ' हा सारा वृत्तांत सांगणारा लेख लिहिला. त्या लेखाचा खूप उपयोग झाला. लोकांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. चळवळीत बाकी तरुण पोरं उतरली. आता तो प्रश्न केवळ मुंढव्यात राहिला नाही तर पुणे शहर जिल्हा असा पसरु लागला. १९ ऑक्टोबर १९८३ रोजी पुण्यातून शेती प्रश्नासाठी प्रचंड मोर्चा निघाला. हजारो स्त्री-पुरुष आपल्या कुटुंबकबिल्यासह, बैल, गाई, शेळ्या, गाढवं, डुकरं घेऊन अभिनव मोर्चा काढला. मोर्चाला फार प्रतिसाद मिळाला. आख्खं पुणं मोचा रोजच पाहातं पण असा मोर्चा आतापर्यंत पाहिला नव्हता. सारे भटके विमुक्त स्त्री-पुरुष. तरुण मुलं घोषणा देत न्याय मागत होती. आम्ही जनतेच्या न्यायालयात प्रश्न नेला. तसा न्यायालयातही नेला आणि न्यायालयाने लगेच २० ऑक्टोबरला महानगरपालिकेला गुरांचे गोठे हलवण्यास मनाई करणारा स्टेही दिला.

शिवलालचं संघटनाचातुर्यच मोर्चाने सिद्ध केले. नवी एक टीम पुणे शहरात उभी राहिली. विलास दांडेकर, मुसळेगुरुजी, ना. वा. माने, मुरचंद भाट ही आज महाराष्ट्रीतली परिचित असलेली नावे याच मोर्चाच्या निमित्ताने पहिल्याने महाराष्ट्राला माहीत झाली.

परिस्थिती जैसे थे होऊ लागली. डॉ. बाबा आढावांनी या कामात केलेली धडपड आणि मदतही फार मोलाची होती. बाबांनी हा प्रश्न नुसता धसास लावला नाही तर नैनिक बलही उभे केले. महानगरपालिकेवर दबाव आणला. लोकप्रतिनिधींच्या आमसभेला निदर्शनांना समोरं जावं लागलं. अखेर अखेर तडजोड ठरली. आणि सर्व्हे करून झाला. बाबा, मी, शिवलाल जाधव सारी जमीन फिरलो. बाबांना छोटा अपघात झाला होता. पायांनी लंगडत बाबा सारं शिवार हिंडत होते. मी सांगितलं पण ऐकत नव्हते. सर्व्हे झाला आणि वहिवाटीखाली असलेली जमीन १४० एकर भरली, तर ९० एकर जमीन नुसता माळ भरला. महानगरपालिकेने ठराव करून सदर शेतजमीन ताबेदारांना परत देण्याचे मान्य

केले. मात्र लढाईत गड आला पण सिंह गेला, असे झाले. ९० एकर जमीन गमवावी लागली. ही सारी लढाई जीवाच्या आकांताने लढला तो शिवलाल आणि त्याचे सहकारी. शिवदास, शंकर, रमेश आणि सारेच रावले. यश मिळालं पण ९० एकर जमीन हातातून निसटली. जीवावर आलेलं बोटावर निभावलं. झालं पुन्हा सारी प्रजा निपचित पडली. स्टे मिळाला. पुढे काय ? तडजोड झाली. पुढे काय ? असे प्रश्न आम्ही कार्यकर्ते विचारत होतो. पण लोकांनी जी मरगळ खाल्ली ती काही जाईना. जमीन मिळाली याला अर्थ नव्हता, कारण ७/१२ वर मालकी शासनाची होती. आणि वहिवाट होती सत्तरजणांची. काय करावे ? त्यात कुणी दादागिरी करून खूप जमीन कसत होता तर कुणी कमी कसत होता. जमिनीच्या वाटणीला अर्थ नव्हता. ८३ सालापासून शासन दरबारी हेलपाटे सुरू झाले. शिवलाल चिकाटीने हेलपाटे मारू लागला. हे हेलपाटे मारल्याने विचारा एवढा अडकला की वरा चाललेला उद्योग बंद पडला. पोटापाण्याची पंचाईत नव्हती. आई नोकरीला होती. पण खटला चालणार कसा ? चार मुलं, बायको. पण हा एम. ए. झालेला मुलगा यानं सारं सोडलं. आईनं आधार दिला आणि हा जमिनीसाठी हेलपाटे मारू लागला. बाकी सारे जवळपास झोपले होते किंवा झोपेचे सोंग घेऊन बसले होते. उलट तुझ्या नादाला लागलो आन् कोर्टकचेऱ्या झाल्या म्हणून त्यालाच शिव्या देऊ लागले. चार–दोन लोकांनी चार दोन वेळा दमही दिला. बाकी सारे कानावर हात ठेवीत. जमीन कधीच मिळणार नाही, मग उगाच शिवलालला कटकट करतोय कशाला म्हणून लोकांनी पाठबळ काढून घेतले. तरी शिवलाल, मी, बाबा आम्ही प्रयत्न करीतच होतो. याच दरम्यान एकदा वसंतरावदादा पाटील मुख्यमंत्री होते. ते पुण्यास मराठा प्रिपरेटरी स्कूलमध्ये शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या उद्‌घाटनाला आले होते. सोबत यशवंतरावजी चव्हाणसाहेबही होते. आम्ही निदर्शने केली. चव्हाणसाहेब तेव्हा सत्तेत नव्हते. त्यांनी पोलिसांकरवी बोलावले. मी गेलो. त्यांनी शांतपणे निवेदन वाचले. शेजारी वसंतरावदादा होते. ते प्रचंड गर्दीत आणि चव्हाणसाहेब जवळच अलिप्त. माझ्याशी बोललेले दादांना सांगत होते. दादा हा माझा तरुण मित्र. मोठा लेखक आहे. पण दादा गर्दीत. ते काही केल्या बघेनात. मलाच वाईट वाटले. सिंह म्हातारा झाला की असेच होत असावे का ? गर्दीत घुसून निवेदन दिले. पण मनाला रुखरुख लागली. आपल्यामुळं चव्हाणसाहेबांना अशी वागणूक मिळाली नसेल ना ?

दादा आले, गेले, पुन्हा आले. निलंगेकरही आले, गेले.शंकररावांनी तर साधे आमचे तोंडही नाही पाहिले. चारपाच वर्षं फलराची जमीन हा प्रश्न उरला होता तो केवळ कागदापुरता. पण शिवलाल, विलास, मुरचंद, मी आम्ही तो लावून धरला होता. त्यात मध्येच सरकार आचके देत हातपाय हालवी.चार लाथा झाडी.

चार कागद खालून वर, वरून खाली जात, एवढंच. त्यातच महानगरपालिकेला गोठे करण्याची घाई झाली होती. त्यांनी सरकारमागे लकडा लावला. नुकसान भरपाई देता आल्यास जमीन संपादन करता येईल. सरकारच्या मामलेदार, सर्कल, तलाठी यांनी प्रत्येक शेतीफार्मवर जाऊन मोजणी केली. १४० एकर जमिनीत ७० कुटुंबे वहिवाट करीत होती. ३० मार्च ८४ ला त्यांनी वहिवाटदारांची यादी तयार केली. ती यादी नुकसानभरपाई देण्यासाठी झाली. पुन्हा आम्ही दबाव आणून महापौर, उपमहापौर, विरोधी पक्षनेता साऱ्यांना भेटलो. बाबांनी निर्वाणीचा इशारा दिला आणि सारं चक्र फिरलं. गोठेवालेही गारठले. पण सरकार आमच्या बाजूने हालेना. शिवलाल नुसतीच धावाधाव करीत होता. एकदा बैठक घेतली. लोक जमले चारपाच. तेही रडत खडत. कारण शेतीची पिकपाणी चालू होती.

जून ८८ उजाडला. महाराष्ट्रात सत्तांतर झाले, आणि शरदराव पवारांनी सत्ता संपादन केली. आमच्या छावणीत आनंदी आनंद झाला. शरदराव विरोधी पक्षात असल्यापासूनच त्यांनी चळवळीशी जवळीक ठेवली होती. अनेक मेळावे, परिषदांना ते हजर होते. अनेक ठिकाणी त्यांनी भाषणे केली होती. त्यामुळे भटक्या–विमुक्तांचा प्रश्न समजलेले, समजावून घेऊ शकणारे दोन बहुजन समाजातले नेते म्हणजे डॉ. बाबा आढाव आणि शरदराव पवार असे आम्ही मानत होतो. आणि आता शरदराव मुख्यमंत्री झाले. ते भारतीय भटके विमुक्त विकास संशोधन संस्थेचे अध्यक्ष होतेच. शहाणा माणूस मुख्यमंत्री झाला. आम्हाला फार बरे वाटले. सात–आठ वर्षे मोर्चे, मेळावे, परिषदा करून कार्यकर्ते जेरीला आले होते. लोकांचे प्रश्न मांडण्याचे काम झाले होते. काम करणारे नेतृत्व महाराष्ट्रात नव्हते ते शरदरावांच्या रूपाने मिळाले.

शरदरावांनी सत्ता जूनमध्ये हातात घेतली आणि ऑगस्टमध्ये भटक्या विमुक्तांच्या प्रश्नासाठी 'भेटा' असा मला मंत्रालयातून निरोप आला. मी चाळीस पानांचे सविस्तर निवेदन दिले. आणि भटक्यांचे अनेक वर्षांचे प्रश्न मार्गी लागू लागले. त्यानंतर मुख्यमंत्री सतत वेळ देऊ लागले. आता शेती फार्मचा प्रश्न निकालात निघेल. कैक वर्षांचे स्वप्न साकार होईल म्हणून शिवलाल खूष होता. १७ जानेवारीला शेती प्रश्नावर पहिली बैठक झाली. शरदरावांनी सारा फौजफाटा बोलावला होता. अधिकाऱ्यांशी चर्चा झाली. अनेक नकार घेऊन अधिकारी बसलेले. आम्ही हतबद्ध झालो. मुख्यमंत्री सारे ऐकत होते. बैठक संपली. आम्ही म्हटले काही खरे नाही. पण पुन्हा मुख्यमंत्र्यांनी लगेच २२ जानेवारी ८९ ला बोलावले. तीन तास दिले. बाबा आढाव, अनिल अवचट, अरुण खोरे आणि आमची आख्खी टीमच वर्षावर बसली होती. मुख्यमंत्र्यांनी भटक्यांच्या अनेक प्रश्नासंबंधीची गंभीर नोंद घेतली. सरकारी फाईली मार्गाला लावल्या. पण सरकारी अधिकारी काही केल्या हालत नव्हते. प्रत्येक वेळी काहीना काही निर्माण करून

निर्णय पुढे जात होते. शरदरावांनी खरोखर मनापासून लक्ष घातले होते. प्रश्न सुटणार ही आशा बळावली होती. पण यंत्रणा हालत नव्हती. २ फेब्रुवारी ८९ ला तर खुद्द मुख्यमंत्री काहीसे रागावले. फाईल्स तातडीने हजर करण्याचे आदेश निघाले. अखेर ११जुलै ८९ला शासनाने आदेश काढला.'सदर वहिवाटदारांना दोन एकराचा मूखंड देण्यास ते पात्र आहेत' अशा रीतीने ही लढाई आम्ही जिंकली असे वाटून आम्ही हुरळून गेलो. पण कसचे काय अन् मुसळात पाय अशी स्थिती झाली.

ज्या दिवशी जमीन दिल्याची ऑर्डर ७० लोकांना मिळाली त्याच दिवशी शिवलाल खलनायक, डॉ. बाबा आढाव खलनायक नंबर एक आणि मी खलनायक नं. २ ठरलो. प्रत्येक सेट्लमेंटमध्ये राहाणारा माणूस जमीन दे नाहीतर बघून घेतो म्हणून उभा राहिला. आमचे बरे आम्ही तेथे राहात तरी नव्हतो. शिवलाल मात्र 'हेचि फल काय मम तपाला' म्हणून कपाळाला हात लावून घेऊ लागला. आता भांडणं दोन प्रकारची. एक ज्यांना जमीन मिळाली त्यांना खडकाळ मिळाली म्हणून नको होती. तर दुसऱ्यांना वहिवाटीचीच हवी होती. वाटपावरून मारामाऱ्या सुरू झाल्या तर दुसऱ्यांनी यादीच बोगस आहे पैसे खावून यादी बनवली. शिवलाल, लक्ष्मणला दोन दोन हजार माल मिळाला. यादी त्यांनीच बोगस दिली आणि मुख्य म्हणजे माझे नाव त्यात नाही हा मुख्य राग. म्हणजे आत्राबान गेला आन् गोसावी दानाला दिला असं झालं. आंधळ्याचा हात ---- पाहावं तसं. फुकट मिळणारी जमीन ते लोक साधं शेत कुठं आहे हे माहीत नाही ते सांगू लागले वहिवाट. तरी बरं रामा शेट्टी गेला. तो बाबांना म्हणाला होता की 'लवडचाला लुणी लावायला आलायास' आम्ही आणि बाबा आवाक् झालो होतो. तर आता शंकर म्हणत होता धावसेल पावसेल झालंया फुकाटं दिवा रातसार जवा आन उरल्यालं त्याल मिशाला लावा. सारं हासत होते.

मुख्यमंत्री तरी काय करणार? त्यांनाही रोज पाच-पन्नास जण मेटू लागले. जमिनीची ऑर्डर झाली. आता ७/१२ ला नावं लावायची. तर झाले याचे श्रेय लक्ष्मण माने, शिवलालला मिळणार म्हणून काहींच्या पोटात उलटचा होऊ लागल्या सोलापूर, मुंबई, बारामतीचे सारेजण काडचा घालू लागले. जमीन नाही मिळॉली तरी चालेल पण श्रेय यांना मिळता कामा नये. मग काहीही होवो. शिवलाल आता शोधयात्रा, टकारी, अधिवेशन अनेक परिषदा यात चांगला पुढारी झाला होता. काडीचंही व्यसन नसणारी ही तरुण मुलं हेच या चळवळीचं बळ आहे आणि जुने संपलेले लोक म्हणूनच यांचा द्वेष करीत नसतील ना? अशी शंका येते. जमिनीची ऑर्डर आली. तलाठ्याकडे १४/१५ रुपये एकराला भरायला सांगितले. तेव्हा मी शिवलाल फलटावर होतो. नऊ-दहा पारधी, प्रत्येकाने २९ रुपये भरावयाचे होते. त्यांनी जो कालवा केला तो ना भूतो ना भविष्यति. कारण कळेना. पैसे एवढे आणणार कोठून? पैसे नाही तर जमीन जाणार.

लक्ष्मण पवार नावाचा आमचा कार्यकर्ता निघाला ना जीव द्यायला. आता काय करार. गेलो आम्ही मागे पळत आणला धरून. शिवलाल म्हणाला मी भरतो मग काय करणार ? शिवलालने दहा पारध्यांचे पैसे भरले. भिकारी झोळी फाटकीच वापरतात. त्यात राजानी दिलेलं दानही असं गळून लाऊ लागतं. तर ह्या जमिनीपाई बदनामी सुरू झाली. साधी वाटखर्ची सुद्धा कुणी मागितली नाही की कुणाचा चहाही आम्ही प्यालो नाही. तर हजार खटलं सुरू. मी तर तर अलीकडे अशा गोष्टींना सरावून गेलोय. समोरच्या माणसाचा पराभव करता येत नसला की त्याची बदनामी सुरू करायची. खोटं नाटं वाट्टेल ते बोलायचे हा उद्योगच काही लोक करीत असतात. बरं बोलत होते तोवर ठीक होते. आता त्यांनी जावून जिल्हा अधिकारी साहेबांना लेखी अर्ज दिला. आम्ही जमिनी कसत होतो.आम्हाला जमीन द्या. नोकरशाहीला आधीच उल्हास त्यात हा फाल्गुन मास. मग काय विचारता झाले ७/१२ चे काम रखडले. खरे म्हणजे ही ७० लोकांची लिस्ट काही कार्यकर्त्यांनी केली नव्हती. ती केली मामलेदाराने स्वतः येऊन, मोजणी करून पिकपाण्याच्या नोंदीही त्यांनीच केल्या होत्या. नुकसानभरपाई देण्यासाठी. पण आंधळं दळतंय अन् कुत्रं पीठ खातंय अशी स्थिती.

यांना हवं शेत. मीही वैतागून गेलो होतो. पदरात पडणार म्हटलं की असंच. लहानपणी पत्रावळ्या उचलून उकिरड्यावर निघाला की आमचा एवढा कालवा व्हायचा, एवढी रेटारेटी व्हायची की तो पत्रावळीवाला उकिरड्यात टाकायचा. त्यानं नाही मला, नाही त्याला, घाल कुत्र्याला असं व्हायचं. मला वाटते आमचे लोक आजही याच मानसिक अवस्थेत असावेत. काही मिळण्याचा प्रसंग आला की यांच्या आपसात मारामाऱ्या सुरू.

यांच्या जमिनीसाठी मारामाऱ्या सुरू असतात. आणि तिकडं पुण्याच्या आसपास दरोडे पडायला लागतात. झालं, कुठेही दरोडा पडायला लागला तरी पोलीस रेडिमेड गुन्हेगारांना आधी लॉकअपमध्ये टाकणार. पोलिसांची कुत्री लागली फिरायला. दिसली का घाल गाडीत सत्र सुरू झाले. गोसावी, नंदीवाले हे परंपरेनं गुन्हेगार नसलेलेही डांबले जाऊ लागले. फोडून काढले जाऊ लागले. शिवलालचा फोन आला. फलाटचावरच्या आपल्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी फोडून काढलंय. मागे असंच झालं होतं. आणि आताही तसंच झालं. कोर्ट म्हणाले होते, ' गुंडांच्या टोळीला साजेल असं वर्तन पोलिसानी केलं आहे. '

अनायासे त्याच दिवशी मुख्यमंत्री शरदराव पवार एका पुस्तक प्रकाशनाला पुण्यात येणार होते. मीही पुणे गाठले. शिवलाल, लक्ष्मण पवार, अंकुश काळे, मधुकर भीमसेन पवार, जगन गुलाब पवार या अटक केलेल्या पारध्यांना आणि ह्यांच्या माणसांना घेऊन आला होता. शे-पाचशे बायापोरं, लेकरं आली होती. मी सारं शांतपणे ऐकली. साधी चादर चोरली होती. त्याच्या तपासासाठी सारे

पारधी मारले जात होते. वर मुद्देमाल तर नव्हताच. ते पारधी होते बस्स.

मी सारं मुख्यमंत्र्यांना सांगतो असं म्हणालो पण लोक ऐकतात त्यांचं म्हणणं आम्ही मुख्यमंत्र्यांना भेटतो. हामी त्यांच्या संग बोलनाव सांगतात म्हारुन टाक आम्हाला एकडाव. म्हंजी पुलिस सुटत्याल. इकडे दरोडे सत्र सुरूच होतं मी त्यांना घेऊन मुख्यमंत्र्यांना भेटण्याचं ठरवलं. त्यांना शासकीय विश्रामधामावर थांबवलं आणि प्रकाशनाच्या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांना भेटून त्यांच्या कानावर झाला प्रकार घातला. त्यांनी भेटायला वेळ नाही, पण शेवटचा कार्यक्रम टिळक स्मारक भवनात आहे तो संपल्यावर भेटू, तू घेऊन ये सान्यांना असं म्हणाले. मी बाहेर येऊन लोकांना सांगितले. लोकांना आनंद झाला. पुणे महानगरपालिकेने मुख्यमंत्र्यांना मानपत्र देण्याचा कार्यक्रम ठेवलेला होता. तो सर्वांना खुला होता. आमचे लोक चार वाजल्यापासून टिळक स्मारकाजवळ रेंगाळू लागले. त्यानं पोलिसांचं पित्त खवळलं. पारधी बघितला की पोलिसांचं पित्त खवळतं की काय कोण जाणे. आम्ही सारे शांतपणे व्हाईटहाऊसच्या फुटपाथवर दारात उभे होतो. मुख्यमंत्री येण्याची वेळ जशी जवळ येऊ लागली तशी गर्दी वाढू लागली. त्यात फाटक्या अंगवस्त्रांचे पारधी, त्यांच्या बाया, शेंबडी पोरं, शिवलाल, मुरचंद, विलास, ना. वा. आम्ही सारे शांतपणे उभे. टिळक रोड लहान होता. तेवढ्यात लाल दिव्यांच्या गाड्या भराभरा आल्या आणि झगमगाट करीत टिळक स्मारकापुढे विसावल्या. मी आणि काही निवडक कार्यकर्ते मुख्यमंत्र्यांना भेटायला निघालो. माझी समजूत अशी लोक आपल्या नावावे का असेना ओळखतात. त्यात पत्रकारांचं शासकीय अॅक्रिडिएशन कार्ड असल्याने पोलिस सोडतील. पण कसचे काय नी कसचे काय ? पोलिस काही ऐकेनात. तुम्ही जाऊ शकत नाही. एवढेच उत्तर. तेवढ्यात एक पोलिस आला. त्याने नाव, गाव, धंदा सारं विचारलं. मी त्याला मुख्यमंत्री महोदयांनी बोलावल्याचं सांगितलं. तो वरिष्ठ अधिकाऱ्याकडं गेला. आणि आम्ही पुन्हा जाण्याचा प्रयत्न करू लागलो. तसं पोलिसांचं पित्त खवळलं. त्यांनी रेटीत आम्हाला लांब नेलं मलाही राग आला. आम जनतेला मुख्यमंत्र्यांना भेटायला मज्जाव नाही आणि आम्हाला मुख्यमंत्र्यांनी बोलावलंय म्हणतोय तरी सोडीनात. मग मी आणि सहकारी जबरदस्तीनं टिळक स्मारकाकडे घुसलो तरी पोलिसांची रेटारेटी सुरु झाली. आम्ही रस्त्यात बसू लागलो. वाहतुकीला अडथळा होणार म्हणून पोलिसांनी उचलून पुन्हा रस्त्यावरल्या फुटपाथवर धरुन आपटलं. आता मीही चिडलो होतो. तेवढ्यात एक पोलिस सिनिअर अधिकारी धावत आले. मी मी त्यांना पत्रकार असल्याचं सांगितलं, नाव सांगितलं, पण त्यांचं डोकं गरम झालं होतं. ते म्हणाले कुणीही लुंग्यासुंग्या उठतो, शे-दोनशे माणसं आणतो काय, पुढारी झाल्याचा आव आणतो काय, समजता काय तुम्ही ' अहो मी पत्रकार आहे ! असाल कुणीही उठून पत्रकार होऊ लागलाय. काय वाटले काय तुम्हाला ? अहो

मुख्यमंत्र्यांनी बोलावलंय ? काय भाजीपाला वाटला काय मुख्यमंत्री तुला-गपगुमान उभा राहा. तेवढ्यात शिवलाल, पारधी, घुसून निघाले. तसं पोलिसांनी भराभरा अटक करून गाडीत घालायला सुरुवात केली. खरंतर आम्ही शांतपणे उभे होतो. ना घोषणा, ना गडबड पण आम्ही पारधी होतो, फाटक्या अंगाचे होतो. भारतीय नागरिक नाही का म्हणून मी अधिकाऱ्यांशी हुज्जत घालू लागलो. तेव्हा तो म्हणला तुम्ही कोण आहात, तुम्हाला पोलिस अधिकारी म्हणजे काय वाटलं काय ? वाटेल ते उद्धटासारखं बोलताय. मी तुम्हाला अटक केलीय. इथंच उभं राहायचं. हालायचं नाही. मग मला विनोदाची बुद्धी सुचली. मी म्हणालो, साहेब मुतायला आलीय, तसा तो चिडला. म्हणाला, हितंच मुता. साहेब मागे तिकडे वगू का ? नाही इथंच फुटपाथला उभं राहा, साहेब खाली बसू का ? का खाली बसायला काय झालं ? गप उभे राहा. मग पाहातो काय ते. मुख्यमंत्री जाऊ द्या मग पाहातो. काय नाव तुमचं. मला नाव नाही साहेब. काय आगावू आहेत ? गाव सांगा म्हणतो ना ? गावही नाही मला. साहेब, मसणवाटा, पाणवठा काही काही नाही. बिन चेहऱ्याचा आहे साहेब, अच्छा, मस्करी करता काय ? जावू द्या मुख्यमंत्री मग दाखवतो. मस्करी नाही साहेब, आई शपथ मला नाव नाही, गाव नाही, शिव नाही, काहीच नाही साहेब. जाऊद्या ना साहेब. आता मात्र अधिकारी अतिशय संतापले, धावून आले. आपण डोळे झाकले. म्हटलं हड्डी नरम होणार आता नक्की. तेवढ्यात टिळक स्मारकाकडून कुणीतरी त्यांना हाक मारली. त्यांनी हात आखडता घेतला. काठी वाचली होती. पलिकडे मुख्यमंत्र्यांचे सचिव धर्माधिकारी उभे होते. पोलिसांना काही विचारीत होते. गाड्या भरल्या जात होत्या. शांतपणे सत्याग्रह सुरू होता पोलिसांची धावाधाव झाली. काही उभे राहिलेले अधिकारी धावतच माझ्याकडे आले. माफ करा मानेसाहेब, गैरसमज झाला. तुम्ही नावच सांगितलं नाही. कार्यक्रम चालू आहे. आता संपेल. मुख्यमंत्री साहेबांचे सचिव आलेत. आपल्याला आत बोलावलंय. मी म्हणालो, ' मी येणार नाही. मला तुम्ही तोंडी अटक केलीय. मुतायलाही सोडत नाही म्हणालात. मी येणार नाही. ' अधिकारी दिलगिरी व्यक्त करू लागला. झाला प्रकार धर्माधिकारींना समजला. ते धावत अलीकडे आले. हाताला धरून टिळक स्मारकात घेऊन गेले. तेवढ्यात कार्यक्रम संपला. अटक नाटयही संपले. मुख्यमंत्र्यांना सारं सांगितले. अवाक् झाले. तुला अटक केली ? हाय साहेब. रस्त्या उभं केलं पोलिसांनी. लोक कुठं आहेत. लोक गाड्यांत भरून नेले. त्यांनीही कपाळाला हात लावला. बरं, सकाळी सहा वाजता ये सर्कीट हाऊसला. मी परत आलो. पारधी, शिवलाल, सारे अटक होते. साऱ्यांना सोडले. सकाळी मुख्यमंत्र्यांना भेटलो. त्यांनी पोलीस अधिकाऱ्यांना त्यांच्या वरिष्ठांना आम्हा समक्ष समज दिली आणि गंमत सांगितली. जो अधिकारी मला मुतायलाही

सोडत नव्हता. तो भटक्या जमातीचा असल्याचे आणि दुसरा बी. सी. असल्याचे सांगून हसू लागले हसत हसत बारामतीला घेऊन गेले. त्या दिवशीचा योगच चमत्कारिक होता. मुख्यमंत्र्यांचे सत्कार चालू होते. आमची गाडी मागं नळयाची यात्रा चालू होती. भटक्यांच्या प्रश्नावर चर्चा चालू होती. अनेक ठिकाणी माझाही आवर्जून त्यांनी सत्कार करायला लावला. खरं तर पोलिसांच्या आगळिकतेची भरपाई होते की काय असे वाटत होते. शेती फार्मरचा सारा प्रकार त्यांना सांगितला. हसून म्हणाले ' मार्ग काढू या, जरा दमानं घ्या '.

ग्रामीण भागातला हा दौरा गावोगाव त्यांचे सत्कार, आवर्जून मी थोर कवी महानोर व्यासपीठावर आमंत्रित असायचे. डोरलेवाडीत अशीच गंमत झाली. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पार्णापुरवठयाचे उद्घाटन झाले. आम्ही बाजूला होतो. मुख्यमंत्र्यांनी मला खुणवून जवळ बोलावले. कार्यक्रम सुरू झाला. मला म्हणाले, ' काय झाले असेल ?' मी न समजून विचारले काय झाले मला म्हणाले' पाणी नेमके वैदूंना नाही गेले, बाकी गावाला गेले. अस्वस्थ होते. त्यांनी एका–एका अधिकाऱ्याला खुणेने बोलवायला सुरुवात केली. सरपंचापासून साऱ्यांना आदेश दिला. आठ दिवसांत वैदूंना पाणी देण्याची तजवीज करा. अधिकारी मान डोलवत होते. दिवसभराची त्यांची भाषणं शासनाची दिशा, जातिनिरपेक्ष, धर्मनिरपेक्ष आणि गरिबांच्या बाजूला झुकली असल्याची सांगत होती. डोरलेवाडीत हा सूर जरा अधिक कठोर झाला. भाषणाची सुरुवातच त्यांनी अशी केली, गावात पाणी पुरवठा झाला. त्याचं उद्घाटन झालं. गावात पाणी घरोघर गेलं पण गावकुसा-बाहेरच्या वैदू वस्तीत पाणी नाही गेलं, असे झालं का ? पाणी कुणा पाटलाच्या घरी नाही गेलं. असे झाले का ? गावात ब्राह्मणांच्या घरी पाणी नाही गेलं असं कां झालं ? मग असं वैदूच्या वस्तीत पाणी का नाही गेलं. खरं म्हणजे शासनाच्या योजनांचा फायदा या समाज़ातील दुबळ्या घटकांना अधिक व्हायला हवा होता तो झाला नाही. ही गोष्ट आपणा सगळ्यांना कमीपणा आणणारी, लांच्छनास्पद आहे. जातिपातीच्या पलीकडे गेल्याशिवाय आता उपयोग नाही. गावाला वाईट वाटले. पण मला सांगायचं आहे. ही गोष्ट तुम्ही चांगली नाही केली. आठ दिवसांत वैदूवाडीला पाणी पोहोचलं पाहिजे. तसं झाल्याचं मला समजलं पाहिजे. नाही तर म. ज्योतिरावांचं, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं नाव आपण फुकाचं घेतो असं होईल.' शिवलाल मी खुश झालो. गाड्या धुरळा उडवीत गेल्या. एक शहाणा माणूस राज्य करतोय असं मनापासून वाटलं. पण रात्रीचा पोलिस अधिकारी आसपास भांडत बसणारे आमचे लोक मेंदू कुरतडीत होते. तो साताराला पोहोचेपर्यंत मी बाबांना एकदा म्हणालो होतो, ' बाबा तुम्ही आमचे मित्र आहात, आप्त आहात. अगदी तुमचे जरी, राज्य आले तरी मी रस्त्यावरच असेल. शासन चालवणारा बदलेल पण व्यवस्था जोवर अशीच राहील तोवर आम्हाला न्याय

मिळणार नाही. मग उद्या अगदी कुणीही मीसुद्धा मुख्यमंत्री झालो तरी नागनाथ जाऊन सोमनाथ आला एवढाच बदल होईल. बाबा आम्हाला संघर्ष अटळ आहे. जे द्याल ते घेऊ; त्यासाठी आभार मानू तुमचे. ऋणी राहू. पण जे मिळालेले नाही त्यासाठी लढत राहू. गेलेली जमीन दिलीत, शरदराव आम्ही आभारी आहोत. पण अजून ५२ सेटलमेंटच्या जमिनी मिळवायच्या आहेत. आम्हाला थांबता येत नाही.

**– लक्ष्मण माने**

१० ब, करंजी सातारा

●

# असा न्याय दिला अन्यायग्रस्तांना

**– ज. वि. पवार**

१९७२ ते १९७५ हा माझ्या आयुष्यातला धगधगता कालखंड. आजही माझ्या पायाला चाके असल्यासारखी फिरस्ती चालू आहे. परंतु त्यावेळी पायांना एक आगळी वेगळी गती होती. तो कालखंडच गतिमान होता. प्रत्येक आंबेडकरी समाजातील तरुणांच्या मनात वणवा पेटला होता आणि म्हणून प्रत्येक तरुण म्हणजे एक चळवळच झाली होती. दिवस उजाडताच कोठे तरी अघटीत घडल्याचे ऐकावे लागणार अन् मग त्यासाठी लढण्यात तो दिवस खर्ची पडणार हा ठरलेला दिनक्रम. दिवस उजाडतो न उजाडतो तो एकेक कार्यकर्ता भेटायला येणार. . . कुठल्या तरी अबलेवर बलात्कार झालेला असायचा, एखाद्या गावातल्या दलितांच्या विहीरीत विष्ठा टाकलेली बातमी असायची, कुठे तरी बहिष्कार पुकारून जगण्याची कोंडी केलेली असायची, कोणाचा तरी संशयातीत मृत्यू झालेला असायचा तर कोणाला तरी बढती नाकारताना 'म्हारडे माजलेत' असले अवमानीत शब्द ऐकावे लागलेले असायचे. अस्पृश्यता कोठे नव्हती . . . अगदी ग्रामपंचायत ते मंत्रालय, खेडे ते महानगर सगळीकडे ही अस्पृश्यता आपले अस्तित्व दाखवित होती आणि त्यामुळेच माझ्याकडे दयनीय अवस्थेतले लोक 'न्याय मिळवून द्या' अशी विनवणी करायला येत असत. प्रकरणे कितीही असोत अगदी त्याच दिवशी त्या प्रकरणांना संबंधीत

स्तरावर वाचा फोडायचे मी काम करीत असे. एक वेगळीच शक्ती माझ्यात संचारली होती. अगदी सुरुवातीपासून मी एक पथ्य पाळले होते, ते म्हणजे प्रश्न सुटला पाहिजे हे. अन्यायग्रस्तांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी मी शक्य तेवढे सगळे प्रयत्न करीत होतो, कधी रस्त्यावर येण्याची भाषा करीत असे तर कधी संबंधितांना बॉम्बे पोलिस अ‍ॅक्ट. आय. पी. सी., अस्पृश्यता कायदा, घटनादत्त अधिकार इत्यादी तरतुदींचा धाक दाखवित होतो. मी दिलेल्या निवेदनात त्या तरतुदींचा उल्लेख असायचा, जी. आर. चे नंबर असायचे त्यामुळे मी दिलेल्या निवेदनाला केराची टोपली दाखविण्याची हिंमत कोणत्याही अधिकाऱ्याला झाली नाही. निवेदनही नेमके असायचे . . . प्रश्नाला भिडणारे. मी दिलेल्या निवेदनाचा 'मुव्हमेन्ट' वर माझा सतत डोळा असायचा. त्यामुळे शेकडो प्रश्न मी शासन यंत्रणेकडून सोडवून घेतले. कित्येक खुनांना वाचा फोडल्या. कित्येक चौकशांचे अहवाल रदवातल ठरवून नव्याने चौकशा चालू करविल्या. अनेकांना गावगुंडांनी हिसकावलेल्या शेतजमिनी मिळवून दिल्या. अन्यायाला वाचा फोडण्याचे तेव्हा दलित पँथरचे ब्रीद होते. अन्याय, मग तो कोणावरही अन् कसलाही असो, धाव घेतली जायची ती दलित पँथरकडे. यात पोलिस खात्यातल्या लोकांचे प्रमाण ज्यास्त असायचे. प्रकरण पोलिस कर्मचाऱ्याचे अन् न्याय मिळवून देते दलित पँथर, असे चित्र होते त्याकाळी. अन्यायग्रस्ताला न्याय मिळवून देणारी संघटना असा दलित पँथरचा बोलबाला होता. प्रकरण राजा ढाले यांच्याकडे जावो वा नामदेव ढसाळांकडे अंतिमत: ते माझ्याकडे यायचे. त्या काळी मी दलित पँथरचा सरचिटणीस होतो. मी दलित पँथरचा–संस्थापक सरचिटणीस असल्यामुळे सर्व पत्रव्यवहार मीच करीत असे; संघटनात्मक अन् शासकीय स्तरावरचाही. दलित पँथरला स्वत:चे असे कार्यालय नव्हते. माझे घर हेच कार्यालय. कामाठीपुऱ्यातल्या सिद्धार्थनगरात मी रहात होतो. कामाठीपुरा म्हणजे आंबेडकरी चळवळीचे केंद्र; अगदी बाबासाहेबांच्या काळीही. त्यांचा भारतभूषण प्रिंटिंग प्रेस कामाठीपुऱ्यातलाच. चळवळीची थोर परंपरा असलेल्या कामाठीपुऱ्यातील सिद्धार्थ नगरात दलित पँथरचा दिनांक ९ जुलै १९७२ रोजी पहिला मेळावा संपन्न झाला. सूत्रसंचालक मीच होतो. त्याकाळी माझा बराचसा वेळ शिवसेना विरुद्ध दलित पँथर असल्या हाणामारी संदर्भात विभाग पोलिस स्टेशन, सचिवालय यातच जात असे, पत्रव्यवहार खूप असे. पत्रव्यवहारासाठी कोणतीही सुविधा नव्हती. कपाट नव्हते. बराचसा पत्रव्यवहार मी माझ्या झोपायच्या पलंगावरच ठेवीत असे. म्हणजे लाकडी पलंग, त्यावर सतरंजी अन् सतरंजीखाली पत्रे. आठ–पंधरा दिवसांनी, जसा वेळ मिळे तसा मी पत्रे फाईल करीत असे, वा स्मरणपत्रे पाठवीत असे.

२. एखादे प्रकरण आले की त्याची शहानिशा करून संबधीताला न्याय मिळेपर्यंत ते मी लढवित असे. त्या साठी आवश्यक ते सर्व मार्ग चोखाळीत असे.

कधी मोर्चा, कधी निदर्शने तर कधी घेराव घालीत असे. एखादा अॅक्शन प्रोग्रॅम घेतला, त्याचे वृत्तांत वर्तमानपत्रात आले, आता आपले काम संपले, असे मी कधीच मानले नाही. आम्ही मोर्चे काढीत असू वा निदर्शने करीत असू ते प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी. प्रश्न सोडविला नाही तर कोणत्याही गंभीर प्रसंगाला सामोरे जावे लागेल याची जाणीव मंत्री वा अधिकारी यांना होती. आणि म्हणूनच प्रश्न सुटत होते. मोर्चाच्या शिष्ट मंडळाने मंत्र्याना भेटताना मोर्चाचा विषय दुय्यम ठरवून स्वतःला वा आपल्या सहकाऱ्यांना काही तरी मागायचे ही प्रथा रूढ झाली नव्हती. मोर्चाने जायचे आणि वैयक्तीक प्रश्न सोडवायचे हे नंतरच्या काळात प्रतिष्ठीत पावले. त्यामुळेच आम्ही मूलभूत प्रश्नांना हात घातले तर नंतरच्या लोकांनी स्वतःसाठी वा सहकाऱ्यांसाठी घरे, एजन्सी, दुकानांसाठी परवाने मिळविले. प्रश्न सुटण्याऐवजी ते तसेच ठेवण्यात त्यांनी हातभार लावला. प्रश्न सुटले तर मोर्चे, निदर्शने संपणार होती अन् ती संपली तर खाजगी मागण्या मागण्यासाठी दुसरा मार्गच नव्हता त्यांच्यासमोर आपले ईप्सित साध्य करण्यासाठी मोर्चे,निदर्शने हे त्यांना साधन वाढू लागले. सोयीप्रमाणे एखादा प्रश्न बोथट करणे वा धारदार करणे हे तंत्र अवलंविले नसते तर नामांतराचा प्रश्न सुटला असता. पण त्यासाठी काहींना घरे मिळाली नसती, एजन्सी मिळाली नसती, नेतेपद मिळाले नसते. जो समाज त्याग करतो तोच तग धरून राहतो. इथे तर सगळे उलटे. त्यागाची परंपरा खंडीत झालेली. स्वतःच्या स्वार्थासाठी समाजाला वेठीस धरणारी.

३. माझ्या संघर्षमय जीवनात ज्येष्ठ व सामान्य सहकाऱ्यांच्या बळावर मी अनेक दूरगामी प्रश्न सोडवून घेतले. मी आज अभिमानाने सांगू इच्छितो की १९७२ नंतर दलितांचा सर्व क्षेत्रांत जो शिरकाव झाला, शेकडो लोक उच्चपदस्थ झाले, दलितांना सर्व क्षेत्रे सताड उघडी झाली याचे कारण आहे १९७२ साली सुरू झालेली लढाऊ चळवळ व आम्ही मंडळीने केलेले शिस्तबद्ध प्रयत्न. आमच्या चळवळीने काय साध्य झाले हे सांगायचे हे ठिकाण नाही परंतु घटनादत्त अधिकारांची होत असलेली पायमल्ली आम्ही थांबवली. सर्व खात्यांतील सर्व स्तरांवरील बॅकलॉग ( अनुशेष ) भरून काढण्यासाठी जो लढा देण्यात आला, अंमलबजावणीसाठी कडक उपाय योजण्यात आले त्याचा इतिहास आजही माझ्यासारख्याकडील कागदपत्रांवरून दिसेल. मग ते महाराष्ट्र शासनातील पोलिस खाते असो, केंद्रातील नोकऱ्या असोत, राष्ट्रीकृत बँका असोत, सहकार क्षेत्र असो; केंद्र वा महाराष्ट्र शासनाचे अंगिकृत व्यवसाय असोत, उद्योगधंदे असोत वा घरादारांचा प्रश्न असो.

४. अर्थात हे प्रश्न सोडविण्यासाठी आम्हाला कधी लेखणीची जरब दाखवावी लागली तर कधी प्रत्यक्ष जरब. या जरबेचे दोन उपयोग होत असत. दलितांना अभय मिळायचे तर त्यांच्यावर अन्याय करणाऱ्यांवर वचक बसायचा. जरब

निर्माण केलीच नसती तर सरकारी अधिकारीही दलितांच्या न्याय्य हक्कांबाबत उदासीन राहिले असते. आसपास जे काही घडते त्याचा दूरगामी परिणाम होत असतो; कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष. या संदर्भात मी दोन प्रकरणांचा दाखला देऊ इच्छितो. पहिले प्रकरण आहे मु. गोनवडी, पो. आंबेठाण, ता. खेड ( राजगुरुनगर ), जि. पुणे येथील. ते प्रकरण खेडयातले अन् जरबेच्या बळावर न्याय मिळवून दिला तोही खेडयातच, तर दुसरे प्रकरण आहे अकोला जिह्यातील धाकली या गावच्या गवईबंधुंचे. त्यांच्यावर अन्याय झाला खेडयात; परंतु न्याय मिळवून दिला तो मुंबई शहरात.

५. पुणे परिसरात दलित पँथर म्हटली की काहींचे काळीज धडधड उडे. ज्या पुण्य नगरीने दलितांना पेशवाईच्या रणरणत्या कढईत काळे ठिक्कर होताना पाहिले तेच पुणे आता दलितांच्या धाकाने गर्भगळीत होऊ लागले. इतिहासाची चाके आता उलटी फिरू लागली होती. गोनवडीच्या आधी आसखेड या गावात दि. १३–१०–७३ रोजी ९२ तरुणासह गावप्रवेश करून तेथील दलित शेतकरी विठू दगडू मोरे यांना तीस एकर जमीन उभ्या पिकासह मिळवून दिली. पाण्याखालील ३० एकर जमीन तेथील गुंड कुन्हाडीच्या बळावर गिळंकृत करू पहात होता परंतु आम्ही गावात प्रवेश करताच तो गुंड जो पळाला तो कायमचा. आसखेडमुळे एक आगळा वेगळा धाक निर्माण झाला होता. पुणे जिल्ह्यातच नव्हे तर महाराष्ट्रभर असली अनेक आसखेडी होती अन् मोरे सारखे हजारो लोक हे सगळं सहन करीत होते. आसखेडमुळे मात्र आख्खा राजगुरुनगर तालुका हादरला अन् तशातच गोनवडीचे प्रकरण माझ्याकडे आले. आसखेडला न्याय मिळवून देण्याचं समाधान मिळविणाऱ्यांना आणखी एक प्रकरण. मी सगळीकडे निरोप पाठविले आणि दि. २४–११–७३ रोजी रात्रौ पुणे पॅसेंजरने निघालो. आसखेडच्या विजयामुळे तरुणांचा भरणा जास्त होता. प्रकरण आसखेड सारखेच होते. फक्त नावे वेगळी होती. इथल्या दलित शेतकऱ्याचे नाव होते भिका शंकर गायकवाड तर गावगुंडाचे नाव होते देवराय गेणू मोहिते. गायकवाड यांची २४ एकर जमीन मोहिते बाहुबलावर कसत होता. न्याय मागायला जावे तर न्याय देणारे मोहिते याने विकत घेतलेले.

६. आम्ही ३५० तरुण तळेगाववरून चालत निघालो आणि ठरल्याप्रमाणे भल्या पहाटे गोनवडीच्या सीमेवर उभे राहिलो. मी आधी पाटल्याच्या घरी गेलो. माझ्याबरोबर गायकवाड, जाधव हे दोन बलवान साथी होते. त्यांच्या दरडावण्याने पाटील बाहेर आला. सुरुवातीला तो माझ्याशी मग्रूरीने बोलू लागला. शेताचा ताबा सोडणार नाही असे सांगत होता. आसपासचे लोक, बायकांपोरे गोळा झाली बाचाबाची सुरू झाली. माझाही आवाज चढला. पाटील काही ऐकायला तयार नाही हे पाहताच जाधवने त्याची मानगुटी धरली अन् पूर्वेकडे पहायला सांगितले.

पाटलाने दूरवर नजर टाकली. अर्धा मैल अंतरावर तरुण उभे होते; गोलाकार. हातात काठ्या. एखाद्या हिंदी चित्रपटाला शोभावा असा तो देखावा होता. कोवळ्या उन्हात चमकणारे ते चेहरे पाहताच पाटील हबकला. घरच्या बाया–बापड्यांनी एकच गोंधळ घातला. बायकांचा आरडाओरड परंतु पाटील मात्र गर्भगळीत. त्याच्या तोंडून शब्दही फुटेना. त्याचा एक महत्त्वाचा साथीदार गावात नव्हता. भिका शंकरच्या मते तो गावगुंडीत सराईत होता. पाटलाला मी फर्मान सोडलं . . . हा गुंड दुपारी बारा वाजेपर्यंत गावात यायला हवाय. सगळ्यासमोर भिकाची जमीन परत मिळायला हवीय . . . ती मिळणार नसेल तर हे साडेतीनशे तरुण बळजबरीने मिळवतील. ते तसे करताना त्यांची माथी भडकली आणि काही कमी जास्त झाले तर त्याला जबाबदार मी नसेन, हेही सांगितले. वेळेची मर्यादा मी स्वतः जाहीर केल्यामुळे त्या सर्व तरुणांना तो पर्यंत बौद्ध-वाड्यात थांबायला सांगितले. मधल्या काळात तेथून जवळच असलेल्या औट पोस्ट पोलिस स्टेशनला मी एक निवेदन पाठविले. 'मोहितेने शेत दिले नाही तर आम्ही शेतात प्रवेश करून शेताचा कबजा घेऊ . . .आपणाला पूर्व सूचना आहे. . . . आपण अतिक्रमण ठरवू नये' अशा अर्थाचे ते निवेदन होते. निवेदनाची प्रत पोलिस अधिक्षक, ग्रामीण पोलीस, पुणे यांना पाठवित असल्याची नोंद मूळ निवेदनावर होती. ते निवेदन वाचल्यावर तेथील हवालदार हबकला. निवेदनाची प्रत पुण्याला पाठविली नव्हती परंतु हवालदाराला मात्र वाटले की ही प्रत पुण्याला घेऊन कोणी तरी गेले असेल. आसखेड मुळे ग्रामीण पोलीस चिडलेले होतेच अशा अवस्थेत पुण्याचे पोलिस येण्याआधी आपण गेलेले बरे असा विचार करून हवालदार गावात हजर झाला. खून झाला तरी तात्काळ न येणारा हवालदार पाहून मोहितेला घाम सुटला. सगळा गाव एकवटला. हवालदारासमक्ष बैठक सुरू झाली. मधल्या वेळेत मी पांच रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा तयार केला. ती बैठक वेगळ्या प्रकारची होती. मी करारनाम्यातले एकेक कलम वाचत होतो, माझ्या म्हणण्याचा अर्थ हवालदार गावकऱ्यांसमक्ष मोहितेना सांगत होता आणि मोहिते निमूटपणे मान्यता देत होता. करारनाम्यानुसार मोहिते यांनी २४ एकर जमीन तात्काळ सोडलीच परंतु उभ्या पिकाचा हिस्साही तिथल्या तिथं मान्य केला शिवाय गेली दहा वर्षे जमीन कसल्याबद्धल रोख रुपये तीन हजार देण्याचे मान्य केले. स्टॅम्पपेपरवर मी व अविनाश महातेकर, देवराम गेणू मोहिते व हवालदार यांनी सह्या केल्या. सुरुवातीला हवालदार सही करायला तयार नव्हता. उगाचच आपल्याला अडकविले जाईल असे त्याला वाटले. मी त्याला पोलिस हवालदार म्हणून नव्हे तर एक त्रयस्त साक्षीदार एवढी तरी सही करा असे सांगितले. हो ना होकरता अखेर पोलिस हवालदाराने सही ठोकली व नेहमीच्या सवयीमुळे सहीखाली आपला बक्कल नंबरही टाकला. बकल नंबर टाकल्यावर त्याला आपली चूक कळली. मोही

तो नंबर खोडून टाकला. हवालदाराला डोक्यावरले ओझे उतरल्याचा आनंद झाला. हवालदाराइतकाच आम्हा सगळ्यांना आनंद झाला होता. जे प्रकरण कोर्टात गेले असते तर किमान पंधरा वर्षे तरी न्याय मिळाला नसता तो न्याय आम्ही जनतेच्या कोर्टात एका दिवसात मिळवून दिला.भिका शंकर आनंदला परंतु साडेतिनशे तरुणाना जेवण देऊ शकत नसल्यामुळे हिरमुसला. भिकाला पिकाचा अर्धा हिस्सा मिळणार होता. मोहितेच्या अंगणात भूईमूगाच्या शेंगाचा ढिग होता. बौद्धवाड्याकडे परतताना एका तरुणाने त्यातली एक शेंग उचलली. दरवाज्याजवळ एक म्हातारी बसली होती. तिने खा रे बाळा, खा म्हणताच पडत्या फळाची आज्ञा समजून सर्व तरुण त्या ढिगाऱ्यांवर तुटून पडले. दोन-चार पायल्या शेंगा फस्त करण्यात आल्या. ते तरुण घटाघट पाणी प्याले अन् आनंदाचा ढेकर दिला तो भिका शंकर गायकवाड याने. तरुण पाण्याचे तांब्यावर तांबे खाली करीत होते अन् भिमाचे डोळे पाण्याने भरत होते. भिकाच्या एका डोळ्यातल्या अश्रुत घुसळण होत होती ती आनंदाची तर दुसऱ्यात अगतिकता होती तरुणांना पोटभर अन्न खाऊ न घातल्याची. मी मात्र सायंकाळच्या थंड वाऱ्याला सांगत होतो . . . जा, ही बातमी सगळीकडे पोहोचव. अजूनही जिथे मोहितेसारखे गावगुंड असतील तेथे जाऊन त्यांना गोनवडीचा संदेश दे . . . म्हणावं एक टोळधाड आली आहे. नाव आहे तिचं दलित पँथर . . . दलितांना न्याय देते . . . अगदी एकाच दणक्यात. त्यानंतर पुणे जिल्ह्यातील खूप प्रकरणे झाली परंतु न्याय मिळविण्यासाठी कोणत्याही खेड्यात जावे लागले नाही. संबंधितांना मी पत्रे पाठवित असे . . . जमिनीचा ताबा सोडण्याची अंतिम तारीख देत असे. त्या तारखेपर्यंत ताबा न सोडल्यास कोणत्याही क्षणी टोळधाडी-सारखे अवतरू अशी जरब असायची. माझे एक पत्रही पुरे पडे. अंतिम तारखे–आधी जमिनीचा ताबा सोडला जायचा. कुठे उभ्या पिकासह तर कुठे पिकाशिवाय.

७. खेड्यातल्या सामान्य माणसावर जरब बसली होती त्याच वेळी शहरातले वडेवडे अधिकारीही या जखमेच्या प्रभावाखाली होते. अनेक स्तरांवर संघर्ष करून मी जे प्रकरण धसास लावले ते गवई बंधू प्रकरण. तो १९७५ चा जानेवारी महिना होता. नेहमीसारखा मी सिद्धार्थ विहार, वडाळा येथे गेलो तर तेथे अकोल्याचे नाना रहाटे, डी. एन. खंडारे, व व्ही. डी. अडकणे माझी वाट पहात होते. त्यांच्याबरोबर धाकलीचे गवई बंधू होते. या गवई बंधुचे डोळे काढण्यात आले होते. प्रकार माणुसकीला कालिमा लावण्यासारखा होता. गवई बंधुची चूक नसतानाही पाटलाने ही अघोर शिक्षा केली होती. गवई बंधुचा एकच गुन्हा होता आणि तो म्हणजे आपल्यावरील अन्यायाविरुद्ध त्यांनी दाद मागितली. या गवईबंधुपैकी बब्रुवाहन गवई यांच्या मुलीवर पाटलाच्या दिवट्याने बलात्कार केला. गवई बंधू दलित. त्यांना इज्जत प्यारी. आपल्या इज्जतीचे धिंडवडे निघ नयेत म्हणून त्यांनी पाटलापुढे पदर पसरला. मुलीला सून करा अशी विनवणी

केली. न्याय मागितला परंतु पाटील आणि साप यात फरक नसतो हे गवईबंधू विसरले. त्या सापाच्या मते बलात्कार करताना बाई ही फक्त बाईच असते. अन् लग्न करताना ती नुसती बाई नसते तर तिला जात असते, धर्म असतो, गरिबी, श्रीमंती असते. पाटलाने नकार तर दिलाच परंतु गवईबंधुवर अतिक्रमण केल्याचा खटला भरला. या खटल्यात गवई बंधू व त्याची मुलगी निर्दोष सुटली. कोर्टाने गवईबंधुच्या बाजुने निकाल देताच पाटील सूडाच्या भावनेने पेटून उठला. एका दलिताने आपल्या विरूद्ध विजय मिळविणे म्हणजे परंपरेला मिळालेला धक्का· तो त्याला सहन होत नव्हता आणि म्हणून पाटलाने गवईबंधुना शिक्षा द्यायचे ठरविले. दोन्ही भाऊ गावात आहेत हे समजताच पाटलाने त्यांना आपल्या घरी बोलाविले. गवईबंधुना कोणती शिक्षा द्यावी याबद्दल पिंजर पोलिसस्टेशनचे इन्स्पेक्टर पाटील यांनी सूचना दिली होतीच. त्यांच्या आदेशाप्रमाणे गवईबंधुवर गुंडानी हल्ला केला. वीस गुंडानी त्या दोघा बंधूना बेदम मारले व अंतिमतः इन्स्पेक्टरच्या सांगण्याप्रमाणे न्याय मागणारे डोळे निमुळत्या काठ्यांच्या सहाय्याने ठेचण्यात आले. लोंबकळणारी चार बुब्बुळे त्या नराधमांनी खचकन खेचली आणि गवईबंधुना कायमचं आंधळे केले. पाटलाच्या सहाय्याला इन्स्पेक्टर पाटील होताच. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रातून कांगावा करण्यात आला की, गुंडाना धडा शिकविण्यासाठी गावकऱ्यांनी त्यांचे डोळे काढले. पोलिसांनी अहवाल तयार केला . . . अमरावतीच्या डी. आय. जी. ने ( त्यांचेही नाव पाटीलच ) त्या अहवालावर शिक्कामोर्तब केले अन् अशा अवस्थेत न्याय मागायला ही मंडळी मुंबईत आली. मुंबईत आय. जी. वा गृहमंत्री यांना भेटलो तरी ते आमरावतीच्या अहवालाचाच दाखला देणार हे मला माहित होते आणि म्हणूनच माझ्या समोर एकच मार्ग होता आणि तो म्हणजे वृत्तपत्रांकडे धाव घेणे. वृत्तपत्रांकडे बातमी दिली तर सगळीच वर्तमानपत्रे ती बातमी छापतील याबद्दल मला खात्री नव्हती, कारण काही वर्तमानपत्रे तर सरकारचे समर्थन करण्यात धन्यता मानणारी. पत्रकार परिषद घ्यावी म्हटली तर पत्रकार परिषद म्हणजे नेमके काय हे मलाच नव्हे तर माझ्या सहकाऱ्यांना सुद्धा माहीत नव्हते. अखेर धावपळ करून मी पत्रकार परिषद आयोजित केली. पत्रकार परिषदेसाठी जागा बुक करणाऱ्या व्यक्तीनेच पत्रकारांसाठी काय ठेवणार हे विचारले. पत्रकारासाठी चहापाणी ठेवायचे असते हे मला तोपर्यंत तरी माहित नव्हते. पत्रकारांना त्यांच्या कार्यालयात निमंत्रणे धाडली आणि ठरल्यावेळी पत्रकार आले. राजा ढाले व काही निवडक सहकारी समोर येऊन बसले.मी कोणतेही निवेदन आणले नव्हते.पत्रकार परिषद मी बोलावली होती म्हणून पत्रकारांनी मला निवेदन करायला सांगितले. पत्रकारांना मी उद्देश सांगून सरळ गवई बंधुनाच त्यांची कहाणी सांगायला उभे केले. गोपाळ गवई हे धीट होते.त्यांनीच आपल्यावरील अन्यायाचा पाढा वाचला.पत्रकारांनी आपल्या

संशयी वृत्तीने दोन्ही भावांना अनेक प्रश्न विचारले. तेव्हा कोठे गवई बंधुचे म्हणणे त्यांना पटले अन् मग कॅमेरे पुढे सरसावले.प्रकरण अतिमानवी होते.काही पत्रकारांना इतके वाईट वाटले की चहा न घेता ते आपल्या कार्यालयात गेले.२५ जाने ७५ची ही पत्रकार परिषद.दुसऱ्या दिवशी मुंबईतील सर्व वर्तमानपत्रात दोघांच्या फोटोसह ती क्रूर बातमी प्रसिद्ध झाली.२६ जाने.ला शिवाजी पार्कवर जयप्रकाश नारायण यांची सभा होती. टाईम्स ऑफ इंडियातील गवईबंधुवरील अन्यायाचा धागा पकडून त्यांनी शासनाचे वाभाडे काढले. पत्रकारपरिषदेचे वृत्त सर्वच वर्तमानपत्रात पहिल्या पानावर प्रसिद्ध झाल्यामुळे गृहखात्यातील अधिकाऱ्यांची धावपळ सुरू झाली. दोन–तिन दिवसानंतर मला सचिवालयातून आमंत्रण आले. मुंबई पोलिसांमार्फत हे आमंत्रण आल्यावर मी सचिवालयात गवई बंधुना घेऊन गेलो. तेथे मुख्यमंत्री, गृहराज्यमंत्री व विधानपरिषदेचे उपसभापती यांची भेट झाली.मुख्यमंत्री नाईक होते.गृहराज्यमंत्री रत्नाप्पा कुंभार यांच्या केबीनमध्ये उपसभापती रा. सु. गवई यांची भेट झाली तेथे असतानाच मला डी.आय.जी.सी.आय.डी. यांचे बोलावणे आले. तेव्हा डी.आय.जी. सी.आय.डी. मधुकर गवई होते. अन्याय झाला होता गवईवर, गृहखात्याचे सेक्रेटरी पद्माकर गवई, उच्च सभागृहाचे उपसभापती गवई अन् चौकशीचे सगळे अधिकार असणारा अधिकारीही गवईच. आशेचा तोच एक किरण होता कारण मंत्र्यांची सहानुभुती कोरडी होती हे मी समजून होतो.मधुकररावांनी गवई बंधुकडून सविस्तर ऐकून घेतले आणि माझ्या मागणीप्रमाणे अमरावतीच्या डी.आय.जी.नी पुर्नचौकशीचा आदेश दिला. नव्याने चक्रे फिरू लागली अन् डी.आय.जी.पाटलांचा अहवाल खोटा ठरू लागला. खालून आलेला अहवाल जसाच्या तसा मूक्रर करणाऱ्या पाटलाना वेगवेगळचा संघटना,वर्तमानपत्रे व विरोधी पक्षवाले फैलावर घेऊ लागले.वातावरण गवईबंधुमय झाले होते अन् तेवढचात पंतप्रधानांचा महाराष्ट्र दौरा जाहिर झाला.

८. पंतप्रधानांचा दौरा असला की २–३ दिवस पोलीस माझा पाठलाग करायचे निदर्शने, घेराव यांची त्यांना भीती वाटायची. इतर वेळी पोलिसांशी चांगले संबंध ठेवणारा मी अशावेळी मात्र पोलिसांशी फटकून वागत असे. पंतप्रधानांच्या मुंबई भेटीला दोन दिवस असताना माझ्यावर नायगाव कोर्टात एक केस होती. वरळी–नायगाव दंगली संदर्भातील आणि त्यामुळे पोलिसांना मी भेटणे टाळू शकत नव्हतो पण कोर्टात असतानाच मी रामदास आठवले यांच्यामार्फत वर्तमानपत्राकडे एक पत्रक पाठविले. पंतप्रधानांच्या गाडीखाली गवई बंधू जीव देणार असे ते पत्रक होते. वर्तमानपत्रातल्या कार्यालयात ते पत्रक जाताच पोलिस खात्यात गहजब झाला. पोलिसांचे अन् पत्रकारांचे ' आतले ' संबंध असतात, नव्हे काही पत्रकार तर चक्क ' खबरे ' असतात. ते तसे असतात म्हणून तर नायगाव कोर्टातच अधिकाऱ्यांचा एक ताफा मला भेटायला आला. गवई बंधू कोठे व किती वाजता जीव देणार या बद्दल ते विचारणा करीत होते परंतु कोर्ट संपल्यावरच

याबद्दल मी गवईबंधूशी बोलून नक्की करेन असे सांगून मार्गी लागले. पंतप्रधानांच्या गाडीखाली गवई बंधुनी जीव देऊ नये अशी मी त्यांना विनंती करावी हे सांगायला डीसीपी बालचंद्रन व एसीपी मोकाशी माझ्याकडे आले. गवई बंधुवर आधीच खूप अन्याय झालाय अशा अवस्थेत मी त्यांना त्यांच्या निर्णयाविरूद्ध जायला सांगून त्यांच्यावर अन्याय करू इच्छित नाही हे निक्षून सांगितले. चर्चे अंती मी वैतागून पोलिसांना सांगितले की ते हवं तर ठिकाण सांगतील. तुमची इच्छा असेलच तर तुम्ही त्यांना अटक करा. पोलिसांसमोर हाही तिढाच होता. अटक नाही केली तर जीव देण्याचा प्रयत्न करणार अन् अटक केली तर वर्तमानपत्रे आग ओकणार. शेवटी हो ना, हो करता गवईबंधू अन् पंतप्रधानांची भेट घालून देण्याचे मान्य झाले. या भेटीच्या वेळी मी व राजा ढाले यांनी उपस्थित रहावे असे ठरले. दुसऱ्या दिवशी आम्हाला पोलिस गाडीतूनच सहार विमानतळावर नेण्यात आले. विमानतळावर पंतप्रधान उतरताच सुरक्षा व्यवस्था ' कडक ' करण्यात आली. तोवर पंतप्रधानाना गवईबंधु प्रकरणाची खबर देण्यात आली होती. देशाच्या पंतप्रधानांना भेटण्याचा माझा पहिलाच प्रसंग.

९. पंतप्रधान इंदिरा गांधी भेटीच्या ठिकाणी आल्या. त्यांच्या पाठोपाठ मुख्यमंत्री, मंत्रीमंडळातील काही सदस्य, पोलिस महानिरीक्षक, मुंबई पोलिस आयुक्त वगैरे अनेक अधिकारी होते.त्या जवळ येताच आम्ही त्यांना नमस्कार वगैरे करू असे त्यांना वाटले असावे. एक प्रयत्न म्हणून तरी. पण का कोण जाणे नमस्कारासाठी पंतप्रधानांचे हात जुळले असतानाही मी एकाएकी उसळलो अन् ' देखो देखो, अपने आँखसे देखो की आपके राज मे किस किस्मका अन्याय हो रहा है 'असे सुनवताच बाई एकदम माझ्यावर उकडल्या. ' यह राज्य क्या तुम्हारा नही है ।' असा उलटा प्रश्न मलाच विचारू लागल्या अन् मी ही तेवढ्याच निर्भयतेने... ' नही इस प्रकारका अन्याय केवल आपके राज में ही हो सकता है ' मी ' राज 'मे म्हणत होतो तर त्या राज्य ( State ) समजत होत्या. तीन–चार मिनिटे मी पंतप्रधानावर अक्षरश: तुटून पडलो होतो. समोर गवई बंधू होते. वातावरण तप्त झाले. तेवढ्यात मुख्यमंत्री नाईक बाजूलाच उभ्या असलेल्या राजा ढाले यांची पंतप्रधानांना ओळख करून देण्याचा प्रयत्न करू लागले. राष्ट्रध्वजाला फडके म्हणणारा हाच तो राजा ढाले असे कदाचित् त्यांना सुचवायचे असावे परंतु ढालेंनी ओळख करून घेण्याऐवजी वसंतराव नाईकांना ' तुम्ही मध्ये कशाला तडमडता, तो पी.एम्.जी. बोलतोय ना 'या शब्दांत खडसावले. बिच्चारे मुख्यमंत्री खट्टू झाले तर पाठीमागून सूर्यकांत जोग आणखी कसली तरी खूण करीत होते. मुख्यमंत्र्याना ढाले यानी परस्पर गप्प केल्यावर पुन्हा माझे व पंतप्रधान यांचे बोलणे सुरू झाले.

१०. पंतप्रधानाना मी जेव्हा ' डोळे फोडण्याचा ' प्रकार सांगत होतो तेव्हा गवईबंधू हात जोडून ' आम्हाला न्याय द्या ' असे विनवीत होते. खाचा झालेल्या

त्यांच्या त्या डोळ्यांना पंतप्रधानानी निरखून पाहिले अन् टच्कन त्यांचेही डोळे पाणावले. त्यांनी आपले दु:ख बोलून दाखविले. १ फेब्रु. ७५ ची ही पंतप्रधानांची मुंबई भेट एक आगळी वेगळी ठरली. अमानुष अन्याय पाहताना त्यांच्यातली स्त्री जागी झाली आणि म्हणून तर स्त्रीसुलभ कारुण्य त्यांच्या डोळ्यांत तरळले... आवाज खालावला. या प्रकरणी कसून चौकशी करा असा आदेश पंतप्रधान मुख्यमंत्र्यांना देत होत्या. परंतु पुन्हा एकदा चढ्या आवाजात महाराष्ट्र सरकारवर आमचा मुळीच विश्वास नसल्याचे सांगितले. चौकशी खरोखरच करायची असेल तर सी. बी. आय तर्फे करा. कारण महाराष्ट्र शासन 'दलितशत्रू' असल्याचेही सांगितले अन् तशी मागणी असलेले एक निवेदन पंतप्रधानांना दिले. पंतप्रधानांनी ते स्वीकारून जवळच उभ्या असलेल्या पी. ए. कडे दिले. त्या निवेदनाची प्रत मुख्यामंत्र्याना देण्यासाठी कागद पुढे केले परंतु नाईकांचे हात पुढे येईना. पंतप्रधानांनी ते पाहिले. त्या तिथल्या तिथ नाईकांवर चिडल्या. ' वह आपको निवेदन दे रहे है और आप लेने भी नही ऐसा बर्ताव करेगा तो वह आपके खिलाफ जाएंगे नही तो क्या ?'... नाईकानी नाईलाजाने हात पुढे केला, मी त्यांना निवेदन दिले . . . इंदिरा गांधी पाठमोऱ्या झाल्या. त्यांनी पदर डोळ्याला लावला. मी, राजा ढाले, गवई बंधूसह पोलिसांच्या जीपमधून बाहेर आलो. पंतप्रधानांनी गवईबंधुना मदत जाहीर केली. गवईबंधूसह आम्ही त्यांचा प्रश्न पंतप्रधानासमोर ठेवला . . . राज्यशासनाच्या विरोधी भूमिका घेतली. पंतप्रधानाच्या भेटीनंतर सचिवालयात लाल फितीत अडकलेला 'कारभार' वेग घेऊ लागला. अधिकारावर असलेल्या गवईबंधुनी अन्यायग्रस्त गवईबंधुना न्याय देण्यासाठी आपले 'अधिकार' पणाला लावले. खटल्याचं स्वरूपही बदललं गेलं. सुरुवातीला ३२४ हे कलम लावले होते ते आता ३२६ करण्यात आले. पोलिस खाते आणि मुख्यमंत्र्याविरुद्ध कुजबूज सुरू झाली. मुख्यमंत्र्याना जावे लागणार अशी 'हवा' निर्माण झाली आणि २० फेब्रुवारी ७५ च्या वर्तमानपत्रात बातमी झळकली. . . महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदावरून नाईकांची हकालपट्टी . . . गवईबंधुचे डोळे आर्म्हीच नव्हे तर देशी-परदेशीय शास्त्रज्ञही देऊ शकत नव्हते परंतु डोळस नाईकांच्या डोळ्यात आम्ही असे अंजन टाकले की त्यामुळे गवई बंधुच्या डोळ्यांची एक हजार रुपये किंमत करणाऱ्या नाईकांचे डोळे लालेलाल झाले. त्याना काहीही दिसेनासे झाले . . . त्यांच्या डोळ्यासमोरही अंधार . . . अगदी गवई बंधुसारखा. नाईकानाही शून्यात बघत रहावे लागले . . . भल्या मोठ्या शून्यात . . . त्या काळोखात ते मुख्यमंत्र्याच्या खुर्चीवरून कधी कोसळले ते त्यांचे त्यानाही कळले नाही.

**– ज. वि. पवार**

नं. १ सी, २०३, लक्ष्मीनारायण नगर, एक्सर रोड, बोरीवली (प) मुंबई–४०० १०३

# ‘ भटक्या-विमुक्तांची चळवळ ’

– बाळकृष्ण रेणके

ब्रिटिश सरकारने १८७१ साली गुन्हेगार जमाती कायदा केला. या कायद्याप्रमाणे कांही जमातींची माणसे जन्मतःच गुन्हेगार असतात असे ठरविण्यात आले. जाती व्यवस्था मुळाधार असलेल्या समाजव्यवस्थेस या कायद्यामुळे चांगलेच खतपाणी मिळाले आणि ठराविक जमातींची माणसे जन्मतःच गुन्हेगार असतात हा विचार समाजात सर्वदूर पक्का झाला. म्हैस, बैल, कुत्रा वगैरे पाळीव प्राण्यांबद्दल जिव्हाळासुद्धा या माणसाच्या वाट्याला आला नाही. त्यामुळे त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारास सीमाच राहिली नाही. कधी पोलिसांच्या ताब्यात, कधी तुरुंगात, तर कधी रानावनात लपून छपून कोल्ह्या लांडग्याचे जीवन जगणे, या पलीकडे त्यांना दुसरा पर्याय उरला नाही. घर, गाव, शेती, उद्योग, सणवार वगैरे बाबींना त्यांच्या जीवनात स्थानच उरले नाही.

पुढे १९२४साली ब्रिटीश सरकारने केलेल्या गुन्हेगार जमाती वसाहतीकारण कायदा यामुळे तर त्यांच्यावर कडक निर्बंध लादून तारेचे कुंपण व पोलिसांचा पहारा असलेल्या त्यांच्या स्वतंत्र वसाहती (Settlement Colonies) स्थापन करण्यात आल्या. कोणत्याही जाती जमातीचा माणूस जन्मतः गुन्हेगार असू शकत नाही हे तत्त्व आपल्या राज्य घटनेने मान्य केल्यामुळे स्वराज्यात, १८७१ व १९२४ सालचे

वरील दोन्ही कायदे १९५१ साली रद्द करण्यात आले. त्यामुळे या जमातींना १९५१ पासून पुढे ''पूर्वाश्रमीच्या गुन्हेगार जमाती'' ( Ex-criminal Tribes or Denotifiedtribes )जसे कागदोपत्री संबोधण्यात येऊ लागले. १९५९ साली सोलापूर येथे झालेल्या या जमातींच्या राज्यमेळाव्याचे उद्घाटन करताना पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले, '' साऱ्या देशाबरोबर आपणही ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त झालात. परंतु १८७१ सालच्या गुन्हेगार जमाती कायद्यातून व त्यामुळे निर्माण झालेल्या तारांच्या तुरुंगातूनही तुम्ही मुक्त झाला आहात म्हणून तुम्हाला मी विशेष मुक्त म्हणजेच '' विमुक्त जन ''म्हणू इच्छितो. जन्मतः तुमच्या माथा मारलेल्या तारांचा तुरुंग नष्ट झाला परंतु तुम्हाला माणूस म्हणून सन्मानाने जगण्याची संधी प्राप्त करून देऊन तुमचा सर्वांगीण विकास साधण्याच्या जबाबदारीच्या बंधनाच्या तुरुंगात मात्र मी अडकलो आहे.'' या जमातीना उद्देशून नेहरूंनी ' विमुक्त जन ' हा शब्दप्रयोग केला म्हणून महाराष्ट्र शासनाने Ex-criminal tribe किंवा Denotified tribe या शब्दाचे मराठी भाषांतर विमुक्त जाती असे केले ट्राईब या शब्दाचे मराठी भाषांतर जमाती ऐवजी जाती असे कुणी केले व शासनकर्त्या विद्वान मंडळीनी मान्य कसे केले हे एक कोडे आहे.

ब्रिटिशांनी निर्माण केलेले तारांचे सुरुंग नष्ट झाले. हे लोक मुक्त झाले. परंतु त्याचबरोबर या लोकांसाठी ब्रिटिशांना त्या तुरुंगात केलेली शिक्षण प्रशिक्षणाची व त्यांच्या उपजीविकेसाठी त्यांना मिळणारा दैनंदिन भत्ता व गोष्टीही नष्ट झाल्या. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरूंना आपल्या भाषणात या जमाती विषयी आस्था दाखविली. परंतु त्यांच्या पुनर्वसनाच्या आणि सर्वांगीण विकासाच्या योजना राबविल्या जाण्यासाठी कायद्याची तरतूद करण्यास भारत सरकार विसरले. दिनांक ९ ऑक्टोबर ८४ रोजी पुण्यात ' भटक्या विमुक्तांचे प्रश्न ' या विषयावर आयोजित केलेल्या चर्चा सत्राच्या अध्यक्षपदावरून बोलताना महाराष्ट्राचे थोर नेते कै. यशवंतरावजी चव्हाण म्हणाले '' १९५९ साली सोलापूर येथे पंडित जवाहरलाल नेहरूंनी उद्घाटन केलेल्या विमुक्त जमातीच्या राज्य मेळाव्याचा अध्यक्ष होतो त्यावेळी मी महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होतो. सेटलमेंट तुरुंगाच्या तारा तोडून या जमातींना विशेष मुक्त केलेल्या घटनेचा मी साक्षीदार आहे. त्यांना विमुक्त केले गेले यात जरूर आनंद होता व आहेही. परंतु तारा तोडून मुक्त केले गेलेले हे लोक जाणार कोठे हा प्रश्नच त्यावेळी डोक्यात घुसला नाही. या जमातीची कटी पतंगसारखी आवस्था झाली आहे हे लक्षातच आले नाही. एवढेच नव्हे तर ४० वर्षे सत्तेत असताना या समाज घटकाचे प्रश्न समजू शकली नाही याबद्दल मी स्वतः अपराधी आहे असे आज मला वाटत आहे. ''

**भटक्या जमाती**

उपजीविकेसाठी सतत गावोगाव भटकत राहाण्याची परंपरा असलेल्या काही

जमाती आहेत. बहुतांशी जमाती देवदेवतांच्या नांवे भिक्षा मागत किंवा लोकांची आध्यात्मिक करमणूक करीत फिरतात. काही जमाती रस्तोरस्ती कसरतीचे,जादूचे हात चलाखीचे खेळ करीत फिरतात. साप, माकड, बैल, पोपट वगैरे प्राण्यांचा खेळ करीत फिरणाऱ्या काही जमाती आहेत. नृत्य, गायन, कथा–कथन वगैरे करून लोकांची करमणुक करीत किंवा भविष्य कथन करीत फिरणाऱ्या काही जमाती आहेत. नाडी परीक्षेवरून रोगाचे निदान करून वनस्पतींची आषधे देत गावोगाव फिरणाऱ्या जमातीही आहेत. स्वतःच्या दंडात सुया टोचून निघालेल्या रक्ताचे नैवेद्य कोपलेल्या देवदेवतांना दाखवून गावकऱ्याच्या सुखी जीवनाची मागणी करीत गावोगाव भटकणारी जमातही आहेत. परंपरागत पद्धतीने पुरेशी माहिती मिळाली नाही तर रानावनात शिकार करून किंवा नद्या–नाल्यांत मासे मारून ते आपली उपजीविका करतात.

**सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक अवस्था**

गावगाड्यातील उत्पादन प्रक्रिया किंवा सेवाकार्य यामध्ये त्यांना कोठेच स्थान नाही. गावकुसाच्या बाहेर ओसाड माळावर किंवा गावाच्या आश्रयाने हागंदारीत किंवा मसनवाटयात चार–दोन दिवस राहून त्या गावात भिक्षा मागून झाली की पुढच्या गावाला निघणे हा त्यांचा जीवनक्रम आजही चालूच आहे. घिसाडी, सिकलगार, कैकाडी, वडार वगैरे काही थोडया जमाती गावकऱ्यांच्या गरजा भागविणारे छोटे–छोटे व्यवसाय किंवा माती वाहणे, दगड फोडणे वगैरे सारखी हलकी समजली जाणारी कष्टाची कामे करतात. परंतु या व्यवसायाचे स्वरूप सुद्धा भटके असून हे व्यवसाय हलके व प्रतिष्ठाहीन समजले जातात.

मंत्र-तंत्र, जादूटोणा, भूतबाधा, देवदेवस्की वगैरे बाबतीत या जमाती अत्यंत अंधश्रद्धाळू आहेत.घातूक व्यसनांचे प्राबल्य,परोकोटीचे अज्ञान व दारिद्रय बाळगणारा हा समाज गावात घर नाही, रानात शेत नाही; प्रतिष्ठित व्यवसाय नाही, अशा अवस्थेत पिढयानुपिढया चालत आलेल्या भटकेपणाला कवटाळून जीवन जगत आहे. पूरग्रस्त, दुष्काळग्रस्त, धरणग्रस्त जनतेच्या पुनर्वसनासाठी आपण सारे युद्धपातळीवर प्रयत्न करताना दिसतो. परंतु वरील आपत्तीग्रस्त लोकांचे जीवन शेकडो वर्षांपासून पिढयानुपिढया ज्यांच्या माथी मारण्यात आले आहे अशा भटक्या जमातींच्या पुनर्वसनाचे प्रयत्न ( यांच्या पुनर्वसनाचा प्रश्नच येत नाही, कारण मुळात वसनच झालेले नाही ) युद्धपातळीवर होतात असे दिसत नाही. जे काही कल्याणाचे प्रयत्न होतात त्यात माया, आपुलकी असल्याचे जाणवत नाही.

या जमातीचे लोक जन्मतः गुन्हेगार किंवा भिकारी असतात अशी सामान्य जनांची मनोधारणा असल्यामुळे त्यांना कष्टाची मजुरीची कामे वेळेवर मिळत तर नाहीतच परंतु पदोपदी त्यांना मानवी उपेक्षा व अन्याय–अत्याचारास तोंड द्यावे लागते. काही वेळा त्यांच्यापैकी काहींना मुलभूत गरजा भागविण्यासाठी चोरी

करण्याला, शरीर विकण्याला दुसरा पर्यायच उरत नाही. या परिस्थितीचा फायदा काही धूर्त प्रस्थापित लोक करून घेतात. चोरीचा माल पचविण्याची चोख व्यवस्था करून ते या लोकांना चोरी करण्यासाठी मजुरी देतात. त्यांच्या अगतिकतेचा, त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचे शोषण केले जाते. चोरीचा माल पचविणारे पडद्याआड राहतात. व्यवहारात ते प्रतिष्ठीत म्हणून वावरतात. मजुरीने चोरी करणारा मात्र केवळ गुन्हेगार म्हणून बदनाम ठरत आहे. अशी चोरी करणारी मंडळी जी या व्यवस्थेचे बळी आहेत ती मोजकी असली तरी सबंध भटका विमुक्त समाज मात्र आज गावकऱ्यांच्या व पोलिसांच्या आत्याचारास बळी पडत आहे.

भटकेपणामुळे या जमातींना मुळात शिक्षणाची संधीच मिळत नाही. यांच्या अज्ञान व निरक्षरतेमुळे मुलांची जन्मतारीख लिहून ठेवली जात नाही. त्यामुळे ती सांगताही येत नाही. म्हणून मुलांना शाळेत प्रवेश मिळविण्यास अडचण निर्माण होते. कोणत्याच गावचे रहिवासी प्रमाणपत्र मिळत नाही म्हणून मुलांना शैक्षणिक सवलती मिळण्यास अडचण येते. या अडचणी सोडवून घेण्यासाठी आवश्यक असलेली हुषारी, वेळ, पैसा यांच्या जवळ नाही. मुख्य म्हणजे शिक्षणाबद्दल आवडच नाही. वैदु, माकडवाला, नंदीवाले, डोंबारी, मसनजोगी, पारधी, मांगगारुडी वगैरे जमातीचे लोक शंभर टक्के निरक्षर आहेत. उरलेल्या जमातीमध्ये सुद्धा एक दोन टक्क्यांपेक्षा जास्त साक्षरता नाही. या सर्व जमातींच्या स्वतंत्र बोलीभाषा किंवा सांकेतिक भाषा आहेत. सर्वसाधारण ग्रामीण जनतेच्या, तुलतेने भाषा क्षमता फारच कमी आहे. स्वराज्य, लोकशाही, नागरिकांचे हक्क, आपला देश वगैरे बाबतीत यांच्यात जागृती करायची म्हटले तर ते सारे समजून घेण्याइतकी भाषाक्षमता त्यांच्यात नाही. म्हणून यांचे प्रबोधन करण्याआधी यांच्याशी संवाद साधणे महत्त्वाचे आहे.

## राजकीय अवस्था

अज्ञानी,दरिद्री व सामाजिकदृष्टया तुच्छ,अप्रतिष्ठित किंवा अलिप्त असलेल्या मागास समाज घटकांना समान संधीचा लाभ घेता यावा म्हणून त्यांना विशेष संधी देण्याचे तत्त्व भारतीय घटनेने मान्य केले आहे. अशी विशेष संधी दुर्बल घटकांतील ज्या जाती–जमातींना दिली पाहिजे असे वाटले त्यांची यादी करून राज्यघटनेस दोन परिशिष्टे जोडली आहेत. एक अनुसुचित जातीचे व दुसरे अनुसूचित जमातीचे.

भारतामध्ये दुर्दैवाने आजही अशा अनेक भटक्या जमाती आहेत की ज्या अनुसूचित जाती/जमाती एवढयाच काही वेळा वेळा त्यांच्या पेक्षा कंकणभर जास्तच हालाखाचे उपेक्षित शापीत जीवन जगत आहेत आणि अनुसूचित जाती जमातीची यादी ठरविण्यासाठी आवश्यक असलेले सर्व निकष त्यांना लागू होतात. परंतु विशेष संधी साठी भारत सरकारच्या वरील परिशिष्टात त्यांची नोंद केली गेलेली नाही.

काही प्रांतात मात्र अशा जमातींची वेगळी यादी तयार करून राज्य शासन अंतर्गत शिक्षण व नोकरीच्या थोड्याबहुत सवलती जाहीर केल्या आहेत. परंतु मुळातली भटकी प्रवृत्ती, सामान्य लोकांपासून अलिप्त राहण्याची वृत्ती, सुधारणेच्या विरोधातले त्यांचे परंपरागत मन, निरक्षरता, बहुजन समाजाकडून त्यांना मिळणारी तुच्छता दर्शक वागणूक यामुळे त्यांना राज्य शासनाच्या या सोयीसवलतींचा लाभ होताना दिसत नाही.

भटक्या विमुक्त जमातींसाठी संपूर्ण अभ्यासांती राष्ट्रपातळीवर केंद्रशासनाने निश्चित असे धोरण स्वीकारले नसल्यामुळे अनेक अन्यायकारक व गोंधळाच्या घटना घडत आहेत.उदाहरण म्हणून एक घटना येथे दयावीशी वाटते. श्री. नारायण जाधव नावाचे कैकाडी जमातीचे एक गृहस्थ सध्या सोलापूर येथे रेल्वेत नोकरी करीत आहेत. ते मूळ आंध्र प्रदेशचे रहिवासी म्हणून त्यांचे जातीचे प्रमाणपत्र आदिवासीचे. रेल्वेत नोकरी लागल्यावर नात्यातल्याच कैकाडी जमातीच्या मुलीशी त्यांचे लग्न झाले. ही मुलगी म्हैसूरची. कर्नाटक राज्याचे त्या मुलीचे प्रमाणपत्र अनुसूचित जातीचे. नोकरीच्या निमित्ताने त्यांची बदली सोलापूर येथे झाल्यावर त्यांना झालेली मुले मात्र विमुक्त जमातीची झाली, कारण महाराष्ट्रात कैकाडी जमात विमुक्त जमातीत गणली गेली आहे. बाप आदिवासी म्हणून आणि आई अनुसूचित जातीची म्हणून ते दोघेही केंद्र सरकारच्या सवलती घेऊ शकतात. परंतु त्यांची मुले मात्र केंद्र सरकारच्या सवलती घेऊ शकत नाहीत. कारण ती सोलापुरात जन्मली आहेत. नोकरीच्या निमित्ताने नारायण जाधव हैद्राबादला असताना त्यांना मूल झाले असते तर मात्र ते आदिवासी ठरले असते. एका कैकाडी जमातीचाच हा प्रश्न आहे असे नाही तर अनेक भटक्या–विमुक्त जमातींची अवस्था अशीच आहे. एकच जमात पण निरनिराळ्या राज्यात निरनिराळ्या यादीत लहरीप्रमाणे घुसडण्याचा आंधळा कारभार झाला आहे.

भटक्या जमातीचे लोक आजही राज्यसंस्थेपासून तुटलेल्या अवस्थेत पूर्वापार पद्धतीने भिक्षा मागून व आपला चरितार्थ चालवत असल्याचे दिसते. सापगारुडी, डोंबारी, माकडवाले, नंदीवाले, मरगम्मा, पारधी, वैद, जोशी वगैरे लोक नेहमीच डोळ्यात भरतात. त्यांच्या ब्रिटिश आमदानीतील जीवनात आणि ३८ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर आजच्या जीवनात काही फरक पडल्याचे आढळत नाही. रस्त्याने कसरत करीत गावोगाव फिरणारा डोंबारी, नंदीबैल घेऊन फिरणारे नंदीवाले, सापाचा व जादूचा खेळ करीत फिरणारा मदारी यांना दिल्लीत कोण राज्य करतो याचे काय सोयरसुतक असणार ? राज्य कोणाचेही असो, त्यांच्यासाठी काहीच फरक पडत नाही. पंचायत राज्यात पंचायती तर्फे त्यांच्या हिताचा एखादा निर्णय घेतला आहे व त्याची अंमलबजावणी झाली आहे असे एकही उदाहरण

आढळत नाही. बाहेरील कायद्याची बंधने त्यांच्यावर जरूर पडतात, परंतु त्या कायद्याचे लाभ मात्र त्यांना होत नाहीत अशी अवस्था आहे. 'कायदा व सुव्यवस्था' या आजच्या संकल्पनेत व त्यानुसार होणाऱ्या शासकीय कारवाईत भटक्या विमुक्त जमातीचे तिळमात्र सुख किंवा लाभ सामावलेला नाही. उलट कायदा व सुव्यवस्थे-संबंधीची आजची संकल्पना त्यांच्या 'बोकांडी बसणारीच आहे. बेघर भूहीन असलेले सारे भटके–विमुक्त त्यांच्या हक्कांसाठी रस्त्यावर आले तर प्रस्थापित समाजव्यवस्थेची कायदा व सुव्यवस्था धोक्यात आली म्हणून त्यांच्याच पाठीत वडगा बसण्याची शक्यता आहे.

### भटक्या विमुक्त जमातीचे वेगळेपण

मानवी विकाराला अनुसरून सामान्यजनाप्रमाणे भटक्या विमुक्त जमातीमध्ये सुद्धा अनेक वाद, भांडणे, गुन्हे रोजच होतात. बऱ्याच वेळा या वादाचे रूपांतर खून, मारामाऱ्या होण्यात होते. परंतु आजपर्यंतच्या शेकडो वर्षांच्या इतिहासात आपणास एकही उदाहरण असे आढळणार नाही की एका भटक्या जमातीच्या इसमाने त्याच जमातीच्या दुसऱ्या इसमाविरुद्ध पोलिसांकडे किंवा न्यायालयाकडे धाव घेतली आहे.

भटक्या जमातीचे स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे. त्यानुसार जमातीतील लोकांच्या जीवनक्रमावर सर्व बाबतीत संपूर्णपणे नियंत्रण ठेवणारी, राज्यसत्तेशी समांतर असलेली जमातीअंतर्गत जातपंचायतीची स्वतंत्र शासनव्यवस्था आहे. स्त्री–पुरुष संबंध, लग्न, घटस्फोट, मारामारी, खून, आर्थिक व्यवहार, फसवणूक वगैरे संबंधातले जमातीअंतर्गत निर्माण झालेले सर्व प्रश्न आजही जातपंचायतीमार्फतच सोडविले जातात. ही जातपंचायतीची शासन यंत्रणा एवढी मजबूत व कडेकोट झाली आहे की दिल्लीच्या तख्तावर कोण राज्य करीत आहे याचे त्यांना काहीच सोयर-सुतक नाही. सामुदाईक पंचायतीचे अधिकार त्या समूहापुरते सर्वश्रेष्ठ असतात. या जमाती व राज्यशासन यांच्या संबंधाचा विचार केला तर शासकीय कायद्याचे निर्बन्ध या जमातीवर जरूर पडले आहेत. परंतु त्या कायद्याचा लाभ मात्र या जमातींना तिळमात्र झालेला नाही.

समाजपुरुषाने भटक्या जमातींना गावगाड्यात स्थान दिलेले नाही. त्यांना अवर्ण मानले. त्यामुळे मुख्य समाज व भटके विमुक्त यांच्यात अलिप्तता निर्माण झाली. या अलिप्ततेतून शक्तीशाली प्रस्थापितांशी संघर्ष निर्माण होऊ नये व निर्माण झालाच तर सोयीच्या दृष्टीने संपत्ती, अन्नधान्य, कपडालत्ता वगैरेंचा संचय करायचा नाही, हा नियम झाला. या नियमातूनच रात्रीचे अन्न सकाळसाठी ठेवायचे नाही. ताट, वाटी, झोळी रिकामे करून उशाला घेऊन झोपायचे, तीन दिवसांपेक्षा जास्त दिवस एका गावात राहायचे नाही, रोज ताजी भिक्षा मागूनच पोट भरायचे अशा प्रकारचे तत्त्वज्ञान काही जमातींनी स्वीकारले. भिक्षा

मागितल्याशिवाय उपजीविकाच होत नाही म्हणून भिक्षा मागणे वाईट तर नाहीच परंतु तो आपला पवित्र धर्म आहे अशी धारणा सर्वच भटक्या जमातींची आहे.

देशातल्या एक दगडावर किंवा एका झाडावर मालकी हक्क सांगण्याइतकाही अधिकार नसलेले कोट्यावधी भटके विमुक्त लोक देशात आहेत. चूल तयार करण्यासाठी कोणाच्या शेतातले तीन दगड उचलले, चूल पेटविण्यासाठी कोणाच्या शेतातून काटक्या घेतल्या,भूक भागविण्यासाठी रानातले कणीस किंवा भाजी घेतली तरी या साऱ्या गोष्टी आजच्या कायद्याने चोरीच ठरतात. कैकाडी शिंदीच्या किंवा निर्गुडीच्या फोकांपासून पाट्या-टोपल्या तयार करून विकतो. पण या शिंदींच्या निर्गुडीच्या फोका दुसऱ्याची मालकी असलेल्या शेतातूनच आणाव्या लागतात. आजच्या कायद्याने ती चोरीच आहे. स्वतःच्या गाईम्हशींना चारण्यासाठी कोठलेही गवत भटक्या जमातीने घेतले तरी ती चोरी ठरते. म्हणून प्रत्येक दिवसाचा उगवता सूर्य या जमातीच्या चोरीस साक्ष असतो. चोरी केल्याशिवाय या जमातीचे भागतच नाही. सामान्यजनाकडून कमीत कमी त्रास व्हावा, शक्यतो त्यांच्याकडून सहानुभूती मिळावी म्हणून 'पोटापुरती' म्हणजेच त्या दिवसाच्या गरजा भागण्या एवढीच चोरी करायची हा काही जमातींचा नियम झाला. गरजेपेक्षा जास्त चोरी करणे जातपंचायतीने गुन्हा ठरविला. चोरीची मर्यादा ठरविण्याचे अधिकार जातपंचायतीकडे आले, पण चोरी करण्यास परवानगी देण्यात आली.

अपघातानेच शिक्षण मिळाल्यामुळे शिक्षकाची नोकरी करणाऱ्या उरुळीकांचन येथील मुसळे गुरुजींना कोल्हाटी जमातीची ग्रामपंचायत वाळीत टाकते. मुसळे गुरुजींचा गुन्हा काय, तर त्यांनी कोल्हाटी जमातीचा परंपरेने चालत आलेला नाचगाण्याचा व्यवसाय सोडून शिक्षण घेतले व सरकारी नोकरी पत्करली.

परंपरेप्रमाणे 'सुपडवाले बाशिंग' न बांधता मोत्याच्या मुंडावळ्या बांधून लग्न केल्यामुळे धुळे येथील गोपाळ समाजाच्या एका जोडप्याचे लग्नच जातपंचायतीने बेकायदेशीर ठरविले आहे. होळीच्या दिवशी कानिफनाथाची मढी, जि. अहमदनगर येथे दरवर्षी महाराष्ट्रातल्या गोपाळ जमातीच्या जातपंचायतीच्या सभेत या प्रकरणावर गेली पाच वर्षे सतत चर्चा चालू आहे, निकाल लागेपर्यंत त्या जोडप्यास संसार करण्यास बंदी आहे. दुसरे लग्न करून घेण्यासही बंदी आहे.

मुंबईसारख्या ठिकाणी बायको गहाण ठेवून कर्ज काढण्याची प्रथा आजही काही जमातींत चालू आहे.

सत्य-असत्य ठरविण्यासाठी उकळत्या तेलातला पैसा काढायला लावणे; तप्त लाल झालेली लोखंडाची पहार हाताने उचलून दाखविणे अशा प्रकारच्या अग्निपरीक्षेच्या प्रथा या जमातीमध्ये आजही अवलंबिल्या जात आहेत.

प्रस्थापितांपासून संरक्षण व्हावे, आपले अस्तित्व टिकावे म्हणून भटक्या जमातींनी आपले स्वतंत्र तत्त्वज्ञान व स्वतंत्र रितीरिवाज सुरू केले. जीवन

जगण्याची विशिष्ट पद्धत निर्माण केली. प्रत्येक जमातीची वेगळी सांकेतिक भाषा आहे. जीवनाच्या सर्वांगावर नियंत्रण ठेवणारी जातपंचायतीची शासनव्यवस्था निर्माण केली. परंतु स्वरंक्षणासाठी आणि स्वत:भोवती कोष तयार करते व शेवटी त्यातच अडकून ती मरते त्याच प्रकारे या जमाती स्वतःच्या संरक्षणासाठी स्वतः केलेल्या संरक्षणकोषात स्वत:च गुदमरत आहेत.

वैज्ञानिक सुधारणांचा वारसा घेऊन आपला देश २१ व्या शतकात स्वाभिमानाने पदार्पण करण्याच्या मार्गावर आहे तर या जमाती इ. स. पूर्व काळात वावरत आहेत. त्यांतील काही जमाती एवढ्या कमालीच्या आडाणी आहेत की आजही त्या अन्न शिजवून खात नाहीत. देवधर्माच्या कर्मकांडांत एवढ्या अडकलेल्या आहेत की काही जमातीत आजही नरबळी दिल्याने देवता लवकर प्रसन्न होते असे समजतात. या अंधश्रेद्धचे बळी ठरून त्यांनी स्वत.च्या पोटच्या एक ते पाच दिवसांच्या मुलांना समारंभपूर्वक बळी दिल्याची अनेक उदहरणे आहेत.

या जमातींच्या वस्त्या म्हणजे स्वायत्त बेटे किंवा स्वायत्त राष्ट्रकेच आहेत. त्यामुळे आधुनिक भारताचा कोणताच लाभ या मंडळीपर्यंत पोहोचलेला नाही. देशाच्या स्वातंत्र्याला ४३ वर्षे पूर्ण झाली. 'एक माणूस एकमत' हा सिद्धांत आपल्या राज्य घटनेने स्वीकारला. परंतु या जमाती नागरी स्वातंत्र्याच्या पलीकडे राहिल्या आहेत. या जमातोंतील बहुतांशी लोकांची मतदारांच्या यादीत नोंद नाही म्हणून ते मतदांरीच्या हक्कापासून वंचित आहेत. खंडोबाची जेजुरी, जि. पुणे येथे भटक्या जमातीच्या लोकांनी गेल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या मोसमात मतदाराच्या यादीत आपली नावे नोंदविण्याचा प्रयत्न केला. स्थानिक लोकांनी या प्रयत्नास विरोध केला. या भटक्या लोकांना ते जेजुरीचे रहिवासी असल्याचे सिद्ध करता आले नाही. तसे देशातल्या कोणत्याच गावचे ते रहिवासी असल्याचे त्यांना सिद्ध करता येत नाही. कारण ते वर्षातील आठ महिने गावोगाव भटकतात. उरलेले पावसाळयाचे चार महिने जेजुरीत येऊन खंडोबाच्या पायाजवळ विसावतात.या प्रकरणास वृत्तपत्र प्रसिद्धी मिळाली.उपयोग मात्र काहीच झाला नाही मतदांनाचा हक्क मिळण्यापेक्षा जिवंत राहणे व बायकापोरांची अन्न वाचवणे हे या भटक्या लोकांना महत्त्वाचे वाटले म्हणून भटक्यांनी स्वातंत्र्याचा हक्क मिळविण्याचा तो नाद सोडला, अशी प्रस्थापित समाजव्यवस्थेची भटक्या जमातीवर माया आहे. या जमातीसाठी असलेल्या विकासाच्या साऱ्या योजना सुद्धा याच वरवरच्या मायेने राबविल्या जातात. भूहीन, बेघर व दारिद्र्यरेषेखाली असलेल्या भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांपैकी केवळ पाच टक्के लोकांची सुद्धा दारिद्र्यरेषेखाली लोकांच्या शासकीय यादीत नावे नाहीत, हे काय दर्शविते ?

भटक्या विमुक्तांना न्याय मिळावा म्हणून आज चालू असलेली चळवळ म्हणजे त्यांचा स्वातंत्र्य लढाच आहे. गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या

म्हणजे तो आपोआप गुलामीविरुद्ध बंड पुकारेल. या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकीस अनुसरून गेल्या चार-पाच वर्षांपासून आता कोठे भटक्या विमुक्तांची चळवळ मूळ धरत आहे.

भटके विमुक्त व दलित पँथर असा विचार करण्याआधी स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळात, सातत्याने अन्याय, अत्याचार पीडीत असलेल्या या दुर्बल समाज घटकांकडे राज्यकर्ते व समाजकार्यकर्ते यांच्यापैकी कुणीकुणी व कितपत लक्ष दिले आहे हे पहावेसे वाटते.

दि. ३१ मार्च १९३५ रोजी त्यावेळचे मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री. दिवाणबहाद्दूर व्ही. अयंगार म्हणाले– "संपूर्ण जमातच्या जमात गुन्हेगार ठरवून त्यांच्यासाठी अत्यंत कठोर व कडक शिक्षेची तरतूद करणारा हा कायदा न्याय प्रस्थापित करण्यास कितपत उपयोगी ठरेल याबद्दल शंका व्यक्त करण्याचे धाडस मी करीत आहे. या कायद्यातल्या काही तरतूदी अन्यायकारक तर आहेतच परंतु सत्ताधिकाऱ्यांना या कायद्याचा सहज गैरफायदा घेता यावा अशा त्या आहेत. आशा वाटते की येथील सरकार हा कायदा लवकरात लवकर सुधारून या कायद्याखाली विनाकारण भरडल्या जाणाऱ्या लाखो निष्पाप गरीब लोकांना न्याय देईल."

दि. १८ ऑक्टोबर १९३६ रोजी, आंध्रप्रदेशातील नेल्लोरे येथे श्री. व्ही. राघवय्या यांनी आयोजित केलेल्या विमुक्त जमातीच्या परिषदेत बोलताना पंडित जवाहरलाल नेहरू म्हणाले– "काही जमातींच्या समूहांना नागरी स्वातंत्र्य नाकारण्याची राक्षसी तरतूद असलेल्या या गुन्हेगार जमातीकायद्याची मला कल्पना आहे. निर्दयपणाने या कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या कार्यपद्धतीस आणि कायदाच्या पुस्तकातून हा कायद्याच नष्ट व्हावा यासाठी होत असलेल्या न्याय्य प्रयत्नास संपूर्ण भारतात मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळाली पाहिजे. संपूर्ण जमातीच्या जमाती गुन्हेगार असतात असे समजून त्यांचे गुन्हेगार म्हणून वर्गीकरण करणे हे मुळातच चूक आहे. या कायद्याने ठरविलेले गुन्हेगाराचे निष्कर्ष आणि गुन्हेगाराला वागणूक देण्याच्या पद्धती ह्या संपूर्ण तत्त्वज्ञानाची व सुसंस्कृतपणाची पायमल्ली करणाऱ्या आहेत."

व्ही. राघवय्या यांच्या नेतृत्वाखाली या कायद्याविरुद्ध भारतभर संघर्ष चालू असल्याबद्दल, याच वेळी पंडित जवाहरलाल नेहरूंनी समाधान व्यक्त केले होते. ट्राईब जस्टीस, ट्राईब रिहोल्ड, क्रिमिनल ट्राईब्ज अँन्ड नोमॅडिक ट्राईब्ज ऑफ इंडिया वगैरे. पुस्तके लिहून श्री. व्ही. राघवय्या यांनी 'गुन्हेगार जमाती कायद्या' विरुद्ध व या जमातींना न्याय देणाऱ्या भूमिका मांडल्या. यासाठी भारत सरकारने त्यांना 'पद्मभूषण' हा किताब देऊन त्यांचा गौरवही केला होता.

मद्रास उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश १९३८ साली म्हणाले होते, "सुधारणावादी भारताच्या सद्सद्विवेक बुद्धीला दगा देणारे जे काही कायदे

आहेत त्यांच्यापैकी ' गुन्हेगार जमाती कायदा ' हा एक आहे, जो भारतीय न्याय पद्धतीला काळिमा फासत आहे. "

वकील व न्यायाधीश मंडळींनी मिळून तिन्नेवली येथे दि. १४ मे १९३९ रोजी आयोजित केलेल्या विमुक्त जमातींच्या परिषदेत पाठविलेल्या आपल्या लेखी भाषणात न्यायमूर्ती एम. व्ही. सुब्बाराव म्हणतात, " हा गुन्हेगार जमाती कायदा मानवी मूल्यांच्या विरोधी आहे. माणसाला जन्मतः गुन्हेगार समजून कारवाई करणे हे अमानुषपणाचे आहे म्हणून हा कायदा रद्द झाला पाहिजे. "

दिनांक १० ऑक्टोबर १९३९ रोजी देशपातळीवर आयोजित केलेल्या विमुक्त जमातीच्या परिषदेच्या अध्यक्षपदावरून त्यावेळचे बिहार प्रांताचे राज्यपाल श्री. एम. एस. अणे म्हणाले, समाजातील सर्व थरात व सर्व जातीत वाईट प्रवृत्तीचे काही लोक असतात. अशा परिस्थितीत एखाद्या जमातीतील काही लोकांच्या चुकांमुळे ती संपूर्ण जमातच गुन्हेगार जमात म्हणून जाहीर करण्यास आम्ही संपूर्ण विचारांती विरोध केला आहे. केवळ संशयामुळे त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधने आणणाऱ्या जाचक अमानवी निर्बंधाविरूद्ध आम्ही आक्षेप घेतले आहेत. या कायद्यातील कलम २३ ला तर आम्ही कडवा विरोध केला आहे, कारण त्यातील अमानुषतेमुळे संबंधित माणूस अट्टल व सराईत गुन्हेगार होणे अपरिहार्य आहे.

याच परिषदेत अखिल भारतीय हरीजन सेवक संघाचे उपाध्यक्ष ए. व्ही. ठक्कर यांनी सुद्धा या कायद्यावर कठोर टीका केली होती. देशभक्त कोंडा व्यंकटपुय्या यांनीही या कायद्याला विरोध दर्शविला होता. त्यावेळचे न्यायखात्याचे मंत्री डॉ. के. एन. काटजू यांनी तर "काही जमातीत जन्माला आलेल्या अश्राप बालकांना जन्मतःच गुन्हेगार समजणे म्हणजे मानवतेचा व परमेश्वराचा अपमान करणे आहे " असे म्हटले आहे. भारतीय काँग्रेसचे त्यावेळचे अध्यक्ष श्री. पठ्ठाभी सीताराम म्हणाले, " एका संपूर्ण जमातीला कायद्याने गुन्हेगार ठरविणाऱ्या शासनालाच गुन्हेगार म्हटले पाहिजे ".

वकील, न्यायाधीश, देशभक्त व राज्यकर्ते या मंडळीतर्फे स्वातंत्र्य काळात झालेले वरील प्रयत्न लक्षात घेता हा समाज घटक भारतातील आजी माजी राज्यकर्ते व समाज धुरीणांच्या अगदीच डोळआड होता असे म्हणता येणार नाही. तरीही महात्मा गांधी आणि क्रांतीसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांपैकी कोणाच्याही चळवळीने स्वातंत्र्योत्तर काळात या समाज घटकास स्पर्श केल्याचे दिसत नाही.

अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या समाज घटकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्वयंभू, अभ्यासू व लढाऊ नेतृत्व मिळाले. आदिवासी समाज घटकास ठक्कर बापासारखे सेवाभावी नेतृत्व मिळाले. त्यामुळे .या दोन्ही समाज घटकात जागृती

होऊन ज्यांच्यात स्वाभिमान आत्मविश्वास व हक्कांची जाणीव निर्माण होण्यास मदत झाली. भटक्या विमुक्त जमातीचे समाजघटक मात्र नेतृत्वहीन राहिल्यामुळे तो दिशाहीनच राहिला.

स्वराज्यात निवडणुकीचे राजकारण सुरू झाले. अनुसूचित जातींचा समाज-घटक तुच्छ समजला गेला असून तो गावाबाहेर राहत असला तरी त्याला तिथे वाड्या वाडगे आहेत. तो स्थिर असल्याकारणाने त्याला मतदानाचा हक्क प्राप्त झाला आहे. राजकीय पुढाऱ्यांना पाच वर्षाला एकदा का होईना पण त्यांच्यासमोर हात जोडून जावे लागते. गठ्ठा मतांच्या जोरावर हा समाज घटक सौदेबाजीचे राजकारण करू शकतो. त्यामुळे मनात असले तरी 'राजकारणी लोक या समाज-घटकाकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत.

नागरी संस्कृतीपासून अलिप्त असलेल्या आदिवासी जमाती गावापासून दूर डोंगर, दऱ्याखोऱ्यातून रहात असल्या तरी त्या तिथे एकत्र व स्थिर आहेत. तिथे त्यांना निसर्गाच्या सान्निध्यात निदान निष्पाप पशुपक्षांची संगत तर मिळते. भटक्या विमुक्तांना गावोगाव फिरताना पदोपदी मानवी उपेक्षांना तोंड द्यावे लागते. आदिवासीजवळही गठ्ठा मतांचे भांडवल असल्यामुळे राजकारणी लोक त्यांच्याकडे दुर्लक्ष करू शकत नाहीत. त्यांच्याकडे दुर्लक्ष न होण्याचे दुसरेही एक कारण असे आहे की अनुसुचित जाती / जमातीच्या सर्वांगीण उन्नतीसाठी विशेष संधी मिळावी म्हणून त्यांना घटनात्मक संरक्षण देण्यात आले आहे. असे घटनात्मक संरक्षण भटक्या विमुक्त जमातींना देण्यात आलेले नाही. राज्यघटना तयार होत असताना या जमातीची बाजू मांडणारा यांचा वाली कोणच नसल्याचा हा परिणाम असू शकतो.

भिन्न भाषा, भिन्न देवता, भिन्न व्यवसाय, भिन्न आचार-विचार असलेल्या निरनिराळ्या भटक्या विमुक्त जमाती मात्र गावात घर नाही, रानात शेत नाही, प्रतिष्ठित व्यवसाय नाही अशा परिस्थितीत आजही पोटासाठी दाहीदिशा भटकत आहेत. घोर अज्ञान, कमालीचे दारिद्र्य, घातुक व्यसने, वाईट रुढी, परंपरा, जाती अंतर्गत उच्च नीच्चता आणि भटक्या प्रवृत्तीमुळे निर्माण झालेला विस्कळीतपणा या सर्व गोष्टींमुळे पिचलेला हा समाज प्राप्त परिस्थितीला शरण जाणे नव्हे तर त्या शरणागतीचे समर्थन करण्याइतपत तो मेल्या मनाचा बनला आहे.

समता, बंधुता प्रस्थापित करण्याच्या इच्छेपोटी दलित दुबळ्या समाज घटकांच्या सामाजिक संघटना बांधून एकमेकांच्या सहकार्याने पुढे जाण्याचा प्रयत्न करीत असताना त्या संघटनांच्या नेत्यांचे आचार-विचार जरूर महत्त्वाचे आहेत. परंतु ते ज्या लोकांचे नेतृत्व करतात त्या लोकांचे आचार-विचार किती घट्ट व कडवे आहेत हे त्याहीपेक्षा जास्त महत्त्वाचे आहे, असा माझा स्वतःचा अनुभव आहे.

'स्वतःच्या जातीपुरती संघटना निर्माण करण्याचा संकुचित विचार बाजूला ठेवून सर्वच भटक्या विमुक्त जमातींची एक संघटना बांधण्याचा व्यापक विचार व आचार व्हावा' या हेतूने १९६९ ते ७२ या तीन वर्षांच्या काळात वृत्तपत्र लिखाण, कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष भेटी, निरनिराळ्या जमातींच्या सभा, बैठका वगैरे मार्गाने मी सातत्याने प्रयत्न केले. या प्रयत्नांचे फळ म्हणून ९ जाने. १९७२ रोजी मुंबई येथे भटक्या विमुक्तांची राजव्यापी पहिली परिषद होऊन भटक्या विमुक्तांची संघटना स्थापन झाली. या संघटनेच्या महाराष्ट्र कार्यकारिणीचे परीक्षण करताच माझ्या लक्षात आले की कार्यकारिणी सदस्यांपैकी जवळ जवळ ९० टक्के सदस्य माझ्या 'गोंधळी' या एका जमातीचेच आहेत. म्हणजे एका गोंधळ्याने व्यापक विचार घेऊन इतर जातीजमातीचीही संघटना सुरू केली तर तो व्यापक विचार मान्य असलेले गोंधळीच संघटनेत एकत्र येतात. हे जातीव्यवस्थेचे वैशिष्टय अनुभवाने पटले आहे. जातीव्यवस्थेच्या विरोधात समता, बंधुता व मानवतेच्या विचारांचा प्रचार व प्रसार संघटनेच्या माध्यमातून गेली १५ वर्षे केल्यानंतर आजचा अनुभव असा आहे की, मी स्वतः जात मानत नसलो तरी माझ्या कार्यकारिणीतील कांही लोक मी गोंधळी जमातीचा आहे हे विसरू शकत नाहीत. जातीची मानसिकता फेकून दिलीच पाहिजे. त्याला पर्याय नाही. परंतु लोक तुमची जात विसरायला तयार नसतील तर तुम्ही एकट्याने तुमची स्वतःची जात नाकारल्याने जातीव्यवस्थेत फारसा बदल होत नाही.

कोणत्याही चळवळीतील नेते मंडळी स्वतःच्या इच्छेप्रमाणे निर्णय घेऊ शकतात. पण निर्णयाला अनुसरून परिणाम साधणे हे मात्र त्या चळवळील लोकेच्छेवर अवलंबून आहे.

मे १९८२ मध्ये पिंपरी–चिंचवड येथे आमच्या संघटनेचे राज्य अधिवेशन झाले. या अधिवेशनात मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराला पाठिंबा देणारा ठराव मी मांडला. तेव्हा सामान्य लोकांचा प्रश्न असा होता की, डॉ. आंबेडकरांशी किंवा महारांच्या या मागणीशी आपला काय संबंध आहे ? लक्ष्मण माने व मी स्वतः जेव्हा या प्रश्नावर संघटनेचा राजीनामा देण्यास सिद्ध झालो तेव्हा कुठे नामांतराचा ठराव अधिवेशनाने मंजूर केला. आम्ही जिंकलो याचा आम्हाला आनंद झाला. परंतु लोकांना कोंडीत पकडून ठराव मंजूर करून घेतलेल्या विजयाची धाव कुठपर्यंत आहे ते लगेच ध्यानात आले. नामांतरासाठी तुरुंग भरतीचा प्रसंग आला तेव्हा संपूर्ण महाराष्ट्रातून माने-रेणकेसह भटक्या विमुक्त जमाती संघटनेच्या केवळ चार कार्यकर्त्यांनी तुरुंगवास पत्करला होता.

दीड वर्षापूर्वी इचलकरंजी येथे पोलीस व गावकऱ्यांनी मिळून पारधी वस्तीवर हल्ला केला. पारध्यांची घरे बेचिराख झाली. पारध्यांना बेदम मारहाण झाली. प्राण वाचविण्यासाठी केवळ अंगावरील कपड्यानिशी सर्व पारधी रानोमाळ

पळाले. उपाशीपोटी दोन दिवस चालत आलेल्या पारध्यांना कोल्हापुरात माकडवाला जमातीच्या वस्तीत आमच्या संघटनेने आसरा दिला.तेथे त्यांच्या जेवणाची व्यवस्था केली. भुकेने आतडी पिळवटत असताना सुद्धा पारध्यांचे हात माकडवाल्याची भाकरी आपल्या तोंडात कोंबायला तयार नव्हते. पारध्यांच्या लहान मुलाबाळांनी ती भाकरी खाल्ली. परंतु पारध्याच्या मुरब्बी जातपंचायतीला माकडवाल्याची भाकरी खाऊ घालण्यास संघटनेचे नेतृत्व त्या क्षणी अपुरे पडले. पारध्यांनी चुरमुऱ्यांवर रात्र काढली. पारध्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी, पारध्यांत सुधारणा करण्यासाठी पारध्यांचा पाठिंबा हवा असतो म्हणून अशा प्रसंगी मूलभूत मतभेदावर भांडणाचे अंकाडतांडव करण्यात शहाणपणा नसतो हे उदाहरणादाखल झाले.

लोकांचा पाठिंबा असल्याशिवाय चळवळ चालविता येत नाही. तसे पाहिले तर राज्यकर्त्यांना सुद्धा लोकांचा पाठिंबा हवा असतो. राजकीय पुढाऱ्यांत आणि सामाजिक चळवळ करणाऱ्या संघटनांच्या नेत्यांत फार मोठा फरक आहे. राजकीय पुढाऱ्यांना लोकांचा पाठिंबा पाच वर्षाला निवडणूक प्रसंगी हवा असतो. चळवळीतल्या कार्यकर्त्यांना लोकांचा पाठिंबा रोजच हवा असतो. धर्म जातीच्या भावनात्मक प्रश्नाला हात घालून गठ्ठा मते मिळविण्याचा प्रयत्न राजकीय पुढारी करू शकतो. तसे ते करतातही. जाती व्यवस्थेला विरोध करीत असताना जातच विरोधात जाऊन आपलेच मूळ उपटले जाणार नाही याची काळजी सामाजिक चळवळीतल्या कार्यकर्त्यांना घ्यावी लागते. कारण स्वतःच्या जातीने टाकून दिले तर दुसऱ्या जातीची माणसे काय करतील याचा विश्वास नसतो.

**– बाळकृष्ण रेणके**
C/o आर. के. पवार
६८, उत्तर कसबा, सोलापूर–४१३ ००२

●

निबंध 3836
२८४९५
७/७/८९

# ‘ रिपब्लिकन ऐक्य आणि मी ’

– प्रा. जोगेंद्र कवाडे

महाराष्ट्रात फार मोठ्या संख्येने दलित समाज रहात आहे. देशातील इतर भागात रहात असलेल्या दलित समाजापेक्षा तो अधिक संघर्षप्रिय आहे. याचे कारण म्हणजे महाराष्ट्राला लाभलेली फुले–आंबेडकरांची क्रांतिकारक पार्श्वभूमी ही होय. १९९० हे वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी वर्ष व म. फुले स्मृतीशताब्दी वर्ष असल्यामुळे दलित समाजामध्ये एक प्रचंड क्रांतिकारी जाग निर्माण झाली. पण चळवळीचे चित्र मात्र निराशाजनक आहे.

राखीव जागाना देशभरातून होणारा तीव्र विरोध, हिंदुत्ववादी संघटनांची होणारी प्रचंड एकजूट, दलित संघटनेतील गटबाजी आणि दलित माणसावर वाढत्या प्रमाणावर होणारे अन्याय–अत्याचार यामुळे दलित तरुणांत एक संतापाची लाट उसळू लागली आहे. महाराष्ट्रात एवढ्या मोठ्या प्रमाणात दलित समाज असूनही, त्यांच्यातील अंतर्गत हेवेदावे आणि वैयक्तिक स्वार्थामुळे ग्रामपंचायत, नगरपालिका ते विधानसभेपर्यंत त्यांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणात निवडणुकातील जागा जिंकता आल्या नाहीत. याचे प्रमुख कारण म्हणजे दलित संघटनेत असणारी गटबाजी. १९८९ मधील लोकसभा निवडणुकीमध्ये दलित राजकारणाची दारुण पिछेहाट झाली. त्यामुळे संपूर्ण समाजात असुरक्षिततेची भावना वाढीला लागली.

शिवसेनेच्या बाळासाहेब ठाकरेंनी विधानसभेवर भगवा झेंडा फडकविण्याची घोषणा केली. शिवसेनेचा जोर वरचेवर वाढू लागला. शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाची युती यामुळे हिंदुत्ववादी प्रवृत्ती अधिक आक्रमक बनल्या. काँग्रेसमध्येही नैराश्येचे वातावरण निर्माण झालेले आहे. जनता दल नवा पक्ष म्हणून उभा राहिला. लोकसभेच्या निवडणुकीत कोण जिंकणार ? कोण हरणार ? याचे निश्चित भाकित करता येत नव्हते. एकीकडे काँग्रेस तर दुसरीकडे जनता दल असे दोन पर्याय मतदारांपुढे होते. या दोन्ही पक्षांनी राष्ट्रीय एकात्मता महत्त्वाची मानली होती. भा. ज. प. ने बाबरी मशिद, श्रीराममंदिराचा प्रश्न उभा करून हिंदुत्ववादी प्रचाराला सुरुवात केली. हिंदुत्ववादाचे वाढते आक्रमण भारतीय राजकारणाला ग्रासून टाकत होते. या पार्श्वभूमीवर दलित संघटनांचे ऐक्य नव्हते. ह्याचे परिणाम १९८९ च्या लोकसभा निवडणुकीमध्ये दलित नेत्यांची वाताहात होण्यात झाली. या परिस्थिती बद्दल दलित समाजामध्ये चीड निर्माण झाली होती. याचीच प्रतिक्रिया म्हणून मुंबईतील चेंबूर येथील ९ दलित तरुणांनी आमरण उपोषणाला सुरुवात केली. याची प्रतिक्रिया म्हणून अमरावती, औरंगाबाद, नागपूर या ठिकाणींही या उपोषणाचे लोण पोहचले. जोपर्यंत दलित नेते ऐक्याच्या छावणीत येत नाहीत, तोपर्यंत उपोषण सोडावयाचे नाही, असा निर्धार या तरुणांचा होता. या उपोषणामुळे दलित समाजामध्ये ऐक्याच्या भावनेला वेग आला.

उपोषणाच्या चवथ्या दिवशी प्रमुख दलित नेत्यांनी लेखी हमी दिल्यामुळे हे उपोषण संपले.

ऐक्याच्या वाटाघाटी जोरदारपणे चालू असताना उमाकांत रणधीर या पँथर नेत्याने दलित पँथर कायम राहील अशी घोषणा एका पत्रकाद्वारे जाहीर केली. या घटनेचे इतके तीव्र पडसाद उमटले की, या नेत्याला दलित तरुणांनी मारहाण केली आणि त्याला पळवून नेले, " ऐक्याच्या विरोधी कोणी भूमिका घेतल्यास त्याचे आम्ही हातपाय तोडू " अशी संतप्त भावना दलित तरुणात वाढत होती. याची तथा-कथित नेते मंडळींना भीती वाटू लागली.

१९ डिसेंबर १९८९ चा सूर्य मावळतीला जात असताना रिपब्लिकन ऐक्य उदयास आले. एकूण १३ पक्षगट व संघटना विसर्जित करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या भारतीय रिपब्लिकन पक्षाची घोषणा करण्यात आली. या पक्षात भारतीय रिपब्लिकन पक्षाचे ॲड. प्रकाश आंबेडकर, भारतीय दलित पँथरचे रामदास आठवले, रिपब्लिकन पार्टी इंडियाचे रा. सु. गवई, मास मुव्हमेंटचे राजा ढाले, रिपब्लिकन पार्टीचे बी. सी. कांबळे, दलित पँथरचे नामदेव ढसाळ, भाई संगारे, रिपब्लिकन पार्टी खोबरागडे गटाचे राम टेके, महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे बा. को. गाणार, बंडखोर रिपब्लिकन ऐक्यवादी चळवळीचे काकासाहेब खंबाळकर आणि सिद्धार्थ कॉलेज चेंबूर येथील उपोषणकर्ते दलित युवक यांच्यासह

प्रत्येक संघटनांच्या दोन प्रतिनिधीबरोबर ऐक्याच्या बैठकीस सुरुवा
रणरणते उन आणि हजारोंच्या संख्येने उपस्थित असणारा दलित स
घोषणेची वाट पहात होता. या दिवशी ऐक्याची घोषणा झाली नसती तर बाहेरच्या जमावाने नेत्यांना अक्षरश: मारले असते. हे ऐक्य केवळ राजकीय पक्ष गटांचेच नव्हे तर सामाजिक संघटनांचेही झाले होते. या ऐक्यामागे दलित जनतेचा प्रचंड रेटा होता. याच दिवशी आम्हा सर्व नेत्यांची ऐक्याच्या बाजूने भाषणे झाली. या ऐक्याच्या बैठकीला ज्या संघटनेचे नावही माहीत नाही. अशा संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. दलित पँथर, मास मुव्हमेंट, दलित मुक्तीसेना अशा संघटनांचा प्रचंड अनुयायी वर्ग होता. नगण्य संघटना व अशा मान्यता प्राप्त संघटना यांना या ऐक्याच्या बैठकीत सारखेच प्रतिनिधित्व देण्यात आले होते. ही एक असमाधानाची बाब होती. ऐक्याच्या निर्णयानंतर भारतीय दलित पँथरचे नेते रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली सर्व पक्षांची व संघटनांची अस्थायी समिती नेमण्यात आली. दलित मुक्ती सेना ही संघटना बरखास्त करून व दलित, मुस्लीम अल्पसंख्यांक सुरक्षा महासंघाचे संबंध संपुष्टात आणून मी या ऐक्याच्या प्रक्रियेत सामील झालो. मी आणि प्रकाश आंबेडकर एका बाजूने विचार करीत होतो व दुसऱ्या बाजूने रामदास आठवलेंचा गट वावरत होता आणि ऐक्याच्या समितीमध्ये रामदास आठवले गटाचे प्रतिनिधी जास्त होते.

१९ डिसेंबर १९८९ च्या बैठकीनंतर २५ व २६ डिसेबर १९८९ रोजी गोरेगावच्या आरे मिल्क कॉलनीत न्यूझीलंड हॉस्टेल या निवांत स्थळी फक्त नेत्यांची बैठक घेण्यात आली. त्या बैठकीत पक्षाचे नाव, नेता, घटना, झेंडा कार्यक्रम याविषयी सविस्तर चर्चा झाली. या बैठकीला सर्व गट, पक्ष संघटनांचे नेते उपस्थित असताना अध्यक्षस्थानी मात्र रामदास आठवले हे होते. नव्या पक्षाच्या स्थापनेच्या संदर्भात श्री. एस. एम. जोशी व डॉ. राममनोहर लोहिया यांना उद्देशून डॉ. आंबेडकरांनी लिहिलेल्या पत्राच्या आधारावरच पक्षाची बांधणी होणार असे ठरत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या खुल्यापत्रातील मुद्दे नव्या रिपब्लिकन पक्षाचा पाया म्हणून स्वीकारण्यात आले.

१) विषमता असलेल्या समाजात लोकशाही येताना हिंसा घेऊन येते. आपल्याला हिंसा टाळण्यासाठी समतेची कास धरायला हवी.
२) प्रबळ विरोधी पक्ष हवा.
३) कायद्यासमोर सर्व समान.
४) संविधानात्मक नीतीवर भर.
५) बहुसंख्यांकाच्या लोकशाहीच्या नावाखाली अल्पसंख्यांकांची गळचेपी नको.
६) नीतिमान राजकारणाचा आग्रह.
७) सार्वजनिक विवेकबुद्धी.

हे या खुल्या पत्रातील मुद्दे आहेत.

नवे ऐक्य हे केवळ नवबौद्ध समाजाचे ऐक्य नाही, तर सर्व सर्वहारा समाजाचे ते ऐक्य आहे अशीच आमची भावना आहे. जाती मोडायला, गाडायला आम्ही निघालेले आहोत. जातीव्यवस्था जाळण्यासाठी आमचे आंदोलन आहे. आमचे ऐक्य जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी आम्ही समर्थ माणसे आहोत. नामांतर आणि मंडल आयोगांचा समावेश काँग्रेस आणि जनतादल यांच्या निवडणूक जाहीरनाम्यामध्ये करण्यात आला, तो केवळ आमच्या विराट ताकदीमुळेच.

माननीय पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंह यांनी नवबौद्धांना सवलती जाहीर केल्या, त्या आमच्या ऐक्याच्या वादळी हालचालीमुळेच. नवबौद्धांच्या सवलतीचा प्रश्न अनेक वर्षांपासून केंद्राकडे पडून होता. पण आज तो चुटकीसरशी सुटला आहे. रामदास आठवले, प्रकाश आंबेडकर व रा. सु. गवई यांची सुकाणू समिती निर्माण करण्यात आली व बी. सी. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली पक्षाच्या घटनासमितीची नियुक्ती करण्यात आली. या ऐक्याच्या प्रक्रियेत दलित पँथर या संघटनेचे अस्तित्व कायम असावे असा रामदास आठवले यांचा प्रयत्न होता. पँथर संघटनेला नव्या पक्षाच्या युवक आघाडीचा दर्जा द्यावा, असा पँथर नेत्यांचा आग्रह होता. असे झाले असते तर सर्वच छोटचा मोठचा संघटनांनी पुन्हा आपले अस्तित्व कायम राखण्याचा आग्रह धरला असता म्हणून आम्ही सर्वांनी सर्व संघटना बरखास्त केल्या.

महाराष्ट्रात शिवसेनेच्या दहशतवादाला चोख उत्तर आंबेडकरी जनताच देऊ शकते. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुका अगदी तोंडावर आल्या असल्यामुळे या ऐक्याच्या प्रक्रियेला अधिक गती आली हे खरे असले तरी केवळ राजकीय उद्दीष्टाने हे ऐक्य झाले नाही. तर फुले आंबेडकरांचा सर्वंकष क्रांतिकारी विचार हा आमच्या ऐक्याचा आधार आहे. विधानसभेची निवडणूक ही एक लढाई आहे. अजून किती तरी लढाया आम्हाला लढवावयाच्या आहेत. येत्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात शिवसेना आणि भा. ज. प. युतीचा पराभव जो पक्ष करु शकतो त्याच्याशीच निवडणुक युती झाली पाहिजे. हिंदुत्ववादी, फॅसिस्टांशी आम्ही कदापी युती करणार नाही. आमचा रिपब्लिकन पक्ष अधिक व्यापक, लोकशाही आणि सामाजिक न्यायावर विश्वास असलेला आहे. आमच्या ऐक्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणावर निश्चितच परिणाम होणार आहे. भारतातील सत्ताधारी पक्ष असो वा विरोधी पक्ष असो, त्यांनी नेहमीच दलित जनतेला वापरले आहे. ३३ वर्षांच्या फाटाफुटीमुळे विखुरला गेलेला दलित समाज आज पुन्हा एकदा एकत्र आला आहे. या समाजात नवचैतन्य निर्माण झाले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जन्मशताब्दी डोळ्यावर असताना हे सर्व घडत आहे.

नवीन रिपब्लिकन पक्ष निवडणुका लढविणार अशी घोषणा झाली. पण या निवडणुका स्वतंत्रपणे लढवावयाच्या की अन्य पक्षांशी युती करावयाची हे ठरत

नव्हते. या नव्या पक्षाचे अधिवेशन ५ व ६ जानेवारी १९९० रोजी अलोट गर्दीत मुंबई येथे पार पडले. अनेक ठिकाणांहून या अधिवेशनाला माणसे आली होती. लाखो लोकांची यात्रा या अधिवेशनास जमली होती. सर्वच थरांतून या ऐक्याचे उत्स्फूर्त स्वागत झाले होते. सर्वत्र आनंदी, उत्साही आणि मैत्रीचे वातावरण निर्माण झाले होते. वृत्तपत्रांनीही या ऐक्याची मोठी दखल घेतली.

विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. प्रत्येक पक्ष आपल्या उमेदवाराची यादी जाहीर करीत होते. काँग्रेसने, जनता दलाने आपापले उमेदवार जाहीर केले होते. पण रिपब्लिकन युती कोणाशी करावयाची हे ठरत नव्हते. रामदास आठवले गट हा काँग्रेसशी युती करू इच्छित होता. तर मी व प्रकाश आंबेडकर जनता दलाच्या बाजूने जावे या विचाराचे होतो. एक तर केंद्रात जनता दलाची सत्ता आली होती. काँग्रेसचे सत्तांतर झाले होते काँग्रेसला ओहोटी लागली होती. व्ही. पी. सिंगांनी नवबौद्धांना सवलती जाहीर केल्या होत्या. पुरोगामी वातावरण जनता दलाच्या बाजूने होते. पण योग्य वेळी युतीचा निर्णय घेता आला नाही. शरद पवार विधानसभेच्या निवडणुकीची चर्चा करण्यासाठी दिल्लीत थांबून होते. त्यामुळे त्यांच्याशी चर्चा करणे अवघड झाले होते. निवडणूक नामनिर्देशनपत्रं भरण्याची तारीख जाहीर झाली होती आणि अतिशय अस्वस्थ वातावरण सर्व नेत्यांमध्ये पसरले होते. रामदास आठवलेंनी अस्थायी समितीच्या बैठकीत काँग्रेसशी युती करण्याचे जाहीर केले. आठवले गटाचे प्रतिनिधी जास्त असल्यामुळे त्यांच्या या युतीला मान्यता मिळाली. पण मी, प्रकाश आंबेडकर या युतीपासून दूर राहिलो. जनता दलाने सर्वच जागेवर आपले उमेदवार जाहीर केल्याने त्यांच्याशी युती करणे अवघड झाले होते. २ फेब्रुवारी १९९० रोजी निवडणूक युतीच्या कारणावरून ऐक्य झालेल्या रिपब्लिकन पक्षात पुन्हा एकदा गट पडल्याची बातमी आकाशवाणी आणि वृत्तपत्रांनी ठळकपणे दिली. जनता दलाशी युती न झाल्यामुळे निवडणूक प्रक्रियेत भाग न घेता केवळ पक्ष बांधणीचे कार्य करावयाचे असा निर्णय प्रकाश आंबेडकर यांनी घेतला. आम्ही दोघे एकत्रित होतो. रा. सु. गवई मात्र तटस्थ राहिले.

विधानसभा निवडणुका काँग्रेस आणि रिपब्लिकन युतीने एकत्रितपणे लढविल्या. दुसऱ्या बाजूला शिवसेना आणि भाजप युती होती, तर तिसरा पक्ष म्हणून जनता दल होता. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसशी युती करूनही रिपब्लिकन पक्षाचा एकदेखील उमेदवार निवडून आला नाही. रिपब्लिकन पक्षाला पुन्हा एकदा पाणी पाजले. पण काँग्रेसला पाठिंबा दिला असल्यामुळे व निवडणूक जाहीरनाम्यात काँग्रेस रिपब्लिकन युतीचे सरकार सत्तेवर असेल असे आश्वासन शरद पवार यांनी दिल्यामुळे आठवले गट रिपब्लिकन पक्षाला सत्तेत सहभागी करून घेण्यात आले. निवडणुकीच्या काळात रामदास आठवले यांनी दलितांना

मुख्यमंत्रीपद द्यावे अशी मागणी केली होती. पण निवडणुकीत केवळ १४ जागावर यांना तडजोड करावी लागली. जनता दलाने मात्र रिपब्लिकन पक्षाने प्रस्तृत केलेला निवडणूक जाहीरनामा तत्वत: मान्य केला होता.

श्री. शरद पवार यांनी आठवले गटाचे श्री. टी. एम. कांबळे यांना विधान परिषदेत स्वीकृत सदस्य म्हणून घेतले.

मा. रामदास आठवले यांना विधान परिषदेचे सदस्यत्व देऊन समाजकल्याण मंत्रीपद दिले. रिपब्लिकन पक्ष युतीच्या प्रक्रियेतली ही शेवटची फलनिष्पत्ती. रामदास आठवले आणि त्यांचे कार्यकर्ते हे सत्ताधारी पक्षाच्या बाजूने उभे आहेत. तर आम्हीही रिपब्लिकन पक्षामध्येच आहोत. पण दलित जनतेच्या प्रश्नांच्या बाजूने उभे आहोत. ( शब्दांकन – **अरुण म. कांबळे**, वार्शी, सोलापूर)

**– जोगेंद्र कवाडे**

सा. जयभीम
वरचा माळा, धनवटे चेंबर्स
सिताबर्डी, नागपूर ४४० ०१२

●

# दलित स्त्री संघटना आणि मी

**– उर्मिला पवार**

आम्ही दोघी मैत्रिणींनी दलित महिलाची संघटना बांधायचं ठरवलं. फक्त दोघींनी पुढे व्हायचं म्हणजे. . . चेष्टा नव्हती, पण फुले-आंबेडकरांच्या विचारांचा ध्वज खांद्यावर होता नि टिळक-आगरकर हे द्वय समोर होते. पुढे दोघींच्या पाचजणी झालो तेव्हा नेपोलियन बोनापार्टला फक्त पाच मित्र मिळाले आणि त्यानं जग हादरवलं वगैरे फार फार उदात्त गोष्टी मनात होत्या. पाच पैकी आम्ही चौघीजणी नोकरी करणाऱ्या त्यामुळे सुट्टीच्या दिवशी महिलांना भेटायचं, त्यांच्या कानावर संघटनेचा उद्देश वगैरे टाकून त्याचं काय सहकार्य व सहभाग मिळवायचा असं ठरलं. प्रचाराची वेळ सकाळ व संध्याकाळ निश्चित झाली. ओळखीच्या बायकांना सांगितलच होतं फक्त अनोळखी उंबरठे झिजवायचे होते.

एका रविवारी घरातलं लवकर आवरून आम्ही चौघी एका बाईच्या दारात उभ्या राहिलो. बऱ्यापैकी कपडयातल्या आम्हा शिक्षित बायकांना बघून बाई गडबडली, स्वयंपाक अर्धवट टाकून ती दारात उभी होती. आत या एवढंही सौजन्य दाखवत नव्हती. अर्धं लक्ष आत नि अर्धं लक्ष बाहेर अशा पावित्र्यात ती उंबरठयावरून म्हणाली, तुमचं काय काम असेल ते ' हे ' आल्यावर करतील तुम्ही

दुपारी या. बाई, आमचं तुमच्याकडेच काम आहे. आम्ही दलित स्त्रियांची संघटना काढतो आहोत. . .

आता नको ! तुम्ही 'हे' असतानाच या असं म्हणून घाबऱ्या घाबऱ्या त्या बाईने आमच्या तोंडावरच दरवाजा लावून घेतला. आता काय करायचं ? अशा अर्थानं आम्ही एकमेकींच्या तोंडाकडे पाहू लागलो. आमचं असंही ठरलं होतं की एका घरात आपण गेलो की तिथे आपल्यापैकी असलेल्या दुसऱ्या घरांची चौकशी करायची नि पुढे सरकायचं. आपल्यापैकी घर म्हणजे अे पी. आणि दुसऱ्यापैकी घर म्हणजे डी. पी. अशी आमची कोड लँग्वेजही ठरली होती. पण इथे अे. पी. बाईने दार लावून आमचा तो मार्गच बंद केला. आम्ही मग आणखी एक सोपा मार्ग निवडला. दार ठोठवायचं नि मग आत गौतमबुद्ध, बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमा दिसल्या की चक्क घरात घुसायचं.

आम्ही फुले, आंबेडकर प्रतिमा बघून एका घरात घुसलो. घरवाली पुढे आली, पाठोपाठ घरातली लहानथोर मंडळी आली नि त्यांच्यासमोर आम्ही आमची टेप सुरू केली.

बाई, आम्ही दलित महिलांची संघटना काढतो आहोत. आपल्या समाजातील स्त्रियांसमोर अज्ञान, अशिक्षितपणा, अंधश्रद्धा जातीयता रोजगार असे अनेक प्रश्न आहेत, ते प्रश्न आमचे आम्हीच सोडवायचे आहेत. त्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन लढा देणं आवश्यक आहे. . . आम्ही सांगत होतो नि समोरची मंडळी श्रवण भक्तीने ऐकत होती.शेजारची काही शाळकरी पोरं नि म्हाताऱ्या बायकाही दारातून खिडकीतून डोकावत होत्या. श्रोते बरे भेटले म्हणून आम्हालाही हुरुप आला. आम्ही पुढे चालू ठेवलं . . . . आपले बाबासाहेब म्हणाले, समाजाचं ऋण विसरू नका, समाजासाठी आपल्या मिळकतीचा १ / ८ भाग द्या. शिका, संघटीत व्हा नि संघर्ष करा . . . .आमचं बोलणं चालूच होतं. मध्ये कुणी बोलत नव्हतं. अगदी हूं की चूं नव्हतं. आता समोरच्या श्रोत्यांमध्ये काही तरुण मुलं, मुलीही दिसत होती. म्हणून आम्ही तरुणांच्या कर्तव्याबद्दल बोलू लागलो.शेवटी आमचा तिघी-चौघींचाही परिचय दिला व समारोप करीत म्हटलं, सांगा आता तुम्ही आमच्या संघटनेच्या सभासद होणार की नाही ? सर्वांनी आनंदानं माना डोलावल्या. आमचे ऊर भरून आले.

एक म्हातारी पुढे आली नि म्हणाली, " बाई, तुमी लई ग्वाड ग्वाड काम काढलया हे बगा. ह्यो रमेस, ह्यो अशोक, त्यो अमुक, त्यो तमुक, ती सुजाता या आमच्या पोरास्नी घ्या तुमच्या ताब्यात आन् लावा नोकरीला. "

बाई, आमची संघटना, नोकरी वगैरेसाठी नाही. आम्ही महिलांचा विकास होण्यासाठी . . . .

फुरं फुरं लई आल्या इकास करनाऱ्या. चलारं असं म्हणून म्हातारीनं एकदम आमच्याकडे पाठ फिरवली, कोंबडी हाकलावी त्या आविर्भावात सर्वांना हाकलले.

अहो पण ! ऐका तरी . . . . काय ऐकायचं, आँ ? काय सांगताय ? बाई नुसत्या भाषनांनी पॉट नाय भरत, इकास नाय व्हत. जावा तुमी . . . . म्हातारी आमच्याकडे वळली नि तिनं आमाला दाराबाहेर काढलं.

सुरुवातीलाच ही नकार घंटा ऐकून आम्ही थोडया अस्वस्थ झालो पण चिकाटी ठेवून वागायचं ठरवलं. दोनच घरं घेऊन जेवायला घरी गेलो. दुपारचे दोन वाजले होते. कडाक्याचं ऊन होतं. जीव अगदी घावरा झाला होता. भूकही विलक्षण लागली होती, पण घरात पाऊल टाकलं नि घरच्यांनी तोफ डागली,

" काय करत होतीस एवढा वेळ ? कुठले उकिरडे फुंकायला गेलीस ? घरात जेवणाचं काय ? घरात काय हवं नको ते बघणार कोण (तुझा बाप ? )" कंसातलं सुरुवातीला मनातच होतं.

" अहो पण सकाळी मी सर्व जेवण केलंय . . . . ". " त्याला काय जेवण म्हणायचं ? आज रविवार . . . . जेवायचं काय, बटाटयाची भाजी ? असं असेल तर बास झाल्या तुमच्या संघटना बिगटना . . . . "

पहिल्याच दिवशी संघटनेचा असा मुहूर्त झाला दुपारी आम्ही परत घराबाहेर पडलो. म्युन्सिपल चाळीत अे. पी. बरेच म्हणून तिकडे मोर्चा वळवला. चाळीत शिरताना वाटलं " स्वच्छता " एवढाच संघटनेचा उद्देश ठेवावा.

तळमजल्यावर प्रवेशद्वाराशी बघूनच लोक विचारू लागले, कोण पाहिजे ? काय पाहिजे आम्ही आमचा उद्देश तिथेच सांगितला. जिन्याजवळ बसलेला पांढऱ्या कपडयातला एक लठ्ठसा मध्यमवयीन माणूस उठून पुढे आला. तोंडातला पानाचा तोबरा चघळत नुसते हातवारे करीत थांबा म्हणाला. नि बाजूच्या भिंतीवर थुंकला नि आमच्याकडे वळून डोळे मिटून बोलू लागला, 'त्याचं काय हाय,आमच्या हितं मैलांची रग्गड मंडळं हायत पण कुनाचा पायपोस नाय कुनात.त्यांच्या आयला, बायकांच्या कलागती आन् भांडणंच फार. का रं नाम्या, परवा हाळदीकुंकवात बायांनी काय केलं ते सांग ह्यानला' असं म्हणून तांबडे दात दाखवीत तो खी खी करून हसला. नाम्या पुढे सरसावला. आम्ही म्हंटलं, ते राहू दे पण या महिलांना आम्ही भेटणार. कुठे आहेत त्या ?

'दोन चाळी पल्याडल्या चाळीत मैतीला गेल्यात' आम्ही एकमेकींच्या तोंडाकडे पाहू लागलो. एकजण म्हणाली,चला आपण तिकडे जाऊ. आम्ही वळलो तर पांढऱ्या कपडयातला माणूस म्हणाला,बाई तिकडं लई कालवा हाय तुम्ही कशाला जाताय? मागनं कवातरी या जावा. आमचा नाईलाज झाला. आम्ही परत फिरलो आणि जवळच्या कॉलनीत शिरलो,बिल्डींग खाली शिरून उभं राहून रहिवाशांच्या नावाची पाटी वाचू लागलो. पाटील, तांबे, कामत, सहस्रबुद्धे,जोशी, बर्वे, दाभोळकर. . . .

ही डी. पी. ची वस्ती दिसतेय. एक मैत्रीण म्हणाली. तांबे ए. पी. तही आहेत. बहुतेक हे सुद्धा ए. पी. असावे बघुया का ?

हो, हो चल म्हणत चार जिने चढून धापा टाकत आम्ही वर आलो, बेल दाबली. आयपिसमधून कुणीतरी पाहिलं. कोण पाहिजे या अशा अर्धवट स्वागताची कल्पना केली नव्हती म्हणून जरा गडबडलो. लगेच सावरत म्हटलं, आम्ही दलित स्त्रियांची संघटना काढत आहोत, त्याबद्दल बोलायचं आहे.

एवढं ऐकताच साखळी काढून तिने घाबऱ्याघाबऱ्या आम्हाला आत घेतलं नि पटकन दरवाजा लावून घेतला. बसा म्हणत ती आत गेली. आम्ही घर निरखू लागली. उंची फर्निचर, रंगीत टी.व्ही., फोन वगैरे थाट होता पण फुले, आंबेडकर दिसत नव्हते.

पाण्याचे ग्लास घेऊन बाई आली. स्थूल, गोरी, घरातही चांगली साडी नि ठसठशीत दागिने, अंगावर म्हणाली, " हं, बोला आम्ही आमची टेप सुरू केली. बाईचं लक्ष नव्हतं. मध्येच ती म्हणाली, पण तुम्हाला कसं कळलं आमचं घर तुमच्यापैकी आहे ?" "आम्ही अंदाजानं ओळखलं." "छे हो, आमच्या नांवावरून नि दिसण्यावरून कुणी कल्पनाही करत नाही की आम्ही असे आहोत म्हणून . . . आम्हाला तर इथे कोब्रा समजतात. माझी मैत्रीण हळूच म्हणाली " कोब्रा म्हणजे, काय ?" "कोकणस्थ ब्राह्मण" मी कुजबुजले. " इश्य, मला वाटलं साप की काय, असं म्हणून मैत्रीण खुदूखुदू हसली. बाई आपल्याच नादात आपलं उच्चभ्रू सवर्ण दिसणं चघळत होती. तिला अडवत आम्ही संघटनेचं घोडं पुढे दामटू लागली.

शेवटी कंटाळून उठू लागलो तशी बाई म्हणाली, अहो, प्रत्येकाने आपापला उत्कर्ष साधावा, हो की नाही ? व्यक्ती मिळून समाज नि समाज मिळून देश हो की नाही ? म्हणूनच प्रत्येकानं आपलं पहावं " मोठं तत्त्वज्ञान सांगितल्यासारखं बोलून बाई खुशीत हसली.

" पण बाई, बाबासाहेबही असंच म्हणाले असते तर आज आपण कुठे असतो? आमच्यापैकी कुणीतरी म्हणालं नि बाई जराशी वरमली. तेवढ्यात आणखी एक वार करत मी म्हटलं, तुम्ही म्हणता ते बरोबर आहे बाई. काही माणसं स्वतः पुरतंच बघतात. आडनावं बदलतात, जात लपवतात. . . पण अशा कृतीनं समाजातल्या दलित पीडितांचं दुःख दूर होतं का ? त्यांच्या स्थितीत परिवर्तन येतं का ? ही लपून राहाण्याची किंवा परिस्थितीपासून पलायन करण्याची वृत्ती चांगली का ? "

बाई अस्वस्थ झाली. चुळबुळू लागली. आम्ही उठलो, म्हटलं हा आमचा पत्ता, या पत्त्यावर दर शनिवारी दुपारी तीन वाजता आम्ही भेटतो, तुम्हाला वाटलं तर तिथे या. उठताउठता बाईकडे चौकशी केली. आपल्यापैकी आणखी कोणकोण आहेत इथं? बाईनं खडा न् खडा माहिती दिली तीही आडनावं बाईसारखीच होती बदललेली.

आभार मानून खाली आलो. मैत्रीण म्हणाली, पहिलंत त्या बाईला इतरांविषयी व्यवस्थित माहीत आहे पण तिला वाटतयं आपल्याबद्दल कुणालाच माहिती नाही.

तिथले आणखी चार जिने चढलो. त्या बाईंच्याच वृत्तीच्या आणखी काहीजणी मिळाल्या. अे. पी. निश्चत करताना बुद्ध, आंबेडकरांसाठी नजर भिंतीवर भिरभिरली. काहींनी बुद्धप्रतिमेऐवजी पद्मपाणी शोपीस म्हणून भिंतीवर लटकावलेला. काहींच्या टेबलावर कुंडीत दिसेल न दिसेल अशा बेताच्या बुद्ध, आंबेडकरांच्या इवल्याशा मुर्ती ठेवलेल्या. कुणी विणकाम, भरतकामात दोघांना गुंतवलेले. तो गुंफण दाराआड किंवा शोकेसमध्ये ठेवलेली. थोडक्यात दर्शनी भागी हे जातीदर्शक फोटोत दिसतील अशी अतीदक्षता घेतलेली दिसत होती.

संध्याकाळी दमूनभागून घरी आले तर कर्जतहून कुणीतरी भाषणासाठी निमंत्रण ठेवून गेलेले त्यामुळे घरातलं सकाळचं वातावरण अधिकच तापलेले. थोड्या वेळानं सकाळसारखी तणतणीही झाली, पण मी मुक्या–बहिऱ्याची भूमिका घेतली म्हणून निभावलं. समाजकार्य करायचं तर हे आधी यायलाच हवं.

निमंत्रण लांबचं होतं. कार्यक्रमही सावकाश होता, जायचं निश्चित केलं नि तसं त्यांना कळवलं त्यानिमित्तानं चार स्त्रियांशी संपर्क साधून संघटनेची माहिती तिथपर्यन्त पोहोचवता येणार होती. मधल्या काळात ओळखीच्यांशी संपर्क चालूच ठेवला. बऱ्याच जणी आवडीनं सहभाग घ्यायला तयार झाल्या.

दोघीतिघींनी चिडून आमचीच हजेरी घेतली, म्हणाल्या, " आपले एवढे पुढारी करतात तेच तुमी पण करणार काय ? नुसत्या वर्गण्या मागायच्या नि जनतेच्या पैशावर मजा मारायची. " काहींनी " निराश, हताश स्वरात आम्हीही एकेकाळी असली कामं केली नि अखेरीस हात टेकले. तुमच्यानं सुद्धा काही होणार नाही, " " असं भविष्य वर्तवलं. काहींनी तर " तुमची संघटना वाऱ्यावर उडून जाणार अशी शापवाणीही वर्तवली.

उडदामाजी काळे गोरे तशा काही आशावादी व्यक्तीही भेटल्या. चांगले करताय. अशा संघटनेची आवश्यकता आहेच. पुढे चला, काही लागलं सवरलं तर सांगा, आम्ही मदतीला आहोत, असा दिलासाही बऱ्याच जणांनी दिला आणि उत्साहानं कामाला लागलो.

कर्जतला भाषणाला जाताना स्त्री म्हणून एक अडचण आली. थोडा त्रासच झाला. घरून सकाळी स्पशेल कारने निघालो. वाटेत दोघा-तिघांना घेतलं. पाच-सहा तास गाडीत बसून कंटाळा आला. त्यात एक नंबरला जायचं होतं. शाळेत असताना ठीक होतं. करंगळी वर करून सांगता येत असे अगदी बिनदिक्कत, पण इथे बाकी सगळे पुरुष मी एकटीच बाई. गाडी थांबवा मी जाऊन येते म्हणायची लाज. बाकीचे मात्र अधूनमधून गाडी थांबवत होते नि उतरून रस्त्यावर इकडे तिकडे उभे राहात होते. गाडीत ओळखीचे लोक होते पण तरीही...गाडीतून उतरलो ते थेट स्टेजवर...

तिथे पाणी, चहा मात्र तत्परतेने आला, पण मी घेतला नाही. अधिक त्रास नको म्हटलं. भाषणं सुरू झाली. लंब्याचवड्या प्रस्तावना, पाहुण्याचा

अतिशयोक्तीपर परिचय. अहवाल वाचन, मुलांचा सत्कार, कार्यकर्त्यांची नि वक्त्यांची रवरासारखी ताणलेली भाषणं,मी पार वैतागले, पण सांगणार कुणाला ?

माझं भाषण कसंबसं संपवून मी श्रोत्यांमध्ये बसलेल्या काही महिलांना गाठलं नि आडोशाला गेले तेव्हा शांताबाई दाणींच्या अनुभवाची आठवण येत होती. त्यांनाही वारंवार या त्रासाला तोंड द्यावं लागे. आजही त्या परिस्थीतीत फारसा फरक पडलेला नाही.

अजून बऱ्याच ठिकाणी प्रचाराला जायचं होतं. कारण एका शनिवारी ज्या महिला यायच्या त्या दुसऱ्या शनिवारी नसायच्या. तिसऱ्या शनिवारी आणखी वेगळ्याच महिला दिसायच्या. कधी महिलांची उपस्थिती बरी असायची कधी चिंता लावायची. परत चार घरं फिरावं लागायचं.

एकदा एका सुशिक्षित घरात शिरलो. बाई एकटीच घरात खुडबुडत होती बुवा बाहेरच्या खोलीत आरामात बसले होते. आम्ही महिलांची एक संघटना काढतो आहोत असं म्हटल्याबरोबर म्हणाले, " अहो, आमच्या बायकांना काय करायची आहे स्त्री–मुक्ती ? आमच्या बायका मुक्त आहेत, आमच्या बाईचं नवऱ्याशी नाय पटलं तर ती सरळ म्हणते तुझं माझं सरलं, घे तुझं डोरलं आणि ती सरळ घराबाहेर पडते किंवा नवऱ्याला घराबाहेर काढते. "

अहो पण आमचा उद्देश तुम्ही म्हणता तसा स्त्री–मुक्ती वगैरे काहीही नाही, आम्ही फक्त . . .

आम्हाला अवडत ते पुढे म्हणाले. . . . काही सांगू नका, खरं तर आमच्या बायकांना घराबाहेर पडायचीही काही गरज नाही, आम्ही त्यांना काय हवं ते घरात देतोच आहोत . . . .

ते गृहस्थ बोलत होते तेवढ्यात बाई आतलं आवरून बाहेर आली. तिला उद्धेशून ते पुढे म्हणाले, विचारा हिला, काय गं तूच सांग ह्याना कपडालत्ता, दागिना कसली कमतरता आहे का, सांग. बाईल कळेना आमचं बोलणं नेमकं कशाबद्दल चाललंय. . आम्ही त्या बाईकडे वळून सांगू लागलो तरी ते गृहस्थ आपलंच बोलणं रेटत म्हणाले, आमच्या बायकांना काय त्रास आहे ? त्यांना कोण जाळतंय का भाजतंय ? हां, आता संसार म्हटला की चारदोन थपडा ह्या आल्याच . . . त्यासाठी स्त्रीमुक्ती म्हणजे " . . . नवऱ्याचं एवढं ऐकून बाई कायतरी समजली नि चिरक्या आवाजात म्हणाली, नाय तर काय, मंगळसूत्र नाही घालायचं, बांगड्या नाही भरायच्या, नुसतं फॅड. बाई मंगलसूत्र गळ्यातलं गोंजारत पुढे म्हणाली, आमच्या ऑफिसला आहेत दोघी घर मोडून माहेरी आलेल्या . . . . बाईला अडवून आमचा संघटनेचा शुद्ध हेतू सांगता सांगता आमची पुरेवाट झाली. इतका स्त्री–मुक्ती या शब्दाचा त्यांना बाई बाऊ वाटत होता.

थोड्या शिक्षित, थोड्या अशिक्षित अशा वीस–पंचवीस महिला ठरलेल्या

पत्त्यावर जमा झाल्या. सर्वांच्या चेहऱ्यावर एकच प्रश्न होता महिलांचे प्रश्न घेऊन कार्य करायचं म्हणजे नेमकं काय करायचं. ?

खरं तर या प्रश्नाबाबत आमच्याकडेही काही ठोस असं उत्तर नव्हतं. महिला जमल्याच तर सर्वांच्या विचारानं ध्येय धोरणं ठरवू असा विचार होता. काही तरी केलं पाहिजे ही तळमळ मनात होती.

संघटनेचं नामकरण करायचं ठरलं. स्त्री-संघटना म्हणजे स्त्रीवाचक नाव हवं या दृष्टीनं प्रत्येक बाई एक दोन करता करता स्त्रियांची असंख्य नावं पुढे आली. नावाला जरा ऐतिहासिक टच हवा म्हणून मग सुजात, आम्रपाली, यशोदा, गौतमी, संघमित्रा अशी बौद्ध भिक्षुणींचीही नावं घेऊन झाली पण या नावांची महिला मंडळं ठिकठिकाणी होतीच. हो, ना करता करता एक नाव निश्चित झालं. सर्वांनी टाळ्या वाजवून संमती दिली. बारशाला उपस्थित असल्यासारखा आनंद सर्वांच्या चेहऱ्यावर झळकला.

चला, नामकरण तर झालं, आता कार्यकारिणी निश्चित करू. कुणीतरी म्हणालं. मी विरोध करत म्हटलं, कोणत्याही कार्यकारिणीत अध्यक्ष, सेक्रेटरी ही मानसन्मानाची पदच घोळ करतात. इगतपुरी येथे झालेल्या एका सभेच्या वेळी अध्यक्ष कोण होणार यावरून बरीच वादावादी नि भांडणं झाली. अध्यक्ष होण्यास आपणच योग्य आहोत असं अनेकांना वाटत होतं अखेर त्या सभेत चक्क एका खांबाला अध्यक्ष करून सभा पार पाडावी लागली. असं खुद्द बाबासाहेबांनी आपल्या भाषणात सांगितलं आहे. अध्यक्ष, सेक्रेटरी या पदावरून कित्येक मंडळं मोडीत निघालेली आहेत.

माझं म्हणणं सर्वांना पटलं पण काम करण्यासाठी आपल्याला पैशाची गरजही लागणारचं. ते लोकांकडून गोळा करावे लागणार. साहजीकच संस्था रजिस्टर करावी लागणार. म्हणजे कार्यकारिणी हवीच. हेही पटलं. म्हणून मग दुसऱ्या एका बैठकीत कार्यकारिणी निश्चित झाली. अध्यक्ष, सेक्रेटरी, खजिना नसलेला खजिनदार वगैरे पदांवर महिलांची नेमणूक झाली. आणि पहिलं काम हाती घेतल ते संस्थेसाठी पैसा गोळा करण्याचं. रीतसर पावती पुस्तकं घेऊन आम्ही परत चार उंबरे झिजवू लागलो.

आता आम्ही ठरवलं की ए. पी. डी. पी. म्हणजे आपल्यापैकी दुसऱ्यापैकी काहीही बघायचं नाही. सर्वांकडून पैसे गोळा करायचे. खरं तर खालच्या वर्गातल्या विशेषतः स्त्रिया अगदी मनापासून कर्तव्यभावनेने परिस्थितीनुरूप पैसे देतातच. आंबेडकरी चळवळीला वेळोवेळी पैशाच्या रूपाने जी मदत होत असे त्यात स्त्रिया अगदी चारआठ आणे तेही आपली दिवसभराची कमाई पुढे करत असत. उच्चवर्गीय स्त्रिया आपल्या पतीच्या पैशातून किंवा स्त्री-धनातून दान देत व लगेच पतीकडून त्याची भरपाई करीत पण दलित स्त्रिया स्वकष्टार्जीत मिळकतीतून थोडी का होईना

पण मदत देत. तेव्हा आता पैसे गोळा करताना वरपासूनच सुरूवात करायची असं ठरवलं. वरच्या वर्गातल्या लोकांनी तळागाळातल्याकडून सेवा करून घेऊन खूप मौजमजा केली, आता जरा कर्तव्य करू देत, निदान चार पैसे देण्याचं तरी.

सुरुवात वर पासून करायची म्हणून माझ्या ऑफिसातही मी पावती पुस्तकं घेऊन आमच्या साहेबांसमोर उभी राहिले. स्त्रियांची संघटना, विकास वगैरे थोडक्यात सांगितलं. फुले, आंबेडकर वगैरे ऐकूण साहेब म्हणाले, आंबेडकर म्हणजे नक्की खालच्या समाजाचेच ना ? नाही म्हणजे माझ्या मुलाला एक धडा आहे आंबेडकरांचा. ते एवढे परदेशी गेले, शिकले. . . . . तेव्हा शंका वाटली म्हणून विचारतोय. मी कपाळाला हात लावला. वाटलं ज्याला आंबेडकर,त्यांचं देदिप्यमान कार्य वगैरे माहीत नाही अशा माणसाकडून एक पैसुद्धा नको. मी जास्त काही बोलले नाही, मुकाटयानं जाग्यावर येऊन बसले.

थोडया वेळाने पाच रुपयांची नोट घेऊन शिपाई आला, म्हणाला, साहेबांनी दिलेत. पाच रुपये तेही साहेबांनी. परत मला चीड आली. घ्यावे की नको वाटलं पण शेवटी घेतले. पावती फाडून शिपायाच्या हातात दिली तसा शिपाई म्हणाला, " तुम्ही बाईमाणूस म्हणून साहेबांनी दिले, दुसऱ्या कुणाला नसते दिले. . . . असं म्हणत शिपाई गेला नि माझ्या अंगाची लाहीलाही झाली.

बाई असण्याचा शिपायाला ज्या अर्थानं फायदा वाटला तसा आमच्या इतर भगिनींनाही अनुभव आला. काही माणसांनी तर आम्हाला सुचवलं की तिघी चौघी मिळून एका ऑफिसरकडे जायचे. त्यांना एकेकटीनं गाठा नि गोड बोलून पैसे काढा . . . ते ऐकून पठ्ठेबापूरावानं पवळाबाईला बोर्डावर नाचवून मिळालेला पैसा बाबासाहेबांच्या कार्याला मदत म्हणून देऊ केला तो बाबासाहेबांनी कसा ठोकरला आणि पठ्ठेबापूरावाची निर्भत्सना केली ती हकीगत आठवली. लोकांचे असले सल्ले आम्ही फक्त ऐकत होतो. लोकांनी आमच्याकडे फक्त एक व्यक्ती म्हणून पहावं अशी अपेक्षा होती.

वरच्या वर्गातल्या बऱ्याच जणांकडून साहेबांसारखाच अनुभव आला. काहींना तर चुकून मी त्यांच्याकडे देणगी मागते असं वाटलं नि त्यांनी सांगितलंही की, "बाई आम्ही तुमच्यापैकी नाही. " त्यावेळी हसावं की रडावं तेच कळत नव्हतं.

दलित समाजातली माणसं वर्गणी देणगी, प्रकाराला कंटाळली होती. कुणाच्याही घर गेलं की,किती आणि कुणाला म्हणून द्यायचे हा प्रश्न कपाळावरच्या आठीतून उमटायचा. काही जण विचारायचे, मागच्या वेळी पैसे नेलेत त्याचं काय केलंत ? अहो ते आम्ही नाही, असं म्हटलं की तुम्ही पण त्यातलेच हा शेरा ठरलेला, पण कुरकुरत का होईना मदत करायचे.

थोडेसे पैसे जमा झाले आणि आम्ही उद्घाटन वगैरे केलं. लोकांना संस्थेविषयी माहिती व्हावी जास्तीत जास्त सभासद भगिनी मिळाव्या हा उद्देश

होता. त्या दिवशीही बऱ्याच जणानी विचारलं, काय स्त्री-मुक्ती वगैरे काही नाही ना? नाही म्हणजे आमच्या बायकांना तुमच्या संस्थेत पाठवताना विचार करायला हवा म्हणून आपलं. . ." वरून चेष्टा पण आतून खरा असा तो प्रश्न होता.

संस्थेत जमा झालेल्या सर्व भगिनींच्या विचाराने असं ठरलं की, सामाजिक अशा सर्वच विषयावर आपण काम करणं आवश्यक आहे. त्या दृष्टीनं मग कामाची विभागणी झाली. सुरुवातीला स्त्रियांना बोलतं करण्याचा दृष्टीने अनुभव कथनाचा कार्यक्रम घेतला. अगदी साध्या साध्या गृहिणीसुद्धा दीडदोनशे स्त्रियांसमोर धीटपणाने बोलल्या. सभेत बोलण्याचा अनुभव नसलेल्या त्या स्त्रियाचं खूप कौतुक वाटलं. महिला अशाच बोलतील, धीट होतील, काही सामाजिक काम करण्याची जिद्द त्यांच्यात निर्माण होईल असेच कार्यक्रम हाती घ्यायचं ठरलं.

लेखनाची आवड मला सुरुवातीपासून होती. साधारण पंच्याहत्तर शहाहत्तरच्या दरम्यान मी कथालेखनास सुरुवात केली होती. पुस्तक परीक्षणेही लिहीत असे. याच सुमारास महाविद्यालयीन शिक्षणही घेत होते. बी. ए., एम. ए. च्या वर्गात शिकत असताना अनेक पुस्तकं वाचनात आली. ज्याला प्रबोधनात्मक लेखन म्हणता येईल अशा लेखनाची दलित समाजाला खरी आवश्यकता आहे हेही लक्षात येत होते. दलित लेखकांवर एक आक्षेप नेहमीच घेतला जातो की दलित समाजावर जेव्हा जेव्हा अन्याय, अत्याचार होतात किंवा बाबासाहेबांविषयीचे अस्मितेचे कार्यक्रम घेऊन कार्यकर्ते घराबाहेर पडतात तेव्हा दलित लेखक मात्र मूग गिळून बसतात. काही हालचाल करत नाहीत. प्रतिक्रियासुद्धा व्यक्त करत नाहीत वगैरे . . . मला मात्र असं वाटत नाही.

दलित लेखक आपल्या लेखनातून आपल्या समाजात त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांचं वर्णन करत असतो. आपलं दुःख दैन्य समोर मांडून ज्यांनी ते आमच्या पदरात बांधलं त्यांना त्याची लाज वाटायला भाग पाडतो. नव्या पिढीवर हे अन्याय होऊ नयेत यासाठी मानवतेची, हक्क आणि न्यायाची जाणीव लोकांना देत रहातो, हे एका अर्थाने समाजकार्यच आहे असे मला वाटते. समता, न्याय, बंधुता, प्रज्ञा, करुणा, शील ही तत्त्वं दलित लेखकचं प्रभावीपणे मांडत आलेला आहे.

आमच्या संस्थेतील स्त्रियांमधून अशा लेखिकाही तयार व्हाव्यात, त्यांनी आपले अनुभव चित्रित करावेत असाही आमचा आग्रह होता.

आंबेडकरी चळवळीतील स्त्रियांना भेटून चळवळीतील त्यांचे कार्य आणि अनुभव यांचा परिचय करून घ्यावा व त्यावर एक पुस्तक लिहावे असा प्रोजेक्ट मी हाती घेतला. मदतीला एका मैत्रीणीला घेतलं आणि आम्ही कार्यकर्त्या भगिनींचा शोध घेऊ लागलो.

दोन कार्यकर्त्या भगीनी माझ्या आयुष्यात तरी अविस्मरणीय आहेत पुण्याच्या लक्ष्मीबाई काकडे या कार्यकर्त्या महिलेने चळवळीत कार्य करता यावे

म्हणून १९४०–४५ च्या सुमारास दोन मुले झाल्यानंतर आपले फॅमिली प्लॅनिंगचे ऑपरेशन केले. घरच्यांचा त्यावेळी झालेला विरोध, त्रास सारं काही सहन केले. बाबासाहेबांनी १९३८ मध्ये विद्यार्थ्यांसमोर केलेल्या भाषणात आपल्या १४ भावंडांचे व दारिद्र्याचे उदाहरण देऊन म्हटले होते की जीवघेण्या बाळंतपणातून स्त्रियांची सुटका झाली पाहिजे, त्यांची शक्ती अन्य कामाकडे वळवली पाहिजे.

चंद्रिका रामटेके या नागपूरच्या महिलेचा चेहराही विसरू शकत नाही. आम्ही त्या महिलेकडे गेलो तेव्हा बाई अतिशय उदास चेहऱ्याने पुढे आली. आम्ही आमचा उद्देश वगैरे सांगितल्यानंतर आवश्यक ती माहिती बाईंनी दिली. नवऱ्याकडून मारहाण सहन करून समाजाच्या टीकेला, उपेक्षेलाही तोंड देत खंबीरपणे चळवळीत काम करणारी एकेकाळी दंड बैठका काढून पहिलवानासारखी वावरणारी नि प्राथमिक शाळेत शिक्षिकेचं काम करणारी ही स्त्री आता एकदम निष्क्रीय, उदास, निष्प्रभ का ? असा प्रश्न पडला, तिला तसे विचारले तेव्हा आता कुणाचं खंबीर नेतृत्व नाही ही खंत तिने व्यक्त केली. पण त्याही पेक्षा एका व्यक्तिगत दुःखातून त्या बाईला विरक्ती आल्याचं जाणवत होतं. खोदून विचारले तेव्हा एका २४/२५ तल्या तरुण मुलाच्या फोटोकडे बोट दाखवून म्हणाली, माझा हा मुलगा हल्लीच वारला हो . . . . आता काय करायचंय मला समाज नि समाजकार्य ? असं म्हणून ती रडू लागली. तिचा तो विदीर्ण चेहरा पाहवत नव्हता. आम्ही तिला धीर दिला नी निघालो. घरी आल्यावर तिला पत्र पाठवून मी लिहिलं, तुम्ही एक आई आहात, त्याचबरोबर तुम्ही आहात एक कार्यकर्ती जिला नसतात नाती, असते फक्त जाणीव, समाजाची म्हणून उठा वगैरे . . . .

दलित कार्यकर्त्या भगिनींना नेहमी एक गंमतीदार अनुभव पुरुष कार्यकर्त्यांकडून येत असतो. कोणताही कार्यक्रम असो, सभा,मोर्चा, मिटिंग काहीही असो पुरुष कार्यकर्ते स्त्री–कार्यकर्त्यांना अगदी हक्कानं कार्यक्रमात भाग घ्यायला सांगत असतात. कधी विनंती करून तर कधी रागवून मात्र आपल्या घरच्या महिलांना संबंधीत कार्यक्रमासाठी आग्रहपूर्वक बोलावून आणत नाहीत, उलट समर्थन करतात की, त्यांना घरी कामं असतात किंवा घरात कुणी नाही, घर सांभाळावं लागतं वगैरे. . .

काहीजण कौतुकानं सांगतात की त्यांना घराबाहेर पडायची सवय नाही त्या साध्याभोळ्या आहेत.(आम्ही घराबाहेर पडायची सवय असणाऱ्या धूर्त लबाड आहोत असं समजायचं का ?) कंसातलं वाक्य आम्ही मोठ्यानं बोलत नाही कारण आमचे धम्मबंधू भावडेपणानेच हे बोलत आहेत याची जाणीव असते. त्याचबरोबर आमच्या धम्मभगिनी लग्न, बारसे, पिकनीक, नाटक, सिनेमा वगैरेसाठी अगदी नटून थटून दिवसभर घराबाहेर राहतील पण सभा–संमेलनांना मात्र. . . . नाव नको.

दलित स्त्रियांच्या परिसंवादाच्यावेळी अशीच गंमत निदर्शनास येते. स्त्रियांवरील परिसंवाद म्हणजे स्त्रियांनीच बोलायचं. स्त्रियांच्या प्रश्नांशी पुरुषांचा काडीचाही संबंध नाही. श्रोतेसुद्धा स्त्रियाचं हव्या. अशी सर्वांची भावना असते. 'अस्मितादर्श' मेळावा धुळे येथे झाला तेव्हा एका चांगल्या कार्यकर्त्याला (आंबेडकर चळवळीचे निष्ठेने काम करणारा) मी म्हटलं, "काय हो, आमच्या स्त्रियांवरील परिसंवादाच्यावेळी तुम्ही मंडपातून उठूनसे गेलात ? तेव्हा कार्यकर्ता अगदी सहज म्हणला, " स्त्रियांचा परिसंवाद होता म्हटलं इथं आपलं काय काम? म्हणून जरा चक्कर टाकून आलो झालं ".

स्त्रियांच्या प्रश्नावर एक स्त्री–कार्यकर्ती बोलत होती. अन्याय, अत्याचारा-विरुद्ध कडाडून हल्ला चढवत होती. तिचा तो जोश आणि आवेश पाहून मी ठरवलं बाईचा पत्ता लिहून घेतला पाहिजे. भाषण संपवून जवळ येताच मी माझी डायरी तिच्या समोर सरकवत म्हटलं, बाई पत्ता, प्लिज. तेवढ्यात शेजारणीनं कोपरानं ढोसलं. त्यावेळी ढोसण्याचं कारण विचारु शकले नाही पण नंतर कळलं की त्या स्त्रीअत्याचारावर तोंडफाड बोलणाऱ्या बाईनं आपल्या सुनेच्या तोंडात बोळा कोंबून तिला उभी जाळून टाकली होती. ते ऐकताना आ वासलेलं तोंड मिटून घ्यायलाही मी विसरले.

अशा उदाहरणांनी स्त्री ही स्त्रीची शत्रू आहे असं काही तरी बटबटीत विधान करण्यापेक्षा केवळ व्यक्ती शिक्षणाने नव्हे तर मानसिक प्रबोधनाने सुसंस्कृत होते हे लक्षात घेऊन शिक्षणाबरोबरच मनाचं उन्नयन होण्याच्या दृष्टीनं प्रयत्न झाले पाहिजेत हे प्रत्येकानं लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी हवी असते संघटना. संघटीतपणाने केलेल्या कामाचा नेहमीच चांगला परिणाम होत असतो.

मध्यंतरीच्या काळात कोकणातील महिलांना संघटीत करण्याची एक नामी संधी प्राप्त झाली. पहिल्या संघटनेत आलेल्या स्त्रियांप्रमाणे याही संघनेतील स्त्रिया उत्साहाने पुढे आल्या.

महाराष्ट्रातल्या इतर प्रदेशांच्या मानाने कोकण तसा मागासलेलाच भाग त्यातील दलित स्त्रिया संघटीत पणे काम करायला पुढे येतात ही अतिशय स्वागतार्ह अशीच गोष्ट होती. अनेकांनी कौतुकानं पाठींबा दिला.

देवदासी निर्मूलनासाठी आणखी एक संघटना दलित स्त्रियांनी उभी करावी किंवा असलेल्या संघटनेतर्फे काम करावे असे काही इतर कार्यकर्त्यांचे मत होते. या संदर्भात छाया दातार यांनी मला सुचवलं तेव्हा मी मोठ्या अभिमानानं म्हटलं की आम्ही आता बौद्ध झालो आहोत. देव, देवता यांचा त्याग करून अंधश्रद्धेलाही मूठमाती दिली आहे त्यामुळे आमच्या समाजात आता कुणीही आपल्या मुलींना देवाला वाहात नाही. आमच्यापुरता तो प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृपेने संपलेला आहे. माझ्या या उत्तरावर छाया दातार हसल्या, म्हणाल्या मी स्वत: या

विषयावर संशोधन करत आहे. त्यानिमित्त निपाणी, कोल्हापूर, सोलापूर वगैरे भागात फिरते आहे. माझ्या असं निदर्शनास आलं आहे की, नवबौद्ध समाजातल्या मुलीही देवदासी बनत आहेत. काही नवबौद्धलोक जुन्या गोष्टींनाच चिकटून बसलेले आहेत. त्यांच्यामध्ये जागृती होणे आवश्यक आहे.

छाया दातार यांचं म्हणणं खरं आहे. कित्येक नवबौद्धांमध्ये बाहेरच्या खोलीत बुद्ध, आंबेडकर यांच्या प्रतिमा नि आतल्या बाजूला हिंदूधर्मातील देवदेवतांच्या प्रतिमा आम्हाला दिसत होत्याच. काहींच्या घरी तर सर्व धर्म समभाव दर्शक, सर्व धर्मातील पूजनीय व्यक्तींचे फोटो किंवा चिन्हेही असायची. लग्न समारंभातही जुन्या रीतीरिवाजांचा पुन्हा शिरकाव झालेला आम्ही पहात होतो. जुन्याच उत्साहाने हिंदूसणही साजरे होताना दिसत होते.

एक दिवस संध्याकाळी एक मध्यम वयाची बाई माझ्या घरी आली व म्हणाली, दोन दिवस मी सतत तुमच्याकडे येतेच पण तुमची भेट नाही. मी म्हटलं एवढं माझ्याकडे काय काम ?

" अमुक तमूक बाई तुमच्या मंडळात आहे ना ? बरं मग ?" काय म्हणून त्या बाईला मंडळात घेतलंत तुम्ही ? बाई रागारागानं विचारू लागली. मी म्हटलं, हे पहां बाई, तुम्ही कोण ? काय झालं ते नीट सांगा, उगाच काहीतरी बोलू नका.

बाईनो आमच्या ओळखीतल्याच एका कुटुंबाचं नांव सांगितलं. म्हणाली त्या घरातली मुलगी तुमच्या या बाईची सून आहे. आठ–नऊ वर्षं झाली लग्नाला ही बाई त्या पोरीला सारखी छळते तिच्या मुलाची बदली झाली आहे दुसरीकडे तर ह्या बाईने सुनेला सुद्धा तिकडे पाठवावं की नाही ?

तिला थांबवत मी म्हटलं "पण तुम्ही त्या मुलीच्या कोण ? " " मी तिची आत्या " बाईने खुलासा केला नि मग आमच्या मंडळातली बाई तिच्या भाचीला कसं कसं छळते ते सांगू लागली.

"मग मी काय करावं अशी अपेक्षा आहे तुमची ?" " तुम्ही तिला विचारा म्हणावं तू एक बाई असून बाईवर अन्याय करतेस हे तुला शोभतं का?" "हे बघा बाई सध्या असले प्रश्न आम्ही सोडवत नाही पण तुम्ही म्हणाला त्याप्रमाणे आमच्याच मंडळातली बाई जर असं वागत असेल तर आम्ही तिला समजावण्याचा प्रयत्न करू तुम्ही घरी जा."

" अहो तुमच्या समजावण्यानं ऐकणार नाही ती " पक्की निगरगट्ट आहे. बाईच्या मनात चीड खदखदत होती. तिला कसंबसं समजावून मी परत पाठवलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी चहा घेतेय तेवढ्यात एक पंचवीस–सव्वीशीतली किरकोळ देहयष्टीची मुलगी दारात उभी राहिली. तिच्याकडे पाहिल्यावरच मी ओळखलं काल त्या बाईनं सांगितलेली ती मुलगी हीच.

ती मुलगी आत आली म्हणाली, काल माझी आत्या आली होती ना तुमच्याकडे ? मी हो म्हटलं तशी त्या मुलीने सासूच्या कर्तृत्वाचा पाढा वाचायला सुरुवात केली. मला त्या सर्वांनी घराबाहेर काढलंय, मीही आता परत जाणार नाही वगैरे ती म्हणू लागली. मी तिला म्हटलं, उद्या आमची मिटिंग आहे, तू असं कर उद्या तू तिथे ये. तुझी सासू तिथेच असेल तेव्हा तुमचं दोघींचं म्हणणं काय आहे ते समोरासमोर ऐकता येईल. जिची चूक असेल तिला समजावता येईल आणि उद्यापासून तूही आमच्या मंडळात येत जा वगैरे.

माझा हा सल्ला पुढे त्या मुलीला नाही, पण मला मात्र आता चांगलाच भोवला. ठरल्याप्रमणे ती मुलगी आमच्या सभेस आली पण तिची सासू आली नाही. इतर महिलांपैकी काहीजणी त्या मुलीला ओळखत होत्या. काय कसं काय म्हणता म्हणता सुनेला होणाऱ्या छळाची गोष्ट कर्णोपकर्णी झाली आणि हा हा म्हणता म्हणता ही गोष्ट सर्वांच्या तोंडी होऊन मी त्या मुलीला फूस देते आहे, सासूविरुद्ध भडकवते आहे, स्त्री–मुक्तीच्या संस्थेतर्फे सासूवर केस घालणार आहे अशा माझ्याबद्दल नाना तऱ्हेच्या गोष्टी जी ती एकमेकांना सांगू लागली.

मुलीच्या सासरच्यांनी मला लाखोली वाहिली. उलट मी त्या मुलीला शांत रहा हा राग तात्पुरता आहे. तुझ्या नवऱ्याचं तुझ्यावर प्रेम असेल तर तो तुला नक्की न्यायला येईल अशा तऱ्हेने चार शब्द सांगून शांत केलं होतं.

प्राप्त परिस्थितीत शात राहायचं ठरवून मी माझं लेखन वगैरे चालू ठेवलं. त्यानंतर कळलं की त्या मुलीला तिचा नवरा आपल्या नोकरीच्या ठिकाणी घेऊन गेला. आता ती दोघं मजेत आहे. पण मला मात्र वाईटपणा आला तो कायमचाच.

असे कौटुंबिक वाटणारे प्रश्न घेऊन बरीच माणसं येतात; कधी आमच्या मुलीला समजवा. ती या लग्नाला तयार नाही, तर कधी कुणी सांगतात माझ्या बायकोची समजूत घाला. ती माझ्यावर वाट्टेल ते आरोप करते पण मी त्यातला नाही. कुणी सून नांदत नाही तिला चार गोष्टी सांगा, असा आग्रह धरतात.

बहुतेक माणसं " मुलीला सासरी छळतात " हीच तक्रार घेऊन येतात आणि हा प्रश्न चार चौघांसमोर न येता खाजगीतच सुटावा, घरातच मिटावा अशी त्याची अपेक्षा असते. हे प्रश्न घरगुती प्रश्न आहेत अशीच त्यांची समजूत असते ते त्यांना प्रतिष्ठेचे प्रश्न वाटतात.

एकदा क्षमा दलवाई नि शैला सातपुते मला शोधत आल्या. म्हणाल्या तुमच्या बांद्र्यातच एक पवार नावाचा तुमच्यापैकी माणूस आहे तो बायकोला नांदवत नाही. घटस्फोटही देत नाही. बायकोचे सर्व दागिने तो घेऊन बसला आहे. तो तुमच्या नात्यातला वगैरे आहे का किंवा ओळखीचा तरी ? मी त्या माणसाला ओळखत नव्हते. मी म्हटलं मग माझ्याकडून काय सहकार्य हवंय ? त्या म्हणाल्या, तुम्ही त्या माणसाच्या घरातील सर्व माहिती काढून आणा. बाईचे

दागिने त्या माणसाने कुठे ठेवले आहेत. आता तो तिला नांदवायला तयार आहे का ? घरातली माणसं काय म्हणतात वगैरे ?

आपल्यामुळे एका महिलेवर होणारा अन्याय दूर होण्यास मदत होणार असेल तर आपण चौकशी करू या असं ठरवून मी त्यांच्या शेजारी माझ्या ओळखीतले एक गृहस्थ राहात होते. त्यांच्याकडे चौकशी केली, तर ते म्हणाले, " बाई तुम्ही उगाच त्या भानगडीत पडू नका. त्या दोघींना तसं सांगा उगाच आपली गृहछिद्रं दुसऱ्यांना दिसता कामा नयेत.

सुनेला होणारा सासुरवास, भांडणे मारामाऱ्या यावरून माझी एक कार्यकर्ती मैत्रीण मला म्हणाली, "उर्मिला, तू तुमच्या समाजात थोडं बहुत काम करतेस मग तुला असं जाणवतं का ? की सासुरवास म्हणजे सुनेला होणारा त्रास, घटस्फोट वगैरे गोष्टी विशेषत: नवबौद्धांमध्येच फार आहेत. म्हणून ? आम्ही जे स्त्रियांसाठी केंद्र चालवतो त्यात अशा केसेस घेऊन नवबौद्ध महिलाच मोठ्या संख्येने येतात, इतरही येतात पण त्या थोडचा, असं का ?

मलाही आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांच्या मुलाखती घेताना असं लक्षात आलं होतं की घरातली बाई, मग ती सुशिक्षित असो वा अशिक्षित जेव्हा स्वत:हून काही करू पहाते, स्वत:चा विकास होण्यासाठी धडपडते, बाहेरचं जग पहाण्याची तिला इच्छा होते आणि ती पुरुषाच्या मदतीशिवाय घराबाहेर पाऊल ठेवते तेव्हा तिचे ते आत्मनिर्भर रहाणे, तिचे ते स्वातंत्र्य पुरुषांना खटकते. पुरुषप्रधान संस्कृतीचा पगडा त्या पुरुषावर आणि स्त्रियांवरही असल्यामुळे अशी एखादी स्त्री जेव्हा ते जोखड फेकू पाहाते तेव्हा घरातली माणसं तिला विरोध करतात. हे नेहमीचच झालं की त्याला फार मोठ्या भांडणाचं त्यानंतर हाणामारीचं आणि त्यानंतर घटस्फोटाचंही स्वरूप येतं.

नवबौद्ध समाजाला बाबासाहेबांसारख्या दैदिप्यमान पुरुषाचं सर्वंकष नेतृत्व लाभल्यामुळे या समाजातले स्त्री व पुरुष भरभरून आपली प्रगती करू लागले, शिकू लागले, नोकरी, व्यवसायातून चांगला चरितार्थ चालवू लागली; परंतु पुरुष प्रधान संस्कृतीपासून या पुरुषांची मुक्ती झाली नाही. नोकरीनिमित्त, चळवळीनिमित्त, वा स्वत:चा विकास करण्यानिमित्त, घराबाहेर पडणाऱ्या स्त्रीची, पूर्वापार चालत आलेल्या कामापासून मुक्ती झाली नाही. उलट तिच्यामुळे पुरुषाचा अहंकार दुखावला गेला आणि त्यातूनच भांडण, मारामारी, घटस्फोटांची प्रकरणं नवबौद्ध समाजातच फार असं जाणवू लागलं.

इतर दलितांची त्यामानाने प्रगती झालेली नाही.सहाजिकच वर उल्लेखिलेले स्त्रियांच्या त्रासांचे प्रमाण कमी दिसते. यातूनच दुसरी गोष्टही अशी दिसते की दलित पुरुष शिकतो, वरच्या पदांवर नोकरी, व्यवसाय करू लागतो. बऱ्यापैकी पैसा हातात येतो. मग त्याच्या अपेक्षाही उंचावतात. त्यामुळे घर की मुर्गी दाल

बरावर असंही वाटू लागतं आणि मग बऱ्याच जणांचा अंगवस्त्र ठेवण्याकडे कल होतो. यातूनही घरच्या स्त्रियांच्या चित्तरकथेला सुरुवात होते.

माझ्या मैत्रीणीकडे आलेल्या केसेस अशाच प्रकारच्या होत्या. त्यामुळे तिला माझं म्हणणं बरचसं पटलं.

दलित स्त्रियांच्या संघटनांमध्ये काम करत असताना आणखीही वरच्या वर्गातल्या स्त्रियांच्या संघटनेतून मी काम करत होते. बऱ्याच नव्यानव्या गोष्टी शिकत होते. संघटनेत काम करताना फक्त संघटनेच्या ध्येयधोरणाबद्दल कार्यक्रमांबद्दल आणि बाकी कोणत्याही बाबतीत शक्यतो मौन पाळावं. कारण एखादी गोष्ट आपल्याकडून तिसऱ्या, चौथ्या व्यक्तीपर्यंत पोहोचेपर्यन्त त्या मूळ गोष्टीत बरेच पाठभेद झालेले असतात आणि अगदी साध्या बोलण्यालाही वाकडं वळण लागलेलं असतं. त्यामुळे फार जपून बोलावं लागतं. मराठी भाषेला वाकवावी तशी ती वाकते हा अनुभव संघटनेत फार येतो. सर्व भाषिक संघटनांना हाच अनुभव येत असेल तर सर्वच भाषा वाकवाव्या तशा वाकतात म्हणावं लागेल.

कोणतीही संघटना उजव्या आणि डाव्या अशा दोन पक्षांना एकाचवेळी जन्म देते. साहजिकच दोन्ही बाळं सांभाळत कार्यकर्त्यांना काम करावं लागतं. व्यक्तिगत स्वार्थ, परस्पर हेवेदावे सांभाळत संघटनेची नाव पुढे न्यावी लागते. याला दलित स्त्रियांची संघटनाही अपवाद नाही.

कधी कधी पोहणारा बुडतो, बोलणारा अडतो नि लिहिणारा नडतो असाही अनुभव येऊन निष्क्रीयता निर्माण होते.

दलित स्त्रियांवर बंधनं फार असतात असा अनुभव आला. तुम्ही हे करू नका, त्याच्यावर बोलू नका, त्यावर मौन पाळा अशी पुरुषप्रधान, संस्कृतीतून बरीचशी दडपणं येतात. नाहीतर मग संघटनेतील स्त्रियांच्या गळतीला सुरुवात होते. मग कुणाचं तरी व्याख्यान, शिबीर, गेट टूगेदर कार्यक्रम, पिकनिक, लग्न, बारशाला उपस्थिती असे उत्सवाचे स्वरूप या संघटनांना प्राप्त होते.

इतर स्त्रीसंघटनाप्रमाणे दलित स्त्रीसंघटना ठोस अशा ध्येयधोरणांवर उभी राहाणे आवश्यक आहे. संघटनेमध्ये वारंवार निर्माण होणारे ताणतणाव समजून घेणारं सुजाण नेतृत्व हवं आहे. त्यादृष्टीने आम्हा सर्वच स्त्रियांचे मानसिक प्रबोधन झालं पाहिजे. बाबासाहेबांच्या तत्त्वांचा केवळ नामोच्चार करण्यापेक्षा त्यांनीं सुशिक्षितांवर जी जबाबदारी टाकली आहे ते पेलण्यासाठी सशक्त मनोभूमी होणे आवश्यक आहे. भाकरीचा प्रश्न सुटला की तीही होईल. हा विश्वास आहे. मी फार मोठी कार्यकर्ती नाही पण आत्मविकास करताकरता बाबासाहेबांच्या प्रेरणेने काहीतरी करावं असं वाटत होतं. समाजाचं आपल्यावर ऋण आहे ही जाणीव होती. त्यादृष्टीनं माझी थोडीशी धडपड चालली होती. थोडेसे बरेवाईट अनुभव गाठीला होते. सभासंमेलनांना आवर्जून उपस्थित रांहात होते. नोकरी,

घर, थोडसं लेखन संघटनामधून कार्य भाषण असं अगदी सपाटून जोमाने उत्साहाने कार्य चाललं होतं आणि एक दिवस . . . .

चंद्रिका रामटेकेच्या आयुष्यात उगवलेला तो काळ दिवस माझ्या आयुष्यात उगवला. दुःखाचा, वेदनेचा प्रचंड लाव्हा माझ्याभोवती आणि हृदयात उसळला त्या लाव्हाने माझ्या सर्व भावाना कोळपून, थिजवून टाकल्या. सर्व जोम, उत्साह आणि नवे बेत भस्म झाले.

कधी कधी काही घटना आयुष्याला मोडून तोडून, चोळामोळा करून एका वेगळया वळणावर फेकून देतात. तिथून त्या व्यक्तीचं नवं आयुष्य उभं राहू लागतं. अगदी प्रारंभापासून तोपर्यंत फक्त जगायचं असतं कशाच्या तरी आधारानं.

लेखनाच्या आधारानं सध्या मी जगत आहे. मात्र जाणीव आहे त्या शब्दांची जे माझ्यासारख्या आईलाच मी लिहिले नि आठवण आहे त्या ऋणांची ज्या समाजात मी वाढले.

**– ऊर्मिला पवार**

ब २०२/४ शासकीय वसाहत

बांद्रा (पूर्व) मुंबई ४०० ०५१

# मातंग चळवळ आणि मी

– प्रा. मच्छिंद्र सकटे

मला चांगलं आठवतंय, तेव्हा मी दुसरीला मुंबईत होतो. जेव्हा मी निळया टोप्या घालणारी माणसं बघायचो तेव्हा मला कौतुक वाटायचं. कारण तोपर्यंत मी पांढऱ्या टोप्याच बघितल्या होत्या. म्हणून मी माझी शंका माझ्या वडिलांना विचारली.

" बापू, ही आसली कसली माणसं ? "

" ती भूकरी हायती. " बापू.

" भूकरी म्हंजी ? "

' भूकरी म्हंजी आंबेडकरांची माणसं. " बापू.

" आंबेडकर म्हंजी ? "

" बाबासायब आंबेडकर, डाक्टर, म्हारांचा मोठा पुढारी "

" म्हारांचा म्हंजी ? "

" म्हारांचा म्हंजी म्हारांचा. आपून जसं मांग हाय तशी म्हारं." बापू जरा वैतागूनच म्हणलं. मी आणि काहीतरी विचारेन म्हणून बापूच म्हणलं, " आता गप बस न्हायतर कानसुलीत ठिवून दिन. "

खरोखरंच, म्हार – मांग हे शब्द मी प्रथमच ऐकले. बाबासाहेबांचं नावही मी प्रथमच ऐकलं. मी दुसरीला होतो तेव्हा. 'चळवळ' हा शब्द मात्र मी आठवीत असताना ऐकला. तेव्हा मी विटयाच्या भैरवनाथ विद्यार्थी वसतीगृहात होतो. त्यावेळी तिथं भाई संपतराव पवार (मुक्ती संघर्ष चळवळीचे प्रमुख) माजी आम. भगवानराव मोरे ( क्रांतीसिंह नाना पाटलांचे जावई )भगवानराव सूर्यवंशी, सदाशिवराव पवार, रावसाहेब शिंदे, कदम गुरुजी (कळंबी) ही सारी माणसे शेतकरी कामगार पक्षाची कामं करत. ही मंडळी शेतकरी,कष्टकरी जनतेचे मेळावे घ्यायची, मोर्चे काढायची. मी त्यात सहभागी व्हायचो, मनापासून. १९७७ ला लोकसभेच्या निवडणुकीत तर या मंडळीच्यामुळंच मी जनता पक्षाचा प्रचार केला. विशेष म्हणजे तेव्हा मला मतदानाचा हक्कही मिळाला नव्हता.

शे. का. पक्षाची मुलं तेव्हा " पुरोगामी युवक संघटनेत "होती. मीही त्यात काम करत होतो. एकदा असंच मी अकरावीला असताना कार्यकारिणी निवडणेचे वेळी मला अध्यक्ष करण्याविषयी काहीजणांनी आग्रह धरला. परंतु अक्षरशः केवळ मी दलित असल्यामुळे अध्यक्ष होऊ शकलो नाही. माझ्या आयुष्यात प्रथमच 'जात' हा निकष लावला गेला.

मी जेव्हा कॉलेजला होतो तेव्हा एस. टी. सुरू करणे, फी वाढ रद्द करणे या संदर्भात वरिष्ठांना भेटणे आणि वेळप्रसंगी मोर्चे काढणे असे काही कार्यक्रम करीत असू. परंतु नंतर मात्र या गोष्टी सुद्धा मला फालतू वाटायला लागल्या. याचे प्रमुख कारण म्हणजे पुरोगामी संघटनेचं राजकारण. कॉलेजच्या निडवडणुका राजकीय पक्ष, शहरी, ग्रामीण भाग आणि जात हा भाग महत्त्वाचा ठरतोय. ही गोष्ट मला चांगलीच खटकली.

निवडणुकीला बुद्धीनं मंद आणि पैशानं गबरगंडच मुलं बहुसंख्येने सहभागी होतातही अशी वस्तुस्थिती आहे व होती.एस.टी. पास काढायची पंचायत असताना हजारो रुपये जी. एस., यु. आर. होण्यासाठी खर्च करणे आम्हाला तरी शक्य नव्हते. आमच्या वेळी तरी बहुतेक पैसेवाली पण येडझवी पोरंच निवडून यायची. कॉलेज निवडणुकांत मतदारांना पाहिजे ते दिलं जातं. नाष्टा, पाणी तर असलेच पण बाई, बाटली सुद्धा दिली जाते. बियरने गांड धुणारे यु. आर. विद्यापीठ कार्यकारिणीवर निवडून गेलेले आहेत. यामुळे कॉलेज निवडणुका म्हणजे 'फार्स' वाटतो, दलित मुलांना इथं स्थान नसतं. लघवी करण्यापुरतं जसा x x x हातात धरला जातो तसा दलित मुलांचा वापर होतो. हे लक्षात यायला. लागलं शेवटी पुरोगामी संघटनेतून मी बाहेर पडलो. दलितांचं एक स्वतंत्र पॅनेल असावं असं वाटू लागलं. तसा आम्ही प्रयत्नही करू लागलो. बाबू, सुरेश, हेमंत, रवि (भिंगारदेवे), अनिल, अविनाश ( भिसे ), भगवान सकटे, जगू वायदंडे, महेंद्र खरात, मधू कांबळे, विजय लोखंडे आणि मी स्वतः असा एक मोठा ग्रूप तयार झाला. 'टिट

फॉर टॅट ' चा वापर व्हायला लागला. दलित मुलांची एक जोरदार पलटण तयार झाली. यातूनच मग अनिल भिसे जी.एस. झाला. दीपक साठे, सुभाष देवे यु. आर. झाले. आज बळवंत कॉलजवर दलितांचा विशेषत: मातंग तरुणांचा एवढा दबदबा आहे की आजतरी त्यांना कुणी आव्हान देऊ शकत नाही.

खरं म्हणजे मी ग्रॅज्यूएट होईपर्यंत ' दलित चळवळ ' विटा शहरातच नव्हेतर खानापूर तालुक्यातही नव्हतीच. कोणत्याही प्रश्नावर संप मोर्चे जेव्हा कधी निघायचे तेव्हा ते शे. का. पक्षातर्फेच निघायचे.

खानापूर तालुका हा दुष्काळी भाग. रोजगार हमीची कामे त्यावेळी असायची. त्यात मीही एक मजूर. पण तेव्हा आम्हाला पगार झाटभर मिळायचा. अक्षरश: दिवसभर गाढवासारखं राबून एक रुपयाने पगार काढायला ओअरशेअरना लाज वाटायची नाही. मग यावर भाई संपतराव पवार व डॉ.भारत पाटणकर यांनी आवाज उठवला.सांगली जिल्हाधिकारी कचेरीवर हजारोंचे मोर्चे गेले. पवार,पाटणकर यांच्याबरोबर मी ही असायचो. या संदर्भात दोन वेळा अटक व्हायचा प्रसंग आला.

कॉलेजमध्ये प्रा. आढावसर आंबेडकरांच मोठेपण सांगायचे. आम्हाला स्फूर्ती यायची. आपणही समाजासाठी काही तरी करावं, संघटीत व्हावं असं वाटायचं. सरांचं ऐकून मी तरुणांना 'एक' करण्याचा प्रयत्न करायचो. सर्वांना एकीचं महत्त्व सांगायचो. ऐकताना सगळ्यांना बरं वाटायचं. सगळेजण ' हो हो ' म्हणायचे आणि मिटींगच्या वेळी मात्र मी एकटाच नेमका राहायचो.

बी. ए. च्या पहिल्या वर्षाला असताना उन्हाळ्याच्या सुट्टीत मी वहिणीकडे मुंबईला गेलो होतो. रमाबाई आंबेडकर नगर, घाटकोपर (पूर्व) तर तिथं बौद्ध विहारामध्ये गर्दी दिसली. एक नेता आला होता म्हणून ती गर्दी होती. नाव समजले तर राजा ढाले. बराच वेळ मी थांबलो. गर्दी कमी झाली. राजा ढाले त्याच्या मित्राशी गप्पा मारीत बसले होते.

मी एकजणाला बाजूला घेऊन म्हणालो, " मी विट्याहून आलोय, ढालेना भेटायचं आहे. '' निरोप घेऊन तो मनुष्य आत गेला. बाहेर आला आणि म्हणाला " साहेबांना वेळ नाही." ढाले तर निवांत हसत खेळत, गप्पा मारत बसले होते.

बी. ए. च्या शेवटच्या वर्षाची परीक्षा दिल्यानंतरही मी पुन्हा मुंबईला गेलो होतो. त्यावेळी आ. यु. ढालेंनी ' बौद्ध परिषद ' भरविली होती. त्या निमित्ताने ते रमाबाई कॉलनीत आले होते. मी डायरेक्ट त्यांनाच गाठलं आणि म्हटलं-

'मी विट्याहून आलोय. मातंग समाजाचा कार्यकर्ता आहे. मला आपल्याशी बोलायचं आहे.''अगदी शांतपणे मी बोललो. पण आयु.ढाले एकदम तडकले म्हणाले-

''काय असतंय तुमचं ? बौद्ध धर्म स्वीकारायचा असेल तर बोला, नसेल तर जावा . . .''

मी काय बोलावं नि काय नाही याच विचारात. डॉ. आंबेडकर यांनीही एवढ्या

तडकाफडकी धर्मांतर केलं नव्हतं हे त्यांना सांगावसं वाटलं.पण मी काहीही न बोलता तासभर थांबून निघून गेलो. नंतर मी अनेकांशी यावर चर्चा केली.बरेच जण म्हणाले–

" विद्वान माणसं तिरसटयासारखेच वागतात आणि ढाले स्वत:ला विद्वान समजतात. " अक्षरश: समाजात काहींची ढाले विषयी ही प्रतिक्रिया.

त्यावेळी ( सुट्टीत ) मी, अरुण कांबळे, नामदेव ढसांळ यांना श्री. विठ्ठल साठे ( महाराष्ट्र मातंग विकास परिषद ) बरोबर गेलो होतो. पण त्यांची भेट झाली नाही. पण अनेक मातंग कार्यकर्त्यांची भेट झाली आणि चर्चा झाली. त्यात सर्वश्री विठ्ठल सोठे, लोंढे गुरुजी, मोहन देवकुळे, बाळू माने आणि माझे बंधू रामदास सकटे वगैरे. या सगळयांशी चर्चा झाल्यामुळे जसा मी आनंदीत झालो तसाच अस्वस्थही झालो. कारण या सर्वांच्या एकंदरीत चर्चेचा सूर होता की–

" बौद्ध समाजाचे कार्यकर्ते मातंग समाजातील कार्यकर्त्यांना नेहमीच दुय्यम स्थान देतात. त्यामुळं त्यांचं आणि आमचं अजिबात जुळणार नाही. बौद्धांना वगळून कधीही एक होऊ या. बौद्ध आण्णा भाऊंना मानत नाहीत मग आम्हीही बाबासाहेबांना कशासाठी मानायचं.

आप्पासाहेब गोपल्यांचा विषय तर अनेक ठिकाणी निघाला. समाजाच्या नावावर पैशाच्या थैल्या गोपल्यांच्याएवढया आजपर्यंत कुणीही गोळा केल्या नसतील. ( म्हणजे हा एक विक्रमच ) आप्पासाहेब गोपल्यांच्या उपोषणामुळंच 'आण्णा भाऊ साठे महामंडळ' शासनानं स्थापन केलं असं मातंगांना वाटलं. त्यामुळे ते गोपल्यांना 'नेता' मानू लागले. मातंगानी तर त्यांना एवढं डोक्यावर घेतलं की सुहासिनी आणि पैशाच्या थैल्या सगळीकडे जमू लागल्या. नंतर मात्र समाजाच्या लक्षात आलं की हे सारे पैसे खाऊ 'भाऊ' आहेत.

मी एकदा जाहीर बोललो होतो की, गोपले कदाचित शिवसेनेत जातील, आणि १९८९ च्या विधानसभा निवडणुकीत गोपले खरंच बाळ ठाकरेंना मुजरा करायला शिवसेनेत डेरेदखल हजर झाले. त्यांच्यामागे त्यांच्या बायकोशिवाय आणखी किती कार्यकर्ते आहेत ते त्यांनाच माहीत.

गोपलेंच्या शिवसेना प्रवेशामुळं महाराष्ट्रातील मातंग तरुण अनेक ठिकाणी खवळून उठला. अनेक ठिकाणी जाहीर निषेधही झाला. एवढं मात्र खरं की गोपल्यांनी समाजाचा घात केला. मातंग समाज आतासा कुठं चळवळीत येत होता. गोपल्याविषयी प्रथम प्रथम चांगलं मत होतं. लोक त्यांना नेता मानत होती. परंतु शिवसेनेत प्रवेश करून मातंग समाज चळवळीच्या नरडीचा त्यांनी घोट घेतला.

गोपलेंनी शिवसेनेत प्रवेश का केला ? ठाकरेंना बौद्धांच्या विरोधात मातंगांना उभं करायचं होतं. कारण महाराष्ट्रात बौद्धांच्यानंतर लोकसंख्येनं मातंग समाजच आहे. त्यामुळे ठाकरेंना दलितांच्यात फूट पाडायची आहे. त्यासाठी त्यांना पर्यायी माणूस हवा होता. गोपल्यांच्या रूपाने तो सापडला. ठाकरेंनी त्यांना भगवा दिला.

मातंग समाजाला संघटीत करण्याच्या संदर्भात आम्ही महाराष्ट्रातील सोळा जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांशी चर्चा केली आहे. सर्वांना मनापासून वाटतंय की दलितांनी एक व्हावं. पण दलितांनी म्हणजे कुणी? तर फक्त मातंगांनी! बहुतेकांचं असं मत आहे की " वाट्टेल ते झालं तरी बौद्ध मंडळी आपणाला पुढं येऊ देणार नाहीत. बौद्धांनी ब्राह्मणांचेच सर्व डावपेच उचलले आहेत " आणि १९८९ च्या बौद्ध ऐक्याच्या ऐतिहासिक पण अयशस्वी प्रयत्नाच्या वेळेस महाराष्ट्रातील एका तरी मातंग कार्यकर्त्याला निमंत्रित केलं होतं काय ?

बाबासाहेबांनी खरंच मातंगांना डावललं का ? डावललं असेल तर का ? याचं उत्तर मात्र शोधलं पाहिजे. कारण खऱ्या अर्थानं परिवर्तनासाठी सर्वांगीण लढा उभारायचा असेल तर दलित चळवळीत मातंग समाज उतरलाच पाहिजे हीच आमची भावना आहे.

खा. संदीपान थोरात पंढरपूर आटपाडी लोकसभा मतदार संघातील इंदिरा काँग्रेसचे हुकमी उमेदवार ! वीस वर्षे झाले ते खासदारकी भोगत आहेत. १९८४ व १९८९ च्या लोकसभा निवडणुकीत संदीपान थोरात दाखवा आणि १००० रु. मिळवा असा प्रचार विरोधक करत होते. परंतु थोरातांना न दाखवताही काँग्रेसप्रेमी मतदारांनी त्यांना लाखो मतांनी निवडून आणून दाखवलं. अर्थात ते त्यांच्या कर्तृत्वामुळं निश्चितच नाही. असं म्हणतात की, " आमच्या या मतदार-संघात धोंडा जरी उभा केला तरी तो निवडून येणार " आणि हे खरं आहे.

नाही म्हटलं तरी खा.साहेबांनी माढयाला सूतगिरणी काढली आहे. त्यामध्ये सर्वेसर्वा ते स्वतःच आहेत. त्यामुळे पाहुण्यारावळयांचे अनेक प्रश्न सुटले. पण बाकी समाजाच्या दृष्टीनं काय ?

आता आमदार ढोबळे भला माणूस. जेव्हा ते राजकारणात आले तेव्हा मातंग समाज अक्षरशः चेकाळून गेला होता. त्यांच्या मधुर व रसाळ वाणीनं लोक मंत्रमुग्ध व्हायचे. मातंग समाजाला " नेता " मिळाला अशा समाधानात मातंग माणूस वावरू लागला. परंतु खासदारकीला संदीपान थोरातांच्याकडून तीन वेळा चीतपट झाल्यावर मा. शरद पवारांनी त्यांना मंगळवेढयातून उभे केले. त्यावेळी त्यांच्या बरोबरीनं त्यांच्यासाठी अनेक दलित समाजातील कार्यकर्त्यांनी रात्रंदिवस परिश्रम घेतले. लक्ष्मण ढोबळे आमदार झाले. समाज आनंदसागरात बुडाला पण–

आमदार झाल्यावर ढोबळे बदलले. त्यांनाही तेच केले. जे इतर आमदार करतात. आज जवळजवळ "बरंचसं" कमावून बसलेले आ. ढोबळे पूर्वीसारखं आपल्या बोलण्यानं लोकांना जवळ करू शकत नाहीत. पूर्वीसारखा तरुण कार्यकर्त्यांचा संच त्यांच्याजवळ राहिलेला नाही. त्यांनाही तशी गरज वाटत नसावी. कालच्या १९८९ च्या विधानसभेच्या निवडणुकीच्यावेळी मात्र त्यांना तिकीट मिळतेय की नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आणि मा. ढोबळेंना समाजाचीआठवण झाली

मग त्यांनीच स्थापन केलेल्या व आश्रय दिलेल्या " दलित स्वयंसेवक संघा " च्या वतीने इचलकरंजीचे किसनराव आवळे यांच्या साथीने दोन दिवसांची मातंग समाजाची राजकीय परिषद पुण्याला भरली. महाराष्ट्रातील सर्व आमदारांना निमंत्रित केलं होतं असं संघाचे अध्यक्ष मोहन वाघमारे यांनी सांगितले पण प्रत्यक्ष कुणीच आलं नाही.

त्या परिषदेत ढोबळेंच्यावर अनेकांनी टीका केली. त्यामध्ये विदर्भातील प्रा. सौ. नंदा तायवाडे याही पाठीमागे राहिल्या नाहीत. परंतु मला बोलायलाही संधी मिळेना. पण मी बोलावं म्हणून माझे मित्र व होलार समाजाचे झुंजार युवा नेते रघुनाथ केंगार यांच्या चिकाटीने मला संधी मिळवून दिली. मी गेलो पण मोहन वाघमारेंनी मला चक्क खाली उतरावयास सांगितले. 'वक्ते जास्त झालेत' इति वाघमारे. पण पुन्हा मात्र त्यांनीच बोलून घेतलं. बोलण्याची संधी दिली.

समाजाविषयीची माझी भूमिका मांडत असतानाच श्री. ढोबळे, वाघमारे व त्याच्या पुणेरी कंपूवर मी अक्षरशः टीकेची झोड उठवली. आ. ढोबळे व तथाकथित सर्वच मातंग समाजातील नेते स्वतःच्या राजकारणासाठी समाजाचा कसा वापर करतात ते मी कडक शब्दांत सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी ढोबळे त्यांच्या खास 'गुळगुळू' भाषेत बोलले. काँग्रेसच्या पाठीमागे उभं राहण्याचं आवाहन त्यांनी केलं. मातंग समाजाचा स्वतंत्र राजकीय पक्ष असावा असंही ठरलं. पुढील बैठक कोल्हापुरात घेऊन तेथे नवी कार्यकारिणी व पक्षाचा जाहीरनामा घोषित करायचा ठरलं. कार्यक्रम संपला. त्यानंतर मात्र ढोबळे, मी व प्रा. सौ. तायवडे जवळ लोकांनी गर्दी केली. माझ्याजवळ विशेषत: मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील तरुण होते. दलित पँथर टाईप एखादी संघटना स्थापन करावी अशी त्यांची तीव्र मागणी होती.

प्रा. सौ. तायवडे व मी उभ्याउभ्याच चर्चा केली ( म्हणजे त्यांना वेळ नव्हता म्हणून ) तर त्या म्हणाल्या, "बहुजन पक्ष मोठा करु या" ( मी खलास ) समाजाचं काहीच नाही. त्यांना वेध लागले होते बहुजन समाज पार्टीचे. "काशीरामला महाराष्ट्रात आणू या असा त्यांचा आग्रह. आर. पी. आय. चे पुढारी आपणाला व्यवस्थित प्रतिनिधित्व देणार नाहीत असंही त्या म्हणाल्या.

पुण्याची परिषद संपली. ढोबळेना तिकीट मिळाले. ते आमदार झाले. मात्र मातंग समाजाचा नवा पक्ष घोषणेबरोबरच विरला. समाज आहे तिथेच राहिला. ढोबळे मात्र पुढे प्रगती करायला रिकामे झाले. दलित स्वयंसेवक संघाचं काम संपलं.

मातंग समाजातील तरुण वर्ग सध्या नव्या पवित्र्यात उभा आहे. त्यांना कुठं जावं आणि कुणाच्या मागे जावं असा संभ्रम आहे. त्यामुळेच साताराचा अमर गायकवाडसारखा तरुण पँथर बनला आहे. तर भगवान आवघडे सारखा तरुण आर. पी. आय. मध्ये आहे. प्रकाश बेडेकर सारखा तरुण बी. जे. पी. मध्ये आहे.

तर दिलीप तुपे सारखा तरुण दलाच्या चक्रात सापडला आहे. परंतु मातंग समाजाच्या संघटनेस त्यांचा सदैव पाठिंबा द्यायची तयारी आहे.

शंकरराव साठे सारखा माणूस समाजाला संघटीत करण्याचा प्रयत्न करून थकला आहे. सध्या आण्णाभाऊ साठे मंडळाची स्थापना करून त्याने दलित स्त्रियांच्यासाठी मोफत शिवण क्लासेस चालवले आहेत. कुणीच काही करत नांहीत, कुणीतरी काही तरी केलं पाहिजे. संघटीत झालं पाहिजे. ही त्याची मनोमन इच्छा आहे पण प्रतिसाद अत्यंत अल्प.

सातान्यात काल परवाच ' वीर लहुजी वस्ताद मातंग समाज संघटने ' ची छ. शिवाजीराजे भोसले (सातारा नगर परिषदेचे अध्यक्ष) यांनी उद्‌घाटन केले. प्रमुख वक्ता म्हणून मीच होतो. अंकुश भिंगारदेवे सारखा तरुण तडफदार कार्यकर्त्याने ही संघटना स्थापन करण्यात पुढाकार घेतला. परंतु श्री. अंकुश भिंगारदेवे हा नगरसेवक आहे आणि पुढच्या निवडणूकीच्या अंतस्थ हेतूने त्याने ही संघटना स्थापन केली आहे, असं काही कार्यकर्त्यांनी सांगितलं. म्हणजे पुन्हा आमच्या समाजाला नगराध्यक्षांच्या दावणीला बांधण्याला तो प्रयत्न नाही काय ?

पुण्यातील विठ्ठल साठे हे सुद्धा एक तडफदार कार्यकर्ते. 'झाला बुद्ध महार' व 'खपले देवाच्या नावाने' सारखी दोन वादळी पुस्तकं लिहून त्यांनी चांगलीच खळबळ उडवून दिलेली. परंतु पुण्यातील डी. एम. एस. कार्यकर्त्यांचा त्यांना विरोध. एकदा तर त्यांना एका कार्यक्रमास बोलावून मा. ढोबळेच्या समोर त्यांची कोंडी करण्याचा प्रयत्न झाला. अगदी मारहाण करण्यापर्यंत मजल गेली असे स्वत: त्यांनीच सांगितलं. सध्या त्यांनी बाबासाहेबांच्या स्वतंत्र मजूर पक्षाचे पुनरुज्जीवन केले आहे. समाजासाठी काम करण्याची त्यांची तळमळ मात्र आहेच.

पिंपरी चिंचवडमध्ये तर शिवसेनेचे नेतृत्व मातंग समाजातील तरुण कार्यकर्ता सांभाळीत आहे. गोवंडीत तर मातंग समाज व बौद्ध समाजामधून विस्तव जात नाही. आंबेडकर जयंती बौद्ध लोक धुमधडाक्यात करतात तर त्यांच्या ईर्षेवर मातंग समाजातील लोक शिवजयंती व आण्णा भाऊ साठे जयंती साजरी करतात. बौद्धांना शह देण्यासाठीच तेथे मातंग समाज बहुसंख्येने शिवसेनेत आहे.

भास्कर आणि प्रेमानंद आवळे हे जेव्हा मंत्री झाले तेव्हाही समाजाने 'नेता' मिळाला असे समजून सुस्कारा सोडला पण प्रत्यक्षात त्यांनीही समाजाकडे पाठ फिरवली. एखाद्या मंडळाचं अध्यक्षपद भूषविण्यात त्यांना धन्यता वाटते.

अकोल्याचे मधुकरराव कांबळेही समाजासाठी धडपडताहेत. ' जाग उठा इन्सान ' सारखं साप्ताहिक त्यांनी काही दिवस चालवलं. पण ते समाजाच्या सहकार्याशिवाय चालणार कसं ? सध्या ते बंद पडले आहे. प्रा. भटलाडे हे सुद्धा लेखन वगैरे करतात. पण समाजाचा प्रतिसाद चीड आणण्यासारखा.

सांगलीत आण्णा बयाजी साठे हे मातंग संघटनेचे नेते होते. त्यावेळी त्यांनी

( संघटनेचे ) विद्यार्थी वसतिगृह सांगलीत सुरू केलं. पण तेही सध्या बंद आहे. मुंबईत विठ्ठल साठे यांचं काम आहे.

आजपर्यंत मातंग समाज चळवळीच्या रूपानं महाराष्ट्र राज्य पातळीवर म्हणून काही उभा राहिला नाही. त्याची कारणं काय ? याचं उत्तर सापडायचं असेल तर एक प्रातिनिधीक उदाहरण म्हणून सांगली जिल्हा मातंग समाज संघटनेचा उल्लेख करता येईल.

सांगली जिल्ह्यातील मातंग समाजाचा व चळवळीचा आढावा घेता येईल. मातंग समाजाची प्रेरणास्थानं दोन. एक म्हणजे आद्य क्रांतिकारक लहुजी वस्ताद. म. फुलेंचे गुरु आणि दुसरे म्हणजे आण्णा भाऊ साठे. आण्णाभाऊ साठे ही सांगली जिल्ह्यातील ( वाटेगाव ). आण्णाभाऊंची जयंती कमी अधिक प्रमाणात महाराष्ट्रभर साजरी होते. सांगली जिल्ह्यातही ती साजरी होते पण तुरळक ठिकाणी. आजपर्यंन्त जिल्हा पातळीवर मोठ्या प्रमाणावर एक अपवाद सोडला (१९९०) तर साठे जयंती साजरी झालेली नाही. सांगली जिल्हा मातंग समाज संघटना अस्तित्वात असली तरी तिच्या नेतृत्वाचा वाद तिच्या जन्मापासूनच सुरू झाला आहे. आणि यातच ही चळवळ मृतप्राय झालेली आहे.

नेताजी कांबळे (सांगली) विश्वनाथ कांबळे (विटा) यांच्यातील वाद तर अगदी उघड आहे, वास्तविक प्रत्येक राजकीय पक्ष अशा संघटनांचा स्वतःसाठी उपयोग करून घेत असतो. सांगली जिल्हाही त्याला अपवाद असण्याचे कारण नाही.

कालच्या (१९८९) विधानसभेच्या निवडणुकांत हेच झालं. काँग्रेसला पाठींबा द्यायचा ठरलं. मातंग समाजाचा मेळावा झाला. तिकीटं मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू झाला. विश्वनाथ, नेताजी स्वतंत्रपणे प्रयत्न करू लागले. कारण जत मतदार संघ राखीव आहे. पण काँग्रेसने दोघांनाही डावललं. तिकीट तिसऱ्यालाच मिळालं. हे मात्र फाटून गेले. समाजाच्या चळवळीच्या चिंध्या झाल्या.

विधानसभेला काँग्रेसला पाठींबा द्यायचं ठरलं. पण विटयाचे नगराध्यक्ष हणमंतराव पाटील यांनी बंडखोरी केली. आता हणमंतराव व विश्वनाथ यांचे संबंध चांगले. त्यामुळे जिल्हाध्यक्ष विश्वनाथरावांनी विटयात बंडखोरांचा प्रचार केला. तर रविंद्र भिंगारदेवे, डॉ.राजन किंवा संभाजी भिंगारदेवे यांनी काँग्रेसशी निष्ठा दाखविली. यातून भिंगारदेवे ग्रूप व विश्वनाथ कांबळे ग्रूप यांचं फाटलं. चळवळ फाटली. समाज दुभंगला, म्हणजे जिल्हा संघटना तालुका पातळीवर फाटतात. तुटतात यातून समाजाचा विचका होतो आणि महाराष्ट्रभर हेच घडत आलं आहे.

**– मच्छिंद्र सकटे**

समाजशास्त्र विभाग, शाहू कॉलेज, कोल्हापूर

# एकटा चलो रे

– मल्लिकार्जुन बनसोडे

मा. नामदार श्रीयुत रणजितभाई देशमुख
शिक्षण राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२
यांना नम्र निवेदन

विषय :– १) दलित मुख्याध्यापकावर बहिष्कार टाकून अनेक प्रकारे छळ प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश देणेबाबत . . .
२) रा. सं. चंडक हायस्कूलवर प्रशासक नेमणेबाबत . . .

मी बनसोडे मल्लिकार्जुन शाहू, मुख्याध्यापक, रा. सं. चंडक हायस्कूल, सम्राट चौक, सोलापूर, वय वर्षे-३२, आपण विचारलेवरून जबाब देतो की, मी अनुसूचित जातीपैकी हिंदू-महार जातीचा आहे. माझे शिक्षण बी. ए. बी. एड. इतके झालेले आहे. माझी नेमणूक सोलापूर येथील सोलापूर एज्युकेशन सोसायटीचे रा. स. चंडक हायस्कूल या ठिकाणी दि. २२–६–८२ रोजी सहशिक्षक म्हणून झाली. संस्थेने मी बी. ए., बी. एड. असतानाही मला डी. एड. वेतनश्रेणीवर नेमले आणि या वेळेपासून माझ्यावरील अन्यायास सुरुवात झाली. वास्तविक पाहाता सदरहू संस्थेच्या रा. सं. चंडक प्रशालेमध्ये त्यावेळी असलेल्या २३ शिक्षक स्टापपैकी एकही अनुसूचित

जातीपैकी शिक्षक नव्हता. शासनाच्या आदेशानुसार व भारतीय राज्यघटनेप्रमाणे अनुसूचित जातीची शिक्षक संख्या शेकडा १३ इतकी असावयास हवी होती. म्हणजे प्रशालेतील एकूण २३ शिक्षकांपैकी नियमानुसार ३ शिक्षक अनुसूचित जातीपैकी नेमावयास हवे होते. पण माझेशिवाय दुसरा शिक्षक अनुसूचित जातीपैकी नेमला गेला आहे. त्यामुळे एका शिक्षकाचा अनुशेष शिल्लक राहिला आहे. असे असताना माझी नेमणूक करताना संस्थेने मला माझ्या शैक्षणिक पात्रतेप्रमाणे म्हणजे बी. ए., बी. एड. शैक्षणिक पात्रता असल्याने मला प्रचलित नियम व कायद्याप्रमाणे प्रशिक्षित पदवीधर शिक्षकाची वेतनश्रेणी देण्याचे टाळून मी केवळ अस्पृश्य जातीपैकी महार जातीचा असल्यानेच मला घटना व कायद्याप्रमाणे न्याय देण्याचे नाकारून भेदाभेद केला आहे. जातीय विषमता जोपासली गेली आहे. अस्पृश्यतेशिवाय दुसरे सबळ कारण मला दिसून येत नाही.

मा. शिक्षणाधिकारी, जि. प. ( माध्यमिक ) यांनी जा. क्र. जिपसो/शिक्षण मा. ४–५०१ दि. १६–१०–८५ रोजी मला प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी द्यावी असा हुकूम दिला असतानाही या हुकूमाची अंमलबजावणी केली गेली नाही. याचे कारणही अस्पृश्यतेशिवाय दुसरे असू शकत नाही. मला न्याय नाकारण्याचे हे एकमेव कारण आहे. नागरी हक्क संरक्षण कायद्याप्रमाणे हा गंभीर स्वरूपाचा दखलपात्र गुन्हा आहे.

सोलापूर एज्युकेशन सोसायटी संचलित रा. सं. चंडक हायस्कूल हे सोलापूरातील सम्राट चौकाचे बाजूला असून या हायस्कूल सभोवताली अनुसूचित जातीपैकी महार, मांग, चांभार, ढोर या अस्पृश्य जातींच्या वसाहती आहेत. आणि या भागातील रा. सं. चंडक हायस्कूल शिक्षणाचे एकमेव केंद्र आहे. बहुसंख्य मुले आणि मुली चंडक हायस्कूलमध्येच शिक्षण घेतात. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक दृष्टीने रा. सं. चंडक हायस्कूलमधील विद्यार्थी, विद्यार्थीनी मागासलेल्या आहेत. यामुळे या विद्यार्थी–विद्यार्थीनींच्या सर्वांगीण प्रगतीची दारे खुली करण्याचे काम,समतेच्या संस्काराचे काम या शैक्षणि केंदाकडून अपेक्षित आहे. पण सोलापूर एज्युकेशन सोसायटी ही शिक्षणसंस्था उच्चवर्णीय सवर्ण लोक चालवित असून त्यांचेपैकी बहुसंख्य ए. आर. एस. एस. वाले अथवा त्यांचे सहप्रवासी कडव्या जातीचे सनातनी ब्राह्मण आहेत. असे हे संस्थाचालक वर्णवर्चस्वासाठी सातत्याने जागरुक आणि क्रियाशील असल्याने चंडक हायस्कूलमध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जातीपैकी महार, मांग, चांभार, ढोर इत्यादी अस्पृश्य जातींच्या मुला–मुलींना नेहमीच अस्पृश्यतेच्या, भेदाभेदाच्या भावनेतून वागविण्यात आलेले आहे. त्यांच्या या विचारसरणीमुळेच अशा या विद्यार्थी–विद्यार्थिनींच्या सामाजिक, शैक्षणिक विकास होऊ शकला नाही. याचा सबळ पुरावा द्यावयाचा झाल्यास गेल्या १० ते १५ वर्षांचा एस. एस. सी. चा निकाल निकृष्ट दर्जाचा

लागलेला आहे. यात संस्थेचे सर्व पदाधिकारी व अध्यक्ष तसेच कार्यवाह डॉ. प. गो. वळसंगकर हेच सर्वस्वी जबाबदार आहेत. त्याचे एकमेव कारण म्हणजे रा. सं. चंडक हायस्कूलमधील बहुसंख्य विद्यार्थी, विद्यार्थीनी अस्पृश्य जातीचे व त्यांना शिक्षण देणारे अस्पृश्यता, भेदाभेद मानणारे उच्चवर्णीय व आर. एस. एस. वादी कर्मठ ब्राह्मण समाजाचे. यामुळेच विद्यार्थ्यांचे जाणीवपूर्वक नुकसान करण्यात आलेले आहे.

याच सोलापूर एज्यु. सोसायटीच्या उच्चवर्णीय जातीयवादी पदाधिकाऱ्यांनी जातीयवादी हेतूने जाणीवपूर्वक आपल्याच संस्थेच्या रा. सं चंडक हायस्कूलमध्ये शिक्षकांची नेमणूक करताना वर्णवर्चस्त्राचा जातीयवादी दृष्टिकोन ठेऊनच बहुसंख्य उच्चवर्णीय सनातनी, कर्मठ ब्राह्मणांच्या नेमणुका केलेल्या आहेत. सदर शिक्षकांचाही दृष्टिकोन जातीयवादी व वर्णवर्चस्ववादी असल्याने त्यांनी ज्ञानदानाचे काम करताना या अस्पृश्य विद्यार्थ्यांकडे समतेने व मानवतेने पाहिले नाही. आपले ज्ञानदानाचे काम प्रामाणिकपणे केलेले नाही. अस्पृश्य विद्यार्थी विद्यार्थिनींचा तुच्छतेने अवमानच केलेला आहे. प्रशालेतील काही शिक्षकांनी "महारा–मांगाच्या मुलामुलींना शिकून काय करावयाचे आहे ? शेवटी तुम्ही कुठेतरी झाडूच मारणार ना ! तुमचा जन्म अत्यंत हलकीसलकी कामे करण्यासाठीच झालेला आहे. चांभाराच्या देवाला खेटराचीच पूजा केली पाहिजे" अशा तऱ्हेची तुच्छतेची वाक्ये उच्चारून, भेदाभेद निर्माण करून अवमानित केलेले आहे. खुद्द माझे बाबतीतही संस्था चालक व काही शिक्षक जातीय भावनेने मला अपमानित करण्यासाठी, माझी अवहेलना करण्यासाठी अत्यंत तुच्छतेची भाषा वापरून भेदाभेद करतात. "झाडू मारण्याची ज्यांना अक्कल नाही असे महार, मांग जातीचे लोक शिक्षणक्षेत्रात असल्यामुळेच शिक्षणाचे वाटोळे झाले आहे." अशा तऱ्हेचे जातीय भेदाभेदाचे उद्‌गार सतत ऐकवून मानहानी केली जाते. माझे शिक्षक सहकारी श्री. एल. एस. भोसले. श्रीमती बिदरकोटे यांचेसमोर अवमानित केले आहे. संस्थेच्या मिटिंग-मध्येही पदाधिकारी अशाच प्रकारचे अपशब्द वापरून अवमानित करतात व अस्पृश्यतेची, तुच्छतेची वागणूक मला देतात. सवर्ण शिक्षण संस्थाचालक व सवर्ण कर्मठ ब्राह्मण शिक्षक यांनी संनगमताने आपले वर्णवर्चस्व टिकविण्यासाठी तसेच माझे व प्रशालेतील विद्यार्थी–विद्यार्थीनींचे नुकसान करण्यासाठी व जातीय व्यवस्था टिकविण्यासाठी या सर्वांनी आपल्या कृतीने आणि वाणीने सातत्याने अस्पृश्यता पाळली आहे. याचे कागदोपत्री व तोंडी पुरावे मी आपल्यासमोर देण्यास तयार आहे.

सोलापूर एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेने वरील अस्पृश्यतेचे अनेक गुन्हे केलेले आहेत. माझे नेमणुकीनंतर मला प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी संस्थेने स्वतः होऊन तर दिली नाहीच पण शिक्षणाधिकारी यांनी आदेश

देऊनही दिली नाही. एवढेच नव्हे तर सहशिक्षक म्हणून माझ्या नेमणुकीस कायम स्वरूपी मान्यता असतानाही संस्थेने सन १९८४साली मला काहीही कारण नसताना कामावरून कमी केल्याची नोटीस दिली हा सुद्धा एक लेखी पुरावा आहे. त्यानंतर मी शिक्षणखात्याच्या न्यायाधिकरणाची दारे ठोठावून दाद मागून न्याय मिळविला.

शिक्षण न्यायाधिकारणाने मला न्याय दिल्यावर मी पूर्ववत सह. शिक्षक म्हणून प्रशालेत काम करीत असताना मला प्रशिक्षित पदवीधराची वेतनश्रेणी देण्यात येत नव्हती पण माझेनंतर नेमणूक झालेल्या अनेक सवर्ण शिक्षक–शिक्षिकांना माझी सेवाजेष्ठता डावलून प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी देण्यात आली हा सुद्धा भेदाभेद मानण्याचा, अस्पृशता पाळून अवमान करण्याचा गुन्हा संस्था चालकांनी केला आहे. यास कागदोपत्री पुरावे आहेत. त्यानंतर मी प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी मिळावी म्हणून व त्याचवेळी मुख्याध्यापकाची जागा जुलै १९८७ रोजी रिक्त झाली. श्री. डी. वी. सुर्डीकर हे मुख्याध्यापक पदावरून ३० जून ८७ रोजी सेवानिवृत्त झाले. या रिक्त झालेल्या मुख्याध्यापकांच्या जागेवर माझा घटना व कायद्याप्रमाणे न्याय्य हक्क होता. म्हणून मी संस्थेकडे मुख्याध्यापक पद मिळावे म्हणून अर्ज दिला पण संस्थेने मागासवर्गीयासाठी निर्माण झालेली मुख्याध्यापक-पदाची जागा मला दिली नाही. यामुळे संस्थेने जातीभेद पाळून माझ्यावर अन्याय केला याचाही पुरावा माझेकडे आहे. त्यानंतर संस्था मला मी केवळ अस्पृश्य असल्याने जातीयवादी भूमिकेतून मला न्याय देत नाही, भेदाभेद करते म्हणून मी सोलापूर येथील दिवाणी कोर्टात दावा दाखल करून संस्थेने नेमलेल्या उच्चवर्णीय सवर्ण कर्मठ ब्राह्मण श्री. वाय. आर. देशपांडे यांच्या मुख्याध्यापकपदाच्या नेमणुकीस स्थगिती मिळविली.पण नंतर 'या कोर्टाच्या कार्यकक्षेत मुख्याध्यापकपदाचा प्रश्न येत नाही" या सबबीवर माझा दावा फेटाळला गेला. योगायोगाने माझा दावा फेटाळून लावणारे न्यायमूर्तीही देशपांडे आडनावाचे ब्राह्मण जातीचेच होते ही केवळ वस्तुस्थिती म्हणून आपल्यापुडे मांडत आहे.नंतर माझा दावा फेटाळल्यावर मी मला घटनेने दिलेल्या मागासवर्गीयांना समानसंधी व न्याय्य हक्कासाठी, मुख्याध्यापकपद हे प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणीसह मिळावे म्हणून मा. मुंबई उच्च न्यायालयाकडे दि. १९–८–८७ रोजी नं. ४०७९/८७ ची याचिका दाखल केली. या प्रकरणाची सुनावणी होऊन मा. मुंबई उच्च न्यायालयाने मागासवर्गीय म्हणून मला मिळत असलेला मुख्याध्यापकपदाचा व वेतनश्रेणीचा न्याय्य व समानसंधीचा हक्क मान्य करून मला प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी देऊन मुख्याध्यापक म्हणून १ जुलै १९८७ पासून मागील सर्व लाभासह नेमणूक करण्याचा संस्थेस आदेश दिला. मा. मुंबई उच्च न्यायालयाने सदरचा निर्णय देऊनही संस्थेने मला वेतनश्रेणी व मुख्याध्यापकपद देण्याची तब्बल दोन महिने टाळाटाळ केली. याचे कारणही मी केवळ हिंदू–महार जातीचा असल्याने मुख्याध्यापकासारख्या मोठ्या

व मानाच्या पदावर नेमणूक करण्याची टाळाटाळ म्हणजे भेदाभेद व अस्पृश्यता पाळण्याचाच प्रकार होय. हा हायकोर्टाचा फार मोठा अवमान होता. याचा विश्वसनीय सबळ पुरावा आहे. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाचा अवमान केला म्हणून संस्थेविरुद्ध मी मुंबई उच्च न्यायालयामध्ये अर्ज दाखल केला. ( दि. १८–११–८७ ) ( कंटेम्प्ट ऑफ कोर्ट ) हे कळताच उच्च न्यायालयातील संस्थेचे वकीलांनी दंड आणि शिक्षा होण्याची जाणीव संस्था चालकांना तात्काळ करून दिल्याने संस्थेने नाईलाजाने मला मुख्याध्यापकपदावर नेमणूक केल्याचा तातडीने आदेश दिला. (दि. १८–११–८७ रोजी) तेव्हापासून आजतागायत मी मुख्याध्यापक म्हणून काम पाहात आहे.

मुख्याध्यापक म्हणून काम पहात असताना संस्था व संस्थेचे पदाधिकारी यांनी संगनमताने व मला कार्यक्षमतेने काम करता येऊ नये म्हणून प्रशालेच्या सर्व वर्गखोल्या, शैक्षणिक साहित्य, ऑफिसिअल साहित्य, प्रयोगासाठीचे साहित्य व इतर अनेक शैक्षणिक साहित्याची लेखी व तोंडी अनेकदा मागणी करूनही अद्याप चार्ज दिलेला नाही. गेल्या शैक्षणिक वर्षात सुमारे वर्षभर शिक्षण संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी चेकवर सह्या करण्याचे जाणूनबुजून नाकारले आहे. त्यामुळे प्रशालेच्या पाण्याची व विजेची बिले मला देता आलेली नाहीत व त्यामुळे सुमारे ८ महिन्यापासून शाळेचा वीजपुरवठा व पाणीपुरवठा खंडित केला गेला आहे. रा. सं. चंडक प्रशालेतील जवळ जवळ सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनी मागासलेले व अस्पृश्य असल्याने संस्था व पदाधिकाऱ्यांनी मुद्दामच आतीयवादी भुमिकेतून माझा व विद्यार्थ्यांचाही वीज व पाणी पिण्याचा हक्क नाकारलेला आहे.

गेले वर्षभर इ. १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी मराठी, इतिहास व इंग्रजी या विषयासाठी शिक्षक नेमण्याविषयी संस्था व पदाधिकारी यांना अनेकदा कळवूनही शिक्षक नेमले गेले नाहीत. त्यामुळे १० वी तील दलित विद्यार्थ्यांचे व विद्यार्थीनींचे संबंधित शिक्षकांअभावी कधीही भरून न येणारे शैक्षणिक नुकसान झालेले आहे व हे नुकसान मुद्दामच जाणूनबुजून केले गेलेले आहे. याला अस्पृश्यतेशिवाय दुसरे कारण असूच शकत नाही.

तसेच १० ऑगस्ट १९८९ रोजी संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजीत देसाई व कार्यवाह डॉ. प. गो. वळसंगकर हे भाजपाचे नगरसेवक श्री. नरसिंग मेंगजी, संस्थेचे उपाध्यक्ष श्री. ना. रा. आराध्ये, सुरेश तोरो व श्री. ज. भ. सुर्डीकर व अन्य काही लोक ७–८ पोलीस कॉन्स्टेबल, एक फौजदार असा फौजफाटा बरोबर घेऊन माझ्या कार्यालयात घुसले व मला दमदाटी देऊन एक बंद पाकीट देऊन एका कोऱ्या कागदावर माझी सही मागू लागले. मी कोऱ्या कागदावर सही करण्यास नकार देताच संस्थेचे श्री. तोरो वगैरे पदाधिकारी माझ्या अंगावर धावून आले व मला दमदाटी देऊन व शिवीगाळ करून मला कोऱ्या कागदावर सही करण्यास

भाग पाडू लागले. परंतु तरीही मी कोणत्याही परिस्थितीत सही देत नाही हे पाहून बरोबर आणलेल्या फौजफाटयासहीत सर्वजण निघून गेले व दुसऱ्या दिवशी म्हणजे ११ ऑगस्ट ८९ रोजी सकाळी १०-०० वाजता पुन्हा काही गुंड व आर. एस. एस. च्या काही लोकांना बरोबर घेऊन सोबत ७-८ कुलुपे घेऊन गाडीत बसून शाळेत आले. कदाचित माझ्या ऑफिसची कुलुपे तोडून आपली आणलेली कुलुपे लावण्याचा व अशा तऱ्हेने जबरदस्तीने माझ्या कार्यालयाचा ताबा घेण्याचा त्यांचा बेत असावा. मी त्याचवेळी माझ्या काही सहकाऱ्यांसमवेत काही शालेय कामासाठी गेलो असताना तेथे हे सर्व दृश्य मला पहावयास मिळाले. तेथील हा सर्व देखावा पाहिल्यावर यांच्या मनात काही तरी काळेबेरे आहे असे वाटल्यावरून मी माझ्या कार्यालयासमोरील सेंट्रल हॉलमध्ये थांबलो. कार्यवाह डॉ. प. गो. वळसंगकर हे पॉलिटेकनिकच्या ऑफिसमध्ये गेले व पॉलिटेकनिकच्या काही शिपायांना सोबत घेऊन आले व माझ्या कार्यालयासमोरील चेंबरच्या लाकडी भिंतीवर तीन चार टाईप केलेली पत्रे चिकटवून लावली. नंतर मला कळले की, सदरच्या पत्रावरील मजकूर मला निलंबित करण्यात आल्याबद्दलचा होता. हा सुद्धा प्रकार जातीवादातूनच घडला आहे.

माझी मुख्याध्यापक पदावर दि. १८-११-८७ रोजी नेमणूक झाली. संस्था चालकांना व कार्यवाह डॉ. प. गो. वळसंगकर यांना आजवर अनेकदा कळवून, अर्ज, विनंत्या करून देखील दरवर्षी मला द्यावी लागणारी वार्षिक वेतनवाढ आजतागायत दिली नाही. गेली दोन वर्षे कारण नसताना माझ्या दोन वार्षिक वेतनवाढी मला दिलेल्या नाहीत. तसेच माझ्या पत्नीच्या आजारपणाच्या वेळी माझ्या भविष्य निर्वाह निधीच्या खात्यातील रक्कम कर्ज म्हणून काढण्यासाठीच्या अर्जावर कार्यवाह डॉ. प. गो. वळसंगकर व संस्थेचे पदाधिकारी यांनी सह्या केल्या नाहीत. त्यामुळे आजारपणात माझ्या पत्नीचे औषधोपचाराअभावी आत्यंतिक हाल झाले असे अनेक अमानुष छळाचे व आडवणुकीचे प्रकार संस्था व संस्थेचे पदाधिकारी वारंवार जाणीवपूर्वक करीत आहेत. या सर्वांचे कारण केवळ मी दलित समाजाचा असल्याने व मुख्याध्यापक म्हणून अधिकाराच्या व मानाच्या जागेवर बसलो आहे हेच आहे. म्हणून असे अमानुष अन्यायाचे व छळाचे प्रकार सातत्याने घडत आहेत.

मी मागासवर्गीय मुख्याध्यापक या मानाच्या अधिकाराच्या पदावर कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे परंतु संस्थेच्या इच्छेविरुद्ध असल्याने मुख्याध्यापकपद स्वीकारल्यानंतरही संस्थेने व प्रशालेतील २३ सवर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी संगनमताने कट करून माझा ऐनकेन प्रकारेन छळ करणे, मानहानी करणे, असहकार्य करणे इ. प्रकारे जातीय स्वरूपाचा त्रास देणे व जेणेकरून मी स्वत: होऊन मुख्याध्यापकपद व नोकरी सोडून निघून जावे अशी अमानुष परिस्थिती

सातत्याने निर्माण केली. यापैकी दि. २७/१०/८८ रोजी प्रशालेची प्रथम सत्र (सहामाही) परीक्षा चालू असताना विनाकारण अचानकपणे प्रशालेतील सुमारे सहा शिक्षकांनी १) श्री. देसाई, २) श्री. हलकुंडे, ३) श्री. जेऊरे, ४) श्री. उटगे, ५) श्री. देशमुख, ६) श्री. चव्हाण इ. सवर्ण शिक्षकांनी परीक्षेवर बहिष्कार टाकला. यामुळे त्या दिवशीची मराठी विषयाची परीक्षा घेता आली नाही. या विषयाची परीक्षा पुढे ३०/११/८८ रोजी घ्यावी लागली. या संबंधी संस्था व तिचे पदाधिकारी यांना शिक्षकांच्या या बहिष्कारासंबंधी कळवूनही संस्था चालकांनी त्यांचेवर शिक्षण कायद्याप्रमाणे कोणतीही शिस्तभंगाची अगर अन्य कारवाई केली नाही. एवढेच नव्हे तर साधी ताकीदही दिली नाही. यावरून शिक्षण संस्था, पदाधिकारी व शिक्षक यांनी संगनमताने मी केवळ अस्पृश्य जातीचा, मानाच्या व अधिकाराच्या मुख्याध्यापक या पदावर बसलो म्हणूनच हे घडवून आणले आहे. याशिवाय दुसरे कारण असूच शकत नाही.

यानंतर दि. १७–८–८९ ते २८–८–८९ पर्यंत एकूण १२ दिवस प्रशालेतील २३ सवर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी माझ्यावर व प्रशालेवर सामुदायिक बहिष्कार टाकून प्रशालेत गैरहजर राहिले. या बहिष्कारासंबंधी सोलापूर शहरातील दैनिक ' विश्व समाचार ' मध्ये दि. १९–८–८९ रोजी प्रशालेतील सामुदायिक बहिष्कारामध्ये सामील असलेले पत्र दै. विश्वसमाचारांमध्येही नोकरी करीत असलेले उच्चवर्णीय सवर्ण ब्राह्मण शिक्षक श्री. के. एस. वांगीकर यांनी ' चंडक प्रशाला शिक्षकांचा कामकाजावर बहिष्कार ' या मथळयाखाली मोठ्या फुशारकीने बातमी छापून आणली. त्यामुळे शहर व जिल्ह्यातील लाखो लोकांना बहिष्काराची बातमी समजली. त्यामुळे मी स्वतः दलित मुख्याध्यापक या नात्याने माझेवर व रा.सं.चंडक प्रशालेतील जवळ जवळ सर्व विद्यार्थी–विद्यार्थीनी दलित, अस्पृश्य असल्याने आम्हा सर्वांचा जाहीर अवमान झाला आहे. या १२दिवसांच्या काळात माझे व प्रशालेतील सर्व विद्यार्थी व विद्यार्थीनी यांचे कधीही न भरून येणारे नुकसान या २३ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले आहे. बहिष्कारात प्रत्यक्ष भाग घेतलेल्या या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नावे अशी आहेत. (१) पर्यवेक्षक– वाय. आर. देशपांडे (२) सहशिक्षक–एस.सी.शहा (३) सहशिक्षक–एम वी.देशमुख (४) सहशिक्षक–जी. आर. कुलकर्णी (५) सहशिक्षक एम. डी. कुलकर्णी (६) सहशिक्षक–के.एल. वांगीकर (७) सहशिक्षक–एम. वी. देशमुख (८) सहशिक्षक – एम. ए. दिंडोरे (९) सहशिक्षक – एस. व्ही. साखरे (१०) सहशिक्षक – व्ही. आर. कुलकर्णी (११) सहशिक्षक–आर. वाय. देवस्थळे (१२) सहशिक्षिका–सौ. के. ए. जी. बेंद्रे (१३) सहशिक्षिका – सौ. एस. एस. दोकडे (१४) सहशिक्षिका–सौ. एस. एन. चव्हाण (१५) सहशिक्षिका – सौ. के. एस. आलेकर (१६) सहशिक्षक – श्री. एस. एन. गणेचारी (१७) सिनिअर क्लार्क – श्री. आर. एन दुरुगकर

(१८) प्रयोगशाळा सहाय्यक – श्री. डी. वी. व्हनकळस (१९) नाईक – पी. डी. वाघमोडे (२०) शिपाई – आर. एन. कुलकर्णी (२१) शिपाई – वी. बी. उगळे (२२) शिपाई - वी. जी. घाडगे (२३) शिपाई एम. जी. नागटिळक या १२ दिवसांच्या बहिष्कार काळात मी मुख्याध्यापक या नात्याने या २३ जातीयवादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना " बहिष्कार मागे घेऊन शाळेत कामावर हजर राहाण्यासंबंधी दि. १८-८-८९ व २३-८-८९या दोन दिवशी अंडर पोस्टिंग सर्टिफिकेट पत्राद्वारे विनंती करुनही हे २३ शिक्षक व शिक्षकेतर कामावर हजर राहिले नाहीत. त्यांनी बहिष्कार चालूच ठेवला. त्यामुळे त्यांचा सदर वहिष्काराच्या व गैरहजेरीच्या काळातील पगार कपात केला आहे. कारण त्यांनी या काळात काही कामच केलेले नाही. अगर ते शाळेतही आलेले नाहीत. या बहिष्कार प्रकरणी मी मुख्याध्यापक या नात्याने (१) संस्थेस (२) सोलापूर एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी यांना जा. क्र. ६२८ दिनांक १७–८–८९ ने समक्ष व पत्राद्वारे यासंबंधी लेखी कळवूनही संस्था व पदाधिकारी यांनी प्रशालेतील २३ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शाळेत गैरहजर का राहिला ? मुख्याध्यापक व शाळेवर तुम्ही बहिष्कार का टाकला ? यासंबंधी व्यक्तीगत अथवा सामुदायिक, लेखी अथवा तोंडी साधी विचारपूसही केली नाही. तसेच बहिष्कार टाकू नका, कामावर हजर व्हा असेही सांगितले नाही. खरे तर शिक्षण कायद्याप्रमाणे अशा सामुदायिक गैरहजेरी प्रकरणी या २३ शिक्षक कर्मचाऱ्यांवर वेतनवाढ रोखणे, निलंबित करणे, ताकीद देणे, किंवा सेवा समाप्त करणे या तऱ्हेची कोणतीही कारवाई केली नाही. याउलट संस्था व तिचे पदाधिकारी यांनी डॉ. प. गो. वळसंगकर यांचे सोलापूर क्लिनीकमध्ये तसेच काळजापूर मारुती मंदिर (डफरीन चौक) या दोन्ही ठिकाणी या २३ जातीयवादी सवर्ण शिक्षक-कर्मचाऱ्यांना सामुदायिकरित्या बोलावून त्यांना बहिष्कार टाकून गैरहजर राहाण्यासंबंधी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी स्वत: जातीने व्यवस्थित राहून प्रोत्साहन दिले, धीर दिला. या वेळी माझे प्रशालेतील काही सहकारी शिक्षक हा प्रकार चोरून पाहात होते व ऐकत होते. यावरून शिक्षण संस्था, तिचे पदाधिकारी व २३ जातीयवादी सवर्ण व कर्मचारी यांनी सामुदायिक बहिष्काराचा पूर्वनियोजित कट रचून माझेवर व प्रशालेतील सर्व दलित विद्यार्थी व विद्यार्थीनींवर १२ दिवस बहिष्कार टाकला. यामुळे माझे व सर्व दलित विद्यार्थ्यांचे कधीही भरून न येणारे शैक्षणिक नुकसान व मानहानी झाली आहे. या प्रकरणी शिक्षण खात्यातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांना वारंवार कळविण्यात आलेले आहे.

प्रशालेची शालेय समिती ही प्रशालेच्या यशस्वी प्रशासनातील एक महत्त्वाची घटक आहे. संस्थेचे कार्यवाही डॉ. प. गो. वळसंगकर अध्यक्ष श्री. रणजित देसाई व त्यांचे अन्य सहकारी याही बाबतीत माझ्याशी असहकार

करून मला भयानक अडचणीत आणत आहेत. शालेय समितीच्या सभांना गैरहजर राहाणे, एकादे वेळेस हजर राहिलेस तर बेकायदेशीर बाबीबद्दल माझ्यावर दडपण आणणे, सदरच्या बेकायदेशीर बाबी करण्याचे मी नाकारले तर शाळा समितीची सभाच न होऊ देणे अशा तऱ्हेची क्रूर,अमानुष चेष्टा डॉ.वळसंगकर व त्यांचे सहकाऱ्यांनी चालविली आहे. उदा. दि. ९–९–८९ व दि. २३–६–८९ या दोन बैठका डॉ. वळसंगकर यांच्या संमतीने आयोजित करण्यात आलेल्या होत्या. असे असतानाही सदरच्या दोन्ही बैठका. डॉ. वळसंगकर व इतर पदाधिकाऱ्यांनी अत्यावश्यक असलेले कोणतेही निर्णय न देता उधळून लावल्या. दि. ९–९–८९ बैठकीत तर डॉ. वळसंगकर व अन्य पदाधिकाऱ्यांनी गैर हजर राहून जणू काही बैठकीवर बहिष्कारच घातला. त्यामुळे चेकवर सह्या न करणे, माझ्या बेकायदेशीरपणे रोखलेल्या दोन वेतनवाढी, वीज–पाणी बिल न भरल्यामुळे खंडित केलेला शाळेचा वीजपुरवठा व पाणीपुरवठा पुन्हा चालू करणे, प्रशालेची अनेक थकित बिले न भरल्यामुळे प्रशालेची अत्यंत अप्रतिष्ठा व नापत झालेली आहे. डॉ. वळसंगकरच्या एकूण वरील वर्तनामुळे प्रशालेच्या वरील अत्यावश्यक व महत्त्वाच्या बाबीसंबंधी कोणताही निर्णय होऊ शकलेला नाही.

या वरील नमूद अन्याय व छळ प्रकरणी जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (मा) श्री. तु. ना. लोंढे यांनी त्यांना असलेले कायदेशीर अधिकार वापरून मला न्याय देण्यास हेतुपर्वक टाळाटाळ करून दिरंगाई केली. उलटे सुलटे फिरविल्यामुळे संस्था व २३ सवर्ण शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी माझेवर बहिष्कार टाकला, छळ केला. त्या प्रकरणी मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) श्री. तु. ना. लोंढे यांनी आपले कायदेशीर अधिकार वापरून संस्था व शिक्षक – कर्मचारी यांचेवर कोणतीच कारवाई केलेली नाही. एवढेच नव्हे तर सोलापूर शहरातील रा. सं. चंडक हायस्कूलमध्ये स्वतः भेट देऊन चौकशी करण्याचे सौजन्य एकदाही दाखविलेले नाही. याउलट संस्था व संस्थेचे पदाधिकारी व २३ सवर्ण शिक्षक कर्मचारी यांनी संगनमताने सामुदायिक बहिष्कार टाकलेला असतानाही शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी त्याच्यावर अधिकारी या नात्याने नागरी हक्क संरक्षण कायद्याखाली गुन्हा दाखल केला नाही किंवा मला संरक्षण देण्यासंबंधी पोलीस खात्यास कळविले नाही. पण संस्था व पदाधिकारी व २३ सवर्ण शिक्षक–शिक्षकेतर कर्मचारी संगनमत करून त्यांनी केलेल्या फौजदारी गुन्हेगारी प्रकारास संरक्षण दिले व त्यांचा पगार काढण्यासंबंधी माझ्यावर बेकायदेशीर दडपण आणून, दमदाटी करून पगार काढण्यासंबंधी लेखी व तोंडी आदेश दिले. त्यामुळे मा. शिक्षणाधिकारी (माध्य.) श्री. तु. ना. लोंढे हे सुद्धा या गुन्ह्यामध्ये सहभागी आहेत.त्यामुळे इंडियन पिनल कोड कलम ३४ प्रमाणे यांनाही आरोपी करणे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

मी स्वतः अस्पृश्य जातीचा मुख्याध्यापक म्हणून रा. स. चंडक प्रशालेतील सर्व अस्पृश्य जातीतील विद्यार्थी–विद्यार्थिनी या आम्हा सर्वांचा अस्पृश्य म्हणून भेदाभेद करणे, छळ करणे, शाळेचे पाणी, वीज मुद्दाम खंडित करणे, वेतनवाढ रोखणे, शालेय साहित्याचा चार्ज न देणे,शिक्षकांच्या नेमणुका न करणे,शिक्षक-शिक्षकेतरांना बहिष्कारासंबंधी चिथावणी देणे व मदत करणे, त्यांचेवर कारवाई न करणे इ. प्रकारचे अस्पृश्यतेसंबंधी भेदाभेद मानायचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे केलेले आहेत. या मागील संस्था चालकांचा मुख्य उद्देश म्हणजे माझा आत्यंतिक मानसिक व शारीरिक छळ करणे, जेणेकरून या सर्व संस्थेच्या त्रासास कंटाळून मी मुख्याध्यापक पद सोडून जावे अथवा आत्महत्या करावी असाच असावा असे माझे स्पष्ट मत आहे, म्हणून १) सोलापूर एज्युकेशन सोसायटी सोलापूर २) संस्थेचे पदाधिकारी

| | |
|---|---|
| १) र. का. देसाई – अध्यक्ष | २) वा. ब. आराध्ये – उपाध्यक्ष |
| ३) सु. म. तोरो–चेअरमन | ४) डॉ. प. गो. वळसंगकर–कार्यवाह |
| ५) श्री. ज. भ. सुर्डीकर–सदस्य | ६) श्री. ह. मा. साळुंखे– सदस्य |
| ७) श्री. ह. वा. पवार– सदस्य | ८) डॉ. जवळगेकर– सदस्य |

बहिष्कारास सामील असणारे सर्व शिक्षक व कर्मचारी

| | |
|---|---|
| १) पर्यवेक्षक– वाय. आर. देशपांडे | २) सहशिक्षक– एस. सी. शहा |
| ३) सहशिक्षक– एम. बी. देशमुख | ४) सहशिक्षक– जी. एल. कुलकर्णी |
| ५) सहशिक्षक– एम. छी. कुलकर्णी | ६) सहशिक्षक– के. एल. वांगीकर |
| ७) सहशिक्षक– एम. जी. देशमुख | ८) सहशिक्षक– एम. ए. दिंडोरे |
| ९) सहशिक्षक– एस. व्ही. साखरे | १०) सहशिक्षक– व्ही. आर. कुलकर्णी |
| ११) सहशिक्षक– वाय. आर. देवस्थळे | १२) सहशिक्षका– सौ. एस. एन.चव्हाण |
| १३) सहशिक्षिका– सौ.एस.एस.रोकडे | १४) सौ. ए. जी. बेंद्रे |
| १५) सहशिक्षिका –सौ.के.एस आलेकर | १६) सहशिक्षक– श्री. एस.एन.गणेचारी |
| १७) सिनिअर क्लार्क– श्री. आर. एन. दुरुगकर | १८) प्रयोगशाळा सहाय्यक– डी. बी. व्हनकळस |
| १९) नाईक– पी. डी. वाघमोडे | २०) शिपाई– आर. एन. कुलकर्णी |
| २१) शिपाई– बी. बी. उगळे | २२) शिपाई– बी. जी. घाडवे |

२३) शिपाई एम. बी. नागटिळक या प्रकरणी श्री. टी. एन. लोंढे–शिक्षणाधिकारी (माध्य.) या सर्वांनी सामुदायिकरित्या कट करून कोंडी केल्याने शैक्षणिक नुकसान होत असल्याने प्रशासक नेमून अनेक प्रश्न सोडविण्यासाठी तावडतोब कार्यवाही करावी ही विनंती.

आपला विश्वासू

श्री. एम. एस. बनसोडे

मुख्याध्यापक, रा. स. चंडक हायस्कूल, बुधवार पेठ, सोलापूर– २

स्मरणपत्र–१

क्रमांक/जबाबी/का. वि./१९१८/९०
सोलापूर दिनांक २७–९–९०

प्रति,

पोलीस निरीक्षक,
जेल रोड पोलीस स्टेशन यांचेकडे

विषय:–१) दलित मुख्याध्यापकावर बहिष्कार टाकून अनेक प्रकारे छळ प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश देणेबाबत. . . .

२) रा. स. चंडक हायस्कूल, प्रशासन नेमणेबाबत. . . .

संदर्भ :– इकडील सर्व शासकीय पत्र क्रमांक / जबाबी का. वि./ १७१७/९० सोलापूर दिनांक १२–९–९०

वर नमूद केलेल्या संदर्भीय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, आपणास इकडील कार्यालयीन पत्र क्रमांक/जबाबी/का वि/१७१७/९० सोलापूर दि. १२–९–९० अन्वये सविस्तर चौकशी करून कार्यवाही करून पूर्तता अहवाल देणेस कळविणेत आले होते. परंतु अद्याप आजतागायत चौकशी व कार्यवाही केलेली नाही. तरी आपण समक्ष सदर प्रकरणी दखल घेऊन दोन दिवसात गुन्हा दाखल करून कार्यवाही करून अहवाल सादर करणेत यावा.

तहसिलदार उत्तर सोलापूर

श्री. पां. ता. भंडारे
तहसिलदार
उत्तर सोलापूर.

तहसिल कार्यालय उत्तर सोलापूर
क्रमांक/जबाबी/कावि/१९११/९०
सोलापूर, दिनांक २२/१०/९०

विषय:–रा. स. चंडक हायस्कूल मागासवर्गीय मुख्याध्यापकावर बहिष्कार व छळ प्रकरणी गुन्हा दाखल करणेस टाळाटाळ करून मदत केली प्रकरणी पोलीस अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याचा आदेश होणेबाबत.

मान्यवर महोदय,

वर नमूद केलेल्या विषयान्वये आपणास सादर करणेत येते की, सदर बाबत इकडील कार्यालयाकडून पोलीस निरीक्षक जेलरोड पोलीस स्टेशन यांना क्रमांक जबाबी/कावि/१८१८/९० दिनांक २७/९/९० अन्वये अर्ध शासकीय देण्यात आले होते. त्यावर पोलीस निरीक्षक जेलरोड पोलीस स्टेशन यांचेकडून त्यांचेकडील पत्र क्रमांक/६चे५४ दिनांक १/१०/९० अन्वये मा. निवड श्रेणी पोलीस अभियंता सोलापूर यांचेकडे अवलोकनाकरीता पाठविणेत आले आहे असे त्यांनी कळविले आहे. सदरचा गुन्हा गंभीर असून तीन महिने झाले केवळ चौकशी चालू आहे असे कळविले जाते. त्यावर आजतागायत कार्यवाही काहीही झालेली नाही. सदरचा

गुन्हा जातीवादाचा सामाजिक गंभीर गुन्हा आहे. तरी सदरबाबत आपण स्वत: जातीने लक्ष घालून गुन्हेगारावर त्वरीत कार्यवाही करून पूर्तता अहवाल देणेस विनंती आहे. सोबत श्री. अंबादास सैंदू शिंदे, संपादक साप्ताहिक 'बंडखोर' यांनी दिलेले तक्रारी निवेदन सादर करणेत आले आहे.

आपला आज्ञाधारक
( पां. ता. भंडारे )

प्रति,
श्री. प्रकाशराव पवार
पोलीस अधिक्षक, सोलापूर

श्री. एम. एस. बनसोडे – मुख्याध्यापक
रा. सं. चंडक हायस्कूल, सम्राट चौक, सोलापूर
जा. क्र. १२६/९०–९१
दिनांक १/११/१९९०.

प्रति,
मा. शिक्षणाधिकारी ( माध्य. )
जिल्हा परिषद, सोलापूर
यांनी नम्र निवेदन तात्काळ कार्यवाहीसाठी सादर.

विषय : १) श्री. सु. नि. गणेचारी २) श्रीमती क. सो. आलेकर या दोन शिक्षकांच्या नेमणुका अस्तित्वात नसलेल्या संस्थेने केल्या असल्याने नेमणुका बेकायदा असून यामुळे आपण कामावर हजर करून घेण्याचा दिलेला आदेश बेकायदा असल्याने तो रद्द करणेबाबत.

संदर्भ : आपले पत्र क्र. जिपसो/शिक्षण/माध्य–६/७५०
दिनांक २९–१०–१९९०

महोदय,

आपणास या निवेदनाद्वारे सत्य परिस्थितीची कल्पना यावी म्हणून नम्रपणे खुलासा करीत आहे. याचा तातडीने विचार करून नि:पक्षपातीपणाने न्याय, नीती व नियम याला अनुसरून ताबडतोब कारवाई करावी एवढीच या निवेदनाची अपेक्षा आहे.

सोलापूरातील, सोलापूर एज्युकेशन सोसायटी ही शिक्षणसंस्था सन १९३३ साली रजिस्टर एफ ८ प्रमाणे पब्लिक ट्रस्ट कायद्याप्रमाणे नोंदलेली आहे. या संस्थेची घटना व नियम यांचा अभ्यास केल्यास सदरहू संस्थेचे लाईफ मेंबर हे शिक्षणसंस्थेत काम करणारे शिक्षक कर्मचारी असावेत असे स्पष्टपणे नमूद आहे. अनेक वर्षे याप्रमाणे कारभार चालला. पण नंतरच्या काही वर्षांत शहरातील

काही जातीयवादी व धनदांडगे लोक या संस्थेत अनाधिकृतपणे घुसून आम्हीच संस्था आहेत असे भासवून बेकायदा चॅरिटी कमिशनरची मंजुरी नसताना अनेक वर्षे घटना,नियम डावलून मनमानी पद्धतीने कारभार करीत आलेले आहेत. याचेच उत्कृष्ट उदाहरण म्हणजे (१) श्री. सु. नि. गणेचारी (२) श्रीमती क. सो. आलेकर यांच्या बेकायदा नेमणुका होत. म्हणून या बेकायदा नेमणूक प्रकरणी आपण तातडीने चौकशी करून त्यांना गेल्या दोन वर्षांत दिलेला पगार वसूल करण्याची कारवाई करावी व आपण दिलेला हजर करून घेण्याचा दिनांक २९-१०-९० चा आदेश तावडतोव रद्द करावा व या दोन शिक्षकांना कोणत्याही प्रकारचे संरक्षण देऊ नये असे मला वाटते.

सोलापूर एज्युकेशन सोसायटी या शिक्षण संस्थेच्या अस्तित्वासंबंधी या सोबत सार्वजनिक विश्वस्त संस्था नोंदणी पुस्तकातील अधिकृत उतारा जोडलेला आहे. याचा अभ्यास केला असता दिनांक ३-१-१९८९ पर्यंत संस्थेचे पदाधिकारी व इतर सदस्य असे एकूण १४ विश्वस्त आणि व्यवस्थापक आहेत. त्यांची नावे येणेप्रमाणे (१) दिवाण बहादूर लिमये- अध्यक्ष (मयत) (२) श्री. एस. एन. जमादार- चेअरमन (मयत) (३) श्री. व्ही. जी. वैशंपायन- सदस्य (मयत) (४) श्री. सी. एम. वारद- सदस्य ( अत्यवस्थ ) (५) श्री व्ही. बी. साठे - सदस्य (मयत) (६) श्री. एस. एम. सरदार- सदस्य (मयत) (७) श्री. के. डी. देसाई- सदस्य (अत्यंत वयस्कर) (८) श्री. बी. एन. जक्कल सदस्य- (मयत) (९) श्री. टी. जी. सोहनी- सदस्य ( अत्यंत वयस्कर व बाहेरगावी ) (१०) श्री. एस. व्ही. काळे- सदस्य (अत्यंत वयस्कर व बाहेरगाव) (११) श्री. वाय. बी देवस्थळे- सदस्य (मयत) (१२) श्री. एल. आर. कडुसकर - सदस्य (मयत) (१३) श्री. एस. व्ही. इराबत्ती- को. ऑप्ट सदस्य ( कधीच हजर नाहीत ) (१४)श्री. व्ही. बी. कोंडा- को. ऑप्ट सदस्य (कधीच हजर नाहीत.) या नमूद एकूण १४ विश्वस्त आणि व्यवस्थापक कमिटीपैकी फक्त चारच म्हणजे (१) के. डी. देसाई (२) सी. एम. वारद (३) श्री. टी. जी. सोहोनी (४) एस. व्ही काळे हे अत्यंत वयस्कर, काम न करण्याइतपत अकार्यक्षम असून ते कधीच कोणत्याच मिटिंगला हजरनसल्याचे कळते. बाकीचे राहिलेले सुमारे ८-९ सदस्य तर मयतच झालेले आहेत असे असताना व संस्थाच अस्तित्वात नसताना या वरील दोन शिक्षकांच्या नेमणुका कोणी व कशा केल्या समजत नाही, म्हणून यांच्या नेमणुका बेकायदा असून त्यांना दिलेला पगारही बेकायदा दिलेला आहे. अशा परिस्थितीत त्यांनी अस्पृश्यतेसंबंधी बहिष्कारासारखा सामाजिक गंभीर गुन्हा केला असल्याने हे दोघे शिक्षक हंगामी असल्याने नियमाप्रमाणे ठराव करून कमी केलेले आहे. याबाबत शिक्षणखात्याला या दोघांना कामावर घ्या म्हणण्याचा कोणताही अधिकार नाही.

या वरील नमूद दोन शिक्षकांना कामावर हजर करून घ्या व त्यांचा पगार काढा असा संस्थेने दिलेला आदेश हा चुकीचा व बेकायदा असून संस्थेच्या आधाराने आपण या दोन शिक्षकांना कामावर हजर करून घ्या म्हणून काढलेला आदेशही चुकीचा व बेकायदेशीर आहे. याचे कारण असे की, दि. १६–६–८९ पर्यंत मा. असि. चॅरिटी कमिशनर, सार्वजनिक विश्वस्त संस्था यांनी सध्या बेकायदा अस्तित्वात असलेल्या (१) रणजितभाई देसाई–अध्यक्ष (२) नानासाहेब आराध्ये–उपाध्यक्ष (३) डॉ. प. गो. वळसंगकर– सचिव (४) सुरेश तोरो – चेअरमन इत्यादी सदस्यांना कायदेशीररित्या मा. असि. चॅरिटी कमिशनर यांची मंजुरी नव्हती. हे वरील सर्वजण बेकायदा, मनमानी कारभार करीत होते. यामुळे या वरील नमूद पदाधिकाऱ्यांना आपणाकडे किंवा कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याकडे किंवा कोर्टाकडे पत्रव्यवहार करण्याचा, एकाद्या विषयावर निर्णय घेण्याचा किंवा कर्मचाऱ्यावर कारवाई करण्याचा, नेमणुका करण्याचा अधिकार नव्हता. यामुळे या वरील नमूद दोन शिक्षकांना नेमणुका करण्याचा कसलाही अधिकार नव्हता हे आपण कागदपत्राची तपासणी केल्यानंतर दिसून येईल. असे अनेक बेकायदा व मनमानी निर्णय घेतलेले आहेत. हजारो रुपयांचे गैरव्यवहार केलेले आहेत. या प्रकरणी मी मुंबई उच्च न्यायालय व इतर न्यायालयात दिवाणी व फौजदारी स्वरूपाची कारवाई करीत आहे. यामुळे आपण आपल्या आदेशाची बेकायदा अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न करू नये, ही आग्रहाची विनंती. एवढेच नव्हे तर आपण दिलेला बेकायदा आदेश ताबडतोब रद्द करणे जरुरीचे आहे.

वरील नमूद दोन शिक्षकांनी आपणास बेकायदा कमी केले म्हणून मुंबई हायकोर्टाकडे धाव घेतली होती. मुंबई हायकोर्टाने या प्रकरणी हस्तक्षेप करण्यास नकार देऊन रिटपिटीशन काढून घेण्यास सांगितले होते. याप्रमाणे रिटपिटीशन काढून घेण्यात आलेले आहे. यारिटपिटीशनप्रमाणे मुंबई हायकोर्टाने मुख्याध्यापकास कामावर हजर करून घ्या म्हणून आदेश दिलेला नाही हे कृपया आपण अवलोकन करावे. म्हणजे आपला आदेश चुकीचा व बेकायदा असल्याचे स्पष्ट होते. म्हणून आपण या दोन शिक्षकांना कामावर हजर करून घ्या असा दिलेला आदेश ताबडतोब रद्द करावा अशी विनंती आहे.

सोलापूर एज्युकेशन सोसायटी शिक्षण संस्थेचे सोलापुरातील शा. सं. चंडक हायस्कूल हे अनेक वर्षांपासून चालविले जाते. यामध्ये जवळजवळ ७०० विद्यार्थी, विद्यार्थीनी अनुसूचित जाती जमातीपैकी अस्पृश्य समजली जाणारी आहेत. या प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. एम. एस. वनसोडे मी सुद्धा मागासलेल्या जातीपैकी हिंदू–महार या अस्पृश्य गणलेल्या जातीचे आहेत. ( स्वतः ) रोस्टरप्रमाणे माझी मुख्याध्यापक म्हणून नेमणूक व्हावी व बी. एड. वेतन श्रेणी मिळावी म्हणून मुंबई हायकोर्टाकडे दिनांक १९–८-८७ रोजी नंबर ४०७९/८७ ही याचिका

दाखल केली होती. या प्रकरणी मला बी. एड. वेतनश्रेणी देऊन मुख्याध्यापकपदी नेमावे असा आदेश हायकोर्टाने दिला. तरीही नेमणूक करण्यास टाळाटाळ केली. शेवटी नाईलाजाने मुख्याध्यापकपदी नेमावे लागले. तेव्हापासून आजपर्यंत मुख्याध्यापक म्हणून काम पाहात आहे. मुंबई हायकोर्टाच्या आदेशाप्रमाणे मला अजूनही शालेय शैक्षणिक साहित्य व वर्ग खोल्या यांचा अद्याप चार्ज दिलेला नाही. याचे कारण असे की, शिक्षण संस्था हे अस्पृश्यता मानणाऱ्या उच्चवर्गीय सवर्णांची आहे. त्यांना माझ्यासारखा मागासवर्गीय अस्पृश्य मुख्याध्यापक नको आहे. शाळेतील सर्व मुले/मुली मागासलेल्या अस्पृश्य जातीचे असल्यामुळेच यांना चांगले शिक्षण द्यावयाचे नाही. चांगल्या सुविधा द्यावयाच्या नाहीत. यामुळे गेली कित्येक वर्षे रा. चंडक हायस्कूलचा निकाल अतिशय निकृष्ट लागलेला आहे. अनेक वर्षे शाळेचा निकाल ० ते१० टक्के इतकाच लागलेला आहे. यावरून शिक्षण संस्थेची व त्यांच्या पदाधिकाऱ्यांची जातीयतेची प्रवृत्ती स्पष्ट होते. या वरील सर्व प्रकरणी आपण व आपल्यासारख्यां शिक्षण खात्यातील अनेक वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी माणुसकी म्हणून सुद्धा शिक्षणसंस्था चालकाला केव्हांही जाब विचारला नाही, साधी चौकशी केली नाही. याउलट या वरील सर्व गुन्ह्यांना शिक्षण खात्याने पांघरूणच घातले आहे असे खेदाने म्हणावे वाटते. पण हे दोन शिक्षक(१)श्री. सु.नि.गणेचारी(२) श्रीमती क. सो. आलेकर या दोघांनी सामाजिक बहिष्कारासारखा गंभीर गुन्हा करूनही, यांच्या नेमणुका बेकायदा असूनही, मुंबई हायकोर्टाने कोणताही आदेश दिला नसताना या दोघा शिक्षकांच्या बाबतीत एवढे गुन्हे करूनही यांना कामावर हजर करून घ्या अन्यथा माझ्यावर कारवाई करू असा तातडीचा आदेश कसा काय निघू शकतो ? याचा एकमेव अर्थ हे शिक्षक सवर्ण असून संस्थाचालक सवर्ण आहेत आणि शिक्षण खात्यातील आदेश देणारे अधिकारीही सवर्ण आहेत. म्हणूनच हा आदेश चुकीचा, बेकायदा व पक्षपाती निघालेला आहे व त्याची ताबडतोब अंमलबजावणी करण्यासाठी माझेवर शिस्तभंगाची कार्यवांही करण्याची धमकी आदेशात दिलेली आहे ती केवळ आपले या सर्व जणांच्या जातीयतेच्या धोरणाचा परीपाक आहे. असे खेदाने म्हणावेसे वाटते.

शिक्षण संस्थेच्या रा. सं. चंडक हायस्कूलमधील २३ सवर्ण शिक्षक व कर्मचाऱ्यांनी माझेवर मी केवळ अस्पृश्य जातीचा हिंदू–महार असल्याने संस्थेच्या सांगण्यावरून व चिथावणीने दिनांक १७-८-८९ ते २८-८-८९ पर्यंत एकूण १२दिवस घोषित बहिष्कार घातला व सामाजिक गंभीर गुन्हा केला. या प्रकरणी मी वेळोवेळी रिपोर्ट देऊनही आपण व आपले खात्यातील कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याने शाळेला भेट देऊन चौकशी करून बहिष्कार प्रकरणी कारवाई करण्याचे माणुसकी या नात्याने सौजन्यही दाखविले नाही. एवढेच नव्हे तर बहिष्कार टाकवलेल्या २३ शिक्षक कर्मचाऱ्यांना आपल्या खात्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी

या २३ शिक्षक कर्मचाऱ्यांना पगार काढण्याचा दोन वेळा लेखी आदेश दिला. व पगार आदा करण्यासंबंधी समक्ष व फोनवरून अनेकवेळा दमदाटी केली. माझे सही शिक्का नसलेले पगार बिल सादर करून गुपचुप पगार काढण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. याचे कागदोपत्री पुरावे आमचेकडे आहेत. या बहिष्कार प्रकरणी आपण चौकशी करून जातीयवादी संस्था चालक व २३ शिक्षक कर्मचारी यांचेवर बहिष्काराचा गुन्हा का दाखल केला नाही ? याचे आश्चर्य वाटते. कमीत कमी आपणासारख्या शिक्षणाधिकाऱ्यांनी शिस्तभंगाची कारवाई म्हणून तेवीस शिक्षक कर्मचाऱ्यांवर कारवाई करा असा एकादा हुकूम कधी निघाला नाही. यावरून आपण (१) मा. श्री. जोशीसाहेब– शिक्षणाधिकारी ( माध्य. ) (२) मा. श्री. शेखसाहेब–उपशिक्षणाधिकारी (माध्य.) जातीयवादी संस्था चालक व जातीयवादी २३ शिक्षक कर्मचारी की ज्यांनी सामाजिक बहिष्कार टाकून अस्पृश्यतेचा गुन्हा केला. यांचेच पाठीराखे आहात हे आपण श्रीमती आलेकर व श्री. गणेचारी यांना कामावर हजर करून घ्या अशा दिलेल्या आदेशामुळे स्पष्ट होते. यामुळे आपणही बहिष्कारासारख्या गुन्ह्याला मदत करून संरक्षण देत आहात. त्यांचेवर कारवाई करीत नाहीत. कारवाई करण्याचा आदेश देत नाहीत म्हणून सामुदायिक जबाबदारीच्या तत्त्वानुसार आपणसुद्धा नागरी हक्क संरक्षण कायद्याप्रमाणे या बहिष्कारा प्रकरणी आरोपी म्हणून समाविष्ट करून घेणे मला भाग पडेल. या बहिष्कार प्रकरणी यापूर्वी पोलीस चौकशी चालू असून बहिष्कार प्रकरणी दोषी लोकावर गुन्हा दाखल करावा असे आदेश श्रीयुत पी. टी. भंडारे तहसीलदार उत्तर सोलापूर व कार्यकारी दंडाधिकारी यांनी जेलरोड पोलीस इन्स्पेक्टर व पोलीस अधिक्षक जिल्हा सोलापूर यांना तीन वेळेला (१) क्रमांक जबाबी/का वि/१८१८/९० दि. २७–९–९० (२) क्रमांक ६४५४ दिनांक १–१०–९० (३) क्रमांक जबाबी/कावि/१९१९/९० दि.२२–१०–९० या अन्वये दिलेले आहेत. या प्रकरणी कारवाई निश्चितच होईल. या प्रकरणात आपल्या खात्याचे वरिष्ठ अधिकारी (१) श्रीयुत टी. एन. लोंढे यांनी बहिष्कार टाकलेल्या २३ शिक्षक कर्मचाऱ्यांचे पगार अदा करण्याचे आदेश मुख्याध्यापकांना दिल्याने यांनाही आरोपी करावे असे तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांनी म्हटले आहे. (२) बहिष्कार प्रकरणी जेलरोडचे पोलीस इन्स्पेक्टर श्री. कल्याणराव मोरे यांनी बहिष्काराचा गुन्हा दाखल करण्यास अक्षम्य टाळाटाळ केली. आरोपीना संरक्षण दिले म्हणून त्यांचेवरही व त्यांचे कनिष्ट फौजदार श्रीयुत जाधवसो यांचेवरही गुन्हा दाखल करावा असा आदेश श्रीयुत पी. टी. भंडारे तहसिलदार व तालुका कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिला आहे. या बहिष्कार प्रकरणी आपणही या आरोपीना संरक्षण देण्याचाच प्रयत्न करीत आहात असे आपल्या दिनांक २९–१०–९० च्या आदेशाने स्पष्ट होते. म्हणून आपणही या

गुन्ह्यात सहभागी असल्याचे स्पष्ट झाल्याने आपल्यावरही पोलीस कारवाई करणे न्यायाच्या दृष्टीने मला आवश्यक वाटते. या अगोदर आपण दिलेला आदेश रद्द केल्यास मला फेर विचार करता येईल. या प्रकरणी आपण जरूर फेरविचार करावा व हजर करून घेण्याचा दिलेला आदेश तावडतोब रद्द करावा.

या वरील नमूद बहिष्कार प्रकरणाव्यतिरिक्त माझेवर संस्थेचा व शिक्षकांचा जातीयतेच्या भूमिकेतून जुलूम व छळ चालू आहे. (१) माझी वार्षिक वेतनवाढ देणे (२) प्रा. फंडातील रक्कम काढण्यास मंजूरी न देणे (३) शालेय खर्चासाठी चेकवर सह्या न करणे (४) शाळेचा पाणीपुरवठा बंद करणे (५) शाळेत विजपुरवठा बंद करणे (६) शाळेत शिक्षकांची नेमणूक न करणे (७) शाळेतील सवर्ण शिक्षकांना माझे विरुद्ध जातीयवादातून चिथावणी देऊन सहककार्य न करण्यास भाग पाडणे इत्यादी अनेक प्रकारे अस्पृश्यतेच्या भावनेतून जुलूम व छळ चालू आहे. या नमूद सर्व प्रकरणी आपणाकडे व शिक्षणखात्यातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्याकडे अनेक वेळा पत्रव्यवहार केला आहे. समक्ष भेटून अन्याय कथन केला आहे. तरीही या प्रकरणी आपण किंवा कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी न्यायाची चीड, चाड म्हणून किंवा माणुसकी म्हणून साधी चौकशी करून सवर्ण संस्था चालक तसेच २३ शिक्षक कर्मचारी यांना साधी ताकीद देण्याचेही धाडस कधी केले नाही. याचा अर्थ मी निश्चितपणे समजून घेऊ शकतो. आपण व आपले खाते केवळ पक्षपातीच नव्हे तर जातीयवादी लोकांचे आहे, अशांचीच कामे होतात हे स्पष्ट झाले आहे. आपण संस्थाचालक व २३ शिक्षक कर्मचारी यांचेवर शिस्तभंगाची किंवा बहिष्काराचा गुन्हा दाखल करण्याचे धाडस करू शकाल काय? अद्याप तरी हे झालेले नाही.

वरील नमूद सर्व प्रकरणी शिक्षण खात्यात, वर्तमानपत्रात व सरकार दरबारी गाजत असताना आपले खात्यातील वरिष्ठ अधिकारी (१) श्री. टी. एन. लोंढे – शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद (२) श्री. शेख – उपशिक्षणाधिकारी (माध्य.) सोलापूर यांनी याच काळात प्रत्येकी २० हजारांचे कर्ज म्हणून जनता बँक, सोलापूर यांचेकडून घेतल्याचे समजते. यातले खरे काय ? आणि या भांडण तंटयाच्या काळातच या दोन अधिकाऱ्यांनी शिक्षण संस्थेचे कार्यवाह– डॉ. प. गो. वळसंगकर यांनी स्थापन केलेल्या जनता बँक सोलापूरकडूनच कर्ज का घेतले ? या कर्जाचे हप्ते परतफेड म्हणून कोण भरतो ? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. हेच अधिकारी सोलापूर शिक्षण खात्यात वरिष्ठ अधिकारी असताना जातीयवादी संस्था चालक व २३ शिक्षक कर्मचारी ज्यांनी बहिष्कार घातलेला आहे यांचे बाजूने त्यांनी गुन्हे केलेले असतानाही कसे काय निर्णय घेतात ? यांचे हिताचे व फायद्याचे आदेश देतात पण माझ्यासारख्या अस्पृश्य मुख्याध्यापकावर बहिष्कारापासून अनेक छोटे मोठे अस्पृश्यतेचे गुन्हे सवर्ण संस्था चालक व २३ सवर्ण शिक्षक कर्मचाऱ्यांनी

करूनही त्यांच्यावर कशी कारवाई होत नाही. याचा संबंध २० हजार रुपये कर्ज घेतलेल्या कर्जाशी तर येत नाही ना ?अशी साधार भीती वाटते. नि:पक्षपातीपणाने चौकशी केल्यास या प्रकरणी कागदोपत्री पुरावे निश्चितच मिळतील.

सध्या शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) या पदाचा चार्ज घेतलेले प्राथमिक शिक्षणाचे शिक्षणाधिकारी मा. श्री. जोशीसाहेब हे अधिकारावर आल्याबरोबरच बहिष्कार टाकलेल्यापैकी श्रीमती आलेकर (२) श्री. गणेचारी यांना कामावर हजर करून घेण्याचे आदेश तातडीने कसे काय निघाले ? यामधील संस्थेचे सचिव डॉ. प. गो. वळसंगकर बहुसंख्य बहिष्कार टाकलेले २३ शिक्षक कर्मचारी यांची असलेली ब्राह्मण जात व सध्या शिक्षणाधिकारी (माध्य.) म्हणून असलेले मा. श्री. जोशीसाहेब यांची जातकुळी जर तपासली तर ती एकच आहे म्हणून असे चुकीचे व बेकायदेशीर आदेश निघतात. बरिष्काराला, जातीवादाला खतपाणी घातले जाते. माझेवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची लेखी धमकी दिली जाते हे सर्व आपल्या सर्वांच्या जातीवादाचा परिपाक आहे. असे नाइलाजाने म्हणावेसे वाटते.

तरी वरील नमूद सर्व प्रकरणी आपण सुनावणी घेऊन कागदपत्राची व परिस्थितीची फेर तपासणी करावी, माझेकडील पुरावे दाखल करून घ्यावेत, मला बाजू मांडण्याची संधी द्यावी मगच निर्णय घ्यावा, माझे प्रशालेतील दोन शिक्षक (१) श्री. सु. नि. गणेचारी (२) श्रीमती क. सो. आलेकर यांना हजर करून घेण्यासंबंधी दिलेला आदेश ताबडतोब रद्द करावा व माझेवर कोणतीही कारवाई करू नये. माझेवर कारवाई केल्यास मला मुंबई हायकोर्टात याचिका दाखल करून सर्व जबाबदार व आपणावर दिवाणी व फौजदारी कारवाई करणे भाग पडेल याची स्पष्ट जाणीव मी नम्रपणे देत आहे सदरहु निवेदन हे कायदेशीर नोटीस समजून ताबडतोब योग्य ती कारवाई करावी ही विनंती. आपला विश्वासू

( एम. एस. बनसोडे )

प्रति : माहितीसाठी व सत्वर कार्यवाहीसाठी

१) मा. मुख्य न्यायमूर्ती मुंबई हायकोर्ट.

२) मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई

३) मा. शिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई.

४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई.

५) मा. शिक्षण सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.

६) मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य पुणे – १

७) मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे – १

**– मल्लिकार्जुन बनसोडे** (मुख्याध्यापक)

रा. सं. चंडक हायस्कूल,बुधवार पेठ सोलापूर

●

# भटक्या–
# विमुक्तांच्या
# शोधयात्रेचे दर्शन

**– लक्ष्मण गायकवाड**

गेल्या दशकापासून सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात काम करत असताना अनेक आगळे वेगळे अनुभव माझ्या जीवनात येऊन गेले.माझी सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यामध्ये १९७६–७७ पासून सुरुवात झाली. कामगार म्हणून काम करत असताना कामगारांवर होणारे विलक्षण अन्याय मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आणि स्वत: अनुभवले.यातून कामगारांच्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी वेगवेगळ्या माध्यमातून मी सुरुवात. केली. हळूहळू कामगारांमध्ये एकोप्याची भावना निर्माण होऊन मॅनेजमेंटच्या अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी सर्व कामगारांनी संघटन केले यातूनच माझ्या सभाधीटपणामुळे आणि कामगार सभेत जाहीर भाषणे करण्याने, कामगारांचा पुढारी म्हणून मान्यता मिळू लागली. कामगारांच्या भल्यासाठी प्रामाणिकपणे काम करायचे ठरवले आणि काम करत असलेल्या सूत गिरणीत, १९७७–७८ साली खूप मोठा संप घडवून आणला आणि या संपामध्ये कामगारांच्या न्याय्य हक्काच्या मागण्या मान्य करून घेतल्या याच संपामध्ये काही मागण्यासाठी लातूर येथे दहा दिवस आमरण उपोषण केले.नंतर कामगारांनी याच मिलमध्ये कामगार प्रतिनीधी डायरेक्टर म्हणून माझी निवड केली. मी कामगारांची बाजू घेऊन चेअरमन व मॅनेजमेंटशी भांडण करू लागलो. यामुळे माझी लवकरच मिलमधून हकाल पट्टी करण्याचे ठरवले.

एक दिवस मेमो देऊन मला कामावरून कमी करण्यात आले. पुढे मी नोकरी गेल्यावर लातूर येथे विविध कामे केली. यावेळी मात्र सामाजिक क्षेत्रामध्ये काम करणारे एक सच्चे कार्यकर्ते भगवानराव देशपांडे यांच्याशी माझा संबंध येत गेला. त्यांनी मला खूप चांगल मार्गदर्शन करून कार्यकर्ता म्हणून घडवण्याचं काम केलं. अनेक आर्थिक समस्या उद्‌भवल्या असताना त्यांनीच लातूर येथे बँकेचे कर्ज काढून देऊन सुरुवातीला किराणा दुकान घालायला लावले. दुकान चालत नाही हे पाहून परत सायकलचे दुकान लातूर येथे घातले. सायकल दुकानही चालत नाही हे समजल्यावर चहाचे स्टॉल टाकले. हे करत असतानाच झोपडपट्टीच्या संघटना बांधून, हॉटेल बॉईज संघटना, रोजगार हमी, शेतकरी, शेतमजूर अशा इतर वेगवेगळ्या संघटनांमधून कामे केली. आणि लातूर येथे एक आगळी वेगळी चळवळ निर्माण करून मोर्चे व आंदोलन घडवून आणले. मला अनेक वेळा कॉम्रेड भगवानराव देशपांडे यांनी वेगवेगळ्या सामाजिक शिबिरासाठी बाहेरगावी पाठवले, यामुळे माझा संबंध अनेक सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यामध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या ओळखी झाल्या. मी माझ्या सामाजिक कार्याची थोडी दिशा बदलून आजच्या समाजामध्ये ज्यांचे खरे शोषण मोठ्या प्रमाणात आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या होत आहे भटक्या – विमुक्त जमातीच्या लोकांसाठी काम करू लागलो. सुरुवातीला या लोकांमधे काम करत असताना खूपच अडचणी यायच्या. या जमातीवर काही गुंड लोकांच्या व पोलीसांच्या अत्याचारांचे या जमाती बळी आहेत हे दिसून आल्यावर मी मोठ्या प्रमाणात मराठवाडाभर भटक्या–विमुक्तांची आंदोलने करून प्रथम भटक्या-विमुक्तांच्या अन्यायाला वाचा फोडली. सुरवातीला तर भटक्या–विमुक्तांच्या मोर्चात वडार, कैकाडी, पाथरी, टकारी, भामटे अशा अनेक जाती–जमातीचे लोक जमा झाल्यावर घोषणा कशा द्याव्यात हे सुद्धा नीटपणे माहीत नसल्याने ते वेगवेगळ्या अर्थाने घोषणा द्यायचे. अन्याय, अत्याचार करणाऱ्या अधिकाऱ्यांचा म्हणायचे की सर्व लोकांचा विजय असो असे म्हणायचे. त्यांना काही जरी झालं तर फक्त विजय असो असं म्हणायच एवढच माहीत होतं. धिक्कार असो हा शब्दच कधी त्यांच्या तोंडात आलेला नव्हता. एवढेच काय पण त्यांना भटके, विमुक्त काय हे सुद्धा कळत नव्हतं. आला रे आला भटका आला म्हणण्याऐवजी मटका आला असं म्हणत होती.हळूहळू या भटक्या जमातीमधील काही तरुण कार्यकर्ते मी तयार केले व यातूनच फुले, आंबेडकर यांच्या विचाराने काम करणारी मराठवाड्यात एक चळवळ निर्माण झाली. ही चळवळ करत असताना माझा अनेक कार्यकर्त्यांशी संबंध आला. यामुळे आम्ही एक भटक्या–विमुक्तांची महाराष्ट्र पातळीवर संघटना प्रबळ करायची ठरवले.यात सर्वश्री बाळकृष्ण रेणके, लक्ष्मण माने व मी, मोतीराज राठोड, व्यंकप्पा

भोसले, आसाराम गुरुजी, दौलतराव भोसले, ना. वा. माने, मुरचंद्र भाट इत्यादी कार्यकर्त्यांनी मिळून महाराष्ट्रात भटक्या–विमुक्तांची एक भक्कम चळवळ उभी केली. यामुळे भटक्या–विमुक्तांच्या चळवळीस एक नवीन स्वरूप निर्माण झाले या चळवळीचे योग्य दिशेचे आंदोलन पाहून महाराष्ट्रातील अनेक विद्वान लोकांनी या चळवळीस प्रतिसाद दिला. यात बाबा आढाव, तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी; म. पु. रेगे, डॉ. भालचंद्र फडके, य. दि. फडके, रामदास आठवले, शंकरराव खरात, प्रकाश आंबेडकर, एस. एम. जोशी, ग. प्र. प्रधान, माधव गडकरी अशा मातब्बर लोकांनी भटक्या–विमुक्तांचे प्रश्न महत्त्वाचे आहेत असे समजून आपापल्या परिने खूप मोठे सहकार्य केले. या संघटनेशी अनेक राजकीय लोकांनी सुद्धा आपली बांधिलकी आहे हे जाहीर केले व या भटक्या-विमुक्तात प्रत्यक्षात सहभागी होऊन काम केले. यात शरद पवार, विलासराव देशमुख, मृणालताई गोरे इत्यादी राजकीय लोकांनी सुद्धा विधानसभेत लावून धरले. यामुळे भटक्या–विमुक्तांची चळवळ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पसरली. ही चळवळ सर्व कार्यकर्त्यांनी मिळून आठ–दहा वर्षे चालवल्यानंतर आपला, समाजाचा व संघटनेचा शोध घ्यावा म्हणून महाराष्ट्रात एक शोधयात्रा, लातूर ते मुंबई. काढण्याचे ठरवले. लातूर हे ठिकाण मी स्वतः एवढ्यासाठी ठरवले, या मराठवाडा भागातून खूप मोठी भटक्या-विमुक्तांची चळवळ उभी केलेली होती आणि लोकही खूप मोठ्या संख्येत होते. ही शोधयात्रा लातूरपासून सुरुवात करण्याची संपूर्ण जिम्मेदारी मी माझ्यावर घेतली. आणि तसा मी कामाला लागलो. या शोधयात्रेच्या तयारीसाठी म्हणून मराठवाडाभर फिरून यात सर्व जाती-जमातीचे लोक सहभागी व्हावे असे आव्हान मी केले त्याप्रमाणे लोक व कार्यकर्ते कामाला लागले. हे काम ऐतिहासिक आहे असं समजून मोठ्या प्रमाणात कामाला सुरवात केली या शोधयात्रेच्या सुरवातीच्या तयारीसाठी कसलीच आर्थिक तयारी नव्हती आणि फंड पण उपलब्ध नव्हता. या कामाला पैशाची जेव्हा अडचण भासली तेव्हा मी पान टपरीचं दुकान विकून पाच हजार शोधयात्रेत खर्च केले. अनेक वेगवेगळ्या वेशभूषेतील लोक शोधयात्रेत सहभागी होण्यासाठी लातूरला येऊ लागले. ही शोधयात्रा मुद्दामच स्वातंत्र्याच्या दिवशी, १५ ऑगस्टला लातूर पासून सुरू करायची ठरवले. या शोधयात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी महाराष्ट्रातील अनेक राजकीय व सामाजिक कार्यकर्ते आले होते.

या संघटनेचे प्रमुख म्हणून लक्ष्मण माने आणि बाळकृष्ण रेणके हे दोघे होते आणि या दोघामध्ये शोधयात्रा निघेपर्यंत एकोपा होता. याच्याने सर्व कार्यकर्ते संघटित झाले होते. पण शोधयात्रा जेव्हा सुरू झाली त्याच्या आधी थोड्या दिवसापासूनच पोस्टर व बॅनरवरील नावावरून कार्यकर्त्यामध्ये कुरबुर सुरू झाली. शोधयात्रा अजून सुरूही झाली नव्हती. या शोधयात्रेचे श्रेय तुला की मला

यावरून कार्यकर्त्यांमध्ये कुरबुरी सुरू झाल्या खरंतर मी या शोधयात्रेची लातूरपासून सुरुवात करणारा संयोजक होतो. माझे कुठल्याही पोस्टर व बॅनरवर नाव छापले नव्हते तरी मी त्याची कधी खंत बाळगली नाही व त्याचे मला वाईट पण वाटले नाही म्हणूनच या शोधयात्रेत मी स्वतःला गुंतवून घेऊन भटक्या-विमुक्तांचे प्रश्न महत्त्वाचे समजून लोकांमध्ये काम करत गेलो. यामुळेच लातूर शहरात १५ ऑगस्ट १९८६ ला शोधयात्रेत सहभागी होण्यासाठी हजारो लोक जमवू लागलो. कित्येक लोक गळ्यात साप अडकवून आले होते. तर काही लोक गाढव, कुत्री व मांजर घेऊन आपापल्या वेशभूषेमध्ये सहभागी झाले. मसनजुगी हातामध्ये डमरू घेऊन, तर गोसावी भगवे कपडे घालून, हातामध्ये त्रिशुल घेऊन आणि बहुरूपी पोलिसांचे नकली ड्रेस घालून बसवेश्वर मंगल कार्यालयाच्या मैदानात जमा झाले. १५ ऑगस्ट असल्याने झेंडावंदन करून राष्ट्राच्या ध्वजाला सलामी देऊन शोधयात्रा काढण्याचे ठरवले. स्वातंत्र्याच्या नंतर प्रथमच या शोधयात्रेच्या निमित्ताने एका साप-गारुडी माणसाच्या हातून गळ्यात साप अडकावून झेंडावंदन केले. राष्ट्रगीत जमलेल्या भटक्या-विमुक्तांपैकी कोणालाही नीट म्हणता येत नव्हते. तेव्हा काही कार्यकर्त्यांनी राष्ट्रगीत म्हणायला सुरुवात केली. तेव्हा हे सर्व भटक्या विमुक्तांचे लोक कार्यकर्त्यांच्या तोंडाकडे बघत होते आणि म्हणत होते, नवीनच आज हे काय गाणं म्हणत आहेत ! तेव्हा आम्ही त्यांना सांगितले की हे आपल्या देशाचे राष्ट्रगीत आहे आणि आज रोजी आपला देश स्वतंत्र झालेला आहे.

पण आपण मात्र अजून स्वतंत्र झालो नाही असे तेव्हा लोकांना सांगण्यात आले. झेंडावंदन झाल्यानंतर पुढे आम्ही मिरवणुकीने लातूर शहरातून घोषणा देत रस्त्याने निघालो. स्वातंत्र्याचा विजय असो, भारत माता की जय आणि एक घोषणा मात्र यात महत्त्वाची होती ती अशी-या चाळीस वर्षांच्या स्वातंत्र्याचे काय झाले. आमच्यापर्यंत काही नाही आले. ही घोषणा मात्र सर्व लातूरकरांना आकर्षून घेत होती तर या मिरवणुकीमध्ये समोरच्या बाजूला बूरबूर पोयामा आपले वाद्य वाजवत अंगावर आसूड मारत पुढे पुढे जात होती. एकविसाव्या शतकाकडे जात असताना हे लोक खरोखरच किती मागे आहेत असे समाजातील जाणकार तज्ज्ञ मंडळी बोलू लागली. त्या शोधयात्रेची मिरवणूक गावाबाहेर गेली. या शोधयात्रेमधे चालणाऱ्या कार्यकर्त्यांचे जागोजागी सत्कार होऊ लागले. या शोधयात्रेसाठी मदत म्हणून रुपया दोन रुपये सर्वसामान्य माणसं देऊ लागली. यातून काही पैसा संघटनेकडे जमा होऊ लागला. चालत असताना कार्यकर्त्यांचा जिथे मुक्काम होईल तिथे जेवण्याची, राहण्याची सोय त्या गावातील सामाजिक व राजकीय लोक करत होती, आणि त्या ठिकाणी सभा होऊन भटक्या-विमुक्तांचे प्रश्न कार्यकर्ते मांडू लागले. आता भटक्या-विमुक्तांच्या शोधयात्रेला चांगलीच सुरुवात झाली. ते उमरगा येथे कार्यकर्ते चालत गेले. उमरग्याच्या नगरपालिकेने आम्हा सर्व

कार्यकर्त्यांचे भव्य असे स्वागत केले. यावेळी शोधयात्रेमध्ये चालण्यासाठी भटक्या-विमुक्तांच्या महत्त्वाच्या दोन कार्यकर्त्यांच्या बायका सुद्धा चालायला होत्या,उमरगा येथे जेव्हा जाहीर सत्कारामध्ये रेणके व माने यांची भाषणं झाली यात रेणकेने किती वेळ भाषण करावं याच तारतम्य असायला हवं असे लक्ष्मण माने यांनी बोलायला सुरुवात केली. तसा रेणके हा अभ्यासू असल्याने आपल्या बोलण्याचा ठसा जनमतावर उमटवत असे. यामुळे लक्ष्मण माने दुखायचे अशा या दोघांच्या हेव्यादाव्यामुळे शोधयात्रेत चालणाऱ्यांमध्ये सुद्धा दोन गट पडायला सुरुवात झाली या शोधयात्रेचे श्रेय कोणाला मिळावे यासाठी लक्ष्मण माने व रेणके यांच्यामध्ये चुरस सुरू झाली. या दोघांच्या अशा वागण्यामुळे कार्यकर्त्यामध्ये तर गट निर्माण झालेच पण त्यांच्यासोबत चालत आलेल्या बायका सुद्धा एकमेकींशी बोलेनाश्या झाल्या, शोधयात्रा मराठवाड्यातून चालत असताना जास्तीत जास्त लातूर जिल्ह्यातील लोकच सोबत होते. विशेषत: मराठवाड्यात त्यावेळी पाण्याची खूप टंचाई होती. यामुळे काही ठिकाणी जेवणासाठी व पाण्यासाठी थोडाफार त्रास होतच असायचा. काही भटक्या-विमुक्तांच्या तांड्यावरची लोक सर्वजण मिळून पिठलं आणि भाकरी जेवायला करायचे तेव्हा हे जेवण घेतल्यावर काही पश्चिम महाराष्ट्रातील कार्यकर्ते तुम्ही फार तिखट खाता मोठाड खाता आम्हाला हे पचत नाही. आमची प्रकृती बिघडून जाईल अशा प्रकारच्या तक्रारी करत असत. यावेळी मी म्हणालो आम्ही मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त असलेली माणसं भुकेची आग पोटात पडल्यास त्यात मिरचीची आग पोटात घालून पोटातील भूकेच्या आगीला काही तरी ओले – कच्चे खाऊन जगतो. तेव्हा या शोधयात्रेच्या निमित्ताने आम्ही मराठवाड्यातील लोक कसे जगतो याचाही आपण या निमित्ताने शोध घ्यावा. एखाद्या वेळी मराठवाड्यातील जेवण घेतल्याने तुमचे पोट बिघडते, आम्हाला तर रोजच असे खावे लागते असे म्हटल्यावर काही कार्यकर्त्यांना राग आला. आता पुढे आम्ही चालत सोलापूरकडे वळलो. सोलापूरमध्ये महानगरपालिकेने कमानी बांधून भव्य असे आमचे स्वागत केले. कारण या सोलापूरमध्ये देशात सर्वांत अधिक भटक्या-विमुक्तांची लोकसंख्या आहे. यामुळे इथे चार – पाच नगरसेवक महानगरपालिकेत निवडून येतात. यावेळी येथे उपमहापौर लालसिंग रजपूत आणि अ‍ॅड.वाय. एस. गायकवाड हे आमच्या संघटनेचे कार्यकर्ते असल्याने आणखीनच या शोधयात्रेच्या सत्काराला आगळ-वेगळ स्वरूप आलं होत. येथील महानगरपालिकेने २५ हजार रुपये शोधयात्रेस देणगी जाहीर केली. या शोधयात्रेसाठी स्वत: शरद पवारांचा पाठिंबा असल्याने जिथे-जिथे पवारांचे कार्यकर्ते आहेत तेथील कार्यकर्ते या शोधयात्रेसाठी मदत करायचे. अशीच मदत जिथे कार्यक्रम होईल तिथे आम्ही जनतेकडून मदतेची मागणी करत असे तेव्हा जनतेतून रुपया, दोन

रुपये, पाच रुपये असे कोणीही रुपये झोळीत टाकायचे असे हजारो रुपये यांमुळे गोळा झाले. या संपूर्ण पैशांचा हिशोब आणि ठेव काही कार्यकर्त्यांकडे असायचा. या शोधयात्रेच्या नेतृत्वामुळे भाषण तू आधी करायचे का मी आधी ? आणि किती वेळ करायचे आणि पैसा कोठे आणि किती जमला आणि पैसे काय झाले ? अशा विविध कारणांवरून लक्ष्मण माने व रेणकेंचे पुण्याला जाईपर्यंत खूपच मतभेद टोकाला गेले. आणि यातूनच शोधयात्रेमध्ये समाजाचा शोध घेण्याऐवजी कार्यकर्त्यांनी कार्यकर्त्यांमध्येच शोध घेण्याची वेळ आली.

पुणे येथे शोधयात्रा पोहचली तेव्हा महाराष्ट्रातील अनेक मान्यवर लोकांनी भटक्या–विमुक्तांच्या न्याय हक्काला पाठिंबा देण्यासाठी हजेरी लावली. यावेळी तेव्हाचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण स्वत:हून या शोधयात्रेत सहभागी होऊन शोधयात्रेकरूंचं स्वागत केलं. पुढे ही शोधयात्रा अशीच मुंबईमार्गे निघाली तेव्हा काही भटक्या – विमुक्त कार्यकर्त्यांची पत्रकं शोधयात्रेचं नेतृत्व लक्ष्मण माने करत आहेत. तर काही ठिकाणी बाळकृष्ण रेणके करत आहे ' असे एकमेकांच्या विरोधी पत्रकं निघू लागली. जेव्हा भटक्या–विमुक्ताची शोधयात्रा मुंबईपर्यंत गेली तेव्हा कार्यकर्त्यांमधील आपसातील मतभेदाचा अंत लातूर–मुंबई शोधयात्रेत चालण्यास लागणारे अंतर जेवढ होते तेवढेच अंतर कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण झालेले दिसून येत होते. खरेतर ही शोधयात्रा काढली तेव्हा आमचा या शोधयात्रे-मागचा उद्देश सर्वांचा असा होता की आमचे या देशामध्ये काय स्थान आहे याचा व समाजाच्या अस्मितेच्या, देशाचा शोध घेण्यासाठी म्हणून ही शोधयात्रा काढली होती पण काही कार्यकर्त्यांच्या अल्पसंतोषीमणामुळे,स्वार्थी हव्यासापोटी आणि मतलबी नेतृत्वामुळे महाराष्ट्रात लातूर पासून निघालेली ही शोधयात्रा मुंबईला येईपर्यंत संघटनेच्या दृष्टीने शवयात्रा ठरली. एकदाची ही शोधयात्रा मोहरम आल्यानंतर लोक त्या दिवशी थाटामाटात डोला करतात, नाचतात,बागडतात आणि एक दिवस हाच डोला पाण्यामध्ये बुडऊन टाकतात तशीच ही भटक्या-विमुक्तांची शोधयात्रा मुंबईच्या महासागरात बुडऊन टाकल्यासारखी झाली. यानंतर भटक्या-विमुक्तांच्या चळवळीमधे फाटाफूट होण्याची शक्यता दिसू लागली तेव्हा मी आणि आमच्या कार्यकर्त्यांनी लातूर जिल्ह्यात उदगीर येथे भटक्या-विमुक्तांचा एक मेळावा घेऊन शोधयात्रे पासून लक्ष्मण माने व रेणके यांच्यामधे टोकाला गेलेला मतभेद कमी करावा या उद्देशाने दोघांचाही या मेळाव्यात एकत्र सत्कार करण्यात आला. मी स्वत: पुढाकार घेऊन दोघांमधे चर्चा घडवून दोघांमधील मतभेद दूर केले. हा समझोता उदगीर मेळाव्यापर्यंतच मर्यादित राहिला. पुढे मात्र हे दोघे वैयक्तिक पातळीवर एकमेकांच्या कार्यकर्त्यांवर टीका करू लागले. संघटनेच्या जेव्हा बैठका होऊ लागल्या तेव्हा या बैठकीत अमुक संघटनेच्या कार्यकर्त्यांनी घोळ केला. त्या कार्यकर्त्यांनी पैसे खाल्ले. यांनी त्यांनी संघटनेत

टीका केली. अशाअशांचीच चर्चा होऊ लागली. सुरुवातीला जेव्हा आम्ही संघटना चालवत असू त्याकाळी बैठकीच्या ठिकाणी समाजाच्या कुठल्या माणसावर कुठे अन्याय झाला याचीच चर्चा असायची आणि आम्ही यावर मोर्चे,आंदोलने करायचो. पूर्वी बैठकांमध्ये अन्याय, अत्याचारांवर विचारविनिमय व्हायचा पण शोधयात्रेच्या बैठकीवर कार्यकर्त्यांच्या तक्रारीचाच विचार होऊ लागला. यामुळे मला वाटू लागले आता कार्यकर्त्या–कार्यकर्त्यांमधील भांडणे मिटणे अवघड आहे तेव्हा आपण आपले कार्य करावे या निकषाला पोहोचलो. शोधयात्रेमध्ये जमा झालेले पैसे आणि वेगवेगळ्या महापालिकेने जाहीर केलेले लाखावर रुपये न घेण्यावाचून बुडाले.यामुळे तर आणखीनच संघटनेमध्ये वाद निर्माण झाला. याही वेळी माने आणि रेणके यांना मी अनेक वेळा समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण हे दोघे एकत्र येण्याऐवजी आपापले गट निर्माण करू लागले. मी दोघाच्याही गटात नसल्यामुळे माझी मात्र पंचाईत व्हायची. नंतर माने व रेणके एकमेकाच्या विरोधात पेपरमधून आरोप करू लागले. यामुळे तर आणखीनच संघटना विस्कळीत झाली. आता आमच्या एका संघटनेत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या तीन संघटना झाल्या. मोतीराज राठोड, रेणके व माने असे उघडउघड तीन गट झाले. समाजातील राजकीय व सामाजिक लोकांना वाटायचे भटक्या–विमुक्तांच्या सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन महाराष्ट्रात काम करावे. अशाच वेळी धुळे येथे भटक्या–विमुक्तांचा मेळावा मोतीराज राठोड, असाराम जाधव गुरुजी यांनी आयोजित केला. या मेळाव्याच्या निमित्ताने शरद पवार यांनी महाराष्ट्रातील आम्हा कार्यकर्त्यांची एक बैठक घेऊन आपसातील भांडणे मिटवावी असा प्रयत्न केला गेला.यावर सर्वांनी धुळे येथील मेळाव्यात एकत्र येण्याचे ठरवले. या मेळाव्याला जेव्हा शरद पवार स्वत: आले तेव्हा या मेळाव्याचे तोंड भरून कौतुक त्यांनी केले पण या वेळीही भटक्या-विमुक्तांच्या काही कार्यकर्त्यांना स्टेजवर मुद्दाम येऊ न देण्याचे प्रकार घडले. लक्ष्मण मानेला, रेणकेला व मला स्टेजवरच प्रवेश नाकारण्यात आला. तेव्हा यावेळी कार्यकर्त्यांमध्ये आपसात गोंधळ निर्माण झाला. तेव्हा काही कार्यकर्ते शरद पवारांनीच स्टेजवर बोलावले. हा मेळावा पार पडला. आता मी मात्र ठरवलं संघटनेच्या वादात न पडता आपले आपण भटक्या – विमुक्तांचे मराठवाड्यातील काम पहायचे असे ठरवले, आणि मराठवाड्यात विविध जिल्ह्यात सुरुवातीसारखेच मोर्चे आणि मेळावे घेऊ लागलो नि काम करू लागलो. अशातच माझ्या ‘ उचल्या ’ या पुस्तकाला राष्ट्रीय साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला. यामुळे भटक्या–विमुक्तांचे प्रश्न सर्व समाजासमोर मांडण्यासाठी मला नवीन संधी उपलब्ध झाली. मी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन शोधयात्रेनंतर थंड पडलेले भटक्या–विमुक्तांचे प्रश्न जोराने मांडू लागले.

यामुळे समाजातील लोक या प्रश्नाबद्दल जागरूक होऊन नव्याने विचार करत असलेले दिसू लागले. यापूर्वी भटक्या विमुक्ताचे सातत्याने प्रश्नाची आस्था असणारे आणि पाठिंबा व्यक्त करणारे शरद पवार हेच मुख्यमंत्री झाले. त्यांनी भटक्या–विमुक्तांच्या प्रश्नासाठी स्वत: पुढाकार घेऊन शासनाच्यावतीने भटक्या–विमुक्तांची राज्यव्यापी परिषद सोलापूर येथे घेऊन या परिषदेसाठी भारताचे पंतप्रधान राजीव गांधी यांना बोलावले या भटक्या–विमुक्तांच्या मेळाव्यासाठी सोलापूर येथे आम्ही सर्व कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन लाखो भटक्या-विमुक्तांचे लोक या मेळाव्याला जमा केले. या मेळाव्याचे संयोजन सोलापुर येथे अर्थमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले होते. महाराष्ट्रात प्रथमच भटक्या-विमुक्तांच्या मेळाव्यासाठी भारताचे पंतप्रधान राजीव गांधी आले होते. यामुळे भटक्या–विमुक्तांच्या अपेक्षा उंचावल्या होत्या. या भटक्या–विमुक्तांच्या अति मागासलेल्या लोकांना अनुसूचित जाती-जमातीमध्ये समाविष्ठ करतील अशी अपेक्षा घेऊन लोक या मेळाव्यात आले होते. पण या मेळाव्यामध्ये भटक्या–विमुक्तांचे एकाच पुस्तकाला साहित्य अकादमी पुरस्कार मिळवलेले प्रसिद्ध लेखक म्हणून पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हस्ते मला व मानेला एक एक लाख रुपयांचा महाराष्ट्र सन्मान पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार देण्यात आल्यानंतर राजीव गांधी यांनी सांगितले, 'तुम्हारे लिए ये करेंगे, वो करेंगे' म्हटले. पण प्रत्यक्षात मात्र काहीच केले नाही. या मेळाव्यात मात्र शरद पवारांनी भटक्या–विमुक्तांचे प्रश्न सोडवण्याची भूमिका चांगली घेतली होती पण त्यांनाही यश आले नाही. या मेळाव्यात भटक्या–विमुक्तांच्या वेगवेगळ्या गटांनी एकमेकांच्या विरोधात निषेध पत्रक वाटली. आणि एकदाचा मेळावा पार पडला. मेळाव्याच्या नंतर भटक्या – विमुक्तांची संघटना परत स्थिर झाल्यासारखी दिसू लागली. अशातच लोकसभेच्या निवडणुका आल्या. यामुळे भटक्या–विमुक्तांचे वेगवेगळ्या पक्षांचे कार्यकर्ते आपापले गट घेऊन त्या त्या पक्षात विलीन झालेले दिसू लागले. मला मात्र एक लाख रुपये मिळाल्याने अनेक लोक लाखोपती म्हणू लागले. हे लाख रुपये लोकांसाठी भूषण ठरले. माझ्यासाठी मात्र वैयक्तिक खूपच अडचणीचे झाले असे जाणवू लागले. कारण आयुष्यात कधी नाही ते एक लाख रुपये मिळालेला माणूस अशा एकेका जाती – जमातीत जन्मलेला होता की ज्यांना लाख रुपये काय असतात, पुस्तक कशासाठी असत याची कशाचीही ओळख नसलेल्या समाजातून मात्र वेगवेगळ्या पातळीवर त्रास होऊ लागला. एक लाख रुपये मिळण्यापूर्वी एक–दीड वर्षं अगोदर माझे पुस्तक बाहेर आले होते. तेव्हा सर्व माझे भाऊ व भावजया हे माझ्या सोबत होते. पण एक लाख मिळाल्यापासून त्यांना कोणीतरी असे सांगितले हे सर्व रुपये तुमच्या घरातील सगळ्या माणसांना मिळालेले आहेत तेव्हा पासून माझ्या भावजया व भाऊ रोज

येऊन चहा करून पाजवा म्हणणारे आता एक लाख रुपये वाटून द्या म्हणू लागले. मी त्यांना खूप समजाऊन सांगू लागलो, हा मला मिळालेला पुरस्कार आहे. हे पैसे तुमच्यासाठी नाही तर माझ्या पुस्तकासाठी मला मिळालेले आहेत. तेव्हा माझे भावजया व भाऊ म्हणाले, हे पुस्तक आमच्यावरच लिहिलं आहे की ? त्यात आमचे नाव कसे घालतात ? त्या पुस्तकात आमची इज्जत गेली नाही का ? त्याचा मोबदला आम्हाला द्यायला नको का ? असं म्हणून रोज दारू पिऊन येऊन जातपंचायत बसवता म्हणून भांडू लागले. काही हितसंबंधी लोकांनी जाणून-बुजून माझ्या विरोधात माझ्या नातेवाईकांना भांडण्यासाठी इतर समाजातील लोक प्रोत्साहन देऊ लागले. यामुळे तर माझे भाऊ आणि भावजय मला व माझ्या बायको–मुलांना मारण्यासाठी घरापर्यंत धाऊन येऊ लागली. पण मी झोपडपट्टीत न राहता एका चांगल्या वस्तीत येऊन राहिलो होतो, जिथे समाजातील उच्च समजल्या जाणाऱ्या ब्राह्मणांची घरे आहेत. या वस्तीमध्ये स्वतःच्या मुलामुलींना जोराने हाक मारणे हे सुद्धा अभद्र समजले जाते तिथे माझे भाऊ, भावजया दारू पिऊन येऊन माझ्या घराच्या समोर वाट्टेल त्या ठेवणीतील शिव्या देऊ लागले, ज्या शिव्या आमच्या गल्लीतील लोकांनी आयुष्यात कधी ऐकल्या नसतील इतक्या अभद्र शिव्या कान देऊन चवीने ऐकत असत, याची किळसवाण्या शिव्या आणि भांडणाला कंटाळू लागलो, कारण आता मी नाही म्हटलं तरी थोडा प्रतिष्ठीत झालेला माणूस होतो. याच्या पाच–दहा वर्षांपूर्वी अशा शिव्या देणे आणि खाणे हे अंगवळणी पडले होते पण ते आता शिव्या देणे व खाणे बरे वाटेना म्हणून मी निमूटपणे सहन करत होतो. आता शिव्या आणि भांडण माझ्यासाठी अनावर झाले म्हणून मी पोलीसाकडे धाव घेतली तेव्हा थोडे काही दिवस शांत झाले. मला वाटू लागले आपल्याला एक लाख रुपयांला आपल्या नातेवाईकांच्या एक लाख शिव्या खाव्या लागल्या म्हणून मला वाटू लागले की एक रुपयाला एक शिवी पडली. पुढे पुढे तर माझ्या समाजातील अनेक लोक तुमच्या पुस्तकात आमच्या गावचंही नाव बी हाय म्हनं काही तर लिहीलाव म्हनं, आम्हा-लावी एक लाख रुपयातले पैसे वाटून द्याव लागतय म्हणू लागली. मी विचार करू लागलो. एक लाख रुपयांतील पैसे वाटायचे तरी किती लोकांना. नाही तरी आमच्या समाजातील माझ्या भागातील लोकसंख्या एक लाखावर आहे. प्रत्येकाला वाटले तरी एक एक रुपया वाट्याला येईल अशी अवस्था झाली.काही समाजातील तर लोक म्हणू लागले, ह्यांच्या विरोधात जात–पंचायत बसवा. या माणसांनी आपल्या जातीच्या विरोधात लिहून आपल गुपीत सरकारला कळविलय. म्हणून सरकारने ह्याला एक लाख रुपये दिले. पण यावेळी सर्वच माणसं माझ्या विरोधात होती अशातला भाग नाही. थोडेफार शिकून–सवरून शहाणे झालेले लोक मात्र माझी बाजू घेत आणि सांगत, या माणसांनी आपल्या जातीचा उद्धार

केलाय. आपल्याला कोणी ओळखत नव्हतं. पण आता लक्ष्मण गायकवाडचं पुस्तक आल्यापासून आपल्या जमातीला न्याय मिळू लागला. आता मी या कटकटीतून बाहेर पडून वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम स्वीकारून भटक्या–विमुक्तांचे प्रश्न मांडू लागलो आणि मी विचार करू लागलो, आपला समाज अज्ञानी, अडाणी, अशिक्षित आहे म्हणूनच तो आपल्याशी आज अशाप्रकारे भांडत आहे व गैरसमज करून घेत आहे. याला एक उपाय आहे की त्यांचे सामाजिक प्रबोधन करणे.

एक वेळा तर मुंबई येथे कवी कुसुमाग्रज व माझा उपराष्ट्रपती शंकरदयाळ शर्मांच्या हस्ते वसंतराव नाईक प्रतिष्ठानतर्फे सत्कार ठेवण्यात आला होता. तेव्हा लातूरातील इतर समाजातील प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या माणसांनी हा आपल्या विरोधात जाऊन मोर्चे काढतो म्हणून माझ्या भावा, भावजयांना तिकीट देऊन मुंबईला घेऊन गेले आणि तेथील कार्यक्रमामध्ये व्यत्यय आणण्याचा प्रयत्न सुद्धा केला गेला.यावेळी मात्र मला वाटले इतर समाजातील माणसाला मानसन्मान मिळाल्यास किंवा उपराष्ट्रपतींसारख्या माणसाकडून सत्कार केल्यास लोक अशा माणसांची वाहवा करतात आणि त्या गावातील लोक सुद्धा आपल्या गावच भूषण समजतात पण माझं मात्र याच्या अगदी उलट झालं. उपराष्ट्रपतींच्या हस्ते माझा सत्कार होऊ नये म्हणून माझे भाऊ, भावजय गेले ते अज्ञानी व अडाणी आहेत हे मी समजू शकतो पण त्यांच्या सोबत काही कद्रु मनाची सुज्ञ माणसं होती याचे मात्र मला मनापासून वाईट वाटले. याचा अर्थ असा नव्हे की सर्व लातूरातील माणसं माझ्या विरोधात होती. लातूरातील अनेक माणसांनी माझ्यावर भरभरून प्रेम केले, लातूर येथे सत्कार केले. भावी आयुष्यात पुढे जाण्यासाठी चालना देत होते.

आता मी सर्व गोष्टीपासून दूर राहून भटक्या–विमुक्तांचे मोठ्या प्रमाणावर काम करायचे ठरवले आणि भारताचे माजी पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांची भेट घेऊन भटक्या–विमुक्तांच्या प्रश्नावर दहा ते पंधरा मिनिटे चर्चा केली त्यांनी या प्रकरणात लक्ष घालून हे प्रश्न सोडवून असे आश्वासन दिले. यामुळे मी महाराष्ट्रात भटक्या–विमुक्तांच्या कल्याण होण्याच्या हेतूने म्हणून राजकारणाची थोडी भूमिका बदलून निवडणुकीत पंतप्रधान व्ही. पी. सिंग यांना पाठिंबा दिला. यामुळे आणखीनच भटक्या–विमुक्त जमातीमध्ये फाटाफुटी झाली. आता मी सोलापूर, मुंबई येथे भटक्या–विमुक्तांच्या कार्यकर्त्यांच्या बैठका व मेळावे घेऊन भटक्या–विमुक्तांचे थंड पडलेले काम परत सुरू केले. पारधी समाजावर होणारा अन्याय दूर व्हावा म्हणून मराठवाड्यात मोठा मोर्चा काढला आणि शासनाकडं पारधी समाजाला चोर, गुन्हेगार न समजता त्यांना चांगली वागणूक द्यावी अशी मागणी केली. भटक्या–विमुक्तांचे काम आता वेगवेगळ्या पातळीवर करतच मी माझ्या भाषणांतून आणि व्याख्यानांतून या लोकांबद्दलचा पाहण्याचा दृष्टिकोन

बदलावा असे आवाहन करत राहिलो. अशाच वेळी मुंबई येथे जागतिक मराठी परिषद भरण्यात आली तेव्हा भारतातून एकमेव दलित लेखक म्हणून माझी निवड करण्यात आली. यावेळी जागतिक मराठी परिषदेत बोलताना मी भटक्या–विमुक्त व दलितांचे प्रश्न प्रभावीपणे मांडून म्हणालो, आता जगात निग्रोंचा लढासुद्धा अस्मितेसाठी चालू आहे. परंतु आमचा भटक्या-विमुक्तांचा लढा आपल्या देशात मात्र आस्तित्वासाठी चालू आहे. आजही आमचं आस्तित्व आपल्या देशात नाकारण्यात येत आहे तर दुसरीकडे अस्मितेचा लढा चालू असलेल्या निग्रोला मात्र पाठिंबा देत आहेत. जेव्हा माणसाला अस्तित्व असते तेव्हा माणूस अस्मितेसाठी लढा करत असतो म्हणून आमचे अस्तितव मान्य करावे, आमचे पुर्नवसन व्हावे, येथील दलित, भटके–विमुक्त आणि स्त्रियांना समान हक्क मिळाले तरच मराठी भाषेची प्रतिमा वाढेल. जर भाषेच्या माध्यमातून मराठी भाषिकांचेच शोषण चालू राहील तर ती भाषा आपलीशी न वाटता कालांतराने नष्ट होत असते, याची जाणीव मराठी भाषिकांनी ठेवावी असा प्रश्न या जागतिक परिषदेत मांडला, अशा वेगवेगळ्या माध्यमातून महाराष्ट्रभर व महाराष्ट्राबाहेर भटक्याविमुक्तांचे प्रश्न मी मांडण्याचा प्रयत्न आजही करत आहे. आज एक चळवळीतील कार्यकर्ता म्हणून महाराष्ट्रातील दलित, भटक्या–विमुक्तांच्या कार्यकर्त्यांकडून वेगळी अपेक्षा आहे. सध्याच्या परिस्थितीत दलित समाजातील चळवळीची जी कुत्तर ओढ चालू आहे, दलित समाजातील व भटक्या–विमुक्त जमातीच्या नेतृत्वाच्या स्पर्धेमुळे समाजाचे खरे प्रश्न बाजूला राहत आहेत आणि कार्यकर्ता व नेता यांच्यात मारामारीला उत येत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांची कास धरून पुढे गेले तरच भटक्या–विमुक्त आणि दलितांचे प्रश्न मार्गी लागतील असे वाटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जन्मशताब्दी निमित्ताने व फुलेंच्या स्मृती वर्षाने दलित चळवळीतील कार्यकर्त्यांना व दलित समाजातील कार्यकर्त्यांना चांगली बुद्धी सुचावी व सर्वांनी एकत्र येऊन परिवर्तनाचा लढा उभा करावा आणि समान बांधवाची खऱ्या अर्थाने प्रश्न सोडवावे असे वाटते.

**– लक्ष्मण गायकवाड**

टिळकनगर, लातूर

# दलित विद्यार्थी चळवळ

**— संजय लांडगे**

मी ज्यावेळी कॉलेजच्या जीवनात प्रवेश केला तो काळ एक संघर्षमय, क्रांतिकारी काळ होता. मराठवाडा नामांतरासाठी पेटला होता. नुकताच दलित पँथरचा जन्म झालेला. सर्व तरुण अन्यायाच्या विरोधात पेटलेले त्यामुळे दलित समाजातील परिस्थितीचे थोडेफार आकलन मला झालेले होते. घरची गरीब परिस्थिती, त्यामुळे शिक्षण सोडून मी काम करीत फिरायचो. मन अन्यायामुळे पेटलेले असायचे. आपणही काहीतरी करावे असे सतत वाटायचे. काम केल्याशिवाय पोट भरत नव्हते. त्यामुळे गप्प बसायचो. गल्लीत दलित पँथरची स्थापना केली. मी पण सहभागी झालो. पेपरला नावे जाहीर झाली आणि दुसऱ्याच दिवशी पोलीस घरी आले. मी कामाला गेलो होतो. आल्यानंतर समजले. पोरांना पोलिसांनी पकडून नेले आहे. मग वस्तीतील चार मोठी माणसे हाताशी धरून त्या पोरांची सुटका केली. तेव्हा पासून या कार्यात पोरांचा सहभाग कमी झाला.

पुढे घरातील मोठे भाऊ चांगल्या ठिकाणी कामाला लागल्यामुळे मी पुढील शिक्षणास सुरुवात केली. काम सोडून दिले. मी कॉलेजला चाललो. वस्तीत एक तरुण मंडळ काढून त्याद्वारे आम्ही विविधगुणदर्शन कार्यक्रम करीत होतो. परंतु हे करीत असतानाच माझ्या डोक्यात नवी कल्पना आली, आणि आम्ही

नामांतरावर अन्याय, अत्याचारांवर छोटे छोटे प्रसंग बसविले. त्याला लोकांनी प्रतिसादही भरपूर दिला. लोकांना ते आवडले. पोरानवर त्याचे परिणाम झाले. त्यामुळे सतत विविध विषयावर अशा प्रकारचे कार्यक्रम करून, लोकजागृती करून वस्तीत आणि वस्ती बाहेर एक नवे वातावरण तयार झाले. परंतु पुढे पुढे कळाले की यालाच पथनाट्य असे म्हणतात. ते एक समाज जागृतीचे प्रभावी माध्यम आहे. चळवळ करीत असतानाच कॉलेजमध्ये जात होतो. कॉलेजात बरेचसे प्राध्यापक ओळखीचे झाले होते. त्यांनी मला नेहमी प्रोत्साहन दिले. चळवळीकडे मी प्रोत्साहीत झालो. दलित साहित्याची वेगवेगळी पुस्तके वाचून काढली. विविध कार्यक्रमात मी सतत सहभागी होत आलो. या विविध क्षेत्रातून काम करताना पेपरमध्ये प्रसिद्धी मिळू लागली. परंतु ही प्रसिद्धी गल्लीतील माणसांना बघवेना. त्यांनी गल्लीतील माझ्या एका कार्यक्रमावर गोंधळ घातला. माझ्याबरोबर भांडणे काढली आणि अशा प्रकारचे कार्यक्रम करू नको म्हणून मला दम दिला परंतु त्यांच्या या धमकीला न घाबरता मी महाराष्ट्रातून अनेक नाट्य, साहित्य संमेलनातून ग्रामीण विभागातून समता थिएटर या संस्थेच्या नावाखाली कार्यक्रम करीत राहिलो. आज त्याच लोकांना या कार्यक्रमाचं महत्त्व पटलेलं आहे.

विद्यार्थी जीवनात अनेक घडामोडी घडलेल्या असताना विद्यार्थांच्या प्रश्नावर आवाज उठवला पाहिजे ही भावना मनात निर्माण झाली. कारण शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नाही. दलित विद्यार्थांशो तेथील कारकून आणि इतर लोक नीट बोलत नाहीत. त्यांच्याकडे जाणूनबूजून दुर्लक्ष केले जाते. हे सर्व हळूहळू माझ्याकडे घेऊन येत होते. हळूहळू मुलं तक्रारी माझ्याकडे घेऊन येत होते कारण मी बोलका होतो हे सर्वांना माहीत होते. त्यामुळे मलाच सर्वजण पुढे करीत होते. मग अशा छोटया-मोठया प्रश्नासाठी मी पोरांना घेऊन प्राचार्यांकडे तक्रारी घेऊन जात होतो आणि त्यांचे प्रश्न सुटत होते.

एकदा काय झाले, बी. कॉम. भाग दोनचा वर्ग, वर्ग मुलांमुलींनी गच्च भरलेला. एक विद्वान प्राध्यापक तास घेत होते. मधूनच मुलांना प्रश्न विचारीत होते. प्रश्न विचारता विचारता त्यांनी प्रकाश नावाच्या एका दलित विद्यार्थ्याला प्रश्न केला परंतु प्रकाशने त्या प्रश्नाचे उत्तर समाधानकारक दिले नाही म्हणून सरांनी दुसरा प्रश्न केला.

" शिष्यवृत्ती घेतोस ?"

" होयं सर घेतो " प्रकाश–

" अरे थोडयाच दिवसांनी राष्ट्रीय संपत्ती म्हणजे काय समजेल तुम्हाला ! शिष्यवृत्ती बंदच करायला पाहिजे तुमची " सर–

सर बोलत होते. प्रकाश खाली मान घालून उभा होता. सर्व मुले–मुली हसत होते. प्रकाशची टिंगल करीत होते. प्रकाशचा अपमान सरांनी केला होता.

तास संपल्यावर प्रकाशने माझी भेट घेतली. मला सर्व घडला प्रकार सांगितला. मी लगेच दहा पंधरा पोरांना गोळा केले. घडला प्रकार कथन केला. सर्वांनी सरांना स्टाफरूममध्ये गाठायचे ठरविले. स्टाफरूममध्ये सर्वजण गेलो. सरांना जाब विचारला. त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. आम्ही सारी मुले चिडलेली होतो. सरांनी माफी मागावी अन्यथा वाईट परिणाम होतील असे सांगितले. तेव्हा दुसरे प्राध्यापक मध्ये पडले. त्यांनी त्या प्राध्यापकाला माफी मागण्यास सांगितले. त्या प्राध्यापक महाशयानी प्रकाशची माफी मागितली आणि हा प्रकार इथे संपला.

त्यानंतरचा एक प्रसंग, बारावीचे परीक्षा फॉर्म भरलेले पैसे दुसऱ्या वर्षीचे सहा महिने लोटले तरी परत मिळेनात. चौकशी केली तर प्राचार्य म्हणाले, " पैसे परत मिळत नाहीत ? "

मी आणि माझ्या कार्यकर्त्यांनी इतर कॉलेजात पैसे नियमाप्रमाणे परत मिळतात हे नजरेस आणून दिले आपल्याच कॉलेजमध्ये परीक्षेचे पैसे का परत मिळत नाहीत याची विचारणा केली. तेव्हा प्राचार्यांनी टाळाटाळ केली. परंतु आम्ही त्यांचा पिच्छा पुरवला. एके दिवशी रागाने प्राचार्य म्हणाले,

" आपल्या कॉलेजची इमारत बांधायची आहे, तुमचे पैसे देणगी म्हणून राहूद्यात. "

यावर मी म्हणालो, " हे अगोदरच सांगायला पाहिजे होते तुम्ही. सर्वजण आम्ही स्वखुशीने देणगी दिली असती. परंतु आम्हाला न विचारताच तुम्ही ही देणगी कशी घेता " त्यावर प्राचार्य गप्प झाले.

" बरे ठीक आहे, कॉलेज आपलेच आहे तेव्हा देणगी घेऊन टाका पण तशा रीतसर देणगी पावत्या आम्हाला द्या. " मी म्हणालो. यावेळी सर्व पोरांनी माझ्या सूरात सूर मिसळला.

" हो, हो पावत्या द्या " एकच आवाज झाला. यावर प्राचार्यानी गुपचूप पावत्या द्यायचे कबूल केले. आणि दोन दिवसांनी तशा पावत्या सर्वांना मिळाल्या.

सवर्ण प्राध्यापक दलित विद्यार्थ्यांवर अन्याय करतात. त्यांची मानसिक छळवणूक करतात. पैशाची अफरातफर करतात. दलित विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करतात तरी देखील दलित विद्यार्थी खऱ्या अर्थाने अभ्यास आणि गुणवत्ता या बाबतीत कधीच मागे पडला नाही. अशा दुर्लक्षित दलित विद्यार्थ्यांच्या मदतीला त्या त्या ठिकाणी तोंड देण्यास दलित विद्यार्थी संघटना सज्ज असते.

## विद्यार्थ्यांच्या कॉलेज जीवनातील अनेक अडचणी

विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षण घेत असताना अनेक अडचणी येत असतात. काही विद्यार्थ्यांना कॉलेजमधील ग्रंथालयातून पाहिजे ती पुस्तके मिळत नाहीत, पुस्तकांच्या प्रती कमी असतात किंवा पुस्तकाची किंमत जास्त असते. म्हणून ग्रंथपाल ती पुस्तके विद्यार्थ्यांना देण्याचे टाळतात. खेळाच्या बाबतीत विचार

करायचा झालाच तर खेळाडूची निवड करताना खेळाचे प्राध्यापक जाणूनबूजून चांगल्या विद्यार्थ्यांनृकडे दुर्लक्ष करतात आणि ओळखीने' वशिल्याने नवीन पोरांना भरतात. परंतु चांगले खेळाडू यापासून दूरच राहतात. विशेष म्हणजे आडनाव विचारून त्या विद्यार्थ्यांचो निवड केली जाते.

त्याचप्रमाणे कॉलेजमध्ये अनेक मंडळे आहेत. त्यावर इतर विद्यार्थांना प्राधान्य दिले जाते. एखादी स्पर्धा घेतलीच तर स्पर्धेचे पारितोषिकही विद्यार्थांच्या आडनावरूनच त्याच कॉलेजमधील परीक्षक झालेले प्राध्यापक काढतात आणि दलित विद्यार्थ्यांनवर अन्याय करताना दिसून येतात. ऐवढेच काय एखाद्या कॉलेज-मध्ये विशिष्ट अशा एका जातीला आणि भाषेला प्राधान्य दिले जाते आणि त्यामुळे त्या त्या विद्यार्थ्यांची अडचण निर्माण होते. उदाहरणच घ्यायचे झाले तर सोलापुरातील एका महाविद्यालयाचे ज्वलंत उदाहरण घेता येईल. येथे कन्नड भाषेला फार महत्त्व आहे. कन्नड भाषेतून कारकून किंवा शिपायांना बोलले तर काम लगेच होते. पण मराठीतून बोलले तर उलट उत्तर येईल. इतकेच काय पण मराठी माध्यमातून शिकवण्यासाठी कितीतरी विषयाचे प्राध्यापक कन्नड भाषेचे असल्याने त्यांना मराठी नीट बोलता येत नाही. आणि वर्गात वेडेवाकडे माराठी बोलताना जो गोंधळ निर्माण होतो त्यातून विनोद निर्माण होतो. आणि मुले हसतात. शिक्षणापेक्षा विनोदातच तास संपतो.

दलित विद्यार्थ्यांच्या आणि सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या अशा कितीतरी समस्या आहेत. त्या कोणीच सोडवू शकत नाहीत. मग ग्रंथालय लहान असल्याच्या असो. शिष्यवृत्तीच्या बाबतीतल्या असो. प्राध्यपकान्बाबतच्या असो अथवा दलित विद्यार्थ्यांच्या मानहानी बाबतच्या असो, इतकेच काय तर एखादा कार्यक्रम स्वत: विद्यार्थ्यांना करू न देता प्राध्यापक आणि प्राचार्य हस्तक्षेप करताना दिसतात.

परवाचीच गोष्ट. मी कॉलेजमधील सर्व कवी आणि कवयित्री यांचा प्रातिनिधीक हस्तलिखित कवितासंग्रह काढायचे ठरवले एक महिना अगोदर नोटीस लावून कविता मागवून घेतल्या. त्या एकत्र केल्या मराठीच्या प्राध्यापकाडून तपासून घेतल्या. मराठीच्या तीन प्राध्यापकांचा अभिप्राय घेतला. माझे मनोगत घातले आणि सुंदर मुखपृष्ठासह " हिरवा गुलाब " नावाचा कवितासंग्रह तयार केला. त्या पुस्तकांच्या प्रकाशन समारंभासाठी मी प्राचार्यांना कार्यक्रमासाठी वर्ग द्या म्हणून विनंती करायला गेलो. पुस्तक त्यांना दाखवले तर प्राचार्य म्हणाले कसे

" मी वर्ग देणार नाही "

मी विचारले, " का देणार नाही ?"

" या पुस्तकाच्या कार्यक्रमात कोणत्याच प्राध्यापकांचा सहभाग नाही. तुम्ही स्वत:च सगळे करता आहात म्हणून" प्राचार्य

त्यावर मी बोललो " सर आपणाला माहित आहे. मी कवी–लेखक कलावंत

आहे. माझी दोन पुस्तके बाजारात आली आहेत. मग या कार्यक्रमाचं काय अस अवघड काम आहे ते मला झेपणार नाही. हा कवितासंग्रह मी स्वः तयार केला आहे यामध्ये सर्व कॉलेजमधील मुलामुलींच्या कविता आहेत.मराठीच्या प्राध्यापका-कडून तपासून घेतल्या आहेत. शिवाय तीन प्राध्यापकांचे अभिप्राय आहेत. "

" तरीपण कोणीतरी प्राध्यापक यात तुम्ही घ्या त्याशिवाय वर्ग मिळणार नाही. " परवानगी मिळणार नाही. प्राचार्य

" सर, मी पुन्हा विनंती करतो. " मी

" मग असे करा, कॉलेज युनियनतर्फे हा कार्यक्रम करा. " प्राचार्य

मी चिडलेलो " सर, आज या तीन वर्षात कॉलेज युनियनने एकही कार्यक्रम केलेला नाही. मग कुठे आहे कॉलेज युनियन ? आणि का करायचा त्याच्यातर्फे हा कार्यक्रम. पुस्तकासाठी कविता मी गोळा केल्या. पुस्तक मी तयार केले. खर्च मी केला. कष्ट मी केले. आणि याचे श्रेयमात्र कॉलेज युनियनला द्यायचे ? आयत्या बीळावर नागोबा ?

प्राचार्य " मग परवानगी नाही मिळणार "

मी " ठीक आहे. आम्ही मराठी विभागातर्फे कार्यक्रस करतो मराठीच्या प्राध्यापकाना सहभागी करून घेतो असे म्हणाल्यावर प्राचार्य तयार झाले. मग पोरानकडून मराठीच्या प्राध्यापकांना बोलावून घेतले, त्यांना कार्यक्रमाविषयी सांगितले. ते तयार झाले आणि तेव्हा कुठे प्राचार्य महाशयांनी हॉल दिला, परवानगी दिली. आणि " हिरवा गुलाब " पुस्तकाचे प्रकाशन झाले.

या अशा प्रकारच्या ज्या अडचणी आहेत, त्या समस्या इतर विद्यार्थ्यांपेक्षा दलित विद्यार्थ्यांच्या जीवनातच अधिक येतात. आणि त्यावर मात करण्यासाठी दलित विद्यार्थ्यांचा लढा सतत सुरू असतो. त्याचीच चळवळ बनते आणि एकसंघपणे संघटनेच्या रूपात उभी राहताना दिसते.

## सवर्ण विद्यार्थी चळवळ

विद्यार्थ्यांच्या अनेक प्रकारच्या अडचणी सोडविण्यासाठी त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी अनेक संघटना कार्यरत आहेत. प्रामुख्याने अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, छात्रभारती विद्यार्थी संघटना, एन. एस. यू. आय., विद्यार्थीसेना संघटना, म. फुले विद्यार्थी संघटना, डॉ. आंबेडकर स्टुडंटस् असोसिएशन या संघटना आपापल्या हेतूनुसार स्वहितासाठी झगडताना दिसत आहेत. परंतु काही संघटना विशिष्ट ध्येय डोळ्यासमोर ठेऊन एकाच दिशेने विद्यार्थ्यांना घेऊन जात आहेत. कांही संघटना केवळ विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडवणे हेच ध्येय बाळगतात तर कांही संघटना प्रेमपत्र स्पर्धा, सदृढ बालक स्पर्धा,सुंदर स्वाक्षरी स्पर्धा, संगीत खुर्ची, लिंबू–चमचा, रक्तदान,व्याख्यान, परिसंवाद यासारखे कार्यक्रम आयोजित करताना दिसून येतात. मोठ्या प्रमाणात या कार्यक्रमांना त्या त्या संघटना खर्च करतात.

कारण त्यांच्याकडे पैसा भरपूर आहे. त्यांना मदत करणारे हात जास्त आहेत. देणगी देणारे देणगीदार भरपूर आहेत. म्हणूनच त्यांची आर्थिक बाजू अतिशय खंबीर आहे. त्यामुळे विविध प्रकारच्या जाहिराती छापणे, कार्यक्रम आखणे, पत्रक काढणे वगैरे सारखे कार्यक्रम ते जोरात राबवतात. या संघटना आपापल्या परीने विद्यार्थ्यांच्या कॉलेज जीवनातील अडचणींना दूर करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. प्रत्येक संघटनेचे ध्येय वेगळे असले तरी विद्यार्थी हाच त्यांचा केंद्रबिंदू आहे.

या संघटना राजकीय दबावाखाली दबलेल्या आढळून येतात. राजकीय पक्षाचे बॅनर वापरून त्या संघटना चालतात. मग त्या काँग्रेस पक्षाशी सहमत असतील, भारतीय जनता पार्टीशी सहमत असतील अथवा कुठल्या ना कुठल्या पक्षाचा आशीर्वाद घेऊन त्याच्या सावलीत वाढताना या संघटना दिसतात. म्हणजेच त्या त्या राजकीय पक्षाचे कार्यकर्ते तयार करण्याचा या संघटना म्हणजे एक कारखाना आहे असे म्हणायला हरकत नाही.

राजकीय दबावाखाली जरी या संघटना वावरत असल्या तरी त्या स्वतःचे ध्येय, स्वतःचे काम यापासून विचलीत होताना दिसत नाहीत. या प्रत्येक संघटना विद्यार्थ्यांच्या वेगवेगळ्या प्रश्नासाठी नेहमीच झगडताना दिसतात. थोडक्यात, विद्यार्थी समस्येसाठी या संघटना नेहमीच पुढाकार घेताना आढळून येतात.

**दलित विद्यार्थी चळवळ**

सवर्ण विद्यार्थी चळवळीपेक्षा दलित विद्यार्थी चळवळ ही वेगळ्या प्रकारची चळवळ आहे. डॉ. आंबेडकर स्टुडंटस् असोसिएशनचा मी सोलापूर जिल्हा अध्यक्ष आहे. आमच्या चळवळीच्या इतर विद्यार्थी संघटनेपेक्षा फारच वेगळ्या भूमिका आहेत. दलित विद्यार्थी चळवळीमध्ये सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य जागृत युवाशक्तीकडून होते. डॉ. आंबेडकर स्टुडंट असोसिएशनसारख्या विद्यार्थी संघटना बौद्धीक व्याख्यानमाला, झोपडपट्ट्यांतून स्वच्छता मोहीम स्वच्छतेचे महत्त्व पटवून सांगणे, साक्षरता वर्ग, बालसंस्कार वर्ग चालवणे, कॉलेजमध्ये एखाद्या विद्यार्थ्यावर अन्याय झालाच तर सर्व युवाशक्ती अक्षरशः तुटून पडताना दिसते. सर्वच दलित विद्यार्थ्यांकडे सरकारचे लक्ष वेधावे म्हणून दलित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ व्हावी म्हणून कॉलेज बंद सारखा कार्यक्रम घडविला जातो आणि खरोखर संपूर्ण कॉलेजस् पूर्णतः बंद करण्यात तितक्याच ताकदीने या दलित विद्यार्थी संघटना यशस्वी ठरताना दिसतात.

परवाचीच एक घटना. विशेष लक्षात घेण्यासारखी बाब आहे. चंद्रकांत तपकिरे या वसतिगृहात राहणाऱ्या दलित विद्यार्थ्याने शिष्यवृत्ती वेळेवर न मिळाल्याने आणि वस्तिगृहातील अधिक्षकांची वागणूक नीट नसल्यामुळे त्यांच्या त्रासाला कंटाळून मानसिक त्रास सोसून, भुकेला कंटाळून शेवटी आत्महत्या केली. अशावेळी सरकारचे लक्ष त्या गोष्टीकडे वेधण्यासाठी आणि चंद्रकांत तपकिरे या

विद्यार्थ्याला न्याय मिळण्यासाठी आणि त्याच्या मृत्यूला कारणीभूत असलेल्या सर्वच माणसांना कायद्याने शिक्षा करण्यासाठी उपोषणाला बसावे लागले. जिल्हाधिकारी कार्यालय याच्यासमोर लाक्षणिक उपोषणास हजारोंच्या संख्येने दलित विद्यार्थी उपस्थित होते.

क्रांतिकारी म. ज्योतीबा फुले यांच्यावर बाळ गांगल यांनी लिखाण करून समाजातील लोकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात खळवळ माजली होती. त्यावेळी मी आणि माझ्या कार्यकर्त्यांनी चौकात जाहीरपणे ' सोबत ' साप्ताहिक पत्राची होळी केली.

गांगल आणि ते छापणाऱ्या बेहरेंच्या विरोधात डॉ. आंबेडकर स्टुडंटस् असोसिएशनतर्फे मोर्चा काढला जिल्हाधिकाऱ्यांना आम्ही निवेदन सादर केले. त्याचबरोबर नामांतरसारख्या प्रश्नावर लोकजागृती व्हावी सरकारला नामांतराची आठवण रहावी. आणि नामांतरास पोषक वातावरण निर्माण व्हावे. यासाठी आम्ही विद्यार्थ्यांनी हजारोंच्या संख्येने सोलापुरातून मोर्चा काढला. त्याला प्रतिसादही तरुणशक्तीने अतिशय उत्साहीतपणे दिला. इतकेच नव्हे तर शिष्यवृत्ती वाढीसाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम वेळेवर लवकर दिली जावी यासाठी समाज कल्याण अधिकारी कार्यालयावर मी आणि माझ्या कार्यकर्त्यांनी मागे दोन वेळा निदर्शने देखील केलेली आहेत.

राखीव जागा अनुशेष भरून काढण्यासाठी सरकारने आदेश दिलेला असताना देखील येथील बऱ्याच संस्थातून आणि कार्यालयातून अनुशेष भरून काढला जात नव्हता. तेव्हा आम्ही सर्व विद्यार्थ्यांनी एकत्र जमून या विषयावर चर्चा केली. स्वतः मी, माझे कार्येकर्ते डॉ. आंबेडकर स्टुडंट असोसिएशनतर्फे सर्व कार्यालये, शाळा, शैक्षणिक संस्था, महाविद्यालयांना अनुशेष भरणे बाबतपत्रक दिले. अनुशेष न भरल्यास अंदोलनाचा त्यांना इशारा दिला तेव्हा प्रत्येक संस्थेमध्ये शाळा–कॉलेजमध्ये अनुशेष भरणेबाबत कार्य सुरू झाले त्या त्या ठिकाणी जागा भरल्या गेल्या. आम्हाला तशी लेखी पत्रंही त्या त्या संस्थांनी पाठवली आहेत.

### विद्यार्थ्याचा संघटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि सहभाग

विद्यार्थी ज्यावेळी संघटनेत काम करू लागतो त्यावेळी खरोखरच त्याच्या वास्तवजीवनातील अनुभवाचे क्षेत्र व्यापक बनते, त्याला चांगले, वाईट काय आहे याची जाणीव होते. आणि संघटना म्हणजे काहीतरी एक उस्फूर्त शक्ती आहे. ते एक जागृती करण्याचं, अन्यायाविरुद्ध भांडण्याचं प्रभावी साधन आहे हे त्याला कळू लागते. अर्थात मला पण ते असच हळूहळू कळत आलेलं आहे. त्यामुळे माझ्या मनात संघटनेबद्दल एक आस्था, एक आदर निर्माण झालेला आहे. इतर विद्यार्थ्यांच्यातही तो असतोच. मग कुणी काही संघटनेबद्दल वाकडं बोललं की ते आपणाला खपत नाही. मग आमची भांडणे होतात. पण ती केवळ भांडणे नसून

वैचारिक तत्त्वासाठी मांडणे असतात. संघटनेत मतभेद असावेत या मताचा मी आहे, पण ते मतभेद वैचारिक तत्त्वाचे असावेत.

एकदा असेच झाले. डॉ. आंबेडकर स्टुडंट असोसिएशनतर्फे सोलापुरात कस्तुरबाई मार्केट येथील महानगरपालिकेच्या शाळेत M.P. S. C. चे अभ्यासवर्ग चालू केलेले होते. परंतु एके दिवशी अचानकपणे काही कार्यकर्त्यांनी कुणालाही विश्वासात न घेता रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित केला. मी नेहमी प्रमाणे वर्गात आलो. मला सर्व बातमी समजली. मी रक्षाबंधनाला विरोध केला. रक्षाबंधन करू नका. बाबासाहेबांनी हिंदू–धर्माचा त्याग केलेला आहे. त्या रुढीपरंपरा सोडा, दुसरा कार्यक्रम घडवा. म्हणून मी त्या कार्यकर्त्यांना विनंती केली, त्यांच्यात. माझ्यात वाद सुरू झाला. पण तो वैचारिक होता. शेवटी ते काही केल्या ऐकेनात म्हणून मी वर्गातून गुपचूप बाहेर पडलो आणि मगच त्या कार्यकर्त्यांनी तो कार्यक्रम आटोपला. परंतु त्या एकाही कार्यकर्त्याची हिंमत झाली नाही हा रक्षाबंधनाचा कार्यक्रम झाल्याची वृत्तपत्रातून प्रसिद्धी देण्याची त्यांना त्यांची चूक नंतर कळून चुकली होती. दुसऱ्या वर्षी तो कार्यक्रम न घेता त्याठिकाणी प्रवचनाचा चांगला कार्यक्रम आयोजित करण्यात आला हे ही तितकच महत्त्वाचं आहे.

म्हणजेच संघटनेला कोणत्याही प्रकारची बाधा होता कामा नये अथवा कलंक लागता कामा नये याची जबाबदारी प्रत्येक विद्यार्थी अत्यंत जागृतपणे घेत असतो. आणि ही जबाबदारी पार पाडीत असताना संघटनेत काम न करणारी इतर मुलंही आपोआपच संघटनेशी समरस होताना दिसतात. संघटनेत अशा प्रकारची जागृती, अशा प्रकारचं परिवर्तन, अशा प्रकारचे एखादे विधायक काम होत असताना प्रत्येक विद्यार्थ्याचा संघटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा विनम्र आणि आदरात्मक क्रांतिकारी असतो. तितक्याच विनम्रतेने आणि संघटनेच्या कार्याने प्रोत्साहीत झालेली अनेक मुले संघटनेकडे, विधायक काम करणाऱ्या सर्वांशी गोड बोलणाऱ्या, सतत संपर्क ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी समजून घेणाऱ्या कार्यकर्त्याशी एकरुप होतात. आणि आपोआपच संघटना यामुळे बळकट होत जाते. संघटनेला वजन प्राप्त होते.

विद्यार्थ्यांचा संघटनेत सहभाग हा तितकाच महत्त्वाचा भाग आहे. आणि प्रत्येक विद्यार्थी वेळोवेळी आपल्या मित्रपरिवारासह कुठल्याही संघटनेच्या कार्यक्रमात उस्फूर्तपणे सहभागी होताना दिसतो. त्यामुळेच प्रत्येक कार्यकर्ता एक क्रांतीमय वलय निर्माण करून गर्भाशयाच्या अंकुरांना फुलवीत प्रेमाच्या, ममतेच्या शृंखला जोडीत सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने घौडदौड करताना दिसूत येते.

## दलित विद्यार्थी आणि दलित प्राध्यापक संबंध

मी आंबेडकर स्टुडंस असोसिएनचा सोलापूर जिल्हा अध्यक्ष असल्याने प्रत्येक कॉलेजमध्ये प्राध्यापकाकडे वर्गणी मागायला जात होतो. त्यांना कार्यक्रमाला

आमंत्रित करीत होतो. पण खरे पाहता काही दलित प्राध्यापक मंडळी थोडासुद्धा उत्साह अथवा आत्मीयता न दाखवता वरच्या मनाने माझ्याशी आणि कार्यकर्त्यांशी बोलताना आढळून आले. " वर्गणी जेवढी असेल तेवढी घेऊन जा. " कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आश्वासन देऊन कार्यक्रमास अनुपस्थित राहत असत. काही प्राध्यापक तर वर्गणी द्यायला देखील टाळाटाळ करताना आढळले. दरवेळेस मी आणि माझे कार्यकर्ते त्या त्या कॉलेजच्या प्राध्यापकांशी संपर्क साधून त्यांना विश्वासात घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. पण तो निष्फळ ठरतो. कारण हे दलित प्राध्यापक संघटनेपासून दूर जाण्याचा प्रयत्न करतानाच दिसून येतात. कारण संघटनेचे नाव एकदा का त्यांच्या मागे लागले तर आपण कोणत्या समाजाचे आहोत हे इतर मुलामुलींना कळून येईल ही एक भीती त्यांच्या मनात असते. म्हणजे संघटनेचा त्यांच्या प्राध्यापक जीवनात वाईट परिणाम होईल असेच त्यांना वाटत असावे. म्हणूनच आजपर्यंत दलित प्राध्यापक बाहेरचे तर सोडाच पण कॉलेजमध्ये संघटनेने आयोजित केलेल्या कुठल्याच कार्यक्रमाला मग तो ६ डिसेंबरचा असो अथवा १४ एप्रिलचा असो एकदाही हजेरी लावलेली नाही. याचा अर्थ मी आणि माझ्या कार्यकर्त्यांनी काय समजावा ?

दलित प्राध्यापकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि म. जोतीबा फुले या महापुरुषांना विसरू नये. आपण संघटनेची वर्गणी दिली म्हणजे सगळे काही संपले असे होत नाही. का या थोर पुरुषांचे उपकार हे दलित प्राध्यापक विसरले आहेत ? विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन योग्य त्या सूचना या प्राध्यापकांनी करायला पाहिजे अशी माझी स्वतःची इच्छा आहे. या सर्व दलित प्राध्यापकांनी या दलित विद्यार्थ्यांच्या संघटनेत सहभागी होऊन विचाराअंती एकीने जे कार्य करायचे आहे ते अधिक ताकदीने, जोमाने करण्यास मदतच होईल. याचाही विचार या दलित प्राध्यापकांनी जरूर करावा.

काही दलित प्राध्यापक तर असे अनुभवास आले आहेत की आम्ही संघटनेचे कार्यकर्ते त्यांना रस्त्यात भेटलोच तर अथवा दिसलो तर सरळ तोंड फिरवून बघून न बघितल्यासारखे करून जातात. आशा या महान प्राध्यापकांना गावाचे अनुयायी म्हणवून घेण्याचा काहीच अधिकार नाही. संघटनेत काम केल्याने, कार्यकर्त्यांशी संपर्कात राहिल्याने आपली जात कॉलेजमधील मुलांमुलींना कळेल ही भीती त्यांना का वाटावी. ? सगळे दलित प्राध्यापक असेच आहेत असेही मी म्हणत नाही. काही प्राध्यापक स्वतःहून संघटनेत येतात, कामं करतात. वेळावेळी मार्गदर्शन करतात. कांही चांगल्या वाईट गोष्टी समजावून सांगतात, आर्थिक मदत करतात. मार्गदर्शन करतात. सतत विद्यार्थ्यांच्या कार्यक्रमात सहभागी होताना दिसतात. अशाच प्रकारचे प्रा. महादेव देशमुख सर हेही आहेत. त्यांचे गुण घेण्यासारखे आहेत. यामुळेच माझ्यासारख्या कार्यकर्त्याला कामासाठी प्रेरणा मिळते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. जोतीबा फुले यांनी घालून दिलेल्या विचाराला घेऊन जाताना सर्वांना बरोबरीने घेऊन जायाचे हे काम प्राध्यापक का करीत नाहीत. हा एक संभ्रम माझ्या आणि माझ्या कार्यकर्त्यांच्या मनात राहिला आहे. जात लपवून हे प्राध्यापक आपल्या वस्त्यापासून, वसाहतीपासून दूर राहतात संघटनेत येत नाहीत. विद्यार्थ्यांशी संबंध ठेवत नाहीत. म्हणजेच ते दलित ब्राह्मण झाले आहेत असेच मला या ठिकाणी म्हणावेसे वाटते.परंतु एक दिवस असा येईल या दलित ब्राह्मण झालेल्या माझ्या तमाम बांधवाविरुद्धच संघटनेला लढा द्यावा लागेल. या प्राध्यापकांना माझी अशी विनंती आहे की तुम्ही स्वतःला दलित ब्राह्मण म्हणवून घेता मग हिंदू–महार म्हणून का सवलती घेता ? प्रमोशन का मिळवता ? राखीव जागेचा का फायदा घेता ? तुमच्या मुलांमुलींना या सवलतीचा का लाभ घेऊ देता ?म. जोतिबा फुलेचा, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जर आदर्श तुम्हाला जपायचा असेल तर तुम्हाला स्वतःला त्यांचे अनुयायी म्हणवून घेण्याचा अधिकार नाही तुम्ही सर्वांनी एकत्र यावे. सर्वजण मिळून कामे करावीत विद्यार्थी चुकल तिथं तुम्ही जरुर मार्गदर्शन करा हीच माझी इच्छा आहे.

## इतर प्राध्यापकांचा दलित विद्यार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन

दलित विद्यार्थी आणि त्यातल्या त्यात तो दलित विद्यार्थी संघटनेत काम करतोय म्हटल्यावर काही प्राध्यापक गुरुवर्य जातीच्या नावाखाली अप्रत्यक्षपणे विरोधी भूमिका करताना दिसून आले.

डॉ. आंबेडकर स्टुडंटस् असोसिएशन तर्फे आम्ही सर्वच महाविद्यालयांतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म. जोतीबा फुले वगैरे नेत्यांची जयंती, पुण्यतिथी दरवर्षी साजरी करतो. परंतु एका महाविद्यालयात एका खास कार्यक्रमाच्या वेळी कार्यक्रम द्यायचा नाही म्हणून प्राचार्यांकडून आम्हाला बोलावून घेण्यात आले. आम्ही ठरविलेला कार्यक्रम करायचा नाही असे सांगण्यात आले. माझे डोके थोडे तापले. मी म्हणालो,

" सर, तुम्ही कॉलेजात परवानगी देणार नसाल तर ठीक आहे. हा कार्यक्रम कॉलेजच्या फुटपाथवर होईल अथवा शेजारचा हॉल भाड्याने घेऊन तो केला जाईल, पण कार्यक्रम रद्द होणार नाही. तुमचा कार्यक्रमाला सरळ विरोध आहे हे वृत्तपत्रातून आम्ही जाहीर करणार असे म्हणाल्यावर प्राचार्य महाशय आणि त्यांचे साथीदार काही प्राध्यापक मंडळी घाबरली आणि आमचा विरोध नाही म्हणून त्यांनी आम्हाला परवानगी दिली. त्या दिवशीचा जो कार्यक्रम होता तो बहुसंख्य विद्यार्थी–विद्यार्थिनी आणि प्राध्यापकांच्या उपस्थितीत पार पडला. पण दुसऱ्याच दिवशी त्यातील काही प्राध्यापकांनी काही विद्यार्थ्यांना हाताशी धरून विद्यार्थी सेना नावाची नवीन संघटना उघडली. अशातऱ्हेने प्राध्यापकांचा हा राजकारणीय डामडौल चालू आहे.

दुसरे विशेष सांगायचे म्हणजे दलित साहित्य हा विषय इतर प्राध्यापकांकडे शिकवण्यासाठी असतो. त्यावेळी हे प्राध्यापक दलित साहित्यिकावर टीका करत विद्यार्थ्यांना त्या साहित्यातील वाईट बाजू सांगतात आणि लेखकाची बदनामी करण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. परंतु दलित साहित्यातील दुःख, वेदना, त्याग, विद्वत्ता, गुणवत्ता, वास्तवता, विद्रोह, नकार या बाबी मात्र विचारात न घेता विद्यार्थ्यांना विचित्रपणे मार्गदर्शन केले जाते.

एकदा साहित्यशास्त्र या विषयाचा तास चालू होता. पौर्वात्य आणि पाश्चिमात्य साहित्यिकांनी साहित्याच्या व्याख्या कशाप्रकारे केलेल्या आहेत. यावर चर्चा चालू होती. वर्ग मुलामुलींनी गच्च भरला होता. मी स्वतः वर्गात हजर होतो. दंडी, भामह, रुद्रट, वामन वगैरे पौर्वात्य तर रस्कीन, वाल्टेअर, वर्डस्वर्थ, शेक्सपियर वगैरे पाश्चिमात्य साहित्यशास्त्रज्ञांच्या ' व्याख्यांचा ' परामर्श चालू होता. एक ब्राह्मण प्राध्यापक हा विषय शिकवीत होते. त्यांनी बोलता बोलता आपला मोर्चा लोककला वगैरे करत नाटक-पथनाट्य इकडे वळवला. ते प्राध्यापक महाशय म्हणाले, ज्या मुलांना किंवा कलाकारांना नाटकात कामे मिळत नाहीत किंवा त्यांना स्टेज मिळत नाही अशी सटरफटर चार माणसं एकत्र येतात आणि फूटपाथवर नाचतात त्यालाच पथनाट्य असे म्हणायचे. इतका वेळ मी शांत बसलेला यावेळी मात्र खवळलो आणि उठून सरांना बोललो. सर, तुम्ही काहीतरी चुकीचं बोलता आहात. पथनाट्य म्हणजे केवळ नाटकात अथवा स्टेजवर काम न मिळालेले कलाकार फूटपाथवर नाचतात हे चुकीचं आहे. पथनाट्य म्हणजे समाजपरिवर्तनाचं एक व्यासपीठ आहे. पथनाट्य म्हणजे लोकजागृतीचं एक प्रभावी साधन आहे. पथनाट्य म्हणजे रंजल्या, गांजल्या पिडीतांना, दरिद्र्यांना, निरक्षरांना, अंधश्रद्धाळुंना नवजीवन देणारा एक मार्ग आहे. पथनाट्ये ही चळवळ केवळ महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण भारतात आहे, आणि भारतदेशाबाहेर अमेरिका, आफ्रिका, रशिया, जपान, चीन वगैरे देशांत पथनाट्य चळवळ चालू आहे. अमेरिकेत ब्लॅकपँथर ही चळवळ चालवते आहे तर आफ्रिकेत निग्रोंनी स्वतःच्या मुक्तीसाठी वर्णभेदाविरुद्ध अभेद्य अशी पथनाट्याची चळवळ चालू केली आहे. पथनाट्यांचा वापर सर्व जगात लोकजागृती-साठी केला जातो. इतर राष्ट्रातही अशाच प्रकारे ही पथनाट्याची क्रांतिकारी चळवळ सुरू आहे. भारतात ही चळवळ सर्वत्र आहे. उत्पलदत्त, नसरुद्दीन शहा, नाना पाटेकर, शबाना आझमी, स्मिता पाटील, सदाशिव अमरापूरकर, निळू फुले, डॉ. श्रीराम लागू वगैरे कलावंत या माध्यमातून काम करीतच चित्रपट नगरीत आले आहेत, हे तुम्ही विसरू नका. सर, पथनाट्य हे सामाजिक परिवर्तनाचे जागतिक स्वरूपाचे प्रभावी माध्यम आहे. ते मर्यादित नाही. असे असताना तुम्ही

विद्यार्थ्यांना खोटे का बोलता. तुमचा जर या विषयाचा अभ्यास नसेल तर तो तुम्ही करा, मगच आम्हाला शिकवा. नाहीतर तुमचे अर्धवट ज्ञान आमच्या जीवनात अर्धेच राहील आणि आमच्यापासून निर्माण होणारी नवीन पिढी अर्धवट ज्ञानातच जोपासली जाईल. त्यावर प्राध्यापक महाशय गप्प झाले. " बरे, माझा याविषयाचा अभ्यास नाही. " एवढेच बोलले आणि वर्गातून निघून गेले. पण सर्व वर्गातील विद्यार्थ्यांना माझा हा विचार पटला होता. म्हणजेच इतर समाजाचे प्राध्यापक आज महाविद्यालयातून शिकवत असताना मनात काही तरी रोष ठेऊन विद्यार्थ्यांना शिकवताना दिसताहेत. ज्या ज्या ठिकाणी म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उल्लेख करणे महत्त्वाचे ठरते त्या त्या ठिकाणी प्राध्यापक उल्लेख करणे जाणूनबुजून टाळतात. जाणूनबुजून दलित विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष करताना दिसतात. अशा तऱ्हेचे विघातक कृत्य हे प्राध्यापक राजरोसपणे करीत आहेत. परंतु दलित विद्यार्थी संघटना आणि त्यातील जागृत कार्यकर्ते प्रत्यक्ष वर्गातच अशा गोष्टींना आणि प्राध्यापकांना विरोध करीत आहेत.त्यांचे मुद्दे खोडून काढत आहेत. म्हणून प्राध्यापक या कार्यकर्त्यांना हाताशी धरू पाहात आहेत. या दलित विद्यार्थ्यांना गोड बोलून आणि त्यांना विश्वासात घेऊन आपल्या मनातील द्वेष पद्धतशीरपणे त्यांच्यावर लादत आहेत आणि हा द्वेष मत्सर, आणि ज्या अडचणी आहेत त्या ओळखणे ही आजच्या दलित विद्यार्थ्यांच्या हिताचे ठरते. दलित विद्यार्थ्यांनी प्रत्येक पाऊल विचाराने उचलणेच महत्त्वाचे वाटते अन्यथा या प्राध्यापकांच्या खोटया प्रेमवलगनांना बळी पडून आमच्याच काळजात कटयार घुसली जाणार आहे, याचीही नोंद सर्वच दलित विद्यार्थ्यांनी घेणे गरजेचे वाटते.

परंतु सर्वच इतर प्राध्यापक हे कर्मठ प्रवृत्तीचे, सनातनी, रुढीपरंपराप्रिय आहेत असे नाही. दलित विद्यार्थ्यांना, कार्यकर्त्यांना हाताशी धरून निर्भिडपणे, स्वच्छ मनाने या विद्यार्थ्यांत एकरूप होऊन तन्मयतेने काम करणारे, सतत मदतीचा हात पुढे करणारे, वेळोवेळी मार्गदर्शन करणारे आणि विद्यार्थ्यांचे चुकेल तिथे कान पकडणारे काही प्राध्यापक आहेत. पण पण त्यांची संख्या बोटांवर मोजण्या इतकी आहे.

## मुलींचा संघटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन

मुलींचा विचार करीत असताना आणि ते ही संघटनेच्या बाबतीत म्हटल्यावर अगदीच अल्पसा प्रतिसाद मुलींकडून मिळतो आहे. शक्यतो मुली दलित विद्यार्थी संघटनेत काम करण्याचे नाकारताना दिसून येतात. एखाद्याच बोलक्या चांगल्या मुलीला समजावून सांगून तिचे मनःपरिवर्तन करून तिला संघटनेत सहभागी करून घ्यावे लागते. ती संघटनेत सहभागी झाल्यानंतर तिच्याकडे बळजबरीने तिच्या मैत्रिणी अथवा इतर मुली वेगळ्या दृष्टीने पाहतात. तिचा संपर्क तोडतात तिची मैत्री तुटली जाते.आणि केवळ ती खऱ्याच अर्थाने अनाथ दलित बनून राहते.

त्यामुळेच मुलींचा सहभाग या दलित विद्यार्थी चळवळीत म्हणावा तसा नाही. म्हणून याचा अर्थ असा नव्हे की मुली संघटनेत येतच नाहीत. संघटनेच्या प्रत्येक कार्यक्रमास त्या उपस्थित असतात. कार्यक्रमात त्या सहभागी होतात. वर्गणी देतात. परंतु त्यांना त्याची प्रसिद्धी अथवा या ठिकाणी नाव वापरण्यास नको वाटते. म्हणून मुलींचा संघटनेकडे बघण्याचा दृष्टीकोन हा काहीसा मर्यादित आहे.

अर्थात या मुलींमध्ये काही मुली या कॉलेजमध्ये मौजमजा करणाऱ्याही असतात. काही मुली इतर संघटनेकडे काम करीत असतात. काही मुली केवळ आपली जात कळली जाईल म्हणून न येणाऱ्याही आहेत. तर काही बड्या घरच्या दलित विद्यार्थिनी संघटनेशी कार्यकर्त्याशी कसल्याच प्रकारे आपला संपर्क न ठेवता फक्त इतर जातीच्या मुलींत मैत्री बनवून ओळखूनही येत नाहीत. म्हणूनच संघटनेत मुलींचा सहभाग पाहिजे तसा मिळत नाही.

एकदा असेच एका मुलीने ६ डिसेंबर दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाणदिनी डॉ. आंबेडकरांवर भाषण केले. भाषण खूपच चांगले झाले. परंतु दुसऱ्याच दिवशी कॉलेजमधील काही मुलांनी तिला डॉ. आंबेडकर म्हणून चिडविण्यास सुरुवात केली. तिची टर उडवू लागले. तेव्हा स्वत: तिने मला व माझ्या कार्यकर्त्यांना येऊन निरोप दिला. मी आणि माझे कार्यकर्ते सगळे एकत्र जमून आम्ही त्या पोरांना गाठले. त्यांना जाब विचारला. दम भरला. पुन्हा त्या मुलीला चिडवशील तर याद राख ! ताकीद देऊन हे प्रकरण मिटवले. ती मुले शांत झाली; परंतु संघटनेत काम करणारी एक कार्यकर्ती त्यामुळे दुरावली.

अशाप्रकारे मुलींच्या बाबतीत अनेक संकटे येत असतास. मुलीचा या बाबतीत अतिशय नाजूक प्रश्न असतो. त्यामुळे मुली शक्यतो संघटनेपासून लांबच असतात. परंतु त्यांचा संघटनेला अप्रत्यक्षपणे पाठिंबाच असतो, हे नाकारता येत नाही.

## दलित विद्यार्थी नेमका कुठे कमी पडतो

दलित विद्यार्थी हा तसा जिज्ञासू, कष्टाळू, अभ्यासू, प्रामाणिक आहे. प्रत्येक क्षेत्रात दलित विद्यार्थ्यांचा सहभाग नजरेस पडतो आहे. काही बाबतीत विचार केल्यास दलित विद्यार्थी थोडासा वेगळा वाटतो. कारण कॉलेज जीवनात वावरत असताना तेथील वातावरण आणि विद्यार्थ्यांचे तारुण्याचे हसायखेळायचे दिवस लक्षात घेता हा दलित विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांप्रमाणे लाईट रंगाचे कपडे न घालता तो गडद रंगाचे भडक असे कपडे वापरतो. त्यात कपड्याला इस्त्री नसते. कारण दलित विद्यार्थ्यांची घरची परिस्थिती अर्थिक बाबतीत नाजूक असते. त्यामुळे कपड्यांना सतत तो इस्त्री करू शकत नाही. त्यामुळे इतर विद्यार्थ्यांच्या मानाने दलित विद्यार्थी या ठिकाणी कमी पडतो. कारण दलित विद्यार्थी कितीही हुषार असला, प्रामाणिक असला तरीही इतरांनर त्याचा प्रभाव पडत नाही. वर्गात त्याला जवळचे असे सहकारी मित्र मिळत नाहीत. त्याचबरोबर त्याचे इतर

विद्यार्थ्यांशी वागणे, बोलणे हे वेगळया पद्धतीचे असल्याने तो इतर विद्यार्थांपुढे हास्यापद विषय ठरतो.

कॉलेजमध्ये ' भरारी मित्र मंडळ ' नावाचे एक मंडळ गेली दोन वर्षे काम करीत आहे या मंडळात विविध क्षेत्रांतील खेळाडू, कलावंत, साहित्यिक, गायक वगैरे सर्व तऱ्हेच्या विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. या मंडळातर्फे काव्यस्पर्धेचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्या कार्यक्रमाचे संचलन एका दलित विद्यार्थ्याकडे देण्यात आले होते. त्याच्या जोडीला एक ब्राह्मण समाजाची मुलगी होती. दोघांनी संचलन करायचं ठरलं ! ठरल्याप्रमाणे बहुसंख्येने विद्यार्थ्यांच्या उपस्थित कार्यक्रम सुरू झाला. स्वागत गीत झाले. मुलींनी काव्यस्पर्धेस अतिशय चांगल्या पद्धतीने सुरुवात करून दिली. एका स्पर्धकाने सुंदर कविता वाचून दाखविल्या. आता दलित विद्यार्थ्यांकडे पुढचा संचलनाचा भाग होता. तो समोर आला. एक तर अंगावर पोशाख व्यवस्थित नव्हता. डोक्याला तेल लावलेले नव्हते. केस विंचरलेले नव्हते. समोर येताच त्याने संचलनास सुरुवात केली.

आत्ताच ज कविणी कविता वाचली
त्याला आपल्या सगळचानी साथ दिली.

आता या पुडचा कवी हायत . . . सगळचा कार्यक्रमात त्याच्या या ग्रामीण भाषेमुळे हशा पिकला. कार्यक्रमात एक वेगळाच सूर मिसळला. मी स्वतः त्या कार्यक्रमाला हजर होतो. दलित भाषा त्या विद्यार्थ्याने शेवटपर्यंत तशाच पद्धतीने सादर केली आणि हास्याच्या दरबारात एक नवा विक्रम नोंदवला. कार्यक्रमानंतर त्या दलित विद्यार्थ्याला समजले की मुले आपणाला का हसत होती.

दलित विद्यार्थ्यांकडे गुण आहेत, गुणवत्ता आहे परंतु चालण्या–बोलण्याच्या राहणीमानाच्या विसंगत सवयीमुळे अथवा अज्ञानामुळे त्याचे जे नुकसान होत आहे. त्याला तो स्वतःच व्यक्तिशः जबाबदार आहे. दलित विद्यार्थ्यांने स्वतःचे वागणे, बोलणे, राहणीमान सुधारेल.

ज्यावेळी आपला मुलगा दहावी पास होतो आणि कॉलेज जीवनात प्रवेश करतो त्यावेळी दलित विद्यार्थ्याच्या पालकांचा विद्यार्थ्याच्या पुढील भवितव्याचा विशिष्ट असा कोणताच दृष्टिकोन त्यांच्यासमोर नसतो. इतर जातीचे पालक आपला मुलगा डॉक्टर, वकील, इंजिनिअर व्हावा ही दूरदृष्टी ठेऊन पाल्याला त्या त्या शाखेत कॉलेजमध्ये घालतात. तसा कोणताच दृष्टिकोन दलित विद्यार्थ्याच्या पालकात नसतो. त्याच्यासमोर फक्त माझा मुलगा शिकावा, त्याने शिक्षण घ्यावे, एवढाच दृष्टिकोन असतो. त्यामुळे दलित विद्यार्थ्यांना व्यवस्थित मार्गदर्शन मिळत नाही. दलित विद्यार्थी जीवनात भरकटत जातो. फक्त शिकत राहतो. डिग्री मिळवतो. बेकार होतो. ही पालकांची चूक विद्यार्थ्यांना पुढील आयुष्यात भोगावी लागते. त्यासाठी कॉलेज जीवनात पदार्पण करताना प्रत्येक विद्यार्थ्याने नक्की

आपणाला कोणत्या मार्गाने जायचे आहे. तो मार्ग निश्चित करावा आणि मगच प्रवेश घ्यावा.हाच महत्त्वाचा काळ विद्यार्थ्यांच्या जीवनात महत्त्वाचा असतो अन्यथा केवळ घाईगडबडीच्या निर्णयामुळे किंवा अज्ञानाच्या चुकीमुळे भविष्यकाळातल्या जीवनात त्याचे प्रायश्चित घ्यावे लागते. त्याकरिता प्रत्येक पालकाने आणि विद्यार्थ्यांने जागृतपणे आपला मार्ग आपले क्षेत्र निवडावे आणि त्यात्र दृष्टीने त्यांनी वाटचाल करावी म्हणजे पुढील संकटातून मुक्त होऊन निर्भयपणे जीवन जगता येईल.

### संघटना आणि चळवळ यांचा विद्यार्थ्यांच्या जीवनावर कोणता परिणाम होतो

संघटनेत काम करीत असताना ज्या जबाबदाऱ्या सर्वांनी मिळून पार पाडावयाच्या असतात. त्या पार पाडीत असताना सर्वांची मदत, सर्वांची तळमळ एकसंघपणे मोलाची ठरते. नाहीतर त्या कार्यात जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवरच सर्व बोजा पडून ते कार्य मोडीत निघते. आणि संघटनेस गालबोट लागण्याची शक्यता निर्माण होते. म्हणजेच संघटनेत काम करीत असताना प्रत्येकाचा सहभाग, काम, कम्युनिकेशन अत्यंत महत्त्वाचे ठरते. कोणत्याही चळवळीत एखादं काम जागृतपणे, तळमळीने, एकोप्याने होत असेल तर संघटना मजबूत होण्याला मदत होईल. अन्यथा संघटना फुटीरतेच्या मार्गावर दिसेल.

संघटनेत काम करीत असताना काही कार्यकर्ते स्वतःला मी कोणीतरी आहे या भ्रमात असतात आणि त्या भ्रमातच ते वावरतात. त्यामुळे समोरील व्यक्ती कोण आहे. त्या व्यक्तीचा संघटनेसाठी काय उपयोग होईल किंवा त्या व्यक्तीकडून संघटनेला कशाप्रकारे मदत मिळेल याचा विचार न करता तो कार्यकर्ता स्वतःच्याच 'ग 'च्या भ्रमात वावरतो आणि संघटनेच्या एखाद्या चांगल्या कार्यामध्ये विघ्न आणतो. संघटनेला बाधा होईल असेच त्याचे वर्तन असते. त्यामुळे संघटनेच्या इतर कार्यकर्त्यांत दुफळी निर्माण होते. त्यामुळे संघटना फुटीरतेच्या मार्गावर दिसते. सर्वच कार्यकर्ते अशा प्रकारचे वर्तन करतात असेही नाही. काही कार्यकर्ते पूर्णपणे स्वतःला संघटनेच्या कार्यात वाहून घेतात. आणि केवळ संघटना हेच दैवत मानून काम करतात. उदाहरणच घ्यायचे झाले तर संजीव सदाफुले, शाम शिंगे, डॉ. आंबेडकर स्टुडंटस् असोसिएशनचे माजी अध्यक्ष सतत संघटनेच्या कार्यात झटणारे पोरानकडून वर्गणी गोळा करणे, प्रत्येक कॉलेज शाखांना भेटी देणे कार्यक्रमाचे नियोजन करणे, कार्यक्रमाच्या पाहुण्यांना निरोप देणे पासून ते कार्यक्रम संपल्यावर खालच्या सतरंज्या घडया करण्यापर्यंत पडेल ते काम करणारे हे संजीवन खरोखरच संघटनेला लाभलेले आहे. यामुळेच कार्यकर्त्यांत गोडी निर्माण होते. संघटनेत एकता साधली जाते. आणि संघटनेच्या कार्याला गती प्राप्त होते. म्हणून अशा कार्यकर्त्यांची संघटनेलां अत्यंत आवशकता आहे.

एखादा कार्यकर्ता ज्यावेळी चांगली कामे करू लागतो. त्यावेळी काही वाईट प्रवृत्तीची मुले त्याला विरोध करतात. त्याच्या कार्यात अडथळे आणतात. आपापसातील मतभेदामुळे संघटनेच्या कार्यात अडथळे निर्माण करतात. कार्यक्रम रद्द केले जातात. यामुळे संघटना वेगळयाच वातावरणात जाते. कार्यकर्त्यामधील समतोल बिघडतो आणि प्रत्येक कार्यकर्ता भरकटत जातो.

सर्वानुमते मला डॉ. आंबेडकर स्टुडंटस् असोसिएशनचा अध्यक्ष म्हणून निवडण्यात आले. सर्व कार्यकर्ते कामाला लागलो. मी स्वतः जास्तीत जास्त वेळ संघटनेच्या कामासाठी देत होतो. प्रत्येक कॉलेजवर शाखा स्थापन करण्याचे काम जोरात चालू झाले. काही कार्यकर्ते मुद्दाम आमच्यात सहभागी होत नव्हते. जेवढे जमतील तेवढयांना घेऊन प्रत्येक कॉलेजवर शाखा स्थापन करण्याचे कार्य केले. हा कार्यक्रम अतिशय परिश्रमाने पार पडला. 'विद्यार्थी मेळावा' हा कार्यक्रम बैठकीत सर्वानुमते मंजूर करून आयोजित केला. हॉल आणि पुष्पहार, गुच्छ, एका प्राध्यापकाकडून मोफत मिळाले. चहापानाचा खर्च संघटनेला येणार होता. परंतु कोणत्याच कार्यकर्त्यांनि पैसे वर्गणी न दिल्याने हा विद्यार्थी मेळाव्याचा कार्यक्रम रद्द करावा लागला. हा कार्यक्रम घेण्यापाठीमागचा उद्देश असा की प्रत्येक शाखेच्या कार्यकर्त्यांची एकमेकांना ओळख करून देणे. त्यांच्यात विश्वास निर्माण करणे, सभासद कशाप्रकारे मिळवणे,कार्यक्रम कशाप्रकारे करणे वगैरे माहिती कार्यकर्त्यांना देण्यात येणार होती.

मंडल आयोगाविरोधात विद्यार्थी आत्मदहन करीत आहेत. देश पेटला आहे. परंतु मंडल आयोग म्हणजे काय ? त्याचा फायदा कुणाला होणार आहे याबद्दल एक परिसंवादाचा कार्यक्रम आखला पण तो ही कार्यक्रम वर्गणी न मिळाल्याने रद्द करावा लागला. त्यानंतर येथील दैनिक तरुण भारत कार्यालयास डॉ.आंबेडकर, म. फुले यांच्या शताब्दिनिमित्त फोटो आणि साहित्यभेट कार्यक्रम आयोजित केला होता. तो कार्यक्रम पण संघटनेचे प्रमुख सल्लागार चार आकडी पगार घेतात पण केवळ ४५ रुपये देऊ न शकल्यामुळे रद्द केला गेला.

म्हणजे सतत एखाद्या कार्यकर्त्याला जर अशा प्रकारचे कार्यक्रम रद्द करून त्याची मानसिक आणि शारीरिक पिळवणूक कार्यकर्ते करीत असतील तर संघटनेला हे धोकादायक ठरते. आणि माझ्या बाबतीत तेच घडले. शेवटी या सर्व बाबींना कंटाळून मी स्वतःच माझ्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. परंतु त्यामुळे संघटनेतील इतर कार्यकर्त्यांवर त्याचे परिणाम होऊन प्रत्येक शाखेच्या अध्यक्षांनी, उपाध्यक्षांनी, सेक्रेटरी वगैरेंनी राजीनामा देण्याची माझ्याकडे लेखी तयारी दर्शवली, परंतु मी त्यांची समजूत घातली आणि त्यांना आपण सगळे एक आहोत. संघटनेत फूट पडेल असे काही करू नका म्हणून समजावून सांगितले व त्यांचे समाधान केले आणि संघटनेचे कार्य पूर्ववत सुरू झाले.

अशाच पद्धतीने चळवळीच्या बाबतीत उदाहरणे देता येतील.संघटना ज्यावेळी अशा प्रकारचे कार्य करीत असते मग, तो नामांतराबाबत मोर्चा असो किंवा एखाद्या वृत्तपत्राने गलिच्छ वृत्त छापून नेत्यांची बदनामी केलेली असो, अशावेळी सर्व कार्यकर्ते चळवळीच्या चौथऱ्यावर एकत्र येतात त्यावेळी अनेकात मतभेदही होऊ शकतात. परंतु अशावेळी समजूतदारपणा घेणे हे फार महत्त्वाचे ठरते. कार्यकर्त्याला अटक होते. पोलिसांचा मार खावा लागतो. त्यांच्यावर पोलीस केस होते. त्यावेळी अध्यक्ष, सल्लागार मंडळी यांनी त्या कार्यकर्त्याला या संकटातून मुक्त करणे जबाबदारीचे असते नाहीतर पोलीस केस झाल्याने त्या विद्यार्थ्याचे, कार्यकर्त्याचे जीवन बरबाद होते. त्याच्यावर वेगळाच परिणाम होतो. तो वेगळ्या दिशेने जातो. कार्यकर्त्यांना द्वेषभावनेपोटी पोलीस मारहाणही करतात, अटक करतात. त्यामुळे कार्यकर्त्यात दबाव निर्माण होतो. संघटना आणि चळवळीत काम करीत असताना जीवनात जे अनुभव येतात, जे प्रसंग त्यांच्यावर गुजरतात, कार्यकर्त्यांना ज्या घटनेतून, प्रसंगातून जावे लागते त्याचेच परिणाम कार्यकर्त्यांच्या पुढील आयुष्यात होत जातात. आणि अशाच प्रकारच्या नावाचा शिक्कामोर्तब होतो. एकदा का पोलीस केस झाली, कार्यकर्त्याला सजा झाली, तर यांचे परिणाम त्याच्या जीवनाला कलाटणी देतात. तो गुंड बनतो. विधायक कामे करीत असतानाच तो विघातक कृत्यांना वळी पडतो. आणि तेच त्याच्या जीवनाचे साधन म्हणून बनून राहते. परंतु असाच एखादा कार्यकर्ता चांगला लिडरही बनू शकतो. उदाहरण घ्यायचे झाले तर मा. ना. रामदास आठवले यांचे आपल्या डोळ्यासमोर ठेवता येईल.

म्हणजेच विद्यार्थी जीवनात, कार्यकर्ता संघटनेत चळवळीच्या दृष्टिकोनातून काम करीत असताना त्याचे जे साथीदार आहेत, जे कार्यकर्ते आहेत, जे मार्गदर्शक आहेत, कोणते स्थळ आहे. कार्यक्षेत्र कशा प्रकारचे आहे. या सर्व गोष्टीचा प्रभाव त्याच्या भावी जीवनावर नक्कीच पडतो. आणि त्याचे भावी जीवन घडविण्यास तेच परिणाम यशस्वी ठरतात. मग ते चांगले असो अथवा वाईट असो त्या त्या प्रकारे कार्यकर्त्याच्या जीवनावर त्याचा दूरगामी प्रभाव पडलेला आढळतो हे मात्र सूर्यतेजाइतके सत्य आहे.

**— संजय लांडगे**

संजयनगर, कुमठा नाका, सोलापूर

●

नोंद ३८३६
२९४९६
१७/५/९

# लोहार, गाडीलोहार संघटना

**– वैजनाथ कळसे**

संघटना बांधल्यापासूनच अनेकांचा नुसता प्रश्न की, पुढे काय ? अधिवेशन होताच, पुढे काय ? मोर्चा काढून होताच, पुढे काय ? गंमत अशी की आखलेला कार्यक्रम पार पडल्यानंतर आठ दिवसांच्या आत ठिकठिकाणाहून पत्राद्वारे विचारणा व्हायची की, आपला प्रश्न सुटला का ? मुख्यमंत्र्यानी चर्चेसाठी बोलावले का ? बऱ्याच लोकांची कल्पना अशी की, एखादा कार्यक्रम केला की शासन लगेच दखल घेऊन प्रश्न सोडवणार. शेवटी प्रत्येकजण आपापल्या कुवतीप्रमाणे विचार करत असतो. समाजातला प्रत्येकजण जसा माझ्यासारखा विचार करू शकत नव्हता तसं त्यांच्या पातळीवर जावून मीही विचार करू शकत नव्हतो. फक्त मला आनंद एवढाच होता की, समाजबांधणीला, संघटनेला आपण चळवळीचे रूप देत आहोत, याचाच. लोकांनी समाजाचे प्रश्न सुटले पाहिजेत याची घाई झाली होती. तर मला संघटनेने चळवळीचे रूप धारण केले पाहिजे याची निकड वाटत होती. प्रश्नाच्या स्वरूपाच वय हजारो वर्षांच असल्या कारणाने इतक्या झटपट, अल्प कालावधीत प्रश्न सुटण्यातले नव्हते आणि समजा शासकीय पातळीवर सुटले तरी खेड्यापाड्यांतला जो निरक्षर,अडाणी समाज आहे याच्यापर्यंत जावून पोहचायला खूप अवधी लागतोय व जाती–जमातींना कागदोपत्री ज्या सवलती गेल्या चाळीस

वर्षांपासून मिळत आहेत. त्यातून त्या समाजातील दहा टक्क्यांना देखील अजून पदरात पडलेल्या नाहीत तर अगणितांना आपणासाठी सवलती आहेत हे ही माहीत नाही.

मार्च ८९ च्या शेवटच्या आठवड्यात ' पुढं काय ' ? यासाठी संघटनेची सभा ठाण्याला बोलावली गेली. बारामतीतल्या समाजबांधवांना खास निमंत्रित करण्यात आले होते. कारण मुख्यमंत्री शरद पवार जेव्हा विरोधी पक्षनेते म्हणून काम करत होते तेव्हा बारामतीतल्या या समाजबांधवांच्या विनंतीवरूनच आमच्या समाजाचे प्रश्न त्यावेळच्या आमच्यातल्या अनेकांना समाजाचा प्रश्न सुटल्यागतच वाटत होते. मुख्यमंत्र्याकडे व समाजकल्याण मंत्र्याकडे मांडून नेतृत्वही-करण्याचे मान्य केले होते. त्यामुळे शरदचंद्रजी पवार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होताच बारामतीतले आमचे समाज बांधव आनंदून गेले होते आणि आमच्याही समाजाला आशेची पालवी फुटली होती, एकट्या बारामती गावात पन्नास ते साठ उंबरठे असलेला लोहारवाडा होता. तर केवळ बारामती तालुक्यात दोन हजारांहून अधिक लोहार समाजाची लोकसंख्या होती. पण शरद पवार मुख्यमंत्री होऊन वर्ष होत आले पण बारामती लोहारांना त्यांनी भेट दिली नाही की, स्मरणपत्र पाठवूनही पोच दिली नाही वा त्यांच्या प्रश्नांविषयीची विचारपूसही मुख्यमंत्री शरद पवार यांनी केली नाही. त्यामुळे बारामतीतले लोहार संघटनेने आखलेल्या डागणी मोर्चाकडे फिरकलेही नाहीत. कारण मोर्चात शरद पवार विरोधी घोषणा, धिक्कार होणार. त्यात आपण सामील कसं व्हायचं? हा त्यांच्या पुढे प्रश्न निर्माण झाला असवा. त्यांची धारणा होती, की शरद पवार म्हणजे आमचे गाववाले, आमचे पेट्ट ! या बैठकीत शरद पवारांची गाठ–भेट घेऊन समाजाच्या प्रश्नात मुख्यमंत्र्यानी लक्ष घालावे यासाठी बारामतीकरांवर जबाबदारी टाकण्यात आली. शरद पवार मुख्यमंत्री झाल्याचे कळताच संघटनेतील अनेक कार्यकर्त्यांनी बारामतीतील या समाजबांधवांना या संबंधीची विनंती पत्रं पाठवलेली होती. बारामतीकरांना अजूनही तसं यश मिळालं नव्हते.

या संदर्भात एक गंमतीची गोष्ट सांगावीशी वाटते ती म्हणजे संघटनेच्या कामानिमित्त महाराष्ट्रातील विविध भागांतील कार्यकर्त्यांकडे आम्ही जेव्हा जात असू तेव्हा, तिथल्या कार्यकर्त्यास स्वतःच्या कर्तृत्वाबद्दल व नेतेगिरी बद्दल प्रचंड आत्मविश्वास. जेव्हा सांगली, मिरजेला जायचो तेव्हा तिथले समाज बांधव म्हणायचे 'वसंतदादा पाटील ना ? त्यांच्याकडे काही काम आहे का सांगा आत्ताच्या आत्ता त्यांच्याकडे जाऊन त्यांचे हात धरून मी आपले काम करून आणीन !' नांदेडला गेले की तिथले लोक शंकररावाबाबत असेच बोलायचे. 'अशोकराव चव्हाण ना ? आमचा जिगरी दोस्त ! त्यांना घेऊन या घडीला आपण शंकरराव चव्हाणांकडे जाऊन जी. आर. बदलून आणू' तर अकलूजकर मंडळी

म्हणायचे 'ना. मोहिते पाटील लई मोठ्या मनाचे. त्यांचे आमचे घरेलु संबंध आहेत. आमचे वडील वारले तेव्हा आमच्या घरी येवून ते रडून गेले बघा. आमच्या घरी आले की ते अंथरूणावर सुद्धां बसत नाहीत. अगदी आमच्या मांडीला मांडी लावून भोईवरच बसत्यात बघा. ' सुरुवाती सुरुवातीला असं ऐकून बरं वाटायचं. पण पुढे-पुढे त्यातली निरर्थकता लक्षात येऊन हसू यायचे तसे त्यांचे संबंध असतीलही, संबंधामुळे त्यांचा वैयक्तिक फायदा झालाही असेल पण हे संबंध समाजाचे प्रश्न सोडवण्यास उपयोगी पडत नसतात हे आमच्या भावड्या लोकांना समजत नव्हते. कदाचित ही पुढारी मंडळी समाजाचा अशा खोटया संबंधाने राजकारणात उपयोग करून घेत असावेत.

एप्रिल उजाडला पण बारामतीकरांकडून हालचालीचा वेपत्ताच. संघटनेतील लोकांकडे पुढे काय ? हाच प्रश्न ! संघटनेतील कार्यकर्त्यांपुढे ' मी स्वतः मुख्यमंत्री शरद पवार यांच्या निवासस्थानापुढे प्राणांतिक उपोषणाला बसतो, तर बाकीच्यांनी नुस्ते धरणे धरावे. या ' धरणे ' कार्यक्रमात जास्तीत जास्त लोकांनी सहभागी होण्यासाठी संघटनेने प्रचार मोहीम आखावी. ' कार्यक्रम सर्वांना बेहद्द पसंत पडला. १५ मे ८९ ही तारीख पण लगेच निश्चित करण्यात आली. जिल्ह्यातील संघटनांना मूख्य कार्यकर्त्यांना चक्रमुद्रीत पत्रेही पाठविण्यात आली. एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात मुख्यमंत्री, समाज कल्याणमंत्री इ. ना तशी नोटीसही देण्यात आली.

कांही दिवसापूर्वीच रत्नागिरी येथे आम्ही ' पुरोगामी विचारमंच ' साहित्य सांस्कृतिक विषयाच्या अनुसंधाने संस्था सुरू केलेली होती. या संस्थेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील लोहार गाडीलोहार समाजाला परिवर्तनवादी विचारवंताची ओळख व्हावी. कारण बराच समाज निरक्षर. त्यातून जे काही शिकावे ते पोटार्थीच शिक्षण विचार–विचारवंत हा पल्ला फार लांबचाच. गाडी लोहार समाज संघटनेचे अध्यक्ष पैशाने बऱ्यापैकी. घरी उसाचा मळा, एस.टी. खात्यात कार्यकारी अभियंता पदावर ऑफिसची गाडी असूनही हौसेखातर स्वतःची कार ! त्यांना मी विनंती केली की, ' मराठी साहित्यातील पुरोगामी विचारांनी युक्त अशा ग्रंथास आमची ' पुरोगामी विचारमंच ' संस्था पुरस्कार देवू इच्छिते. पुरस्काराची रक्कम आपण देणगी म्हणून दिल्यास तुमच्या इच्छेप्रमाणे तुमच्या वडिलांच्या स्मरणार्थ हा पुरस्कार ठेवता येईल. त्यांनी एक हजार एकशे अकरा रु. देणगी देण्याचं मान्य केले. आणि संस्थेने कै. बापूराव विघे स्पर्धा जाहीर केली. १९८८ साठी डॉ. भिमराव गस्ती यांच्या 'बेरड' आत्मकथनाची संस्थेनी निवड केली.

सर्वसाधारणपणे दरवर्षी २० एप्रिल पासून कॉलेजला सुट्ट्या लागतात. १५ मे च्या कार्यक्रमासाठी प्रचाराला दिवसही मला मिळणार होते. १५ मे च्या कार्यक्रमाबाबत आराखडा ठरवण्यासाठी संघटनेच्या प्रमुख कार्यकर्त्यांची सभा घेणे

आवश्यक होते. म्हणून आम्ही सात मे रोजी औरंगाबादला डॉ. भिमराव गस्तीचा पुरस्कार कार्यक्रम आखला. आणि त्याच वेळेस १५ मे च्या कार्यक्रमासाठी प्रमुख कार्यकर्त्यांची सभाही लावण्यात आली.

मध्यंतरी एक घटना घडली. सोलापूरला ३१ मार्च ८९ रोजी भटक्या-विमुक्त जाती–जमातीचा मेळावा आखण्यात आला. पंतप्रधान राजीव गांधी येणार होते. त्यात लक्ष्मण गायकवाड आणि लक्ष्मण मानेचा सत्कार होणार होता. त्या कार्यक्रमाच्या पूर्व तयारीसाठी १६ मार्चला मुख्यमंत्री शरद पवार यांनी वर्षा बंगल्यावर सभा लावली होती. त्या सभेचे तारेने मला बोलावणे आले होते. (गायकवाड – माने यांची मैत्री असल्या कारणाने त्यांनीच माझे नाव शरद पवारांना सुचवले असावे. ) या बैठकीचा आणि आमच्या गाडीलोहार समाज संघटनेचा काहीही संबंध नव्हता. पण उद्या समाजातले लोक म्हणणार ' प्रा. कळसे आमच्या संघटनेवर मोठे झाले आणि मुख्यमंत्र्याचे बोलावणे येताच धावत धावत एकटेच गेले. ' असा शब्द नको, म्हणून तार चौदाला संध्याकाळी मिळाली. १५ ला संध्याकाळपर्यंत ठाणे गाठले. संघटनेचे अध्यक्ष विघे ठाण्यालाच रहात होते. त्यांच्या घरून संघटनेचे सल्लागार न्यायमूर्ती द. रा. सम्राट यांना फोन लावला. असच इतरही काही कार्यकर्त्यांना कळवले गेले. १६ मार्चला संध्याकाळी सात वाजता समाजाच्या कार्यकर्त्यांसह वर्षावर गेलो. महाराष्ट्रातील सर्व भटक्या–विमुक्त जाती – जमातीच्या प्रमुख कार्यकर्त्यांनी वर्षा मधला बैठक हॉल खच्चून भरलेला. बैठकीला सुरुवात होताच कोणकोणत्या भागातून कोण किती माणसे आणणार व त्यासाठी ट्रक, टेंपो, कार, मेटॉडोर पुरवण्याची जबाबदारी तेथील आमदार, नामदारांवर टाकण्यात येत होती. त्याप्रमाणे त्या त्या जिल्ह्याच्या कलेक्टरला साधने उपलब्ध करून देण्याबाबत कळवण्यात येणार होते. कोकणातून भटक्या–विमुक्तांना सोलापूरला आणण्याची जबाबदारी माझ्यावर टाकण्याची घोषणा करण्यात आली. मी चटकन उभा राहून म्हणालो, कृपया आमच्या समाजाचा अजून शासकीय पातळीवर प्रश्न सुटलेला नाही व आपण मुख्यमंत्री होऊन वर्ष झाले पण आपण लक्ष दिलेले नाही. लोक आम्हाला विचारतात, चाळीस वर्षांत काँग्रेसने आम्हाला काय दिले ? कृपया मी तरी आमच्या समाजाकडे जाऊन सांगू शकत नाही की, ' मुख्यमंत्री शरद पवार, पंतप्रधान राजीव गांधी बोलावत आहेत. त्यांचे विचार ऐकायास चला, त्यामुळे माणस आणण्याची जबाबदारी मी घेऊ शकत नाही व आमचा समाजही त्या कार्यक्रमास येऊ शकत नाही. क्षणभर शांतता पसरली आणि काही झालेच नाही त्याप्रमाणे ३१ मार्चच्या सोलापूर कार्यक्रमाची आखणी सुरू झाली. आणि आम्ही सर्वजण तेथून बाहेर पडलो. माझ्या या सडेतोड बोलण्याने आमच्या सर्वच कार्यकर्त्यांनी बाहेर पडताच पाठीवर थाप मारत त्यांनी मला शाबासकीच बहाल केली.

औरंगाबादला सकाळच्या सत्रात डॉ. भीमराव गस्तीचा सत्कार डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. मोतीराज राठोड गंगाखेडचे श्रीनिवास कुलकर्णी यांच्या उपस्थित पार पडला. सत्कार संपता संपता अगदी अप–टू–डेट कपड्यातल्या माणसांची जीप भरून आली. त्यातली काही मंडळी अगदी नवीन चेहऱ्याची दिसत होती. सत्कार संपताच जेवण, पानतंबाखू आटोपून दुसऱ्या सत्राला सुरुवात झाली. रत्नागिरी–औरंगाबाद पंधरा तासांहून अधिक, तोही रात्रीचा प्रवास करून डोळे जड पडले होते. नेहमी प्रमाणे कोपरा धरून पडून राहिलो. संध्याकाळचे चार वाजून गेले. पण कार्यकारिणीतील एकही माणूस १५ मे च्या कार्यक्रमाबाबत सुरुवातही करत नव्हता. संघटनेचे सल्लागार समजले जाणारे प्रतिष्ठीत न्यायमूर्ती द. रा. सम्राटाच्या हातात वर्गणीच्या आकड्यांची यादी होत होती. त्यांच्या भोवती त्या जीप मधून आलेल्या नवीन माणसांचा, की जे आता पर्यंत संघटनेच्या कामात कधीच आढळले नव्हते, त्यांचे कोंडाळे. मीच न राहून म्हणालो ‘ अहो, सम्राट साहेब चार वाजून गेले. दूर दूरचे लोक आले आहेत. त्यांना संध्याकाळच्या गाडीने परत जावयाचे आहे. १५ मे च्या कार्यक्रमाचा आपणाला तपशील ठरवायचा आहे. ते एकदाच ठरवून टाकू ’ यावर न्यायमूर्ती म्हणाले, तुम्हाला अजून माहीत नाही ? १५ मे चा कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे ’ मी मात्र एकदम तडकलोच. ‘कार्यक्रम कुणी रद्द केला ? का केला ? हे अधिकार तुम्हाला कोणी दिले ? ’ माझ्या तर अंगाअंगाची लाही होत होती तरी देखील अगदी शांतपणे ऐकून घेण्याची तयारी ठेवून बसलो. सम्राट म्हणाले, ‘त्याचं असं झालं तुम्हाला माहीतच आहे की राहूरीचे आपले हौशिनाथजी लोहार नगर जिल्ह्याचे जनतादलाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्याकडे विरोधी पक्षनेत्या मृणालताई गोरे आल्या. तेव्हा हौशिनाथनी आपल्या समाजाचा प्रश्न मृणालताई पुढे मांडला. त्यांनी हौशिनाथला बरोबर घेऊनच २४ एप्रिलला मुख्यमंत्री शरद पवारांकडे घेऊन गेल्या. शरद पवारांनी चर्चेसाठी २८ एप्रिलला सकाळी बोलवले होते. त्याप्रमाणे आम्ही मंडळी जाऊन शरद पवारांशी चर्चा केली. त्यांनी लवकरच प्रश्न सोडवण्याचे आश्वासन दिले. आम्ही तुमच्या १५ मे च्या उपोषणाची मृणालताई गोरेना कल्पना दिली. त्या म्हणाल्या, आता आंदोलनाची गरज नाही. तुमचा मुख्यमंत्र्याशी संवाद सुरू झालेला आहेच. तर आंदोलन रद्द करा. त्यासाठी त्यांनी तुम्हाला तसे पत्रही दिले आहे ’

आता मी बराच सावरलो आणि एक-एक प्रश्न विचारू लागलो. हे हौशिनाथ लोहार कोण ? इतके दिवस कोठे होते ? उपोषणाची नोटीस दिल्यानंतर त्यांना मृणालताई कशा काय भेटल्या ? त्या पूर्वी कधी भेटल्याच नव्हत्या काय ? २६ जानेवारीचा मोर्चा होऊन आज पाच महिने झाले. उपोषणाची नोटीस दीड महिन्यापूर्वी देऊन झाली. इतके दिवस त्यांना प्रयत्न करण्यास कोणी

थांबवले होते काय ? ठीक आहे. कृतिसमितीचा प्रमुख कोण ? त्याला चर्चेस बोलवयाचे असते की नाही ? २८ एप्रिलची चर्चा ही २४ एप्रिलला ठरलेली होती. चार ते पाच दिवसांचा अवधी होता. दोन दिवसात देशातल्या कुठल्याही प्रांतातील माणसाशी संपर्क साधता येतो. मुंबई, रत्नागिरी चार ते पाच दिवसात माझ्याशी संपर्क साधता आला नाही ? बरे, मुख्यमंत्र्यांनी ठोस असे काही आश्वासन दिले काय ? उत्तर होते 'नाही.' मग तुम्ही आंदोलन मागे का घेतले ? तुम्हाला मी तसा अधिकार दिला होता काय? म्हणजे लढाई करण्यासाठी बंदूक माझ्या खांद्यावर पण बंदुकीचा चाप तुमच्या हातात. समोर गोळी आली तर मी खावी, पण गोळी घालण्याचा चाप मात्र तुमच्या हातात. व्वा, खरे तुम्ही न्यायमूर्ती ! २६ जानेवारीच्या मोर्चापासून सी. आय. डी. माझ्या घराभोवती फिरत आहेत. सरकार दरबारी माझ्याविषयी अहवाल जात आहेत आणि मुख्यमंत्र्याशी विरोधी पक्षनेत्या समवेत बोलणी मात्र तुम्ही, तुमचे जवळचे नातेवाईक, समाजात तोरा मिरवणाऱ्यांनाच बरोबर घेवून करता.

जास्त काही बोलण्यात आता अर्थ नव्हता. पण उठता–उठता सहज चौकशीच्या निमित्ताने हे निधीचे आकडे कशाचे ? म्हणून विचारले ( गेले काही दिवस आळंदीच्या धर्मशाळेसाठी निधी गोळा करण्याचे चालले होते. ) संघटनेचे अध्यक्ष बी. वी. विद्दे म्हणाले, त्यांचं काय आहे. कुठले शासकीय पातळीवरचे काम करून घ्यायचे म्हणजे मूठ दाबावीच लागते. आम्ही चार–पाच लाख रुपये देण्याचे कबूल केले आहे. मी लगेच म्हणालो, ' कोणाला ?'अध्यक्ष म्हणाले, 'ते मात्र तुम्ही आम्हाला विचारावयाचे नाही व आम्हीही सांगणार नाही. तुमचा आमच्यावर विश्वास असेल तर या नाही तर राहू द्या. '

अहो पण गेल्या वर्षी समाजकल्याण सचिवाला पंचवीस हजार रुपये बोलला होतात. त्यातले पाच हजार दिलेलेही होते. माझ्या माहितीप्रमाणे आपल्या संघटनेची फाईल ज्या दिवशी त्या अधिकाऱ्याच्या टेबलावर गेली त्या दिवशी तो अधिकारी रजेवर गेला. त्या टेबलावर कुलकर्णी, जोशी आलेल्या अधिका-याने प्रतिकूल शेरा मारला. नशीबच आपले, पाच हजारच बुडाले. तसेच आताही होणार नाही कशावरून ?

ह्या पेक्षाही महत्त्वाचे म्हणजे अशा पद्धतीने समाजाचा प्रश्न तुम्हाला सोडवून घ्यावयाचा होता तर कृतिसमिती फॉर्म करून चळवळीचे सर्व अधिकार मला का दिलेत ? किंवा तुम्ही हे जे काही ठरवत आहात त्यात मला का नाही सहभागी करून घेतलेत ? मला का नाही विचारलेत ?

न्यायमूर्ती, ' अहो तेवढा वेळ कुठे आहे ? आपल्या समाजातल्या शंभरहून अधिक लोकांना नोटीसा आल्यात की, तुम्ही गाडी लोहार नाहीत. खोटे दाखले देऊन नोकऱ्या मिळवलात. त्यांच्या जीवनमरणांचा प्रश्न निर्माण झाला आहे. '

मी, 'ठीक आहे. ते लोक कोण आहेत ? त्यांची नावं वाचा' चार-पाच नाव वाचताच मी विचारले, ' ही कोण मंडळी आहेत ? यातला आपण आतापर्यंत आखलेल्या कोणत्याच सभेला, कार्यक्रमाला हजर नव्हता. संघटनेसाठी त्यांनी आतापर्यंत एक छदामही वर्गणी म्हणून दिली नाही. त्यांना न्याय पाहिजे असेल तर १५ मे च्या उपोषण आंदोलनात माझ्याबरोबर बसावे. माझा खेड्यापाड्यांतला हातावर जगणारा जो समाज आहे त्यांनी या नोकरीवाल्यासाठी पैसा का द्यावा ? वरून त्या पैशाची ना पोच ना हिशोब !

आता मात्र अक्षरशः माझे रक्तच खवळले. तिरीमिरीत उठून उभा राहिलो. 'ठरल्या प्रमाणे १५ मे चा उपोषणाचा कार्यक्रम होईलच. तुम्ही कोणीही आला नाहीत तरी चालेल. एकटा बसण्याची पाळी आली तरी मी बसेनच'

सभात्याग करून बाहेर पडताना लातूर जिल्हा संघटनेचे अध्यक्ष बाबुराव पोपलाईत, परभणी जिल्हा संघटनेचे अध्यक्ष बाबुराव परब आणि वर्ध्याचे चव्हाण, काळभांडे, जालन्याचे दोघेजण एवढीच मंडळी सोबत आली. आमचं पक्कं झालं की '१५ मेच्या कार्यक्रमासाठी पूर्ण ताकदीनिशी आपण प्रयत्न करू ठरल्याप्रमाणे कार्यक्रम घडवून आणायचाच.'

औरंगाबादचे फक्त डी. आर. गाडेकराचा तेवढा आम्हाला पाठिंबा मिळालेला. दिवस फार थोडे. नुस्ता मराठवाडा फिरायचं म्हटलं तरीही शक्य नव्हते. त्यातून पैशाचा तर खडखडाटच आतापर्यंतचा सारा प्रवास टपाल खर्च प्रत्येकजण आपापल्याच खिशातून करत होतो. लोक कार्यक्रमाला जमणे महत्त्वाचे त्यामुळे त्यांच्याकडूनही पैशाची मागणी करता येत नव्हती. मूळात पैसः देण्याची ऐपतच नव्हती आणि महत्त्वाचं म्हणजे अशा कार्यक्रमाला पैसा वर्गणीच्या रूपाने द्यावयाचा असतो याची सवयही कोणाला नव्हती. दर चार–पाच महिन्यांनी वाढलेल्या महागाई भत्त्याची रक्कम दर वर्षी मिळत असलेली इन्क्रीमेंट परीक्षेचे आलेले पैसे, पुस्तकाच्या मोडकी–तोडकी रॉयल्टीचा माझा सारा पैसा इकडंच खर्ची पडत होता. बायकोचे घरी समाधान की, आपला नवरा पगारातला पैसा उधळत नाही म्हणून ! कारण तिच्या समाधानासाठी महिन्याच्या महिन्याला पासबूकावर जमा झाले या पगाराचा हिशोब देत होतोच. तिचंही गणित बरोबरच होतं. 'आपणाला गावात ना घर ना शिवारात जमिनीचा तुकडा. काही बरं वाईट झालं तर लेकर–बाळं रस्त्यावर टाकायची काय ? साताराच्या प्रा. एस. आर. चव्हाणच्या कुटुंबियांची परिस्थिती त्यांच्या मृत्यूनंतर मी पहात होतोच. समाजातले लोक म्हणालेच ' एवढी वर्षे नोकरी केली त्यांनी काही शिल्लक टाकायला नको होते काय ? सारा पगार खावून हात पुसले ' तर ज्यांच्यासाठी आपण करू इच्छितो ते वेळ पडताच विचारणारे नव्हते ! हे सारं पटत होतं पण संवेदनशिल मन गप्प रहात नव्हत.

नुकतेच महागाईभत्त्याचा फरक मिळालेले बाराशे रुपये खिशात होते सहाव्या वर्गातली मृदुला चौथीतली क्षमाली यांचा बऱ्याचदिवसा पासूनचा हट्ट होता की, पप्पा तुम्हीच नेहमी नेहमी एकटे फिरता आम्हाला कुठे सुद्धा नेत नाही. आता औरंगाबादला जातच आहात, आम्हांलाही सुट्ट्या लागलेल्या आहेत. वेरूळ–अजंठा दाखवाल काय ?' अनेक वेळात मनात असूनही पत्नी मुलांना नेता आले नाही '१५ मे रोजी मुंबईचा कार्यक्रम. दोन दिवस तरी अगोदर जावे लागणार होतेच. तीन-चार दिवस औरंगाबाद, वेरूळ–अजिंठ्यासाठी खर्ची घालून सहकुटुंबच मुंबईस जावून, मुंबईत बहिणीकडे सोडून कार्यक्रम आटोपून रत्नागिरीला येता येईल' या हेतूने दोन्ही मुलींना आणि पत्नीला औरंगाबादला आणले होते पण अचानक सारंच उलटं–पालटं झालं होत कारण मी आणि परबांनी मिळून मराठवाडा कव्हर करण्यांच ठरवलं होत ८ मे चा तेवढा दिवस मुलांना औरंगाबाद तरी दाखवाव अस ठरलं ७ मे रोजी रात्री कैंकाडीपूऱ्यात डी. आर. गाडेकरांकडे परब व मी बसून कार्यक्रमाची आखणी करत असताना अचानक ॲड. टाकसाळांची आठवण झाली. खोकडपूरा, कैंकाडीपूऱ्यापासून हाकेच्या अंतरावर टाकसाळ वकील कम्युनिष्ट पक्षाचे नेते. नगरच्या अधिवेशनात २६ जानेवारीच्या मोर्च्यांच्या भाषणात ' समाजासाठी मी केव्हा ही माझे रक्त सांडण्याची तयारी आहे.' असे भाषण करून लोकांकडून कडाडून टाळ्या मिळवल्या होत्या. रात्रीचे अकरा वाजत आलेले. त्यांना झोपेतून उठवून निर्माण झालेली परिस्थिती त्यांच्या पुढे ठेवली. वकीलसाहेब म्हणाले. बहुसंख्य लोकांच्या मनात १५ में चा कार्यक्रम रद्द करावे असे असेल तर कार्यक्रम घेऊ नये. मी म्हणालो, 'कार्यक्रम घेवू की नये हा प्रश्न आता राहिलाच नाही. कोणत्याही परिस्थितीत आम्ही घेणारच आहोत. तुम्ही येणार काय ? सोबत काही कार्यकर्ते आणणार काय ? आपल्या डोक्यावरील विरळ केसांवरून हात फिरवत वकीलसाहेब म्हणाले त्याच काय आहे 'आता जवळ-जवळ शंभर गावातून ग्रामपंचायतीच्या निवडणूका लागलेल्या आहेत. कम्युनिस्ट पक्षाचा मी प्रमुख असल्याकारणाने मला निवडणुकाकडे पहावे लागणार आहे ! मी–तुम्ही मुंबईच्या कार्यक्रमाला येणार की नाही? तेवढच सांगा वकीलसाहेब. 'माफ करा मला येता येणार नाही.

तेवढ्या रात्री तडक आम्ही परत कैंकाडीपुऱ्याला परतलो. ८ मे रोजी संध्याकाळी औरंगाबाद सोडण्याचे निश्चित झाले. पुरोगामी विचारमंचचे सेक्रेटरी भरतकुमार दहिहंडे, विद्यार्थी मकदूम बरोबर पत्नी – मूलांना वेरूळ – अजिंठा न दाखवताच दिवसभर औरंगाबादमधील स्थळ दाखवून रत्नागिरीकडे पाठवून दिले आणि आम्ही रात्री जालना गाठले. नऊ–साडेनऊला १०–१५ लोकांना मुंबईच्या कार्यक्रमाबाबत सांगितले २५–३० जण येवू, असं त्यांनी आश्वासन दिलं. त्याच रात्रीला रेल्वेने सकाळी परभणी. परभणीला रात्रीची सभा ठरवून संध्याकाळपर्यंत

पाथरी, सेलू-मानवत करून परभरणीला परतलो परभणीला रात्री ज्या वेळेत रेल्वे आली होती. त्याच रेल्वेसाठी परभणी रेल्वे टेशनवर आलो तर पाच मिनिटापूर्वीच रेल्वे निघून गेलेली. तसच अंधारात पायी धडपडत परभणी एस.टी. स्टँडला आलो. पहाटे पांचला नांदेडला जाणारी एस.टी. मिळाली. तो पर्यंत स्टँडच्या बाकड्यावर पडूनच वेळ काढला. सकाळी साडे-आठ पर्यंत सिडकोला नांदेड जिल्हा अध्यक्ष एस. के. कळसकरांच्या घरी गेलो तर ते कामावर गेलेले. तिथून परत फरफटत कारखान्यात भेट झाली. २५-३० माणसं निश्‍चितपणे आणण्याचं त्यांनी मान्य केले.

परभणीच्या तयारीसाठी बाबुलाल परबांना परभणीकडे परत पाठवून दिले. औरंगाबादला आलेल्या लातूर जिल्हा अध्यक्षाजवळ ११ मे रोजी उदरगीरला दुपारी सभा लावण्याचे सांगितले होते. त्याप्रमाणे उदरगीरची सभा झाली.सभेला ७५-८० लोक जमले. एन. के. पवार, एस. एम. थोरात, पी. एम. कळसे, उबाळे, टींगरे इ. चांगली मेहनत घेतली होती. आर्थिक मदतीचे आव्हान करताच लगेच सव्वादोनशे रु. जमा झाले. ११ ला संध्याकाळचा मुक्काम लातूरला. लातूरमध्ये बरेच फिरलो पण कोणी येईलसे वाटले नाही. १२ मे रोजी सकाळी दहा-साडे दहापर्यंत बार्शीला तास दीड तास फिरलो. १५ मे रोजी त्यांच्याकडे लग्न असल्या कारणानं कोणीही येवू शकणार नव्हतं. तिथून भर उन्हाच्या खाईत पिंपळणेर ता.माढा इथं गेलो. दहा बारा माणसं भेटली. संध्याकाळी सहापर्यंत परत कुर्डूवाडीला आलो. सोबत पिंपळणेरचे तीनचार कार्यकर्ते आले होते.कुर्डू आणि वाडीत त्यांची कांही नातेवाईक मंडळी होती. रेल्वे ब्रिज जवळच एका वर्कशॉपमध्येच सात वाजता पंधरा–वीस समाज बांधव जमले. रात्री नऊच्या रेल्वेने कुर्डूवाडीहून मुंबईकडे निघालो.

स्वत:चे बाराशे, दहिहंडेकडून उसने म्हणून घेतलेले पाचशे, उदगीरचे दोनशे रु. त्यातले आता फक्त दीडशे रु. उरले होते. फिरून-फिरून चेहरा काळवंडून गेला होता. घशाला सारखी कोरड पडायची. सारखं मनात यायचं की प्रामाणिकपणे काम करणाऱ्याच्या वाट्याला असंच का येतं ? या दौऱ्यात एक मात्र मी केलं, जिथं-जिथं मी गेलो, तिथं-तिथं औरंगाबाद इथं झालेल्या वादाच स्वरूप स्पष्टपणे मांडत होतो. कांही लोकांच्या मते मी असं सांगत फिरायला नको होते. पण माझा स्वभावच असा की जे होईल, जे घडेल ते लोकासमोर मांडले पाहिजे. त्यातून आपल्याही चुका आपल्याच निदर्शनास येतात. त्यात कसलाही अहंपणा वा दुसऱ्यांना उघडं पाडण्याचा हेतू नसतो आणि आजही नाही. साकीनाक्याला बहिणीकडे तेराचा पूर्ण दिवस काढला. चौदाला संपूर्ण दिवस कल्याण आणि सभोवतालच्या झोपडपट्ट्यांतून समाजाच्या लोकांपर्यंत कार्यक्रम पोहचता केला.

१५ मेच्या पहाटेपासूनच व्ही. टी. रेल्वे स्टेशनवर लोकांची वाट पहात बसून राहिलो. सकाळी आठ साडेआठच्या दरम्यान ७०–८० माणसं नांदेड,

परभणी, उदरगीरहून एस. के. कळसकर, बाबूलाल परब, एन. के. जाधव यांनी आणली होती. वर्ध्याहून, काळभांडे, चव्हाण यांनी दहा माणसं आणली होती. व्ही. टी. वरून मुख्यमंत्र्यांच्या बंगल्याकडे सिटी बसने निघालो. जवळजवळ सारेच खेडूत. काहींच्या हातात धुराने काळवंटून गेलेल्या प्लॅस्टिकच्या पिशव्या, काही जणांच्या जवळ तर पंढरपूरच्या वारकऱ्यांकडे हडप्या असतात तसे गाठोडे, दोन – तीन वयस्करांच्या हातात गावठी काठ्या. बसमधले इतर लोक आमच्या लोकांकडेच बघायला लागलेले. मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यासमोर पोहचताच पोलिसांचा गराडाच पडला. पोलीस अधिकारी म्हणाला तुम्ही एवढे लोक इथे आलात कसे ? या परिसरात जमावबंदी असते. मी म्हणालो, हे पहा, आम्ही दीड महिन्यापूर्वी शासनाला इथे उपोषण व धरणे धरून बसणार म्हणून कळवलेले आहे. ही पहा पोच. तुम्ही आम्हाला आतापर्यंत काहीच कळवलेले नाही. तसे कळवले असते तर आम्ही इकडे आलोच नसतो. आम्हाला तुम्ही जागा दाखवून द्या. तिथं आम्ही बसू. त्यांनी माझ्याकडून मागण्यांचे निवेदन मागून घेतले. तेवढ्यात तीन–चार पोलीस व्हॅन आल्या आणि आम्हा सर्वांना गिरगाव चौपाटीवर रस्त्याच्याकडेला जागा देण्यात आली. रस्त्याच्याकडेला असलेल्या झाडांना, खांबाना बॅनर्स लागले गेले. पोलिसांनी पिण्याच्या पाण्याची टाकी आणून भरून दिली आणि पन्नास–साठ पोलीस पहाऱ्यात आमचे आंदोलन सुरू झाले. प्राणांतिक उपोषणास फक्त मी एकाटाच बसलो. तर बाकीचे दहा जण साखळी उपोषणास बसलो. दुपारपर्यंत पिंपळणेरहून पाच–सहा जण, पुण्याहून नंदकुमार खेळे, फलटणहून रामदास थोरात सोबत सहा – सात जण. असे शंभराहून अधिक लोक जमले. दिवसभरात पोलीस अधिकारी, सी. आय. डी. चे लोक येऊन–रिपोर्ट घेऊन जात राहिले.

अशी घटना समाजाच्या दृष्टीने पहिलीच. पण लोक मोर्च्यापासून धीट झाले होते. बॅनर–बॅच लावून विना तिकिट रेल्वेत घुसत होते. कोणी टिकिट चेकर आला की ' गाडीलोहार जिंदाबादच्या ! ' घोषणा देत होते. चौपाटी, समुद्र ह्या साऱ्या गोष्टी यातल्या बऱ्याच जणांना पहिल्यांदाच पहायला मिळत होत्या. संध्याकाळी तर टिपूर चांदणं पडावं असा लख्ख प्रकाश वाळूवर, समुद्राच्या पाण्यावर पसरलेला, आणि त्या चांदण्यात पट–पटा चुंबने घेणारी जोडपी अगदी वावंच्या अंतरावर पाहून आमच्या साऱ्या लोकांची तोंडं उघडीच राहात होती. आपण काही तरी विपरीतच पहात आहोत. असा त्यांच्या चेहऱ्यावर भाव !

रात्री परबांना आणि कळसकरांना समजावून सांगून ठाण्याला संघटनेच्या अध्यक्षाकडे बोलणी करायला पाठवून दिले. रात्री एकच्या दरम्यान दोघेही परतले. त्यांच्या मते संघटनेची माणसं पाठिंबा तर जावू द्याच अध्यक्षांची भाषा होती की, 'प्रा. कळसेना आता समुद्रात फेकून देण्याची व्यवस्था मी करीन. '

एवढच नव्हे तर त्यांनी ' संघटनेच्या कोणत्याही माणसाने या कार्यक्रमास येऊ नये असे पत्रक काढलं आहे आणि आपण मराठवाड्यात जिथं-जिथं प्रचारासाठी गेलो तिथं-तिथं त्यांनी पत्र, तारा व माणसं पाठवून १५मेच्या कार्यक्रमाला कोणीही जावू नये म्हणून त्यांनी प्रयत्न केलेले आहेत. '

दुसऱ्या दिवशी म्हणजे १६ मेच्या लोकसत्ता,महाराष्ट्र टाइम्स,नवाकाळ मधून 'लोहार समाजाच्या मागण्यासाठी उपोषण'या मथळ्याखाली बातम्या आल्या होत्या.

१०–११ च्या दरम्यान वर्तमानपत्रातल्या बातम्या वाचून दहिसर वरळी पेडर-रोडचे समाज बांधव येवून पोहचले. जणू काही पिढ्यानपिढ्या रक्ताचं नातं असावं इतकी त्या मंडळीनी मेहनत घेतली. धोंडराम लोहार, शंकरराव लोहार, विजय लोहार, एस. पी. लोहार, इ. नी तर २५ जुलैच्या धरणे कार्यक्रमात साथ दिली नसती तर तो कार्यक्रम व्यवस्थितरित्या होऊच शकला नसता. असेच परिश्रम कल्याणच्या रेखाताई सोनमणे यांनीही घेतला.

१६ मे रोजी संध्याकाळी लोकांची चुळबुळ सुरू व्हायला लागली. कारण लोहा, ता. कंधार या एकाच गावची ५० लोक होती. ज्यांच्या मुलीचं लग्न होतं तोच स्वत: आलेला. लग्न तर २० मे रोजी. त्याच्याच भावकीतली १५–२० माणसं आलेली. बाकीचे सारे त्याचे जवळचे नातेवाईकच, म्हणजे नवरीकडचं सारं वराडच इकडं आलेलं. त्यांना वाटले, एक दोन दिवसात काहीतरी निकाल लागेलच. पण आता दोन दिवस होऊन गेले पण मुख्यमंत्र्यांचे वा समाज कल्याण मंत्र्यांचे चर्चेला निमंत्रणच येत नव्हते. आम्ही सर्वजण 'फक्त आजची रात्र थांबा उद्या दुपारनंतर सगळेच जाऊ' म्हणून समजूत घातली. कारण उदगीरचे चार-पाच जण सरकारी नोकरीचे होते. त्यांच्याही रजेचा प्रश्न होताच. लोह्याचा पन्नास माणसांचा गट केला. म्हणजे बाकींचेही त्यांच्या पाठोपाठ जाणारण होते. संध्याकाळ होताच बऱ्याच जणांना 'मुंबई पाहून घ्या' म्हणून पिटाळून लावले. उदगीरचे एन. के. पवार, पुण्याचे खेळे, परभणीचे परब, विदर्भाकडचे काळभांडे, नांदेडचे एस. के. कळसकर, फलटणचे थोरात या सर्वांचे मत पडले की संघटनेचे लोक ज्या मग्रुरतेने वागत आहेत. त्यांनी '१५ मे च्या कार्यक्रमाला येवू नका' असं कशाच्या जोरावर लोकांना कळवलं ? फक्त त्यांच्याकडे संघटना आहे म्हणूनच ना ? मग आपणच संघटना उभी करू ! सर्वांनाच एकदम कूट प्रश्नाचं उत्तर सापडावं तसा भाव चेहऱ्यावर प्रकटला.

मी मात्र अंतरमुख होवून विचार करू लागलो. दलित पँथर फुटल्याचं जेव्हा मला समजलं तेव्हा खूप वाईट वाटलं. माने आणि मोतीराम राठोड यांच बिनसलं असं कळलं तेव्हा हळहळ वाटली आणि पुढे माने–रेणके यांच्यात वितंड, आरोप–प्रतिआरोप वर्तमानपत्रातून झडायला लागला तेव्हा तोंडात चूक–चूकलो. आता प्रत्यक्ष मीच या कृतीत सापडलो होतो. लोहार, गाडी लोहारसमाजाची संघटना फोडल्याचं आपणास दुषण लागले काय ? याचाच विचार करत राहिलो.

दुसराही एक विचार मनात येत राहिला की दलित पँथर व भटक्या–विमुक्तांची चळवळ अपवादात्मक इतर एक दोन चळवळी सोडल्या तर महाराष्ट्रात आमच्या-सारख्या जातीची नावं घेण्यासाठी एकही चळवळ उभी नव्हती. बहुजन समाजाच्या शेकड्यांनी संघटना निर्माण झालेल्या आहेत. पण त्या संघटनांनी चळवळीचं रूप धारण केलेलं नाही. आणि त्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे त्या संघटनांशी फुले–आंबेडकर तत्त्वज्ञान मूळापासून व मनापासून स्वीकारलं नव्हतं. लोहार, गाडीलोहार समाजाची संघटना नोंदणी झाल्यापासून मनाला वाटत होत की संघटना रजिस्टर्ड झाली खरी पण तिला आता चळवळीचं रूप आलं पाहिजे. ती जबाबदारी आपल्यावर व माझ्यावर जास्त आहे असं वाटत होतं. नगरच्या अधिवेशनात स्टेजवर फुले-आंबेडकरांचा फोटो लावायचा होता. पण इतर लोकांनी ऐकलं नाही. त्यांनी विश्वकर्माचा फोटो लावण्याचाच आग्रह धरला. म्हणजेच संघटनेने चळवळीच रूप धारण केलं नाही. तर ती मृतप्रायच असं माझं मत होतं. आणि मग मनाचा निश्चय केला की मृताचे तुकडे केले काय, जाळलं काय, अन् पुरले काय किंवा गिधाडांना खायाला घातलं काय, त्याच्या प्रेताला खंतच नसते. कारण ते प्रेतच असते. आणि मग ठाम मताने चळवळरूपी संघटना बांधण्याचं मनाशी ठरवूनच सर्वांच्या कल्पनेला मी ही साथ दिली. पण लगेच स्पष्ट केले ' फुले-आंबेडकर विचार धारा मानून काम करत असाल तर मी तुमच्या सोबत आहे, नाही तर मी तुमच्यातला नाही ' सर्वांनी अगदी स्पष्टपणे होकार दिला ४ जून ८९ ला लोहा ता. कंधार, जि. नांदेड इथे सभा ठरली.

१७ ला दुपारी दोनच्या दरम्यान समाज कल्याण खात्याचा निरोप घेऊन सी. आय. डी. अधिकारी आला. आमच्यातले पाच–सहा कार्यकर्ते समाज कल्याण मंत्र्याकडे गेले. ' जून अखेरपर्यंत तुमच्या मागण्या मान्य होण्याची शक्यता आहे. पाच-सहा दिवसानंतर तुम्ही या, त्या वेळेस मी तुम्हाला चर्चेची तारीख देईन ' असे समाज कल्याण मंत्र्याने आश्वासन दिले. ' झाकली मूठ सव्वा लाखाची ' म्हणीप्रमाणे १७ मे रोजी संध्याकाळी लोक आल्या रेल्वेने परतले. माझे तीन दिवसांचे प्राणांतिक उपोषण असल्याकारणाने चालता येत नव्हते. परब आणि मी साकीनाक्याला बहिणीकडे गेलो. दोन दिवस आराम करून तिच्याकडून बस-साठी पैसे घेऊन रत्नागिरी गाठली.

महाराष्ट्रातल्या प्रमुख कार्यकर्त्यांना कळवल्या प्रमाणे ४ जून ८९ च्या सभेस दोन–अडीचशेच्या आसपास कार्यकर्ते जमले. लोहा हे गाव तालुका सुद्धा नसलेलं. आठवडी बाजाराचं गाव, लातूर नांदेड हमरस्त्यावर. गावातले लोक म्हणायला लागले. ' यवडे मायंदळ ल्हवारं आलीत कुठून ? ' माझ्या मनात जी धाक–धूक होती. ' फुले–आंबेडकर म्हणून घोकत बसण्याची पाळी कुठं आपल्या एकट्यावरच पडते की काय ? उघडपणे न बोलता मनातल्या मनात स्मरण करत

काम करत रहावे असे वाटायला लागले होते.' पण फलटण कराड पासून ते यवतमाळ वर्धा–नागपूर पासूनचे कार्यकर्ते आल्याचे पाहून मनावरचं ओझच उतरल्या सारखं झालं.

लोहा येथील कार्यक्रमाची जबाबदारी नांदेडचे अध्यक्ष एस. के. कळसकर, लोहा येथील मुख्य कार्यकर्ते प्रभाकर सूर्यवंशी आणि बाबुलाल परब यांच्यावरच होती. खेडं असूनही आलेल्या लोकांची चांगली सोय केली होती. कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी स्टेजवर फोटो लावण्या प्रश्न आला. राणाप्रताप, इंदिरा गांधी, महात्मा गांधी, विश्वकर्मा इ. चे फोटो आणलेले. प्रभाकर सूर्यवंशीला बाजुला घेऊन ते सारे फोटो बांधून ठेव आणि शाळेत किंवा ग्रामपंचायतीत जाऊन महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो घेवून येण्यासाठी पाठवले.

फोटोवरून अशीच गंमत हाळीच्या कार्यक्रमातही झालेली. कार्यक्रमाच्या आदल्या दिवशीच सतराम पोपलाईत यांना म. फुलेंचा आणि बाबासाहेबांचा फोटो आणून ठेवण्यास सांगितले होते. तरी पण तेथील आमच्या एका गुरुजीने धरून येताना स्टेवर लावण्यासाठी लक्ष्मीचा फोटो आणलेला होता. एकाने बालाजीचा तर एकाने विश्वकर्म्याचा. तर स्टेजवर फोटो लावण्याची ही तऱ्हा होती. आतापर्यंत जिथे जिथे कार्यक्रम माझ्या नियंत्रणाखाली झाले तिथे फुले, आंबेडकरांचेच फोटो लावले. आश्चर्याची गोष्ट की मला कुठेही, कोणीही विरोध केलेला नाही. यावरून एक गोष्ट सिद्ध झाली की प्रमुख कार्यकर्ता निश्चितपणे आपल्या सहकार्यांची मने वळवू शकतो. त्याच हाळीच्या कार्यक्रमात डॉ. ना. य. डोळे यांनी स्टेजवर लावलेल्या फुले, आंबेडकरांच्या फोटोबाबत प्रशंसनीय उद्‌गार काढले होते. हे संघटन निश्चित चळवळीचे रूप धारण करील असे त्यांनी भाकीत केले होते.

जमलेल्या दोन-अडीचशे कार्यकर्त्यांच्या टाळ्या आणि जयघोषात 'महाराष्ट्र गाडीलोहार समाज विकास परिषद' या संघटनेचा जन्म झाला. लोहा येथील कार्यक्रमाचे आणि नवीन संघटनेच्या बातम्या मराठवाड्यातून व पुणे, मुंबईची वर्तमानपत्रे, रेडिओवरून आठवडाभर तरी येत राहिल्या.

**– वैजनाथ कळसे**

नाचणे, जि. रत्नागिरी

●

# अत्तदीपभव

**– बाबूराव कांबळे**

सायकलीवरून उतरलो. सायकल भिंतीला टेकविली. रांजणावर नेहमीच राहणाऱ्या तांब्याभर पाण्याने हातपाय धुऊन चूळ भरली. शनिवार असल्यानं दोन्ही मुलं शाळेतून येऊन जेवणं आटोपली होती. मी एकटाच. गडबडीनं जेवण केलं. नेहमीची बॅग घेतली, धावतच कदेरच्या बस थांब्यावर थांबलेली गाडी गाठली ती कंडक्टरच्या सौजन्यानं. कारण मी धावत गाडीच्या रोखानं येतोय हे पाहून घरं घरं करत गाडी माझ्या सारखीच धापा टाकीत होती. गाडीतल्या एकानं विचारलं, " काय गुर्जी, हेवडं पळत कुटं निगालाव ? " लगेच मी म्हणालो, "दुसरीकडं कुठं ? उमरग्याला, कॉलेजमध्ये सभा हाय" एवढं बोलून रिकामी जागा बघून घाम पुसत बसलो. शेजारच्या माणसानं विचारलं, " सभा आन् कशाची हाय ? " मी शेजारच्याप्रमाणे सरळ सांगून टाकलं आपलं गावरान बोलीत, " रातरच्या शाळेत जे मास्तर म्हणून काम करत्यात त्या मास्तरावची टर्निंग हाय. " हे ऐकून परत त्यानं विचारलं, " तुम्ही तर त्या मसणीच्या शाळेत असताव अन् रात्री कधी शिकविताव ? " असा संवाद होत होत एकेदा उमरगा गाठलं. तर तेथे माझी वाट पाहात प्रा. गायकवाड उभे हाते. मला बघताच त्यांनी हात वर करून हसत स्वागत केलं.

तर हे प्रा. एस. टी. गायकवाड हे माझे समविचारी मित्र. प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविणाऱ्या होतकरू कॉलेज तरुणांना अध्यापनाची दिशा मिळावी म्हणून माझे व्याख्यान ठेवण्यात आले होते. मला जवळ आलेलं बघून ते म्हणाले, " मला वाटलंच तुम्ही दाढी करून येणार नाही म्हणून. चला अगोदर दुकानात जाऊन दाढी करून घेऊ आपण. "

मी म्हणालो, " अहो, दाढीत काय असतं ? दाढी केली काय अगर न केली काय फरक काय पडणारय ? " पण मला सांगा, तुम्ही असं नेहमी अस्वस्थ का असता? कोणती विवंचना तुमच्या मनात आहे ? हे बघा परिस्थितीशी टक्कर देण्यास समर्थ होणं यातच आपलं खरं सामर्थ्य, या माझ्या बोलण्यावर प्रा. एस.टी. सर म्हणाले, " खरंच गुरुजी, क्रांति करू जाणं मास्तरांनीच, आणि कर्जही काढू जाणं मास्तरांनीच ! " यावर दोघेही मनमुराद हसलो.

शेवटी दाढी करत, गप्पा मारत निघालो. दोघेही कॉलेजच्या दिशेने जाता जाता मी गायकवाड सरांना रात्री पडलेलं स्वप्न सांगू लागलो, " बरं का सर मला एक विलक्षण स्वप्न पडलं रात्री. मी जेवढ्या नेत्यांची पुतळे पाहिलेले आहेत. ते सगळे पुतळे माझ्या स्वप्नात आले. त्या पुतळ्यात वेगवेगळ्या मंदिरातील देवादिकांचेही पुतळे होते. हे दृश्य पाहण्यासाठी एवढी माणसं जमली होती की तेथे पाय ठेवायलाही जागा मिळत नव्हती. दाटीवाटीने लोक त्या सगळ्या पुतळ्याभोवती गराडा घालत होते. आणि नेमका बाबासाहेबांचा पुतळा भल्या उंच चवुतऱ्यावरून मोठमोठ्याने बोलत होता. गंमत अशी की त्या ठिकाणी कुठेही माईक, स्पिकर, मंडप दिसत नव्हता. पण आवाज असा घुमत होता की लोक टाळ्यांचा कडकडाट करत होते. आणि बाकीचे सारे पुतळे अक्षरशः रडत होते. मला हे दृश्य बघून आश्चर्याचा धक्काच बसला. मी मनात म्हटलं,

" खरंच, आपण बाबांच्या पायाला तरी स्पर्श करावा. पण एकदाचं धाडस करून बाबांच्या त्या चौथऱ्याजवळ गेलो. बाबा मोठमोठ्यानं बोलण्यात तल्लीन झालेले. पण बाबांच्या पायाला स्पर्श करायला माझा हात पोहचेना. मी निराश झालो. चौथऱ्यावर चढणे तर अशक्यच. संगमरवरी गुळगुळीत चौथरा. परत फिरणार इतक्यात बाबांनी माझ्याकडे पाहिले. मी नतमस्तक होऊन हात जोडले. बाबांनी अक्षरशः वाकून माझ्या पाठीवरून हात फिरवला. तर आहो अश्चर्यम् मी एकाएकी एवढा उंच झालो की बाबांच्या चौथऱ्याएवढा. मी चटकन बाबांच्या पायाला स्पर्श करून आनंदातिशयाने मोठ्याने रडू लागलो–बाबा तुम्ही आम्हाला सोडून का गेलात ? असे म्हणून रडू लागलो. स्वप्नातील माझे रडणे ऐकून माझ्या पत्नीने मला एकदम जागे केले. मी पत्नीवर थोडासा रागावलोच कारण बाबासाहेब मला काहीतरी बोलणार होते पण झोपेतून जागं झाल्यामुळे ते अशक्यच झाले होते. "

यावर प्रतिक्रिया व्यक्त करायला संधीच मिळाली नाही. माझे हे विलक्षण स्वप्न ऐकून गायकवाड सरांनी एक दीर्घ निःश्वास सोडला. तोपर्यंत कॉलेजचे कार्यालय समोरच आले. कार्यालयात गेल्यानंतर प्रथम रात्रीच्या प्रौढशिक्षण वर्गात काम करणाऱ्या विद्यार्थ्यांची यादी पाहून यात मागासवर्गीय किती आहेत ? या माझ्या प्रश्नावर गायकवाड सर 'एकही नाही' असे सांगतात. मला अतिशय वाईट वाटले. अशा विधायक कार्यात दलित विद्यार्थी उदासीन का ? हा प्रश्न मला भेडसाऊ लागला त्या दिवशी मी दिवसभर बेचैन होतो. या तरुण मुलांना काय हवंय ? याचाच मी विचार करू लागलो.

## शिक्षणाविषयी एवढी उदासीनता

दारिद्र्य हे नतद्रष्ट व ना कर्त्या माणसांच्या पाचवीला पुजलेलं असतं. नेमकं दलितांच्या बाबतीत असंच घडलेलं आहे असं राहून राहून मला वाटत असतं. दारिद्र्य हा नियतीनं दिलेला शाप आहे वगैरे मला नेहमीच मृगजळासारखा विचार वाटत असतो.

आजचे वास्तव हे यापूर्वी नव्हते. महात्मा फुले, राजाराम शाहू महाराज, डॉ. आंबेडकरांच्या कर्तृत्वाने कालचे वास्तव हे काळाच्या उदरात झाकले गेले आहे. त्याचे काही अवशेष दृष्टीपथात कधी कधी येतात. पण या बदलत्या वास्तवाचे आमचे भान हरपल्यासारखे झाले आहे. नको त्या प्रसंगात, कार्यात डोकं खुपसण्याची सवय चांगली असं कुणी म्हणणार नाही. तसंच दुसऱ्याला दोष देत राहण्याची सवय ही आत्मघातकीच. ऊठसूठ दलितेतर समाजावर टीका करणे, वा तोंडसुख घेणे हे ही अवास्तव व आत्मघातकीच.

एकदा मी वर्गात शिकवित असताना एक इतर मागासवर्गीय समाजातील शिक्षक वर्गात आला. तो शिक्षक आल्यामुळं मुलंही उठली. मी ही थांबलो. तो शिक्षक म्हणाला, " लई घाम येईस्तोर शिकवाय लागलाय तुम्ही. तुम्हाला कुणी राष्ट्रपती पारितोषिक देणार नाही. आता माझा तास आहे. " झालेल्या अपमानामुळं सहजपणे मी हसण्यावारी नेऊन पुढल्या कामाला लागलो. पण मनात ते शल्य बोचतच राहिले. वास्तविक कर्तव्य भावनेने माझ्या व्यक्तिगत भावनावर मात केल्यामुळे मी ते विसरलो खरा. पण दलित समाजातील इतर मागास समाजातील शिक्षकबंधूना शिक्षणाविषयी अनास्था का ? याचे गुढ उकलण्याचा मी प्रयत्न करू लागलो.

एकदा माझ्याबरोबर दलित शिक्षक उमरगा येथे सहज गप्पागोष्टी करत निघालो होतो. समोरून दोन छोटे बहिणभाऊ व त्यांची छोटी मैत्रीण जात होते. एकाएकी त्यांची माझी दृष्टादृष्ट झाली. मी बघून स्मित केलं मग ते छोटे बहिणभाऊ मला मिठी मारून रस्त्यात रडू लागले. माझ्याही मनात काहीतरी खास घडलं असावं म्हणून त्यांना " काय झालं असं रडायला ? वेड्यासारखं का

रडता ? " असे विचारले. हे दृष्य बघून माझ्या सोबतचे मित्र अणि रस्त्याने येणारे जाणारे प्रश्नार्थक मुद्रेने पाहू लागले. रडत रडत ती मुले म्हणाली, "गुरुजी, तुम्ही गेल्या पासून आम्हास पुस्तके कुणी देत नाहीत ! "

त्यांचा गालगुच्चा घेऊन मी म्हणालो, "एवढंच आहे ना ?अन् एवढ्यासाठी रडायचं ? चला तुम्हाला नवीन पुस्तकं दुकानातली घेऊन देतो. " छोटी मुलगी समजुदार होती ती म्हणाली, " दुकानातील नकोत गुरुजी, तुम्ही उद्या शाळेत या अन् आमच्या गुरुजींना शाळेतील पुस्तके द्यायला सांगा. सगळी मुले तुमची आठवण काढतात. " त्या चिमुकल्या लेकरांना मी काय दिलं असेल ? तर केवळ जिव्हाळा आणि पुस्तक पेढीतील क्रमिक पुस्तके.

माझ्या सोबतचे शिक्षक म्हणाले, " मलतीकडं लाड करता वाटतं. मुलांचे असले फाजील लाड करत जाऊ नका. " या त्यांच्या उपदेशाने माझे समाधान झाले नाही. शेवटी तेच शिक्षक दुसऱ्या दिवशी मला म्हणाले, " चला जाऊ बनाला, झाडाची प्यूवर शिंदी मिळते. आज आठ आण्याचा जेन्ट लागला. कालच येते वेळी हिट ओपन क्लोज पत्त्यासगट लावून आलो होतो. त्या माझ्या मित्राला अनेकवेळा सांगूनही त्यांनी अद्यापही मटका,दारू गांज्याचा नाद काही सोडला नाही.

एके दिवशी ७ वीच्या वर्गात एक दलित समाजातील मुलगा रंगीबेरंगी कपडे अन् हातात घटचाळ बांधून आला. तो खूष होता. आपल्या कपड्याकडे पुन्हा पुन्हा आपणच पाहून मनातल्या मनात हसत होता. घड्याळाकडं सारखं सारखं बघत होता. आपल्याकडे वर्गातील सगळी मुले पाहतात की नाही हे पण न्याहळत होता. शाळा सुटल्यानंतर त्याला मी मुद्दामच सगळ्यांच्या शेवटी थांबवून विचारलं, " सुरेश, आज असं नटून कसं काय आला ? नवे कपडे, घड्याळ. या कपड्याऐवजी शाळेचा ड्रेसच घ्या म्हणायचं वडलांना. " गुर्जी, ह्यामच्या दादानं बंबईहून आणलेत हे कापडं. घड्याळ मातुर दादाचं उगं बांधलाव. " आता चूक त्याचीही नव्हती. त्याला मी सांगितलं " कमीत कमी आता रोज शाळेला तरी येत जा. शेळ्यांच्या मागं जाऊ नको " मान हलवून तो मनान पळाला. तर पालकांमध्येही अशीच उदासीनता. पुढे प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालवायला सुरुवात केली. दलितांची, दलितेतरांची मध्येच शाळा सोडून दिलेली १४ वर्षांपुढील मुलांनी रोज रात्री एक तासभर लेखन, वाचन सुरू केलं हे पाहून दलित मंडळीची ( प्रौढ ) संख्या वाढू लागली. आपलाच मास्तर म्हणून पुढे मग दीपावलीच्या सुट्ट्या लागल्या. थोडा खंड पडला. सुट्ट्या संपल्या. पुन्हा भेटतील त्यांना रात्री शाळेत यायला सांगू लागलो. काही जण येऊ लागली. मध्येच खंडही पडला, त्यात घरच्या काही अडचणीमुळे मी पुढे दोन आठवडे रजेवर गेलो. या दरम्यान दलित वस्तीत, गावात या रात्रीच्या शाळेची चर्चा झाली. पुन्हा मी कामावर आल्यावर त्या सर्वांना रात्री प्रौढांच्या वर्गात येण्याचा लकडा सुरू केला. पण आता

तर कुणीच येईना. मी शाळेतील छोटया मुलांजवळ थोडी चौकशी केली. त्यावेळी त्या मुलांनी सांगितले. "गुर्जी, तुम्ही दिवसाची आन रातरची बी पगार उचलताव अन् रात्रीतर काय येईचना झालाव. त्यामुळं गुराखी पोरं आन् माणसं ठरविले की ती शाळाच नको." त्यानंतर खरं काय ते कळलं. पण आमच्याच शिक्षक बंधूंनी त्या लोकांची डोकी फिरवली होती.

## एक जाणीव

वर्गात प्रवेश केल्यानंतर वर्गभर माझी नजर फिरते. तेव्हा माझ्यासमोर जी मुलं असतात ती काही फाटक्या कपडयांतील, केस वाढलेली, आंघोळ न केलेली, कसल्यातरी अनामिक भीतीनं शेवटच्या ओळीत कोपऱ्यात बसलेली चटकन दिसतात.फार थोडी मुलं नीटनेटके कपडयातील, केस विंचरलेली आढळतात. तेव्हा मला चटकन माझं बालपण आठवतं. कोपऱ्यात दडून बसलेल्या मुलांमध्ये फाटक्या कपडयातला, केस वाढलेला, आंघोळ न केलेला लहानगा मी दिसत असतो. क्षणभर भूतकाळात डोकावतो. गरीबीच्या जाणिवेने शून्य दृष्टीने माझा मीच पहात राहतो.

ग्रामीण भागात अद्यापही वर्तमानकाळातसुद्धा भूतकाळ वावरतोय हे कुणीही नाकारणार नाही. फरक इतकाच की भूतकाळात स्पष्ट उघडपणे अस्पृश्यता पाळली जात होती अन् वर्तमानकाळात ती झाकून वावरतेय एवढाच. त्यात पुन्हा भूतकाळात जवळजवळ ९९ टक्के सहानुभूती ही दलितांच्या बाजूने होती. तर वर्तमानात मात्र ९९ टक्के अंतर्यामी द्वेषाची जळमटे दलितेतरांत वाढली आहेत. कारण काय तर दलितांमध्ये जी काही मंडळी शिकली, सवरली जी काही कोणत्या तरी नोकरीस लागली, जी काही तरुण मंडळी खेडी सोडून शहरात पोट भरायला गेली, त्यांच्यामध्ये स्वत्वाचे स्फुल्लींग रुजले गेले. त्यामुळे शेतीमधील कामे, गुरे राखणे, शेण काढणे, झाडलोट करणे, रामोशी–येसकरपण करणे वगैरे पारंपरिक कामे आज जवळजवळ दलितांनी वर्ज्य केलेली आढळून येतात.

या सर्वांत एक विशेष गोष्ट अशी की, आज प्रत्येक खेडयात शाळा निघाल्या अन् दलितांची छोटी छोटी मुले(ज्यांना शक्य होईल त्यांची)शाळेत जाऊ लागली. त्यात भर म्हणून स्वातंत्र्यानंतरची शिक्षित दलितांची पहिली पिढी ही शिक्षण व्यवसायात पुढे आली.

जो समाज दलितेतरांच्या उष्टयावर जगणारा होता तो समाज आज शिकून कुणी शिक्षक म्हणून, कुणी कारकून, कुणी चपराशी, तर कुणी प्राध्यापक, म्हणून नोकरीस लागला. स्वत्वाच्या जाणिवेने जगणे हेच मुळी येथील काही जातीयवादी, कर्मठ पारंपरिकतेचा परिपाठ करणाऱ्या मंडळीना आजही रुचत नाही, खपत नाही पण नाईलाजानं अशांना काही प्रत्यक्ष करता येत नाही म्हणून अन्य कुमार्गांने अडचणी निर्माण करण्याचे कारस्थान करीत असफल प्रयत्न करण्याचा उद्योग करत असतात.

असाच एक प्रसंग माझ्यावर ओढावला. एके दिवशी गावातील एक नागरिक शाळेच्या एका अधिकाऱ्यासोबत आले. मी वर्गावर होतो. साहेब आणि ते नागरिक दोघेही वर्गात आले. साहेब म्हणाले, "कांबळे आपणच का ? " मी ' हो ' म्हणून सांगितले. त्यावर साहेब म्हणाले, " तुमच्या विरुद्ध तक्रार आली आहे. " तुम्ही वर्गात कसल्याही गोष्टी सांगत असता म्हणे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनावर विपरीत परिणाम होतो.

मी म्हणालो, "साहेब, मुलांच्या आग्रहामुळे मी कधी कधी गोष्टी मुलांना सांगतो. पण काही विपरीत असं न सांगता नीतीकथा, परिकथा किंवा बिरबलांच्या कथा सांगत असतो. "

अहो तसं नाही, परवा म्हणे तुम्ही राक्षसाची गोष्ट सांगितली. अन् या नागरिकाचा मुलगा गेली दोन चार दिवस घाबरून रात्री झोपेतून उठतो अन् राक्षस आला असे झोपेत बरळत असतो म्हणजे हे बरोबर नाही. तुम्ही मुलांना यापुढे गोष्टी सांगत जाऊ नका. आता यापुढे असं करणार नाही असं लिहून द्या.

या झाल्या प्रकरणाचं एक कारण पुन्हा समजलं की मी त्या गृहस्थाला कधी नमस्कार चमत्कार केला नव्हता.

साहेब आणि ते नागरिक गेले खरे पण मी अधिकच बेचैन झालो. पुढे काही दिवसांनी माझी बदली तालुक्याला झाली. थोड्याच दिवसात काही पालक मला भेटायला आले आणि म्हणाले की, " गुरुजी, काही करा पण आमच्या मुलांची शिकवणी घ्या. जी काही फीज असेल ती आम्ही देऊ. " मी त्यांना सांगितलं की, "एक चारपाच दिवसात मी विचार करून सांगतो." जिथे-जिथे भेट होईल तेथे बरेच पालक ' शिकवणी घ्या गुरुजी ' असेच सुचवू लागले. त्या शाळेत असे बरेच शिक्षक शिकवण्या घेत असल्याचे मला जाणवले. मला वाटतं तो काळ 'आणीबाणी ' चा होता. मलाही त्या शाळेत येऊन सहा–सात महिने झालेले. माझे काही हितचिंतक शिक्षकमित्रांचाही सल्ला घेतला. त्यांनीही सुचवलं की, "बघा, पगार कमी आहे. तालुक्याच्या ठिकाणी खर्चाची ओढाताण होते. आलीय संधी तर घ्या फायदा. घरखर्च वरच्यावर निघतो, पगार शिल्लक राहतो. "

माझ्या काही मित्रांच्या सल्ल्यानुसार मी शिकवणीला पाच-सात मुलांसाठी माझ्या घरी यायला सांगितलं. मुलंही पहिल्याच दिवशी महिन्याची १० रु. फी पण सोबत आणली. मी 'महिना झाल्यानंतर द्या'असं म्हणालोही.पण मुले म्हणाली 'तसं नाही गुरुजी शिकवणी घेणारे सगळेच गुरुजी महिन्याच्या पहिल्याच दिवशी फी घेतात.'

शिकवणी सुरू केली तशी मुलांची संख्याही वाढू लागली. पैसाही हातात खेळू लागला. जेमतेम व्यवस्थित गाडी रूळावर आली. एकत्र कुटुंब पद्धतीमुळं कुटुंबही मोठं होतं, त्यात खर्चाचा ताळमेळ बसू लागला. मात्र माझ्यापूर्वी ज्याच्याकडे मुले शिकवणीला जात होती त्यांची संख्या म्हणजे २० मुलांची बॅच

एकदम कमी झाली. त्यामुळे ते शिक्षकमित्राने माझ्याबद्दल गैरसमजामुळे तुसडेपणाने बोलण्या, वागण्याला सुरुवात केली. त्यांच्याकडे जाणाऱ्या मुलांना मी तशी कल्पनाही दिली. पण मुले काही ऐकेचनात. झालं, आम्हा दोघांमध्ये दुरावा निर्माण होत गेला. मात्र चार दलित आणि एका धनगराच्या विद्यार्थ्याला कसलीही फी न घेता शिकवल्यामुळे एक वेगळे समाधान मिळत होते. दलितांची त्यापैकी काही मुले इंजिनिअर, प्राध्यापक म्हणून आज व्यवस्थित जीवन जगतात.

हे सगळं घडत असताना मी शाळेच्या सांस्कृतिक कार्यक्रमापासून ते रात्रीचे प्रौढशिक्षण वर्ग व दैनंदिन अध्ययन अध्यापनात खंड पडू दिला नाही. कारण नेमकं याच काळात एक छोटासा लेख 'हिरवी क्षितिजे' या साप्ताहिकात प्रसिद्ध झाला होता. "तर तुझे नांव काळजावर कोरले असते" हे त्या लेखाचे शीर्षक होते. त्यामुळे शाळेच्या मुख्याध्यापकांच्या मर्जीतला शिक्षक म्हणून मी ओळखला जाऊ लागलो. तर काही शिक्षकमित्र मला " साहेबांच्या नाकातला केस " असे कुत्सितपणे संबोधित असत.

या काळातच माझ्याकडे वाचनालयाचा पुस्तक पेढीचा विभाग आला. अक्षरशः अध्ययन, अध्यापन, शिकवणी, प्रौढशिक्षण, लेखन या कामात इतका गुंतलो की माझ्या वैयक्तिक अडचणींना मुरड घालावी लागली. याच दरम्यान आणीबाणी संपली. अन् शासकीय कर्मचाऱ्यांचा दीर्घकालीन संप सुरू झाला. या संपामुळे आम्हा शिक्षक मंडळीत एकमेकांमध्ये दरी निर्माण झाली. कारण मी संपात सहभागी नव्हतो संप मिटला अन् माझ्या शिक्षक सहकारी मित्रांनी नको ते संकट उभं केलं अन् माझी बदली तालुक्याबाहेर जिल्ह्याच्या शेवटच्या टोकाच्या खेडेगावात झाली. आमचं ' विंचवाचं बिऱ्हाड ' तिकडं हालविलं. जेव्हा बदली झाली तेव्हा माझ्या चिमुकल्या बालमित्रांनी अक्षरशः रडतच मला निरोप दिला. मात्र जी काचेच्या घरात राहणारी मंडळी होती त्यांनीच माझ्या घरावर दगडफेक केली होती. याचं प्रत्यंतर त्या मित्रांना नजिकच्या काळातच घडलं.

एक मात्र खरं की माझी माझ्या कामावर अढळ निष्ठा व पत्करलेल्या पेशावर श्रद्धा बसत गेली. कारण माझ्या सुखाच्या निष्ठेच्या कल्पना व मर्यादांची जाणीव मी जागृत ठेवली होती याचा अर्थ असाही नाही की मी एक सर्वगुण संपन्न अशा आदर्शाचा मेरूच आहे. पण जे काही कार्य हाती घेतो ते तळमळीनं व कर्तव्य भावनेनं पार पाडण्याचा प्रयत्न करतो. त्यात अपयश आलं तरी खचायचं नाही ही माझी प्रवृत्ती. कारण बालपणापासूनची संकटं खाण्याची सवयच होती.

## ग्रामीण शिक्षकांचा छळ

भारतातील खेडी अद्यापही १६, १७ व्या शतकात वापरताहेत ही वस्तुस्थिती आहे. २१ व्या शतकातील भाषा ही एखाद्या नाटकातील विदुषकाने फेकलेला एक ' डायलॉग ' आहे.

माझ्या २० वर्षे सेवेच्या कालावधीत जे काही दलित शिक्षक भेटले आणि जेथे जेथे नोकरीसाठी भटकावे लागले तेथे तेथे दलित शिक्षकांना राहण्यासाठी घरच मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. जिथं गावकुसावाहेरील दलितांनाच आपला चिल्यापिल्यांना निवारा म्हणून झोपडीचा आश्रय घ्यावा लागतो तिथं परगावच्या शिक्षकांना घर मिळणं ही अशक्य बाव आहे.

आणि जर समजा एखाद्या खेड्यात घर मिळालेच तर तेथे तो काही महिने सुद्धा टिकत नाही. याचं कारण असं की, खेड्यामध्ये सर्वांच्या दृष्टीक्षेपात २४ तास राहणारा प्राणी म्हणजे मास्तर. लहान मुलापासून ते तरुण–तरुणी बायका–पुरुष सगळ्यांचेच लक्ष हे मास्तरकडे असते. अन् गंमत अशी की, श्रीमंतपासून ते गरीब दलितांपर्यंतच्या घरातील सर्वच सामाजिक स्तरातील विद्यार्थ्यांशी शिक्षकांचा संबंध येतो. त्यामुळे नवीन मास्तर आले की प्रत्येक घरात त्याच्या विषयी चर्चा घडतेच.

त्यात भरीला भर म्हणून खेड्यातील इतर पुरुषांपेक्षा मास्तरचे राहणीमान, कपडेलत्ते हे स्वच्छ व नीटनेटके असतात. त्यामुळे तरुण मुली व तरुण स्त्रिया या नेहमी मास्तरकडे उगीच येता जाता न्याहाळत असतात. त्यात नवीन नोकरीस लागलेला, अविवाहित मास्तर असला तर मग त्या त्या क्षेत्रात त्याचा भाव हा वाढलेला असतो. त्यात थोडा वहुतही तोल सोडलेला मास्तर असला की झालं, सगळ्या गावात चोरून खाल्लेल्या कोंबडीच्या पंखाडाची गत मास्तराची होते.

त्यात दलित शिक्षकांचा तोल जात नाही असे म्हणणे गैरच. आणि केवळ या तोल जाण्याच्या सवयी अगोदरच " मास्तर " या प्राण्याला क्वचित गावीच खोली मिळते. या संदर्भात मला एक विचित्र असा अनुभव आला. (गावाची नावे मुद्दाम टाळली आहेत.)

एका गावात माझी बदली झाली. मी अजूनही अविवाहित होतो. तेथे कामाला लागल्यापासून पुरते दोन महिनेही झाले नाहीत तोवरच असं घडलं की इयत्ता ५ वी च्या वर्गातील एक मुलगी दुपारच्या सुट्टीत शाळेत आली अन् सांगितलं की " गुर्जी, तुमाला आमची माय बोलावतेय. "

मी विचारलं, " कशाला ? काय काम आहे ? "

" पत्र लिव्हायचंय आमच्या बापूला " मुलगी म्हणाली. ठीकंय, म्हणून त्या मुलीबरोबर निघालो वस्तीवर. घरी गेल्या गेल्या ती छोटी मुलगी धूम पळाली दप्तर घेऊन शाळेला. घरात अंथरलेल्या फाटक्या सतरंजीवर बसलो. तर एक तरुण मुलगी चुलीवर चहाला आधण ठेवत होती. मी म्हणालो, "तुमची आई कुठंय, पत्र लिहायचंय नाही का ? दोन वाजत आलेत. लवकर लिहून जावं लागेल शाळेला मला. "

मुरका मोडून मुलगी म्हणाली, " माय परसाकडं गेलीय, आत्ता येईल. " अशी बोलत कपबशीत चहा गाळून दिला सुद्धा. मी गुळचट चहा घेतला. कपबशी खाली ठेवली. ती मुलगी दारातच उभी होती. कपबशी खाली ठेवतोय न ठेवतोय तोच त्या मुलीनं दार लावलं अन् चक्क आतून कडी घातली.

माझं काळीज थडथडा उडाय लागलं.हातपाय लटपटाय लागले.कापरं भरल्या• सारखं झालं. असं का, असं का म्हणतोय तवरच वया जवळ आली अन् बजावलं.

"घाबराचं नाही."

" पण का ? असं का ? पाया पडतो तुमच्या. शाळेत आता मला जावंच लागतंय " मी कळवळलो.

" गुर्जी, हेवढं घाबराय काय झालं ? मी हाय नं. मी काय करणार नाय तुम्हाला. फक्त मला एक वचन द्या. दार आत्ता काढते."

" कोणतं वचन ?' मी अधिकच चक्रावलो.

"गुर्जी, मी बी चांगल्या घरची लेक हाय. माझा वाप पंच हाय. फक्त मला शिकलेला अनिक मास्तर नवरा करून घ्यायचाय ! व्हय मना न्हाय तर बोंब ठोकते" ती.

मला घाम सुटला. तिकडे दुपारची पहिली घंटा झाली. छातीत धडधडू लागलं. काय करावं ? काय सुचेना. गोंधळलो. अशा अनपेक्षित प्रसंगाने घाबरलो खरा पण धीर सोडला नाही.

मी म्हणालो, " तसं काय करू नका, मी लग्न करून घ्यायला तयारय, पण लग्नाची मागणी, सोयरिक अशी कशी ? "

" तसं काय समजू नका गुर्जी मला तुम्ही . . . " असं म्हणून तिनं दार काढलं आन हसाय लागली. मी चपलेत पाय सारुन चटकन शाळेच्या दिशेने निघालो. दुपारच्या वेळी सगळे कामाधामास गेल्यानं वस्ती तशी शांतच होती.

मात्र पुन्हा कधी वस्तीतल्या त्या घराकडं मी साधी नजर सुद्धा वळविली नाही. त्यानंतर काही दिवसातच दुसरे एक दलित शिक्षक त्या शाळेवर बदलून आले. ते माझ्यापेक्षा अनुभवी होते. त्यांनी कसं काय दुरूनच्या नात्याचा पाहुणापणाचा संबंध शोधला अन् एका घराजवळच्या छपरात आपलं कुटुंब थाटवायचं ठरवलं. ते दिवस होते बहुतेक दसऱ्याच्या पूर्वीचे. घर उभं, आडवं घेणे, न्हाणधुणं करणे हे सगळीकडं चालू होतं. त्या दिवशी मुलंही शाळेत आली नव्हती. सुट्टीच होती जवळजवळ. आम्ही जवळजवळ सगळेच मास्तर शिक्षा म्हणून आल्यासारखं त्या गावात नोकरीसाठी आलो होतो. गाव ही असं होतं, आम्ही त्या गावाला आंदमान, निकोबार बेट म्हणत असू.

तर त्या दिवशी आम्ही पंधरा सोळा शिक्षक शाळेतच होतो अन् नवीन आलेले शिक्षक जेवण करून येतो म्हणून वस्तीतल्या झोपडीकडे गेले होते. एक

तासानंतर ते नवे मास्तर लुंगी गुंडाळल्याप्रमाणे नेसते धोतर गुंडाळून, जेवण आटोपून दुपारच्या वेळी बनियनवर झोपले होते आन् तशा अवस्थेतच पळत धापा टाकत शाळेकडे आले अन् सारखे उडचा मारत बोबडं बोबडं काही तरी बोलू लागले. मी चाटच पडलो. भानगड काय ती कळेचना. मी त्यांना जवळ येऊन विचारलं, " काय गुरुजी ? असं का ? काय झालंय असं टणाटणा उडचा मारायला ? " ससस्स. . . रड. . . सरड. . . सरड हाय धोतरात " गुरुजी गांगरून म्हणाले.

मी पटकन कमरेला गुंडाळलेले धोतर विस्कटले तर काय गंमत चांगला हाताच्या आंगठयाएवढा सरडा पटकन धोतरातून खाली पडला. तेव्हा कुठे गुरूजी टणाटणा उडचा मारायचे थांबले. घाम पुसला अन् म्हणाले, "गुरुजी कुण्यातरी मुलीनं मी झोपल्यावर माझ्या धोतरात हा फासा घातलेला सरडा सोडला अन् झोपेत मला काय झाले ते समजेचना. बरं म्हणून बरं आपली शाळा वस्तीपासून फार दूर नाही" असं म्हणून त्या नवीन गुरुजींनी ते धोतर व्यवस्थीत गुंडाळले अन् निवांतपणे वस्तीवर निघाले. तर आमच्या वस्त्या या अशा.

तसं बघाय गेलं तर आमचं 'ध्यान' म्हणजे गावरान भाषेत 'माट' ज्याला म्हणतात ते कुणाच्या मनात रेंगाळणारं नाहीत. त्यामुळे माणसांचा बाह्य व्यक्तिमत्वाचा जो प्रभाव असतो तो पहिल्यापासूनच माझ्या बाबतीत नगण्य म्हणायला काहीच हरकत नाही. त्यामुळे माझ्या बऱ्याच कृतीकडे, बोलण्याकडे सहसा कुणी मन लावून ध्यानच देत नाही. याची मला उगीचच रूखरूख वाटायची. पण माझी ही रूखरूख पुढे काही दिवसातच लोप पावली. याला कारण होते आमचे एक विद्यार्थीप्रिय मुख्याध्यापक आद. ए. जे. कुमार. त्या काळातच आद. योगिराज वाघमारेसर, आद. डॉ. गंगाधर पानतावणे सरांची एक दोन पत्रे शाळेच्या पत्त्यावर आली. तेव्हा माझ्यामध्ये काहीतरी चांगले विचार रुजलेले आहेत हे त्यांनी ओळखलं. त्यावेळी मु. अ. संबंधात " शाळेचे मुख्याध्यापक " कसे असावेत यासबंधी संक्षिप्त विचार लिहायला सांगितले.

तेव्हा " शाळेचे मुख्याध्यापक हे सर्कशीतील रिंगमास्टरप्रमाणे असावेत " असे एक वाक्य मी माझ्या लेखात लिहिले. त्यामुळे मला त्यांचेकडून अध्ययन, अध्यापनाची एक वेगळी दिशा मिळत गेली.

नंतर जड अंत:करणाने ती शाळा सोडून दूरच्या ठिकाणी माझी बदली झाल्यामुळे सगळं कुटुंब मी माझ्या गावी आणलं. नव्या शाळेवर रुजू व्हावं म्हणून मी गावाकडून तालुक्याच्या गावी चालत निघालो. त्यावेळी आमच्या गावाहून एस. टी. जातच नव्हती. म्हणून मी पिशवी घेऊन चालतच सकाळी सकाळी निघालो होतो. देवळाजवळ आलो होतो तेवढयात एक वाण्याचा अडाणी मुलगा संडासहून घरी जाता जाता मला कारण नसतांना "कुठं निघालास धेडग्या सकाळी

सकाळी " असं म्हणून माझ्या साधारण स्वच्छ असलेल्या कपड्याकडं उपहासानं हसत असं हाटकलं, आता सकाळी सकाळी हे नसलेलं संकट अंगावर कशाला ओढून घ्यावं म्हणून मी निमूटपणे निघालो. पण त्याच्या मनात काय आले कुणास ठाऊक. " माजलास काय धेडग्या, बोललं तरीबी बोलंनास असं म्हणून शर्टाला धरून ओढलं. झालेला अपमानाचा आवंढा गिळत मी म्हणालो, " तुला काय करायचंय ! जा की नीट." सहज व सरळच मी बोललो.

तो धावतच आला आणि " आरं तुरं बोलतूस धेडग्या ? " असं म्हणून गचुटीला धरलं. मी पण धरलो. झटापट सुरू झाली. आन् बरेच लोकही जमा झाले. पण कुणीही माईचा पूत पुढं आला नाही की, कशाला मांडण करताय असं म्हणून सोडवासोडवी केली नाही. माझ्यावर अनपेक्षित गुजरलेल्या प्रसंगाने मी रडतच होतो. आन त्या मुलाने फडाफडा दोन कानशीलात घेतल्या आणि मी सुद्धा त्याला चांगलीच थोबाडीत दिली. त्याने गचुटी सोडून " जा धेडग्या, असं माजल्याबानी आरंतुरं, पुन्ना बोल म्हंजी दाखवितो " असं म्हणून निघाला. सगळेजण बघत होते. साधी चौकशीसुद्धा कुणी केली नाही.

मला पुढे जाणं भाग होतं. काय करावं सुचत नव्हतं. पण शेवटी तालुक्याच्या वाटेला लागलो. डोळ्याचं पाणी काही केल्या थांबेना. परिस्थितीनं, वेळेनं मला मजबूर केलं होतं. वाटेनं जाता जाता एक मन म्हणालं– जावं ठाण्याला आणि ठोकावी फौजदारी. दुसरं मन म्हणत होतं कसल्या करतोस भानगडी ? तुला नवीन शाळेवर रुजू व्हायचंय तिकडेच तू जा.

निराश होऊन मी शाळेवर रुजू व्हायला लातूर गाडीत बसलो. माझ्या त्या दिवसाच्या निराशेंन खूप काही शिकवलं मला. खरंच नसत्या वयात नको त्या जबाबदाऱ्या डोक्यावर घेतल्या की माणूस खचत असतो, प्रसंगी स्वतःच्या जीवनाचा नाशही ओढवून घेत असतो. त्यात निराशेने ग्रासले की माणूस आत्मविश्वास गमावतो, निर्भयता गमावतो. दरम्यानच्या काळात घडलेली घटना माझ्या माईला, भावाला सर्व कुटुंबाला, गावातील सर्वांना कर्णोपकर्णी कळली. पण कुणीच काही केले नाही. मात्र माझी झालेली बदली मला क्लेषदायक ठरली नाही. जो काही अल्पकाळ मी दूरच्या शाळेवर गुजरला त्यावेळी दलित चळवळीतील, दलित साहित्य चळवळीतील बऱ्याच सहप्रवाशांच्या गाठीभेटी, ओळखी–पाळखी झाल्या. त्यामुळे माझ्या नैराश्याला ते एक आव्हान ठरले आणि नैराश्याची जागा आत्मविश्वास आणि निर्भयतेने घेतली. त्यावेळी मला जी मित्रमंडळी भेटली त्यात मित्रवर्य शरणकुमार लिंबाळे, धसवाडीकर, वाघमारे, मिलिंद येरमाळकर, तु. लिं. कांबळे, राम रायवाडीकर,टी. एम. कांबळे,मोहन कांबळे,कै. बी. सूर्यवंशी, अंबादास देवळे, हरिभाऊ बनसोडे, झोलेकर वगैरे मित्रमंडळींच्या जवळून ओळखी–

पाळखी झाल्या. आणि माझ्या ललित लेखनास एक वेगळी गती व दिशा मिळाली. याच काळात गुरुवर्य डॉ. गंगाधर पानतावणे यांचे मार्गदर्शन लाभले आणि 'अस्मितादर्श 'या दलित चळवळीस वाहिलेल्या मासिकाने मला एक कवी म्हणून प्रकाशात आणले. जर 'अस्मितादर्श ' नसते तर माझी लेखणी मला म्यान केलेल्या तलवारीप्रमाणे बंदच करावी लागली असती, असो.

तर सांगायचा मुद्दा असा की, अवघ्या तीन महिन्यांतच परत माझी बदली गावाजवळ एका प्राथमिक शाळेत झाली. माझ्या जीवनाला मिळालेले आणखी एक ते आव्हानच होते.कारण गावात राहून शेजारच्या गावाला नोकरीसाठी येणं, जाणं करणं म्हणजे दररोज एका संकटाला, अपमानाला गिळतं राहणं होतं.

शेवटी आमचं बिऱ्हाड पुन्हा " दिल्ली ते दौलताबाद प्रमाणे " गावाकडे. दरम्यानच्या काळात मी " मास्तर " असलेलं गावात जवळजवळ माहीत नव्हतं. आमच्या वस्तीला, मात्र " दगडूला मास्तरची नवकरी सरकारी लागलीय " हे माहीत होतं. शिवाय सकाळी सकाळी झालेल्या माझ्या मारामारीमुळे तर वस्तीत वेगळीच हवा पसरली होती.

त्यात गंमत अशी की वस्तीमधील पहिला " सरकारी मास्तर " म्हणून बऱ्याच माणसांच्या पोटात कारण नसताना डुचमळत होतं. त्याचं काय की आठराविश्व दारिद्र्यामुळे आमच्या कुटुंबाची खूपच वाताहात झाली होती. त्यात भावकीमध्ये पाटलाच्या वाड्यातील " महार " वतनासाठी आपसात भांडणं व्हायची. त्याचं पर्यवसान एकमेकात तेढ आणि भावकीच्या भांडणात व्हायचं. मग "कारन–परजन" आलं की एकमेकांना शह–काटशह देण्याची वृत्ती मनात घर केलेली. त्यामुळे एकमेकांना पाण्यात बघण्याची सवय भावकीला होती. त्यात वडिलांना मृत्यू आला तो "कुटुंबनियोजन" चे ऑपरेशन म्हातारपणात केल्यामुळे, अतिशय दारिद्र्यात.

अशा गुंतागुंतीत " मास्तर " म्हणून नोकरी, तीही गावाजवळ, याबद्दल वस्तीत थोडी चलविचल झाली. दरम्यानच्या काळात थोरल्या भावाची मुले व मुलगी शाळेला होत्या. त्यांच्या खर्चाचा भारही काही प्रमाणात सोसणे आवश्यक होते. माय तर वृद्ध. माझेही लग्न होऊन एक मुलगा झालेला. बहीण एक लग्नाची या सर्व कौटुंबिक जबाबदाऱ्यातून हळूहळू मार्ग निघत होता.

माझं घर म्हणजे झोपडं अन् सात पत्रे. घर अपुरं होऊ लागलं. घरात बायाबायांची कुरबुर हाऊ लागली. योगायोग असा की, शिक्षक सोसायटीचं कर्ज मिळालं आणि छोटसं घर बांधावं म्हणून कामाला लागलो. सुट्टीच्या दिवशी माती, दगड, धोंडे या संबंधात सोय केली. थोडे बहुत धोंडे–माती येऊन पडली आणि भावकी व वस्तीत संघर्षाला तोंड फुटले. मला एवढी जागा, तुझा तेवढी, इकडं एवढा रस्ता, तिकडं एवढा रस्ता अशा वादात बरेच दिवस घोळ पडला.

मी बेचैन झालो. गावच्या सरपंचाने बांधकाम रोखले. तक्रारी अर्ज गेले. बऱ्याच भानगडी उपस्थित झाल्या. त्या भानगडीत भानगड म्हणजे माझ्याकड आणि माझ्या पलीकडे पाहण्याचा दृष्टिकोन वस्तीत बिघडत चालला. अनंत समस्या वस्तीनं माझ्या पुढं उभ्या केल्या. मला वाटाय लागलं. एकद्या वेळेला दलितेतर समाज बरा पण ही वस्ती नको. दरम्यानच्या काळात वस्तीत बरीच "शिक्षक"मंडळी सरकारी शाळेत नोकरीस लागली होती. त्या शिक्षक मंडळीत मी वयानं लहान पण नोकरीस लवकर लागल्यामुळं माझ्याबद्दल उगीच द्वेष पसरलेला. त्यात भर म्हणून वस्ती मधील एक भांडण कोर्टकचेरी पर्यंत गेलेलं होतं. कोर्टात गेलेला वस्तीतला माणूस हा आमच्या पत्नीच्या माहेरकडून पाहुणा होता. त्यामुळं कारण नसताना माझा संबंध त्या भांडणाशी काही मंडळी जोडू लागली.

हे सर्व घडत असताना माझा मानसिक तोल मी घसरू दिला नाही. माझ्या–बद्दल सरपंच, पोलीस पाटील यांच्यापर्यंत आणि मी जेथे काम करतो तेथे संधी मिळेल तेथे काही मंडळींनी अफवा पसरावयाला सुरुवात करून माझी प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला. त्यात दलित समाजाची माझी शिक्षक मंडळी असा एक खटाटोप करू लागली की सार्वजनिक जीवनातून मला दूर करण्याचा. भर म्हणून गावाजवळ नोकरीस असल्याने मला निमुटपणे सहन करावे लागत होते. त्याशिवाय ही मंडळी " आपलीच " आहे ही एक भाबडी समजूत करून त्याच्यात आज ना उद्या बदल होईल अशी अपेक्षा करून " पाण्यात राहून माशाशी वैर कशाला ? " म्हणून अलिप्तता स्वीकारली.

या अलिप्तताविचाराचा परिणाम असा झाला की, मी चारचौघात बसून गप्पा मारणे किंवा काहीतरी कुटाळक्या करीत बसण्याच्या प्रवृत्तीचा हा एक निषेध मी नोंदवत आहे असा आमच्या मंडळीचा ग्रह बनला. त्यामुळे माझ्याबद्दलचे अफवांचे पीक भरपूर पिकले.

दरम्यानच्या काळात मी काही शैक्षणिक कृती संशोधक प्रकल्प राबविले. शैक्षणिक लेख लिहिले. माझ्या काही शैक्षणिक निबंधांना प्रथम पारितोषिके मिळाली. या सर्व शैक्षणिक लेखनामुळे परिसरात "कामाचा शिक्षक" म्हणून माझी वाहवा झाली. दलितेतर समाजातील शिक्षक, शैक्षणिक जाणिवांचे पालक, काही अधिकारी यांनी माझी स्तुती केली. परिणामतः माझ्यात एक प्रकारचा अहंकारच निर्माण झाला आणि मला वाटते या अहंकारातूनच शैक्षणिक कार्य करण्याला जिद्दीमन तयार झाले. कारण माझ्या कामाचे मूल्यांकन हे फक्त घडणारे विद्यार्थी, निरागस दलित मुले–मुलीच करणार आहेत हा एक आत्मविश्वास होता, आहे न जाणो याला काही वर्षांचा अवधी लागेलही.

तात्पर्य, मला प्रत्येक पातळीवरून डिसकरेज, मानसिक वैफल्य निर्माण करण्याचे काम दलित शिक्षक स्वतः आणि दलितेतर शिक्षकांच्या मदतीने करू

लागले. मला वाटू लागले की "काय आवदसा आठवली आणि गावाजवळ मास्तरकी पत्करली."

अशातच कै. सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना महाराष्ट्रभर राबविण्याचे शासकीय पातळीवरून ठरले. शासकीय परिपत्रकानुसार एके दिवशी आमचे साहेब शाळेला अचानक भेट देऊन "सावित्रीबाई दत्तक पालक" योजनेनुसार प्रत्येक शिक्षकानी एक मुलगी दत्तक घेऊन दरमहा शैक्षणिक साहित्य व कपडे यासाठी मुलीच्या मूळ पालकास २५/– रुपये दिले पाहिजेतच असा आग्रह धरला. आमची शिक्षकमंडळी कावरीबावरी झाली. आपल्या पगारातून दरमहा २५/– रुपये दुसऱ्यासाठी द्यायचे हे ऐकूनच प्रत्येकाची तोंडे आंबट झाली.

साहेबही चाणाक्ष होते. ते माझ्याकडे वळून म्हणाले की, "प्रथम कांबळे गुरुजी आपल्या शाळेतील एक मुलगी दत्तक घेतील. सांगा गुरुजी, कोणती मुलगी दत्तक घेणार?"

"साहेब, तुम्ही सांगाल ती गरीब कुटुंबातील मुलगी मी दत्तक घ्यायला तयार आहे" मी म्हणालो. त्यावर सगळेच म्हणाले की, साहेब, यातून काहीतरी मार्ग काढा. तोच चहा अन् बिस्किट आली. साहेब चहामध्ये बिस्किट बुडवून खात म्हणाले, "आता मित्रहो, मार्ग एक आहे तो म्हणजे आपल्याच शिक्षकांच्या परस्पराच्या मुली 'दत्तक मुली' म्हणून आदलाबदल करून लिहा नावे. लागलीच तशी यादी शिक्षकांनी तयार केली. मात्र याला मी कबूल झालो नाही. मी साहेबांना सांगितलं की, "साहेब मी कोणती मुलगी दत्तक घेणार आहे त्या मुलीचे नाव पहिल्याच्या वर्गात जाऊन निश्चित करतो. मग माझ्या नावापुढे दत्तक मुलीचे नाव लिहा. त्यावर साहेबांनी परवानगी दिली अन् मी एका मुलीचे नाव दत्तक मुलगी म्हणून सूचवले. तेव्हा काही शिक्षक मंडळी कुत्सित व साशंकतेने माझ्याकडे पाहू लागली. कारण त्या गरीब मुलीचे वडील वारले होते. परंतु सामाजिक जाणीवेशिवाय अस्वच्छ हेतू माझ्या मनात नव्हता. तर अशी मानसिकतेवर प्रतिघात करणाऱ्या प्रसंगाची आठवण झाली की मन सुन्न होते.

### स्थगन व गळती

शिक्षणक्षेत्रात "स्थगन व गळती" ही समस्याही दलित विद्यार्थी व विद्यार्थीनींच्या भोवती गुरफटलेली आहे. "गळती व स्थगन" या विद्यार्थ्यांच्या ज्वलंत प्रश्नावर जे काही संशोधन झाले आहे ते संशयास्पद आणि वस्तुस्थितीला डावलून झाले असावे असे वाटते. कारण या संदर्भात शासकीय परिपत्रके येतात, मासिक अहवाल, मासिक व वार्षिक विद्यार्थ्यांची उपस्थिती अहवाल जातात पण ही समस्या स्वातंत्र्योत्तर काळापासून कायम आहे.

या विद्यार्थ्यांच्या गळती व स्थगन समस्येला आळा घालण्यासाठी काही ठोस कार्यक्रम आखला जात नाही ही एक खंत आहे. जी काही संशोधने झालेली आहेत,

त्यातील शिफारशी संदर्भात परिपत्रकाशिवाय दुसरे काही घडत नाही. आमची शिक्षक मंडळी म्हणतात, ( विनोद नव्हे ) आपल्या खात्यात केवळ कागदी घोडे नाचविल्याशिवाय दुसरे काही नाही. आपल्या शिक्षण खात्यात आहेच काय दुसरे कागदाशिवाय ?

सांगायचा मूळ मुद्दा असा की, या गळती व स्थगन समस्येला बळी पडलेले विद्यार्थी विद्यार्थीनीं या दलित आहेत असा माझा अनुभव आहे. घरचे दारिद्रय, शैक्षणिक साधनांचा अभाव, पोटाच्या खळगीचा प्रश्न, दलितेतर शिक्षकांनी दलित विद्यार्थ्यांना दिलेली असमानतेची वागणूक, दलित विद्यार्थी–विद्यार्थिनींना जाणूनबुजून केली जाणारी कडक शिक्षा, शैक्षणिक वातावरणाचा कौटुंबिक अभाव, ग्रामीण भागात प्राथमिक शाळेनंतर विद्यालयीन व महाविद्यालयीन शिक्षणाला दूरच्या गावी न जाण्याची प्रवृत्ती, वाढती बेकारी, शैक्षणिक धोरणातील विसंवादी पारंपरिक अपप्रवृत्ती, अभ्यासक्रम आणि पाठ्यपुस्तकांचा दूरान्वय, चुकीची मूल्यमापन व्यवस्था, या आणि याशिवाय अनंत अडचणीमुळे दलित मुले–मुली नापासीनंतर पुन्हा शाळेला जात नाहीत किंवा मध्येच शाळा सोडून देऊन गुराढोरांच्यामागे पोटावारी राबतात. त्यामुळे ही समस्या केवळ सर्व्हे करून, रेकॉर्ड ठेवून सुटत नाही, तर त्यासाठी काही मूलभूत योजना वास्तवात राबविणे आवश्यक आहे. तसेच आज जवळजवळ १५–१६ व्या शतकाकडे आपण जात आहोत की काय याची जाणीव व्हायला लागलीय. कारण पारंपरिकता, धर्मान्धता, जातीयवाद, अंधश्रद्धा ही शैक्षणिक विश्वातही शिरली आहे. त्यामुळे अगोदरच अंधश्रद्धेच्या पोटी जन्मलेली दलित मुले–मुलीही डोळस व्हायला शैक्षणिक धोरण, आकृतीबंध अभ्यासक्रम पाठ्यपुस्तके ही मूलभूत जाणिवेतून निर्माण होणे गरजेचे आहे.

**– बी. व्ही. कांबळे**

कदेर, ता. उमरगा;

जि. उस्मानाबाद

●

# बातमी आणि मी

**– भीमराव शिरवाळे**

प्रत्येक पत्रकार हा थोड्याफार प्रमाणात कार्यकर्ता असतोच. निदान तो असावा असं मानणाऱ्यापैकी मी आहे. आपल्या वृत्तपत्रातील कोणत्याही प्रकारची बातमीदारी तो करीत असला तरी त्याचा जनतेशी सातत्याने संबंध येत असतो. मुळात त्यांच्या अंगी कार्यकर्तेपण थोडेफार असले तरी कालांतराने त्याचे कार्यकर्तेपण अधिक वाढत जाते. अर्थात केवळ कार्यकर्ता म्हणून वावरणेही पत्रकाराला शक्य नसते. कारण या व्यवसायाच्या मर्यादा पडतात. ज्या वृत्तपत्रासाठी तो काम करतो,त्या वृत्तपत्राच्या ध्येयधोरणाच्या मर्यादा त्याला असतात. या ध्येयधोरणाच्या चाकोरीत राहूनही तो आपल्यातील कार्यकर्त्याला क्रियाशील ठेऊ शकतो. पण निव्वळ सामाजिक कार्यकर्ता असणे आणि पत्रकार असणे या दोन भिन्न गोष्टी आहेत हे तितकेच खरे !

मी आज पत्रकार म्हणून समाजात वावरत असलो तरी पत्रकारिता ही मला अपघातानेच स्वीकारावी लागली. कस्टम, रिझर्व्ह बँक, एअर इंडिया इत्यादी ठिकाणच्या सरकारी नोकऱ्या केल्यानंतर एका अपरिहार्य परिस्थितीत मी पत्रकारितेकडे गरज म्हणून वळलो. गरज म्हणून मला अन्य नोकरी व्यवसायाकडेही वळता आले असते, पण तसे होऊ शकले नाही.

वरील ठिकाणी नोकऱ्या करीत असताना कथा, कवितेच्या रूपाने मी लेखन करीतच होतो व दलित साहित्यात कथाकार म्हणून थोडेफार नांव होते. दलित साहित्यिकाचा पिंड हा मुळात एका कार्यकर्त्याचाच पिंड असतो. म्हणून साहित्यातील, समाजातील व चळवळीतील थोडेफार कार्यकर्तेपण अंगवळणी पडले असल्यानेच या परिस्थितीत पत्रकारितेच मी आलो. फारसे सख्य नसले तरी आत्यंतिक दुरावाही नसलेले साहित्य व पत्रकारिता ही दोन भावंडे आहेत. आपल्या ठायी वसणारा थोडाफार साहित्यिक व कार्यकर्ता अशा वैचारिक ठेवणीमुळे माझे पाऊल पत्रकारितेकडे वळले. अन्य काही करताच येत नव्हते म्हणून पत्रकार झालो. हे असेही नव्हते. गरजेपोटी पत्रकारितीकडे वळलो असलो तरी आता ते केवळ जगण्याचे व पोटापाण्याचे साधन राहिले नाही, तर ती एक जीवनपद्धती आता बनली आहे आणि त्यातून सुटकाही जवळजवळ नाहीच.

सिनेमा कादंबऱ्यातून वावरणारा पत्रकार इतरांप्रमाणे मलाही प्रारंभी ग्लॅमरस असाच वाटत होता. कुठेही निर्भिडपणे जाऊन बातम्या मिळवणारा व त्या बातम्या छापून चोहीकडे खळबळ उडवून देणारा, समाजातील विसंगती ओळखून त्यावर तलवारीप्रमाणे लेखणी चालविणारा व दुर्जनाला सळो की पळो करून सोडणारा, ज्याला चोहीकडून न्याय नाकारला गेला आहे, अशा व्यक्तीच्या अन्यायाला वाचा फोडणारा व जेथे उणेपण दिसत असेल तेथे राजशा स्त्रीवाण्याने कुणाचाही मुलाहिजा न ठेवता टीकास्त्र सोडणारा... अशी काहीतरी प्रतिमा जनसामान्याच्या मनात पत्रकाराबद्दलची असते. ती तशी असणे यात काही गैर नाही, पण वस्तुस्थिती मात्र वेगळीच असते, हे प्रत्यक्ष या क्षेत्रात पाऊल ठेवल्यानंतर कळायला लागले !

पत्रकारितेतील अनुभवाची शिदोरी तशी माझ्या गाठीशी अल्प अशी आहे. मला पत्रकारिता सखोलपणे कळलीय, असाही दावा मी करणार नाही पण या क्षेत्रात आज मी जेथे उभा आहे तेथून पत्रकारितेच्या सर्व दालनांत प्रवेश करता येत नसला तरी ती दालनं निदान स्पष्टपणे दिसत आहेत. त्यांची खोली, लांबी, रुंदी, ऊंची लक्षात येत आहे.

विधीमंडळे, प्रशासन व न्यायव्यवस्था हे लोकशाही सरकारचे तीन स्तंभ, पण त्यातही न्यायालयांचे बाकीच्या दोन्हीवर वर्चस्व असते. परंतु पत्रकारिता हा चौथा स्वतंत्र स्तंभ असून तो बाकीच्या तिन्ही स्तंभांना आधार देतो व त्यांच्यावर अंकूशही ठेवतो, असे मानले गेले आहे.... पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण करताना असलं जड व भव्य दिव्य शिकविलं गेलं होतं व आजही थोर, मोठे तसे प्रतिपादन करीत असतात व आम्ही बिचारे पत्रकारही तशा त्यांच्या बातम्याही लिहीत असतो. या क्षेत्रात प्रत्यक्षात पाऊल ठेवल्यानंतर मात्र लक्षात येऊ लागते की कोणकोणावर नियंत्रण करीत आहे !

पत्रकारिता हे एक व्रत आहे, दिव्य आहे असं या क्षेत्रातील थोर मोठे सांगून गेले असले तरी आज व्रतस्थ पत्रकारिता कोठे आहे हाही शोध पत्रकारितेचा एक भाग होऊ शकेल अशी अवस्था प्राप्त झाली आहे. पत्रकाराला आणि बातमीदाराला आपल्या प्रत्येक बातमीसाठी आणि त्या बातमीतील प्रत्येक ओळीसाठी तडजोड करावी लागते.

नवख्या माणसाला या क्षेत्रात मान्यता मिळणे हे तर कठीण कर्म, पण त्यातली हा माणूस दलित असेल, तर पावलोपावली त्यांला सत्त्वपरीक्षेलाच सामोरे जावे लागते. आपल्या दलितपणाचं भांडवल करून या क्षेत्रातही फार अन्याय, अत्याचार सहन करावा लागतोच असं म्हणायला मी धजणार नाही. पण अनेक तडजोडी मात्र स्वीकाराव्या लागतात. तडजोडी तशा कोठे स्वीकाराव्या लागत नाहीत ? सर्व व्यवसायात, आणि नोकऱ्यांत त्या स्वीकाराव्याच लागतात, पण पत्रकाराला " ओपिनियर मेकर " वगैरे सारखी महनीय विशेषणे लावली जातात. त्यामुळे येथील तडजोडीला अधिक महत्त्व प्राप्त होते. या तडजोडी भावनेच्या, मनाच्या व बुद्धीच्याही पातळीवर अत्यंत जीवघेण्या असतात.

आज भ्रष्टाचार प्रत्येक क्षेत्रात बोकाळलेला आहे. त्याचं प्रमाण एवढं मोठं आणि सार्वजनिक झालेलं आहे की अनेक ठिकाणी तो होतोच हे सर्वांनी गृहीत धरलेले असते. परिस्थिती अशी निर्माण झाली आहे की शासनाने एका विशिष्ट मर्यादेपर्यंतचा भ्रष्टाचार आपल्या वेगवेगळ्या खात्यांतील व हुद्यावरील लोकांना ठरवून द्यावा ! हा भाग विनोदी व थोडा विपर्यस्त वाटत असला तरी त्याची प्रचीती पावलोपावली येते. भ्रष्टाचार करणारा व त्याला तो करायला लावणारा या दोघांनाही त्याचे काही वाटत नाही. भ्रष्टाचाराशिवाय, हात ओले केल्याशिवाय, हातावर चिरीमिरी ठेवल्याशिवाय आपले कोणतेच काम होणार नाही याची प्रत्येकाला जाणीव असते आणि त्यानुसारच तो आपल्या कामाला सुरुवात करतो.

सरकारी विभागातील सार्वजनिक बांधकाम खाते, महसूल, पाटबंधारे, सहकार, वगैरे ठिकाणी अशा अनंत आणि अनाकलनीय उलाढाली रोज घडत असतात. परंतु त्या फारशा लोकांच्या लक्षात येत नाहीत. लोकांच्या डोळ्यात चटकन भरतो तो पोलीस भ्रष्टाचार. पोलिसांशी सामान्य जनतेचा सातत्याने संबंध येत असतो व उघड्या डोळ्याने ते तो पाहात असतो. हातभट्टीचे धंदे, मटका, जुगार यांचे अड्डे, अनाधिकृत वेश्याव्यवसाय अशा अनेक गोष्टी राजरोसपणे चालू असतात. लोक ते पाहातही असतात. लोकांच्या विविष्ट गरजा भागविण्यासाठी तसेच राजकारण्यांच्या राजकारणात अडीनडीला हातभार लावण्यासाठी अशा धंद्यांची आवश्यकताही असते. निवडणुकांच्या वेळी लागणारा पैसा तसेच मोठ्या समारंभासाठी लागणाऱ्या देणग्या या उदारहस्ते मोठ्या धंदेवाल्या

दानशूरांकडून मिळत असतात. असे धंदे वाढविण्यात व त्यांना संरक्षण देण्यात कोणताही राजकीय पक्ष मागे नसतो. फक्त त्या त्या पक्षाच्या ताकदीनुसार राजकीय वजनानुसार हे प्रमाण कमीअधिक होत असते. निवडणूक व मोठे समारंभ अशावेळी राजकीय पक्ष अन्यथा इतरवेळी पोलीस असेच या वसुलीचे वेळापत्रक असते. पोलीस पैसा खात असला तरी त्याला या खात्यात येण्या अगोदर मोठे आर्थिक दिव्य करावे लागते. पैसा ओतल्याविना खांद्यावर म. पो. से. ( महाराष्ट्र पोलीस सेवा ) व दोन स्टार ही बिरुदे मिळविताच येत नाहीत. मग ओतलेला पैसा तो वसूल करतो व हे वसुलीचे चक्र मग अव्याहतपणे पुढे चालूच राहते. असं सर्वत्र बोलले जात असते. पोलीस सेवेत प्रवेश मिळविण्यासाठी जिवाचा असा आटापिटा करावा लागतो पण तो मिळल्यानंतरही "चांगलं कलेक्शन" असणारे पोलीस स्टेशन मिळावे म्हणून त्याला अनेक कसरती कराव्या लागतात. अशी बरकतीची पोलीस ठाणी पोलीस अधिकाऱ्यांना कशी दिली जातात हा तर भयानक प्रकार आहे. वरिष्ठ अधिकारी अशा पोलोस ठाण्यांचा फक्त जाहीर लिलावच करायचा राहतात असं काही पोलीस अधिकारीच हसून सांगतात.

अशा पोलीस ठाण्याला पोस्टिंग मिळण्यासाठी बदल्याच्या काळात गुप्तपणे भाव फुटतात. जो अधिक देईल व तेथील पोस्टिंगच्या काळात अधिक देण्याची बांधिलकी स्वीकारील त्याला असे पोलीस ठाणे मिळते. या गोष्टी आपल्या डोळयासमोर घडत असतात पण त्याला काहीही पुरावा नसतो.

पोलिसी भ्रष्टाचारातील सर्वांत किळसवाणा प्रकार म्हणजे ते वेश्यांकडून पैसे खातात. अनेक गजबजलेल्या ठिकाणी शेपन्नास रुपयांचे गिऱ्हाईक गाठून देहविक्रय करणाऱ्या वेश्या, या खरे म्हणजे अत्यंत गरीबीतील, हलाखीतील जीवन जगणाऱ्या व परिस्थितीचा बळी ठरून या मार्गाला लागलेल्या असतात. वेश्यांच्या श्रेणीतील अशा वेश्यांची श्रेणी ही खरोखरीच सडकछाप असते. परंतु त्यांच्या-कडूनही दिवसाकाठी १० रुपये उकळणारे पोलीस पाहिल्यानंतर या भाडखाऊपणाची किळसच नाही तर मनस्वी चीड येते. दिवसाकाठी येणारा अशा वेश्यांच्या भाडीचा हिशेब ठेवला जातो, एखाद्याकडे द्यायला पैसा नसेल अथवा ती देऊ शकत नसेल तर त्या बदल्यात तिच्या शरीराचा मोफत भोग घेतला जातो. एवढेच नव्हे तर आपल्या परिसरातील अशा वेश्यांच्या "मासिक पाळी"च्या तारखांची नोंद ठेवली जाते ( कारण या चार दिवसात त्या धंदा करू शकत नाहीत ) हे सर्व पाशवी व क्रूर वाटते. हातभट्टी, जुगार, मटकावाले ;यांच्याकडून घेतल्या जाणाऱ्या हप्त्यांचे एकावेळी कमीअधिक नीतिमत्तेच्या निकषावर समर्थनही होईल ( ? ) पण अशा शोषणाला काय म्हणावे ?

असं म्हटले जाते पोलीस दुनियेकडून पैसा खात असला असला तरी त्याच्याकडून पैसा खाणारा एक विभाग आहे आणि तो म्हणजे शासकीय

रुग्णालयातील न्यायवैद्यकशास्त्र म्हणजे 'डेड हाऊस' अथवा 'फोरन्सिक मेडिसिन विभाग!' आत्महत्या, खून बलात्कार आदी बाबी या विभागाच्या अखत्यारीत येतात एखाद्या मृत व्यक्तीने आत्महत्या केलीय की तिचा खून झालाय या निदानावर त्या केसची न्यायालयीन उभारणी व नंतरचा निकाल अवलंबून असतो.

'डेड हाऊसच्या' दरवाज्यावर एक भव्यदिव्य आणि पोएट्रिक फिलॉसॉफिकल वाटावे असे एक वचन लिहिलेले असते-" द लँग्वेज ऑफ द डेड इज डे सिफर्ड हिअर " याचा अर्थ असा की मृताची भाषा येथे ओळखली जाते. म्हणजे काय तर एखाद्या व्यक्तीचे निधन नेमके कशामुळे झाले हे त्याच्या शवचिकित्सेवरून व आपल्या वैद्यकीय ज्ञानाच्या मदतीने हे डॉक्टरलोक ओळखतात. अशावेळी पोलिस व हे डेडहौशी डॉक्टर संगनमताने खुनाची आत्महत्या व आत्महत्येचा खून करतात. मेलेला माणूस आपल्या मरणाने एकदा मेलेलाच असतो परंतु हे दुसऱ्यांदा त्याच्या पार्थिव देहाला "अबोल" करतात त्याच्या निष्प्राण देहाचा दुसऱ्यांदा गळा घोटतात. मेल्या मढ्याच्या टाळूवरील लोणी खाणारा माणूस आजतागायत तरी कोणाला भेटला नसेल पण डेडहौशी डॉक्टर त्याहीपेक्षा भयाण भेसूर आहेत.

यातून हजारोंच्या, लाखोंच्या उलाढाली होतात व परिणामी निर्दोषी दोषी होतो नर दोषी निर्दोषी बनतो. कारण बलात्कारित स्त्रीची तपासणी व नंतरचा निर्णय एखाद्याचे वय निश्चित करणे व मूल नेमकं कोणत्या पुरुषापासून जन्माला आलं आहे हे ठरविणे या सर्वच बाबतीत अनेक गैर प्रकार घडत असतात. पण याला पुरावा काहीही नसतो. कारण ही मंडळी इतकी तज्ज्ञ आहेत की कोणी तिर्‍हाईतराव व पत्रकारच काय पण या विषयात संशोधन करणारा एखादा संशोधकही माघार घेईल.

पुराव्याशिवाय काहीही सिद्ध होत नाही हे खरे असले तरी लोकमताला आणि लोकप्रवादालाही अगदीच नगण्य मानू नये असे वाटते.

समाजात वावरताना 'आपला पत्रकार' म्हणून दलित जनता आणि त्यातही विशेषकरून दलित कार्यकर्ते माझ्याकडे आशेने पहात असतात. आपली बातमी हमखास येणार व विस्ताराने येईल याविषयी ते निश्चित असतात. बरे दलित कार्यकर्त्यांचा उत्साह दांडगा तर असतोच, पण हॅन्डबिलमध्ये छापलेली ५-५० कार्यकर्त्यांची नांवे बातमीत छापून यावीत ही त्यांची मुख्य अपेक्षा असते.

पूर्वीच्या काळी (आणि आताही) थोडेफार लग्नपत्रिकेत सर्व भाषिकांच्या माणसांची नावे छापलेली असायची. नांवे टाकली नाही तर ते रुसायचे. लग्न-समारंभाचा विचका करायचे. तसा हा हॅन्डबिलाचा प्रकार बऱ्याचदा असतो आणि तीच अपेक्षा बातमीच्या बाबतीतही माझ्याकडून ठेवली जाते. अशी बातमी करणे मलाच काय पण कोणत्याही पत्रकाराला शक्य नसते. मग अशा 'एडिटेड' बातमीमुळे माझ्यावर आरोप होतो तो दलित राजकारणातील आमरण

गटबाजीचा. शिरवाळे अमक्या गटाचा आहे, तमक्याचा विरोधक आणि फलाण्या-बिलाण्याला समर्थक आहे असा !

अगदी अलीकडे घडलेली एक घटना सांगतो . . . समाज कल्याण मंत्री रामदास आठवले हे चळवळीतूनच मंत्रीपदी आले असल्याने व आपल्यालाही चळवळीचे थोडे अंग, निदान उपांग असल्याने ते माझेही अनेकांप्रमाणे मित्र आहेत. थोडीफार अधिक जवळीक असेल हाच तो काय वेगळा भाग.

रिपब्लिकन पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या सभेत त्यांचे भाषण असते. मुळात सभा उशीरा सुरू झालेली व त्यात वक्ते भाराभर. हा कार्यक्रम बातमीसाठी माझ्याकडे असतो.

बातमीदारीच्या प्रचलित दंडकाप्रमाणे मुख्य पाहुणे,वक्ते यांच्या भाषणाचीच बातमी होते. या सभेत इतर वक्त्यांचीच भाषणे वक्तृत्व स्पर्धेप्रमाणे चालली होती. रामदासाचे भाषण होत नव्हते. रात्रही वाढत चालली होती आणि अजून बरेच वक्ते बोलायचे होते जसजसा वेळ वाढत चालला होता तसतसा माझा जीव खालीवर होत होता. बातमी वेळेत जाणे आवश्यक होते. रामदासला मी चिठ्ठी लिहून ही अडचण सांगतली. त्यानेही माझी मागणी मान्य केली आणि सभेतील लोकांना आपले विचार ऐकविले. माझा जीव भांड्यात पडला. बातमी मिळाली व झोळी बंदखोटीला मारून मी तडक प्रेसवर आलो.

पण दुसऱ्या दिवशी घडायचे तेच किंवा न घडायचे ते झाले. ती बातमी पेपरला लागली नाही. त्या बातमीला योग्य जागा मिळाली नाही किंवा जागा मिळाली नाही म्हणून माझ्या पेपरातून ती बातमी दुसऱ्या दिवशी गायब झाली होती पण अन्य एकदोन पेपरातून आली होती. अन्य वक्त्याअगोदर रामदासचे भाषण झाल्याने त्याच्या भाषणानंतर सभा आपोआपच बरखास्त झाली होती. बरे हे होण्यास कारणीभूत मी झालो होतो अन् बातमी वर आली नव्हती. कार्यकर्त्यांनी मला जो बोल लावायचा तोच लावला, "काय राव, तुझ्यामुळे आम्हाला सभा लवकर आटपावी लागली. हेवढं होवून बातमी पन नाही. नुसताच पत्रकार म्हणून रुबाब! कसं घडलं अथवा का घडलं असे हे त्या कार्यकर्त्यांना समजण्यापलीकडचे असते. त्यात त्यांचा दोषही नसतो. तेव्हापासून मी मात्र पक्क केले की दलितांचा कोणताही कार्यक्रम आपण आपल्याकडे घ्यायचा नाही !

समाजात वावरतांना दुसरा एक प्रश्न परत सातत्याने विचारला जातो. त्या प्रश्नात थोडा विनोद, थोडे आश्चर्य व कधी कधी दुःखही असते. तू 'केसरी' मध्ये कसा काय ? . . . . असा प्रश्न विचारणारे केवळ दलितच नाहीत, तर दलितेतरही असतात. 'कांय ओ नकली जानवं घालून जाता का ?' नाही तरी शिरवाळे नावावरून तुमच्या जातीचा बोध होत नाही. कांबळे, वाघमारे असल्यावर वेगळी गोष्ट असते ! 'केसरी'चं कुंकू कपाळाला लावून फिरताना दलित थोड्याफार

कौतुकाने पाहतात. तर इतर मात्र 'आयला, केसरीत रिझर्वेशन बिझर्वेशन आहे की काय' असे भाव न बोलता व्यक्त करतात.

हे झाले आम जनतेबाबत, परंतु चौथा स्तंभ म्हणून संबोधला गेलेला व निरक्षराकडे पृथक दृष्टीने पाहणारा तथाकथित जाणकार आणि जाणीवकार पत्रकार मात्र सामान्य जनापेक्षाही सामान्य असल्याचे अनेकदा जाणवते. सर्वजण सारखेच असतात असे नाही, पण जे आहेत त्यांच्यामुळे सत्य बदलू शकत नाही. व्यवसायातील तांत्रिक ज्ञानाच्या दृष्टीने हे पत्रकार महनीय असतीलही परंतु त्यांची जीवनाकडे आणि माणसाकडे पाहण्याची दृष्टी नुसती असामान्यत्व लाभावी इतकी हिणकस आणि हलकट असते. असे पत्रकार असतात थोडेच, परंतु तेच इतरांवर रुबाब गाजवीत असतात. पुढारी म्हणून मिरवतात व इतर पत्रकारांना दिशादर्शनाचे काम करतात. अशांची संख्या कमी असली तरी महत्त्व त्यांनाच येते व इमानदारीने पत्रकारिता करणारे बिचारे गौण किंबहुना नगण्यही ठरतात !

कोणाला मोठे करायचे, कोणाला छोटे करायचे आणि कोणाला नामशेष करायचे हे काम एरवी पत्रकार संबंधित व्यक्तीच्या गुणवत्तेनुसार करीतही असतो, नाही असे नाही. परंतु बऱ्याचदा या अभियानात अनेक गुणवंत पत्रकार आपले कसबही पणाला लावतात. अमुक एक व्यक्ती, संस्था संघटना अथवा पक्ष अशी अशी आहे म्हणून तिच्यावर आपल्या लेखणीतून शिक्कामोर्तब करतात आणि मग त्याचे सार्वत्रिकरण नाईलाजाने इतर पत्रकारांच्या बाबतीतही होते. एखादा अ ब क ड वाईट आहे हे एकदा छापले गेले की येणाऱ्याच्या कामात त्याचे वाईटपण हे गृहीतच धरावे लागते. ते वाईटपण गृहीत धरूनच पुन्हाः पुन्हा त्या व्यक्तीविषयी लिहिले जाते. मग अशा वाईटापेक्षा कितीतरी वाईट व्यक्ती समाजामध्ये उजळ माथ्याने वावरत असतात. थोर मोठे म्हणून आरवत मिरवत असतात. परंतु त्यांच्यावर आमच्यातील काही दिग्गजांची कृपादृष्टी असते ( किंवा असे म्हणता येईल की आमच्यातील काही जणावर अशांचीच कृपादृष्टी असते. )

आणि त्यामुळे करून सवरून नामानिराळे असणाऱ्या या व्यक्तीबद्दल काही वाईट छापले जाऊ शकत नाही . . . आमच्याही मनात कधी कधी येते की अशांबद्दल काही लिहावे, छापून आणावे पर्दाफाश वगैरे करावा पण हे छापणार कोण आणि कसे ?

खरे म्हणजे अनेकांच्या खांद्यावरील ओझे विनाकारण आपण आपल्या खांद्यावर वागवित असतो. खांदा मोडला तरी बेहत्तर पण ' तुझे ओझे किती चांगले ' असे गीत गातच पुढे जावे लागते.

आंबेडकरी तत्त्वज्ञानाची दृश्य परिणती म्हणजे आज महाराष्ट्रात शिकून सवरून शहाणी झालेली दलितांतील पिढी. ही पिढी पुस्तकी ज्ञानाने शहाणी असेलही परंतु त्यात आत्मकेंद्री वृत्तीचा व मध्यमवर्गीय जीवनपद्धतीचाच प्रभाव

अधिक दिसतो. दलित तरुण हा समाजात वावरत असल्याने व त्याला दलितांच्या चळवळीच्या चढउताराचे भान असल्याने तो सतत सावध व प्रसंगी आक्रमकही असतो. तो जेथे असतो तेथे त्याच्या जोडीला त्याच्यासारखे इतर बरेचजण असतात· परंतु पत्रकारिता हे क्षेत्र मात्र तसे नाही. दलित म्हणूनच एखादे दु:ख जेव्हा जाणिवेच्या भावनेच्या पातळीवर अथवा प्रत्यक्षात माझ्या वाट्याला येते तेव्हा फार एकाकी वाटते. एकतर दलितांची पत्रे नाहीत, जी आहेत ती वृत्तपत्रे नाहीत तर मतपत्रे आहेत व इतरांना कोणाला त्यात सामावून घेणे त्याच्या चालकाला, मालकाला परवडणारे नसते. मग पत्रकारिता करण्याची खाज जिरवायची असेल तर जिथे जिरवायला मिळते तेथेच जिरवावी लागते.

एखाद्या सरकारी कार्यालयात, बँकेत काम करणारा माणूस कार्यालयात काही बिनसल्यास घरी येऊन आपल्या पत्नीला, घरच्यांना सांगू शकतो. आपल्या मनाचा भार हलका करू शकतो. बायकोही नोकरी करणारी असेल तर तिलाही नवऱ्याच्या दु:खाची थोडीफार कल्पना असते. पण पत्रकारिता ही फुकटची फौजदारी. हाती शस्त्र नाही पण मशीनगनवाल्यालाही भीती घालणार. खिशात दमडी नसली तरी टाटा बिर्लाचं माप काढणार. बातमी मिळवण्यासाठी केलेला आटापिटा आणि बातमी छापून आल्यानंतरही डोक्यावर येणारे टेन्शन असं सदान सदा टेन्शनखालीच वावरावं लागतं. ऑफिसातून सुटणारा नवरा वाकडी वाट करून बाजारात जातो. तेथून भाजीपाला, पोरांना खाऊ व फुलांचा गजरा घेऊन येतो हे सामान्यत: मध्यमवर्गीय नवरेपण स्त्रीला अपेक्षित असते.

अगोदरच्या नोकऱ्यात असे नवरेपण मी जतन करीत आलेलो असल्याने या नोकरीतही तेच करावे अशी रास्त ( तिच्या दृष्टीने ) अपेक्षा बायको करीत असते. येथे तर सातत्याने पळावे लागते. कुत्रे मागे लागल्याप्रमाणे, तेही पिसाळलेले कामाच्या वेळा, कामाचे ( म्हणजे बातम्यांचे ) ठिकाण, बातम्यांचे सोर्सेस सारखे बदलत असतात. त्यामुळे चोहोकडे असून कुठेच नाही व कुठेच नसला तरी चोहोकडे अशी अशी या पत्रकाराची अवस्था होते. अर्ध्या रात्रीच्या सुमाराला घराकडे परतावे. तेव्हा भाजीविकेही नसतात आणि गजरेवाले तर एक शेवटचा गजरा घेऊन गायब झालेले असतात !

सुटीच्या दिवशी पोरांबाळासह जरा बाहेर पडणे, रविवारी टी. व्ही. वरचा भंगार सिनेमा पाहात निर्हेतूकपणे हसणे, उसासे टाकणे व प्रसंगी अश्रूही गाळणे यातले काही म्हणता काही जमत नाही. श्रीदेवी, सलमान आणि अमीरखान या लोकांचा, दीक्षितांच्या माधुरीचा सिनेमा त्या दिवशी असेल तर घरात कसं सणासुदीचं वातावरण असते. त्याचक्षणी आपल्या डोक्यात हमाल पंचायतीचा एखादा बाबा आढाव किंवा दक्षिण अफ्रिकेतला कोणी एक नेल्सन मंडेला अथवा जेलभरो, तेलभरो आंदोलन वगैरे असते. त्यामुळे साहजिकच "तुमचं घरात लक्ष

निबंध ३४३६ २६३९६ २०/५/७

नाही, तुमच्यात आता ती रसिकता उरलेली नाही. आता तुम्ही फार बदलले आहात'' वगैरे वगैरे सारखे भाष्य प्रिय पत्नीच्या तोंडून सातत्याने ऐकावे लागते.

कितीही खपून एखादी बातमी बनविली तरी वरिष्ठांना ती त्रुटीपूर्ण वाटते, तसं घरादारासाठी कितीही खपलं तरी " हल्ली तुमचं लक्ष नाही " चा आरोप येतो . . . म्हणजे अजबच आहे की नाही हे पत्रकारी जिणं !

तू पण वडिलांप्रमाणे पत्रकारितेकडे न वळता अभिनयाकडे का वळलास ? असा प्रश्न मी एकदा अभिनेता मोहन गोखलेला विचारला होता. "पत्रकार'' म्हणून त्यांनी काय त्रास सहन केला. काय काय तडजोडी स्वीकारल्या व खस्ता खाल्ल्या हे मी पाहिले होते. तेव्हाच मी ठरविले होते काहीही व्हायचे पण पत्रकार नाही'' हे मोहन गोखलेचे अधिकार उद्‌गार म्हणूनच मला अर्थपूर्ण व अविस्मरणीय वाटतात. तरी नशीब, माझा मुलगा अद्याप असं काही बोलला नाही !

माझी पत्नी मीनाक्षी ही एका बँकेत नोकरी करते. तिच्या ऑफिसातील बाया त्यांचे दागिने, साड्या, नवीन गाड्या, फर्निचर याबद्दल काहीबाही सतत सांगत असते. एम्ब्रॉयडरी, मेंहदी, पाकशास्त्र, योगासने असल्या काही अप्रस्तुत क्लासेस बद्दलही ती बोलत असते. तिने कसला काही विषय काढणे म्हणजे भयप्रद वाटते. देशातील पेचप्रसंग, मंडल आयोगाने उठलेले वादळ, पुण्यात वाढलेली गुन्हेगारी, निदान आपल्या कॉलनीतील नागरी सुविधांचा अभाव या विषयावर अथवा काहीच नसले तर निदान वीज मंडळाच्या गलथान कारभारावर तिने एखादे वाक्य बोलावे असे आपल्याला वाटते.

पण तसं कधीच होत नाही. यात तिचा दोषही नसतो व हे तिच्या आकलनाच्या पलीकडचे असते. आपल्यालाही त्याचे संपूर्ण आकलन झालेले असते असेही नसते पण त्याच्याशी संबंधीत शब्दांच्या चक्रवातात आपण सतत गरगरत असतो आणि गरगरण्यातील भोवळ नशा अनुभवत असतो ? एवढाच तो काय फरक !

माझे दोन भाऊ शंकर आणि मधुकर हेही बँकातून नोकरी करतात व मी स्वत:देखील रिझर्व्ह बँकेसारख्या ठिकाणी सुमारे आठ वर्षे नोकरी केली असल्याने नोकरीवर सकाळी वेळेवर जाणे व वेळेवर घरी येणे या गोष्टी आई वडील व इतर नातेवाईकांना सवयीच्या होत्या. या नोकरीतील भलत्या वेळी जाणे व भलत्या वेळी घरी येणे तसेच बातमीसाठी सभासंमेलनांसाठी व पत्रकार परिषदांसाठी गावभर भटकावे लागणे यामुळे अनेकांना असे वाटते मी बेकार असावा !

नोकरीवर असणारा माणूस असा उगीच थोडाच भटकू शकतो, यावर अनेकांचा विश्वास नसतो. यामुळे समाजात अथवा कुठेतरी पक्षसंघटनात कार्यकर्ते• पण करीत फिरत असावा असे अनेकांना वाटते. ते त्यांचे वाटणे मी त्यांच्या मनातून घालवूही शकत नाही, मी नेमका काय करतो हे समजावून देऊही शकत नाही.

यावरूनच आठवलं म्हणून सांगावसं वाटतं. मी एअर इंडियात फ्लाईट पर्सर म्हणून नोकरीला सुरुवात केली तेव्हाचा तो प्रसंग आहे. माझे वयोवृद्ध आजोबा गेबी रघुनाथ शिरवाळे हे तेव्हा मुंबईत माझ्याकडे होते. रिझर्व्ह बँकेत नोकरीवर सकाळी निघायचो तेव्हा आजोबा सकाळी मला पानाचा विडा करून देत असत. मलाही सकाळी नाश्ता केल्यानंतर आजोबांनी दिलेलं ते साधं पान तोंडात चघळायला बरे वाटायचे. एअर इंडियात वरील नोकरीवर रुजू झाल्यानंतर सुरुवातीला काही काळ सांताक्रूझ येथे आम्हाला ट्रेनिंग दिलं जात होतं. सकाळी जाऊन संध्याकाळी परतून येणे अशीच या ट्रेनिंगची वेळ असायची.

नोकरी बदलली तसं वातावरण बदललं. तेथील नियम व शिस्तही बदलली. पान खाऊन रंगल्या तोंडाने अथवा रंगल्या दातांनी ट्रेनिंग सेंटरमध्ये पाऊल ठेवता येत नव्हते. एकवार तसं केल्याबद्दल मला ट्रेनिंग सेंटरच्या डायरेक्टरकडून तंबीही मिळाली होती.

आजोबा तेव्हा दम्याने आजारी होते व मधल्या काळात तो आजार थोडा अधिक बळावला होता. ट्रेनिंग नीटपणे सुरू झाले व एक दिवस मी आजोबांना सांगितले तिथं असं पान खाऊन जाता येत नाही. तुम्ही पान देत जाऊ नका आजपासून. मला कल्पना नव्हती पण म्हाताऱ्याला या गोष्टीचं फार वाईट वाटलं. ते आजारी असल्याने त्यांच्या हातचं पान खाणे घाणेरडे आहे असं मला वाटल्याचा त्यांचा समज झाला. तिथे पान खाणे हे नियमबाह्य का असते हे मी त्यांना पटवून देऊ शकलो नाही !

माझं ट्रेनिंग संपलं आणि माझ्या फ्लाईंग ड्युटीला सुरुवात झाली. म्हाताऱ्याने विमान फक्त आकाशातच पाहिलेले. विमानात बसून आकाशात भरारी मारणारी माणसं ही कशी असतील याबाबत त्यांच्या अनेक कल्पना मी लहानपणी ऐकलेल्या असतात. मी स्वत: फ्लाईट पर्सर झाल्यावर त्यांना आनंद तर झालाच पण दु:खही वाटले. कारण विमानाचा अपघात होईल, ते कुठेतरी कोसळेल व मी संपून जाईल ही त्यांची निरागस भीती. तशी भीती थोडीफार मला स्वत:लाही वाटायची, नाही असे नाही, पण त्या जीवनाचा स्वीकार स्वेच्छेनेच केला होता !

या अगोदर फक्त एकदाच विमान प्रवास मी केलेला असतो आणि तो इंडियन एअरलाईन्सच्या अॅव्हरो निव्हरोसारख्या डबडा विमानातून. ट्रेनिंग संपलं, रीतसरपणे सर्व सोपस्कार आटोपले आणि मला पहिलं वहिलं फ्लाईट मिळाले ते मुंबई–लंडन असं. माझ्याही पोटात धस्सं झालं होतं. म्हाताऱ्याला मी सांगितलं आज रात्री विलायतेला चाललो आहे.

विलायत हे आगळं वेगळं जग असून तेथे फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरच शिकण्यासाठी गेले होते, एवढे आजोबांनी कुठूनतरी ऐकलेलं असतं. त्यांना दु:ख-मिश्रित आनंद होतो. शेवटी ती घडीही जवळ येऊन ठेपते. नवी नवलाई माझ्या

अंगावर भरलेली असते. आनंद, आदर्श. दुःख कुतूहल, उत्सुकता भीती अशा सर्वच संमिश्र अशा भावभावनांनी माझ्या अंतःकरणात कल्लोळ केलेला असतो.

एअर इंडियाची गाडी मला नेण्यासाठी घरी येते. फ्लाईट पर्सरचा तो पायलटछाप गणवेश मी अंगावर चढवितो व विलायत प्रयाणाला निघण्यापूर्वी आजोबांच्या पायाला स्पर्श करतो. म्हाताऱ्याचा कंठ भरून आलेला असतो. त्याच्या थिजलेल्या बुबुळांतून सुरकुतलेल्या गालावर अश्रू ओघळतात व थरथरत्या ओठाने ते माझा मुका घेतात ( टोणगा झालो असलो तरी ते माझा मुका घेत असत ) व पाठीवरून हात फिरवीत उद्गारतात, " जा बाबा, यशवंत हो ! "

" देवाचं नाव घेऊन इवाइनात पह्यला उजवा पाय टाक ! देव तुला यश देईल !"भरल्या गळ्याने निरोप घेताना मी त्यांना विचारले, "तुम्हाला लंडनहून काय आणू ?"

" काय नकू,दम्यासाठी चांगलं औषध आन. पालकुटचा पटका घेऊन यी !" औषधाचं ठीकच होतं परंतु आजोबांनी मला लंडनहून पालकोटचा फेटा आणायला सांगितला होता. काय म्हणावे या निरागसतेला ? (की अज्ञानाला)

रोमच्या लिओ नार्डी या व्हिंची व लंडनच्या हिथ्रो विमानतळाला माझे पाऊल लागले तरी मी पालकोटच्या फेटाच्या या कोड्यातून स्वतःची सुटका करून घेऊन शकलो नाही.

खरं म्हणजे इतकी वर्षे झाली तरी ते कोडे मला अजूनही सुटलेले नाही. ( लंडनला लालबाग, परळ अथवा दादर, कुर्ला नव्हतंच मग मी तेथून असा फेटा आणणार कसा) नंतर आजोबा फार कमी काळ ठिकले व त्यांचा त्या आजारातच वयाच्या सुमारे नव्वदाव्या वर्षी अंत झाला. या ना त्या कारणाने मुंबईत फेट्याच्या दुकानात जाऊन परत त्यांना तो फेटा घेऊन देणे जमले नाही. ते गेले तेव्हा मी दूरदेशी असाच कुठेतरी जपान, हाँगकाँगला होतो. नंतर एअर इंडिया सुटलं व आज पत्रकारिता पत्करली तरी आजोबांच्या त्या फेटयाचं दुःख मला विसरू म्हणल्याने विसरता येत नाही !

कार्यकर्तेपण आजही माझ्या रोमारोमात भिनले असले तरी पुढारीपण मात्र मला कधी जमले नाही व येणाऱ्या जीवनातही कधी जमणार नाही ! आजच्या दलित कार्यकर्त्यांची मनोवस्था अशी असते की कार्यकर्ता म्हणून थोडाफार सिनियर झाला की तो स्वतःला पुढारी मानू लागतो. मानो वापडा, पण ते मला जमत नाही. आंबेडकर जयंती, पुण्यतिथी, बुद्धजयंती, धम्मचक्र प्रवर्तनदिन अशा प्रसंगी दलित कार्यकर्ते मला मुद्दाम बोलवितात ( बातमी छापून यावी हे ही एक कारण असतेच)व भाषणाचा आग्रह धरतात. न जपलेल्या पुढारीपणाप्रमाणे भाषणबाजीही मला कधी आयुष्यात जमली नाही. चांगला फर्डा वक्ता स्टेजवर बोलायला लागला

म्हणजे मला आतून गलबलून येते, अंगावर रोमांच उभे राहतात व प्रसंगी माझ्या गळ्यात हुंदकाही दाटून येतो. त्याला अन्यही प्रासंगिक कारणे असतात पण आपल्याला भाषण जमत नाही ही रखरुखही, विषादही मनात त्या क्षणी कार्यरत होत असावा. अनेक पत्रकार इतकी भाषणे ठोकतात, मी का भाषण करीत नाही यावरून मी आखडू आहे किंवा त्यांच्यात मी मिक्सअप् होऊ इच्छित नाही असे गैरसमज ते मजविषयी करून घेतात, पण प्रत्यक्षात कारण काय आहे हे माझा मी जाणो !

घरगुती पातळीवर या व्यवसायातून अजून एक समस्या बऱ्याचदा निर्माण होते. पुरुष कार्यकर्त्याबरोबर अनेक महिला कार्यकर्त्याही सातत्याने संपर्कात येत असतात. ज्या आघाडीच्या कार्यकर्त्या आहेत त्यांच्या बातम्या छापून येतच असतात पण अन्य व छोटया महिला कार्यकर्त्यांची नावे बातमीत येतीलच असे काही नाही. बरे या छोटया कार्यकर्त्यांचा उत्साह अधिक दांडगा.त्यांचे वयही आघाडीच्या स्त्रियां-पेक्षा लहानच असते. ( आणि हे तर अधिकच वाईट ) बातमीत नाव यावे म्हणून जवळीक साधणे, नाव, पत्ता देणे व कधी चिठ्ठी,चपाटी लिहिणे इथपर्यंत हा उत्साह जाऊन पोहचतो.अशाच एका कार्यकर्त्याने लिहिलेल्या चिठ्ठीमुळे घरात बाका प्रसंग उभा राहिला होता. त्या चिठ्ठीचा ' तसा ' काहीही अर्थ नाही हे पटवूनही पटत नाही तेव्हा पत्रकारिताच काय पण जीवही नकोसा होतो.

हे झाले सामान्य स्त्रीच्या बाबतीत. परंतु, या पत्रकारितेमुळे अंगी असामान्य कर्तृत्व व मोठे नाव असणाऱ्याही काही स्त्रियांचे जवळून संबंध आले. यातील काही स्त्रिया देशभर गाजलेल्या तर काहींनी इव्हन आंतरराष्ट्रीय ख्याती मिळविली आहे अशा स्त्रियांबरोबर काढलेले फोटो, त्यांचे आलेले पत्र म्हणजे घरी संशोधनाचा विषय. अशा स्त्रियांच्याबाबतीतही प्रिय पत्नी संशय घेण्याचे सोडीत नाही. तिने तसा संशय घेतल्यावर मनातून थोडे बरेही वाटत असते. तिचा संशय खरा व्हावा असेही मनात कुठेतरी असते पण एवढं थोर भाग्य थोडेच आपले असते! (आता हे वाचूनही गहजबच होईल पण निदान आत्मकथनात खरं बोलायला काय हरकत आहे ?)

**– भीमराव शिरवाळे**
२४/५ राणाकपूर दर्शन,
सर्व्हे नं. १११/१, आनंदी रोड, येरवडा
पुणे–४११ ००६

# चळवळ व मी

– रमेश जाधव

मला आठवतं १९८१ साली मी कोल्हापूरात राजर्षी शाहू महाविद्यालयात प्रवेश घेतला त्यावेळी मी स्वत च्याच भावी विश्वात रमणारा एक माणूस होतो. त्यावेळी प्राचार्य स्वामी हे शाहू कॉलेजचे प्राचार्य होते. म्हणावयाला हे कॉलेज शाहूंचा, कर्मवीरांचा वारसा सांगणारं, पण इथल्या वसतिगृहात स्थापनेपासून मला वाटतं वसतिगृहाच्या खोल्यांनी ' दिवा ' हा प्रकारच पाहिला नव्हता. मात्र विद्यार्थ्यांना स्वावलंबन आणि पुरोगामित्वाचे धडे दाभोळे, मेडेकर अशा प्राध्यापकांच्याकडून मिळत होते. पण ही सारी कोरडी सहानुभूतीच वाटावी अशी परिस्थिती मी १९८१ व १९८२ पर्यंत अनुभवली ' सुहास निर्मळे ' नावाचा एक बंडखोर विद्यार्थी या वसतिगृहात राहत होता. परंतु जेवणाचा निकृष्ट दर्जा, अंधाऱ्या खोल्या या संदर्भात काही हालचाल त्याच्याकडून होत नव्हती. नाही म्हणयला नंदकुमार ढोबळे ( शाहू ) नावाचा एक विद्यार्थी अधूनमधून जेवण चांगलं मिळावं म्हणून प्रयत्न करीत होता. यामुळे या वसतिगृहातील सर्वच मुलांसाठी काहीतरी करावं असं मला वाटत होतं. परंतु मी वसतिगृहात रहात नसल्यामुळं मला परिस्थितीचं आकलन होत नव्हतं. म्हणून असेल किंवा शहरी वातावरणात वाढल्यामुळं परिस्थितीचं गांभीर्य लक्षात आलं नसल्यामुळं असेल पण

मी काही करू शकलो नाही. मात्र १९८३ साली बी. ए. फायनलला अॅडमिशन घेतले आणि इथूनच माझ्या सामाजिक जीवनाला सुरुवात झाली.

**प्रत्यक्ष चळवळीला सुरुवात**

हॉस्टेलला प्रवेश घेतला आणि तेथील विद्यार्थ्यांची अगतिकता लक्षात आली जेवण किंवा इतर बाबतीत तक्रार करणाऱ्या विद्यार्थ्यांना हॉस्टेल सोडण्यास सांगण्यात येत असे. मी सर्वप्रथम खोलीत उजेड यावा यासाठी प्रयत्न केला. त्यासाठी अ. भा. वि. प.शी संधान बांधलं.मात्र त्यांच्याकडून अपेक्षित सहकार्य मिळालं नाही. मग वसतिगृहातील विद्यार्थ्यांनाच संघटित केलं म्हणण्यापेक्षा त्यांना भडकावलंच म्हणा. यावेळी इंग्रजीचे विभाग प्रमुख डॉ. सूर्यवंशी प्राचार्य होते. विद्यार्थ्यांच्या खोलीमध्ये विजेचे दिवे लावावेत अशी त्यांना विनंती केली पण विनंतीच ती. विद्यार्थ्यांत बी. सी. व ओ. बी. सी. असे गट पाडण्याचा प्रयत्न कॉलेजचे रेक्टर (निवासी) प्रा.आनंदराव जाधव (सध्या हयात नाहीत) यांनी केले.पण बी.सी.विद्यार्थी ठामपणे माझ्या बाजूला उभे राहिले. ओ. बी. सी. पैकी भानू गौडांडकर, घालगडे वगैरे विद्यार्थी आमच्या बाजूला राहिले. कॉलेजचे जी. एस. सर्जेराव चोकाककर यांचेही सहकार्य मिळाले. विद्यार्थ्यांच्या सभेत एकीमुळे वसतिगृह कमिटीला माघार घ्यावी लागली. दुसऱ्या सत्रात प्रत्येक खोलीमध्ये बल्बची सोय झाली. मला उत्साह आला. याचा परिणाम असा झाला की विद्यार्थ्यांवर माझा प्रभाव पडला.

याचवेळी कर्नाटकातील विद्यार्थ्यांना इतर विद्यार्थ्यांप्रमाणे दिवाळीपूर्वी स्कॉलरशीपचा हप्ता मिळावा म्हणून प्रयत्न केला प्राचार्यांनी कॉलेज फंडमधून २०० ते २५० रुपये विद्यार्थ्याला दिले. त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांचंही नेतृत्व नकळत माझ्याकडे आलं. या घटनांचा बाहेरही बराच गाजावाजा झाला. कोल्हापूर जिल्हा मास मुव्हमेंटच्या कार्यकर्त्यांनी आमच्याशी संपर्क साधला. त्यांच्या मदतीने खऱ्या अर्थाने जिल्हा पातळीवर मागासवर्गीय विद्यार्थी संघटना काढण्याचे प्रयत्न सुरू झाले. प्रा. अंबपकर, आर. बी. कांबळेसारख्या कार्यकर्त्यांच्या मदतीने 'स्टुडंटस् मुव्हमेंट'ची स्थापना जानेवारी/फेब्रुवारी १९८३ मध्ये केली. आयु. अशोक हातकणंगलेकर, गौतम कांबळे, आनंद कांबळे (बोरगांव), नंदकुमार ढोबळे इत्यादी कार्यकर्त्यांच्या बहुमोल सहकार्याने विद्यार्थीबंधूंच्या भेटी, बैठका सुरू केल्या. रात्री १० नंतर शहरातील वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भेटणे सुरू झाले. सुरुवातीला विद्यार्थी आम्हाला बघून झोपेचे सोंग करायचे. 'खुळा जाधव आला' असे म्हणायचे. पण मी संयम सोडला नाही. शहाजी कॉलेज, महावीर कॉलेज, शाहू कॉलेज अशा वसतिगृहातील विद्यार्थ्यांना संघटित केले. आमच्या संयमाचे फळ आम्हाला मिळाले. मला पाहून पांगणारे विद्यार्थी मी येताच स्वतःहून इतर विद्यार्थ्यांना जागे करून एकत्रित करण्यास सहकार्य करू लागले. आणि एक दिवस पहिला जाहीर कार्यक्रम (स्टुडंट्स मुव्हमेंटचा) ठरला.

## स्टुडंट्स मुव्हमेंटचा पहिला जाहीर कार्यक्रम

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बाळासाहेब देवरस यांनी राखीवतेच्या विरोधात काही वक्तव्य केल्याचं याच वेळी वाचण्यात आलं. ( दरम्यान संघटनेच्या अध्यक्षपदी माझीच निवड झाली होती. ) जानेवारी/फेब्रुवारी मध्ये देवरसांचा कोल्हापूरच्या ऐतिहासिक बिंदू चौकात व्याख्यानाचा कार्यक्रम जाहीर झाला होता. या कार्यक्रमाच्या वेळी त्यांच्या जाहीर निषेध करण्याचे आम्ही ठरविले. " स्टुडंट्स मुव्हमेंट "च्या वतीने जाहीर निषेधाचा फलक बिंदू चौकात लावला. निषेधासाठी सुमारे ६०–७० विद्यार्थी ( फक्त शाहू कॉलेजचे ) निघाले. पण वाटेत त्यातले बहुतांश गळाले. विशेषतः सिनियर विद्यार्थी बापुसो ऐवाळे यांनी विद्यार्थ्यांमध्ये भीती निर्माण केली. परंतु ११ वी १२ वी चे १५/२० विद्यार्थी सोबत घेऊन मी स्वतः, ढोबळे, गौतम कांबळे,आनंदा कांबळे असे सर्व मिळून बिंदू चौकात पोहोचलो. परंतु तिथे गेल्यानंतर समजले की देवरसांची जाहीरसभा रद्द केली असून पद्माराजे गर्ल्स हायस्कूलच्या प्रांगणात खाजगी सभा घेण्यात येणार आहे. सभा खाजगी असल्यामुळे आम्ही निषेध करणे गैर आहे असं अ. भा. वि. प. चे चंद्रकांत पंढरपूरकर यांनी सुचविलं. अर्थात आमचा उद्देश सफल झाला होताच. हा एक नवाच आनंददायी अनुभव होता. ज्या ज्युनिअरच्या विद्यार्थ्यांनी अटक करून घ्यायची तयारी दाखविली त्याच्यामध्ये रमेश चिखले, राजकुमार कांबळे, विष्णू भास्कर इत्यादी विद्यार्थी होते. या विद्यार्थ्यांनी नंतरच्या काळातही फार मोलाची साथ दिली. या घटनेमुळे एक नवा उत्साह, एक नवा आत्मविश्वास माझ्यामध्ये निर्माण झाला. खरंतर इथूनच चळवळीत स्वतःला झोकून देण्याची प्रेरणा निर्माण झाली. मी आणि अशोक हातकणंगलेकर दोघांनी यापुढे जोरदार संघटना बांधण्याचा निश्चय केला. मास मुव्हमेंटचे आर. बी. कांबळेंनी आम्हा सर्वांचेच अभिनंदन केले. या घटनेचे पडसाद कोल्हापूरच्याही बाहेर गेले असं नंतर समजले आणि दहाबारा दिवसांतच त्याचं प्रत्यंतरही मला आलं.

प्रा. अंबपकर यांनी आम्हाला घटना ( संघटनेची ) लिहिण्यास सांगितली. सहकार्यांशी चर्चा करून मी एक आठ पानी घटना ( नियमावली ) तयार केली. राज्य स्तरावर कार्यरत होता यावे असा या पाठीमागे मुख्य उद्देश होता. मा. मु. चे संस्थापक व गाढे बौद्धविद्वान आयु. राजा ढाले यांच्याकडे मुंबईला स्टुडंटस् मुव्हमेंटची घटना पाठविली. नंतर त्या घटनेत बराचसा पण अत्यंत योग्य असा बदल राजा ढालेनी केला आहे, असं अंबपकर स्वतःच मला म्हणाले होते. दरम्यान १४ एप्रिल १९८४ रोजी एक अत्यंत महत्त्वाची घटना घडली.

## १४ एप्रिल १९८५

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची ९३ वी जयंती मोठ्या उत्साहात मी पहिल्यांदाच साजरी करीत होतो. नवयुवक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी माझ्या हस्ते

बाबासाहेबांच्या फोटोचे पूजन केले होतेच. पण ते दहापंधरा कार्यकर्त्यांच्या समोर का होईना पण मांडण्याचं ( जाहीरपणे ) महाभाग्य मला लाभलं होतं. खुशीतच कार्यक्रम आटोपून घरी पोहोचलो होतो. इतक्यात शाहू कॉलेजवरून अत्यंत तातडीचा निरोप घेऊन रमेश चिखले आला होता. शाहू कॉलेजमध्ये १२ वी कॉमर्समध्ये शिकत असलेला, वसतिगृहातील एक विद्यार्थी विजय कांबळे याच्यावर कॉलेजचा बुद्धीबळाचा पट व बापू माळी या विद्यार्थ्याचा बेल्ट चोरल्याचा आरोप होता. सूर्यवंशी सरांनी हॉस्टेलची प्रकरणं माझ्यावरच सोपविली असल्यामुळं मी तावडतोब कॉलेजमध्ये गेलो. प्रा. आर. बी पाटील, इतिहासचे प्रा. पाटील व भोपळे सर विजयला मारत होते. अक्षरश: त्यांचे तोंड सुजले होते. त्याच्याकडून चोरी केल्याचं कबूल करून घेण्याचे प्रयत्न चालले होते. मी सर्व प्राध्यापकांना त्याला न मारण्याची विनंती केली. त्यानं जर चोरी केली असेल तर तुम्ही पोलीस केस करा तिथं काय व्हायचं ते होऊ दे असंही सांगितलं. पण आर. बी. पाटील व प्रा. भोसले यांनी त्याला मारहाण सुरूच ठेवली. त्याला रस्टिकेट करू असं म्हणाले. त्यावेळी माझ्यातील बंडखोरी उफाळून आली. मी त्यांना बजावलं की "आज १४ एप्रिल आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती आहे. या दिवशी तुम्ही जाणूनबुजून एका दलित विद्यार्थ्यावर अत्याचार करीत आहात. याचे परिणाम चांगले होणार नाहीत. वातावरण अत्यंत गढूळ झालं होतं. कॉलेजवरती आमचे विद्यार्थी नव्हते. मोजकेच कार्यकर्ते होते. पण पुढे कोणी येईना. फक्त श्रीपती पाटील नावाचा एक विद्यार्थी माझ्या बाजूने भांडत होता. याच वेळी प्रा दाभोळेसर आले. यांनी विजयवर अन्याय होणार नाही असे ठाम आश्वासन दिले. इंग्रजीचे प्रा. जमादार सर यांनीही मध्यस्थी केली व हे प्रकरण एवढ्यावरच संपलं. सुधाकर रणदिवेने नंतर बापू माळीला मारलं असं समजलं पण विजय कांबळे मात्र या प्रकरणातून सुटला. माझं करियर धोक्यात घालून ज्या विद्यार्थ्याला मी बदनामीपासून वाचवलं त्याच विजयनं नंतर नेतृत्वासाठी माझ्यावर नको तसले घाणेरडे आरोप करून मला बदनाम करण्याचा अश्लाध्य प्रयत्न केला. अर्थात माझं चारित्र्य हेच माझं भांडवल असल्यामुळे मी बदनाम झालो नाही, हा भाग वेगळा. पण ज्याच्यासाठी मी माझं करियर धोक्यात घातलं त्यानंच विश्वासघात करावा याचं दु:ख झालं.

## संघटनेचे नामांतर

बी. ए. ची परीक्षा वगैरे झाली. सुट्टीमध्ये गावाकडे (वेळगाव) गेलो होतो. कॉलेज सुरू झाले होते पण एम. ए. चे वर्ग सुरू व्हायचे होते. एक दिवस नंदूचा मला तावडतोब कोल्हापूरला या असा निरोप मिळाला.मास मुव्हमेंटच्या कार्यकर्त्यांनी स्टुडंटस् मुव्हमेंटचं नाव बदललं होतं. ' प्रज्ञाशील करुणा विद्यार्थी संघ ' ( प्रशीक विद्यार्थी संघ ) असं नामकरण केल्याचं समजलं. अध्यक्षपदी माझ्या गैरहजेरीत

माझीच निवड केली गेली होती. खरेतर यात गैर असं काहीच नव्हतं. पण इथंच खरं गौडबंगाल होतं. ऑगस्ट ८४ च्या १२ तारखेला प्रा. गौतमीपुत्र कांबळे (सांगली) यांच्या अध्यक्षतेखाली संघटनेची बैठक बोलाविली होती. मीही बैठकीला उपस्थित होतो. अध्यक्षपदी माझी निवड आधीच झाली. होती त्यामुळे घटनेची प्रत सर्वांत आधी मलाच दाखविण्यात आली. मी घटना वाचली. तिचं जाहीर वाचनही झालं. माझ्या सहकाऱ्यांच्या दृष्टीनं त्यात खटकण्यासारखं बरचसं होतं. विशेषत: गौतम कांबळे व अशोक हातकणंगलेकर हे फार नाराज दिसले. त्यांची नाराजी चुकीची नव्हती हे मला कबूल करावच लागेल. कारण संघटनेची बांधणी कोल्हापुरात झाली. संस्थापकही कोल्हापूरचाच. मात्र घटनेत आमच्या नावाचा उल्लेखही नव्हता. संस्थापक राजा ढाले, सहाय्यक संस्थापक सदस्य मधु कांबळे (गौतमीपुत्रांचा धाकटा बंधू,पर्यायाने राजा ढालेंचा नातलग) अरविंद बेटम इ. नावे होती व संस्थापन स्थळ मुंबई असं स्पष्ट लिहिलेलं होतं. हा सरळ सरळ प्रामाणिक कार्यकर्त्यांवर अन्याय होता. संघटना स्थापन करण्यासाठी मी व माझ्यावर नमूद केलेल्या सहकाऱ्यांनी जीवाचं रान केलं होतं. पण त्याचे फळ मात्र भलत्याच माणसांनी गिळंकृत केलं होतं. ' जयभीम ' हा शब्द कोल्हापूरसाठी नवीन नव्हता अन् नाही. परंतु जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्यांनी फक्त आपापसातच नव्हे तर इतरांना व प्राध्यापकांनाही ' जयभीम ' ने अभिवादन करण्याची प्रथा आम्ही पाडली. प्रत्येक कॉलेजमध्ये मोठ्याने ' जयभीम 'घालून इतरांना 'जयभीम' म्हणण्यास भाग पाडणाऱ्या माझ्या खंद्या सहकाऱ्यांच्या कष्टाचं फळ त्यांना मिळालं नव्हतं. परंतु त्यामुळे कार्यकर्ते, मित्र व सहकारी मला कायमचे दुरावतील असं त्यावेळी वाटलं नव्हतं. त्यांनी त्यावेळी विशेष तक्रार केली नव्हती. त्यानंतरही अत्यंत प्रामाणिकपणे हे कार्यकर्ते 'प्रशीक' वाढविण्यासाठी राबले. मात्र हा मा. मु. धार्जिणा आहे, असा माझ्यावर संशय त्यांच्या मनात खोलवर रुजला होता.

## प्रशीक विद्यार्थी संघाची वाटचाल

माझ्या सहकाऱ्यांच्या मनात वर उल्लेखिलेल्या घटनेमुळं मा. मु. विषयी निर्माण झालेला आकस अस्पष्ट करण्यात मी बराचसा यशस्वी झालो होतो. चळवळीला पोषक असा उत्साह माझ्यात ओसंडून वाहत होता. त्यामुळं आम्हाला मा. मु. च्या राजकारणापेक्षा " बाबासाहेबांच्या विचारांचा प्रचार करणं महत्त्वाचं आहे ते आमचं ध्येय आहे." माझ्या मताशी माझे सहकारी सहमत होते. माझ्या प्रामाणिकतेविषयी त्यांच्या मनात शंका नव्हती. पण मी मा. मु. च्या राजकारणाचा बळी ठरत आहे, असा त्यांचा समज होता. काही प्रमाणात ते खरंही होतं. पण मी जाणूनबुजून हा धोका पत्करला होता. प्रशीकच्या घोडदौडीला आपापसातील कलहामुळे अडथळा होऊ नये यासाठी ' मास ' च्या सहकार्यानं जाणं आवश्यक होतं. भावनिक प्रश्नापेक्षा सांस्कृतिक, सामाजिक प्रबोधनाची भूमिका महत्त्वाची

होती. बौद्ध तत्त्वज्ञान, आंबेडकरी चळवळ यामध्ये मला प्रौढत्व देण्यामागे 'मास'चा बराच मोठा वाटा आहे हे मी नाकारू शकत नाही. म्हणूनच मी 'मास'च्या धोरणाशी मिळतंजुळतं घ्यायचा प्रयत्न करीत होतो. दरम्यान कॉलेजेस, वसतीगृहे, खेडी इ. ना भेटी देऊन संघटना मजबूत करण्याचा प्रयत्न करीत होतो. पैशाचा प्रश्न या काळामध्ये कधी महत्त्वपूर्ण बनलाच नाही. शानबाग ग्रुपमध्ये मॅनेजर म्हणून काम करीत होतोच. शिवाय खाजगी शिकवण्या चालूच होत्या. पुन्हा प्रशीकच्या पावती पुस्तकांच्यामुळे, सभासद वर्गणीसुद्धा जमा करण्याचे प्रयत्न चालू होते. प्रशीकच्या सेक्रेटरीपदी के. डी. कांबळे या एम. कॉम. भाग दोन मध्ये शिकत असलेल्या व्यक्तिची निवड झाली होती. व्यक्ती थोडीशी संकुचित वृत्तीची होती ( नंतर मात्र नीचपणाचा कळस गाठला ) तरी मला भरपूर सहकार्य मिळत होतं. दिवस-रात्र माझ्या बरोबरीनं साधारणपणे ८/९ महिने फिरण्यात के. डी. नं कधीही निरुत्साह दाखविला नाही. आंबेडकरी चळवळीची माहिती के. डी. ला नव्हतीच. पण मला उच्च शिक्षितांच्या संघात अंतर्भाव करून घ्यायचा होता. शिवाय चळवळीत काम केल्याशिवाय चळवळीचा अभ्यास करणं शक्य होत नाही. हा माझा अनुभव होता. त्यामुळे के. डी. (आता प्राध्यापक) व आनंदा वाघमारे(आता प्राध्यापक)यांसारख्या माणसांना चळवळीत ओढणं आवश्यक वाटत होतं ( मात्र हा माझा अतिगाढवपण होता हे नंतर या दोघांनी सिद्ध केलं ) नंदू ढोबळे व गौतम कांबळे यांनी जाहीर व्याख्यानाचा कार्यक्रम घ्यावा असं एका बैठकीत सुचविलं होतं. मलाही अशा प्रबोधनात्मक कार्यक्रमाची गरज भासत होतीच. शेवटी ३०-१०-८४ रोजी हा कार्यक्रम ठरला.

### पहिला व्याख्यानाचा कार्यक्रम

३० ऑक्टोबर ८४ च्या कार्यक्रमाच्या छापील जाहिराती काढल्या होत्या. विद्यार्थी जीवनात 'संघटनेचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान आयोजित केले गेले. प्रमुख वक्ते प्रा. ठावरेसर होते. कार्यक्रम अपेक्षेपेक्षा जास्त प्रभावी ठरला. जवळपासच्या खेड्यातून विद्यार्थीबांधव मोठ्या संख्येने हजर होते. मिस क्लर्क बोर्डिंग विद्यार्थ्यांनी खचाखच भरले होते. या कार्यक्रमाचा प्रशीकच्या प्रगतीमध्ये फार मोलाचा वाटा आहे. या कार्यक्रमातूनच मला रमेश कांबळे, शशिकांत कांबळे हे माझ्या आजोळचे ( वडणग्याचे ) दोन खंदे कार्यकर्ते मिळाले, जे आजपर्यन्त माझ्या सोबत आहेत. परंतु या कार्यक्रमाला मला स्त्री कार्यकर्त्या म्हणून ज्या मुली मिळाल्या त्याचे प्रशीकच्या जडणघडणीमधील स्थान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. आयु. विद्या घाटगे, राजश्री कांबळे, शकुंतला कांबळे, मीना कांबळे या विद्यार्थीनींनी खऱ्या अर्थाने प्रशीकमध्ये मोलाची कामगिरी बजावली. या मुलींच्या पालकांनीही मला जे सहकार्य दिले, माझ्यावर जो विश्वास दाखविला तो केवळ अद्वितीयच म्हणावा लागेल. या मुलींनी अक्षरशः माझ्या बरोबरीने राबून प्रशीकचा

ध्वज फडकत ठेवला. प्रशीकच्या बांधणीमध्ये या भगिनींचे श्रम अनन्यसाधारण महत्त्वाचे आहेत. मात्र त्यांच्या कार्याचे चीज मा. मु. च्या स्वार्थी धोरणामुळं होऊ शकलं नाही याची खंत आजही मला वाटते आहे. कोल्हापूर जिल्ह्यात विद्यार्थीनिंचा दलित चळवळीत सहभाग होण्यास या मुलीच कारणीभूत ठरल्या.

आयु. विद्या घाटगेच्या नेतृत्वाखाली मुलींचा विभाग प्रशीकमध्ये उघडण्याचा विचार आम्ही गांभिर्याने करू लागलो. स्वतःच्या जबाबदारीवर मुलींशी संपर्क स्थापित करण्याचा निश्चय या नवनिर्वाचित उपाध्यक्षांनी ( विद्या घाटगे ) दाखविला. कॉलेजला भेटी देणे असो, वर्गणी गोळा करणे असो, अथवा ग्रामीण भागांना भेटी देण्याचा कार्यक्रम असो या मुली त्यामध्ये कुठंच कमी पडल्या नाहीत. या मुलींबद्दल सर्वच कार्यकर्त्यांना एक प्रकारचा आदर वाटत होता. संशय, कपट, मोह यांना या संबंधामध्ये अजिबात थारा नव्हता. प्रत्येक कार्यकर्त्यांशी घरगुती जिव्हाळा निर्माण करण्याच्या माझ्या प्रयत्नामुळे प्रत्येक स्त्री–सभासदांच्या कुटुंबियांशी मी जिव्हाळा निर्माण केला.

यानंतर ' शाहू स्मारक भवन ' कोल्हापूर मध्ये पुन्हा एक व्याख्यान आम्ही आयोजित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृतिदिनानिमित्त डिसेंबर ८४ रोजी हा कार्यक्रम झाला. माझं वक्तृत्व पहिल्यांदाच दाखविण्याची संधी मिळाली. प्रशीकचे ध्येयधोरण स्पष्टपणे सर्व थरांतील लोकांना सांगण्यासाठी ही संधी होती. मी ती अत्यंत प्रभावीरित्या पार पाडली पण. मी ज्यांना गुरुस्थानी मानले त्या कार्यकर्त्यांनी मात्र मला पूर्णपणे दुर्लक्षित केले. एव्हाना दलित विद्यार्थी व इतर लोकांवर माझा बराचसा प्रभाव पडला होता. एक प्रामाणिक कार्यकर्ता म्हणून मला लोक मान्यता देऊ लागले होते. खेड्यांपाड्यांतील दलित जनता मला नेता मानू लागली होती. हा अनुभव मला नवीन होता. मी खरंतर गोंधळूनच गेलो होतो. वर्तमानपत्रातून प्रसिद्धी मिळत होती. माझं माझ्या शैक्षणिक करिअरकडे पूर्ण दुर्लक्ष झालं आहे असं वाटत होतं. याचवेळी एक अत्यंत मोलाचा सल्ला मला आयु. आर. बी. कांबळेंनी दिला.

" प्रसिद्धीची नशा तुम्हाला चढू देऊ नका. फार वाईट असते ही नशा " हे आर. बी. चे शब्द माझ्या हृदयावर कायमचे कोरले गेले. या सल्ल्याचा मला आजसुद्धा इतका उपयोग होतोय की बस्स ! हा सल्ला मनावर ठसल्यामुळं मी आज सुद्धा प्रसिद्धीपासून चार हात दूर राहणंच योग्य समजत आहे. हे शब्द माझ्य सार्वजनिक जीवनातील एक अमूल्य उपलब्धी आहेत. परंतु मी कितीही प्रयत्न केला तरी मला प्रसिद्धी मिळतच गेली. काही काळ मला ही नशा चढली सुद्धा. पण काही काळच. स्वतःला पुढारी, नेता म्हणविणं फार सोपं असतं, पण मी मात्र कधीही स्वतःला इतरांच्यापेक्षा वेगळा आहे असं दाखविण्याचा प्रयत्न केला नाही आणि हेच माझं वेगळेपण ठरलं. या वेगळेपणामुळंच प्रशीकची भरभराट व्हायला

मदत झाली. उत्कृष्ट वक्तृत्व, चौफेर वाचन, चिकित्सक वृत्ती, संयम, सहनशीलता व स्वतःची चूक कबुल करण्याचं धाडस यामुळे मी विद्यार्थीवर्गात लोकप्रिय होत गेलो आणि माझी लोकप्रियता शत्रू निर्माण करण्यास कारणीभूत ठरली. परंतु उघड विरोध करण्याचं धाडस मात्र कुणीच करू शकले नाही. मला हेच हितशत्रू खाजगीमध्ये माझ्या प्रामाणिकपणाची ग्वाही देत असल्याचे अनेकदा प्रत्ययास आले. आंबेडकरी विचार माझ्या नसानसांतून भिनण्याची ग्वाही हेच लोक देत असल्याचे प्रत्ययास आल्यामुळे हीच माझ्या कार्याची पावती समजून कार्यरत आहे.

## घरातील सहकार्य

विद्यार्थीवर्गाच्या अनंत अडचणी,समस्या हाताळणे ही एक तारेवरची कसरत वाटत होती. विद्यार्थ्यांच्या आर्थिक अडचणीही फार मोठ्या प्रमाणात येत होत्या. संघटनेच्या मार्फत आर्थिक प्रश्न सोडविणं शक्यच नव्हतं वसतिगृहातील विद्यार्थ्यांना साबण, तेल इ. आवश्यक गरजांसाठी कधीमधी स्वतःच काही उसनवारी देण्याचा प्रयत्न होता. हॉटेलमधील पगार, शिकवणीचे पैसे शिल्लकच असायचे. विद्यार्थ्यांना उसने म्हणून दिलेले पैसे परतीच्या अपेक्षेने देत नसे. मात्र काही विद्यार्थी निश्चितपणे पैसे परत करीत असत. या कामी अडचणीच्या वेळी दाभोळेसर मदतीला असायचे. मला वाटतं मीच त्यांचे ५० रुपये देणे लागतोय. काही अपरिहार्य कारणांमुळे'बेळगाव' सोडून कोल्हापूरला भावाकडे रहायला आलेलो असलो तरी भावावर माझा आर्थिक बोजा पडू नये यासाठी प्रयत्न करायचो. भावानंही कधी आर्थिक अपेक्षा माझ्याकडून केली नाही. नाही म्हणायला एखादे वेळी वहिनींचे काही शब्द खटकायचे. पण त्यांनी कधी ठोक गाठलं नाही. उलट माझ्यामुळं त्यांनाच मनस्ताप सहन करावा लागायचा. मुळात मी हृदयाच्या आजारानं बेजार झालेला. त्यात जेवण वेळेवर नाही. त्यामुळे तब्येत कधी सुधारली असं झालंच नाही. नेहमीच मी आजारी दिसायचो. त्यामुळं माझ्याकडं भावाचं व वहिनीचं अजिबात लक्ष नाही असं माझ्या बहिणीला वाटायचं त्यामुळे बहीण व वहिनीमध्ये काही काळ अबोला व्हायचा आणि मला अपराधी वाटायचं. पण मला त्यावर इलाज सापडलाच नाही. माझं न सांगता दोनदोन तीनतीन दिवस घराबाहेर रहाणं, खरंतर कुणालाही संशयास्पद वाटलं असतं. पण घरच्या लोकांच्या मोठ्यामनामुळं त्यांनी माझ्यावर कधीही संशय घेतला नाही. आईचा तर माझ्यावर विश्वास होताच. माझ्या घरच्याचं सहकार्य मिळालं नसतं तर कदाचित मी सामाजिक कार्यात पडलोच नसतो. तर अशा योग्य सहकार्यामुळं मला संघटना बांधण्यास प्रोत्साहनच मिळायचे.

यावेळी शिव-शाहू महाविद्यालय, शाहूवाडी इथले मागासवर्गीय विद्यार्थी तक्रार करीत होते. सदर कॉलेजचे प्राचार्य स. ग. यादव यांच्याशी चर्चा करून ( आंदोलनाचा इशारा आम्ही दिलाच होता. ) हा प्रश्न यशस्वीरित्या हाताळला

व या विद्यार्थ्यांना त्यांची स्कॉलरशीप मिळवून देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. शाहूवाडी, पन्हाळा, भागात यामुळे आम्हाला चांगला प्रतिसाद मिळत गेला. चरणकर, आनंदा कांबळे असे कार्यकर्ते या भागांतून मिळाले. यानंतर एक ऐतिहासिक निर्णय आम्ही घेतला.

## कोल्हापूर प्रशीकचा ऐतिहासिक मोर्चा

आंबेडकरी विचारामुळं मी तर झपाटलोच होतो. त्यामुळं आपण काही भरीव कार्य करावं असं सारखं वाटायचं. एका बैठकीमध्ये निर्णय घेतला की डॉ. आंबेडकर जयंती दिनी राष्ट्रीय सुट्टी मिळावी यासाठी प्रयत्न करायचा. आम्ही या संदर्भात १४ फेब्रुवारी १९८५ रोजी एक प्रचंड मोर्चा काढायचा निर्णय घेतला. विद्येचे उपासक बाबासाहेब यांचा जन्मदिन ' विद्यार्थी दिन ' म्हणून देशभर पाळण्यात यावा या प्रमूख मागणीसह डॉ. आंबेडकराचे सर्व साहित्य सर्व प्रादेशिक भाषांतून प्रसिद्ध करावे, मागासवर्गीय शिष्यवृत्ती महागाई निर्देशकानुसार मिळावी, सर्व क्षेत्रामध्ये राखीव जागांचा कोटा नियमानुसार भरावा इत्यादी मागण्या आम्ही ठेवल्याच पण जहाल जातीयवादी असलेल्या कोल्हापूर जिल्हा समाज कल्याण अधिकारी ' निंबाळकर ' यांची त्वरीत बदली व्हावी या मागणीचाही आम्ही जोर धरला. जाहिराती काढल्या, खेड्यांना भेटी देऊन लोकांना मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन केले. पंधरा दिवस अक्षरश: दिवस-रात्र आम्ही राबत होतो. १४ एप्रिल ' विद्यार्थी दिन ' म्हणून साजरा करण्याच्या मागणीसाठी प्रचंड शक्तीप्रदर्शनाची गरज होती. त्या दृष्टीनं आम्ही कामाला लागलो होतो. जेवण घ्यायला सुद्धा वेळ मिळत नव्हता. याच गोंधळामुळे नंतर शानबाग ग्रुपमधील नोकरी सोडावी लागली. या मोर्च्याच्या तयारीसाठी भगिनींनी अपार कष्ट घेतले.भोगावती महाविद्यालय, सरुड, गारगोटी महाविद्यालय आदी भागात जबरदस्त प्रचार झाला होता. प्रतिसाद चांगला मिळत होता. स्वप्नं सगळी मोर्चाचीच पडत होती. रात्री तीन तीन वाजेपर्यंत आमचे कार्यकर्ते राबत होते. शेवटी एकदाचा मोर्चाचा दिवस उजाडला.

१४ फेब्रुवारी रोजी सकाळी आठ वाजता आम्ही सर्व पदाधिकारी मिस क्लार्कवर जमून घोषणाफलक वगैरेंची तयारी केली. बघता बघता अकरा वाजले पण १०–१५ कार्यकर्ते व शंभर घोषणा फलक यांच्याशिवाय बिंदू चौकात कोणीही नव्हते. मला तर काही सुचत नव्हते. सर्वच नाराज दिसत होते. साडे-बारा वाजले तरी विद्यार्थ्यांचा पत्ता नव्हता. आधीच हार्ट पेशंट असल्यामुळे घाबरल्यासारखं होत होतं. प्रतिष्ठेचा प्रश्न होता. धीर द्यायला मा. सु. च्या आर. बी. शिवाय कोणीच नव्हते. प्रतिगामी संघटनांच्या समोर हसं होण्यापेक्षा हार्टफेल व्हावा असं वाटत होतं. काय करावं सुचत नव्हत आणि तसंच घडलं. प्रशीक विद्यार्थी संघाचा विजय असो....डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विजय असो .... ''

या दोन घोषणा दणाणत कानावर आदळल्या. कार्यकर्त्यांनी सहेतुक माझ्याकडे पाहिले. इतक्यात प्रशीकचा भव्य मोठा फलक लावलेली एक मेटॅडोर आमच्या समोर येऊन उभी राहिली. गारगोटी महाविद्यालयाचे विद्यार्थी गाडी करुन आले होते. आणि बघता बघता बिंदू चौकात सर्व बाजूंनी विद्यार्थ्यांचे थवे जमू लागले. घोषणांनी वातावरण दणाणून गेले. माझ्या जीवात जीव आला. सुमारे ७००/८०० विद्यार्थी १५/२० मिनीटात चौकात जमा झाले. ३० विद्यार्थीनींही आल्या. ठीक १.०० वाजता मोर्चाला सुरुवात झाली. महाद्वार रोडवर मोर्चा येईपर्यंत विद्यार्थी येऊन सामील होत होते. १०००/१५०० विद्यार्थ्यांचा जमाव बघता बघता जमा झाला आणि मी समाधानाचा सुस्कारा सोडला. अत्यंत शिस्तबद्धतेनं मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयाकडे चालत होता. व्हीनस कॉर्नरजवळ जमाव येताच एका घोषणेने माझे लक्ष वेधून घेतले. 'रमेश जाधव आगे बढो, हम तुम्हारे साथ है' अशी ती घोषणा झाली व मी भानावर आलो. मी विद्यार्थ्यांना अशी घोषणा न देण्याची हात जोडून विनंती केली. पण याचा परिणाम उलटा झाला. ढोबळे व विजय पुनः पुन्हा या घोषणा देऊ लागले. खरंतर या घोषणेनं मला कुठंतरी सुखावल्यासारखं वाटत होतं. केल्या श्रमाचं सार्थक झाल्यासारखं वाटत होतं. मात्र हे श्रम माझ्या एकटयाचे नक्कीच नव्हते याची जाणीव होती. श्रेय बाबासाहेबांच्या नावाचं होतं हे मी तेव्हाही विसरू शकलो नव्हतो. परंतु जे घडत होतं ते थांवविणं आणखीन गैरसमज पसरविणारं ठरणारं होतं. जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ मोर्चा आला. आम्ही शिष्टमंडळासह आत गेलो. खरंतर जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः येवून आमचं निवेदन स्वीकारावं असा माझा आग्रह होता. परंतु इतर कार्यकर्त्यांनी फारसं मनावर घेतलं नाही.

जिल्हाधिकाऱ्यांनी १४ एप्रिल स्थानिक सुट्टी जाहीर करण्याचं आश्वासन दिलं व निबाळकरांची योग्य ती चौकशी होईल असंही आम्हाला सांगितलं. आश्वासनानुसार जिल्हा स्तरावर सुट्टी जाहीर केली व मोर्चानंतर ८/१०दिवसातच निंबाळकरांचा बदलीचा आदेश दिला. निंबाळकरांनी मा. ई. कुरणेच्या मध्यस्थीने हा आरोप मागे घेण्याचे खूप प्रयत्न केले. पण आम्ही खंबीर होतो म्हणून निंबाळकरांना त्यांच्या प्रयत्नात यश आलं नाही. आम्ही मात्र एका मर्यादेपर्यंत यश पदरी बांधून घेतलंच.

परीक्षा वगैरे संपल्यानंतर ७–७–८५ रोजी प्रशीकची नवीन शैक्षणिक वर्षातील पहिली मिटिंग बोलावण्यात आली. अध्यक्षस्थानी प्रा. विनायक कांबळे होते. प्रशीकचा प्रथम वर्धापन दिन ( ५ ऑगस्ट ) साजरा करण्यासंदर्भात चर्चा चालली होती. जाहीर व्याख्यान ठेवण्याचा निर्णय घेतला होता. वक्त्यांची निवड व उद्‌घाटन ठरवायचे होते. मी प्रा. डी. यू. पवार यांचं नाव वक्ता म्हणून सुचविलं तर आणखीन कुणीतरी, मला वाटतं राजुताई कांबळेनी, उद्‌घाटक म्हणून

त्यावेळचे उपमहापौर बंडा नाईकवडी यांचं नाव सुचविले. खरंतर कुणाचाच विरोध नव्हता पण विनायकनं सांगितलं, डी. यू. पवार योग्य माणूस नाही. तो ढोंगी आहे.त्यामुळे त्याला नको.आणि बंडा नाईकवडी राजकीय व्यक्ती असल्यामुळं नको. प्रशीक ही मा. मु. शी संलग्न आहे. मा. मु. मध्ये राजकीय व्यक्तींना थारा नाही. त्यावेळी मी त्यांना विचारलं. मास मुव्हमेंटच्या मुझियमच्या उद्घाटनाला काँग्रेसचे रत्नाप्पा कुंभार चालतात तर प्रशीकच्या कार्यक्रमाला बंडा नाईकवडी किंवा इतर राजकारणाशी संबंधित व्यक्ती का चालणार नाही ? यावर विनायक भडकले व म्हणाले, " मा. मु. ची चौकट मान्य नसेल तर राजीनामा देऊन चालू लागा." मलाही राग आला. मी सरळ त्यांना सांगितलं, सल्लागार सदस्यांच्यामध्ये तुमचं नाव आहे याला काही पुरावा नाही आणि राजीनामाच हवा असेल तर तो जनरल मिटींगमध्ये मागा."

खरं तर विनायकच्या या वागण्यामागे पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन तर होताच पण माझ्या संघटनेतील वाढलेल्या प्रभावामुळे निर्माण झालेला द्वेषही होता. वास्तविक मी त्यांना वयानं, अनुभवानं खूप ज्युनियर. पण त्यांची संकुचित वृत्ती नि दडपशाही मला मान्य नव्हती. बैठकीला हजर असलेल्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी विनायकच्या भूमिकेला विरोध दाखविला. तेव्हा अगतिक होऊन ते निघून गेले. शेवटी आम्ही ढावरे सरांना प्रमुख वक्ता ठेऊन 'मराठी साहित्यातील विकृती 'या विषयावर व्याख्यान घडवून आणले व वर्धापनदिनानिमित्त वक्तृत्व स्पर्धा घेतल्या.

अशा पद्धतीने विनायकमुळं आमच्यात फुटीचं बीज रोवलं गेलं. या घटनेनंतर मला खात्री पटली की मी फार पूर्वीच गौतम कांबळेच्या मताशी सहमत व्हायला हवं होतं पण वेळ टळून गेली होती. हे कार्यकर्ते मला दुरावले होते. यानंतर मात्र संघटनेची बांधणी करताना कुठल्याच जुन्या कार्यकर्त्यावर अपमानित होऊन बाहेर पडावं लागणार नाही. या गोष्टीची दक्षता घेतली. मला नेतृत्वाची हाव दाखवून विनायक विजयने कांबळे व के. डी. यांना माझ्यापासून तोडलं.

### मास मुव्हमेंटशी खटका

५-७-८५ व ६-७-८५ हे दोन दिवस नंतरच्या काळात मा.मु. शी खटका उडण्यास कारण ठरले. पश्चिम महाराष्ट्र मास मुव्हमेंटचे पहिले राज्यव्यापी अधिवेशन कोल्हापुरात ठरले होते. वाठारतर्फे वडगांवच्या मा. मु. छावणी उद्घाटनाच्या दिवशी प्रा. कांबळे सर व माझ्यात थोडीशी दरी निर्माण झाली. या पूर्वीच्या एका मिटींगमध्ये अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष म्हणून आर. बी. कांबळेची निवड झाली. वाठारमध्ये स्वागताध्यक्ष म्हणून प्रा. विनायक कांबळेचा उल्लेख केला गेला. मी विचारलं की हा बदल कधी घडला तर कांबळे सर मलाच उलट म्हणाले की आर. बी.ची निवड कधी झाली? यावर मी त्यांना सांगितलं की मिस क्लर्कच्या मिटींगमध्ये आर. बी. ची निवड झाली होती. मी सदर बैठकीला

हजर होतो. यामुळे वातावरण थोडसं गढूळ झालं ( हा वचपा नंतर विनायकने काढला ) प्रकरण एवढ्यावर थांबलं. अधिवेशनाचा दिवस उजाडला. ढाले सरांना बघण्याची, त्यांच्याशी एखाद दुसरा शब्द बोलण्याची फार इच्छा होती. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ढाले सरांच्या आंबेडकर म्युझियमचे उद्घाटन रत्नाप्पा कुंभारांच्या हस्ते झाले. दुसऱ्या दिवशी सकाळी ढाले सरांना भेटायचे होते. मला अंबपकर–विनायक या जोडीने सरांच्याविषयी माझ्या मनात इतके दडपण निर्माण केले होते की बस्स ! साहेब फार कडक आहेत साहेबांशी. फार बोलावयास जावू नका वगैरे पण प्रत्यक्ष भेटीत मात्र ढाले सर फार वेगळे वाटले. त्यांनी माझी खूप चौकशी केली. माझं वाचन वगैरे बद्दल फार चांगलं बोलले. १०/१५मिनिटं माझ्याशी बोलले पण मला कुठंही निरुत्साही करायचा प्रयत्न केला नाही. प्रशीकच्या घटनेत एक कलम होतं. संघटनेचे एक सर्वोच्च सल्लागार मंडळ राहील. त्याचा निर्णय अंतिम राहील. या कलमात मी सुरुवातीसच विरोध केला होता. पण कांबळेसरांनी माझी शंका दूर केली होती. ढालेनी मला पुन्हा तोच प्रश्न केला तेव्हा माझ्या शंकेचं निरसन झाल्याचं मी त्यांना सांगितलंच पण तो नियम चुकीचा आहे हेही सांगितलं. थोडक्यात, समाधानकारक चर्चा झाली.

अधिवेशनात या दिवशी ' बहिष्कृत विद्यार्थी वर्ग आणि आजची शिक्षण पद्धती' यावर परिसंवाद होता. खरंतर मला बोलावं लागेल असं वाटलं नव्हतं. पण ढाले सरांनी माझं नाव अचानकपणे जाहीर केलं. इतक्या विद्वानांसमोर बोलू नये असं फार वाटलं पण कोल्हापूर प्रशीकचं कुणीतरी बोलणं आवश्यक होतं. माझ्या न बोलण्यामुळं विद्यार्थीवर्ग विस्कळीत होईल असं वाटल्यामुळं मी भाषण करायला उभा राहिलो. तयारी नसतानासुद्धा माझं भाषण सुरेख झालं. ढालेनींही तसा अभिप्राय दिला. मात्र विनायक कांबळेनी मात्र पोपटपंची समजून हिरमोड केला.

## वडणगे ग्रामपंचायतीवर मोर्चा

वडणगे गावातील प्रशीकचा एक सभासद अनंत माने याला, गावातील सवर्णांने, सवर्णांच्या विहिरीवर अंघोळ केली म्हणून जातीवाचक शिवीगाळ करून बेदम मारहाण केली. अनंतचा हातच मोडला होता. प्रशीकचा सभासद असल्यामुळे अनंतवरील अन्यायाची दखल घेणे आवश्यक होते. शिवाय प्रतिगामी शक्तींना ठेचून काढण्याची ही एक संधी होती. प्रा. अंबपकरांशी चर्चा करून दि. २६-१२-८६ रोजी वडणगे ग्रामपंचायतीवर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला. प्रा. अंबपकरांना लेखी सूचनाही दिली होती. मला अंबपकर, आर. बी. व गौतमीपुत्र यांच्यात एकमत न झाल्यामुळे मोर्चाच्या दिवशी मोर्चाच काढू नये असे सांगितले. अर्थात आता ते शक्यच नव्हते. आम्ही वडणगे ग्रामपंचायतीवर मोर्चा काढणार असल्याची सूचना पोलिसखाते, वर्तमानपत्र, कार्यकर्ते व सरपंच भीमराव उदाळे यांना दिल्या होत्या. सरपंचानं तर आम्हाला धमकीच दिलेली होती. अशा

परिस्थितीत मोर्चा रद्द करणे म्हणजे नेभळटपणाचं ठरले असते. म्हणून आम्ही स्वतःच्या जबाबदारीवर हा मोर्चा काढण्याचे ठरविले.

गावातले वातावरण अत्यंत तंग होते. इन्स्पेक्टर मोरेनी मोर्चा काढू नये असंच सुचवलं होतं. पण ते आता शक्य नव्हतं. कार्यकर्ते रात्रभर जागून तयारी करीत होते. शेवटी मूकमोर्चा ठरला. आम्ही वडणगे येथील आमच्या समाजाच्या प्रवेशद्वारासमोर माझे सर्व नातेवाईक गावात प्रवेश न करण्याची हात जोडून विनंती करीत होते. गाव हत्यारबंद होऊन बसले आहे. आमच्यावर हल्ला होईल ही भीती त्यांना वाटत होती. आमच्या विद्यार्थीनी मात्र मनात कोणतीही भीती न बाळगता घराघरात जाऊन स्त्रियांना सामील होण्याचे आवाहन करीत होत्या. सुधाकर रणदिवे हा आमच्या मोर्चाचा हिरो ठरला. त्याची जबरदस्त पर्सनॅलिटी शिवाय हातात निळा ध्वज असलेली भक्कम लाठी पाहणाऱ्यांच्या मनात धडकी भरवीत होती. सुधाकर रणदिवे माझ्यामागे, त्यांच्यामागे आमच्या विद्यार्थीनी व इतर स्त्रिया व त्यांच्या मागे आमचे विद्यार्थी असा २०० जणांचा ' न भूतो.. . . ' असा ताफा निडरपणे गावातून चालत शांतपणे पंचायतीसमोर आला. आणि पहिली घोषणा मीच दिली. पाठोपाठ सारा गाव दणाणून गेला. अत्यंत तंग परिस्थितीतून एक जबरदस्त दबाव निर्माण करण्यात आम्ही यशस्वी ठरलो होतो. हा दबाव काही वर्षे गावावर राहणार होता. मात्र नंतरच्या काही दिवसात अनंत माने व त्याच्या कुटुंबियांनी मला किंवा आमच्या संघटनेच्या स्थानिक कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता परस्पर हे प्रकरण मिटवले. पोलीस खात्यामध्ये हा नंतर कुचेष्टेचा विषय झाला असे समजले.परंतु त्यांच्याशी आम्हाला कर्तव्य नव्हते. आमची जबाबदारी आम्ही तर पार पाडली होती. मास मुव्हमेंटच्या संकुचित, दुबळ्या जिल्हानेतृत्वाचा नाकाला मिरच्या झोंबाव्यात असा हा प्रकार होता.पण मला आता त्याची पर्वा नव्हती. मा.मु.मुळे मी खूप काही शिकलो असलो तरी खोट्या अभिनिवेशापाई त्यांची तळी उचलून धरून चुकीच्या मार्गाने वाटचाल करणे आता शक्यच नव्हते. कारण आता प्रशीकचं स्वतंत्र असं स्थान जनमानसात निर्माण झालं होतं. इतरांना आमच्या संघटनेची सहानुभूती नसेना का परंतु त्या संघटनेतील प्रामाणिक कार्यकर्त्यांचा आम्हाला सक्रीय पाठिंबा होता. यामुळेच अंतर्गत एकता व्हावी यासाठी मी प्रयत्न करीत होतो. मा. ई. कुरणे, जालींदर जमादार अशी माणसे आमच्या विद्यार्थ्यांना आधार देत होती. दलित मुक्तीचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात आमच्या भूमिकेशी सहमत होत होते. अशातच आम्ही इचलकरंजी विभाग मजबूत करायच्या कामाला लागलो.

## दलित विद्यार्थी संघटनेचे ' प्रशीक ' मध्ये विलीनीकरण

स्वतःला विद्वान म्हणविणारे तथाकथित दलित नेते ' प्रशीक ' फोडण्यासाठी प्रयत्न करीत असताना प्रशीकची घोडदौड मात्र बेफाम गतीनं चालू होती.

गडहिंग्लज, आजरा, भुदरगड वगळता जिल्ह्यात सर्वत्र प्रशीकचं वारं वाहू लागलं होतं. आम्हाला न कळविताही काही ठिकाणी प्रशीक विद्यार्थी संघाच्या नावानं विद्यार्थी काम करीत असल्याच्या बातम्या येत होत्या. अशातच एके दिवशी विद्याधर राजहंस, इचलकरंजी विभागातील एक कार्यकर्ता गुलाब कांबळे (आता, प्राध्यापक) याला घेऊन माझ्याकडे आला. गुलाबनं दलित युवक संघटना इचलकरंजीला काढली होती. या सर्वांची प्रशीकमध्ये काम करण्याची इच्छा होती. दोनएक बैठका झाल्यानंतर दलित युवक संघटनेचे प्रशीकमध्ये विलीनीकरण करण्याचा निर्णय आम्ही घेतला. नोव्हेंबर ८५ मध्ये आम्ही इचलकरंजीस प्रशीकच्या पहिल्या शाखेचे उद्‌घाटन केले. त्यावेळी सर्व दलित पक्षसंघटनेच्या कार्यकर्त्यांना निमंत्रणं दिली होती. दलितांचे ऐक्य जिल्हापातळीवर व्हावे यासाठी प्रत्यक्ष असा हा पहिलाच प्रयत्न होता. सर्व संघटनांचे कार्यकर्ते आले होते. मी प्रथमच प्रशीकची शाखा इचलकरंजीत उघडण्याचा उद्देश स्पष्ट करताना सर्व दलितांच्या ऐक्याचे आम्ही स्वागत करीत असल्याचे सांगितले होते. कार्यक्रम अत्यंत चांगला व इचलकरंजीच्या गतिमान राजकारणावर प्रभाव पाडणारा झाला. आजसुद्धा इचलकरंजीत माझ्या सहकाऱ्यांचा एक वेगळाच दबाव दिसून येतो.

एव्हाना माझ्याकडे सक्रिय कार्यकर्त्यांचा एक मजबूत संघ तयार झाला होता. खेड्यापाड्यात शाखा उघडून विद्यार्थ्यांना संघटीत करीत होतो. त्यामुळे मला व माझ्या जवळच्या सहकार्यांना एक वजन प्राप्त झाले होते. गावागावांहून मला व्याख्यानासाठी निमंत्रणं येत होती. कोल्हापूर जिल्हा मा.मु. आमच्यामुळं ओळखली जाऊ लागली होती. या मास मुव्हमेन्टचे अस्तित्व एकटचा आर. बी. मुळं राहिलं होतं आणि आर.बी. आमच्याशी सहकार्याच्या भावनेत राहात होते.यामुळे विनायक कांबळे, अंबपकर इत्यादी ना माझा प्रभाव सहन झाला नाही. त्यांनी माझ्यावर खोटेनाटे आरोप करण्यास सुरुवात केली. अर्थात माझ्या गैरहजेरीत. माझ्यासमोर आरोप करण्याची हिम्मत कधी दाखवलीच नाही. माझ्यावर संघटनेतील मुलींबाबत घाणेरडे आरोप करत असताना प्रा. अंबपकर, विनायक, के. डी. कांबळे, ह्यांनी कमरेचे सोडून डोक्याला गुंडाळले. एवढा हलकटपणा मला यांच्याकडून अपेक्षित नव्हता. या अर्धवट लोकांचे एक सोडा पण मी ज्यांना आजही गुरुस्थानी मानतो त्या गौतमीपुत्रांनीही हे आरोप एकून घ्यावेत याचं सुरुवातीला आश्चर्य वाटलं. पण नंतर महाराष्ट्राच्या मा. मु. च्या अध्यक्षस्थानी असलेल्या गौतमीपुत्रांना त्यांचे सहकारी जुमानत नाहीत हे समजलं तेव्हा प्रा.गौतमीपुत्रांची कीव करावीशी वाटली. आपल्या सहकाऱ्यांना ते दुखवू शकत नव्हते. म्हणून माझ्यांवर त्यांनी फाईली व्यवस्थित ठेवल्या नाहीत, दलित मुक्ती सेनेच्या कार्यक्रमाच्या जाहिराती वाटल्या, माझा सल्ला घेतला नाही, असले फालतू आरोप केले. मी नेता कधीच नव्हतो सामान्य कार्यकर्त्यांच्यामध्ये मिसळून काम करणारा एक सामान्य धडपड्या कार्यकर्ता

होतो, आत्मप्रौढीचा दोष पत्करून मी सांगू इच्छितो की सकाळी सात वाजल्यापासून कार्यकर्त्यांची वर्दळ सुरू व्हायची ती मला भरपूर काम देऊनच संपायची. स्थानिक कार्यकर्त्यांचा अभाव असल्यामुळं फाईल वगैरे तयार करण्याच्या भानगडीत पडलो नाही हाच माझा दोष, पण गौतमीपुत्रांनी वारंवार माझ्यावर दबावच ठेवायचा प्रयत्न केला. माझ्यातल्या चुकीचीच ते उजळणी करीत राहिले. अरे मुंगीलाही डिवचलं तर ती चावते, मग मी तर माणूस ! माझ्या स्वाभिमानाला धक्का लावू इच्छिणाऱ्याच्या भावनांचा विचार मी तरी का करावा ?आणि स्वत: सक्रीय राहून कार्य करणाऱ्यांनी माझ्यावर आरोप केला तर तो मी मान्यही केला असता पण इथं चोराच्या उलटचा बोंबा. आपणही काम करायचं नाही, इतरांनाही करू द्यायचं नाही ही या मा. मु. ची भूमिका. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा प्रकरण याचं चांगलं उदाहरण आहे.

## कोल्हापुरातील आंबेडकर पुतळा प्रकरण

तारीख आता आठवत नाही पण ऑक्टोबर ६/८६ च्या दरम्यान कोल्हापुरात बाबासाहेबांचा पुतळा रंकाळा तलावात बसविण्यात येणार होता. भूमिपूजन रत्नाप्पा कुंभारांच्या हस्ते होणार होते.पण ऐन भूमिपूजनाच्या वेळेस कोल्हापुरातील काही प्रतिगामी पुढाऱ्यांनी रंकाळा तलावाजवळ पुतळा बसविण्यास विरोध केला व त्या ठिकाणी भूमिपूजन होऊ दिले नाही. ऐनवेळी महानगरपालिकेच्या आवारात भूमिपूजन करण्यात आले. खरंतर बाबासाहेबांच्या पुतळ्यासाठी रंकाळा ही जागा योग्य नव्हतीच. परंतु ज्या प्रवृत्तीने तेथे पुतळा बसविण्यात विरोध केला त्यांना समज देणे अपरिहार्य होते. आमचेकडे वेळ फार कमी होता. घटस्थापनेच्या दिवशी मोर्चा काढण्याचा निर्णय आम्ही घेतला. कॉलेजना सुट्ट्या होत्या. पण तात्काळ निषेध नोंदविणे अत्यावश्यक होते. कोल्हापुरातील दलित संघटना निष्क्रिय राहिल्या होत्या. खरंतर आम्ही हा निर्णय घेतला याचं कौतुक व्हायला हवं होतं पण. . .

मोर्चा काढला, पण सुरुवातीलाच बिंदू चौकात येऊन एका संघटनेच्या १५/२० कार्यकेर्त्यांनी ( की गुंडांनी ? ) स्पष्ट शब्दात मलाच धमकी दिली. या धमकीनंतर मला मोर्चा काढणे अपरिहार्य झालं. मोर्चा काढला. अवघ्या एक दीड दिवसात ४०० विद्यार्थी आम्ही जमविले होते. मोर्चा यशस्वीरित्या पार पडला. मोर्चानंतर मात्र गौतमीपुत्रांनी माझ्यावर सगळा मागचा पुढचा राग काढला. महापालिकेवर निषेध मोर्चा काढणं कसं मूर्खपणाचं होतं ते गौतमीपुत्रच जाणोत. आम्हाला मात्र या मोर्चामुळं थोडंसं हलकं वाटलं. बाबासाहेबांच्या पुतळ्याला विरोध कुठलाही आंबेडकरवादी मुळीच खपवून घेणार नाही. आमच्या ताकदीनुसार आम्ही आमचा निषेध नोंदविला याचं समाधान आजही आहे. बाबासाहेबांचा पुतळा

चिमासाहेब चौकात (दसरा चौकाजवळ) बसवावा म्हणून आम्ही आंदोलन करणार होतो. परंतु वरील समजल्या जाणाऱ्या नेत्यांनी आमचे प्रयत्न हाणून पाडले. तर असं हे मा. मु. चं धोरण आम्हाला पावलोपावली अडखळायला लावत होते.

**रिडलसचे आंदोलन**

रिडल्स प्रकरणात मी व रमेश कांबळेनी एकेका दिवसात लुनावरून २०/२० गावात प्रचार केला. डी. बी. कांबळे, शशिकांत कांबळे, विद्याधर कांबळे, भीमराव संघमित्र या कार्यकर्त्यांनी अतोनात श्रम केले. अर्थात इतर दलित पक्ष संघटनांनीही प्रयत्न केले व १०/१५ हजार आंबेडकरी जनता कोल्हापुरात रस्त्यावर आली. पण मिरवणुकीनंतर माझी इतकी हजार माणसं, माझी इतकी हजार माणसं अशी दलित जनतेची वाटणी करून शामप्रसाद कांबळे (दलित मुक्ती), दत्ता जाधव ( दलित पँथर ), जमादार ( प्रकाश गट ) इत्यादींनी आंबेडकर विचारसंवर्धक समितीला सुरुंग लावला. १०/१५ हजाराच्या संख्येने जनता आली ती या नेत्यांच्या नावासाठी नसून ती बाबासाहेबांच्या नावामुळं आली हे सत्य या नेत्यांनी कबूल केलं असतं तर कदाचित राज्यस्तरावर सुद्धा एक प्रभावी सामाजिक एकजूट घडून आली असती.

यानंतर ५ फेब्रुवारी १९८४ ला याच प्रश्नावर मुंबईला एका विराट मोर्चाचं आयोजन केलं होतं. मीही गेलो होतो. अफाट जनसमुदाय बाबासाहेबांच्यावरील प्रेमामुळं एकत्र आला होता. मुंबईत प्रशीकच्या फार मोठ्या लंब्या-चौड्या बाता आम्ही ऐकल्या होत्या. पण तिथं मला चित्र वेगळंच दिसलं. मुंबईत प्रशीकचा बॅनर धरण्यासाठी मुंबईचा भाई कदम होता. हातात बॅनर गुंडाळलेला होता. मला पाहताच बॅनर उघडून एक बाजू माझ्याकडे दिली. एक बाजू अर्थातच स्वत: धरली. मुंबई प्रशीकचं कार्य किती जोरात चाललं आहे याचं स्पष्ट प्रात्यक्षिकच मी याची देही याची डोळा पाहून आलो. अशा लोकांनी आमच्यावर हुकूमत गाजवावी हे आंबेडकरी चळवळीचं दुर्दैव नव्हे तर काय ?

**मास मुव्हमेंटशी फारकत**

प्रशीक अभेद्य राखण्यासाठी मी प्रसंगी माझ्या तारुण्यसुलभ भावनांनासुद्धा मुरड घातली. संघटनेतील एक सभासद-विद्यार्थीनी माझ्यावर आसक्त झाली होती. परंतु तिला प्रतिसाद देणे माझ्या हाती नव्हतंच. मी वेळोवेळी नकार देऊनही ती विद्यार्थीनी मानायला तयार नव्हती. याबाबतीत अधिक खोलात जाणे योग्य होणार नाही. या प्रकरणाचा फायदा घेऊन मला बदनाम करण्याचा मोह ह्यांना टाळता आला नाही. या संधीचा फायदा उठवून मला समाजकारणातून उद्ध्वस्त करण्याचा चंग बांधला. कधीच अस्तित्वात नसलेल्या प्रेमप्रकरणाच्या बावड्या उठविण्यास प्रा. अंबपकर, प्रा. विनायक कांबळे, विजय कांबळे या त्रिकुटांने प्रत्येक कॉलेजवर जाऊन एक खास मोहीम उघडली. अर्थातच माझ्यावर

विश्वास असल्यामुळे विद्यार्थीबांधवांनी, जातील त्या ठिकाणी या त्रिकुटास काय वागणूक दिली ती मी इथे सांगू इच्छित नाही. माझ्या अनुपस्थितीत प्रशीकची दोन तीन वेळा मिटिंग बोलावून माझ्यावर घाणेरडे आरोप केले. मात्र माझ्या अनेक सहकारी कार्यकर्त्यांनी वेळोवेळी माझ्यावर माझ्या अनुपस्थितीत केलेल्या आरोपाचे समर्थपणे खंडन केले. पण त्याबरोबरच प्रत्यक्ष माझ्या उपस्थितीत हे आरोप करण्याचे आव्हानही दिले. या मित्रांचं विशेषतः गुलाब, रमेश, शशिकांत, विद्याधर व डी. बी. कांबळे याचे सहकार्य नसतं तर कदाचित प्रशीकचं अस्तित्वच संपून गेलं असतं. सध्या प्रशीकचे जे महत्त्व आहे ते माझ्यामुळं नसून या व इतर अनेक सहकाऱ्यांच्या माझ्यावर असलेल्या प्रगाढ विश्वसामुळंच, मी मात्र निमित्त.

मास मुव्हमेंटबद्दल मनात कमालीची, घृणा निर्माण झाली. आणि एक दिवस १६–१–८७ रोजी रात्री जेवण करून सहज बाहेर पडलो असता प्रा. अंबपकर भेटले व त्यांनी सांगितले की १७–१०–८७ रोजी मिटींग आहे. खरंतर मी जिल्हा प्रमुख, मला न कळविता मिटिंग घेणंच अवैध होतं. तरी म्हटलं एकदाचा काय तो निकाल लावून टाकू. रातोरात डी. बी., शशि, रमेश यांना निरोप पाठविले. विद्याधर कांबळेला त्यांनीच पत्र पाठविलं होतं. मिटींगला प्रशीकचे सभासद कमी पण मा.मु चे पदाधिकारी जास्त होते. के.डी.,विजय कांबळे यांच्यासह एकूण ३१ विद्यार्थी हजर होते. या बैठकीत माझ्यावर जे काय आरोप करावयाचे असतील तर माझ्यासमोर करावेत अशी विनंती केली. पण कोणीही उठले नाहीत. मग मी माझ्यावर खोटे नाटे आरोप करणाऱ्या सर्वांचा व ते आरोप खरे समजणाऱ्या राजा ढाले यांचा निषेध केला. त्यावेळी मला अत्यंत आदरणीय असलेल्या गौतमीपुत्रांनी सरळ मला उद्देशून ' गेट आऊट ' असे शब्द वापरले. मीही तयारीनंच गेलो होतो. मी सरळ सांगितलं की मी बाहेर तर जाणारच आहे पण ते तुम्ही म्हटलंत म्हणून नव्हे तर स्वेच्छेने मी स्वतःच सभात्याग करणार आहे. के. डी. नी मला समजावण्याचा प्रयत्न केला पण शेवटी पाच मिनिटींनी मी सभात्यागाची घोषणा करून बाहेर पडलो. माझ्यापाठोपाठ २४ मुलं बाहेर पडली. त्यावेळी गौतमीपुत्र काही सांगण्यासाठी म्हणून माझ्यापाठोपाठ खाली आले तेव्हा काही विद्यार्थींनी अनुचीत शब्दप्रयोग केले. विद्याधर कांबळे तर अंगावरच धाऊन गेला होता. मिटींगमध्ये झालेला माझा आपमान कुणालाच मानवला नाही. त्यानंतर त्याच सायंकाळी टाऊन हॉल बागेत बैठक घेऊन प्रशीकच्या नावामध्ये किंचित बदल करून भारतीय प्रशीक विद्यार्थी संघ या नावाखाली कार्यरत राहण्याचा निर्णय झाला.

दुसऱ्या दिवशी पेपरमध्ये बातमी वाचल्यावर कळले की ३१ पैकी आम्ही २४ सभासद निघून गेल्यावर उरलेल्या ७ सभासदांमधून ११ सदस्यांची कार्यकारिणी प्रा. गौतमीपुत्र कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली निवडण्यात आली. धन्य ते अध्यक्ष धन्य ती बैठक. चौकातल्या कुणीतरी कार्यकर्ता नसलेल्या रबरस्टँपची प्रशीकच्या

अध्यक्षपदी निवड झाली होती. हा चोकाककर नावाचा प्रशीकचा अध्यक्ष निवड झाल्यानंतर कोल्हापुरातील प्रत्येक कॉलेजवर व हॉस्टेलवर जाऊन विद्यार्थ्यांना भेटी देत होता. मात्र या भेटीमध्ये त्याला सातत्याने विद्यार्थी बांधवांचा विरोध होत गेला. कोणीही विद्यार्थी त्याला ओळखत नव्हते. चळवळीशी त्याचा कधी संबंध आलाच नव्हता. त्याला प्राशीकच्या जुन्या सभासदांची नावे तर माहीत नव्हतीच. परंतु त्याच्या अध्यक्षतेखाली निवडण्यात आलेल्या इतर पदाधिकाऱ्यांचीही नावे त्याला सांगता येत नव्हती. तो जिथं जिथं जाई तिथं तिथं त्याला 'रमेश जाधव कुठं आहेत ? ' तुम्हाला प्रशीकच्या आतापर्यंतच्या कार्यक्रमामध्ये आम्ही कुठंच पाहिलं नाही. "जाधव सरांना घेऊन या मगच आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवू" असं विद्यार्थीबांधवांच्याकडून विचारलं जात होते. काही कॉलेजीस व खेड्यांमधून तर त्याला अक्षरश: अपमानित करून पाठवलं. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. तो स्वत: माझ्या घरी आला व माझं सहकार्य मागितलं. वास्तविक माझ्या लोकप्रियतेचा फायदा उठवून घेण्याचाच उद्देश होता. मी त्याला एका अटीवर सहकार्य करण्यास तयार होतो. ती अट म्हणजे त्यांनी मा. मु. शी असलेला प्रशीकचा संबंध तोडून टाकावा. प्रशीक विद्यार्थी संघ, कोल्हापूर एक स्वतंत्र समावेशक असल्याचं जाहीर करावं. मात्र या अटी मान्य होणे शक्य नव्हतं. कारण मास मुव्हमेंटच्या कुबड्या फेकून देऊन प्रशीक चालविणं त्याला शक्यच नव्हतं. तेवढी त्याची कुवतच नव्हती. ' नेतृत्वाला हपालेली एक व्यक्ती ' एवढंच त्यांचं वर्णन करता येईल. मी त्यांना दाद देत नाही हे समजलं तेव्हा मला सदरबझार कोल्हापूर येथे येऊन दम देण्याचाही प्रयत्न केला. परंतु सदरबझार येथील मार खाण्याची वेळ त्यांच्यावर आल्यावर मी माझ्या मित्रांना शांत करून त्याना तिथून सहीसलामत पाठवण्याची सोय केली. त्यावेळी गेलेला चोकाकर आजपर्यंत मला भेटलाही नाही व त्याच्या प्रशीकचं नावही आजतागायत कधी ऐकायला मिळालं नाही.

**. . . आणि जोगेंद्र कवाडे सर भेटले**

संघटनेची लोकप्रियता दिवसेदिवस वाढत होती. जिल्ह्याच्या बाहेरही संघटनेच्या शाखा उघडण्याबद्दल पत्रे येत होती. सांगली, कराड, रत्नागिरी अशा भागातील कार्यकर्ते भेटत होते. सांगलीला यापूर्वीच तांदुळवाडीला एक शाखा उघडण्यात आली होती. पर्यायानं मला भरपूर प्रसिद्धी व लोकप्रियता मिळत होती. मुंबई, नागपूरच्या नेत्यापर्यंत आमच्या संघटनेचे कार्य पोहचले होते. याचवेळी (१९८८) दलित मुक्ती सेनेचे सरसेनापती प्रा. जोगेंद्र कवाडे सरांनी मला निरोप पाठवला. विद्याधर कांबळेने माझ्याबद्दल सरांना बरंच काही सांगितलं होतं. आंबेडकरी चळवळीत स्वत:ला झोकून दिलेला एक सच्चा आंबेडकरवादी मला स्वत: भेटायला बोलावणं पाठवतोय याचा मला अभिमान वाटला. मी तावडतोब त्यांना भेटायला गेलो. नागाव येथे जाहीर सभेचा कार्यक्रम होता. मी पोहचलो त्यावेळी

कार्यक्रम संपत आला होता. नंतर जेवण होते. त्यामुळे सरांचे जेवण झाल्यानंतर त्यांना भेटणं होईल म्हणून मी वाट पाहत होतो. इतक्यात कवाडे सर जेवणासाठी माझी वाट पाहत आहेत असा निरोप तीनचार कार्यकर्ते घेऊन हा खरंतर मला सुखद धक्का होता. क्षणाचाही विलंब न लावता मी गेलो.

यापूर्वी राजा ढालेनी कोल्हापूर भेटीत शशिकांत कांबळे या कार्यकर्त्याला सोळंकी लॉजवर भेट घेण्यासाठी गेलो असता माझ्यापासून फोडण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी टी. एस. कांबळे हजर होते. माझ्याविरुद्ध भडकवण्याचा प्रयत्न ते व त्यांच्या चमूने केला होता. शशिकांत कांबळे हे प्रशीकचे खंदे कार्यकर्ते आहेत. प्रशीक ते भारतीय प्रशीक या वाटचालीत त्यांनी मोलाची साथ मला दिली आहे. राजा ढालेच्या प्रलोभनाला ते बळी पडणे शक्यच नव्हतं. त्यांनी सडेतोड उत्तर देऊन आमची अभेद्यता राजा ढालेंना दाखवून दिली होती. माझ्या मित्रांनाही फोडण्याचा प्रयत्न मास मुव्हमेंटने केला होताच. परंतु प्रलोभनाला बळी पडणारी या कार्यकर्त्यांची जात नव्हती. प्रशीकच्या वाटचालीत आजतागायत ही मंडळी आपल्या भूमिकेशी ठाम आहेत.

## प्रा. गौतमीपुत्रांचा शाप ?

मा. मु. च्या कार्यकर्त्यांनी माझी बदनामी करण्याचे प्रयत्न थांबवावेत अशी विनंती करण्यासाठी डी. बी. कांबळे व शशिकांत कांबळे हे प्रा. गौतमीपुत्रांच्याकडे कॉमर्स कॉलेजवर गेले असता, विनंती ऐकणे तर दूरच पण ' रमेश जाधव व तुम्ही आयुष्यात कधीच यशस्वी होणार नाही ' असा शाप देऊन त्यांची पाठवणी केली.

खरंतर शिष्यांना शाप देणं ही हिंदूधर्मीय गुरुंची परंपरा सर्वश्रुतच आहे. परंतु डॉ. आंबेडकर व बुद्धांच्या तत्त्वज्ञानाची परंपरा सांगणाऱ्या गौतमीपुत्रांनी त्यांच्या शिष्यांना शाप देण्याचा प्रकार अनाकलनीय आहे.

## रुकडी शाखा

प्रशीक विद्यार्थी संघाचे वारे आता जोमानं खेड्यांपाड्यांतून वाहत होते. अनेक विद्यार्थीकार्यकर्ते प्रशीकचे सभासद होत होते. आपापल्या गावात प्रशीकची शाखा स्थापन करणे बाबत माझ्याशी विचारविनिमय करीत होते. हातकणंगले तालुक्यातील रुकडी हे गाव याला अपवाद नव्हते. रुकडीतही आमचे बरेच कार्यकर्ते होते. विशेषत: डी. बी. कांबळे हा आमचा कार्यकर्ता रुकडीमध्ये विद्यार्थ्यांना संघटित करीत होता. आणि त्यातूनच रुकडीत शाखा उघडण्याचा संकल्प पुढे आला. मी त्यावेळी बेळगावला गेलो होतो. रुकडीतील मास मुव्हमेंटचा एक कार्यकर्ता जे. एस. कांबळे याचं मला एक पत्र आलं. ' आम्ही रुकडीमध्ये प्रशीकची शाखा उघडतोय आपण बैठकीला उपस्थित राहून विद्यार्थ्यांना सहकार्य करावे '. पत्र मिळताच तातडीने रुकडीला आलो. रुकडी समाज मंदिरात बैठक आयोजित केली होती. विद्यार्थ्यांचा उत्साह दांडगा होता. शंभरावर विद्यार्थी हजर होते. काही

प्रतिष्ठित, काही वडीलधारी मंडळीही उपस्थित होती. बैठकीच्या अध्यक्षस्थानी माझीच निवड जे. एस. ने केली. माझ्या कार्याचा परिचयही त्यानेच करून दिला. डी. बी. कांबळे या आमच्या कार्यकर्त्या मित्राने कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. बैठक झाली. प्रशीकच्या उद्घाटनाची तारीख ठरली. नामफलक कुठं लावायचा हेही ठरलं. पदाधिकारी निवडले. शाहू कॉलेजचा माझा जुना मित्र राहुल कांबळे अध्यक्षस्थानी निवडला गेला. इतर पदाधिकारीही निवडले.

...आणि दोन दिवसानंतर पेपरला बातमी आली, "रुकडीत प्रशीकची शाखा" आणि या बातमीने वादळ निर्माण केलं. ही बातमी कोल्हापुरातील मास मुव्हमेंटच्या कार्यकर्त्यांनी वाचली. त्यांनी जे. एस.ला बोलवून त्यांचे कान भरले. मास मुव्हमेंटची शाखा रुकडीत असताना प्रशीक तिथे कशाला ? विद्यार्थ्यांना मास मध्ये सामील करून घ्या आणि विशेष म्हणजे पेपरला अशी बातमी दिली कोणी ? कोणाची परवानगी त्यांनी घेतली ? आणि पोरांना भडकावण्याचं काम मी करतोय हा माझ्यावर आरोप. हे करण्यापाठीमागे जो हात होता तो विनय कांबळेचा. पुन्हा त्याची री ओढणारे बाकीचे होतेच.

जे. एस. कांबळेनं रुकडीत येऊन हे जसंच्या तसं ओकलं. आणि शाखा इथे उघडता येणार नाही असं विद्यार्थ्यांना त्याने सांगितलं. विद्यार्थी भडकले. त्याला शिव्या देऊ लागले. तेव्हा लंगडं समर्थन म्हणून 'घटनेत तसा उल्लेख नाही' असं सांगितलं. विद्यार्थी चिडले. त्यांच्या उत्साहाला सुरुंग लागला होता त्यांनी डी. बी. कांबळे यांना घेऊन पुन्हा एकत्र येऊन इथेच प्रशीक विद्यार्थी संघाची शाखा स्थापन करण्याचा प्रयत्न सुरू केला. परंतु रुकडीत विद्यार्थ्यांची एकजूट होऊ नये, खास म्हणजे प्रशीकची स्थापना होऊ नये यासाठी जिल्हा पातळीवर प्रयत्न होऊ लागले. जे. एस. आणि उत्तम चोपडे माझ्याबद्दल रुकडीत सांगू लागले. माझी बदनामी करण्याचा प्रयत्न करू लागले. जेणेकरून रुकडीतील विद्यार्थी फोडण्याचे निकराचे प्रयत्न होऊ लागले. दरम्यान विनायक कांबळे याने रुकडीत उत्तम चोपडेच्या घरात डी. बी. कांबळे यांना बोलावून धमकी देण्याचा प्रयत्न केला. प्रशीक इथे उघडली तर वाईट परिणाम होतील आणि त्याबरोबरच माझ्याबद्दल वाईटही सांगून आमच्या चळवळीला आणि विद्यार्थ्यांना फोडण्याचा प्रयत्न केला. पण आमच्या डी. बी. कांबळेंनी 'प्रशीक इथे स्थापन होणारच, कोणाला काय करायचं ते करू देत.' ही उलट धमकी दिलेली त्यांच्या ध्यानात असेलच. या प्रकाराने आमचे कार्यकर्ते खचले नाहीत. आमच्या विद्यार्थ्यांची मने बळकट करायला या घटनांचा फायदा झाला.

### ...आणि दिवस उजाडला

मास मुव्हमेंटशी असलेले धागेदोरे आम्ही तोडले होते. त्याला कारणे बरीच होती. मी ती ओघाने लिहिली आहेतच. खरं तर विद्यार्थ्यांनी स्वतः स्वतःचे निर्णय

घ्यायला शिकलं पाहिजे. त्यांच्यावर कोणाची हुकुमशाही नको. तो बाबासाहेबांसारखा स्वतंत्र, स्वयंभू विचारांचा बनला पाहिजे ही आमची धडपड होती. पण मासचे कार्यकर्ते विद्यार्थ्यांना समजून घेत नसत. त्यांची कायम पिछेहाट करीत. वेळोवेळी विद्यार्थ्यांना नाराज करीत होते. आणि यातूनच विद्यार्थ्याला समजून घेणारा म्हणून माझ्याभोवती वलय निर्माण झालेलं होतं.

१७ जानेवारी १९८८ रोजी आम्ही टाऊन हॉल बागेत बैठक घेतली. 'भारतीय प्रशीक विद्यार्थी संघ' या नावाने काम करायचं ठरलं. आणि याचवेळी डी. बी. कांबळेंनी "भारतीय प्रशीक'ची पहिली शाखा रुकडीत स्थापन होईल असं जाहीर केलं. खरं तर रुकडी हे गाव मास मुव्हमेंटचं नाक होतं. आणि म्हणून फार मोठ्या प्रमाणात विरोध रुकडी शाखेला होत होता.

आमच्या इतर कार्यकर्त्यांनी अहोरात्र प्रयत्न केला. आणि भारतीय प्रशीक विद्यार्थी संघाचा बोर्ड रुकडीत उभा राहिला. ७ फेब्रुवारी १९८८ रोजी रुकडीत शाखा उद्घाटनाचा कार्यक्रम जाहीर झाला. समाज मंदिरासमोर मंडप उभा केला. पताका लावल्या, स्पीकर लावला. कार्यक्रमाला कुठंतरी गालबोट लावण्याचा प्रयत्न मास मुव्हमेंटचे कार्यकर्ते करीत होते. समाजाच्या मालकीच्या असणाऱ्या खुर्च्या, टेबल, आम्हाला दिला नाही. काहींनी मंडपाचे खांब उपटण्याचा प्रयत्न केला तर काहींनी वीजपुरवठा बंद करण्याचा प्रयत्न केला.

रूकडीत वातावरण तंग आहे. शाखा उद्घाटन कार्यक्रमाच्या वेळी भांडण होईल ही आगाऊ सूचना इचलकरंजी शाखेला समजलेली. घोषणांनी आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहाने वातावरण फुलून गेले होते. माझ्या हस्ते नामफलकाचे उद्घाटन झाले. भाषण झाले, आमच्या कार्यकर्त्यांची भाषणे झाली. आयु. ब्राह्मणे (नागपूर) हेही उपस्थित होते. कार्यक्रम व्यवस्थित संपन्न झाला. कार्यकर्ते आपापल्या गावी गेले. जाताना नवा उन्मेश घेऊन गेले. न भतो असा हा कार्यक्रम झाला. पुढे कितीतरी दिवस याबद्दल मिल क्लार्कवर चर्चा सुरू होती.

## हुपरी लाँग मार्च

प्रशीकला फोडण्यात दलित चळवळीतील काही वरिष्ठ नेत्यांना थोडेफार यश मिळाले होते. विशेषतः मा. मु. चे कार्यकर्ते संधी मिळेल तेव्हा आम्हाला बदनाम करण्याचे प्रयत्न करीत होतेच. आमच्या विरोधात बोलत होते. यामुळं आमच्या कार्यामध्ये एकप्रकारची उदासीनता आल्यासारखी वाटत होती. मला विद्यार्थीबांधव पुन्हः पुन्हा कार्यरत राहण्याचा आग्रह करीत होते. विशेषतः रूकडी येथे 'भारतीय प्रशीक विद्यार्थी संघाच्या प्रथम वर्धापनदिनानिमित्त कविसंमेलनाचा कार्यक्रम आयोजित करून पुन्हा एकदा विद्यार्थी चळवळ गतीमान करावी असं विद्यार्थी, विशेषतः डी. बी.आर. सी. सुचवित होते. शेवटी रूकडी येथे कविसंमेलन भरविण्यात आले. रिपब्लिकन नेते मा. ई. कुरणे यांचे हस्ते उद्घाटन झाले

कार्यक्रमाचे नियोजित अध्यक्ष शशी गजवाणी न येऊ शकल्यामुळे माझ्याच अध्यक्षतेखाली कविसंमेलन पार पडले.कार्यक्रमास बरेच नवोदित कवी उपस्थित होते. याच्या एक दिवस आगोदर हुपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याची विटंबना करण्याचा अघोरी प्रकार प्रतिगामी शक्तींनी केला होता. दलित पक्ष संघटनांनी विविध स्तरावर या प्रकाराचा निषेध केला होता. एक दिवस कोल्हापूर बंदचा आदेशही सर्व पक्ष संघटनांनी ( दलित ) दिला होता. मी व माझे सहकारी सकाळी ७ वाजल्यापासून १०/१२ जणांच्या टोळीने शहरातील सर्व व्यवहार बंद ठेवण्याचे आवाहन करीत होतो. ११ वाजता मोठी मिरवणूक निघाली परंतु रिपब्लिकनचे 'जालिंदर जमादार' यांच्याशी सर्वच दलित कार्यकर्त्यांचा मिरवणुकीचा मार्ग ठरविण्यावरून खटका उडाला आणि हा वाद पुढेही दिसून आला. रिपब्लिकनच्या एका गटाने (गवई) या बंदमध्ये भाग घेतलाच नव्हता.

नंतर दत्ता जाधवनी सर्व दलितपक्ष संघटनेच्यावतीने कोल्हापूर ते हुपरी असा लाँग मार्चचा कार्यक्रम ठरविला. दत्ता जाधवबाबासाहेब वडगावकर वगैरे पँथरचे नेते यासाठी खूप राबले. विद्यार्थ्यांच्या परीक्षा असल्यामुळे आम्ही मर्यादित प्रचार केला. मला १५ ते २० हजार लोक यावेत इतका प्रचार पँथर नेत्यांनीच केला होता. मात्र पोलीस खात्याने दडपशाही मार्गाने गावागावाहून येणाऱ्या कार्यकर्त्यांना आधीच कोंडीत पकडले होतं. लोकांना अटक करून सांगली, सातारा, येरवडा इत्यादी ठिकाणी जेलमध्ये पाठविले होते. दत्ता जाधव, आवळे यांना मोर्चाच्या दिवशी सकाळीच अटक करण्यात आली होती,

सकाळी दहाच्या दरम्यान बाबासाहेब वडगावकर, मी, डी. बी. कांबळे, राजू क्षिरसागर असे चौघे बिंदू चौकात आलो. आमच्या लोकांना बिंदू चौकात येऊ न देण्यात पोलीस खाते यशस्वी ठरले होते. ३५ ब कलम पुकारण्यात आलं होतं. या कलमानुसार ५ पेक्षा अधिक लोकांना एकत्र येण्यास मज्जाव होता. आम्ही चौघे बिंदू चौकात येताच सब इन्स्पेक्टर झुंजारे व त्यांच्या सहकार्यांनी आम्हाला घेराव घातला. आम्ही चौघे असल्यामुळे ३५ ब कलमाचा भंग होत नाही असं मी त्यांना सांगितलं पण त्यांनी ऐकून घेतलं नाही. आम्हाला सरळ धक्काबुक्की करत जीपमध्ये कोंबलं. बाबासाहेब वडगावकर मात्र खरोखरच यावेळी खऱ्या क्रांतिकारासारखे वागले. झुंझारेनी त्यांची कॉलर धरताच त्यांनी झुंझारेना कडक शब्दांत कायदा हातात न घेण्याविषयी बजावले. परंतु मायबाप सरकार प्रतिगाम्यासारखेच वागलं. पुतळ्याची विटंबना करणारे खुशाल मोकळे फिरत असताना समतेसाठी संघर्ष करणाऱ्या दलित कार्यकर्त्यांना मात्र अटक केली जात होती. आम्हाला अटक करून मार्केट यार्ड मधील जनावरांच्या गोठ्यात कोंबलं. आमच्या आधीच तिथं तीनचारशे कार्यकर्ते कोंबण्यात आले होते. तिथं गेल्यानंतर मी पाणी मागितलं तर पोलीस अधिकारी के. एल. बिष्णोई या

अधिकाऱ्यानं मला एक घाणेरडा ड्रम दाखवून त्यातील पाणी पिण्यास सांगितलं. परंतु मी सरळ त्यांना सुनावलं की त्यांनी सत्याग्रहींसाठी तावडतोब पाण्याचा टॅन्कर मागवावा. विष्णोई हा तसा अत्यंत कडक शिस्तीचा पोलीस अधिकारी म्हणून ओळखत होतो. पण सत्याग्रहींच्या बाबतीत मात्र त्यांनी शिस्त गुंडाळून ठेवली असावी. शेवटी त्यांना टॅन्कर मागवावाच लागला. तिथेच आम्ही क्रांतिमंच स्थापन करून विद्रोही कवितांचे वाचन सुरू केले. सत्याग्रही कमी पण हत्यारबंद पोलीस अधिक अशा परिस्थितीत आम्ही पोलिसांच्या निषेधाच्या घोषणा देत होतो. शेवटी रात्री बारा वाजता आम्हाला बिंदू चौक सबजेलमध्ये डांबण्यात आले. आमच्यापैकी वडगांवकरांना सांगली जेलला पाठविलं गेलं. दत्ता जाधव माझ्या बराकीतच होते. पुन्हा जेलमध्ये आंबेडकरी गीत, कविता सुरू झाल्या.

दुसऱ्यादिवसापासून मात्र सत्याग्रहींचे धैर्य संपायला सुरू झालं. कारण दुसऱ्या दिवशी नेताजी कवाळे व त्यांच्या सहकार्यांची सुटका (जामीनवर) करून घेतली गेली. दत्ता जाधवांच्या बाहेरील मित्रांनी त्यांच्या सुटकेचे प्रयत्न सुरू केले. खरंतर जेलमध्ये दत्ता जाधवांना बघून मला धीर आला होता. मात्र माझ्या अपेक्षेप्रमाणे ते वागले नाहीत. उदा० सामान्य कैद्यांना देण्यात येणारं जेवण मी नाकारून कमीत कमी चांगली भाजी तरी मिळावी, चहा, वर्तमानपत्रे मिळावीत यासाठी मी जेलर जाधव यांच्याशी वाद घातला. कैद्यांना ज्याप्रमाणे एका विशिष्ट पोजमध्ये गिनतीसाठी बसावं लागतं ते मी मान्य केलं नाही. परंतु जाधवांनी यावेळी माझ्यकडे दुर्लक्ष का करावं हे त्यावेळी समजलंच नाही. मात्र दुसऱ्यादिवशी त्यांच्या अनिल माने वगैरे कार्यकर्त्यांनी त्यांच्या वैयक्तिक सुटकेसाठी प्रयत्न सुरू केले.

माझे बाहेर असलेले सहकारी रमेश, शशी यांना हे आवडलं नाही. त्यांनीही मला, डी. बी. ना सोडवून घेणे आपल्या प्रतिष्ठेचा प्रश्न करून मला व जिल्हाध्यक्ष डी. बी. ना साठ तासानंतर सोडवून घेतलंच. दरम्यान इयत्ता १० वीच्या परीक्षेला बसलेल्या ज्या विद्यार्थ्यांचे पेपर्स होते त्यांना सोडविण्यासाठी जेलर जाधव यांना विनंती केली. त्यांनीही सहानुभूतीने प्रयत्न करून (कायद्यानेच) अशा विद्यार्थ्यांना सोडण्याची सोय केली.

जेलमधील ज्येष्ठ नेत्यांचा अनुभव मात्र मन विषण्ण करणारा होता. जेलमधून बाहेर आल्यानंतर जालिंदर जमादार, माई कुरणे यांच्या सहकार्याने काही सत्याग्रहींची सुटका करण्यात मी यशस्वी ठरलो.

लॉंगमार्च जरी यशस्वी झाला नसला तरी आमच्या सत्याग्रहींनी जे धैर्य, निष्ठा दाखविली ती कौतुकास्पद होती. दत्ता जाधवांनी या प्रकरणी सर्व दलित नेत्यांना विश्वासात घ्यायला हवं होतं पण. . .मास मुव्हमेंट (कोल्हापूर)ने मात्र कुठल्याही प्रकारे सत्याग्रहींना सहकार्य केले नाही. आपल्या माणसांना आपलं म्हणण्याच्या प्रवृत्तीचा अभाव असल्यामुळेच लॉंगमार्चचा उद्देश पूर्णार्थानं सफल झाला नाही.

## घोटवडे–पाणी–लाँगमार्च

पन्हाळा तालुक्याच्या एका कोपऱ्यात वसलेलं ' घोटवडे ' हे खेडं स्वातंत्र्य मिळून चाळिशी ओलांडून गेली तरी अद्यापही जातीयता टिकवून आहे आणि यातूनच तेथे दलितांना हीनत्वाची वागणूक मिळत होती. घोटवडेला पाण्याच्या प्रश्नावरून सवर्ण व दलित यांच्यात वाद सुरू झाला. वादाचे रूपांतर सामाजिक बहिष्कार टाकण्यात झाले. कोल्हापूर जिल्ह्यातील गावोगावी ही वार्ता पसरलेली होती. अनेकांनी याचा निषेध केला. आर. वी. कांबळे यांनी यात विशेष लक्ष दिले होते.

घोटवडे येथील दलितांना आधार द्यावा, त्यांना धान्य, अन्न द्यावे या हेतूने कोल्हापूर जिल्ह्यातील कोणत्याच घटना, प्रसंगापासून आमची विद्यार्थी चळवळ अलिप्त नव्हती. आमच्या विद्यार्थ्यांनी सायकलवरून जायचे ठरविले. मी घरच्या अडचणीमुळे तेव्हा बेळगावलाच होतो. आमच्या प्रमुख कार्यकर्त्यासमवेत अनेक विद्यार्थी घोटवडे येथे गेलो.

कोल्हापूर ते पन्हाळा, घोडवडे हा तसा लांबचा पल्ला. त्यात विद्यार्थी आणि इतर संघटनांचे मिळून पाचशे कार्यकर्ते गेलेले होते. दत्ता जाधव, यदुनाथ कांबळे ( दलित मुक्ती ), जालिंदर जमादार ही नेतेमंडळी आलेली होती, पण एस. टी. ने हे महत्त्वाचं.

आमचे विद्यार्थी घोटवडे गावात गेले. बाबासाहेब आंबेडकर यांच्या घोषणांनी सारा मुलुख दुमदुमत होता. लाँगमार्च निघणार म्हणून पोलीस फोर्स होताच. आणि तिकडे सवर्ण मंडळीही टपून बसलेली होती. मोर्चा गावात न्यायचा हा काही संतप्त कार्यकर्त्यांचा निर्णय. पण आमच्या विद्यार्थ्यांनी त्याला नकार दिला.

समाजाजवळील पाराच्या झाडाखाली सभा भरली. सभेत दत्ता जाधव जालिंदर जमादार आणि यदुनाथ कांबळे यांची भांडणे झाली. आपण आलो कशासाठी हे ते विसरले होते. प्रत्येकजण भडक भाषण करू लागला. सवर्णांना शिव्या देऊ लागला. त्यांचा निषेध करू लागले. सवर्णांची घरे जवळच होती. ते खवळले आणि काठ्या–कुऱ्हाडी, गज घेऊन त्यांनी लाँगमार्चवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. दोघात दगडफेक झाली. पोलिसांनी हवेत गोळीबार केला. लाठीमार केला तेव्हा कुठे जमाव पांगला, पण म्हणून ते शांत झाले नाहीत. जिथून लाँगमार्च परत फिरत होता त्या वाटेवरील उसाच्या पिकात ते सवर्ण काठ्या घेऊन बसले होते. पोलिसांच्या गाड्या तीन–चार होत्या. त्यांनी कार्यकर्त्यांना पूर्ण संरक्षण दिले पण तरीही ट्रकमधून येणाऱ्या आमच्या कार्यकर्त्यांवर दगडफेक झाली. काहींची डोकी फुटली, सायकली खराब झाल्या. एक गाडी पुढे आणि दुसरी मागे अशा बंदोबस्तात पोलिसांनी लाँगमार्चवाल्यांना सुरक्षित आणले. उंच डोंगरावरून भडकलेले सवर्ण वरून खाली दगड मारीत होते. त्यात लहानापासून ते मोठ्यापर्यंतचा सहभाग होता.

पोलिसांचे संरक्षण नसते तर लॉंगमार्चमध्ये भाग घेतलेल्यांच्या चिंधड्या उडाल्या असत्या. जीव मुठीत धरून लॉंगमार्च चालत येत होता. अंधार पडलेला, रस्ता कच्चा, आणि सगळे तहानलेले, भुकेलेले होते.

लॉंगमार्चचं नेतृत्व करणारे नेते मात्र विशेषत: दत्ता जाधव, जालिंदर जमादार, यदुनाथ कांबळे एस. टी. ने कधीच पुढे आले होते.

दुसऱ्या दिवशी पेपरला फोटो आला, बातमी आली. 'दलित पँथरच्यावतीने लॉंगमार्च' आणि नाव होतं दत्ता जाधवचं. वास्तविक प्रत्येक संघटनेच्या कार्यकर्त्यांचा त्यात समावेश होता. दत्ता जाधव तर कधीच पुढं आला होता. सुरक्षित आणि म्हणून लॉंगमार्च कोल्हापूरकडे येताना जे काही बोलत होता, शिव्या देत होता त्याला कारण हे नेते होते.

## नवगठीत रिपब्लिकन पक्ष

जयभीम म्हणत लोकप्रियतेचा जोगवा मागणाऱ्या काही दलित नेत्यांच्यामुळं आंबेडकरी चळवळीच्या कार्यकर्त्यांकडूनच आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा पराभव होत असल्याचं पाहण्याचं दुर्भाग्य दलित चळवळीला लाभलं होतं. बाबासाहेबांचे अनुयायी दलित जनतेची आपसात वाटणी करुन घेऊन दुबळे बनत चालले होते. दलित नेत्याच्या नेतृत्त्वासाठी चाललेल्या ओढाओढीमुळे सर्वत्र दलितपक्ष संघटना कमकुवत होत चालल्या होत्या. या कमकुवतपणामुळे जातीय संघर्षात दलिताचे बळी जात होते. अशाच एका संघर्षात चेंबूरच्या एका युवकाचा बळी गेला आणि मुंबईतील नऊ दलित तरुणांनी नेतृत्वासाठी चढाओढ करणाऱ्या नेत्यांना एकत्रित आणण्यासाठी स्वत:च्या प्राणांची बाजी लावली.

या नऊ दलित तरुणांनी दलित नेत्यांचे ऐक्य व्हावे यासाठी ऐतिहासिक आमरण उपोषण आरंभिले. चेंबूरमध्ये बळी पडलेल्या युवकांमुळे व या उपोषणवीर आंबेडकरी चळवळीच्या पुरस्कर्त्या युवकांच्यामुळे दलित नेत्यांना खडखडीत जाग आली.

## आणि तो सुदिन उजाडला

६ जानेवारी, १९९० रोजी दादरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाच्या साक्षीने लाखो आंबेडकर अनुयायांच्या उपस्थितीत सर्वच दलित नेत्यांनी जाहीररीत्या एकत्र येण्याची शपथ घेतली. सर्व संघटना बरखास्त करून 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया'च्या निळ्या ध्वजाखाली सर्व नेते एक झाले. दलित चळवळीच्या कार्यकर्त्यांनी जिवाचं रान करून दलित नेत्यांच्या शपथा घेतल्या. प्रत्येक दलित कार्यकर्त्याच्या मनातील खळबळ शांत झाली. प्रत्येक सामान्य कार्यकर्ता आपल्या भागात जाऊन नवनिर्मित रिपब्लिकन पक्षाच्या, बाबासाहेबांच्या स्वप्नातील संघटनेचा प्रचार आणि प्रसार करण्याच्या शपथा घेऊन मुंबईहून परतले.

मात्र ही एकजूट म्हणजे एक स्वप्नच ठरलं. येऊ घातलेल्या महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकीत कुठल्या पक्षाशी युती करायची यावरून पुन्हा नेत्यांत वाद सुरू झाले. . . .विकोपाला गेले. निवडणुकीत तटस्थ राहणारा गट, जनता दलाला सहकार्य करणारा गट, काँग्रेसला सहकार्य करणारा गट असे तीन गट पुन्हा निर्माण झाले. नऊ उपोषणवीरांच्या प्रामाणिक भावनेचा अपमान झाला. नेता निवडीवरूनही जिल्ह्याजिल्ह्यात वाद सुरू झाले. अर्थात कोल्हापूर जिल्हाही त्याला अपवाद नव्हता.

खरंतर ' ऐक्य होणार ' या बातमीमुळं आम्ही 'भारतीय प्रशीक'चे कार्यकर्ते उत्साहीत झालो होतो. एक जानेवारी रोजी आम्ही सर्व भारतीय शाखा प्रमुखांना आपापल्या शाखांचे बोर्ड पांढरे करण्याचे आदेश दिलेले होते. इचलकरंजीला सर्व दलित पक्ष संघटनांच्या बैठकीमध्ये भारतीय प्रशीक विद्यार्थी संघ सर्वांत आधी बरखास्त करण्यात येईल असे सांगितले होते. एक तारखेला सर्व पक्ष, संघटनांचा मेळावा घेण्याची घोषणा करून जिल्ह्यातील सर्व दलित नेत्यांना दिनांक २६ पूर्वी पोहोचतील या बेतानं पत्रंही पाठविली होती. मात्र असा मेळावा घेण्याचं श्रेय आमच्यासारख्या तरुणांना मिळू देतील तर ते ज्येष्ठ नेते कसले ! दत्ता जाधव, ठिपकुले यांनी पुढाकार घेऊन ३० तारखेला दलितांचा मेळावा जाहीर केला. अर्थात श्रेय घेणे हा आमचा उद्देश कधीच नव्हता. मी तावडतोब सर्व कार्यकर्त्यांना एक तारखेचा मेळावा रद्द केला असून ३१ तारखेच्या मेळाव्याला हजर राहण्याबाबत सूचना पाठविल्या माझे सर्व सहकारी शाहू स्मारक भवन येथील सदर मेळाव्यास उपस्थित होते. मला मात्र काही अपरिहार्य करणांमुळे या मेळाव्यास हजर राहता आले नाही. मला या मेळाव्याच्या वेळी भारतीय प्रशीक विद्यार्थी संघास ऐक्य प्रक्रियेत सामील करून घेता येणार नाही असं स्पष्टपणे पँथर नेते दत्ता जाधव यांनी भारतीय प्रशीकचे जिल्हा प्रमुख डी. बी. कांबळे यांनी सांगितले. हा खरंतर मला फार मोठा धक्का होता. ज्या संघटनेचे अस्तित्व एका कुटुंबापुरतं मर्यादित आहे ( जिल्ह्यातील सर्वांनाच माहीत असलेलं हे उघड गुपित आहे ) अशा संघटनेला ऐक्य प्रक्रियेमध्ये सामील करून घेतले होते. परंतु भारतीय प्रशीकचं जाळं जिल्हाभरच नव्हे तर जिल्ह्याच्या बाहेरही पसरले असताना त्यांना ऐक्यापासून दूर ठेवणे हा करंटेपणा नव्हे तर काय आहे ? नाकापेक्षा मोती जड झाला म्हणून नाकच कापून टाकण्याचा हा प्रकार आहे. यामध्ये माझा आतमप्रौढी मारण्याचा फाजीलपणा मुळीच नाही.

अशा प्रतिकूल परिस्थितीत 'स्टुडंटस् मुव्हमेंट' ते 'भारतीय प्रशीक ' असा वाळवंटी प्रवास करत असताना मला जे अनुभवायला मिळालं. जे पाहिलं ते स्पष्टपणे सांगण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. आज मला जिल्हाभर एक प्रभावी कार्यकर्ता, एक चांगला संघटक म्हणून ओळखतात. यामध्ये खरंतर मी काही विशेष केलं आहे असं मला कधी वाटतच नाही. प्रशीक ते भारतीय

प्रशीक हा प्रवास चालू असताना अनेक माध्यमांचा वापर मी केला. नवोदित कवींच्या सहकार्यानं कवीसंमेलन, काव्यस्पर्धा इत्यादी माध्यमानं आंबेडकरी विचारांचा प्रचार आणि प्रसार केला. तर कधी माझे मित्र रमेश कांबळे यांच्या सहकार्याने समाजातील अनिष्ठ रूढी, अंधश्रद्धा मोडून काढण्यासाठी खेडोपाडी स्वखर्चाने ( रमेश कांबळेंच्या ) जाऊन अंधश्रद्धा निर्मूलनाची प्रात्यक्षिके दाखविणं, गावांगावांतून व्याख्याने देऊन बाबासाहेबांच्या विचाराचे कार्यकर्ते तयार करणे अशा पद्धतीनं समाजाभिमुख होऊन कार्य करीत राहणं हेच भारतीय प्रशीकचं ध्येय होतं. यापुढेही अशाच पद्धतीनं भारतीय प्रशीक विद्यार्थी संघ कार्यरत राहण्याचा प्रयत्न करील.

मी कधीही, कुठेही कुणावरही आक्षेप घेतला असेल तर तो प्रामाणिक कार्यकर्त्याला येणाऱ्या अडचणींच्या पोटतिडकीमुळेच. कुणाला बदनाम करावं असा माझा कधीच उद्देश नव्हता आणि असणार नाही.

" जो बदनाम नसतो त्याला कुणीही बदनाम करू शकत नाही " हा माझा ठाम विश्वास आहे. आंबेडकरी विचारानं प्रेरीत होऊन कार्य करीत असताना मी एकच शिकलो,

" Leadership should not be the issue, the main thing is that we should remain strong and make no compramise with our Principles "

**– रमेश जाधव**

डॉ. आंबेडकरनगर,

बेळगांव–५९० ००२

●

# चर्मकार चळवळ आणि मी

— ना. म. शिंदे

परिवर्तनाची चळवळ महाराष्ट्रात महात्मा फुले, आगरकर, शाहू महाराज, वि. रा. शिंदे यांनी सुरू केली आणि ती तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. चळवळ हा शब्द जरी आता अलिकडे रूढ झाला असला तरी सामाजिक बांधिलकीचे माणूस जीवन जगण्याचे हक्क, अधिकार नैतिक पातळीवर आणि वास्तव जीवनात अग्रक्रमाने मान्य व्हावेत यासाठीची धडपड आणि सौम्य तसेच तीव्र लढे वर्षानुवर्षे चालू आहेत याचा परिपाक म्हणूनच साहित्यातून, भाषणांतून परिवर्तनाचे विचार जनमानसात पोहोचविण्याचे काम वेगवेगळचा संघटना करीत आहेत. त्यातच मर्यादित स्वरूप धारण करून का होईना वेगवेगळचा जाती आपापले अस्तित्व टिकवीत आणि जोपासत वेगवेगळचा मार्गाने आपली असलेली आणि नसलेली 'अस्मिता' अंगाखांद्यावर मिरवत आहेत.

एकंदर चळवळ म्हटली की स्वातंत्र्यानंतरच्या कालखंडात परिवर्तनाची चळवळ ही 'दलित चळवळ' अशी मान्यता पावत गेली. त्यात पूर्वाश्रमीचे महार आणि बौद्ध यांनी साहित्यातून आपल्या विद्रोही भावना मांडल्या. वैचारिक ताणतणावाची ठिणगी साहित्यामुळे समाजजीवनात पडली आणि दलितांची एक संघटना उभी राहिली.

त्याच काळात प्रादेशिक अस्मिता घेऊन उभी असलेली संघटना ही जोम धरत होती आणि धक्कादायक किंवा अतीव आश्चर्याची गोष्ट म्हणजे त्या संघटनेतील ९० टक्के लोक हे वर्गीकृत जाती–जमातीचे तसेच इतर मागासवर्गीय होते.दलितांची संघटना वेगळी स्थापन होताच प्रादेशिक संघटनेतील'दलित हरिजन महार' म्हणून ओळखली जाणारी जात बाहेर पडली आणि महारांची म्हणूनच दलित चळवळ संघटना व्यापक स्वरूपात दिसू लागली. त्याच वेळी वर्गीकृत जाती–जमातीचे महारेतर मात्र इतरत्र व प्रादेशिक संघटनेत आपली अस्मिता वेगळी आहे अशा अविर्भावात टिकून राहिले आणि पुढे स्पष्टपणे निदर्शनास येते ते ज्या ज्या वेळी दलित चळवळीस वेगवेगळ्या कारणासाठी वेगवेगळ्या संघटनेने विरोध केला. दलित–महार विरुद्ध दलित–महारेतर असाच लढा रस्त्यावर गल्लोगल्ली झाला.कारण दलित चळवळीत प्रामुख्याने महार आहे तर इतर ठिकाणी चळवळ वगैरे प्रकार नसतानाही महारेतर मिरवताना दिसतात. त्यांची वेगळी काही चळवळ आहे काय हा विषय इथं आहे.

महार समाजाच्या लोकसंख्येइतकाच दुसरा वर्गीकृत जातीतील समाज चांभारांचा आहे. परत मी इथे जाणीवपूर्वक चर्मकार समाज म्हणतो आहे तो 'चांभार' या एका जातीपुरता मर्यादित नाही. पूर्वाश्रमीच्या जातीव्यवस्थेचा विचार करता स्पष्ट होते की, मेलेल्या जनावराला गावाबाहेर नेऊन त्याचे कातडे काढावयाचे काम महार जात करायची. त्यानंतर 'ढोर' जात त्या कातड्याचे पक्के कातडे करीत असे आणि नंतर त्या कातड्यापासूनच्या वस्तू चांभार जात बनवित असे. म्हणजे महार, ढोर, चांभार हे चर्मापासून ते चर्मवस्तू बनविण्याच्या कार्यात सारखेच गुंतलेले. म्हणजे चांभार ही एक जातच फक्त चर्मकार होत नाही. तर ढोर, महार या जातीही चर्मकारच. या चर्मकारातील 'महार' नावाच्या जातीने दलितासाठी एक व्यापक चळवळ निर्माण केली.

त्या चळवळीची स्थापना १९७२ साल हे जर मान्य केले तर १९७२ ते १९९० या कालखंडात चर्मकार म्हणून संबोधल्या जाणाऱ्या चांभार आणि ढोर या जातीचे योगदान नगण्य आहे.तरीही चर्मकारांची चळवळ या विषयावरचे हे लिखाण मोठे धाडसाचे ठरावे. म्हणून १९७२ते१९७४ हा माझ्या गावातील माझा चर्मकाराशी संबंध व त्यानंतर १९७४ ते १९९० या काळातील माझा दलित चळवळीतील कार्यकर्त्यांशी आलेला संबंध, त्याचबरोबर चर्मकार संघटनेशी त्यांच्या कार्यकर्त्यांशी आलेला संबंध यांचे माझ्या दृष्टीस आलेले सत्यदर्शन देणे हाच भाग पुढे येईल.

दलित संघटनेच्या आक्रमकतेनंतर सवर्णांतील मराठा जातीने आपली संघटना दलिताच्या विरोधातच सुरुवातीला उभी केली. त्याचबरोबर प्रादेशिक संघटनेने आपले स्वरूप धर्मार्थाचे करून दलित चळवळीस शड्डू ठोकला. त्या कालखंडात रूढार्थाने 'चर्मकार' म्हणविले जाणारे काम करीत होते. कुठे होते याची ही गोष्ट.

नाही म्हटलं तरी प्रत्येक माणसाला स्वतःच्या जातीचं प्रेम आणि आकर्षण असतंच. कुणीही कितीही तत्त्वज्ञानाच्या गोष्टी सांगितल्या तरीही मी मुंबईत ज्या खात्यात नोकरीला रुजू झालो तेथे माझ्या जातीचे दोन माझे सहकारी होते.त्यातला एक माझ्या आडनावाचा. त्याने सहज चौकशी केली आणि आमची जात एक निघाली. ते गृहस्थ आमच्या जातीच्या सह. गृहनिर्माण सोसायटीत राहात. ती सर्व मंडळी पूर्वी धारावीत राहात होती आणि धारावी म्हणजे ढोर लोकांचा मोठा अड्डा. धारावीत ढोरांची एक संस्था, पंचमंडळ आणि शंकराचे देऊळ, एक हायस्कूल आहे.

धारावीतूनच सर्व ढोर जातीच्या संदर्भात विचारविनिमय व्हायचा. कारण मुंबईत इतरत्र जेथे कुठे ढोर जात राहाते ती पूर्वी केव्हातरी धारावीत वस्ती करून होती. तसं तर संपूर्ण भारतात धारावीतच ढोरांची संख्या ( एकत्रीत वस्ती करून राहणाऱ्या ) अधिक आहे.

एका दिवशी मला कळले की वीरशैव कक्कय्या (ढोर) समाजाचे अधिवेशन भरणार आहे. मी ही त्यात कर्यकर्ता म्हणून रुजू झालो. खरं तर माझ्या डोक्यात चळवळ मला उगीच वाटलं 'चहा ढोरही चळवळीत येणार.'

चळवळ म्हणजे जनजागृती. जनजागृतीच्या मोहीमेत आपले इप्सित साध्य करण्यासाठीचा विधायक कार्यक्रम. असा काही कार्यक्रम असेल तर आपणही एकसंघ होऊन परिवर्तनाच्या चळवळीला हातभार लावावा.

मी अधिवेशनाच्या संदर्भातील प्रत्येक मिटींगला हजर राहात होतो. अधिवेशनासाठी रावत होतो. आणि अधिवेशन तोंडावर आले होते. त्यापूर्वी एक मिटिंग ठरली. समाजातील व्यापारी, पैसेवाले आणि मोठ्या हुद्यांवरील सरकारी अधिकारी, वकील, डॉक्टर ही मंडळी पुढारी पुढारी म्हणून मिरवत होती ते सगळेच त्या मिटींगला हजर होते. मिटिंग सुरू झाली आणि निमंत्रण पत्रिका छापून आल्या होत्या त्याचा नमुना सादर होताच एकच गदारोळ सुरू झाला. कारण अध्यक्ष, उपाध्यक्ष, खजीनदार, सेक्रेटरीपदांचीच नावे छापली होती आणि त्या नावाला कडाडून विरोध झाला.

" हे सगळे एकमेकांचे नातलग आहेत. फोनवर समाजकारण करतात. ह्या लोकांना कुणी निवडले ? "

" मागच्या मिटींगमध्ये ही नावे मुकर्रर झाली होती.

" कोण कोण होतं त्या मिटींगला ? "

" सगळे होते. "

आम्ही एकमेकांच्या तोंडाकडे पाहू लागलो आणि निर्णय घेतला गेला.

" ह्या सगळ्या पत्रिका कॅन्सल करा. कुणाचीच नावे पत्रिकेवर असता कामा नयेत. नाहीतर संमेलन होऊ देणार नाही. " असा पवित्रा घेतला घेतला.

शेवटी निर्णय झाला. ह्या पत्रिका रद्द त्या कमिटीऐवजी एक कार्यकारिणी नेमली गेली आणि नव्या पत्रिका छापल्या गेल्या. त्यावर कुणाचेच नाव नव्हते.

संमेलनादिवशी काही लोकांनी विरोधातील पत्रके वाटली स्टेजवर कुणी कुणी बसायचे हा वाद निर्माण झाला. शेवटी ज्यांना स्टेटजवर बसायचे ते बसले व १९३९ नंतर, तब्बल ४० वर्षांनंतर दुसरे अधिवेशन संपले.

या अधिवेशनान काय दिले ? काही लोकांच्या एकमेकांशी ओळखी झाल्या पंगती उठल्या आणि काहींची लग्ने जमण्यास मार्ग खुला झाला. सगळी ढोर आपापल्या मार्गाने पांगली. आम्ही काही चळवळे मात्र गंभीरपणे विचार करू लागलो, ' यातून मार्ग काय ! '

महार,मांग, चांभार यांच्या संघटना कार्यरत आहेत. कार्यक्रम घेऊन आहेत. आपण कुठे जायचे ? त्यानंतर आम्हीही काही मिटींगा बोलाविल्या. चार सहा माणसं आली पुढे काहीच झालं नाही. आमच्यापैकी एकाने नंतर विवाह मंडळ स्थापून आपले स्वतःचे व आपल्या बहिणीचे लग्न जमवले व ते ही बरखास्त केले.

एकंदर वीरशैव कक्कय्या, कंसात ढोर हा शब्द असलेला, बॅनरवर हातात ढाल-तलवार घेतलेला राजस्थानी पोशाख घातलेला हा वयस्कर पुरुष आमचा मुळपुरुष. कक्कय्या म्हणत ही माणसं ढोरासारखी वागली. आज हातात ढाल तलवार घेणे नाही तरी त्याच हातात भरीव कार्यक्रम घेऊन समाजासाठी काही करावे ही इच्छा कोणताच नाही. हे चित्र स्पष्ट होते. दोनचार वर्षांनंतर २०-२५ वयाची तरुण मंडळी उठते. पुन्हा संघटनेचा विचार करतात चळवळीचा विचार करतात. आणि त्यांचे विचार हवेत विरतात. कारण सामाजिक बांधिलकी असल्याशिवाय कोणीही संघटना, चळवळ उभी करू शकत नाही. आणि ती बांधिलकी दोनचार जणांच्या मनात असून काही उपयोग होत नाही. त्यासाठी प्रभावी व मान्य नेतृत्व असावे लागते हे सत्य आहे.

जी गोष्ट ढोर या चर्मकारांची त्याहून चांभार हा चर्मकार याच्या भूमिकेत चळवळी संदर्भात फार मोठा फरक जाणवत नाही.

पुन्हा ढोर समाजाचे अधिवेशन दोन वर्षांनी झाले आणि तीच स्थिती. काहीच हाती आले नाही. त्या दरम्यान काही ढोर-चांभार तरुणांच्या २०-२२ संघटना अस्तित्वात आहेत. त्यांनी तरी एकत्र येऊन चर्मकार एकसंघ करावा हा विचार पुढे आला. आता चर्मचार एकसंघ कशासाठी ? तर सवर्णांबरोबरच प्रखर झालेल्या महारांना देखील आपली ताकद दाखविण्यासाठी. या संघटनांचे काही निर्माते हे राजकारणातील स्वप्नाळू होते. कुणाला कॉर्पोरेटर, कुणाला आमदार, कुणाला खासदार किंवा मंत्री व्हायची जबरदस्त इच्छा होती आणि आपल्या संस्थेच्या लेटरपॅडचा उपयोग ते कुठल्या ना कुठल्या पक्षाकडून निवडणुकीला तिकींट मिळविण्यासाठी ' काडीचा आधार ' म्हणून वापरत होते.

ही मंडळी ढोर जातीच्या मान्यवर (इतर समाजात) पुढाऱ्यांच्या सान्निध्यात होती आणि त्यामुळे ते एकमेकांना परिचित होते. अचानक एक टूम निघाली आणि एक तारीख निश्चित झाली. मराठा मंदिर या ठिकाणी चर्मकार–ढोर चांभाराच्या २०–२५ संघटनेचे विलीनीकरण करून एक भक्कम संघटना निर्माण करायचा घाट घातला गेला. त्या सभेत सगळ्या संघटना बरखास्त केल्या गेल्या. अनेकांचे सत्कार झाले भाषणं झाली आणि पुन्हा भेटायचे ठरले. गंमतीची गोष्ट ही की, प्रत्येकाला सर्व संघटीत संघटनेला आपल्या जुन्या संघटनेचे नाव असावे असे वाटत होते. तो प्रयत्नही फसला आणि सगळ्या संस्था वेगवेगळ्या पद्धतीने आपापल्या कार्यात पुन्हा मग्न झाल्या.त्याच वेळी एका संघटनेने ढोराच्या पुढाऱ्याला आपल्या संघटनेचे अध्यक्ष करून टाकले. खरं तर ती संघटना कुणाच्या खिजगणतीलाही नव्हती. परंतु ढोर समाजाच्या पुढाऱ्याला अध्यक्ष केल्याने त्या संघटनेचा आणि त्या संटनेच्या संस्थापकाचा प्रचंड आणि आयुष्याचे कल्याण करण्याइतपत पुढे फायदा झाला हे सत्य आहे. ढोर पुढारी त्या संघटनेचा अध्यक्ष करून तो संस्थापक थांबला नाही तर प्रसिद्धीस हापापलेल्या व राजकारणपदासाठी धडपडणाऱ्या एक-दोन ढोरांनाही कार्यकारिणीत घेतले व ती संघटना समस्त चर्मकारांची म्हणजेच ढोर-चांभारांची म्हणजेच ढोर चांभार आहे हा ढोल बडवायला सुरुवात केली. आणि त्या एकदोन ढोरांनीही त्यांना संगीतसाथ दिली.

परंतु ढोर–चांभाराची ही संघटना ढोरांना त चांभारांना कुठे मान्य होती ? आणि इतर ढोर–चांभार मंडळी आपल्या संघटना व त्यांची अस्मिता टिकविण्यास मरत होते.

महारेतरातील ढोर, चांभार, मांग ह्या प्रमुख दलित जातींतील लोक आजही आंबेडकर आणि आंबेडकरी चळवळ मान्य करू इच्छित नाहीत. याची चर्चेतून निघालेली मीमांसा अशी देता येईल.

१) डॉ. आंबेडकर हे आपल्या जातीचे नाहीत ही भावना सतत डोकावते आणि आपल्या वेगळ्या अस्तित्वासाठी इतर जातींच्या नेत्यांनी त्या समाजाला वेगळ्या विचारांशी निगडीत करून ठेवले आहे.

२) डॉ.आंबेडकरांनी माणूस म्हणून जगण्यासाठी जे जे संदेश दिले व ज्या ज्या चळवळी उभ्या राहिल्या त्यात महारेतर बोटावर मोजता येईल एवढेच सापडतात.

३) डॉ. आंबेडकरांच्या विचारप्रणालीतून निर्माण झालेल्या परिवर्तनाच्या चळवळीत फक्त महारबौद्धच जिवाच्या आकांताने उभा राहिला आणि झगडतो आहे, इतरांची भूमिका प्रामुख्याने बघ्यांची आहे.

४) इतरांवर कॉंग्रेस व हरिजन सेवकसंघाचा पगडा. त्यातच इतर राजकीय प्रवाहाची भेळमिसळही दिसते. राजकीय हितसंबंध जोपासणे हे समाजहितसंबंधाहून अधिक महत्त्वाचे मानले जाते. म्हणूनच दोन वेळा डॉ. आंबेडकर यांनाही स्वतःच्या

जातीतील व दुसऱ्या जातीतील दलितांकडून निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. डॉ. आंबेडकरांना एकमुखी बिनविरोध नेतृत्व सर्वांनी मिळून कधीच दिले नाही. तसे होते तर आज ह्या देशाचे चित्र अत्यंत वेगळे असते.

५) धर्माची अभेद्य भिंत आणि शिक्षणापलीकडं साहित्य वैचारिक बांधिलकी घेऊन वाचनाचा अभाव हे दिसते. एवढेच नव्हे तर आर्थिक सुबत्ता नसल्याने शैक्षणिक प्रगती नगण्य आहे आणि सवलती पदरात घेण्याची ताकदही मर्यादित राहिली आहे. सुधारणा किंवा बदल हा काही कुटुंबापुरताच असून संपूर्ण दलितांचे जीवनमान पूर्वीच्या पातळीपलीकडे गेले नाही.

आज डॉ. आंबेडकरांनंतर राष्ट्रीय पातळीवर मान्य असे समस्त दलितासाठी कोणतेही नेतृत्व नाही. महारेतरांत विद्रोह करण्याची अपुरी हिकमत तसेच पोटजात हा पर्यायी निकष पुन्हा मूळ धरत आहे. एकंदरीत महारेतरांबाबत आंबेडकर आणि चळवळ याचा विचार करता जो आढावा येतो आणि प्रश्न समोर उभे राहतात ते असे–

१) सवलती घेणाऱ्या सर्वांनी डॉ.आंबेडकरांना तसेच त्यांच्या विचारसरणीला का मानू नये, जोपासू नये ?

२) सवलती घेऊन समृद्ध झालेल्या सर्व दलितांनी आणि सवलती घेणाऱ्या समाजातील प्रत्येक घटकाने डॉ. आंबेडकरांची विचारसरणी सर्व माध्यमांतून तळागाळापर्यंत पुरस्कारीत होईल असा प्रयत्न का करू नये ?

३) शासनकर्त्या समाजाचे स्वप्न दुभंगणार काय ?

४) आंबेडकरी चळवळ किंवा परिवर्तनाची चळवळ एका जातीची मक्तेदारी जबाबदारी आहे काय ?

५) चळवळीत झोकून देण्यासाठी किंवा चळवळ जिवंत ठेवण्यासाठी महारेतरांना कोणी रोखले आहे काय ? त्यांना मानसन्मान किंवा आमंत्रणे आवश्यक आहेत काय ?

६) महार–बौद्धांसहीत इतर दलितांनी आंबेडकर अभ्यासला आहे काय ? त्यांना किती कळले ?

७) ज्यांनी तसा अभ्यास केला नाही त्याची कारणमीमांसा शोधता येईल काय ?

८) डॉ. आंबेडकरांची जयंती, पुण्यतिथी महारतेर का साजरी करीत नाहीत किंवा नुसती जयंती पुण्यतिथी साजरी करून समाजात वेगळं काही घडविणे शक्य आहे काय ?

९) आंबेडकरी विचारसरणी मान्य करून ती प्रसारीत करण्यासाठी किंवा तिचा पाठपुरावा करण्यासाठी महार–बौद्ध म्हणूनच जन्मायला पाहिजे किंवा धर्मांतर करणे आवश्यक आहे काय ?

१०) सर्व दलित, वर्गीकृत जाती, जमाती, भटके–विमुक्त किंवा इतर मागासवर्गीय जाती, समान कार्यक्रमाद्वारे एका व्यासपीठावर यायला काय अडचण आहे. जर अडचण असेल तर ती दूर करता येणे दुरापास्त आहे काय ?

११) समान सामाजिक प्रश्नावर एकत्रित येण्यासाठी प्रभावी नेतृत्त्व उपलब्ध आहे काय ? ते यशस्वी होणे शक्य असेल काय ?

१२) या सर्वांसाठी नेते आणि सर्व समाज यांना एकत्रित येण्याची गरज आहे काय ?

१३) नेतृत्वासाठी किंवा पोटजातीच्या अस्तित्वासाठी चळवळ संपणार काय? किंवा पुन्हा त्याच चक्रात रूतत जाण्याची तयारी आहे काय ?

१४) सवलतीचे स्वरूप तीन अॅग्रीमेंटचे आहे याचे भान राहिले आहे काय ! उद्या सवलती बंद झाल्यास उन्नतीसाठी पर्याय आहे काय ?

१५) महारेतरांच्या आणि महार–बौद्धाच्या सामाजिक व आर्थिक क्षमतेत परिस्थितीत कितीसा फरक पडला आहे ? गेल्या ४२ वर्षांत जे झाले नाही ते यापुढे किती वर्षात होईल ? यासाठी कुणाकडेही कार्यक्रस नाही असे का ?

१६) वेगवेगळचा दलित जातीसाठी वेगवेगळी महामंडळे कार्यरत असतांना वेगवेगळे राहूनही प्रत्येक पोटजातींना त्या महामंडळाडून किती लाभ घेता आला आणि पुरेसा लाभ का घेता नाही याचा गांर्भीर्याने विचार का होत नाही.

त्याच दरम्यान अंधेरी येथे आम्ही १७ गृहनिर्माण संस्था ( ज्या मागासवर्गीयांसाठी आहेत ) तेथे सर्व मागासांसाठी एक संघटन करायचा कार्यकम घेतला आणि तिथे मोहोळ उठले. त्या सोसायटीत राहाणारा एक माजी नगरसेवक खडबडून उठला. तो देशस्थ चांभार. संघटना बांधण्यात एक ढोर व एक कोकणी चांभार, हे कळताच त्याने राजकारणी धूर्तपणा वापरला व दोन दिवसात त्याच्या मुलाला अध्यक्ष करून एक संघटना त्या परिसरात काढली आणि चळवळ तर दूरच, कुणालाही तिथे प्रवेश करू दिला नाही.

तेच गृहस्थ सरकारी यंत्रणेतील चर्मकारांसाठी असलेल्या महामंडळावरही होते. एकमात्र खरे की हे महामंडळ चर्मोद्योगाला प्रोत्साहन देऊन पारंपरिक चर्मकार जातीच्या सहाय्यासाठी आहे. त्याचा फायदाही ढोर–चांभार जातीलाच मिळावा असे म्हणता येईल, असेही नाही, असे लोक म्हणतात.

चळवळीचा भाग म्हणून काही संघटनांनी मात्र रस्त्यावर गटई कामगारांसाठी स्टॉल (गटई कामगार हा चांभार जातीचाच असतो) उभे केले. छोटी मोठी कर्जे त्यासाठी उपलब्ध करून दिली. काहींच्या संसाराला हातभार लावला आणि काही बड्या लोकांनी मात्र चर्मोद्योगासाठी संस्था उभ्या केल्या. कारखाने, उद्योग काढण्यासाठी सहकारी संस्था निर्माण केल्या. त्यासाठी भाग भांडवलही जमा केले, पण एका ठिकाणी तर ढोरांनी चर्मोद्योगाचे प्रप्रोजल आणले आणि त्याचवेळी

सवर्ण सदस्यांनी ते हडप केले. ही वस्तुस्थिती पाहता चर्मकार चळवळ नसल्याने त्यांच्या पदरात त्याच्या स्वतःसाठी जे ठेवले आहे तेही पडत नाही असे दिसते.

चर्मकारांत चळवळ फोफावत नाही, तरीही चांभार समाजाने मुंबईत आपली दोन वेगवेगळी संमेलने घेतली. मी प्रेक्षक म्हणून हजर होतो, खरं तर कार्यक्रम नसलेली कोणतीही संघटना भरीव कार्य करू शकत नाही. हे पुन्हः पुन्हा सिद्ध होते ते इथेच.

चर्मकारात शिक्षणाचे प्रमाणही म्हणावे तेवढे नाही आणि साहित्यात ढोर व चांभार जातीची थोडेफार लिहिणारी दोनचारच माणसं आहेत. त्यांचीही कोंडी दलित साहित्य संमेलनात होते. चर्मकार चळवळ ही समांतर चळवळ म्हणूनही उभी राहू शकत नाही. कारण पुन्हा इथेही ढोर–चांभारांत स्वतःच्या जातीपुरता विचार मर्यादित. जिथे कुठे ढोर चांभार एकत्रित येतात तिथेही सवर्णांचे नेतृत्व मानणारे मध्ये पाय घालतात.

चर्मकारामधील काही हुशार सुशिक्षित विचारवंत आज ओ.बी.सी. संघटना, दलित संघटनातील कार्यक्रमात हिरारीने भाग घेताना दिसतात. तरीही त्यांना जे कार्यक्षेत्र आहे ते मर्यादित आहे. कोण्याकाळी धंद्यावर उपजीविका असलेला हा समाज पूर्णपणे नोकरीवर अवलंबून आहे आणि आधी ' पोटाची चळवळ ' हाच त्यांच्यादृष्टीने महत्त्वाचा भाग आहे.

जी चर्मकार चळवळ आणि दलित चळवळ पाहिली त्याच्या आधारे एवढाच निष्कर्ष निघतो तो म्हणजे एक तर चर्मकार चळवळ अस्तित्वातच नाही. आणि ती अस्तित्वात आहे असा जर कुणाचा दावा असेल तर त्यातले आजपर्यंतचे सगळेच वार फुसके आहेत. आज मातंग समाजतही कुणी तरी स्वतःला बाबासाहेब म्हणवून घेत मोर्चा काढतो, लोकांना एकत्रित करतो. आणि समाज बांधिलकीचा विचार दूरच राहिला तरीही त्या समाजापुरते संघटन करायचा सतत प्रयत्न करत आहे, संपूर्ण वेळ कार्यकर्ता म्हणून काम करणारे चर्मकार नाहीत ही वस्तुस्थिती आहे. आणि चर्मकार म्हणवून घ्यायला आजही ढोरं तयार नाहीत. तो चर्मकार या शब्दाचा रूढ अर्थ "चांभार" आहे हे गृहीत घरूनच वावरतो आहे.

नुसती सभासम्मेलने, जयंत्या, उत्सव साजरे केले की ती चळवळ होत नाही. म्हणूनच चर्मकार जळवळ आज मूर्त रूपात कुठेच नाही आणि ती मूर्तरुपात साकार होईल असं आज तरी दृष्टीक्षेपात येत नाही. ही बाब तशी गंभीर आहे. तरीही वर्गीकृत जाती, जमातीच्या वेगवेगळ्या संघटना लोकसंग्रहासाठी मान्य केल्यावरही संपूर्ण समाजाची, ज्याला रुढ अर्थानं दलित म्हणतात, त्या सगळ्यांची एकच चळवळ होणे आवश्यक आहे. नाही तर चळवळ करणाऱ्या एका समाजाला इतरांनी सक्रीय पाठींबा दिला नाही तर सगळेच संपतील की काय अशी भीती वाटते.

मुंबईसारख्या महानगरात आपल्या समजातील पुढाऱ्यांची नावे देऊन उभ्या असलेल्या गृहनिर्माण संस्था, बंगलेवजा घरे आणि बिल्डींगमधील फ्लॅट त्यांच्याच जातीतील झोपडीकडे दुर्लक्षून आहेत. तर झोपड्या आक्राळविक्राळपणे त्या सिमेंटच्या घराकडे पाहात आहेत. आज चर्मकार असलेला 'महार' समाज जेव्हा चर्माचं नाव घेत नाही तेव्हा चर्म सर्वस्व मानणाऱ्या ढोराचांभारांनी काळाची पावलं ओळखावीत अन्यथा तुमच्या पुढील पिढीला कुणाचाही आधार असणार नाही. वर देणारा कुणी नसेलही पण कुणीच कुणाला क्षमा करणार नाही.

**— ना. म. शिंदे**

६१/१२३१ आझादनगर;
वि. रा. देसाई मार्ग, अंधेरी (पश्चिम)
मुंबई–४०० ०५८

# मंडल आयोग व बामसेफची चळवळ

– के. के. चौदंते

बामसेफ या संस्थेच्या माध्यमातून अखिल भारतीय स्तरावर मंडल आयोगाच्या समर्थनार्थ अनेक परिसंवाद आयोजित करण्यात आलेले आहेत. त्याच कडीतील एक भाग म्हणून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये बामसेफतर्फे १००० मिटिंग व १३ ठिकाणी भव्य परिसंवाद आयोजित करण्यात आलेले आहेत. या माध्यमातून आम्ही जवळपास ५०,००,००० लोकांशी सरळ संपर्क साधून मंडल आयोगासंबंधातील गैरसमज व पूर्व ग्रहावर आधारलेले दूषीत मन दूर करण्याचा प्रयत्न करणार आहोत, नव्हे ही आमची नैतिक जबाबदारी आहे. बामसेफने मंडल आयोगाच्या समर्थनार्थ १९८२ पासून संपूर्ण देशपातळीवर कन्याकुमारीपासून जम्मू काश्मीर पर्यंत व सिलीगुडीपासून कच्छपर्यंत आपली नैतिक जबाबदारी ओळखून वैचारिक मंथन मोठ्या प्रमाणावर घडवून आणलेले आहे व त्या माध्यमातून इतर मागासवर्गीय बांधवांना आपल्या हक्काविषयी जागृत करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले आहेत.

## मंडल आयोगाची निर्मिती व पूर्वेतिहास

मंडल आयोगाच्या शिफारसीपूर्वीच्या घडामोडी काय व कशा घडल्या हे पाहणे उचित ठरेल. भारतीय राज्य घटना लिहीत असताना डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांनी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांना घटनेमध्ये ३४१–३४२ कलमान्वये सर्व क्षेत्रांमध्ये राखीव जागांची व्यवस्था करण्यात आली, अनुक्रमे १५ व ७॥ टक्के.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत देश इंग्रजांच्या विळख्यातून मुक्त झाला व २६ जानेवारी १९५० ला प्रजासत्ताक घटना अस्तित्वात आली आणि एका राजकीय समानतेच्या युगास सुरुवात झाली हे जरी शाश्वत सत्य असले तरी भारतीय राज्य घटनेच्या शिल्पकाराच्या मनात घटना लिहीत असते वेळी मागासवर्गीयांच्या (ओ. बी. सी ) हक्कांविषयी व राष्ट्रीय प्रवाहात सामील करून घेण्यासंबंधी काहूर उठले होते. कारण त्या देशातील समाजव्यवस्थेच्या वळी गेलेल्या घटकांना हजारो वर्षांपासून शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक क्षेत्रांत येथील व्यवस्थेच्या उच्चभ्रू लोकांनी गुलाम केले होते. त्या गुलामीतून आजाद भारतामध्ये त्यांची मुक्ती झाली पाहिजे. या कारणास्तव त्यांनी आपल्या कुशाग्रबुद्धीच्या जोरावर घटना समितीत तीव्र विरोध व असंख्य अडथळे असूनही त्यांनी भारतीय घटनेस मागासवर्गीय (ओं. बी. सी.) समाजासाठी ३४० व्या कलमांतर्गत तरतूद करून ठेवली आहे.'मागास–आयोग' नेमावा या कल्पनेचे मूळजनक भारतीय राज्य घटनेत शिल्पकार डॉ. भीमराव आंबेडकर आहेत. त्यांच्या दूरदृष्टीतून निर्माण झालेले हे ३४० कलम आहे.

## भारतीय घटनेतील ३४० कलम काय आहे

' मागासवर्गाच्या स्थितीचे अन्वेषण करण्यासाठी आयोगाची नियुक्ती. '

३४०–(१) भारताच्या राज्य क्षेत्रातील सामाजिक व शैक्षणिक दृष्टचा मागासलेल्या वर्गाच्या स्थितीचे व त्यांना ज्या अडचणी सोसाव्या लागतात त्यांचे अन्वेषण करणे आणि अशा अडचणी दूर करण्यासाठी व त्यांची स्थिती सुधारण्यासाठी संघ राज्याने किंवा कोणत्याही राज्याने उपाययोजना कराव्या त्यासंबंधी व त्या प्रयोजनाकरता संघ राज्याने किंवा कोणत्या राज्याने कोणती अनुदाने द्यावीत व कोणत्या शर्तीच्या अधीनतेने अशी अनुदाने द्यावीत त्यासंबंधी शिफारसी करणे याकरता राष्ट्रपतीला त्या योग्य वाटतील अशा व्यक्ती मिळून बनलेला हा आयोग आदेशाद्वारे नियुक्त करणाऱ्या आदेशाद्वारे आयोगाने अनुसरावयाची कार्यपद्धती निश्चित करण्यात येईल.

२) याप्रमाणे नियुक्त केलेला आयोग त्याच्याकडे निर्देशिलेल्या जातीचे अन्वेषण करील आणि त्यास आढळून येईल अशी वस्तुस्थिती मांडणारा व त्याला उचित वाटतील अशा शिफारशी करणारा अहवाल राष्ट्रपतीस सादर करील.

३) राष्ट्रपती याप्रमाणे सादर केलेल्या अहवालाची प्रत, त्यावर केलेल्या कारवाईची स्पष्टीकरणे करणाऱ्या निवेदनासहित, संसदेच्या प्रत्येक सभागृहा समोर ठेवतील.

**'आजाद भारतातील पहिला मागास आयोग'**

वरील कलमान्वये स्वतंत्र भारतातील राज्यकर्त्या जमातीने २९ जानेवारी १९५३ ला पहिला मागसवर्गीय आयोग माननीय काकासाहेब कालेलकर यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केला. त्यांनी ३० मार्च १९५५ ला आपला मागासवर्गीय अहवाल तेव्हाचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांना सादर केला. परंतु सादर करते वेळी मा. काकासाहेबांचे ब्राह्मणी मन स्वतःच्या जातीचे अधिकारी जोपण्यास धावून आले. अमर्याद अधिकार मनूच्या कायद्यानुसार या देशातील ब्राह्मणांना हजारो वर्षांपासून बहाल करण्यात आले होते. व्यक्तीशः अध्यक्ष काकासाहेब कालेलकर ' मागासवर्गीय कोण? ' या व्याख्येसाठी जातीचा निकष लावावा या विरुद्ध होते. त्यांनी तसे त्यांचे मत राष्ट्रपतींना लिहिलेल्या पत्रात (पान क्र. XIV पॅरा नं. ६६) मध्ये स्पष्ट केले आहे.

हजारो वर्षांपासून या देशात मनूच्या वारसदारांनी मागासवर्गीय बहुसंख्यांक जातींना गुलाम बनवले आहे. व त्यांच्या अधिकारापासून दूर ठेवलेले असताना स्वतंत्र भारतामध्ये सुद्धा ब्राह्मणशाहीचे हितसंबंध जोपासणाऱ्या व्यक्तीशिवाय मागासवर्गीयात एकही १९५३ पर्यंत लायक व्यक्ती या देशात दिसू नये ही खेदाची गोष्ट आहे.

काकासाहेब कालेलकर आयोग पंडित नेहरूंच्या काळात भारतात लोकशाही दृढ करण्याचा उदो उदो करणाऱ्यांनी साधा चर्चीला सुद्धा न जावा, अंमलबजावणी तर फार लाबचा टप्पा राहिला. अखेर कालेलकर आयोग १९६१ मध्ये कत्तलखान्यात पाठवण्यात आला व मागासवर्गीयांचे ओ. बी. सी. ससेहोलपट तीव्र गतीने सुरू झाली.

जनता पार्टीने आपल्या पार्टीच्या जाहीरनाम्यात काकासाहेब कालेलकर आयोगाची अंमलबजावणी करण्याचे अभिवचन दिले, राजसत्तेवर १९७७ साली येता ब्राह्मणशाहीला सुरूंग लागेल या भितीपोटी व अंतर्गत दबावामुळे मागासवर्गीयांची सहानुभूती मिळावी म्हणून चालढकल करण्याच्या दृष्टिकोनातून वेळ मारून नेण्यासाठी दुसरा मागासवर्गीय आयोग नेमला. २० डिसेंबर १९७८ ला बिंदेश्वरी प्रसाद मंडल यांच्या अध्यक्षतेखाली या आयोगाचे काम सुरू झाले व त्यांनी ३१ डिसेंबर १९८० ला आयोगाचा अहवाल राष्ट्रपतींला सादर केला व मंडल आयोगाच्या संक्षिप्त अहवालात भारतीय घटनेच्या ३४० कलमान्वये आर्थिक निकषांची वासलात लावताना घटनेच्या ३४० वे कलम उधृत केले. 'सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्ग' या कलमांतर्गत येतात. यात आर्थिक निकष मागासवर्गीय ओळखण्यासाठी घुसडवणे म्हणजे गैरसमज पसरवणे होय. कारण आर्थिक बाबीचा दूरान्वय उल्लेख ही ३४० व्या कलमात नाही.

हिंदू समाजव्यवस्थेने ज्यांचा सामाजिक दर्जा नाकारलेला आहे, ज्यांच्या-

कडून नीच व हलकी कामे करून घेण्याचे संस्कार केलेले आहेत. ज्यांचे उच्चवर्णीयांकडून सतत शोषण चालू आहे, अशा हिंदू समाजातील जाती मागासवर्गीय ठरवण्यात आल्या. कारण भारतीय समाजव्यवस्था ही जातीच्या उच्चनीचतेच्या भेदावर आधारलेली आहे व शोषणाची प्रक्रिया उच्चवर्णीयांकडून सतत अमानवीयरित्या चालूच आहे. अन्य मागासवर्ग (ओ.बी.सी.) हा सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासलेला आहे म्हणूनच आर्थिकदृष्टयाही मागासलेला राहिला आहे.याला सर्वस्वी जबाबदार येथील चातुवर्ण्याधिष्ठीत सामाजिक समाजरचना होय.

म्हणून बी. पी. मंडलने हिंदू समाजातील जात हा निकष लावलेला आहे. मुसलमान, ख्रिश्चन, शीख आदी धर्मातदेखील जातीरचना आढळून येते. विशेषतः अस्पृश्यांतून धर्मातरित झालेल्यांची सामाजिक व शैक्षणिक अवस्था जवळपास हिंदूतील अस्पृश्यांसारखीच आहे. त्यामुळे अशा लोकांचा समावेश मागासवर्गात करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे हिंदुधर्मात असलेल्या विशिष्ठ धंद्यानुसार उदा. धोबी, तेली, न्हावी, लोहार, धिवर, दर्जी आदी कामे करणारे समूह या धर्मातही दिसून येतात. म्हणून अशा समूहाचा मागासवर्गात समावेश करण्यात आला आहे.

बी. पी. मंडल यांनी सामाजिक शैक्षणिक आणि आर्थिक शैक्षणिक सर्व्हे करून हजारो साधनांच्या माध्यमातून मागासपणाच्या ११ कसोटचा निश्चित करून त्या माध्यमांतून मागासवर्ग ओळखण्याचा निकष विकसीत केला. वरील शास्त्रशुद्ध व वस्तुनिष्ठ विकसित केलेले निकष लावून बी.पी. मंडलने मागासवर्ग ओळखण्याची पद्धती विकसीत केली व त्या आधारे भारत देशात अशा प्रकारच्या ३७४३ जाती आपल्या अहवालात समाविष्ट केल्या. ज्या भारतातील एकूण लोकसंख्येच्या ५२ टक्के होतात. ५२ टक्के ओ.बी.सी. ना मंडलने आपल्या अहवालात २७ टक्के जागा आरक्षित करून ओ.बी.सीं. ना शासन व प्रशासनात सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून देण्याची शिफारस केली. त्यापैकी महाराष्ट्रातील २७२ जातींचा समावेश करण्यात आला. (२७२ जातींची यादी आम्ही सोबत जोडलेली आहे.)

१) आगरी, आगळे किंवा काळण २) अहिर, यादव, गवळी ३) अलितकार ४) अत्तार ५) अवधिया ६) वडक ७) बडिआ ८) बगालू ९) वागडी (मारवाड बावरी, मारवाड वाघरी, सालत वाघरी) १०) बजनिया ११) बहुरूपी १२) बैरागी, गोसावी, उदासी १३) बाजीगर १४) बालसंथानम १५) बंदी १६) बंजारा, वंजारी, वंजारी, मथुरा, वंजारा (ए), गोरबंजारा लंबाडा, लंबारा लम्माणी, चारण बंजारा, लभान, मथुरा, लमानी, कचकीवाले वंजारा, लमाण बंजारा, लमाण, लमाणी, लबान, धाली, धालिया, धाडी, धारी, सिंगरी, नावी वंजारा, जोगी बंजारा, बंजारी, शिगडे बंजारा, लम्बाडे, फणाडे बंजारा, सुनार धाल्या बंजारा, वाल्या बंजारा, बंजारा शिगाडिया, शिगाडिया बंजारा १७) बंतु

१८) बावरीया १९) बारी किंवा बारई २०) नारीया कोली,बारीया २१)बथीनी २२) बावचा २३) बेगारी, बेडर, बेरड, नाईकवाडी, तलवार, वाल्मिकी २४) बेसदेवा २५) बेस्तर, सचलू वड्डार २६) भाट २७) भडभुंजा २८)भामटा किंवा घंटीचोर किंवा परदेशी, पोंग, दासर, उचित राजपुत भामटा, भामटी, पाथरूट, कमाटी, टकारी उचले २९) भांड ३०) भंडारी ३०अ) भंडूरा ३१) भंडुरा बिलावर ३१) भांटा ३२) भराडी, बालसंतोषी, किंगरीवाले नाथबाव, नाथजोगी, नाथपंथी, डवरी, गोसावी ३३) भवय्या किंवा तारगल ३४) भावीण ३५) भिल्लाल ३६) भिनाकोया ३७) भोई, खारवी, घिवर, भोई, झिंगाभोई, परदेशी, भोई, राजभोई, कहार,गाडिया कहार, किरात, मचवा, मांझी, जातिया, केवट धिवर, धिवर, ढिमर, पालेवार, मच्छेंद्र नावाडी, मल्हार, मल्हाव, गाढव भोई, खारे भोई, खाडी भोई, घिवरा, धुरिया, कहार ३८) भिस्ती किंवा पखाली ३९) भोवर (पवार) ४०) भुते, भोपे ४१) बिंदली ४२) बुरबुक ४३) बुरूड, मेडर ४४) बुट्टाल ४५) चादर ४६) स्वरवाद्य, दासर ४७) चमया ४८) चांडाळ ४९) चांडालगाडे ५०) चरण किंवा गाढवी ५१) चाडोरी, छरा ५२) चेन्चू किंवा चेन्चवार ५३) छप्परबंद ५४) चिमूर ५५)चितला ५६)चिप्पा ५७) चित्रकथी ५८) चोघ्रा ५९) ख्रिश्चन ( शेडयुल कास्टमधून धर्मान्तरीत ) ६० दावगर ६१) डकालेरू ६२) दर्जी ६३) दास किंवा दांगडीदास ६४) देपला ६५) देवांगा ६६) देवरी गोसावी, नागपंथी ६७) देवदिग ६८) देवळी ६९) धनगर, कुरूवा, करूवर ७०) ढिमर, ढिवर, गाबित, हरकत्रा, मगेली, पागे, संदुरी ७१) धोबी, परिट, वट्ट, मडवल रजक ७२) घोली ७३) घोम्भारा ७४) फकिर बंदवाला ७५) फुटगुडी ७६) गदाबा किंवा गोडवा ७७) गदारिया ७८) गद्री ७९) गाढवी ८०) गणाली किंवा गंडोली ८१) गंधारप ८२) गंगानी ८३) गारोडी, गारूडी ८४) गारपगारी ८५) गवंडी ८६) धडसी ८७) घिसाडी, घिसाडी लोहार, गाडीलोहार, चितोडी लोहार, राजपूत लोहार ८८) गोल्ला, गोल्लेवार,गोलेर,गोलकार, घोल्लेवार ८९) गोंधळी,गौडाला ९०) गोपाल, भोरपि खेलकरी ९१)गोसावी,बावा, बैरागी भारतीगिरी गोसावी,भारती गोसावी,सरस्वती पारबत, सागर, बाण किंवा वाण तीर्थआश्रम, अरण्य घरभारी संन्यासी, नागपंथी, गोसावी ९२) गोचकी ९३) गुजराथ बावरी ९४) गुरव, गुरोव ९५) हबुरा ९६) हलेपाईक ९७) हरणी ९८) हटकर ९९) हलवे, हिलव १००) हिल्ल, रेड्डी १०१) जगियासी १०२) जाजक १०३) जंगम १०४) जातिगर १०५) जतिया १०६) जवरी जोहरी १०७) झाडी १०८) जिनगर १०९) जोगी, नाथ, नाथजोगी, गोसाई देवरी ११०) जोगीन १११) जोशी, बुड्डूकी, डमरूवाले, कुडमुडे मेघांगी, सरोदे, सहदेव जोशी सरवदे, सरोदा ११२) जुलाहा, विणाकर, वन्य वाणकर ११३) काची, कछिया ११४) कचोरा ११५) कदेरा ११६) कैकाडी

(जेथे ते शेड्यूल कास्ट नाहीत तेथे) कोरच, धोतले, कोरवा किंवा कोची कोरबा, माकडवाले, पडलोर, कोरवी ११७) कलाल, करवा, लाड, लाडवक, गोंड कलाल, शिवहरे ११८) कामाटी ११९) कम्मी १२०) कंदेल १२१) छारा, कंजजर नात १२२) कापडी १२३) कासार, कसेरा १२४) कसवी १२४अ) कसाई, खाटिक, कसाव १२५) काशीकापाडी १२६) कटावू १२७) काथर काथरवानी, कंठाहरवानी (लिंगायत वाणी किंवा लाडवाणी सोडून) १२८) काथी-खाटी १२९) कटिपामुला १३०) खारवा किंवा खारवी १३०अ) किरार १३१) कोल्हाटी, डोंबारी १३२) कोळी, कोळी सूर्यवंशी, मल्हार कोळी, ख्रिश्चन कोळी १३३) कोरचा किंवा येरकुला किंवा येरकुला, किंवा कोरवे १३४) कोरचर १३५) कोरवा कोडाकूसहीत १३६) कामाकापू १३७) कोन्डू १३८) कोंगाडी १३९) कोष्टी, काशकोटी देवांगा १४०) कुचबंध १४१) कुछरिया १४२) कुंभार कुम्हार १४३) कुणवी १४४) कुरहिनशेटी १४५) कुरमार १४६) लाभा १४७) लड्डाफ, लड्डांफ १४८) लाडिया, लाधिया, लारिया १४९) लेखेरा, लाखारी १५०) लाझड १५१) लोहार, लोहार–गाडा, डोडी, सांतवाल, पांचाळ १५२) लोणारी, चुनारी १५३) माच्छी, तांडेल १५४) मगा १५५) महाली, माहली १५६) माहील १५७) मैधासी १५८) मेराळ दांगट, वीर १५९) मझवार १६०) माळी, फुलमाळी १६१) मानभाव १६२) मंगाला १६३) मारवार ब्रावरी १६४) मसगजोगी, सुडगादिस्ध्धा, मापनजोगी १६५) मयुरा १६६) मटिअर, मातिहारा १६७) मंकार खातु १६८) मे १६९) मिना १७०) मिठा १७१) मोपिन ( विणकर ) १७२) मोन्डीवार मोन्डीवारू १७३) मुन्डा १७४) नामधारी, पाईक १७५) नंदीवालाल, तिरमल १७६) नवकाशी १७७) नावी, न्हावी, हजाम, कलसेरू, नावलिगा, केलाशी, नाभिक, नाई १७८) नीली १७९) नीलकंठी १८०) शंकर, जडा १८१) नव बुद्धीस्ट १८२) नेथुरा १८३) निलिगार, निराली १८४) निरशिकार १८५) नोनिया १८६) ओतारी, ओतनकर, ओतकर, वतारी, ओझारी १८७) पाचभोतला, पाचवोटला १८८) पघारिया १८९) पदमपारी १९०) पदिआर १९१) पखाली, भिस्ती १९२) पारपारधी १९३) पमुला, पांचाळ १९४) पंचमा १९५) पंडा १९६) पांगुळ १९७) पांका १९८) पाटकर १९९) पत्रादेवरू २००) पेरकी २०१) फार २०२) फासेचरी २०३) फुदगी २०४) फुलारी २०५) पिंजारा, पिंजारी २०६) पखाली २०७) पुतळीगर २०८) रचबांधिया २०९) राचेवार २१०) रचकिया २११) रघवी २१२) राईकारी २१३) राजपारधी, गावपारधी, हरणपारधी २१४) राजपुत, भामटा, परदेशी भामटा, परदेशी भामटी २१५) रामोशी २१६) नोत, राऊतिया, रावत २१७) रंगारी रंगरेज, मावसर २१८) राऊतिया २१९) रावळ, रावळ किंवा रावळयोगी २२०) सहीस, साईस, शिस २२१) साळी,

पद्मशाली, स्वकुलशाली २२२) संगर २२३)संगारी २२४) संजोगी २२५) संताल २२६) सौन्ता किंवा सौन्ता २२७) साव–तेळी २२८) सपेरा २२९) सरानिया २३०) सरे २३१) शिलवट २३२) शिंपी, भावगर, शिवशिंपी, नामदेव २३३) शिंगदेव किंवा शिंगाडिया २३४) सिक्कलगर, कोठारी २३५) सिधोर २३६) सिंगीवाला २३७) सोनार २३८) सोरे २३९) सुन्ना २४०) सुन्नाई, सुथारिया २४१) सुतार, बढई, वाढई २४२) सुप्पालिग २४३) टाकणकर २४४) टाकारी २४५) तलवार कनाडे २४६) तांबट २४७) तांबोळी २४८) तारगला २४९)तेली, निगा, धंची २५०) ठाकर २५१) थेलारी २५२) थेटवार २५३) थोगटी, थोगाटी २५४) थोटेवाडु २५५) थोरीया २५६) तिमाली २५७) वाघरी, वघारी, सालत वाघरी २५८) वैदु २५९) वैती २६०) वलवई २६१) वंजारी. वंजार, २६२) वासवा २६३) वासुदेव २६४) विथोलिया २६५) वड्डेल, वड्डेल ( कलावडेर किंवा पाथरोड ) वेलदार, ओड, गिरणी, वडार, वड्डार, गड्डीवड्डुर. जातिवड्डुर, मातीवड्डुर, पाथरवट २६६) वाडी २६७) वंजारी, वंजारा २६८) वान्सफोड २६९) वरठी २७०) वनाडी २७१) येनादिवाड २७२) येरागोलावाड किंवा थेल्ला पामलवाड.

## मंडळ आयोग (ओ.बी.सी.) चे विरोधक कोण ?

सार्वभौम भारतामध्ये आरक्षण नितीचे समर्थक या देशात अनुसूचित जाती व अनुसूचित जनजाती अनुक्रम १५ टक्के व ७॥ टक्के मिळून २२॥ टक्के एवढी आहेत. याचप्रमाणे मंडलनी व्याख्यांकित केल्याप्रमाणे इतर मागासवर्गीय भारतीय लोकसंख्येच्या ५२ टक्के आहेत व अल्पसंख्यांक दहा टक्के (२२.५ अधिक ५२.० अधिक १०.५ बरोबर ८५टक्के)तात्पर्य भारतीय लोकसंख्येच्या ८५टक्के जमात ही आरक्षण नितीचे समर्थक आहेत.(शेटजी-भटजी पंधरा टक्के लोक विरोधक आहेत)

हजारो वर्षांपासून ह्या देशात ८५ टक्के बहुजन समाजाला सांस्कृतिक दृष्टीने नीच लेखून देशाच्या सर्व सत्ताकेन्द्रापासून जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आलेली आहे. स्वतंत्र भारताच्या ४३ वर्षांत सुद्धा त्याचे अस्तित्व नाकारण्याचा कुटील डाव डाव ब्राह्मणी समाजव्यवस्थेच्यां उच्चभ्रु लोकांनी खेळण्यास सुरुवात केलेली आहे. राष्ट्रीय प्रवाह व राष्ट्रवादावर उर बडवून घेणारे पेशव्यांचे औरसपुत्र राष्ट्रीय प्रवाह काय आहे हे मात्र सांगत नाहीत. कोणतेही राष्ट्र एका जातीची मालमत्ता नसते तसे राष्ट्र जगाच्या पातळीवर टिकू शकत नाही. भारत देश ६००० हजार जातीचे मिळून उदयास आलेले राष्ट्र आहे परंतु त्या देशात मनुच्या पुत्रानी आम्हीच या देशाचे सर्वेसर्वा समजून हजारो वर्षांपासून आजपावेतो या देशाला गुलाम बनविण्यातच मोठा हातभार लावला आहे. ह्या देशाच्या आजही अंतर्गत सीमा जातीय ज्वालांनी पेटलेल्या आहेत. परंतु त्यांना ह्याबाबत काही देणे घेणे नाही. ना आजपर्यंत कधी जातींअहकारापुढे त्यांनी देशाचे भले पाहिले. ब्राह्मण-

शाहीला दिमाखात वावरायला मिळाले म्हणजे झाले. १९८५–८६ सालात आमच्या देशाचे गुपीत एका दारुच्या बाटली व बाईसाठी त्यांनी परदेशाला विकले ते २२ लोक उच्च वर्णीय ब्राह्मण होते. त्यामध्ये कुणी एस. टी., एस. सी., ओ. बी. सी. नव्हते.ही घटना काय दर्शविते.हे एकराष्ट्रवादाचा उदोउदो करणाऱ्या जमातीचे (ब्राह्मण शाहीचे) गोंडस बाळ आहे. असे चरित्र आणि चरित्र्य हजारो वर्षांपासून सतत आम्हा बहुजनांवर लादलेले आहे. नव्हे मनूने या देशात आलेखीत घटनेच्या द्वारे त्यांना अमर्याद अधिकार सांस्कृतिक आरक्षणाद्वारे दिलेले आहेत.

ज्यांची नीती आणि नियम साफ नसते असे लेक सोंग–ढोंग करत असतात स्वत:च्या आईची ओळख करून देण्यासाठी आक्रस्ताळेपणाची भूमिका घेणे हे करंटेपणाचे लक्षण आहे. आई ही आईच असते. तित्याशी मुलाचे नाते त्याच्या पवित्र वर्तनातून व कर्तव्यातून स्पष्ट होत असते. आम्ही भूमिपुत्र आहोत. ह्या भारतमातेशी आमचे अतूट नाते आहे. कपट कारस्थानी लोकांनी आम्हाला राष्ट्रवाद शिकविण्याची जरूरी नाही.

राष्ट्रीय प्रवाहाच्या गप्पा झोडण्यात पटाईत असलेले हे लोक बहुजन समाजाला शासन आणि प्रशासनात सामील करून घेणार आहेत काय हा प्रश्न आहे. कारण देशाची सर्व सत्तास्थाने हे केवळ या देशाच्या लोकसंख्येच्या साडेतीन टक्के जमात असणाऱ्या एकटया ब्राह्मणशाहीच्या हाती आहेत. बी. पी. मंडल यांनी आपल्या अहवालात याची जाण दिलेली आहे. श्रेणी एक व दोन ही राज्यकारभार यंत्रणेतील उच्चपदे होत व त्यात ब्राह्मणवाद्यांची टक्केवारी ८९.६३ च्या वर आहे.

बी. पी. मंडलनी आयोगामध्ये ओ. बी. सी. ( मागासवर्गीयांची स्थिती ) आकडेवारीसहित स्पष्ट केलेली आहे.

Annexure 8, Volume II

| नोकऱ्यांची वर्गवारी | एकूण संख्या | टक्केवारी ओ. बी. सी. ची |
|---|---|---|
| वर्ग पहिला | १,७४,०४३ | ४.६९ टक्के |
| वर्ग दुसरा | ९,१२,७८६ | १०.६३ टक्के |
| वर्ग तिसरा/चौथा | ४,८४,६४६ | २४.४० टक्के |
| एकूण | १,५७,१४७ | १२.५२ टक्के |

वरील सर्व आकडेवारी काय दर्शविते ? स्वतंत्र भारतातील ४३ वर्षांत ओ. बी. सी. ना त्यांच्या अधिकारापासून वंचित ठेवलेले आहे. त्यांच्या अधिकरावर ब्राह्मणांनी सत्तेच्या जोरावर आक्रमण केलेले पहावयास मिळते. इतर मागासवर्गीयांसाठी ( ओ. बी. सी. ) आरक्षणाची तरतूद करणे हे काही उपकार किंवा

दान नाही तर त्याचे भूमिपुत्र या नात्याने हक्क आहेत. आरक्षण हे नोकऱ्यांसाठी नाही तर ते एक शासन आणि प्रशासनात सहभागाचे प्रभावी माध्यम आहे.

## मागासवर्गीया (ओ. बी. सी.)ना दिशाभूल करण्याचे षडयंत्र

ब्राह्मणी वर्चस्व असलेल्या भारताच्या क्षितीजपटलावर ८०–९० हे दशक सनसनाटी फैलावणारे ठरले आहे. या दशकात मोठ्या प्रमाणात मागासवर्गीय ओ.बी.सी.ना यशस्वीपणे जागृत करण्याचे प्रयत्न झाले. त्याचप्रमाणे त्या जागृतीला तितक्याच कौशल्यपूर्ण चालाखीने गाडण्याचेही प्रयत्न झाले.

बी. पी. मंडल यांनी मागासवर्गीय आयोगाचा अहवाल ३१ डिसेंबर ८० ला राष्ट्रपतींकडे सादर केला व ह्या देशातील ब्राह्मणी संस्कृतीच्या वारसदारांनी सांस्कृतिक सत्तेच्या जिवावर 'तोडा-फोडा-झोडा' ह्या क्रूर नीतीची अशी व्यूहरचना आखली. ओ. बी. सी. (मगासवर्गीयांना) धार्मिक बेहोशीचे रसायन वापरून त्यांना स्वतःच्या अस्तित्वाचा सुद्धा अहसास झाला नाही पाहिजे अशी स्थिती निर्माण करण्यात आली. कारण ब्राह्मणी संस्कृतीच्या वारसदारांना हे माहित आहे की, त्यांच्या संस्कृतीचा कणा हा ओ. बी. सी. आहे व तो कोणत्याही किमतीवर जागृत अवस्थेत राहिला नाही पाहिजे तो फक्त त्यांच्या इशाऱ्यावर डान्स करणारी कठपुतली असला पाहिजे. हे सत्य आहे की, ५२ डक्के लोकसंख्या असलेला ओ. बी. सी. जर त्यांच्या अस्तित्वाविषयी जागृत झाला तर सांस्कृतिक वारसदारांचे सत्तेतील व अमर्याद अधिकारांचा धुव्वा उडणार आहे हा चमत्कार घडवून आणण्याची किमया फक्त मंडल आयोगातच आहे. म्हणून ३१ डिसेंबर ८० ला आपला आयोग राष्ट्रपतींना सादर केला. तसाही या देशात ब्राह्मणवादी मंडळींनी वेगवेगळे तर्क-वितर्क करण्यास सुरुवात केली व ओ. बी. सी. च्या अधिकाराच्या विरोधात ओ. बी. सी. ना मोठ्या प्रमाणात ढाल म्हणून वापरण्यात आले.

त्याचाच एक भाग म्हणून अतिशय पद्धतशीरपणे फायदा उचलण्यासाठी रण निती राष्ट्रीय पातळीवर आखण्यात आली व ' गंगाजलाच्या ' निमित्ताने रथयात्रा संबंध भारतभर काढण्यात आली व त्यामध्ये मोठ्या प्रमाणात ओ. बी. सी. मागासवर्गीयांना वापरण्यात आले व एक भूलावणी नारा देण्यात आला. ' गर्व से कहो हम हिंदू है ' त्या भूलावणी रसायनाने इतकी भूरळ पाडली की ते पार बेहोष झाले. आणि आपल्या अस्तित्वासाठी मंडल आयोगाबद्दल संघर्ष करण्याचे विसरले. गर्व से कहो हम हिंदू है या बेहोश करणाऱ्या रसायनापुढे ओ. बी. सी. ने आपली बौद्धीक व शारीरिक क्षमता ५२ टक्के असूनही ब्राह्मण संस्कृतीच्या वारसदारांजवळ गहाण ठेवली. दूरदर्शी नेतृत्वाचा अभाव असल्यामुळे सुद्धा आजाद भारतात ओ. बी. सी. ची ससेहोलपट सुरू झाली. गध्या–घोड्यावर सामान लादून वापरण्याची प्रथा प्रचलित आहे. पण त्या देशात ब्राह्मणी तत्त्वज्ञान माणसांना पण

जनावरांप्रमाणे वापरण्यात तरबेज आहे. तोच समाज वापरला जातो, ज्या समाजाजवळ विकावू व अदूरदर्शी नेतृत्व आहे. या परिस्थितीचा फायदा उचलत ओ. बी. सी. ना मंडल आयोगाच्या माहितीपासून दूर ठेवण्यात आले आहे.

त्यामध्ये ३०–४–१९८२ ला मंडल आयोगाचा अहवाल संसदेच्या पटलावर आला व ह्या देशामध्ये वादळ उठले. ओ. बी. सी. ( मागासवर्गीयांना ) आपल्या हक्काविषयी काही घडामोडी या देशात घडत आहेत. याबद्दल जिज्ञासा निर्माण झाली व लगेच त्यांचे लक्ष विचलित करण्यासाठी 'रामजन्मभूमी–बाबरी मज्जीद' वाद भयानक, खतरनाक प्रकारे हाताळण्याची योजना राष्ट्रीय पातळीवर बनवण्यात आली. परंतु ओ. बी. सी. ना 'कोमा प्रोसेस' ( बेहोश हालत ) मध्ये नेण्यात आले. वस्तुस्थिती ही आहे की ब्राह्मणांना रामाविषयी काही देणे घेणे नाही. ना त्यांच्या घरामध्ये रामाचा फोटो असतो. आम्ही असे म्हणायचे धारिष्टच करणार नाही की ते हा प्रश्न प्रामाणिक हेतूने हाताळतील. त्यांना हा प्रश्न निकाली काढावयाचा नाही कारण हेतू अतिशय अप्रामाणिक आहे.स्वतःच्या जातीचा अहंकार व अधिकार शाबूत ठेवण्यासाठी ते 'हिंदुत्वाची' ढाल करून भारत देशात कलह माजवून ओ. बी. सी. ना त्यांच्या हक्काच्या लढाईपासून पंगू बनवू पहात आहेत. हा एक डाव आहे. इतके तर्कटांचे तर्कटचाळे ओ. बी. सी. ना गमराह करण्याचे चालत असताना ह्या दशकाच्या शेवटी काही जागृत ओ. बी. सी. च्या दबावामुळे सरकारला मंडल आयोगाच्या शिफारशी मान्य कराव्या लागल्या. ह्याची परिणिती अशी झाली की संबंध देशातील ब्राह्मणशाहीला जबरदस्त हादरा बसला. त्यांच्या मनात भीतीचे वातारण निर्माण झाले, कारण ओ. बी. सी. समाज ब्राह्मणशाहीच्या संरक्षणाची ढाल म्हणून व गुलामाप्रमाणे अधिकाराने वापरात येणारे परिणामकारक अस्त्र ब्राह्मणांच्या भात्यातून निकामी होणार होते. परिणामी ब्राह्मणीशाहीचा नायनाट होणार ह्या भीतीपोटी मंडल आयोगाला विरोध सुरू केला व आर्थिक निकषांच्या कुबड्यांचा वापर करण्यासाठी खेळी सुरू केली. आर्थिक दुर्बलांना सबळ बनवण्यात यावे असा त्यांचा हेतू नाही. कारण ब्राह्मण-शाहीच्या अंताच्या पर्वाची सुरुवात झाली आहे. त्यांचा हेतू संशयाच्या घेऱ्यात खितपत पडला आहे. म्हणून दुसरे अस्त्र सार्वमताचे काढण्यात आलेले आहे. परंतु ते विसरलेले दिसतात की बी. पी. मंडलने मागासवर्गीय अयोग बनवतेवेळीच सार्वमत आजमावलेले आहे.

बी. पी. मंडल यांच्या नेतृत्वाखाली जेव्हा मंडल आयोग स्थापन करण्यात आला, त्यानंतर त्याचा अहवाल सादर करेपर्यंत मंडल स्वतः देशातल्या जिल्ह्यामध्ये फिरले. या ४०५ जिल्ह्यांतील प्रत्येक जिल्ह्यात किमान ५ गावांना त्यांनी भेटी दिल्या. हजारो निवेदने स्वीकारली. अनेक मान्यताप्राप्त संस्थांकडून माहिती घेतली. ९७ खासदारांची निवेदने स्वीकारली. १७१७ नामवंत व्यक्तींच्या कैफियती

सादर केल्या. भारतातील अनेक तज्ज्ञांशी चर्चा केली. एक लक्ष अकरा हजार आठशे बहात्तर लोकांनी त्यांच्या प्रश्नावलीची उत्तरे दिली. त्यापैकी ७५ टक्केपेक्षा जास्त लोकांनी ओ. बी. सी. ना जातीनिकषावर सवलती ठेवण्यास संमती दिली. वातानुकूलित कार्यालयात बसून बी.पी.मंडल यांनी हा अहवाल तयार केलेला नाही.

मंडल आयोगाचे विरोधक कितीही गरळ ओकीत असले तरी ५२ टक्के ओ. बी. सी. समाजाच्या अस्मितेशी खेळणे देशाला परवडणारे नाही. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीच्या घोषणेने लगेचच ५२ टक्के मागासवर्गीय समाजाला नोकऱ्या मिळतात ह्या भ्रमात आम्ही मात्र नाही.प्रामाणिक हेतुच्या दिव्य कसोटीतून मंडल आयोगास अंमलबजावणीकडे जावे लागणार आहे. मंडल आयोगामुळे मात्र नवीन चेतना व ५२ टक्के मागासवर्गीयांना गुलामीच्या लाचार व जटील साखळदंडातून मुक्त होण्याची जाण होणार आहे. ही आमच्या जमेची बाजू आहे. ५२ टक्के ओ. बी. सी. समाजाचे ओळख व अस्तित्व सरकारने मान्य केले आहे. त्यामुळे देशातील जातीय आधारावरील राजकारणाचे समीकरण बदलणार आहेत. हजारो वर्षांपासून बहुजन समाजाला लाचार व गुलाम बनवण्याचा खेळ समाप्त होण्याची सुचिन्हे भारतीय क्षितिजावर चकाकत आहे. तेव्हा ही एक निर्णायक वेळ आहे. ओ. बी. सी. ने वेळेचे महत्त्व व गांभीर्य लक्षात घेऊन वेळीच आपले शत्रू व मित्र ओळखले पाहिजे. आणि जर हे ओळखण्याची घोडचूक केली तर इतिहासाने जी त्यांच्याबरोबर हजारो वर्षांपासून धोकेबाजी केली ती भविष्यात अतिशय तीव्र व बेमुर्वत, अमानवीय पद्धतीने चालत राहील. त्यास ओ. बी. सी. चा नामर्दपणाच कारणीभूत ठरेल. म्हणून काळाची पावले ओळखून वेळीच आपल्या मुक्तीलढ्यासाठी स्वतःच्या पायावर संघटीत होऊन देशात मुक्तीलढा उभारावा व स्वतःचा उद्धार स्वतःच करण्यासाठी संघटन बांधावे. ओ. बी. सी. ने दुसऱ्यांच्या कुबड्यावर आपल्या निर्णायक मुक्तीलढ्याचा संग्राम उभारू नये. एवढी एकच उदात्त आणि महान भूमिका घेऊन आम्ही समाजासमोर येत आहोत.

– के. के. चौदंते

●

# माझी सांस्कृतिक यात्रा

**– चंद्रशेखर रामटेके**

माझी कधीही अशी इच्छा नव्हती की माझ्या कार्याबाबत लिहावं. सन १९८० ला जेव्हा मला समाज, सामाजिक बांधिलकी कळू लागली तेव्हा मी वयाच्या हिशेबानं खूप मोठा नव्हतोच, त्यावेळी मी केवळ १९ वर्षांचा होतो. मात्र वडिलांची सामाजिक कार्यातली बांधिलकी पाहून मलाही काही तरी करावं असं वाटायचं. मात्र नक्की काय करावं हेही कळत नव्हतं. अशातच नाटकवाल्या मंडळीशी परिचय झाला. ' दलित रंगभूमी ' हे नाव फक्त मी ऐकलं होतं. प्रत्यक्ष त्यांच्या चळवळीशी संबंध आला नव्हता.

इ. स. १९९० या वर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयात दीक्षाभूमी नागपूर या महाविद्यालयात १२ वी विज्ञान या शाखेमध्ये शिकत होतो. त्या वेळी युनिर्व्हसिटी अंतर्गत सर्व महाविद्यालयांच्या एकांकिका स्पर्धेचं आयोजन केलं होतं. मी देखील माझ्या महाविद्यालयाची एकांकिका ' मुक्तता ' बघायला गेलो, तेव्हा अमर रामटेके, अध्यक्ष ' दलित रंगभूमी ' नागपूर यांच्या सोबत परिचय झाला. हळूहळू परिचय वाढत गेला. तो आजपर्यंत मी एकदिवस अमरला म्हणालो, दादा मी कामगार कल्याण केंद्रातर्फे होणाऱ्या राज्यस्तरीय तीन अंकी नाटकात डॉ. निलकांत कुलसंगे, इ. मो. नारनवरे यांच्या दिग्दर्शनाखाली चंदा गोटे

( सौ. कुलसंगे ), श्रीकांत वोरकर, राजा करवाडे यांच्यासोबत लहानलहान भूमिका केल्या. तेव्हा मला तुम्ही आपल्या नाटकात काम करण्याची संधी द्याल का ? लगेच अमरनी माझा पत्ता आपल्याकडे लिहून घेतला. तिसऱ्या दिवशी अमर घरी येवून गेला. मी नव्हतोच. चिठ्ठीत निरोप लिहला होता, आपण उद्या ' कामाक्षी हॉटेल ', शिवाजी पुतळा महाल येथे दुपारी १.३० वाजता मला भेटणे. डावरे एकांकिका स्पर्धेत ' संगर ' हे माझं नाटक रोशन सोमकुवर दिग्दर्शित करणार आहेत, तुम्हाला त्यात काम करायचंय, त्वरीत भेटा.

दुसऱ्या दिवशी नियोजितवेळी स्थळी मी पोहचलो. अमर माझ्या आधी १० मिनिटांपूर्वीच येवून काहीतरी वाचत होता. नंतर लक्षात आलं ' संगर ' ह्या नाटकाची ती स्क्रिप्ट होती. चर्चा आरंभिली. तुला हनिफमामु ह्या ६०–८० वयस्कर मुस्लिम म्हाताऱ्याची भूमिका करायची आहे. रेल्वेपुलाखाली झोपडपट्टी. झोपडपट्टीत एक मंदिर. सर्वांच ते पुजनीय स्थळ. झोपडपट्टीतील मंदिर तुम्ही तोडून जर वाचनालय बांधायचा साधा प्रयत्न केला तर हे धर्मांध जातियवादी प्रतिगामी शक्ती प्रस्तुत एकांकिकेतील नायकास जिवंत मारून टाकतील अशी भीती दाखवितो. पण हे मंदिर जर तुटलं तर आपणास ह्या वयात उपाशी मरावं लागेल. कुणी भीकसुद्धा घालणार नाही. अन्न अन्न करीत आपणास दारोदार भटकावं लागेल. हा स्वार्थ हनिफमामुचा असतो. तर झोपडपट्टीत वाचनालय झालं तर लहान मुलांना वाचनाची सवय लागेल. परिणामी ते शिक्षणाकडे वळतील असा पोथिनिष्ठ मठांचा पोट भरण्याचा व्यवसाय आणि मुलांच्या शिक्षणाचा मुलभूत प्रश्न हा दुहेरी संघर्ष. चहाचा शेवटचा घोट घशात उतरवित उद्या तालमीला ये असं बोलला. मी सुद्धा हो म्हणून सांगितलं.

अगदी १० दिवसांवर १२ वीची बोर्डाची अंतिम परीक्षा येवून ठेपली. रोज दुपारी १.३० च्या सुमारास कमाल टॉकीज चौक ते अजनी पोलिस स्टेशनच्याजवळ तालमीसाठी सायकलने १०६ डिग्री सेल्सिअसच्या तापमानात जायचो. समोरच्या खोलीत माझे जिवलग मित्र अरविंद सोनटक्के, भास्कर सातपुते अभ्यास करायचे.

८ तारखेला इंग्रजीचा पेपर आणि मी मात्र आदल्यादिवशी रंगमंदिराच्या स्टेजवर. स्पर्धेतील नाटकात एकांकिका उत्कृष्ट झाली. सर्वांनी सर्वांच्या भूमिके-बद्दल कौतुक केलं. बक्षीस मिळालं नाही. परंतु नाटकातून सुद्धा समाजप्रबोधन होतं हे त्यावेळी मला पूर्णत्वाने कळलं. ' समग्र सांस्कृतिक परिवर्तन ' पहिल्यांदा आवश्यक आहे. हे सूत्र मी मनाशी बांधून कोणत्याही प्रकारचा मनात स्वार्थ न ठेवता आंबेडकरवादाशी निष्ठा ठेवून मी माझी 'सांस्कृतिक यात्रा' सुरू केली.

दलित रंगभूमी नागपूरचं काम त्यावेळी खूप जोमात होतं. अमर रामटेके रोशन सोमकुवर ही मंडळी पूर्ण ताकदीने सांस्कृतिक चळवळीत काम करीत होती. ह्या वेळी " पथनाट्य " हे चीफ अॅन्ड बेस्ट (स्वस्त आणि चांगलं) प्रबोधनाचं

सर्वदृष्टचा परवडणारं माध्यम आहे. म्हणून तेच आम्ही स्विकारलं.१९७९–८० ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नांव मराठवाडा विद्यापीठाला देण्यात यावे या प्रश्नावर वादंग होऊन जे जातीय दंगे झाले त्याचे असंख्य लोकांच्या मनात नामंतराच्या आंदोलनाचे पडसाद पडत होते. त्यावेळी दलितामध्ये शहरात आणि खेड्यांतसुद्धा घबराटीचे वातावरण निर्माण झाले होते. अशा वेळी लोकांना धीर देण्याचा प्रयत्न पथनाट्याच्या माध्यमातून केला. त्यांच्यापर्यन्त जावून पोहोचलो. त्या दरम्यान आम्ही दिवसाला १०–१० पथनाट्येकरीत असू.

उत्तर नागपूर सकाळी तर दक्षिण नागपूर संध्याकाळी. असा दैनंदिन कार्यक्रम असायचा. नागपुरातील अशी एकही वस्ती शिल्लक नाही जिथे आम्ही प्रयोग केले नाहीत. त्यावेळी गाजलेल्या पथनाट्यामध्ये ' शहर, पाखंड 'विस्फोट, बगावत आणि पार्टी ' यांच्या आवर्जून उल्लेख करावा लागेल.

'शहर' ह्या पथनाट्याचे आम्ही १५० प्रयोग केलेत. तर शहराचा शतक महोत्सवी विशेष प्रयोग धनवटे रंगमंदिर 'बर्डी' नागपूर येथे संपन्न झाला. या शहरच्या विशेष प्रयोगासाठी विदर्भाचे भूषण, नाटककार प्रा. महेश एलकुंचवार यांना याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून बोलविण्यात आले. तर टेक्सॉस गायकवाड अध्यक्ष दलित रंगभूमी, पुणे यांना उद्घाटक म्हणून पाचारण करण्यात आले होते.

दलित साहित्य, दलित चळवळ, दलित नाट्य यांचे उचभ्रू मंडळी कौतुक करतात. पण तो एक दुटप्पीपणा आहे हे ध्यानात घेण्याचा इशारा यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलतांना दिला. तर उपेक्षितांची बाजू घेऊन संघर्षात उतरणारा दलित. दलित म्हणजे केवळ अस्पृश्य नाही तर अन्यायाविरुद्ध झगडणारा प्रामाणिक कार्यकर्ता. उपेक्षितांची बाजू घेऊन संघर्षासाठी सज्ज तो दलित आहे. अशी सर्वव्यापी व्याख्या त्यांनी केली आणि 'शहर' हे निषेध नाटक होय अशी ग्वाही दिली.

अनेक आंबेडकरी मंडळीचा पथनाट्य चळवळीला विरोध होता. तरी कुणाचीही तमा न बाळगता पथनाट्य चळवळीस आत्मसात करून शिखर गाठलेच. कारण त्याच्याशिवाय दुसरा पर्याय आमच्याकडे नव्हताच. रस्त्यावर आयुष्य काढणाऱ्या लोकांना, माणसांना जगविण्यासाठी रस्त्यावर जावून संवाद त्याच्या समोर साधणे अत्यंत महत्वाचं होते. कारण सत्य हे की ७५ प्रतिशत दलित शोषीतांसाठी त्यांच्या प्रश्नांचं वेदनांचं नाटक सादर करतो, तेव्हा हा राब–राब राबणारा शेतमजूर, श्रमिक, गिरणीकामगार ज्याची रोजची मिळकत ५ रुपये आहे तो २ रुपयाचं नाटकाचं तिकीट घेऊ शकत नाही म्हणून प्रबोधन करायचं असेल तर तुम्हाला त्यांच्या वस्त्यांमध्ये जाऊनच प्रयोग करावे लागतील. त्या पद्धतीने भरपूर केले. आजही तेच करीत आहोत. कारण ' ज्यांना जागं करण्याची आवश्यकता आहे त्यांच्यापर्यंत आम्हालाच जाऊन पोहचलं पाहिजे ' हे सूत्र आम्ही मनाशी बाळगलं नव्हे ते अंगिकारलं.

सामान्य माणसाला आजच्या आधुनिक गतिमान जीवनात तीन तास बसवून त्यांना प्रबोधनात्मक तत्त्वज्ञान सांगू शकत नाही. यासाठी कमी वेळेत त्यांच्या समस्यांचं नाटक, प्रश्नांचं नाटक, त्यांच्यासमोर चौकात सादर करणे हाच एकमेव उपाय. कारण सामान्य माणसाचं अर्धे अधिक आयुष्य दोन वेळचा पोटाचा प्रश्न सोडविण्यासाठी रस्त्यावरच जात असते. म्हणून त्यांना रस्त्यावर वा चौकात हे सगळं, कमी वेळात सांगावं लागेल. कारण त्यांच्या वेदनांच्या जाणिवांचं वास्तववादी संघर्षमय चित्रण त्याला तिथेच बघावयास मिळते. बंदिस्त थिएटर मध्ये फक्त ठराविक आणि नेहमीच ठरलेला वर्ग नाटक बघण्यासाठी येतो. म्हणून सामान्य माणसापर्यंत त्याच्या मुल्याधिष्ठित जीवनाचे सत्य विचार त्याच्या पर्यंत पोहचविण्यासाठी ' पथनाटय ' हे चौकात किंवहुना वस्तीतील महत्त्वाच्या ठिकाणी सादर करणे ही आज काळाची गरज आहे.

सामान्य लोकांच्या दु:खाचे, वेदनांचे आणि समस्यांचे जाणिवपूर्व गाठोडं घेऊनच पथनाटय चळवळ पुढे आली. आज या चळवळीने प्रायोगिक नाटकांना-सुद्धा मागे टाकले आहे. देशातील तमाम प्रमुख शहरांमध्ये दलित, शोषित, आदिवासींच्या प्रश्नांना हात घालून पथनाटय आजही देशभर होत आहे. आज संबंध देशात पथनाटयाचा महापूर आला असून दलितांचे प्रतिनिधित्व करणारे ' दलित पथनाटये ' संबंध देशभर होताना दिसताहेत.

इथे प्रामाणिकपणे एक गोष्ट प्रकर्षाने सांगतो की दलित रंगभूमीच्या नाटय चळवळीने कधीही जातीभेद केला नाही. आमच्या सर्वांच्या कामात फक्त जिद्द होती. चळवळीसाठी कामाची सरस स्पर्धा होती आणि म्हणूनच जेनीफर स्मिथ, साधना हुज्जनेवार,शेख सलीम, जावेद कुरेशी उर्फ पाशा,विजय गुमगांवकर,मनोहर गौर, राजेंद्र पत्थे, रंजू पैठणकर, स्मिता फडतरे, रंजना मोडक इत्यादी सर्वधर्मांची मुलं–मुली काम करायची. आज ही माणसे आपल्या खाजगी आयुष्यात गुंतली असली तरीसुद्धा त्यावेळी दलित रंगभूमीच्या सांस्कृतिक परिवर्तनासाठी चळवळी-साठी त्यांनी जो वेळ देवून सहकार्य दिले ते आजही न विसरता येण्याजोगे आहे.

तालमीसाठी जागा नाही, तालमीनंतर चहा नाही वा जायला कुठलंही वाहन नाही आणि त्यात घरच्या मंडळींचा विरोध या सर्व आपत्ग्रस्त प्रश्नांना पेलवून आम्ही पथनाटय चळवळ जिवंत ठेवली. केवळ एवढंच केलं नाही तर ही पथनाटय चळवळ संपूर्ण विदर्भात पसरवून अनेक ठिकाणी शाखा उघडल्या. आज प्रामुख्याने दलित रंगभूमीच्या शाखा वर्धा, पुसद, दिग्रस, उमरेड, अमरावती, अकोला, चंद्रपूर, पातूर, हिंगणघाट इत्यादी ठिकाणी कार्यरत असून खऱ्या अर्थाने आंबेडकरी विचार सांस्कृतिक माध्यमातून पेरण्याचे काम ग्रामीण भागात सुरू आहे. दलित रंगभूमी नागपूरचं काम फक्त नागपूर शहरापुरतं मर्यादित न राहता ते आता विस्तारून खेड्यात गेले आहे.

निबंध ३८३८ २६४९७ १९/८/९९

या चळवळीत काम करताना असंख्य दाहक अनुभव आलेत. जे आयुष्य संपेपर्यंत विसरणे शक्य नाही.

**पथनाट्याचे अनुभव**

अमरावती जिल्ह्यातील तिरखोरा या गावी विस्फोट या पथनाट्याचा प्रयोग सुरू असताना गावातील धर्मांध शक्तीला हाताशी घेऊन त्या गावच्या पाटलाने प्रेक्षकांमध्ये ट्रॅक्टर घुसविला. एवढ्यावरच त्याला राहावलं नाही तर त्याने प्रयोग सुरू असताना जळते गोळे सुद्धा अंगावर फेकले. किमान अर्धा एक तास गावात तणाव निर्माण झाला. समन्वयाची भूमिका डोळ्यांसमोर ठेवून संपूर्णपणे परिस्थिती निवळल्यानंतर तब्बल दोन तासांनी लोकांच्या आग्रहास्तव आम्हाला प्रयोग करावा लागला.

भगवान जामगडे या कलावंताचा आजोबा मरून पडलेला असतानाही त्याने प्रथम भूमिका केली व नंतर प्रेतयात्रेला गेला.

कस्तुरचंद पार्कवर जेव्हा शहरचा प्रयोग सादर करीत होतो तेव्हा एस.आर.पी. च्या पोलिसांनी आम्हाला अर्ध्यावर रोखून धरले आणि तुरुंगात नेऊन डांबले.

दीक्षाभूमीवर दोन लाख आंबेडकरी जनसागरासमोर 'मृत्यूदिन वा मुक्तीदिन' चा प्रयोग आणि 'शहर' या पथनाट्याचे १५० प्रयोग केलेत.हा देखील एक उच्चांक म्हणावा लागेल.

पुणे येथे पहिले अखिल भारतीय नाट्य संमेलन दिनांक २४ फेब्रुवारी ते २७ फेब्रुवारी १९८४ पर्यंत संपन्न झालं. या संमेलनाच्या निमित्ताने पुण्यामध्ये गरवारे चौकात डेक्कन जिमखाना जवळ प्रयोग सुरु असताना चोहीकडील वाहतूक ठप्प झाली होती. पूर्वग्रह संचेतत ठेवणाऱ्या जातियवादी पोलीस यंत्रणेने आमच्या भाषणस्वातंत्र्यावर बंदीचं पाखंडी दडपण आणून आंबेडकर सामान्यापर्यंत पोहोचू दिला नाही.

तसेच प्रयत्न आज सुद्धा सातत्याने सुरु आहेत. असा हा शतकापासून सुरु असलेला माणसामाणसांचा खेळ खेळणाऱ्या या सडलेल्या समाजव्यवस्थेतील, महारोगी मेंदूनी, पोलिसांकरवी बेबंदी दडपण आमच्यावर त्यांच्या स्नेहांकित सहकार्याने लादून 'शहर' चा प्रयोग बंद पाडला. बंद करावाच लागला. दुसरा पर्याय नव्हताच. परत या जातियसलोखा राखणाऱ्या शासन यंत्रणेने आपल्या ढोंगी मूर्खपणाची प्रचिती आम्हाला आणून दिली.

उंटखाना येथील 'शहर' चा प्रयोग संपल्यानंतर एका भिकाऱ्याने या चळवळीला आर्थिक सहकार्य ६ रुपये दिले. त्याचं नाव विठोबा नत्थू नारनवरे.

हे सर्व विस्ताराने लिहिण्याचे कारण एवढंच की सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या उद्याच्या कलावंत यात्रिकाला प्रेरणा मिळावी, त्याने फुलांच्या हाराची अपेक्षा करू नये.

अनेक अनुभवांचं गाठोडं घेऊन युद्धाशी झुंजण्यास आजही सज्ज आहोत. अनेकदा आपल्याच माणसांकडून कधी पुढे तर कधी मागे अशा स्वरूपाचे चोही बाजूंनी हल्ले झालेत, मात्र डगमगलो नाही. तोफांसारखे आजही युद्धासाठी तयार आहोत.

'कुही' या गावी नाटकाचा प्रयोग होता. त्याची आठवण म्हणून सांगतो. रात्री आठ वाजता प्रयोग अन् रेल्वेगाडी १२ वाजता पोहोचली. आम्ही गावात आलो, विचारपूस केली, पण एवढ्या रात्री समाधानकारक उत्तर मिळेना. शेवटी त्रासून रेल्वे स्टेशनवर येऊन सर्व झोपलो. सकाळी उठलो तर कुणाकडेच खिशात पैसे नव्हते. कुणाला काही कळत नव्हते. भूकही लागली होती. शेवटी उपाशी, विना तिकीट नागपूरला सकाळच्या गाडीने आलो.

असाच एक जीवघेणा प्रसंग. नुकतंच पाचवं अखिल भारतीय दलित नाट्य संमेलन दि. २७, २८, २९ जानेवारी १९९० ला नांदेड येथे पार पडलं. त्यातील अतिशय महत्त्वाचा प्रसंग. दलित रंगभूमी वर्धा च्या वतीने 'मुक्तता' ही एकांकिका आम्ही संमेलनात करणार आहोत असं पत्र संमेलनाचे आयोजनकर्ते प्रा.दत्ता भगत यांना पाठवलं. त्या पत्राचं उत्तर प्रा. दत्ता भगत यांनी ज्या पत्त्यावर आम्हाला पाठवलं ते पत्र आम्हाला न मिळता त्यांनाच परत मिळालं. परत दुसरं घातलं त्यात एकांकिकेचा सुद्धा उल्लेख केला आणि तयारीनीशी नांदेडलां पोहोचलो.

आयोजक प्रा. दत्ता भगत यांच्याशी या विषयावर बोललो तेव्हा पहिल्यावेळी ते खोटं बोलले नंतर थोड्यावेळाने आठवून पत्र मिळाल्याची कबुली दिली. आयोजकांच्या तांत्रिक अडचणीमुळे एकांकिका सादर करू शकलो नाही. शेवटच्या दिवशी परतीच्या प्रवासाचं नांदेड ते नागपूर बस भाडं मागायला गेलो. समोरच्या बाकावर जवळजवळ अर्धा तास बसून होतो आणि समोर औरंगाबादचे प्रा. मधुसूदन गायकवाड हे मान्यवर वक्ते परिसंवादात बोलून व्हॉचर बनवून घेत होते. जवळजवळ अर्धा तास हा सर्व पद्धतशीर प्रकार चालला. एवढंच नव्हे तर 'अश्मक' व 'जहाज फूट गया' या नाटकांच्या ग्रुप्सना २००० रुपयापेक्षा जास्त प्रवास भाडं दिलं.

आम्ही पैशाची जेव्हा दुसऱ्यांदा मागणी केली त्यावर प्रा. दत्ता भगत म्हणाले, "उधार तुम्ही कुणाला तरी मागून घ्या." एवढ्यावर न राहता ते नाटकाच्या डायलॉगस्वरूपात म्हणाले, "तुम्ही इथे वा माझ्यासमोर येऊन निदर्शने करा, आमरण उपोषण करा, नारेबाजी करा पण मी एकही पैसा तुम्हाला देणार नाही." सर्वच प्रकार संमेलनाचे अध्यक्ष प्रा. अविनाश डोळस यांना सांगितला. त्यांनी आपल्या संबंधीत मित्राकरवी १०-१० रुपये जमा करून १७५ रुपये आम्हास दिले. अकरा कलावंतांनी नांदेड ते नागपूर १७५ रुपयांत कसा प्रवास करावा हेच कळेना. तब्बल १६ तास उपाशी राहून दोन ट्रेन

बदलून अकोला येथे पोहचलो. मध्ये विनातिकीट प्रवास करताना सापडलो, पण विनवणी करून सुटलो.

अकोला स्थानकावर जेव्हा फिरत होतो तेव्हा शैलेंद्र सिर्रास या माझ्या बालवयातील मित्राची गाठ झाली. घडलेला सर्व प्रकार त्यास कथन केला. त्यांनी तात्काळ ११ लोकांची जेवणाची समोरच्या लॉजवर व्यवस्था केली. आजही त्या मित्राचे ३७५ रुपये जेवणाचे बिल मी देवू शकलो नाही.

१) तात्पर्य एवढंच, फक्त संमेलनाचा परिसंवाद बोलण्यासाठी यायचं आणि वक्ता म्हणून परिसंवादात बोलल्यावर निघून जायचं, पूर्ण हजेरी न लावता. हीच या जबाबदार माणसांची कर्तव्ये आहेत का ?

२) अखिल भारतीय दलित नाट्य परिषदेने प्रत्येक जिल्ह्यातील पदाधिकारी माणसं सुद्धा ह्या मुद्यावर काहीच न बोलता स्वतःचे व संबंधीत जवळच्या व्यक्तीचे पैसे, प्रवास भाडे खिशात घालून चालते होतात हीच या पदाधिकाऱ्यांची कर्तव्ये का ?

३) दलित रंगभूमीच्या सांस्कृतिक नाट्य चळवळीमध्ये जी कलावंत कार्यकर्ते मंडळी सातत्याने राबरावते आहे त्या कलावंताच्या आणि कार्यकर्त्यांच्या खांद्यावर ही चळवळ उभी आहे. किंबहुना त्याला या क्षेत्रातल्या संदर्भात सर्वच आधुनिक तंत्रे अवगत आहेत. फक्त त्या कलावंताकडे कार्यकर्त्यांकडे प्राध्यापक वा नाटकार या पदव्या नाहीत. म्हणून त्यांना संमेलनाचा अध्यक्ष वा परिषदेचा अध्यक्ष म्हणून नेमणार नाहीत का ?

असे अनेक आणि असंख्य प्रश्न तरुण कार्यकर्ते कलावंतांच्या तापयासमोर मुर्दाडासारखी प्रश्नचिन्हं म्हणून उभी आहेत. मात्र या व नंतरच्या कुठल्याही त्यांच्या इर्द-गिर्द प्रलोभनांस बळी न पडता ज्यांनी दलित नाट्य संमेलन ही व्यक्तिगत मूल्यांकनाची साधनं केली त्याचे बुरखे सुद्धा आम्हीच फाडू त्यासाठी सुद्धा आम्ही सज्ज आहोत.

परंतु प्रश्न, उपप्रश्न किंबहुना दोघांचही वलय, वेदना, मानहानी अनुभवाचं गाठोडं खांद्यावर आहेच. खूप काही लिहिण्यासारखे आहे पण चळवळीच्या दृष्टीने लिहूणं हितावह होणार नाही. अनेक लोकांनी स्वहितासाठी या चळवळीचा उपयोग करून घेतला, पण दुसरीकडे अमर रामटेकेसारखी संपूर्ण पगार चळवळीला देणारी तर बहिणीला लाडीगोडी लावून सतत चळवळीच्या कामासाठी पूर्ण शिष्यवृत्ती देणारी माझी बहीण मंदा रामटेके अशी दमदार, समजदार माणसं बघितली की फार समाधान वाटते.

या सर्व चळवळीत मला राबवून स्वतः राबणारे अमरदादा रामटेके, रोशन सोमकुवर आणि सहकारी मित्र प्रेमकुमार डुके, वंदना कोटाम्बे, साधना हुज्जैनवार, जेनिफर स्मिथ, अशोक जांभूळकर, अनिल कांबळे, संजय जीवने, सुनील रामटेके

आणि ऐन युद्धावेळी सांस्कृतिक चळवळीचा युद्धाचा भार माझ्यावर टाकून गेलेले माझे समता संगरचे दोन साथी. दलित रंगभूमीचे बंडखोर कलावंत दिवंगत काका उर्फ विजय सोनारकर व दिवंगत धर्मेश सोनटक्के यांचे अमूल्य सहकार्य होते. याच दरम्यान आम्ही अनेक नाटचस्पर्धांमध्ये भाग घेतला. अनेक पारितोषिके मिळाली. उदा. ' मुक्तता, संगर, श्रीपाद रमाकांत दळवी, आधार, शिदोरी, स्त्री १९८०'

पथनाटचाची चळवळ खरोखरच लोकांना मनापासून आवडली, नव्हे विचारांनीसुद्धा पटली. याला कोणताही खर्च नसून सामान्य लोकांपर्यंत त्यांच्या प्रश्नांचा मेसेजस्वरूप उत्तर पोहोचविण्याचं काम सुद्धा आम्ही केलं. जेव्हा सामान्य माणूस आम्हाला ' पथनाटचवाले ' म्हणून बोलावितो, ओळखतो तेव्हा आंतरिक समाधान वाटते. गेली १३–१४ वर्षे या काळात सतत एका चळवळीशी बांधिलकी स्वीकारून जगणे कठीण असते. पण केवळ ' आंबेडकरी प्रेमामुळे ' हे करीत गेलो करीत आहोत आणि करू.

गेल्या नऊ महिन्यांपासून 'दलित थिएटर नागपूरचा'चा स्वतंत्र वेगळा ग्रुप जोमाने काम करीत आहे. दिवंगत धर्मेश सोनटक्के लिखीत व चंद्रशेखर रामटेके दिग्दर्शित ' रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया अर्थात इंदोरा ' या पथनाटचाचे सातत्याने खेडोपाडी जाऊन सतत प्रयोग सुरू आहेत. गेल्या दीड महिन्यात या ग्रूप्सनी ४८ प्रयोग केले आहेत आणि लवकरच शतकमोहोत्सवी प्रयोगाकडे वाटचाल करीत आहेत. या प्रयोगाच्या वेळी अनुभव असा की माझ्या एवढ्या वर्षांच्या कालावधीत पथनाटचास सुमारे रात्रीच्या १२ वाजता बाघिततेला प्रेक्षक-वर्ग होय. यात प्रामुख्याने भंडारा जिल्हचात येणारे शहापूर, सावरी व साकोली तहसील अंतर्गत येणारं सावली, मुरमाडी या गावांचा उल्लेख करावा लागेल.

प्रयोग संपल्यानंतर लोक मनापासून ऐकून सांगायचे की ' आम्हाला एकी हवी आहे, आंबेडकरी विखूरलेल्या गटाचं एकीकरण हवं आहे ' हे प्रत्येकच माणूस, स्त्री, तरुण मुलं–मुलींसुद्धा स्पष्ट बोलत होते. पण हे भोंदू, स्वार्थी नेते एक होत नाहीत ही शोकांतिकाच होय. असं सुद्धा ते बोलायचे.या पथनाटचास भरपूर मागणी असून या पथनाटचाचे लवकरच १०० प्रयोग दलित थिएटरच्यावतीने करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. त्या दिशेने वाटचाल सुरू आहेच. यात चंद्रशेखर रामटेके, सुरेंद्र रौराळे,विजय रामटेके, अश्विन नाईक, योगेश राऊत, प्रविण हुमणे, राजू वानखेडे यांचा समावेश असून जयंत बनसोडे, कविता गजघाटे, अनिता ठवळे, चंदू वालदे यांनी दलित थिएटरच्या मदतीकरिता आर्थिक, श्रमिक व कलावंत म्हणूनसुद्धा भूमिका करण्यात सिंहाचा वाटा आहे हे न विसरण्याजोगे आहे. या पथनाटचाचे सर्व भाषांमध्ये प्रयोग व्हावेत असे प्रांजळ मत आहे.

आशय : अनेकजण दलित रंगभूमी नागपूरच्य कार्याबाबत विचारतात.आम्हाला त्यांना एवढेच सांगायचे आहे की, आम्ही दलित रंगभूमीच्या विषयांना नवीन

आयाम दिला. दलित नाटच म्हणजे केवळ दलित ब्राह्मण संघर्ष ही संकल्पनाच आम्ही बदलून टाकली, सामान्य तळागाळातील जीवन जगणाऱ्या माणसापर्यंन्त आंबेडकरी विचार रुजविण्याचा प्रयत्न केला. या चळवळीच्या पाठीशी एक वैज्ञानिक तत्त्वज्ञान आहे. धार्मिकतेवर हल्ला, आत्मविरोधी प्रचार, ईश्वरशाहीसंकल्पनेविरुद्ध प्रचार, अंधश्रद्धाविरोधी प्रचार, बुवाबाजी विरूद्ध प्रचार आणि जातियवादावर प्रखर हल्ला असे दलित पथनाटयाचे आशय घेऊन पथनाटय केलीत.

पथनाटच हे संकुचित असून त्यातील विषय एकच असतो. असा अर्थहीन प्रतिगामी आरोप काही बुद्धीवंतांनी केला. मात्र हे बीनबुडाचे आरोप आहेत. कारण आजवर आम्ही अनेक विषयावर पथनाटये सादर केली. उदाहरणादाखल 'मृत्यूदिन' व मुक्तीदिन' मध्ये दलितांच्या स्वातंत्र्याचा प्रश्न, पार्टी, राजकीय गुलामी, पुढाऱ्यांचा प्रश्न, शहर मध्ये माणसांच्या लिलावाचा प्रश्न,पाखंड मध्ये ईश्वरशाही संकल्पनेच्या विरोधात घणाघती विचारी हल्ले तर विस्फोट मध्ये दलित नेतृत्वाचा प्रश्न, अलिकडे रिपब्लिन पार्टी ऑफ इंडिया अर्थात इंदोरा पथनाटयात दलित नेत्यांचा स्वार्थीपणांचे प्रश्न, नशामध्ये असंख्य माणसांचं गरीबीचं कारण दारु असे नानाविध विषय आम्ही हाताळले. म्हणून आम्ही हे प्रतिगामीवादयाचे बिनबुडाचे आरोप सहन करणार नाही. भ्रष्टाचार, अंधश्रद्धा, ईश्वरवाद, स्वैराचार जोपासणाऱ्या प्रवृत्तीच्या विरुद्ध संघर्षासाठी या माध्यमाचा प्रभावी उपयोग होतो. तर भाषा सरळ 'साधी' मनाला जावून भिडणारी असल्या कारणाने प्रेक्षकांना लवकर कळते. नाटक चटकन कळते.

परिणाम : प्रतिगामी नाटकांना मागे टाकून पथनाटच चळवळ जोमाने पुढे जात आहे. अगदी सुरुवातीच्या स्थितीत काही तथाकथित नामवंत समीक्षकांनी पथनाटच चळवळीला विरोध केला. तिला मान्यता दिली नव्हती. रस्त्यावर सामान्य माणसाचं दु:ख नाटक होऊ शकते ही संकल्पनाच त्यांना मान्य नव्हती तर फक्त बंदिस्त थिएटरमध्ये चैनविलासाची, सुखोपभोगाची नाटकं तिचं नाटक होऊ शकतात ही संकल्पना त्यांनी मान्य केली असा कयास त्यांनी धरला. परंतु आता परिस्थिती बदलली आणि त्याच समिक्षकांनी पथनाटच चळवळीच्या सुप्त कलागुणांना मान्यतेची पावती दिली.

'सफदर हाश्मी' सारख्या प्रकरणाने आम्ही घाबरून पळ काढणार नाही तर अजून बिनधास्त ताकदीने त्यांच्यासमोर उभे राहून नवीन आव्हाने, नवीन संघर्षाची आव्हाने, पेलवण्याची क्षमता देखील आम्ही आमच्या कलावंतांमध्ये निर्माण केली. पथनाटच चळवळीवर होणारे प्रतिगाम्यांचे हल्ले आपण लक्षात घेतले पाहिजेत. कारण नर्मदा बचाव, हिंदू रक्षण, गंगा बचाव सारख्या जनजातीय पोथीनिष्ट विचार परत समाजात लादण्यासाठी त्यांनी 'पथनाटच' या माध्यमाचा स्किार केला आहे. करीत आहेत. तेव्हा ही गांभिर्यपूर्व धोक्याची सूचना सर्व दलित

पथनाट्य कलावंत लेखकांनी कार्यकर्ता सैनिकांनी लक्षात घेतली पाहिजे. कारण प्रतिगामी शक्ती, प्रसार, प्रचार व जनसंपर्काची सारी माध्यमे, साधने आपल्या खिशात टाकून बसले आहेत. हे देखील आपलं प्रबोधनाचं ' पथनाट्य ' माध्यम त्यांच्या हाती गेले तर दलित नाट्यक्षेत्राची फार मोठी हानी निश्चितपणे होईल यात शंका नाही.

## पथकवी संमेलनातील अनुभव

पथनाट्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन होतं हे कटू सत्य असताना त्याला पूरक पण तेवढ्याच ताकदीचं माध्यम म्हणून पथकवी संमेलने सुद्धा केली. पथकवीसंम्मेलनाच्या माध्यमातून झोपडपट्टीत राहणाऱ्या सामान्य माणसांपासून तर इमारतीत राहणाऱ्या माणसांपर्यंत जावून पोहचलो. नागपुरातील सर्वच आणि अतिमहत्त्वाच्या चौकाचौकांत आणि वस्तीवस्तीमध्ये जाऊन आम्ही जवळपास १०० पथकवी संम्मेलने सातत्याने आयोजित केली. हा उपक्रम सातत्याने अजूनही सुरुच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, " माझ्या दहा भाषणाचं काम एक जलसा करतो. " हे वाक्य अगदी मनाशी बांधून आम्ही परिवर्तनवादी चळवळीशी स्वतःला बांधून घेतलं याचे परिणाम आज स्पष्टपणे जाणवत आहेत.

पथकवी संमेलन आयोजित करून मोठ्यात मोठा आशय अतिशय कमी शब्दांत लोकांच्या अंतर्मनाला जावून सरळ भिडेल अशा सोप्या कविता लोकांसमोर सादर करायचो. या सर्व कवितांचे सांगणे एकच की पशूपेक्षा नीच जीवन जगणाऱ्या माणसला सन्मानाने जगता यावे. अंधारातील माणूस हा प्रकाशात आला पाहिजे. या उत्कट आव्हानामुळे या कवितेस स्वतःचे जीवनवादी रूप सापडते. कारण प्रतिगामी सनातन विश्वाच्या निराशाजनक विचारांचं शवविच्छेदन करून दलित कविता जन्मास आली. या कार्यात लोकांनी चांगला प्रतिसाद दिला. यामध्ये श्रीपाद भालचंद्र जोशी, उल्हास मनोहर, नालंदा वानखेडे राहूल वानखेडे, हीरालाल शेंडे, अमर रामटेके, चंद्रशेखर रामटेके, प्रसेनजीत ताकसांडे, गोविंद वाघमारे, सुनिल कुलकर्णी, विलास मनोहर, मनोहर गौर, तन्हा नागपुरी इत्यादी कवीचे न विसरण्याजोगे योगदान आहे.

या देशातील प्रत्येक वेश्या माझी बहीण व इथे काम करणारा मजूर माझा बांधव आहे ही मानवमूल्याधिष्ठीत संकल्पना उराशी बाळगून वेश्यावस्तीपासून तर गिरणीकामगार, कष्टकरी स्त्रिया, रिक्षावाला, स्लॅबवर काम करणारा मजूर, रस्त्यावरचे कागद वेचणारा मुलगा, तरुण तर खरेदीकरणाऱ्या रद्दीवाल्यांच्या संघर्षरहीत वास्तववादी जीवनाच्या कविता त्यांना ऐकवित असू. अनेक ठिकाणी लोकांनी उत्तम प्रतिसाद दिला. काही पॉश वस्त्यांमध्ये होतकरू तरुणांनी एक नवीनच उपक्रम सुरू करून नवपर्वपरिवर्तनवादी परंपरेला सुरुवात करून सहकार्य करण्याची भूमिका दर्शविली आहे.

अनुभव : दिनांक २४-३-१९८४ ला स्थानिक कमाल टॉकीज चौक इथे आम्ही नुक्कड कवीसंमेलन घेण्याचं ठरलं. नियोजीत स्थळी आणि वेळी सर्व कवी-मित्र पोहचले. कवीसंमेलनाला सुरुवात झाली. राहूल वानखेडे हा आमचा कवी मित्र आपली ' रद्दीवाला ' शीर्षकाची कविता प्रस्तुत करीत होता. मध्येच रद्दी वेचणाऱ्या माणसाने " अहो साहेब आपण म्हणता ते अगदी बरोबर आहे " अशी प्रतिक्रीया व्यक्त केली.

कविसंमेलन संपल्यानंतर त्या रद्दीवाल्याने आम्हाला चहा पाजला आणि चहा पीत असताना तो म्हणाला राहुलसाहेब ह्या व्यवस्थेची चातुवर्णीय चौकटीची परंपरावादी विचारांची शृंखला इतकी कुचकामी आहे की माझ्यासारख्या सामान्य माणासाचे, रद्दी वेचणाराचे विचार कितीतरी श्रेष्ठ आहेत. किंबहुना एवढयावरच न थांबता तो पुढे म्हणाला, " अहो माझे रद्दीतील रद्दी जीवन कितीतरी श्रेष्ठ आहे. " ह्या परंपरावादी विचारापेक्षा मीच तर त्यांच्या पडलेल्या, सडलेल्या विचारांना वेचतो आणि विकतो.

दिनांक ६-६-१९८२ ची गोष्ट. स्थानिक सिद्धार्थनगरला कवीसंम्मेलन होते. सर्व कवीदोस्त जेव्हा पोहचले. तेव्हा कवी संमेलनाला सुरुवात झाली. बहुदा तिसऱ्या चौथ्या क्रमावर कविता प्रस्तुत होत होती 'नामांतर.' नामांतराची कविता जेव्हा अमर वाचत होता त्याचवेळी नामांतराच्या वेळी जे खेडोपाडी जातीय दंगे उसळले त्यांचे पडसाद सर्वत्र उमटत असताना नागपुरात सुद्धा गोळीबार झाला. त्या गोळीबारात आमचा दोस्त नामांतराच्या लढयातील एक शिपाई ' दिलीप रामटेके ' पोलिसांच्या गोळीबारात बळी पडला. तो शहीद झाला. त्या कवितांच्या काही ओळी प्रेक्षकामधून काहीनी आत्मसात केल्या आणि ढसाढसा रडले त्या ओळी अशा –

कालची पहाट वेगळीच होती
सूर्य आला आणि मावळून गेला
तेव्हा नामांतरात शहीद झालेल्यांच्या
आई, बहिणी ढसाढसा रडत होत्या
कुठे आहे दिलीप, कुठे आहे रोशनचा
आक्रोश करीत होत्या."

( नामांतर – अमर रामटेके )

रोजच या देशात क्षितिजावर उगवणारा प्रत्येक दिवशीचा सूर्य दलितांच्या घरादारांची राख झाल्यावाचून आणि दलितांना तडफडून मारल्यावाचून मावळत नाही. ह्या बंदिस्त चौकटीत रोज रोज मरण्यापेक्षा ह्या बंदिस्त चौकटीला फोडून, बाहेर आले पाहिजे. असा अमर कवितेतून संदेश देत असताना आपली ' आम्ही ' ही दुसरी कविता सादर करतो. तेव्हा एक सूज्ञ प्रेक्षक प्रतिक्रिया व्यक्त करताना

म्हणतो, 'दादा या गंज लागलेल्या बंदुका आता कुचकामी निकामी ठरणार आहेत. पोलिसांच्या बंदूकीच्या गोळीने सुद्धा आमचे मरणे शक्य नाही. आम्ही मरु या देशात दलित स्वातंत्र्याचा सूर्य पाहू तेव्हाच, अशी संतप्त प्रतिक्रिया त्या प्रेक्षकाने व्यक्त केली.

'आम्ही' या अमर रामटेके यांच्या कवितेतील ओळी–

आम्ही चालतो तेव्हा रस्त्याच्या
दोन्ही बाजूला
पोलिसांचे ताफे उभे असतात
आम्ही चालतो तेव्हा
गंज लागलेल्या बंदुकींना
साफ करण्यात येते
तरीही आम्ही चालतो

## आंबेडकरी जलसा : डिसेंबर १९८८
## तिकीट विक्री : दलितरंगभूमीला आलेले माणसांचे अनुभव

सामान्यपणे दलितांच्या चळवळीबाबत एक फार मोठा गैरसमज (अविचारीपणाचा) काही तथाकथितांच्या मनात आहे. ही तथाकथीत मंडळी काही विशिष्ट कार्यक्रमांनाच ( मोर्चे परिसंवाद ) चळवळ म्हणून मान्य करतात. मात्र सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या पथनाट्याद्वारे, जलसाद्वारे, नुक्कड कवी संमेलनद्वारे वस्त्या वस्त्यांमधून खेड्याखेड्यांतून मानवतेचे विचार सामान्यापर्यंत पोहोचवणाऱ्या दलित रंगभूमीला ते चळवळ म्हणून मान्य करीत नाही. हे मानवतेचे विचार राबवताना कोणत्या अडचणी येतात ते समजून घ्यायला ते तयार नसतात. समजवून नाही पण कमीतकमी त्यांनी ही चळवळ माहीत करून घेण्याची गरज आहे. त्यांच्याच मानसिक विकासाकरीता हे आवश्यक आहे. कारण त्यांना समाजात राहायचे आहे आणि मनाच्या व्यापकतेशिवाय समाजात माणसाला माणूस म्हणून स्थान नाही.

नाटकाचा प्रेक्षकवर्ग नागपुरात उपलब्ध नसल्यामुळे ज्याप्रमाणे नाटकाला पथनाट्याच्या स्वरूपात येऊन आम्ही त्यांच्यामार्फत पोहोचलो त्याप्रमाणे थिएटरला लावलेल्या प्रयोगाच्या तिकिटस् आम्हाला त्यांच्या घरापर्यंत जावून व जबरदस्तीने कमीतकमी दर ठेवून द्याव्या लागतात. आमचा सर्व खटाटोप यासाठी की जी माणसं आजवर अन्यायातच खितपत पडलेली आहेत. त्यांच्यामुळे सत्य खऱ्या संस्कृतीची ओळख त्यांना करून द्यावी. त्यांच्यात संघर्षाची जाणीव निर्माण व्हावी. आमूलाग्र बदलाकरिता त्यांच्यावर थोडी का होईना जबरदस्ती करावी लागते. कारण अति अल्पसुरवात मस्तवण्याची माणसांची प्रवृत्ती असते आणि याच प्रवृत्तीशी आमचा लढा असून ती प्रवृत्ती बदलण्याचाच आमचा सतत प्रयत्न आहे.

## अनुभव काही औरच

संपूर्ण चौदा पंधरा लोकांचा समूह घेऊन आम्ही त्यांच्या दारावर उभे असतो. ( यावेळी आम्ही सकाळी सात वाजता घरातून बाहेर पडलेले असतो. ) या प्रसंगी काहींनी तर हातात तिकीट पुस्तिका पाहताच घराचे दरवाजे बंद केले तर ' पुढे पहा . . . ' असंही म्हणणारे बरेच लोक भेटलेत. लक्ष्मीनगरसारख्या उच्चस्तरीय वस्त्यांमध्ये जेथे माणसं आर्थिकसंपन्न आहेत तिच माणसं पाच रुपयांच्या तिकीटाकरिता महिन्याचे बजेट सांगायला लागतात. तर कुणी पोलिसांची आमच्या घरावर धाड पडली म्हणून आम्ही पाच रुपयांचं तिकीट घेऊ शकत नाही असंही सांगतात.

ज्यांच्यासाठी आम्हाला हे सारं करायचं आहे ती माणसं झोपड्यातच राहतात असं नाही तर इमारतीमध्ये सिव्हिल लाईनमध्ये राहणाऱ्यांनाही त्याची फार आवश्यकता आहे. कारण भौतिक सुखाला बळी पडून ही माणसं असांस्कृतिक होत चालली आहेत. त्यांच्या प्रवृत्ती ठिसूळ होत चालल्या आहेत. सामाजिक जाणिवांचे बंध त्यांनी केव्हाच तोडून टाकले आहेत. त्यांना या गोष्टीची कल्पनाच उरली नाही की जीवन जगण्यासाठी आहे. ते उपभोगण्यासाठी नाही आणि जीवनाला सुंदर बनवणे आपल्याच हातात असतं.

## मनाचे नमुने

आम्ही लक्ष्मीनगर, बजाजनगर, अभ्यंकरनगर यांसारख्या ठिकाणी तिकीटविक्रीसाठी गेलो होतो. मात्र पैशाने मोठी असलेली माणसे मनाने अतिशय लहान असल्याचे जाणवले. काही लोक एक इंचाच्या फटीइतक दार उघडून आमच्या हातात तिकीट पाहताच दार बंद करायचे. लक्ष्मीनगरातील एका गृहस्थाच्या श्रीमती तर चक्क इंग्रजीतूनच ओरडल्या ' आय एम् नॉट इंटरेस्टेड ' बायकोच्या असल्या वाक्यापुढे काही न बोलणारे असामाजिक नवरे . . . आणि आणखी एक प्रातिनिधीक रूप . . . ' साहब को परोस रही हूँ . . . अभी टाइम नही है ' ही भुकेजलेली माणसं खरंच समाजाशी संबंध ठेवतात का ? समाजात स्वअस्तित्व शोधू शकतात का ?

काही लोक तर अर्धातास प्रवचनासारखे ऐकतात आणि खिशातून खूप किंमती वस्तू जात आहे असा चेहऱ्यावर भाव आणून पाच रुपये देतात. म्हणे बजाजनगर येथील पॉश बंगल्यात राहून ' मी रिटायर्ड झालो ' मी तुम्हाला काहीच मदत करू शकत नाही. मग ते खातात तरी काय ? आणि पांढऱ्या शुभ्र कुत्र्याचा खर्च तरी कसा सांभाळतात ? पाश्चिमात्य भौतिक बदलाला माणूस असा बळी पडत चालला आहे आणि माणसाचं मानवनिर्मित तत्त्वज्ञान तो विसरत चालला आहे.

घरात मिस्टर सहकार्य करायला तयार असतील तर मिसेस त्यांच्याशी झगडा करून म्हणतात, " ही मदत वगैरे काही नको, त्यांचा धंदा आहे हा. " साऱ्याच

नैतिकमूल्यांचा धंदा चालवणाऱ्या या माणसांना धंदा काय असतो हे सांगायची आता गरज नाही.

ती पोरे आल्यावर 'तू दारच का उघडलंस' म्हणून आपल्याच मुलांना झोडपून काढणारे आईवडील कमी नाहीत. 'आम्ही पाहुणे आहोत' म्हणून सांगणाऱ्याचीच लहान पोरं आपल्याएवढ्याच लहान मुलामुलींना दारावर बघून खाऊचे जमा केलेले पैसे देतात तेव्हा वाटतं या साऱ्या समाजाने पुन्हा एकदा बालपणात प्रवेश करावा आणि आजच्या उमद्या बालकांकडूनच मानवतेचे धडे घ्यावेत. घर चालवणारे बाहेर गेले असंच जास्तीत जास्त स्त्रिया सांगत असतात. या निमित्ताने स्त्री-मुक्तीच्या बऱ्याचशा प्रश्नांची उकल त्यांच्यासमोर करता आली.

## कुत्र्याने कुत्रा अंगावर सोडला

एका घरी ( अर्थात बंगला ) आम्ही गेलो असता 'यू आर गेटाऊट' असं आमचं काही न ऐकता 'स्वागत' करण्यात आलं. आम्ही अतिशय शांत स्वरात, 'तुम्हाला बोलायला शिकवावं लागेल का ? असं म्हणताच माझ्याजवळ दुसरे शब्द नाहीत असं म्हणून त्याने साखळी बांधलेला कुत्रा सरळ आमच्या अंगावर सोडला. त्या कुत्र्याला आम्ही तिथेच लोळवू शकलो असतो पण . . . जर का कुत्रा आमच्यापैकी कुणाला चावला असता तर . . . खरंच आम्ही रामराज्याच्या कुठल्या अध्यायात जगतो आहोत ? या माणसांना जीवनानेच बनिया बनवलं आहे. आता यांना समाजासमोर खरोखरचं नागडं केलं पाहिजे.

## आम्हाला माणूस हवाय !

समाज फार चांगला आहे. मात्र काही नासक्या प्रवृत्तींनी तो बदनाम होतो. 'चळवळी'ला मदत करू नका पण तुम्ही 'माणूस' व्हा, मानवतेचे गीत गाणारे एवढंच आम्हाला सांगायच आहे. आम्ही तुमच्या जवळ खूप अपेक्षा घेऊन येतो असं नाही. पण आम्हाला सामान्य माणसांचे पैसे हवे आहेत. सामान्यांमध्ये चळवळ रूजवायची आहे. कारण सामान्य माणूस हाच कुठल्याही क्रांतीचा आगडोंब आहे. क्रांतीच्या दर्शनीचे नाव लिहिणारा पहिला सर्जनशील सुकाणू हा सामान्य मानव होय. आम्ही करतो त्याचं फलित व्हावं. कणाकणांतील समग्र परिवर्तन हेच ध्येय !

## नाट्यशिबीर

दलित शोषणाची मानसिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी सांस्कृतिक परिवर्तनाची अत्यंत गरज आहे. या सांस्कृतिक क्रांतीची पूर्व तयारी क्रांतिसूर्य डॉ. आंबेडकरांच्या चळवळीतून, त्यांच्या तत्त्वज्ञानाच्या प्रभावामुळेच झाली हे निर्विवाद सत्य आहे. १९५६ च्या धर्मक्रांतीने समग्र सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाची दिशा घोषित केली, निर्देशित केली. कारण या धर्मक्रांतीला सामाजिक, सांस्कृतिक फार मोठे संदर्भ आहेत. आंबेडकरी विचार ही केवळ प्रेरणा मानून भागणार नाही, तर प्रेरणातत्त्व विचार जनसामान्यांना पटवून द्यावा लागेल. आमचं

लक्ष्य व्यक्ती नसून समग्र व्यवस्था उलथून पाडण्याचे आहे. हे लक्ष्यवेधी सूत्र मनपटलावर मेंदूत बिंबऊन दलित रंगभूमी नागपूरच्या विद्यमाने दोन नाटचशिवीरे आयोजित केली. एका शिबिराचे संचालन दलित कलामंच पुणेच्या अध्यक्षा चित्रपट अभिनेत्री शिल्पा मुंब्रीकर यांनी तर दुसऱ्या शिबीराचे संचालन संजीव जीवने यांनी केलं. साहित्यशिबीरसुद्धा आयोजित केले होते.

नागपूरची गोष्टच निराळी. इथे दलित रंगभूमीने जेव्हापासून नाटच शिवीरे, साहित्य शिबीरे आयोजित केली.त्या शिबीरातून दलित कलावंताची पिढी व दलित साहित्यिकांची पिढीच निर्माण झाली. पण त्याबरोबरच बहुतेक बाहेरच्या जिल्ह्यांत, खेडोपाडी अनेक दलित कलावंत, साहित्यिक निर्माण झालेत. यात प्रामुख्याने प्रशांत साखरकर, अशोक रोकडे, माता मीना साखरकर, अशोक मेश्राम, अशोक कांबळे, राजकुमार नागरे, अशोक बुरबुरे, विलास मवरे, उज्ज्वला तुपसुंदरे, सतेश्वर मोरे, अनिल धनविजय, संजय चवरे, प्रशांत बामरे, शैलेंद्र सिरसाट आदींचा समावेश करता येईल. पुसद, दिग्रस, वर्धा येथे दलित नाटचचळवळीचे काम वेगात सुरू आहे. शिबीराच्या माध्यमाने विद्यार्थ्यांवर आंबेडकरी विचारच हॅमरिंग होत असल्याने समाधिष्ठित समाजपोषक विचारांची पिढी तद्वतच कलावंत, कार्यकर्ता घडविण्याचे काम सुरू आहे.

कारण आंबेडकरी चळवळीसाठी वैचारिक पातळी किमानपातळीपेक्षा जास्त कमालपातळी उंच असणाऱ्या कार्यकर्त्यांची निकडीची गरज आहे. हाच वैचारिक कार्यकर्ता आंबेडकरी चळवळीचं सर्वांत मोठं शस्त्र होय असं मी मानतो.

## नाटचशिबीराचा उद्देश

जातीभेदाच्या शृंखला तोडल्यानंतर डॉ. आंबेडकरांना अभिप्रेत असलेली समाजरचना प्रस्थापनेसाठी क्रांतीलढ्याचे नेतृत्व समाजातील तरुण वर्गाच्या खांद्यावर येऊन पडले. हे जाणून समता, संग्रामात शत्रूपक्षावर विजय मिळविण्यासाठी आंबेडकरी विचारांची शस्त्रे युवक–युवतीने चळवळीतील राबणाऱ्या प्रत्येक कलावंत कार्यकर्त्यांनी आत्मसात करणे ही त्यांची नैतिक जबाबदारी असते.

प्रशिक्षणार्थीच्या आंतरमनावर रुजविणे हा मूळ हेतू. दलित साहित्य, दलित साहित्य संम्मेलन, दलित नाटच संम्मेलन, नाटच शिबीर, चर्चा, परिसंवाद हे विचार पेरण्याचे माध्यम असू शकते. पण दलित रंगभमीचा कलावंत कार्यकर्ता घडविण्यासाठी सातत्याने समता, स्वातंत्र्य, बंधूता या आंबेडकरी तत्त्वज्ञानाच्या विचारांचे प्रहार शिक्षणार्थी विद्यार्थ्यांवर होणे अत्यावश्यक आहे. आम्हास कलावंत पाहिजे जो विचारांनी पेटला असेल, दुसऱ्यास पेटवणार असेल प्रसंगी तो सडकेवरील आंदोलनातदेखील कृतिशील वैचारिक अभिनय भूमिका निभावणारा असेल हे ध्येय उराशी बाळगून आम्ही प्रशिक्षण शिबीराचा वैचारिक प्रवास सातत्याने सुरू ठेवला आहे.

## दलितरंगभूमीकडून अपेक्षा व तिच्या कक्षा

दलित रंगभूमीच्या बाबतीत विचारणाऱ्यास मी एवढच सांगू इच्छितो. की ' दलित रंगभूमी ' हे दलित साहित्य परिवारील सर्वांत लहान भावंड असले तरी तरी ते विद्रोहाचे प्रभावी माध्यम अणि क्रांतीचा वणवा आहे. रंगभूमीपेक्षा वेगळं दुसरं कोणतंही साधन प्रबोधनाचं आमच्याकडे नाही. हे सत्य. कविता आणि नाटक ही दोनच माध्यमं सामांन्याच्यापर्यंत जाऊन पोहचतात. ज्यांच्यात समाज–परिवर्तनाची गरज असून जे विषम समाजव्यवस्थेचे शिकार आहेत त्या सामान्य लोकांपर्यंत विद्रोहाचे लोण पसरविण्याचे काम फक्त रंगभूमीच करू शकते. दलित रंगभूमीची साधने, आशय व अविष्काराची साधने ही प्रस्थापित मराठी रंगभूमी–पासून वेगळी राहतील हे कटु सत्य असताना तिने आधुनिक तंत्राच्या जाळचात अडकून राहू नये. आशय आणि अंतरमनाला जाऊन भिडेल असा कृतिशील अभिनय, साधी सरळ भाषा आणि अभिव्यक्ती हे दलित रंगभूमीचं बलवान सामर्थ्यं होय.

दलित नाटकांनी आज सामाजिक विषमतेचे बंधन तोडून बंधनमुक्त होवून विषमतेच्या मर्यादेपलीकडील नाटक रंगभूमीवर सादर केले. समताधिष्ठित समाज-परिवर्तनाची व्यापक दृष्टी समोर ठेवून सर्व शोषितांच्या विषयांना हात घालूत दलित रंगभूमी नव्या जाणिवांनी आकार घेत पुढे येत आहे.

आपण वर्षांनुवर्षे हे पशुतुल्य जीवन जगलोच कसे ? या भावनेने त्या समाजाविरुद्ध चीड निर्माण होणे साहजिक होते. आणि म्हणूनच दलित नाटकांचा पहिला आशय प्रचंड क्रोधाचा उद्रेक होता असे मी मानतो. क्रोधासमोर जे दिसेल ते नष्ट होते. पण विद्रोह केवळ समोरचे नष्ट करीत नाही तर नवीन जग निर्माण करण्याची प्रेरणाही त्यामागे असते.

ज्यावेळी कलावंत रस्त्यावर येण्यासाठी घाबरत किंवा त्यांना त्यांचा प्रतिष्ठेचा प्रश्न वाटत असे त्यावेळी नागपुरात आम्ही एका नव्या चळवळीला जन्म दिला. एवढंच नव्हे तर चळवळीत मुलींना सर्वप्रथम पथनाटयाच्या माध्यमा-तून समोर आणण्याचे फार मोठं कार्य सुद्धा दलित रंगभूमीने केले आहे. हे केवळ आंबेडकरी प्रेरणेने झाले. राजकीय, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक सारेच प्रश्न आम्ही या चळवळीच्या माध्यमातून हाताळले आहेत.

गेलो १३–१४ वर्षे या सांस्कृतिक पविर्तनाच्या लढयात काम करताना बरेच काही शिकायला भेटले. अनेक अनुभव आयुष्य संपेपर्यंत न विसरण्याजोगे आहेत. अनेक माणसांना अधिक तपासून जवळून पाहता आले. तुमची ' दलित नाटय चळवळ संपणार ' असे म्हणणाऱ्या लोकांच्या तोंडाला आम्ही लांबी लावली. यापुढे असे मुर्खपणाचे वक्तव्य करू नये म्हणून ही चळवळ अधिकाधिक फोफावत असून वादळवेगाने समोरे जात आहे.

दलित नाट्य चळवळ ही सामान्य समूहाची चळवळ व्हावी. या चळवळीतून अनेक विषय हाताळले पाहिजेत. चळवळीत काम करणाऱ्या कलावंताने केवळ रंगभूमीपुरते मर्यादित राहून भागणार नाही तर त्याने मानवमुक्ती संग्रामात, आंदोलनात प्रत्यक्ष रस्त्यावरच उतरावयास पाहिजे. तसेच दलित लेखकानेसुद्धा आपली लेखणी केवळ कागदापर्यंत सीमित ठेवू नये. असं होत असेल तर ती प्रवृत्ती समाजास घातक आहे. येणाऱ्या काळाला तोंड देण्यासाठी नवीन आव्हाने पेलविण्यासाठी दलित रंगभूमीवर काम करणारे लेखक, कलावंत, दिग्दर्शक, कार्यकर्ते या सर्वांचे सांस्कृतिक आंदोलन उभे राहणे ही काळाची गरज आहे.

**– चंद्रशेखर रामटेके**

सतधम्म विहारामागे,
नवा नकाशा, लष्करी बाग, नागपूर

●

# धम्मचळवळ आणि मी

**– मीनाक्षी मून**

सब्बे सत्ता सुखी होन्तु सब्बे होन्तुच खेमिनो
सब्बे भद्रानि पस्सन्तु मा कञ्चि दुःखमागमा ।।

भ. बुद्ध

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९३५ साली येवला (नाशिक) धर्मांतरपरिषदेत भाषण देताना म्हणाले, 'समाजाच्या धारणेकरिता घातलेली बंधने किंवा आचरणात आणावयाचे नियम म्हणजेच धर्म. व्यक्तीच्या आत्मोन्नतीला पोषक असे वातावरण उत्पन्न करणे ही धर्माची मूलभूत कल्पना आहे. व्यक्तिच्या विकासाला सहानुभूती, समता आणि स्वातंत्र्य या तीन गोष्टींची आवश्यकता आहे. व्यक्तीचा विकास हेच धर्माचे खरे ध्येय आहे असे मी समजतो. हिंदूंच्या असमानतेच्या वर्तणुकीमुळे अस्पृश्य सर्व हिंदुस्थान देशामध्ये सर्वांपेक्षा हीन गणला गेला आहे. स्वराज्याची आवश्यकता भारताला, तितकीच धर्मांतराची आवश्यकता अस्पृश्यांना आहे.

माणूस धर्माकरीता नाही. धर्म माणसांकरिता आहे. माणुसकी प्राप्त करायची असेल, सामर्थ्य संपादन करायचे असेल तर धर्मांतर करा. सामाजिक दृष्टीने व धार्मिक दृष्टीनेही, ऐहिक दृष्टया तसेच तात्त्विक दृष्टयाही विचार केला असता अस्पृश्यता हा धर्मकलहाचा प्रश्न आहे, ती नित्याची बाब आहे. ज्या धर्मामुळे

तुमच्यावर अस्पृश्यता व चातुर्वर्ण्याची गुलामगिरी लादली गेली आहे, जो धर्म तुमची पदोपदी मानहानी करतो त्या धर्मात तुम्ही का राहता ?

जो धर्म तुम्हाला शिक्षण घेऊ देत नाही, देवळात जाऊ देत नाही, पाणी मिळू देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहता ? ज्या धर्मात माणसाशी माणुसकीने वागण्याची मनाई आहे तो धर्म नसून शिरजोरी आहे, तो धर्म नसून रोग आहे. ज्या धर्मात अमंगल पशूचा, मुसलमान, परकीय इंग्रजांचाही स्पर्श चालतो. परंतु माणसाचा स्पर्श चालत नाही त्या धर्मात राहणे वेडगळपणा आहे. मी सांगतो म्हणून धर्मांतर केले पाहिजे या भावनेला वश होऊन काही करू नका. स्वाभिमानाने जगण्यासाठी व बुद्धीला जर पटेल तरच धर्मांतर करा."

१९३५ साली झालेल्या येवल्या धर्मांतर परिषदेतले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे भाषण ' मुक्ती कोन पथे ' या नावाखाली जनतेत १४–४–१९५४ रोजी प्रसिद्ध झाले होते. धर्म म्हणजे जपजाप्य, व्रतवैकल्ये वगैरे कर्मकांड करणे तर धम्म म्हणजे प्रज्ञा, करुणा, शील व नीतीतत्वाचे पालन करणे. बौद्धधम्म आचरणात आणावयाचा, जातिभेदाला थारा न देणारा बुद्धीप्रामाण्यवादी धम्ममार्ग आहे.

१४ ऑक्टोबर १९५६ हा माझ्या आयुष्यातील सोनेरी दिवस होय. मी या दिवशी नागपूरला ' धर्मांतर ' सोहळा मोठ्या उत्साहाने पार पडला. त्याप्रसंगी मी माझ्या आईवडिलांसोबत वहिणमावांसोबत हजर होते व मोठ्या तन्मयतेने, एकाग्रचित्ताने सर्व सोहळा बघत होते. त्यावेळी पहिल्याप्रथमच मला बौद्धधर्माची जाणीव झाली व खूप आनंद झाला.

याच अविस्मरणीय, क्रांतिकारी दिवशी आमची हिंदूधर्माच्या गुलामगिरीतून, अस्पृश्यतेच्या खाईतून सुटका झाली व बौद्धधम्म स्वीकारून आमच्या चैतन्यदायी, स्फूर्तिरूपी जीवनाची मंगलमय पहाट उगवली. जगाच्या इतिहासात रक्ताचा एक थेंबही न सांडता पाच लाखांचेवर लोकांनी आपल्या नेत्याच्या आदेशानुसार घडवून आणलेली आणि मनामनांत रूजलेली ही धर्मक्रांती खरोखर अभूतपूर्वच होय.

या प्रसंगी जमलेल्या अफाट जनमुदायासमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व त्यांची पत्नी डॉ. सौ. माईसाहेब आंबेडकरांनी सुप्रसिद्ध व वयोवृद्ध बौद्धभिक्षु महास्थविर चंद्रमणि यांचे हस्ते बौद्धधम्माची दीक्षा घेतली. त्यानंतर उपस्थित असलेल्या पाच लाखाचेवर लोकांना बाबासाहेबांनी स्वतः तयार केलेल्या बावीस प्रतिज्ञासह बौद्धधम्माची दीक्षा दिली. यावेळी सर्व जनसमुदाय जिवाचे रान करून प्रतिज्ञा ऐकत होते. वातावरण फारच पवित्र व गंभीर झाले होते. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव असलेल्या व प्रज्ञा, शील, करुणा, नीती या तत्वांवर आधारलेल्या बौद्धधम्माचा स्वीकार करून सर्वांची मने चैतन्याने पुलकीत झाली होती.

या दीक्षाविधीदानप्रसंगी बाबासाहेब म्हणाले, " आज मला इतका आनंद झाला आहे की मी नरकांतून सुटलो असे मला वाटते. मला कोणी अंधभक्त

नकोत. ज्यांना बौद्धधम्मात यावयाचे त्यांची जाणीवेने आले पाहिजे.मनुष्यमात्राच्या उत्कर्षाला धर्म ही अतिशय आवश्यक बाब आहे. या देशात हजारो वर्षे आम्हाला निरुत्साही करून ठेवील अशी परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत उन्नती होणे शक्य नाही. मनुस्मृतिमध्ये चातुर्वर्ण्य सांगितले आहेत. चातुर्वर्ण्यव्यवस्था समाजाला अत्यंत घातक आहे. ब्राह्मण,क्षत्रिय,वैश्य या त्रैवर्णिकांची सेवा करण्याचे काम फक्त शूद्रांनी करावे. त्यांना शिक्षण कशाला ? चातुर्वर्ण्य ही रूढी नाही, तो धर्म आहे.

गांधीजी चातुर्वर्ण्य मानतात. त्याचा तिन्ही वर्णाला फायदा. शूद्रांना काय ? विषमतावादी हिंदुधर्मामुळे कोणाचाही उद्धार होऊ शकत नाही. तो धर्मच नष्टधर्म आहे.

धर्माची आवश्यकता सर्व मनुष्यमात्राला आहे. धर्म माणसांना आशादायी बनवतो, एकत्र बांधून ठेवतो. जगाचा उत्कर्ष बौद्धधर्मानेच होईल. समतावादी बौद्धधर्म जातिभेद, विषमता, अस्पृश्यता पाळीत नाही. बुद्धांची तत्त्वे अजरामर आहेत. बौद्धधर्माचे कार्य गरिबांचे दुःख कमी करणे हे आहे. बौद्धधर्मात देव आत्मा यांना स्थान नाही. हिंदुधर्माने तुमच्या डोक्यावर, वैश्य, क्षत्रिय, ब्राह्मण अशी उतरड रचली आहे. ती कशी उलटेल हा खरा प्रश्न आहे. म्हणून बौद्धधर्माचे ज्ञान तुम्ही करून घेतले पाहिजे. ' बहुजन हिताय,ब हुजन सुखाय, लोकानुकंपाय, धम्म आदि कल्याणं, मध्य कल्याणं, पर्यासान कल्याणं ' असा श्रेष्ठ धम्ममार्ग तथागथाने तयार केला आहे. यापुढे दरेकानी दरेकाला दीक्षा देण्याचा अधिकार आहे असे मी जाहीर करतो. धर्मासाठी दरेकाने (प्रत्येकाने) प्राप्तीचा विसावा हिस्सा देण्याचा निश्चय करावा. मला राजकारणापेक्षा धर्म अधिक प्यारा आहे.

हा धर्म स्वीकारल्यावर तुमचीही जबाबदारी मोठी आहे. लोकांमध्ये आदर वाढेल, सन्मान वाढेल अशी कृती तुम्ही केली पाहिजे. धर्म म्हणजे गळयात एक मढे अडकवून घेत आहोत असे मानू नका. आपण उत्तम रीतीने धर्म पाळण्याचा विचार केला पाहिजे नाही तर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीस आणला असे होऊ नये म्हणून आपण बौद्ध धर्माच्या तत्त्वांचे पालन करणे व त्यानुसार आचरण करण्याचा दृढनिश्चय केला पाहिजे व हे जर आपल्याला साधले तर आपल्याबरोबर आपण देशाचा व जगाचाही उद्धार करू.''

बाबासाहेबांचे हे धर्माचे विवेचन करणारे भाषण ऐतिहासिक असून मोठे स्फूर्तिदायी होते. प्रत्येक वाक्य मनावर खोल परिणाम करत होते. त्याप्रमाणे वागण्याचा सर्वांनी निश्चय केला. कारण बौद्धधर्माचे महत्त्व हिंदुधर्माच्या तुलनेत त्यांचा अनन्यसाधारण वाटत होते, आणि बाबासाहेब अत्यंत कळकळीने, तळमळीने, हृदयाच्या गाभ्यापासून बोलत होते. ते शब्द जनतेच्या अंतःकरणाला जाऊन भिडत होते. विशेषतः माझ्या मनावर त्याचा जो अतिशय खोलवर परिणाम झाला तो आजतागायत कायम आहे व त्यामुळेच माझ्या पुढच्या आयुष्यात परिवर्तन घडून

आले. म्हणूनच धम्मक्रांती करून बाबासाहेबांनी आम्हाला आमच्या उन्नतीचा, विकासाचा मार्ग खुला करून दिला याबद्दल त्यांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.

आठ-नऊ वर्षाचं वय असतानाची गोष्ट. त्यावेळी आम्ही हिंदुधर्मात असल्यामुळे त्यांचेच सण, रूढी, परंपरा पाळत होतो. आमच्या घरी फार धार्मिकता होती. कोणताही सण आला की देवळात भजन-कीर्तन चालायचे, त्याचे आकर्षण वाटायचे पण आम्ही हिंदुधर्मीय असूनही जातीने महार, अस्पृश्य म्हणून आम्हाला देवळात प्रवेश नव्हता. देवळाबाहेर लांब अंतरावर उभे राहूनच आम्ही सर्व सोहळे बघत असू.

बालवयात मी वडिलांना विचारी " तात्याजी, आपल्याला देवळात का हो जाऊ देत नाही ? आपला विटाळ का मानतात. त्यांचा (स्पृश्यांचा) व आपला रंग एकसारखाच असताना जात वेगळी कशी ? जाती कुणी निर्माण केल्या, आपल्याला अस्पृश्य कुणी बनवलं, देवही माणसामाणसांत जातिभेद पाळतो कसा, देव दिसतो कसा ?" वगैरे प्रश्न केले की तात्याजी सांगत, "आपण अस्पृश्य असून जातीने महार आहोत, आपण कधीही देवळाच्या आत जायचं नाही, जर गेलो तर पुजारी तुला बडवल्याशिवाय राहणार नाहीत, एवढे लक्षात ठेव आणि यापुढे जास्त प्रश्न विचारू नकोस ?" परंतु मला त्यावेळी त्या देवाला कसेही करून एकदा बघायचेच होते. म्हणून एकदा मी युक्ती केली.

जन्माष्टमीच्या दिवशी शेदीडशे स्त्रीपुरुषांचा लोंढा ढोल-चिपळ्या वाजवीत दिंडीमध्ये सामील होऊन देवळात जाऊ लागला. ते पाहून मीही हळूच त्यांच्यामध्ये शिरले व आत गेले. मला वाटत होतं मी सुद्धा इतरांप्रमाणे आंघोळ केली, स्वच्छ कपडे घातले. तसा रंगही ठीक होता. आता कोण ओळखणार आहे मला महाराची पोर म्हणून ? पाहता पाहता मी गर्दीत मिसळले व एका म्हातारीच्या आडाने लपत-छपत पुढे गेले. त्यावेळी कुणी ओळखले तर काय होईल ही भीती वाटे तर दुसरीकडे आज आपण देवाला बघणार म्हणून आनंदही होत होता. पण तेवढ्यात देवळात पूजा करणाऱ्या भल्या गलेलठ्ठ पुजाऱ्याने मला ओळखलं अन् खस्‌कन माझं बखोटं धरलं व फाडदिशी कानशिलात ठेवून दिली नि मारत मारतच मला तो बाहेर आणू लागला. तोंडाने बडबड सुरुच होती त्याची, "शिव शिव महाराची पोट्टी देवळात शिरली. देव बाटवले व मलाही बाटवलं. थांब, आता तुझी तंगडीच मोडतो. खूप माजलेत ना तुम्ही महारडे ? यावेळपर्यंत सर्वजण सावध झाले होते व शिवाशिव होईल म्हणून आधीच वाट मोकळी करीत होते. मी रडत रडत "आता पुन्हा कधी देवळात शिरणार नाही, देवाशपथ " अशी विनवणी करत होते. मनातल्या मनात त्यावेळी " देवा मला वाचव रे या राक्षसापासून. जर तू मला यातून सोडवलेस तर पाच पैशाचे पेढे वाटीन" असे देखील कबूल केले. पण दगडाचा तो देव काही धावून आला नाही आणि त्या पुजाऱ्याने आता पुन्हा

देवळात शिरलीस तर जिवंतच ठेवणार नाही अशी गर्जना करीत टोपलीतल्या केरागत मला दारातून बाहेर फेकले. मुकामार खूपच लागला. खूप रडले. पण घरी कुणाला हे घडलेले सांगायची हिम्मतच झाली नाही. सांगितले असते तर डबल मार बसला असता.

त्या प्रसंगापासून देवळात जाणे बंद झाले व बालवयातच हिंदू धर्मप्रती असूया निर्माण झाली. या क्रूर, कठोर प्रसंगाचा अमिट ठसा मनावर कोरला गेला तो कायमचाच. शाळेतही महाराच्या मुली म्हणून शिक्षक व सवर्ण मुलं–मुली तिरस्काराने बघत. बाई मार्क देतांना कमी देतात असे लक्षात येई. पण आम्हाला आता त्याची सवयच झाली होती. तक्रार केली तर शाळेतून नाव काढण्याची भीती म्हणून आम्ही चांगला अभ्यास करीत होतो. तसेही दिवस गेले. कॉलेजमध्ये गेल्यावरही इतर मुली विशेष मिसळत नसत. अशी ही जात आम्ही जाऊ तेथे आमचा पाठलाग करीत होती.

हिंदुधर्मात असताना पूर्वी कर्मकांडे, अंधश्रद्धा, व्रतेवैकल्ये, नवससायास, उपासतापास खूप करीत होते. दररोज सतीमायची पूजा-अर्चा चालायची. माझा धाकटा भाऊ दिनकर, अडीच वर्षांचा, टायफाईड होऊन वारला. त्यावेळी आई वेडीपिशी झाली. तिला ध्यानी-मनी-स्वप्नी सारखा तोच दिसायचा. अन्न जाईना, तेव्हा माझी मानलेली मावशी सोभाबाई घरी आली व आईला म्हणाली, " सखू, तुझी मुलं वाचत नाहीत. त्या पळसगावच्या सतीमायला नवस करून बघ. ती नवसाला पावते म्हणतात ? आता कार्तिकी पौर्णिमेची जत्रा आहे चलशील का?"

आई अंमळ विचारात पडली. दोन मुले लागोपाठ गेल्याचे व मोठ्या भावाला डोक्याला मोठे फोड झाल्याने त्यातून तोही मरता मरता वाचल्यामुळे ती हवालदिल झाली होती. नंतर आम्ही पळसगावच्या सतीमायकडे दरवर्षी यात्रेला जाऊ लागलो. आईने नवस केला ' यापुढे माझा मुलगा वाचला तर पाच वर्षे त्याचे केस काढणार नाही. व त्याच्या भारोभार ( वजनाइतकी ) शिरणी वाटीन. '

मला भाऊ झाला. आईने पाच वर्षे त्याचे केस वाढवले व नवस फेडला. सतीमायचे सत्त्व खरे झाले असे आईला वाटले. त्यावेळी भक्ती इतकी होती की सतीमायची उष्टी भाजी प्रसाद म्हणून आम्ही मोठ्या भक्तीभावाने खात होतो. तिच्या लाळेचे तीर्थ पाण्यात मिसळून प्राशन करीत होतो. आता धर्मांतरानंतर मात्र पूर्वीचा वेडेपणा आठवून आईला हसू येते. ते सारे थोतांड वाटते. नवलाची गोष्ट म्हणजे ४–५ वर्षांपूर्वी निघालेल्या नामांतराच्या मोर्चात माझी आई, चुलती मावशी वगैरे नागपुरातून गेल्या होत्या. त्यावेळी त्यांचा चष्मा फुटला व मारामुळे चालता येत नव्हते. पूर्वीचे देव सगळे टाकून दिले. एवढी जागृती धम्मक्रांतीमुळे, दलितोद्धाराच्या, बाबांच्या चळवळीमुळे झाली.

धम्मदीक्षासोहळा झाला त्यावर्षी मी व माझ्या मैत्रिणींनी बाबासाहेबांनी धर्माविषयी लिहिलेले स्फुट–विचार ' जनता ' पत्रकांतून वहीवर उतरून घेतले होते. कारण ते आम्हाला अतिशय महत्त्वाचे सुविचार वाटत होते.

' ज्या धर्मात मनुष्याच्या मनुष्यत्वाला व त्याच्या माणुसकीला काही किंमत नाही तो धर्म काय कामाचा ? सर्वांभूति एक ईश्वर मानणारे आणि कृतीने माणसाला पशूतुल्य लेखणारे लोक दांभिक आहेत, त्यांचा संग करू नका. मुंग्यांना साखर घालणारे व माणसांना पाण्यावाचून मारणारे लोक दांभिक आहेत त्यांचा संग करू नका. '

' ज्या धर्मात माणसाशी माणुसकीने वागण्याची मनाई आहे तो धर्म नसून शिरजोरीची सजावट आहे. '

' ज्या धर्मात व्यक्तीला प्राधान्य नाही तो धर्म मला मान्य नाही. व्यक्तीचा विकास हेच खरे ध्येय आहे असे मी समजतो. '

' ज्या धर्मात माणसाची घाण माणसाने काढली पाहिजे अशी शिकवण देण्यात येत आहे त्या धर्मात आपण जोपर्यंत आहोत तोपर्यंत आपल्या मनातील जातिभेदाची भावना कदापि नष्ट होणार नाही. ' (१)

धम्मचळवळीचा विचार करताना आठवले की, बाबासाहेबांनी १९२७ साली ठिकठिकाणी समता सैनिकदले स्थापन करून अस्पृश्यांवर झालेल्या किंवा होणाऱ्या अत्याचाराला आळा घालण्याचा प्रयत्न केला. आणि त्यांचा तो प्रयत्न यशस्वी झालाही. १९५०च्या सुमारास नागपुरात ठिकठिकाणी समता सैनिक दलाच्या (म्हणजेच समता समाज संघ) शाखा निघाल्या होत्या. नागपुरात छोटी धंतोली भागातही समता सैनिक दलाची शाखा स्थापन झाली होती. म्युनिसिपल कॉरपोरेशनच्यासमोरील पटांगणात सकाळी सात वाजता शाखा भरत असे. गजभिये सर कवायत शिकवित. मुलांना नीट तोंड धुऊन, केस विंचरून व्यवस्थित राहण्यास सांगत. बाबासाहेबांच्या आदेशानुसार ते कार्य करीत. त्या शाखेत मीही दररोज सकाळी जात असे. काही वर्षांनी सरांची बदली मुंबईला झाली व शाखा बंद पडली.

धर्मांतर झाल्यानंतर बौद्धधर्माची पुस्तके वाचावीशी वाटत. परंतु कॉलेजात जाणेयेणे, अभ्यास व आईला घरकामात मदत यातच वेळ जाऊ लागला. पण १९५८ मध्ये लग्नानंतर मात्र बराच वेळ मिळू लागला त्यावेळी आम्ही यवतमाळ जिल्ह्यातील दारव्हा या गावी होतो. एकदा सिनेमाला गेलो असताना यांच्या मित्राची पत्नी भेटली. ती म्हणाली, " दुपारी काय करतेस घरात, माझ्याकडे येत जा, मी तुला भरतकाम, शिवणकाम, पॅचवर्क वगैरे शिकवीन. " तिच्याकडे गेल्यावर ती मला त्यांच्या महिला मंडळात घेऊन गेली. १५–२० बाया होत्या.

---

१) डॉ. आंबेडकर, मुक्ती कोन पथे. 'जनता' जयंती विशेषांक : १४ एप्रिल १९५६.

अतिशय चांगल्या बोलल्या. मलाही बरं वाटलं, काहीतरी करता येईल फावल्या वेळात म्हणून !

परंतु दोन दिवसांनी इद्दलवारीण घरी आली व सांगू लागली, '' अगं त्या महिला मंडळाच्या अध्यक्षीण बाई म्हणाल्या ती सूनबाई महार जातीची आहे व आताची बौद्ध. ती जर महिलामंडळात येणार असेल तर आम्ही नाही बाई येणार मंडळात ? ''

'' अहो पण मी म्हणते जात काय कपाळावर लिहिली आहे का ? तिचे राहणे, बोलणे, चालणे वगैरे सर्वच बाबतीत ती आपल्यापेक्षा काही कमी नाही. उलट आचारविचाराने तर ती तुमच्यापेक्षा नक्कीच श्रेष्ठ आहे, असं मी ठणकावून सांगितलं तेव्हा त्या सर्वजणी गप्पच बसल्या. ए, तू येत जा ग महिला मंडळात, त्यांच काय मेल्यांचं ? ''

पण या प्रसंगानंतर मी जातपात मानणाऱ्या सवर्णीयांच्या महिला मंडळात पुन्हा गेलेच नाही. संध्याकाळी यांना घडलेला प्रकार सांगितला. तेव्हा हे म्हणाले, '' तुझा वेळ जात नसेल तर घरच्या दोन पेटयांत चांगली पुस्तके आहेत. ती वाचत जा, म्हणजे ज्ञानात तरी भर पडेल. ''

मग मी बाबासाहेबांनी लिहिलेले ' भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लेखक–धनंजय कीर, ' जातिसंस्थेचे निर्मूलन' लेखक – डॉ. आंबेडकर, अनुवाद– वसंत मून. जुने ' जनता ' चे अंक, बहिष्कृत भारत, धर्मानंद कोसंबी आणि खैरमोडे व इतर बौद्धधर्मावरची अनेक पुस्तके वाचू लागले. महात्मा फुलेंची आणखी इतर बरीच पुस्तके घरी होती.

दुपारच्या वेळात चार मैत्रिणी जमवून गप्पागोष्टी करण्यापेक्षा पुस्तकांची मैत्री मला आवडू लागली. पुस्तके अधिक जवळची वाटू लागली. पुस्तकांतून धम्म समजू लागला. अस्पृश्यता म्हणजे काय. अस्पृश्यतेचा उगम कशात आहे, बाबासाहेबांनी हिंदुधर्माचा त्याग का केला, बौद्धधर्म कशासाठी स्वीकारला, बौद्धधर्माची जीवनतत्त्वे काय, त्यांचा उद्देश व कार्य वगैरे माहिती समजू लागली. वाचन, मनन, चिंतन सुरू होते, आणि आवडतही होते.

गेल्या २५ वर्षांपासून सतत अस्मितादर्श मेळावे, दलित–बौद्ध साहित्य संमेलने, धम्म मेळावे सभा परिषदांना यांच्याबरोबर मीही उपस्थित राहू लागले. आणि कथाकथन व परिसंवादात भागही घेऊ लागले. अशा रीतीने दलित–बौद्ध साहित्याशी जवळचा संबंध आला. याचेही क्षेत्र तेच असल्यामुळे हे साध्य झाले. घरच्या ' डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च इन्स्टिटयूट ' मुळे बरेच परदेशातील व भारतातीलही विद्यार्थी आमच्याकडे अभ्यासाला येऊ लागले. उदा. डॉ. एलिनॉर झेलियट, डॉ.बावरा जोशी,लोरा हॉवेल, मायकेल, डेव्हिड, रोझॅलिन,ओहॅन्लब तसेच प्रकाश खरात, एच.एल.कोसारे आणि इतर शेकडो विद्यार्थी अभ्यासाठी येत असत.

यांच्याशी बौद्ध–दलित साहित्य, आंबेडकरी चळवळ याविषयी चर्चा होऊ लागल्या धम्मचळवळ अशारितीने मनात आकारू लागली. मानसिक परिवर्तन घडू लागले. ' भगवान बुद्ध व त्यांचा धम्म ' या पुस्तकाचे वाचन केल्यावर भगवान बुद्धांच्या जन्मापासून ते अंतापर्यंतचा चित्रपट डोळयांसमोर उभा राहिला.

यशोधरेसारखी तरुण, सुशील पत्नी, सुंदर मुलगा व राजत्याग करून अरण्यात जाऊन सहा वर्षे कठोर तपस्या केल्यावर नवीन समतावादी बौद्धधम्माची ज्ञानप्राप्ती करणाऱ्या भगवान बुद्धांचे जीवन व कार्य बघून, माझे मन त्यांचेविषयी अपार श्रद्धेने व आदराने भरून आले. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांना गुरु का मानले याचा उलगडा झाला. मनात विचार आला. या देशात भगवान बुद्ध, महात्मा फुले, संत कबीर, लोकहितवादी, आगरकर, गांधीसारखे उदारमतवादी जर नसते आणि इंग्रजांचे राज्य झाले नसते तर कुणी सांगावं अजूनही अस्पृश्यतेच्या भावावर पेशवाईत होते तसे पूर्वीसारखेच आमच्या गळयाला थुंकण्यासाठी मडके नि कमरेला (झाडण्यासाठी) खराटा राहिला असता.

सामाजिक परिवर्तन घडून येण्यासाठी भारत देशात सामाजिक क्रांती धार्मिक होणे अतिशय आवश्यक होते. महात्मा फुल्यांची गणना शुद्रांतच होत होती. अस्पृश्यतेचे चटके त्यांनाही बसले. महात्मा फुले उच्चनीयतेच्या भावनेचा व अस्पृश्यतेला जन्म देणाऱ्या ब्राह्मणशाहीचा तिरस्कार करीत. ब्राह्मणांनी स्वतःचे वर्चस्व कायम ठेवण्याकरिता धर्मग्रंथ लिहिले आणि इतरांना अस्पृश्यतेच्या गुलामगिरीत लोटले व जिणे नकोसे केले म्हणूनच स्पृश्यांशिवाय स्त्रिया व शुद्रांवर कठोर आचारनियम लादणाऱ्या मनुस्मृतिकार मनूविषयी फुले लिहितात,

मनु धिक्कारूनी एकीकडे फेका । माना शूद्रांदिका बंधूपरी ।।
बंधु आर्य रावा दयावान व्हावा । जाळूनी टाकावा मनुग्रंथा ।।

धार्मिक बंधनांनी गुलामागत जिणे जगणाऱ्या अस्पृश्यांची हलाखीची स्थिती बघून फा. बनसोडे आपल्या काव्यात लिहितात,

देवा मज पशु कर वा पक्षी कर । परंतु करू नकोस महार ।।

भारतातील ही जातीयता, विषमता नष्ट व्हावी म्हणून बऱ्याच संतांनी; पुढाऱ्यांनी, हिंदुधर्मीय उदारमतवादी नेत्यांनी, छत्रपती शाहू महाराज, वि. रा. शिंदे, गोपाळबाबा वलंगकर, शि. जा. कांबळे, किसन फागुजी बनसोडे, श्रीमंत सयाजीराव गायकवाड महाराजांनी व इतरांनीही अनेक प्रयत्न केले.

एक चिनी राजा होता. त्याला जगात कुठेच नाही एवढी प्रचंड घंटा तयार करण्याची इच्छा झाली. सगळे प्रजाजन कामाला लागले. प्रचंड मूस तयार झाली. वेगवेगळे रसायन तयार केले गेले. पण घंटा तडकूनच जाई. शेवटी राजपुरोहिताने राजाच्या कानात काय ते सांगितले. त्याप्रसंगी ही अविस्मरणीय घंटा बघायला शेकडो लोक जमले होते. त्यातील एका कामगाराला हळूच त्यात

ढकलण्यात आले. क्षणात त्याचे रक्त, हाडं, मांस मिसळले गेले व शेवटी घंटा आकारास आली. बाबासाहेब ही कथा सांगून म्हणतात, या भारत देशातही प्राचीन काळापासून स्त्रिया, दलित शूद्र-अस्पृश्यांचे शासन करून ही चातुर्वर्ण्यरूपी घंटा तयार झाली आहे. बुद्धाने, म. फुल्यांनी व आता डॉ. आंबेडकरांनी ती हलविण्यासाठी अविरत प्रयत्न केले. ती थोडीशी डगमगलीही. परंतु अजूनही शूद्र, अस्पृश्यांवर ती धार्मिकतेच्या नावावर राज्य करीतच आहे.

म्हणूनच बाबासाहेबांनी वेद, धर्मशास्त्रे झुगारून, बुद्धीप्रामाण्यवादी बुद्धधर्माला अनुसरले. २२ प्रतिज्ञात राम, कृष्ण, गौरी गणपती, साईबाबा यांना पूजणार नाही ही एक महत्त्वाची प्रतिज्ञा आहे. हिंदू देवदेवता पाळणे म्हणजे हिंदुधर्मात जाणे होय. स्वाभिमानाने जगण्यासाठी बुद्धाने 'अत्तदीप भव' संदेश दिला. सूर्याप्रमाणे स्वयंप्रकाशीत व्हा, चंद्राप्रमाने परावलंबी होऊ नका, असे ते सांगत.

सुरुवातीला बाबासाहेबांनी १९२० ते १९३५ पर्यंतच्या काळात अस्पृश्यता नष्ट व्हावी. चातुर्वर्ण्य नष्ट करून एकवर्णीय व्यवस्था रूढ व्हावी, माणसाला माणुसकीने वागवले जावे यासाठी हिंदुधर्मातच सुधारणा करून हिंदुधर्म बलशाली व्हावा यासाठी साकल्याने प्रयत्न केले. युगानुयुगे सामाजिक गुलामगिरीत खितपत पडलेल्या अस्पृश्य समाजाला वर काढण्यासाठी, त्यांच्या उन्नतीसाठी त्यांनी वेळोवेळी क्रांतिकारक लढे दिले. त्यावेळी महाड येथील चवदार तळ्याचे पाणी पिण्याचा आम्हालाही हक्क आहे, आम्हीही हिंदुधर्मीय, तुमचे बांधवच आहोत, म्हणून महाडला १९ व २० मार्च १९२७ रोजी परिषद भरवली.तसेच २५ डिसेंबर १९२७ ला 'मनुस्मृतिदहन' करून महाड चवदार तळे खरोखरच पेटवले. नाशिकला काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह सतत पाच वर्षे चालला.

अस्पृश्यांच्या मेलेल्या मनात प्राण ओतून स्वहक्कांविषयी जागृत करण्याचे, स्वाभिमानाने जगण्याविषयी चेतना उत्पन्न करण्याचे महत्त्वाचे कार्य बाबासाहेबांनी केले. 'तुमच्या अंगी तेज आहे,नाही ती जाणीव, तुमचे पूर्वज सिंह राशीचे होते.'[1] 'जागृतीचा विस्तव सतत पेटत ठेवा, विझु देऊ नका'[2] गमावलेले हक्क भीक मागून मिळत नाहीत, त्यासाठी ज्यांनी तुमचे हक्क हिरावून घेतलेत त्याच्याशी तळहातावर शीर घेऊन लढायला हवे'[3] अशा तऱ्हेचा उपदेश बाबासाहेब सभासंमेलने, परिषदांद्वारे करीत. बाबासाहेबांच्या समाजपरिवर्तनाच्या लढ्यात धम्मचळवळ चालवणे हे महत्त्वाचे कार्य होते. सुरुवातीला बाबासाहेबांच्या सभांना ८-१० लोकांशिवाय कुणी हजर राहत नसत. ते पाहून त्यांचं मन पेटून उठे. त्यांची भाषा तिखट होऊन वाणीला वेगळीच धार चढत असे. बहिष्कृत हितकारिणी सभेत बोलताना एकदा ते म्हणाले,

---

(१) कीर धनंजय, (२) कीर तत्रैव, (३) बहिष्कृत भारत १९२७.

" तुमची ही दीन वदने पाहून नि करुणाजनक वाणी ऐकून माझे हृदय फाटते. युगानुयुगे तुम्ही गुलामगिरीच्या गर्तेत गंजत सडत कुजत पडला आहत तरी तुमची भावना हीच आहे की आपली ही दुर्दशा देवनिर्मित आहे, ईश्वरी.संकेतानुसार आहे ? तुम्ही गर्भात असतानाच का मेला नाहीत ? जन्माला येऊन तुम्ही जगातील दु:ख, दारिद्र्य व दास्य यांच्या अक्राळविक्राळ चित्राचा भेसूरपणा आपल्या अवनत नि अपमानित दु:खी जीवनाने वाढवित आहात. जर तुमच्या जीवनाचे पुनरुज्जीवन होत नसेल तर तुम्ही या जगातून नाहिसे होऊन जगाच्या दु:खाचे ओझे कमी का करीत नाही ? माणसासारखे माणसं तुम्ही, स्वत:च्या कर्तबगारीने जगात उत्कर्ष करण्यास प्रत्येकास स्वातंत्र्य आहे. तुम्ही या देशाचे रहिवासी आहात. तुम्हाला अन्न–वस्त्र–आसरा इतर भारतीयांच्या बरोबरीने मिळणे हा तुमचा जन्मसिद्ध हक्क आहे. म्हणून तुम्हाला स्वाभिमानपूर्ण जिणे जगावयाचे असेल तर स्वावलंबन हाच खरा आत्मोन्नतीचा मार्ग होय हे लक्षात ठेवा. "

अशा तऱ्हेच्या तीव्र व कठोर प्रहार करणाऱ्या शब्दांनी, भाषणांनी दलित समाजाच्या मनाची कवाडे हळूहळू खुली होऊ लागली. त्यांना वाटले ' खरोखर या नेत्याला समाजाप्रती खरी तळमळ आहे. दलितांची मने जागवण्याचे प्रमुख हत्यार म्हणून बाबासाहेबांनी मूकनायक (१९२०),बहिष्कृत भारत (१९२७–२९), जनता (१९३०), प्रबुद्ध भारत (१९५६) इत्यादी वृत्तपत्रे काढून दलित चळवळ घराघरांत पोहोचवली. वृत्तपत्रामुळे दलितांना १९२० ते १९३५ पर्यंत व त्यापूर्वीच्या अस्पृश्यांच्या स्थितीचे आकलन झाले. धार्मिकतेच्या नावावर शूद्र–अस्पृश्यांचे शोषण कसे केले जाते, कर्मकांड, अंधश्रद्धा, धार्मिक रुढीचा पगडा समाजावर असल्यामुळे त्यांची सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक उन्नती कशी रोखली गेली, खोती पद्धत, महार वतन, गोलमेज परिषदेतील मागण्या, म. गांधीचे प्राणांतिक उपोषण, पुणे करार, स्वतंत्र मजूर पक्ष व इतर चळवळीचे समर्थ विवेचन करून बाबासाहेबांनी जनतेला चळवळीत घेऊन स्वोद्धाराचे कार्य करण्यास उद्युक्त केले. अशा रितीने दलित चळवळ यशस्वी होण्याकरिता वर्तमानपत्रांची फार मदत झाली.

महाड, नाशिक सत्याग्रहानंतर आम्ही हिंदुधर्मीय तुमचेच बांधव असूनही दलितांना माणुसकीचे हक्क नाकारणाऱ्या या हिंदुधर्माबद्दल बाबासाहेबांना विलक्षण चीड आली. त्यांचे मन पेटून उठले व १९३५ साली नाशिकजवळील येवले मुक्कामी परिषद घेऊन त्यांनी " मी हिंदू धर्मात जन्मलो तरी मी हिंदू धर्मात मरणार मात्र नाही ? अशी प्रतिज्ञा १०००० लोकांसमोर केली. '

१९२७ ते १९३५ काळापर्यंत सवर्णीयांचे मन वळविण्याचा, त्यांच्यात मानसिक परिवर्तन घडवून आणण्याचा बाबासाहेबांनी जिवापाड प्रयत्न केला होता.

---

कीर धनंजय डॉ. बाबासाहेब आंबेडकर पृष्ठ ६४.

त्यावेळी दलित बांधवांच्या मनात अस्पृश्यतेविषयी, त्यांच्या लाचार कृतीविषयी चीड, संताप जागवून स्वावलंबन व स्वाभिमानीवृत्तीचे बीजारोपण केले. १९३५ची येवले धर्मांतर घोषणा ही बाबासाहेबांनी केलेल्या धम्मक्रांती परिवर्तन लढ्याची सुरुवात होय.

'आजवरी होतो तुझे सत्तेखाली तोवरी तो केली विटंबना' अशी बहिष्कृत भारताची सुरुवातच होती मुळी. यावेळेपासून स्त्रियांही स्वतंत्र संघटना उभारू लागल्या व सभा, संमेलन, भाषणाद्वारे आपली मते निर्भिडपणे मांडू लागल्या. कु. राजाबाई गायकवाड १९३६ साली मुंबईत केलेल्या भाषणात म्हणाल्या, "बाबासाहेबांनी आम्हाला असा धर्म द्यावा की ज्यामध्ये वीरमाता, वीरभगिनी, वीरपत्नी होण्याची संधी मिळेल." सौ.अनुसया वाव्हळ म्हणाल्या की, "मानवाच्या उन्नतीस आड येणारी गोष्ट म्हणजे धर्म हीच होय. या जाती व धर्मामुळेच जगात युद्धे होत असतात. आजपर्यंत आपण हिंदुधर्माच्या गुलामगिरीत गुरफटून राहिल्यामुळे आपले सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य नष्ट झाले आहे. धर्मांतरानेच आपली आजच्या हालअपेष्टातून मुक्तता होईल." कु. भागीरथीबाई तांबे म्हणाल्या, "स्वातंत्र्य, समता, बंधुभाव असणाऱ्या धर्मात बाबांनी आम्हाला न्यावे पण पडदा असणारा धर्म देऊ नये" वगैरे. यावरून महिलांची धर्माविषयीची जागृती व त्यांना वाटणारी कळकळ स्पष्ट दिसून येते.

भगवान बुद्धाने २५००वर्षांपूर्वी स्त्रियांना पुरुषांबरोबरीचे हक्क देऊन त्यांचा दर्जा वाढविला व त्यांच्यावरचे दोन प्रकारचे अन्याय दूर केले.पुरुषांबरोबर ज्ञानार्जन करण्याची संधी व आपल्यामध्ये असलेल्या सुप्तावस्थेतील आध्यात्मिक मुक्तीची अथवा तेजाची जाणीव करून देऊन स्त्रियांच्या जीवनात न भूतो न भविष्यति अशी क्रांती घडवून आणली.[1] याची आपल्याला भिक्षुणी महाप्रजापती गौतमी, क्षेमा, भगिनी कुंडलेकशा, पटाचारा,यशोधरा, दानशूर पिशाखा,सुजाता यांची बौद्धकालीन आदर्श जीवनचरित्रे देतात.

आंबेडकरी व दलित–बौद्ध साहित्य वाचताना मी या भिक्षुणींची जीवनचरित्रे वाचली. २५०० वर्षांपूर्वीच्या काळात धर्मप्रसार व धर्मप्रचाराचे कार्य करायला त्या अनवाणी पायांनी मैलोगणती चालत. मिळेल ती भिक्षा खावून जीवन कंठीत तार्तारीसारख्या डोंगराळ भागात व नरमांसभक्षक लोकांमध्ये जाऊन त्यांच्या मनावर बौद्धधर्माची तत्त्वे बिंबवणे, धर्मप्रसार करणे म्हणजे सोपी गोष्ट नव्हती. या भगिनींच्या जीवनचरित्रापासून बोध घेऊन आपणही जमेल त्याप्रकारे सामाजिक, साहित्यिक, धार्मिक वगैरे प्रकारचे कार्य करावे अशी प्रेरणा झाली.

---

(१) डॉ. आंबेडकर, हिंदु स्त्रियांची उन्नती व अवनती.

बाबासाहेबांनी आयुष्यातील प्रत्येक क्षण सोन्याचा कण मानून उपयोगात आणला व आपल्या समाजाच्या विकासाकरिता जीवन झोकून दिले. त्यांचे कार्य बघून ज्या समाजातून आपण वर आलो त्याच्यासाठी कार्य करणे आपले कर्तव्यच आहे हे स्पष्ट झाले. फक्त संधीची वाट पाहत होते. तशात आमच्या घरी डॉ.बार्बरा जोशी या अमेरिकन विदुषी भेटण्याकरता आल्या. गेल्या २२ वर्षांपासून डॉ. एलिनॉर झेलियट याही आमच्या लायब्ररीत अभ्यासाकरिता घरी येत, भेटत. डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. बरुआ, डॉ. एन. डी. कांबळे, यशवंत मनोहर, एम.एस. मोरे, श्री. घावरे, डॉ. रोझालिन एडवर्ड, लॉरा हॉवेल, मायकेल, डेव्हिड, डॉ. निमगडे वगैरे मंडळी मधूनमधून जात येत. डॉ. भालचंद्र फडके, सुरेश भट, श्री. नेरुरकर, वेबीताई कांबळे यांच्याबरोबर चर्चेत मी सहभाग होऊ लागले. आमच्या चर्चा साहित्यिक व धार्मिक असत. चर्चेमधून बरेचसे मार्गदर्शन मिळे. यावेळेपर्यंत मी बौद्ध भिक्षुणींच्या ८ कथा काही नवीन संशोधनाची भर घालून, ललित कथेच्या स्वरूपात लिहिल्या. त्या बायजा, आम्रपाली, सुगावा, धम्मदूत युगप्रबोधन, कल्याणमित्र इत्यादी मासिकांत प्रसिद्ध झाल्या होत्या. नागपूरचे नागपूर पत्रिकेचे संपादक युधिष्ठिर जोशी यांनी त्याचे पुस्तक काढण्याचे ठरवले.

बार्बरा जोशीची मुलाखत मी सेंटॉर हॉटेलमध्ये घेतली. ती मुलाखत नागपूरच्या 'लोकमत' दैनिकात 'दलितांच दुःख शोधायला निघालेली अमेरिकन महिला' या मथळ्याखाली प्रसिद्ध झाली. बार्बरा जोशीला, मला सामाजिक कार्य करण्याची इच्छा आहे, पण सुरुवात कशी करावी ते कळत नाही,त्याबद्दल मार्गदर्शन करावे अशी मी विनंती केली.

बार्बरा म्हणाली, सुरुवातीला दहा–बारा महिला मिळून संघटना उभारा नंतर कार्य आपोआप सुचेल. मग बार्बरा जोशीला घेऊन आम्ही हिरा बनसोडेला भेटायला गेलो. उर्मिला पवारची भेट झाली व 'संवादिनी दलित स्त्री साहित्य मंच' ही संस्था स्थापन झाली. यात पुढाकार हिरा बनसोडेचा होता. अध्यक्ष – हिरा बनसोडे, सेक्रेटरी – उर्मिला पवार, उपसेक्रेटरी – मीनाक्षी मून ( म्हणजे मी ) आणि इतर सभासद मिळून कार्य सुरू झाले. संस्थेचे उद्‌घाटन अमेरिकेतील ख्यातनाम विदूषी डॉ. एलिनॉर झेलियट यांनी केले. त्या काळात संस्थेने साहित्यिक मेळावे भरविले. 'संवादिनी' ने दलित–बौद्ध स्त्रीला व्यासपीठ मिळवून दिले. इतकेच नव्हेतर कथा, कविता, निबंधस्पर्धा घेऊन महिलांना प्रोत्साहनही दिले.

इ. स. १९७९ साली आम्ही मुंबईत राहायला आलो. बांद्रा(पूर्व) शासकीय वसाहत येथे महिलांनी एक छोटासा बुद्धविहार बांधला होता. अधूनमधून त्या मला वर्गणी मागायला येत. त्यामध्ये सौ. सोनकांबळे, सौ. कडलक, सौ. सोनवणे, सौ. नंदा तायडे, श्रीमती देशभ्रतार, सौ. मोहिते, सौ. निकाळे वगैरे प्रमुख होत्या. या बाया जास्त शिकलेल्या नव्हत्या तरी बाबासाहेबांप्रती व बौद्ध

धर्माप्रती त्यांची निष्ठा अढळ होती. त्यांची संघटीत वृत्ती वाखाणण्याजोगी होती. बाबांच्या चळवळीपासून प्रेरणा घेऊन भगवान बुद्धाच्या या औरसकन्या बांद्रा कॉलनीत बुद्ध-धर्माचा झेंडा फडकवयाला निघाल्या होत्या. त्यांचे,धैर्य,शौर्य चिकाटी, जिद्द व आत्मविश्वास अपूर्व होता. महिलांनी मनात आणलं तर त्यांना कोणतीही गोष्ट अशक्य नसते. येथे कम्युनिटी हॉलमागे महिलांनी १२x१२ च्या जागेत एक बुद्धविहार बांधला. तेथे छोटयाशा बुद्धमूर्तीची प्रतिष्ठापना केली व दर पौर्णिमेला त्या प्रार्थनेला जमू लागल्या. एकदा बुद्धविहार अनाधिकृत जागेवर बांधला म्हणून पोलीस तो मोडावयास आले. त्यावेळी मध्ये पडून बुद्धविहार तोडण्यास बंदी घातली. त्यावेळी पोलिसांनी त्यांना पकडून पोलीस ठाण्यावर नेले व धाकदपटशी करून उलटसुलट प्रश्न विचारले. महिलांनी निर्भपणे उत्तरे दिली. जीव गेला तरी चालेल पण बुद्धविहार तोडू देणार नाही म्हणाल्या. नंतर ३–४ तासानंतर त्याना तंबी देऊन सोडून दिले.

महिला मंडळ स्थापन झाले. पुरुष व महिलांनी मिळून बौद्धविहार बांधण्याकरिता ' कालचक्र ' नाटक घेतले. त्या पैशाच्या मदतीने इतक्या छोटया विहाराचे मोठ्या विहारात रुपांतर झाले. थायलंडहून भव्य आणि सुंदर मूर्ती मागवण्यात आली. दररोज संध्याकाळी नियमित वंदना–पूजा होऊ लागली. आंबेडकर जयंती, बौद्ध जयंतीनिमित्त कार्यक्रम होऊ लागले. बौद्धपद्धतीने लग्नविधी होऊ लागले. काही कारणामुळे ते महिला मंडळ तुटले.

१९८४ साली आमच्या कॉलनीत नागपूरच्या श्रीमती सातपुते बाई राहायला आल्या. त्या म्हणाल्या, " काय ग, तुम्हाला बुद्धविहारात वंदना घेतल्याशिवाय अन्न कसं गोड लागतं ? आमच्याकडे आम्ही दररोज वंदना केल्याशिवाय जेवण घेत नाही. " मी म्हणाले, तुम्ही रोज सोबत येणार असाल तर उद्यापासून संध्याकाळी ठीक ८ वाजता मी दररोज विहारात येत जाईन.

मग दरदिवशी संध्याकाळी आम्ही बुद्धविहारात जाऊ लागलो. सुरुवातीला श्री. भंडारे वंदना घेत. एका सुरात, एका तालात म्हटलेली वंदना मुलामुलींना बायामाणसांना फार आवडू लागली. अशारितीने कधी व्याख्याने तर कधी पौर्णिमेला विशेष कार्यक्रम होऊ लागले. ' बुद्ध सरणं गच्छामि ' चे निनाद उमटू लागले. कानाला गोड वाटू लागले.

संवादिनीचे कार्य दोन वर्षे केल्यानंतर उर्मिला पवारसोबत 'आम्हीही इतिहास घडविला ' म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमध्ये स्त्रियांचा सहभाग हे पुस्तक लिहिण्याच्या कामाला आम्ही दोघी जमून भिडलो. सतत तीन वर्षे यासाठी साकल्याने परिशीलन केले. परिश्रमपूर्वक अभ्यास करून संशोधन तर केलेच पण दिल्ली, नागपूर, पुणे, मुंबई, अकोला, अमरावती, विदर्भ, रत्नागिरी, महाड, फलटण, सातारा, अशा अनेक स्थळांना भेटी देऊन शक्य तेथे आंबेडकरी

चळवळीतील जुन्या कार्यकर्त्यांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. त्यानिमित्ताने सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रांतील दलित चळवळ जवळून बघता आली, समजून घेता आली. कार्याची व्याप्ती, सखोलता कळली. १९८९ मध्ये माझ्या पहिल्या 'बौद्धकालीन आदर्श स्त्रिया' या पुस्तकाचे आयु. रा. सु. गवई यांच्या हस्ते प्रकाशन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा श्रीमती नलिनी पंडित होत्या. प्राचीन बौद्धकाळातील भिक्षुणींच्या या कथा सर्वांना आवडू लागल्या. संवादिनीमुळे कथाकथन करण्याचे आत्मबल प्राप्त झाले. कथाकथन करताना गोरेगाव, मुलुंड, अंधेरी, आंबेवाडी, भांडूप, कुर्ला वगैरे ठिकाणी मी या बौद्ध-भिक्षुणींच्या समाजप्रबोधनपर कथांचेच कथन करू लागले. त्यामुळे बौद्धधर्मप्रसार करण्याला थोडीफार मदत झाली. लेखनासोबतच माझे धम्मकार्यही सुरू होते.

दि. ३०-११-१९८९ रोजी 'आम्ही इतिहास घडवला.' ( आंबेडकरी चळवळीत महिलांचा सहभाग )हे पुस्तक प्रकाशित झाले. लेखिका उर्मिला परब व मीनाक्षी मून (मी) होत्या. आंबेडकरी चळवळीतील महिलांनी केलेले सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक कार्य तसेच समतेसाठी केलेले संघर्ष जीवनाला प्रेरणा देणारे होते. बौद्धधर्म स्वीकारल्यानंतर बौद्ध जनतेमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून आले. घरातले जुने देवदेवतांचे फोटो, हिंदू सण, व्रतवैकल्ये व कर्मकांडांचा त्यांनी त्याग केला व बुद्धांचा बुद्धीप्रामाण्यवादी धर्म स्वीकारला. बुद्ध जयंती, आंबेडकर जयंती, वैशाख पौर्णिमा, महात्मा फुले जयंती, सावित्रीबाई फुले जयंती, धम्मचक्र-प्रवर्तन दिन वगैरे सण साजरे होऊ लागले.

१९५६ नंतर सपूर्ण भारतात जिकडे तिकडे दलित चळवळ फोफावू लागली. 'सारा भारत बौद्धमय करीन' ही बाबासाहेबांची अपूर्ण ईच्छा पूर्ण करण्यासाठी व स्वोद्धारासाठी व्याख्याने, परिषदा, संमेलने आयोजित करून धर्मप्रसार होऊ लागला. भारतीय बौद्धमहासभेद्वारे गावागावांत धार्मिक चळवळ राबवली गेली. या कामी उदारमतवादी स्पृश्यांचेही सहकार्य लाभले. पूर्वी जनता रूढी, परंपरांनी करकचून आवळली गेल्यामुळे प्रगतिला अवरोध होत होता. बौद्धधर्मात आल्यावर स्वावलंबन व स्वाभिमानाचे बाळकडू मिळाले व अस्पृश्योन्नती होण्यास मदत झाली. परंतु खेड्यापाड्यांत दलितांवर बौद्ध झाल्यामुळे सवर्णांकडून होणारे अत्याचार वाढले.

धामणगाव, शिरसगाव येथे दलित स्त्रियांची नग्न करून धिंड काढण्यात आली. धाकलीला गवईबंधूचे डोळे काढण्यात आले. आव्हाने-जळगाव दलित-बौद्धाच्या वस्तीला आगी लावून दोघाजणांना हातपाय तोडून जिवंत जाळले. सवर्णांनी एकाएकी हल्ले करून कित्येकांना जखमी केले. १९८७ मध्ये बेळगाव येथे १५ दलितांना गवतचारा चोरला म्हणून विष्ठा खाण्यास भाग पाडले (१७ सप्टेंबर १९८७ केसरी, पुणे), बुद्ध, फुले, आंबेडकरांचे फोटो फोडण्यात आले. तरी

आंबेडकरी जनता कशालाही न भीता समर्थ प्रतिकार करीतच राहिली. किलावेन-मानीला चाळीस दलितांना एका खोलीत बंद करून जाळण्यात आले. आग्रा येथे ओमप्रकाश नेटा या विद्यार्थ्याला प्राचार्यांच्या टेबलावर जिवंतपणे चिरण्यात आले. पण दलित जनता समर्थ प्रतिकार करीतच राहिली.

जग बदल घालुनी घाव । गेले सांगुनी आम्हा भीमराव ।।

असे अण्णाभाऊ साठे म्हणतात ते उगीच नाही. बाबासाहेबांना राजकीय क्रांतिपेक्षा सामाजिक क्रांती महत्त्वाची वाटत असे. हजारो वर्षे, जोहार मायबाप जोहार, तुमच्या उष्टयाचा मी महार म्हणत अस्पृश्यांची गुलामगिरी करीत, उष्टे शिळेपाके अन्न खाऊन जगणारे दलित स्वत्वच विसरले होते. अस्मितेची जाणीव बाबांनी करून दिली. बाबासाहेब म्हणत,अत्याचार करणाऱ्या पेक्षा ते सहन करणाराच जास्त दोषी आहे. यासाठी त्यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा त्रिसूत्री मंत्र दलित–बौद्धांना दिला. त्यांच्यात मानसिक स्थित्यंतर घडवून आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली व बौद्धधर्मच तुम्हाला तारुन नेईल, त्यासाठी पंचशील तत्त्वांचे व २२ प्रतिज्ञांचे कठोरपणे पालन करण्यास सांगितले.

१९५६ नंतर दलित–बौद्ध साहित्य एखादे धरण फुटावे त्या वेगाने बाहेर येऊ लागले. आजवर मुकी असलेली बौद्ध जनता साहित्यातून धर्मप्रसार करू लागली. व्यथा, वेदना मांडू लागली व विद्रोही साहित्य जन्मास आले. गुजराथमध्ये अशिक्षित बायाही स्वत: कवने करू लागल्या.

सकाळी उठीस्तु झाडू बुद्धाची पायरी। तने सापडे लड मोत्याची दोहरी ।।

अस्मितादर्श, लोकानुकम्पा, धम्मसंपदा, कल्याणात धम्मदूत, जयभीम दलित–बौद्ध जनता आणखी इतर शेकडो पाक्षिके व मासिकांतून समाजप्रबोधन करू लागली. दोन वर्षांपूर्वी बांद्रा (पूर्व) गव्हमेंट कॉलनीत आम्ही 'प्रज्ञा महिला मंडळ' स्थापन केले. दर गुरुवारी २–३० वा. महिलांची सभा भरते. नेहमी वंदना (प्रार्थना) होते. त्यानंतर संघपाल भन्तेजी, कधी मी धार्मिक विषयावर प्रवचने देते. दर पौर्णिमेला विशेष कार्यक्रम होतो.

सुरुवातीला दोन चार महिलांशिवाय जास्त महिला जमत नसत. पणं दर आठवडयाला सिद्धार्थनगर, शास्त्रीनगर, अमृतनगर, संजयनगर, अहिंसानगर, सिद्धार्थ कॉलनी, सांताक्रूझ, कुर्ला वगैरे वस्तींना भेटी देऊन तेथील महिलांना महिला मंडळात येण्याविषयीचे व संघटित होऊन बाबांचे अपुरे कार्य पूर्ण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे, असे सांगून आपण कार्यास लागू या असे विचारबीज त्यांच्यात निर्माण करण्याचे कठीण कार्य मी करू लागले. टी. व्ही. वरील कर्मकांडाचा होकार प्रचार, मुंबईतील जीवघेणी महागाई, प्रपंचाच्या अडचणी यावर मात करून वेळात वेळ काढून ४०–५० महिला दर गुरुवारी व पौर्णिमेला येथे संघटित होतात. बौद्धधर्माप्रती त्यांना वाटणारी प्रीती, तळमळ त्यांना कार्य

करण्यास उद्युक्त करते. चूल आणि मूल याव्यतिरिक्त दुसरे कार्यही करू शकतो ही जाणीव, आत्मविश्वास निर्माण झाला.

या सर्व चळवळीचा परिणाम, महिलांचे व भन्तेजींचे मिळणारे सहकार्य बघून तीन महिन्यांचा भिक्षुंचा वर्षावास घेण्याच्या निमित्ताने ८ जुलै १९९० रोजी 'बौद्ध महिलांचा भव्य धम्ममेळावा' आम्ही मोठ्या प्रमाणावर आयोजित केला आणि तो यशस्वी झालाही. बऱ्याच महिलांच्या मनात धम्माविषयी जागृती निर्माण होऊन त्या आपल्या मनातल्या शंकाचे निरसन करून घेतात. बऱ्याच महिला 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या पुस्तकाचे वाचन करू लागल्यात हे प्रज्ञा महिला मंडळाचे यश आहे.

प्रज्ञा सांस्कृतिक केंद्र,प्रज्ञा महिला मंडळाच्या सहकार्याने व अखंड परिशीलनाने हा धम्ममेळावा भव्य प्रमाणात साजरा झाला. तीन महिन्यांत एकूण १५ कार्यक्रम झाले. बौद्ध धम्मावरील वेगवेगळ्या विषयांवर बौद्ध धर्मातील जिज्ञासू अभ्यासू व चिकित्सक मंडळींची समाजप्रबोधनपर प्रवचने झालीत. त्यामुळे येथील वर्गाला नवनवीन विषयांची माहिती होऊन बौद्धधर्माचे बरेच ज्ञान झाले. तीन महिन्यांत पंधरा कार्यक्रम करताना खूपच परिश्रम घ्यावे लागले हे खरे, परंतु समाधानही लाभले व नवीन कार्यकर्त्या उदयास येऊ लागल्या हेही यश थोडके नव्हे. यामुळे धम्मकार्यास गति आली. सौ. मीनाक्षी मून, सौ. यशोदा निकाळे, सौ. सुनिता बागडे, सौ. रूक्मीणीबाई भित्रे, सौ. लिलाताई गजभिये, छाया मानवटकर, सौ. यशोधरा नगराळे, सौ. वंदना गमरे, श्रीमती शकुंतला आगळे, सौ. चित्रा कोसे, शोभा तांबे, सौ. प्रेमा जाधव, कु. सुनंदा पाटील, सुजाता सकपाळ, कौसलपा बर्वे, त्रिवेणी सोमकुवर, उज्ज्वला वळंजु, मातोश्री खेमा यांनी बरीच मदत केली.

सामाजिक, धार्मिक चळवळीत कार्य करताना घरच्या पुरुष मंडळीचे बरेच सहकार्य लाभले व वेळोवेळी मार्गदर्शनही मिळाले.

प्रज्ञा महिला मंडळाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन व कार्य या विषयावर निबंधस्पर्धा आयोजित करून तसेच खेळांचे सामने, बाबासाहेबांची, भगवान बुद्धांची गीते वगैरेंच्या स्पर्धा घेऊन यशस्वी स्पर्धकांना बक्षिसे देऊन प्रोत्साहन दिले.

१० जुलै १९९० रोजी प्रज्ञा महिला मंडळाने गरजू कामकरी महिलांसाठी महिला उद्योजक शिबिर भरवून त्यांना योग्य ती माहिती उपलब्ध करून दिली. अजून साहित्यिक, धार्मिक मेळावे भरवून पुष्कळ कार्य करण्याचे मनसुबे आहेत.

प्रज्ञा सांस्कृतिक केंद्रातर्फे श्याम मानव यांनी अंधश्रद्धेचे प्रयोग करून बुवाबाजी,चमत्कार इ. अंधश्रद्धा दूर करण्याचा प्रयत्न केला. हा स्तुत्य उपक्रम आहे.

काही कार्यक्रम स्त्रिया आणि पुरुष यांनी मिळून संयुक्तरित्या करण्याचे ठरले. त्यावेळी असे लक्षात आले की, जबाबदारीची कामे तेवढी महिलांना देऊन

महिलांना राबवून घेण्यात येते आणि ठराविक महिलांनाच पुढाकार देण्यात येतो. असे अनुभव आम्हास आले. काही निष्ठावंत कार्यकर्त्या महिला अतिशय मेहनत घेत असताना त्यांची नावे ठळक अक्षरांत पत्रिकेत छापून कार्यक्रमातही त्यांना योग्य तो वाव द्यायला हवा होता. एकेका वक्त्यासोबत भाषण करायला त्यांचेही नाव छापायला हवे होते. म्हणजे त्यांना प्रोत्साहन मिळून कार्य करण्याला अधिकच उत्साह वाटला असता. काही महिलांना काम करण्या-बरोबरच त्यांना बोलते करणेही आवश्यक आहे, अशा प्रसंगातूनच कार्यकर्त्या व वक्त्या तयार होत असतात, त्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळत असतो. म्हणूनच त्यांना संधी मिळाली पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. या दृष्टीने पाहता प्रज्ञा महिला मंडळ कु. रंजना उघडे, कु. सुष्मा आचार्य, वंदना जाधव आणि इतर मुलींना व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. एकदा सभाधीटपणा आल्यावर कार्यकर्तीला कार्य करण्यास संधी मिळते व त्यातून उद्याच्या निष्ठावंत कार्यकर्त्या तयार होतील. बऱ्याच भगिनींना योग्य ती संधी न मिळाल्या-मुळे, त्यांच्यात बाबासाहेबांप्रती व बौद्धधर्माप्रती आस्था, कळकळ, आत्मीयता असूनही बोलता न आल्याने त्यांचे कलागुण मारले जातात. तर काही भगिनी विशेष कार्य न करताही पुढे पुढे करून भाव खातात असेही काही अनुभव आहेत. अशी वृत्ती चळवळीला मारक ठरते, पण इलाज नसतो. काही महिला स्वार्थासाठी महिला मंडळात येतात, धम्मकार्याच्या नावाने त्यांना आस्था नसते, त्यांचा कार्याच्या नावाने सहभाग शून्य असतो.

अशातऱ्हेचे मेळावे भरविताना हृदयाच्या तळळीने निःस्वार्थ बुद्धीने कार्य करणारे कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत यासाठी कार्यकर्त्यांमध्ये मानसिक परिवर्तन घडून यावयाला हवे. योग्य यंत्रणा राबवून घ्यायला हवी. संघटीत होऊन अहंभाव विसरून सेवाभावीवृत्तीने कार्य करण्याची अत्यंत गरज आहे. त्यादृष्टीने पुण्यातील 'त्रैलोक्य महासंघ' ही संस्था व्यवस्थित धम्मप्रसार करीत असल्याचे आढळले. एक वर्षापूर्वी धम्मप्रसार, प्रचार करणाऱ्या कोकणभवन येथील महिलांच्या धम्मशिबिरात मी तीन दिवस गेले होते. शिबिरात ६५ महिला हजर होत्या. तेथे बौद्धधर्माचे तत्त्वज्ञान व आपले कर्तव्य याविषयी उपयुक्त माहिती देण्यात आली. बऱ्याच लोकांना अजूनपर्यंत बौद्धधर्म पाहिजे तसा समजला नाही. या दृष्टीने ख्रिस्ती मिशनऱ्यांसारखी संस्था स्थापन करून संपूर्ण भारतभर खेड्या-पाड्यांतून प्रचार करण्याची आवश्यकता आहे. तसेच या धम्मप्रसार, प्रचारासाठी वृत्तपत्रांचीही अतिशय निकड आहे.

आंबेडकर शताब्दी वर्ष व महात्मा फुले स्मृती शताब्दी वर्षात सगळीकडे उत्साह आणि जोश दिसून येत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. पण असाच उत्साह शताब्दीवर्षानंतरही कायम ठेवून प्रत्येक आंबेडकरवाद्यांनी सामाजिक कार्याबरोबरच

धम्मचळवळीस जुंपून घेतले पाहिजे. बाबासाहेबांच्या नुसत्या नावाचा उदोउदो करून भागणार नाही, तर त्यासाठी प्रसंगी आर्थिक झिज सोसूनही तन-मन-धनाने धम्मचळवळ पुढे नेली पाहिजे हे आपले कर्तव्य आहे. याचरोबर कृतिचळवळीतही भाग घेतला पाहिजे. प्रत्येक क्षणाला जागरुक राहून आंबेडकरांचा सामाजिक न्यायाचा, समतेचा, धम्मचळवळीचा लढा, शैक्षणिक लढा करून कार्य साकल्याने सुरु ठेवणे गटबाजीकडे लक्ष न देता मैत्रीभावनेने वागून अहंकार विसरून ऐक्यासाठी झटणे, संघटित होऊन चळवळ पुढे नेणे हीच म. फुल्यांना आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खरी श्रद्धांजली होय.

भगवान बुद्ध म्हणतात,"बौद्धधर्म तुम्हाला नावेप्रमाणे उपयोगात आणण्यासाठी देतो. नीतीवर आधारलेल्या या बौद्धतत्त्वांचे निष्ठेने पालन करा. सर्वहारा समाजाला प्रतिष्ठा देण्याचे सामर्थ्य फक्त बुद्ध धर्मातच आहे. प्रज्ञा, करुणा, नीती, समता शिकविणारा जीवनवादी बुद्धधर्मच आपली आध्यामिक भूक भागविणारा धर्म आहे. तो आचरण धर्म आहे, सर्वसामान्यांचे दु:ख कमी करण्याचा मार्ग म्हणजे बौद्धधर्म होय. चार आर्यसत्यावर ह्या धर्म आधारलेला आहे. १) जगात दु:ख आहे, दु:ख अनित्य आहे. दु:खाचे कारण तृष्णा किंवा आसक्ती ( वासना ) हे आहे. ३) ते नष्ट करण्याकरिता तृष्णेचा नाश केला पाहिजे. ४) त्यासाठी आर्यअष्टांगिक मार्गाचा अवलंब केला पाहिजे. सम्यक वाचा, सम्यक दृष्टि, सम्यक विचार, सम्यक संकेल्प, सम्यक आहार, सम्यक स्मृति, सम्यक आजिविका, सम्यक् समाधी हे ते आठ मार्ग होत. भगवान बुद्ध व त्यांचा धम्म हे बाबासाहेबांनी लिहिलेले पुस्तक बौद्धधम्माचे जणू बायबलच आहे ते प्रत्येकाने आवश्य वाचावे आणि बौद्धधम्म समजून घ्यावा. पंचशील तत्त्वे २२ प्रतिज्ञांचे रोज वाचन करावे त्याप्रमाणे आचरण ठेवावे, विहारत जमावे, धम्मावर चर्चा करावी, समाजप्रबोधन याख्याने वारंवार घडवून आणावी. धम्मावर प्रश्नोत्तरे व्हावी,चर्चासत्रे घडवून आणावी, निबंधस्पर्धा ठेवाव्या. इत्यादी मार्गांनी धम्मजागरण होऊ शकते. खऱ्या निष्ठेने कार्य करून प्रत्येकाने गटबाजी विसरून अहंकार सोडून त्यागीवृत्तीने ही धम्मचळवळ पुढे नेण्याचा प्रयत्न केल्यास ' सारा भारत बौद्धमय करीन ' हे बाबासाहेबांचे स्वप्न पूर्ण होण्यास उशीर लागणार नाही. हे कार्य करणे म्हणजेच स्वोद्धारासाठी व समाजासाठी झटणे होय. आजच्या या जगात जगण्यासाठी बुद्धधम्माचीच गरज आहे. बुद्ध–फुले–आंबेडकरी तत्त्वप्रणालीनुसार आपण वाटचाल केल्यास भारत देशाची प्रगती होण्यास उशीर लागणार नाही. आपल्यावर फार मोठी जबाबदारी येऊन पडली आहे. हिंदुत्व, मंडलआयोग, आरक्षणाविरुद्ध आंदोलन करून भांडवलशाही, ब्राह्मण्यशाही व राष्ट्रविघातक शक्ती डोके वर काढू लागली आहे. यासासाठी युद्ध की बुद्ध हा मोठा महान प्रश्न आहे. बुद्धाशिवाय भारताला पर्याय नाही हे निर्विवाद सत्य आहे. बुद्धधम्मचक्र गतीमान करणे, मिशनऱ्यांप्रमाणे

सेवाभावीवृत्तीने कार्य करणारे भिक्षु, त्यागी कार्यकर्ते तयार व्हावेत. बौद्धधम्माचा प्रसार करणे म्हणजे मानव सेवा करणे होय. २५०० वर्षांपूर्वी भगवान बुद्धांनी भारतात बौद्धधम्माची ज्योत पेटवली. ज्ञानाचा दिवा घरोघरी लावा म्हणच आहे. मध्यंतरी या दिव्याला तेल कमी पडले. परंतु १५ ऑक्टोबर १९५६ साली बाबांनी ही धम्मज्योत पुन्हा प्रज्वलीत केली. आता आपल्या त्यागाचे, निःस्वार्थ बुद्धीचे श्रमाचे निष्ठारूपी तेल घालून ही धम्मज्योत सतत पेटती ठेवण्याची मोठी जबाबदारी बाबासाहेबांनी आपल्यावर टाकली आहे. आपण सर्वांनी मिळून ती जबाबदारी पार पाडण्याचा प्रयत्न करू या. बाबासाहेब 'भगवान बुद्ध व त्यांचा धम्म' या ग्रंथाच्या शेवटी लिहितात :

**भगवान बुद्धांच्या धम्माचा प्रसार करण्याची प्रतिज्ञा**

प्रतिज्ञा आपण करू या, जीवसृष्टी आहे असीम, ती भवसागरपार नेण्याची,

प्रतिज्ञा आपण करू या, आपणांत दोष असंख्य ते नष्ट करण्याची,

प्रतिज्ञा आपण करू या, आहेत सत्ये अनंत, ती पूर्ण आकलण्याची,

प्रतिज्ञा आपण करू या, भगवान बुद्धांचा अमूल्य मार्ग, तो संपूर्ण साध्य करण्याची.

**– मीनाक्षी मून**

२–६–९३ शासकीय वसाहत,

वांद्रे (पूर्व) मुंबई–४०० ०५१

●

# मी शंकर बोऱ्हाडे

**– शंकर बोऱ्हाडे**

मी शंकर बोऱ्हाडे. कळू लागल्यापासूनच सामाजिक चळवळीत ओढला गेलो. घरात शिक्षणाचा वारसा नाही. परंपरेनं मला काही खास सवलती दिल्या नाहीत. आईवडील विडीकामगार.कामगारच्या घरात चहाला दूध कुठं असणार ? पोरासोरांना दूध पहायला मिळणं भाग्य समजायचो.कुणी गायी म्हैशी पिळत असला की त्या दुधाच्या धारापाहून अंग शहरायचं. दुधाची एक धार जिभेवर येईल का ?

राष्ट्र सेवादलातून मी काम करू लागलो. सेवादलाच्या अभ्यासवर्गातून काही नवं ऐकायला येवू लागलं. काही वेगळं जाणवायला लागलं. पाठचपुस्तकातले डॉ. आंबेडकर या ठिकाणी नव्या दिशा, नवे विचार देत होते. माझा आंबेडकर, फुले यांच्याशी सेवादलातून जवळचा परिचय झाला. १९७७ नंतर सेवादलात असणाऱ्या तरुण क्रांतीकारी विचारांच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्र सेवादलाची संस्था, पाळणाघर करू पहाणाऱ्यांना हदरवून सोडले होते. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीशी सेवादल घट्ट बांधण्याचं काम त्यावेळी सुरू होते. सामाजिक समतेचा विचार डोक्यात घेऊन आम्ही वेगानं निघालो होतो.

याच काळात जातीव्यवस्थेचं भयानक रूप पहायला मिळत होतं. सेवादलाची शाखा संपल्यावर दलित तरुण मुलामुलींशी बोलणं, त्यांच्यात मिसळणं आमचं

सुरू होतं. घरात माझा राग राग सुरू झाला. मी घरात तापाने फणफणल्यावर माझ्या मैत्रिणी मला पहायला आल्या. तेव्हा घरात 'तुला वाण्याब्राह्मणांच्या पोरी कश्या पहायला येत नाहीत असा सुर लागला. मी माझा ध्येयवाद उराशी बाळगून होतो. तर आईवडीलांना यानं वाण्याब्राह्मणांशी दोस्ती करावी असं वाटत होतं.

माझी आई मला दलित पँथर म्हणते, माझ्या बायकोला दलित पँथर म्हणते. माझी बायको खानदानी मराठा आहे. मी मंडल आयोगवाला. माझी बायको म्हणते, मराठा म्हणून जन्मले. मराठा म्हणून मरणार नाही. ती बाबासाहेबांचंच तत्त्वज्ञान मांडत असते. घरात खानदानी कुळाचार काही नाही. तिच्या देशमुख आडनावामुळं बाकीच्यांना तिची जात कळते. माझं आडनाव बेरकी आहे. वोन्हाडे ते परीट, सोनार, मराठा अशा अनेक जातीत सापडतं. आम्ही जात हा घटक विसरूनच वाटचाल करतोय.

बायको एकदा बाजारात गेली. भाजीपाला घेऊन आली. बरोबर येताना तिनं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची एक प्रतिमा घरात लावण्यासाठी आणली. तिला आता डॉ. आंबेडकर हे आपले वाटतात. मी घरात बाबासाहेबांची प्रतिमा पाहून खूष होणार हे तिला माहीत असतं. शेजाऱ्यांनी मात्र तिची चांगलीच झाडाझडती घेतली. 'हा फोटू कशाला लावला ?' हा शेजाऱ्यांचा जातीय अहंकार ती स्वत:च्या मनापासून दूर न जाणारी.

आम्ही दोघंही नोकरीत आहोत. कारकुनी करून व्यवस्थित पोट भरतो. माझ्याकडे सारखी कार्यकर्त्यांची वर्दळ चालू असते. कैलास पगारे, अरुण घोडेराव, अनिल भालेराव, लहू कानडे, प्रभाकर निकम हे मित्र वेळोवेळी येतात. शेजारी जातीचा वास काढतात. माझ्या घरची ये जा पाहून आईला घरात पॅन्थर दिसते. शेजारची मुलगी 'दाजी तुमचा तो मित्र मराठा हाये कावो ' असं विचारते. हिरमुसते. माझी बायको मित्रांना शक्य असेल ते देते. गप्पा मारते. कधी एखाद्या मित्राच्या लग्नाचं प्लॅनिंग असतं. मुलगी कशी पळणार किंवा पळवायची याचे आडाखे आम्ही बांधत असतो. आंतरजातीय विवाहाचं एक केंद्र म्हणजे आमचं घर असतं. आहे, असेलही.

माझे मित्र महार. माझा आदर्श डॉ. आंबेडकर. ते ही महार. मी खंडोबाच्या जत्रेला आता जात नाही, १४ एप्रिलला न चुकता जयंतीला जातो. म्हणजे मी महार. जातीत काय पोरी मिळाल्या नसत्या. मी त्या केल्या नाहीत. मला जाणीवपूर्वक जात तोडायची होती. हे मी फार पूर्वीच जाहीर केलं होतं म्हणून मी दलित पँथर. (आई मला भारतीय दलित पँथर, ढाले गट, ढसाळ गट, कांबळे गट, आठवले गट असं काही म्हणत नाही. तिला हे महामानव अद्याप माहीत नाहीत. तेवढीच सुटका.)

महाराच्या घरी गाणं, मराठ्याच्या घरी दाणं असं म्हटलं जातं. माझ्या घरी गाणंही नाही, दाणंही नाहीत. माझा बाप मात्र सोंगाड्या तमाशांत पब्लिकला हजरजबाबीपणानं सामोरा जाणारा, मराठी चार्ली चॅप्लीन म्हणजे माझा बाप. दहावीस हजार पब्लिकसमोर उभा राहून हा मराठी चॅप्लीन प्रचंड टाळ्या मिळवतो.तमाशाचा आस्वाद घेणारा वर्ग उच्च वर्ग असतो. तमाशात काम करणारा वर्ग हा दलित असतो. कनिष्ठ असतो. माझा बाप त्या वर्गात रहातो. म्हणून तो दलित. जातीनं त्याची तमासगिर म्हणून हेटाळणी केलेली तर माझी 'तमासगिराचं प्वार तू. बाप तसा बेटा' म्हणून हेटाळणी केलेली.

बलुतेदार जातीत माझा जन्म झाला. परीट लोकांचे कपडे धुवायचे, इस्त्री करायची, घरी नेऊन द्यायचे. माझ्या लहान वयात माझ्या गावात मी धुतलेल्या गोधड्या घरोघर पोहचवल्या. सणावाराला सनवई मागून आणायचो. दारोदार सनवईसाठी फिरताना लाज वाटली नाही. आज जात माणसाला कशी वागवते या दृष्टीने मी त्या अनुभवाकडे पहातो.

सिन्नर हा सतत दुष्काळग्रस्त भाग. पाण्याचं प्रमाण दिवसेदिवस कमी झालं. लोकांची धुणी धुवायचं परवडेनासं झालं. माझा बाप पोट घेऊन सिन्नरला आला. विड्यांवर गुजरान सुरू झाली. परंपरेचा धंदा सोडून नव्या व्यवस्थेशी आमचं नातं जुळलं. जातीनं पाठ सोडली नाही, जातीतल्यांनी हेटाळणी सोडली नाही.

विद्यापीठ नामांतराचा लाँगमार्च हा माझ्या पुढील वाटचालीत खूप मोठे परिवर्तन घडवून गेला. मी आजारातून उठलेलो. एका दुपारी प्रा. प्रमोद वागदरीकर माझ्याकडे आले. म्हणाले सिन्नरचे कोण क्रांतिकारक लाँगमार्चमध्ये येणार आहेत ? आम्ही सिन्नरला नामांतराच्या समर्थनार्थ समता परिषद घेतली होती. लोकांचं प्रबोधन केलं होतं. त्याचवेळी नामांतरविरोधी बैठक, बातमी सिन्नरमध्ये वेगळीच हवा निर्माण करत होती. मी कशाचाही विचार न करता बैठकीत गेलो. आपली भूमिका समजावून घ्यावी हा माझा विचार. बैठकीला चार दोन मराठा तरुणांपलिकडे कुणीही नव्हतं. नामांतराचा विरोध त्यांचा ठरलेला. बैठक मोडली. मी निघलो.एका फर्लांगभर अंतरावरून काही कार्यकर्ते येत होते. त्यांना पाहून एका मराठा तरुणाने नशेत बरळायला सुरूवात केली. काही अनर्थ झाला असता तर सिन्नरही पेटले असते. आम्ही संयमानच हा गुंता सोडवला.

लाँगमार्चमध्ये सामील होण्यासाठी मी लगेचच प्रा. वागदरीकरांबरोबर निघालो. आणखी एक कार्यकर्ता भेटला. तो व्यवहारी व सावध होता. म्हणाला, 'बाबा आढावांना अटक झाली सगळीकडे धरपकड होत आहे. लाँगमार्चचं कसं होणार–' बाबा आढावांना अटक झाली म्हणजे लाँगमार्च होणार नाही ही चूक त्यांनी त्याच्या लक्षात आणून दिली. तो ही सामिल होण्यासाठी आमच्याबरोबरच निगाला. मी एक वही व पेन घेऊन निघालो. अंगावरचा शर्ट व पॅन्ट या पलिकडे

काही घेतलं नाही. घरात आईलाही सांगितलं नाही. रात्री आम्ही येवल्यात पोहचलो. राष्ट्र सेवादलाची एक तुकडी येवल्याहून औरंगाबादकडे पायी निघणार होती. मुंबई, जळगावचे कार्यकर्ते येवून धडकले होते. प्रतिमा जोशी, मनोहर कदम, अरुण जोशी, बाळ राणे, सविता बागूल या बाहेरच्या कार्यकर्त्यांबरोबरच मोहन गुंजाळ, सुरेश पगारे, गोपाळ पाटील, भास्कर कोल्हे, प्रा. रणजित परदेशी हे लाँगमार्चच्या जोरात तयारीत होते. अरुण ठाकूर, सुरेश पगारे सारखे कार्यकर्ते शासकीय नोकरीचा विचार न करता लाँगमार्चचा रुट ठरवित होते.

सकाळी काही कार्यकर्त्यांनी उठून एस. टी. ने औरंगाबादकडे जायचे ठरले. दलित युवक आघाडीचा प्रकाश शिरसाट औरंगाबादहून खास काही महत्त्वाच्या सूचना घेऊन आला होता. ठरल्याप्रमाणे सकाळी कार्यकर्त्यांची पहिली तुकडी एस. टी. च्या प्रवासासाठी निघाली. येवला–औरंगाबाद गाडीत सर्वजण बसले. कंडक्टरने बेल दिल्यावर सामाजिक समतेचा विचार उराशी बाळगणाऱ्या या मित्रांना खूप हायसं वाटलं. पोलिसांच्या सुचनेप्रमाणे ड्रायव्हरने गाडी पोलीस स्टेशनला नेली. पोलिसांनी पहिल्याच तुकडीला अटक केली. तोवर आम्ही येवला शहरातून लाँगमार्चला प्रारंभ केला होता.

समता संमेलन, वऱ्हाडी कोण कोण ऽ ऽ ऽ अशा लयदार गाण्याबरोबरच नामांतर कशासाठी, समतेसाठी – न्यायासाठी अशा अनेक घोषणा देत देत आम्ही मार्गक्रमण करीत होतो. उत्साह इतका होता की तहान, भूक, आजारपण विसरून आम्ही ओरडत होतो – नामांतर झालेच पाहिजे.

लाँगमार्च येवला पोलीस कचेरीजवळ आल्यावर अटक केलेल्या कार्यकर्त्यांनी घोषणा दिल्या. मग जवळजवळ काही काळ या घोषणायुद्धात गेला. पोलिसांनी आम्हाला अटक केली. दुपारी नाशिक सबजेलमध्ये आणण्यात आले. आठ दिवस नाशिक सबजेलमध्ये राहिलो. कार्यकर्त्यांनी तिथेच अभ्यास वर्ग सुरू केला.

सिन्नरमध्ये माझ्या नावाची बरीच बोंब झालेली. मी बोऱ्हाडे, की बोराडे अशा चर्चा झडत होत्या. बोऱ्हाडे असेल तर मराठा, बोराडे असेल तर इतर जातीचा असा शोध तेव्हा लागला. सिन्नरच्या राजकीय गडावर याची विचारपूस झालेली. मला मात्र हे ऐकून हसू येत होतं. नामांतराच्या सत्याग्रहाने माझ्या जाणिवा अधिक प्रगत झाल्या. माझी जात तिथं गळून पडली. मला नामांतराने कार्यकर्ता बनविले.

भाऊ लहान, वहिणी लहान

लहान लहान मुले, आम्ही लहान लहान मुले

सेवादलामध्ये जातो

वीर सानुले, आम्ही वीर सानुले

ही माझी सेवादलीय बाळबोध भूमिका बदलली. सम्यक् परिवर्तनासाठी आपण काही केलं पाहीजे असं वाटू लागलं. ' क्रांती झिंदाबाद रहेगी क्रांती झिंदावाद ' अशा ओळींनी हृदयात हवा भरली गेली. रात्रंदिवस एक करीत आम्ही संघटना बांधित होतो.

ते दिवस ध्येयवादाचे होते. आपण जे काही करतोय त्यातून काही बदल होईल असं वाटायचं. खूप फिरायचो. खूप काम करायचो. घरी आई वैतागायची. माझी वणवण कधी थांबेल असं तिला व्हायचं. पायात चप्पल नाही. अंगावर धड कपडा नाही. केसांना तेलाची ओळख नव्हती. त्यातही नीननेटकेपणा आणायचा प्रयत्न करायचो. मला उज्ज्वल उद्याचे स्वप्न दिसायचे तर आईवडीलांचा आजच कणेर होता. त्यांना मी विडचा वळायला शिकाव्या, कारखान्यात जावं असं वाटत होतं. माझा तर मार्ग पूर्ण बदलला होता. विडीनं आईवडीलांची जिंदगी नासवली. मी विडी वळणार नाही. वाटल्यास हॉटेलात कपवश्या धुईन ' असं मी घरात सांगायचो. माझं लक्षण मात्र त्यांना वेगळंच दिसत होतं. लोक बापाला म्हणायचे, " किसनदादा, तुझा पोऱ्या पुढारी होईल."

मला पुढारीपण नको होतं. मी सामान्य कार्यकर्ता म्हणूनच ठीक होतो. त्याच सुमारास आमच्या कामाला गती आली होती. अंधश्रद्धा व बुवाबाजी विरुद्ध रणशिंग फुंकले गेले होते. मी माझ्या परीनं त्या लढाईत होतो. त्याच काळात सिन्नर तालुक्यात सुखसागर साईबावाचा उदय झालेला होता. ऐशारामात जगणाऱ्या बाबाची कानावर पडलेली अफवा ऐकून श्रद्धाळूपणे विश्वास ठेवत होते. सुखसागर बाबा सिन्नरजवळच्या वडझिरे गावात होता. मुंबई पुण्याचे यात्रेकरून रांगा लावून बाबांचे दर्शन घेत होते. मी चार–दोन कार्यकर्त्यांसमवेत सायकलवरून वडझिरे गाठले माणूस गुराखी. निरक्षर. झोपलेला होता. बाजूला पाटी. बाबांना कुणी प्रश्न विचारू नये. दर्शन करून आशीर्वाद घ्यावा. आम्ही दर्शनही घेतले नाही की आशीर्वादही मागितला नाही. एका शेतात जावून भाकरी खाल्या. बाबामुळं गावात आवक वाढली होती. काही लोकांचे धंदे तेजीत होते. सगळं वातावरण व्यापारी मंडळींना पूरक होतं.

नासिकच्या आमच्या कार्यकर्त्यांनी वडझिरे गावात जावून बाबाचा बुरखा फाडला. अनेकांना हे असंच चालावं असं वाटत होतं बाबाच्या चमत्कारांवर कुणाचा विश्वास नव्हता. पण वडझिरे शिर्डी झाले तर चालणार होते. अखेर सेवादलाने बाबाविरुद्ध आंदोलन केले. बाबाला अटक झाली. बाबा पुन्हा गुराखी. वडझिरे पुन्हा जैसे थे झाले.

कार्यकर्त्याला वैज्ञानिक दृष्टी असली पाहिजे. तो अंधश्रद्धाळू असता कामा नये. दलित कार्यकर्त्यांनी विज्ञाननिक दृष्टी ठेवली पाहिजे. तसे घडत नाही. त्यामुळे बऱ्याचदा फसगत होते. कार्यकर्ताही बुवाबाजीचा बळी ठरू शकतो. त्यासाठी

कार्यकर्त्यांचे प्रबोधन झाले पाहिजे. दलित कार्यकर्त्यांचे प्रबोधन कुणी करींत नाही. प्रबोधनाची साखळी समाजवादी, कम्युनिस्ट, हिंदुत्ववादी या विचारधारा असणाऱ्या संघटनांमध्ये सापडते. दलित चळवळीत असे प्रयत्नही झाले आहेत. पण ते अत्यल्प स्वरूपात.

माझे प्रबोधन राष्ट्र सेवा दलातून झाले. नामांतराच्या सत्याग्रहातून झाले. बाबा आढाव, रावसाहेब कसबे, बाबुराव बागूल, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, दया पवार यांच्या भाषणांतून झाले. उपरा, बलुतं, मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे यासारखी आत्मकथनं वाचून झाले. चळवळीतल्या कार्यकर्त्यांबरोबर झालेल्या वादसंवादातून झाले. प्रत्यक्ष काम करताना चळवळीतूनच झाले. नव्या जाणिवा मला चळवळीतूनच प्राप्त झाल्या.

चळवळीत काम करताना काही अनुभव विलक्षण येतात. मी जात विसरून जातीच्या नव्हे तर धर्माच्या पलीकडे नजर ठेवून काम करतो. तेव्हा भीम जयंती साजरी करताना एखादा कार्यकर्ता म्हणतो, 'वोऱ्हाडे आमी बाबासाहेबाच्या रक्ताचे हावोत.' ही नवी अस्पृश्यता मनाला बोचत रहाते. आपण कोण ? दलित की सवर्ण ? असे प्रश्न घोंरावत रहातात. तासन् तास विचार करीत बसतो. रात्र-रात्र वाचत बसतो. तरी डोळा लागत नाही.

बाबासाहेबांना देव मानण्याकडे बऱ्याच जणाचा कल असतो. माझ्या घरातील बाबासाहेबांची प्रतिमा पाहून एक कार्यकर्ता म्हणता ' हे दैवत साऱ्या जगाचं दैवत आहे. ' इथे श्रद्धेचं अंधश्रद्धेत रूपांतर होतं. दैवत ही कल्पना हिंदू धर्मशास्त्राची, आम्ही तर बाबासाहेबा बरोबर बौद्ध झालो. मग या हिंदू संस्कारांनी अजून आमचा पिच्छा का सोडला नाही ? की आम्ही बाबासाहेबाचं धर्मांतर समजलो नाही ? की बौद्ध धर्म की धम्म आम्हाला कळला नाही.

माझी बायको वटसावित्रीला मटन खाते. हरतलकेला मटन खाते. चतुर्थी, श्रावणमासातही आम्ही मटन खातो. तेव्हा हिंदू संस्कार पुसले जावेत असाच आमचा प्रयत्न असतो. माझ्या बायकोनं धर्मांतर केलं नाही. बौद्ध झाली नाही. मीही अद्याप बौद्ध झालो नाही. मग हिंदू संस्कार का पुसावे ? मी मात्र ते पुसतो.

मटन न खाणे हा हिंदुसंस्कार असेल तर गांधी जयंती पुण्यतिथीलाही मला मटन चालते. मी आवडीनं खातो. वेळ मिळाला तर गांधीचे सत्याचे प्रयोग वाचतो. मी माझ्यावरच असे प्रयोग करीत असतो.

३० मार्च ८८ ला पहिल्या बाळंतपणासाठी बायकोला नगरपालिकेच्या दवाखान्यात दाखल केले. बायकोला व मला पाहून काही स्त्रिया म्हणायच्या, ' तुमाला मुलगाच व्हणार ' आम्हाला मुलगी पाहिजे, हे आमचे उत्तर. मुलगाच व्हावा हाही मला धर्मसंस्कार वाटतो. मी तो नाकारतो. ३१ मार्चला सकाळी मला मुलगाच झाला.

मुलगा झाला. पेढे वाटा. जिलेबी का नको ? मुलगा झाल्यावर मी जिलेबी दिली. बारसं घातलं नाही. कान टोचले नाही. जावळ काढलं नाही. १४जानेवारीला कानडीसरांना घरी आणून केस कापले १४ जानेवारीला तिळसंक्रात असते. तिलाच मकर संक्रात म्हणतात. तिळगूळ देण्याचा कार्यक्रम याचदिवशी. मी मात्र मुलाचे केस काढले.शेजारीपाजारी कुजबुजतात. आज नका जावळ काढू म्हणतात.मी ते काढतोच. केसांची पूजा न करता उकिरडयावर केस टाकतो. जावळ नदीत सोडावं हा हिंदू-संस्कार मी मुद्दामच पुसण्याचा प्रयत्न करतो. कान न टोचल्याने कुणी मुलाला मुसलमान म्हणतील ? याची भीती माझ्या जवळच्यांना वाटते, मला वाटत नाही. मुलगाही करदोटा अंगावर ठेवत नाही. हिंदू संस्कार असा घरातून हद्दपार होतोय.

मी १५ ऑगस्टला मुलाचे नाव जाहीर केले. त्यापूर्वी मनात काही नावं योजली होती. 'स्वातंत्र्य' हे नाव मनाशी ठरवलेलं होतं. स्वातंत्र्य कष्टकरी माणसाला, शोषिताला अजूनही मिळालं नाही. स्वातंत्र्याचा सूर्य भटक्यांच्या पालांवर अजूनही उगवला नाही. ते नाव मागं पडलं. मनात ' परिवर्तन ' हे नाव घोळत होतं. मुलगा झाला म्हणजे अपेक्षित परिर्वतन झालं का ? त्याने जातिव्यवस्थेचा स्वीकार त्याच्या सज्ञानवयात केला तर ? हे प्रश्न सारखे सलत होते. मित्र म्हणाले , ' स्वातंत्र्य ' परिर्वतन ही कुठे मुलांची नावं असतात का ? माझ्या मित्राच्या मुलामुलींची नावं त्यांचा धर्म, जात समजावून सांगत नाही. शिवाजी गायकवाड–निशा शिवूरकर च्या मुलाचं नाव नदीम, प्रमोद वागदरीकर–कुमुद साळवेच्या मुलींची नावं सकीना, ईला, मोहन गुंजाळ–निर्मला कुलकर्णी यांच्या मुलाचं नाव सत्येन, नरेंद्र दाभोळकरांच्या मुलाचं नाव हमीद. मी ही योग्य अशा नावाच्या शोधात होतो. ' संकल्प ' हे नाव मनात घोळत होतं. संकल्प सोडणे हा ब्राह्मणी शब्द वाटला. मला मुलाचं नाव मनासारखं सापडत नव्हतं. त्यातच यदुनाथ थत्ते यांच पत्र आलं. त्यांनी लिहिलं होतं, काही बौद्ध नावं मला आठवतात ती तुला कळवतोय. स्नेहवर्धन, हर्षवर्धन, गुणवर्धन, शीलभद्र ही नावं मला चांगली वाटली. एकदा कुसुमाग्रजांकडे असाच बसलो होतो. कुसुमाग्रज म्हणजे आमचे तात्या. तात्या म्हणाले, मुलाचं नाव काय ठेवलं ? त्यांना यदुनाथजींचं पत्रच दाखवलं. तात्या म्हणाले, हर्षवर्धन ठेव. आम्ही १५ ऑगस्टला मुलाचे नाव हर्षवर्धन असेच जाहीर केले. सहकारी व मित्रांना चहापान दिले. चहापान घेऊन जाणारा मित्र सहजच चेष्टेने म्हणाला, कार्यकर्त्यांना १५ ऑगस्ट, २६ जानेवारी याशिवाय दुसरे मुहूर्त सापडत नाहीत का ? बाकीच्यांनी त्याला हसून साथ दिली. मी माझ्या विचारावर तितकाच पक्का उभा राहिलो. साडेतीन टक्क्यांचे साडेतीन मुहूर्त त्या मित्राला अपेक्षित तर मला त्याचे सोयरसुतकही नाही.

**– शंकर बोऱ्हाडे**

विमा एजंट LIC of India, सिन्नर, जि. नासिक ४२२ १०३

# कार्यकर्ता कलावंत म्हणून

– लोकनाथ यशवंत

दलित साहित्य समजून घ्यायचे म्हणजे त्याची मुळाक्षरे ज्यावर उमटलीत त्या धूळपाटीचा दृढमूल आणि अपरिवर्तनीय जातिव्यवस्था हा आदिसंदर्भ लक्षात घ्यावा लागतो. वरवर पाहता ती एक समाजशास्त्रीय विकृती वाटत असली तरी मुळात मात्र ती एक अर्थशास्त्रीय निष्पत्ती आहे. समाज ही व्यक्तीव्यक्तीतल्या देवाणघेवाणीची बेरीज असली तरी यातली बहुतेक देवाणघेवाण ही समाजातल्या उपलब्ध साधनसामग्रीच्या वितरणावर अधिष्ठित असते आणि चढाओढ हा या वितरणाचा गाभा असतो. अपरिमित इच्छा असण्याची माणसाची निसर्गदत्त प्रवृत्ती आणि तुलनेने सदैव अपुरी पडणारी साधने त्यांच्यातल्या विसंवादातून ही चढाओढ उद्भवते. सारे अर्थशास्त्र या गृहितावर उभे आहे. या गृहितातले वास्तव एकदा मान्य केले की समाजातल्या साधनसामग्रीच्या वितरणात प्रत्येक वेळी कुणी ना कुणी वंचित उरणे अपरिहार्य असल्याचे स्वीकारावे लागते. प्रत्येक समाजात वंचितांचा एक समूह प्रत्यही अस्तित्वात असतो तो या प्रकारे. भारतात मात्र या बाबीला अन्य समूहांच्या तुलनेने एक वेगळेच रूप प्राप्त झाले आहे. अन्य समाजात वंचितांचा समूह कायम असला तरी त्याचे उर्वरित समूहांशी अभिसरणाचे नाते कायम असल्याने त्यातली कुठलीही व्यक्ती कायम वंचित नसते. समूह स्थिर पण त्यातली

व्यक्ती चल अशी ही स्थिती असते. भारतात मात्र समूहासोबत व्यक्तीलादेखील अविचल मानण्यात आले. आणि यातून वंशपरंपरागत वंचितांचा वर्ग निर्माण झाला. वंचितांचे समूहात्मक रूप संपून त्याजागी त्यांची जात निर्माण झाली. वेगळया शब्दांत विशिष्ट व्यक्तींना संधीचा कायम नकार हा या जातिव्यस्थेचा मूलाधार ठरला. या विकृतीला स्वीकृतीचा आशय मिळाल्याशिवाय ती कायम होणे शक्य नव्हते. या दृष्टीने या व्यवस्थेला मूल्याधिष्ठित समर्थन पुरवण्यात आले.

चातुर्वर्ण्य हे ते समर्थन होय. अन्याय करणाऱ्यांना आपण अन्याय करतो आहोत ही बोच निर्माण होऊ नये आणि ज्यांच्यावर अन्याय होतो आहे त्यांना तो अन्यायच वाटू नये अशी दुहेरी व्यवस्था चातुर्वर्ण्याच्या सिद्धांतात आहे. अन्यायाचे न्यायात रूपांतर करणारी चलाखी त्यात आहे. जसे भारतीय विचारात धर्म ही संज्ञा 'रिलिजन' या अर्थाने वापरली जात असून 'गुणधर्म' या अर्थाने वापरली जाते. त्याप्रमाणे वस्तुमात्रांना जसे गुणधर्म असतात तसेच प्राणिमात्रांचे पण असतात. जसे सापाचे चावणे आणि कुत्र्याची इमानदारी याचप्रमाणे अन्याय करणे आणि करवून घेणे हेही इतकेच नैसर्गिक आहे असे भासवणारा हा सिद्धांत आहे. शतकानुशतकांच्या वहीवाटीने चातुर्वर्णाच्या सिद्धांताला निसर्गदत्त रूप येऊन गेले आणि पुनरुत्थान होणार नाही किंवहुना बंडखोरांची आकांक्षाच निर्माण होणार नाही, इतकी विफलता आलेल्या समाजातल्या विकृत आत्मसंतुष्टेला तडा देण्याचे काम बाबासाहेबांनी प्रथमच केले. हतबलांना साथीला घेऊन, एका बलदं व्यवस्थेला आव्हान देणे किती अवघड होते याची कल्पना त्या काळात जाऊनच करता येते.कुण्या एका समूहाचे पारतंत्र्य ही नैसर्गिक बाब नसून ती केवळ मानवनिर्मितीच नाही, तर प्रयोजनपूर्वक निर्माण करण्यात आली आहे, हे वैचारिक प्रतिपादन बाबासाहेबांच्या चळवळीचे आधारभूत तत्त्व होते. चळवळ ही या विचाराच्या प्रचारार्थ उभी केलेली संघटित शक्ती होती. समता या चळवळीचे मन होते तर संघटना हे तिचे शरीर होते.

दलित साहित्याची मूळ प्रेरणा आंबडेकरी आहे ही बाब निर्विवाद आहे. कारण बाबासाहेबांच्या चळवळीतून दलित लेखकांना अद्याक्षरे गवसली आहेत. या चळवळीनेच त्यांना परंपरेने नाकारलेले अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य मिळवून दिले आहे. बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर त्यांच्या विचारांचे वारसदार म्हणून त्यांच्या चळवळीचे विश्वस्तपण दलित लेखकांना प्राप्त झाले आहे. बाबासाहेबांच्या ऋणमुक्तीचा भाग म्हणून आज दलितसाहित्यासमोर तीन महत्त्वाची आव्हाने आहेत असे मला तरी वाटते. १) दलित साहित्यात येऊ घातलेला पुनरावृत्तीस्वरूप तोचतोपणा टाळायचा असेल तर दलितसाहित्याच्या कक्षा रुंदावल्या गेल्या पाहिजेत. दलित साहित्यातून शोषण प्रकाराचे विविध पैलू अभिव्यक्त झाले असले तरी अजून खूपशा अंधाऱ्या जागा बाकी आहेत. अक्षरप्रकाश तिथवर पोचायलाच पाहिजे. नवागतांचे स्वागत हे

दलित साहित्य चळवळीचे यादृष्टीने महत्त्वाचे अंग व्हायला हवे. (२) दलित साहित्य नुसतेच विस्तृत होऊन चालणार नाही तर ते सखोलही व्हायला पाहिजे. दलितांचा शोषकवर्ग अन्यायाचे प्रकार बदलून त्याचे परिमाण कायम राखण्यात तरबेज आहे. समाजात प्रत्यही उद्‌भवणारे शोषणाचे नवनवे आणि सूक्ष्मतम् प्रकार टिपण्याचे प्रौढपण आणि क्षमता दलित साहित्यात यायला पाहिजे. (२) दलित चळवळीच्या निर्मितीच्या वेळी चळवळीचे शत्रू ओळखणे अवघड नव्हते, कारण पेटलेल्या युद्धात जातीचे बिल्ले लावूनच समोर उभे होते. पण युद्धात शत्रूपासून जेवढा धोका नसतो तेवढा फितुरांपासून असतो. ही सगळयांच चळवळींची शोकांतिका आहे. आंबेडकरी चळवळीचे फितुरही चळवळीसोबतच वाढले आणि बाबासाहेबांच्या मृत्यूनंतर तेच चळवळीचे सेनापती होण्याचा दैवदुर्विलास घडून आला. बाबासाहेबांच्या पुतळयाच्या आडून राज्य करणाऱ्या बेगडी नेतृत्त्वाने शब्दप्रामाण्य नाकारणाऱ्या बाबासाहेबांवरच त्यांच्याच शब्दांचे प्रामाण्य लादून चळवळ उलटी फिरवली. याचे चळवळीतल्या जनसामान्यांवर झालेले परिणाम दलितलेखकाने संवेदनशीलपणे टिपले पाहिजेत.

या दृष्टीने बाबासाहेबांच्या मृत्युनंतर ज्या तथाकथित नेतेमंडळीने दलित चळवळीला ओलीस ठेवले आणि प्राप्त विजयाची वाताहत केली त्यांचे बुरखे फाडणे हे दलित लेखकाचे महत्त्वाचे कार्य ठरले.

दलित लेखक म्हणजे दलितातली संवेदनशीलता दलिततांल्या सामान्यातल्या सामान्य व्यक्तिजीवनात जे तणाव निमाण होतात त्यांना प्रतिबिंबित करण्याचे काम दलित लेखक करीत असतो. या अर्थाने तो दलितलढयातली धग आहे, कारण चेतना संपली म्हणजे चळवळीचा मृत्यू असतो नव्हे पूर्वस्थितीप्राप्त धोका असतो. आंबेडकरी चळवळीचे या धोक्यापासून संरक्षण करणे हे दलित लेखकाचे काम आहे. या अर्थाने दलित लेखक हा आंबेडकरीच नव्हे तर सगळयाच मानवतावादी चळवळीचा अंगरक्षक आहे.

**– लोकनाथ यशवन्त**

सिव्हिल वॉर्ड नं. २, चंद्रपूर 442 401

# होलार समाज चळवळ व मी

– प्रा. रघुनाथ आ. केंगार

सांगलीत शिक्षण घेण्यासाठी गावभागातील बोर्डिंगमध्ये राहिलो होतो. त्या ठिकाणी अठरापगडजातीची मुले होतीच, पण प्रामुख्याने बौद्ध समाजातील मुलांची संख्या जास्त. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बौद्ध धम्म व दलित चळवळ येथील मोठ्या मुलांचे चर्चेचे विषय. शेजारीच दलितांच्या वस्त्या होत्या. तिथेही सभेत वरील विषयावर चर्चा व्हायची. मला हे सर्व नवीन होते. उत्सुकतेपोटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र मिळवून वाचले. त्यांच्याबद्दल आदर निर्माण झाला. नंतर नामदेव ढसाळ, राजा ढाले व आर. डी भंडारे इत्यादींचे सभेतील विचार ऐकल्यानंतर मीही असल्या चळवळीत मूकपणे सहभागी होऊ लागलो.

पुढे मी कुसुर ता. कराड या ठिकाणी शिक्षणासाठी आलो. या बोर्डिंगमध्ये-देखील आठरापगड जातीची मुले होती. बौद्ध मुलांचे प्रमाण जास्त. काही दिवसात रुळलो. येथे पाणी आणणे, लाकडे फोडणे, साफसफाई, जेवणपाळचा, इ. वरून काही वेळा भांडणे व्हायची. मग जातीजातीचे अंतस्थ गट पडायचे. मी व बापू दोघेच होलार समाजाचे. मग जाणीव व्हायची. आपली पण मुले शिकली पाहिजेत. म्हणून इथं आली पाहिजेत. मी गावाकडील मुले येथे आणण्याचा प्रयत्न केला, पण शिक्षणाची नावड व पालकांच्या अज्ञानामुळे ती येत नसत. शाळेत फुले, शाहू,

आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील इ. समाजसुधारकांच्यासंबंधी, त्यांच्याची कार्यासंबंधीची माहिती व्याख्यानाच्या रूपाने मिळे. त्यामुळे मनाची घडत होत गेली. मग समाजसुधारकांची चरित्रे व चळवळीसंबंधी पुस्तके वाचू लागलो. आपणही काही तरी करावे असे वाटायचे, पण शक्य नव्हते. येथेच अशा अवस्थेत डी. एड. झालो.

एक वर्ष नोकरीसाठी भटकल्यावर गुळुंब, ता. वाई येथे नोकरीला लागलो. या ठिकाणी दलितपणाची जाणीव एकर्षाने झाली. पुन्हा वाचनात गढून गेलो. जे हाताला येईल ते व प्रामुख्याने दलित साहित्यकांच्या कविता, कथा, कादंबऱ्या व इतर पुस्तके वाचली. तसेच सातारला सामाजिक चळवळीचे वारे वाहत होते. लक्ष्मण माने, पार्थ पोळके यांनी आयोजित केलेल्या सभांना, व्याख्यानांना न चुकता जात होतो. या काळात भालचंद्र फडके यांची दलितसाहित्यावरील पुस्तके वाचली. नामदेव ढसाळ, राजा ढाले, बाबुराव बागूल, गंगाधर पानतावणे, नारायण सुर्वे, दया पवार, केशव मेश्राम, यशवंत मनोहर, अरूण कांबळे, वामन होवाळ, तुपे,अण्णाभाऊ साठे, नामदेव व्हटकर,माधव कोंडविलकर,लक्ष्मण माने इ. अनेक दलित समाजातील लेखकांची मिळतील ती पुस्तके वाचली. अनेक जातींच्या दु:खांना वाचा फोडणारी अनेक आत्मकथने वाचनात आली, तसे माझे मन बोलू लागले. ' येथील एक गाव म्हणजे एक देश असून एक जात म्हणजे एक राज्य आहे. या राज्यातही पुन्हा अनेक भाग असून प्रत्येकाचे स्थान वेगळे व निश्चित आहे. ' हे लक्षात येऊ लागले. प्रत्येक दलित लेखक आपल्या जातीच्या व्यथा व प्रश्न साहित्याच्या माध्यमातून समाजापुढे मांडत होता. मी माझ्या जातीच्या व्यथा व प्रश्न शोधण्याचा खूप प्रयत्न केला, पण सापडले नाही. होलार समाजाचे प्रश्न वेगळे आहेत की जे आम्ही भोगत आहे. लिहिणारे व चळवळीत काम करणारे प्रामुख्याने शिकलेले आहेत. बौद्ध व इतर समाजातील आहेत. त्यामुळे त्याच्या जातीच्या व्यथा कथारुपाने साकार होतात व चळवळीमुळे समाजप्रबोधन होत आहे. मुले शिकत आहेत हे लक्षात आल्यावर मी ही माझ्या शेलार समाजासंबंधी विचार करू लागलो.

माझ्या आजोळी गोमेवाडी या गावी, होलार समाजाची सुमारे दोनशे घरे असूनही चार मुले शिकलेली नव्हती. शिकत नव्हती व पुढे शिकण्याची शक्यता नव्हती. ही अवस्था एका गावची मग महाराष्ट्रातील होलार समाजाची स्थिती काय असेल हे पाहण्यासाठी वेळ मिळेल तसा कर्नाटक–महाराष्ट्र सीमा भागात सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सातारा इ. ठिकाणी फिरलो. वाईट वाटले खोपटात हा समाज दलित चळवळीपासून, शिक्षणापासून व समग्रलक्षीविकासापासून वंचित राहून लांब अशा खोपटात खुरडत खुरडत जगत आहे.

होलार समाज, चांभार, ढोर, मांग, मान–म्हार, वडार, कैकाडी, धनगर, सनगर, कुणबी इत्यादींची पिढीजात कामे करतो पण त्या जातीच्या नावाने

ओळखला जात नाही. ज्या भागात ते काम करतात तेथे वेगळ्याच नावाने ओळखतात. उदा० कोळे, तळेवाडी या भागात होलार समाज मांग काम करतात तसेच जुन्या चपलाही सांधतात. म्हणून त्यांना फक्त मांग असे न म्हणता 'शिवती मांग' असे म्हणतात. म्हणजे या समाजाला निश्चित व्यवसाय नाही. निश्चित नाव नाही. त्यामुळे संघटन होत नाही. संघटनेअभावी निश्चित दिशा मिळत नाही. त्यामुळेच हा समाज समग्रलक्षीविकासापासून वंचित आहे.

सामाजिक कार्यकर्त्यांचे, दलित पुढाऱ्यांचे पीक काँग्रेस गवतासारखे पाण्याच्या व सुपीक प्रदेशात फोफावले आहे. काही अपवाद वगळता बारकाईने पाहिल्यावर सर्व रबरस्टँपच दिसतात. मग दुष्काळी भागातही पिके कशाला येतात. अर्थात त्यांना दोष का द्यावा. आमच्या होलार समाजात जे शिकलेत त्यांनी स्वतःची आडनावे बदलून समाजाशी असलेली नाळ तोडून टाकली आहे ते झालेत होलार-ब्राह्मण. होलार समाजाची मुंबईला पंचवीस वर्षांपूर्वीच अखिल भारतीय होलार समाज संघ,मुंबई नावाची संघटना आहे. ती ग्यानबा केंगार यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाली होती. या संघटनेतील पुढारी शिंगणापूर, पंढरपूर व खरसुंडीच्या जत्रेला येत. राहण्यासाठी मठ पाहिजे म्हणून मठासाठी त्यांनी वर्गणी गोळा करायला सुरुवात केली.

यात पुरोगामी विचार नव्हता. काय झाले कुणास ठाऊक पण या संघटनेला ग्रहन लागले. आज या संघटनेत आटपाडी तालुक्यातील व जवळपासची पण नोकरीधंद्यानिमित्ताने मुंबईला गेलेली मंडळी काम करीत आहे. तीही जुन्या होलार समाजातील पुढाऱ्यांचीच री ओढत आहेत. या संघटनेच्या कार्याला दिशा नाही. तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी मठ बांधणे, भंडारा घालणे, धार्मिक कार्यक्रम आखणे यासारख्या प्रतिगामी गोष्टींत स्वतःला व इतरांना गुंतवूण आपल्याच हातातील जातीच्या बेडया बळकट करीत आहेत. त्यामुळे स्वतंत्र विचाराने वाटचाल करायचे असे ठरविले.

शिकवत व शिकत असतानाच मी एम. ए. झाल्यावर फलटणच्या मुधोजी कॉलेजवर प्राध्यापक म्हणून रुजू झालो. या भागात होलार समाज असल्यामुळे काम करण्याची संधी मिळाली. ओळख कोणाचीच नव्हती. फलटणमधील रस्त्यावर चप्पल काम करणारे खूप होते. पॉलिश करण्याच्या निमित्ताने एका चप्पल दुरुस्त करणाऱ्याकडे थांबलो. चर्चा करत असताना जवळीकता साधली जावी म्हणून मी म्हटलं, 'मीही हा धंदा केला आहे.' त्यावर त्याने आडनाव विचारले. मी केंगार सांगितल्याबरोबर मी 'असली चांभार' आहे म्हणाला. माझी वाचा बंद झाली. पैसे दिले नि वाटेला लागलो. नंतर असा प्रयत्न केला नाही. रामनाथ चव्हाण सारख्यांचे जाती-जमातींचे दर्शन घडविणारे लेख वाचले होते. एके रात्री 'गावकुसाबाहेरील उपेक्षित समाज- होलार' हा लेख लिहिला व दै. ऐक्य ला

पाठविला. तो प्रसिद्ध झाल्यावर आठ–दहा दिवसानंतर पंधरा–वीस माणसे मला भेटायला आली. आम्ही हॉटेलवर गेलो. लेखावर बोलाय लागली. त्यांना व मलाही समाधान वाटलं.

फलटण तालुक्यातून आलेली पांडुरंग गोरवे, मधुकर आवटे, रघुनाथ ढोबळे, विठ्ठल करडे, मनोहर माने व राजाराम केंगार इ. माणसे मनोगत व्यक्त करत होती. " सगळ्या जातीत पुढारी झाल्यात तेनी त्यांचा समाज सुधारलाय. आता हातचं बगा की, मोठा म्हारुडा हुता. आता सगळी वुद्ध झाल्याती आंबेडकरांमुळं. सगळी शिकत्याती. तेंच्यात आज चार–पाच कमीशनर हायती, इनिसपीटर, बँकत साहेब,कारखान्यात हुद्देदार हायती.मास्तरांचा तर खच्च हाय.संघटनेमुळं समाजाची कामं रेटत्याती. आपल्यात तसं अजून काईच न्हाय. आतापातूर पेपरात व्हलाराचं नाव नव्हतं. तुमी लिवल्याल वगून समाधान झालं म्हणून भेटाय आलूया. आपूनबी कायतरी करूया. आपले म्हमईला पुढारी हायतं पण किरवांजल्यालं तेजी मठाची वर्गणी गोळा करण्यापल्याड काय केल न्हाय. " अशी बरीच मनातील खदखद व्यक्त केल्यावर त्यांना म्हणालो, "तुम्ही साथ दिली तर मी साथ देईन.समाजाच्या पदरात निश्चित काही तरी पडेल. इतर चर्चा झाली शेवटी फलटण तालुक्यातील माणसांची फलटणमध्ये बैठक घ्यायची ठरली.

ठरलेल्या रविवारी फलटण तालुक्यातील सुमारे तीनशे माणसे म्हाळजाई मंदिरात एकत्र जमली होती. मी गाडीमुळे उशिराच पोहचलो. सर्वांनी त्यांच्या पद्धतीनं हसतमुखाने स्वागत केले. सर्वांचे चेहरे उत्साही दिसत होते. बैठकीला सुरुवात झाली. दोघा–तिघानंतर रघुनाथ ढोवळे म्हणाला, "आजपावतर आपण ढुंगनाला ढुंगाण लावून जगत आलूया. केंगार सरामुळं आज सगळयाची तोंडं एकमेकाकडं झाल्यात. आता आपसातली. भावकीतली खेकटं बाजूला ठिवून आपली पोराबाळांची सुधारणा करू या.इतर सर्वांनी जातधंदं सोडून नोकऱ्या पकडल्यात्या. तेंची पोरं शिकत्यानी, सरकारी फायदं ते उपटत्याती आपून मातर चिवडत बसलूया. केंगार सरांचं ऐकू या. " वगैरे मी उभा राहिलो. फुले–शाहू–आंबेडकर व दलित चळवळीसंबंधी बोलून होलार समाजाची सद्यस्थिती व दिशा या अनुषंगाने विचार व्यक्त केले. सर्वजण कानात जीव आणून ऐकत होते.माना डोलवत होते, रडत होते आणि हसतही होते, मी बसलो. एकजण उठला व म्हणाला,"आता नुस्तं सभा घेऊन चालायचं न्हाय. वुद्धाच्या आंबुजासारख्या संघटना काढाय पायजेत." तेवढ्यात दुसरा म्हणाला, " लगा आपली संगटना म्हमईला हाय की. " तोपर्यंत तिसरा म्हणाला, " काय करायच्या वांजुटचा संगटनेला. इतर संगटना बघा नुस्ता हादरं देत्यात्या. आणि आपली बगा मरगाळल्यागत पडलीया. न्हाय म्हणायला जत्रला-तिवढी मठासाठी वर्गणी गोळा कराय यितीया. काय तरी जत्रतच ल्यावलिजाव करत्याती का झालं त्यांचं काम. त्या संगटनाचं नाव काडू नका. दुसरीच संगटना

काढू या. " बरीच उलटसुलट चर्चा झाली. पण बहुसंख्यांच्या मतानुसार ' सातारा जिल्हा होलार समाज संघा ' ची स्थापना अकरा लोकांची कार्यकारिणी तयार करून श्रीपतराव गोरवे यांना अध्यक्ष केले व मनोहर माने यांना सेक्रेटरी केले. कोणीतरी जाऊन हारतुरे आणले हारतुऱ्याचा कार्यक्रम झाला. चहापाणी झाले व पुढील नियोजन करून बैठक संपवली.

नियोजनाप्रमाणे गावोगावी फिरत होतो. मिळेल ती चटणी–भाकरी खात होतो. मिळेल ते अंगावर घेऊन खोपटात जातबांधवाच्या सुखदु:खात सामील होऊन रात्र काढत होतो. त्यांचे प्रश्न समजावून घेत होतो. फुले–आंबेडकर विचार, दलित समाजातील होलार समाजाचे स्थान, मुलांचे शिक्षण, अंधश्रद्धा, अज्ञान, नोकरीचा व्यवसायाचा प्रश्न, शासनाच्या योजना व कर्जप्रकरणासंबंधी समजावून सांगत होतो. काही लोक नाक–डोळे मोडीत होते. अर्धवट शिकलेले ' आपल्या समाजात दुसरा बाबासाहेब आंबेडकर निर्माण हुतुया वाटतं. ' असे कुचेष्टेने म्हणत होते. तरीही काही लोकांची साथ मिळत होती. माणसं संघटनेचे सभासद होत होती. बैठकीच्या बातम्या वर्तमानपत्रातून येत होत्या. इतर तालुक्यातून पत्रे व माणसे भेटायला येत होती. काहींना वाटले माझे सरकारदरबारात खूप वजन आहे म्हणून दुसरी–तिसरी शिकलेली न शिकलेली मुले माझ्यापुढे आणून ' ह्याला कुठंतरी नोक्रीला. 'लावा म्हणत होती. माझ्यापुढेही अनेक प्रश्न निर्माण होत होते. फलटणमध्ये संघटनेच्या कार्यालयासाठी व बोर्डिंगसाठी जागा मिळावी म्हणून प्रयत्न सुरू केले.

समाजविकासाठी सुरू केलेली चळवळ मुंबईच्या अखिल भारतीय होलार समाज संघाच्या लोकांपर्यंत पोचली. त्यांनी मझ्याकडे पत्रव्यवहाराचे रतीब सुरू केले. पंधरा ऑगस्टला त्यांनी होलार समाजाची सभा मराठी ग्रंथसंग्राहालय, दादर या ठिकाणी घेतली होती. त्यांनी माजी शिक्षणमंत्री सदानंद वर्दे व मला प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून निमंत्रित केले होते. गेलो. माझी भूमिका मांडली.दोन दिवस चांगला पाहुणचार झाला. कामकाजाबद्दल स्तुती केली. पण मुंबईच्या संघटनेखाली काम करावे असे त्यांचे मत होते. पाहु या म्हटले. मनात भूमिका निश्चित होती. मी गावी आलो. पत्रांचे रतीब चालूच. शिंगणापूरच्या यात्रेत जाहीर मेळावा घेतल्याचे मुंबईकरांचे निमंत्रण आल्यामुळे सुमारे चाळीस समाजबांधवासमवेत प्रथमच शिंगणापूर यात्रेला गेलो. खरं तर यात्रेला हौसे गौसे व नौसे जमा झाले. होते. संध्याकाळी सभा सुरू झाली माणसे बोलत होती.माणसं भाकरी–टुकडा खात जमले तर ऐकत बसली होती. पावती पुस्तकातील पावत्या निघत होत्या. मी माझी भूमिका स्पष्ट केली. नंतर बैठकीत आमचा आणि मुंबईकरांचा सूर जुळला नाही.

उन्हाळा संपून शाळा सुरू होण्याच्या दरम्यान आम्ही शाळा शिकवण्याची ऐपत नसलेल्या पालकांना भेटून मुलांना बोर्डिंगमध्ये घालण्यासाठी सांगू लागलो.

तोंडाने चांगला प्रतिसाद मिळाला. नंतर समजले की आई-बाप म्हणतात, 'पोरं आमच्या तोंडाम्होरं शिकली पायजेत.' शेवटी मुले मिळाली नाहीत. शोध घेतल्यावर समजले की, "केंगार सरांना पोरापाठीमागं बोर्डिंगात घातल्यावर कायतरी कमिशन मिळत आसल. मग काय करायचं आमाला ते बोर्डिंग." माझं काम सुरूच होतं.

पुढे होलार समाजाचा सर्व्हे केला. फलटण तालुक्यात स्त्री-पुरुष, मुले-मुली, शिकलेली-नोकरी नसणारी, शिकलेली-अडाणी, शिकणारी-न शिकणारी, नोकरीला असणारे पुरुष-स्त्रिया, चप्पलकाम-मजुरी करणारे, बेघर इ. संबंधी माहिती मिळवली. एकूण लोकसंख्या सुमारे सहा हजार. इ. १० पर्यंत शिकत असणारी तीनशे मुले, इ. १२ वी पर्यंत शिकलेली ६०, पदवीधर ५, सरकारी नोकरीत ३०, बिगर सरकारी २५, मुलींचे शिक्षणाचे प्रमाण अत्यल्प किंवा नाहीच. ही एका तालुक्यातील स्थिती तर महाराष्ट्रातील होलार समाजाची काय अवस्था असेल.

नोकरीला लागून आठ वर्षे झाली होती. डोक्यात चळवळीशिवाय काहीच नव्हते. रात्रंदिवस पदरमोड करून फिरत होतो. घरातली माणसं त्रासली होती. आई माघारी म्हणत होती , " पोरगं शिकलं, मास्तर झालं, पैसं कमवाय लागलं. तवा वाटलं हुतं आता सुख लागल. लगीन करल. नातवाचं त्वांड बगून मराय मोकळ व्हया ईल. पण एवढं कुठलं नशीब चांगलं आलया. हेन घोरच लावला. उठतुया-सुठतूया कुत्राच्या शेपटागत व्हलारं सुधराय पळतूया. नगू पुढारी हुस. घात व्हईल. मान्स वंगाळ आसत्याती. त्यापरास परपंचा करावा. " मी कानडोळा करत होतो. चळवळ वाचन व लेखन हेच डोक्यात होते.

दरम्यान कराडला सिनिअर कॉलेजला प्राध्यापक म्हणून रुजू झालो. नवे गाव, नवा परिसर, नवी माणसे व नवा अभ्यासक्रम यामुळे एक-दोन महिने डोके वर काढता आले नाही. नंतर मागलं तेच पुढे चालू झाले. मी प्रत्येक शनिवारी नरवणे गावी जायचो. शनिवारी, रविवारी दहिवडी, फलटण, खटाव, खानापूर, आटपाडी भागांतून समाजात फिरून चर्चा करून रविवारी रात्री तीन चार वाजता सोमवारच्या सकाळच्या कॉलेजला हजर होत होतो. प्रतिसाद चांगला मिळू लागला होता. मी फलटणहून आल्यावर मुंबईकरांनी होलार समाजातील काही लोकांना हाताशी धरून वेगळा गट निर्माण करण्याचा प्रयान सुरू केला. काही बळी पडले.

गेल्या तीन-चार वर्षांत अनेक कडू-गोड अनुभव घेत होतो. त्यामुळे पदरात निराशा पडत होती. त्यामुळे काही दिवस उदासिन झालो होतो. पण कराडमध्ये प्रा. राजेंद्र कुंभार, प्रा. मच्छिंद्र सकटे यांच्यासारखी उत्साही मित्रमंडळी भेटल्याने पुन्हा उत्साह निर्माण झाला. भेटीत एकूण समाजप्रबोधनपर चळवळीवर, दलित चळवळीवर आम्ही गप्पा मारत होतो. मी व प्रा. राजेंद्र कुंभार चर्चा करत

होलार समाजावर आलो. होलार जात, सद्यस्थिती व व्यवसाय इ. वर चर्चा सुरू झाली. होलार समाज परंपरागत अनेक जातीचे व्यवसाय करतो पण त्या जातीचे नाव या समाजाला मिळाले नाही असे सांगितल्यावर हा समाज 'बलुत्याचं बलुतं' आहे असे राजेंद्र कुंभार म्हणाले. ही वस्तुस्थितीच आहे. ज्या गावात चांभार व होलार असतात तेथे चांभारानं बलुतं म्हणून गावकऱ्यांना नवीन चपला तयार करायच्या. होलारानं मात्र नवीन चपला तुटल्यावर फक्त सांधून ( जोडून ) द्यायच्या. या मोबदल्यात चांभाराच्या बलुत्यातला काही हिस्सा मिळायचा. यावरून दोन जाती या बलुतीच पण चांभाराचं बलुतं होलार होता. असेच इतर व्यवसायासंबंधी झाले आहे. मी या जातीचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. कर्नाटक, महाराष्ट्र सीमा भागात याचे प्रमाण जास्त आहे. या जातीसंबंधात पुस्तके वाचली. महादेवशास्त्री जोशी यांच्या विश्वकोशाच्या १० व्या खंडात मांगाची पोटजात म्हणून उल्लेख आहे. तर प्रा. रस्तुम आचलखांब यांच्या 'गावकी' या आत्मकथनात महाराची साडेबारावी जात म्हणून उल्लेख आहे. पण सबळ पुराव्या-अभावी निश्चित काहीच हाती लागत नाही. मी शोध घेण्याचा प्रयत्न करत होतो. या काळात या समाजातील माणसांची, साहित्यातून समाजपरिवर्तन करणाऱ्या व प्रत्यक्ष चळवळीत भाग घेणाऱ्या दया पवार, नारायण सुर्वे, गंगाधर पानतावणे, बाबा आढाव, वामन व्होवाळ, लक्ष्मण माने, पार्थ पोळके, शरणकुमार निंबाळे, लक्ष्मण गायकवाड, सुरेश शिंगटे, अंकुश गायकवाड, महेंद्र ढोले. इ०ची भेटी होत होत्या. चर्चा झडत होत्या. त्यामुळे होलार समाज चळवळीला पोषक वातावरण मिळत होतं. पण मुंबईतील आमच्या कार्यकर्त्यामित्रांना हे मान्य होत नव्हते.

उन्हाळ्यात दि. १२, १३ मे रोजी अस्मितादर्श मेळावा धुळ्याला आयोजित केला होता त्याची निमंत्रण पत्रिका घरी आली. याच तारखांना होलार समाजाचे राज्यव्यापी अधिवेशन दिघंचीला आहे असे समजल्यावर खरे काय म्हणून मी व शशी देठे दिघंचीला गेलो. बबनराव जाबीर भेटले. थंडपणे स्वागत झाले. तास-दीड तास चर्चा झाली. तारीख १२ व १३ मेच होती हे समजले. एवढ्यात बरेच जातबांधव गोळा झाले. शेवटी उठताना सांगितले. राज्यव्यापी अधिवेशनामुळे सर्व समाजबांधव एकत्र येणार ही घटना चांगली आहे. आपले तात्त्वीक मतभेद असले तरीदेखील मी तन-मन-धनासहित सहभागी होईन. सुट्टी असल्यामुळे फिरता येईल. त्यांनी गोल-माल सांगितले. चहा दिला व नियोजन मुंबईत चालू असेल. मी इथे आहे त्यामुळे नंतर सविस्तर पत्राने कळवितो. कार्यक्रम पत्रिका पाठवितो व जीप घेऊन फिरण्यासाठी येतो. मग आपण सविस्तर बोलू असे सांगितले. नंतर दिनांक ९-१० मे पर्यंत मुंबईकरांचे काहीच आले नाही. दहिवडीला अधिवेशनाच्या जाहिराती दिसल्या. प्रमुख पाहुणे मा. ना. रामदासजी आठवले होते. इतर डझनभर आमदार-खासदार होते. वाईट वाटले ते मुंबईकरांच्या

कोणत्या मनोवृत्तीचे. ही मंडळी समाजाचा रबरस्टँपसारखा तर उपयोग करणार नाहीत ना अशी शंका आली. अस्मितादर्श मेळाव्याला जायचे रद्द केले. व काहीतरी मार्ग काढला पाहिजे म्हणून विचार करू लागलो. दुसऱ्या दिवशी प्रा. मच्छिंद्र सकटे आले. त्यांना सविस्तर वृत्तांत सांगितल्यावर ते म्हणाले, "तुम्ही शिकलेले, महान, खूप वाचन आहे, खूप चांगले बोलता, सद्या समाजात तुमचे नाव होऊ लागले आहे. महाराष्ट्रातील तमाम होलार समाजापुढे तुम्ही उठून दिसाल. लोक तुम्हाला डोक्यावर घेतील. हेच मुंबईकरांना नको आहे. म्हणून तुम्हाला जाणीव-पूर्वक काहीच कळू दिले नाही" पण म्हणून आपण दिघंचीला गेलो नाही तर ही मंडळी समाजाचा पाहिजे तसा वापर करील. नव्याने जुण्याच वळणाची हे चळवळ करू लागले तर समाज खड्डयात जाईल" असे मी म्हणालो. मग बरीच चर्चा झाल्यावर 'आता तरी होलार समाजाने जागे व्हावे' हा होलार समाजाच्या सद्यस्थितीवर मुंबईच्या संघाच्या कामकाजावर प्रकाश टाकणारा व होलार समाजाला सद्यस्थितीतून माणसात येण्यासाठी दिशा देणारा लेख दोघानी लिहिला. तो १३ मे १९८९ ला अधिवेशनाच्या दिवशीच प्रसिद्ध झाला. सुमारे पाचशे प्रती घेऊन मी प्रा. मच्छिंद्र सकटे व नंदू लोखंडे दिघंचीला गेलो मोठा मंडप घातला होता. बराच समाज गोळा झाला होता. स्टेजवर मुंबईकर पुढारी होऊन बसले होते काही वेळातच मुख्य कार्यक्रमाला सुरुवात होणार होती. आम्हाला पाहिल्यावर काहींचे चेहरे बघण्यासारखे झाले. प्रा. मच्छिंद्र सकटेंनी 'आता तरी होलार समाजाने जागे व्हावे' हा प्रा. रघुनाथ केंगार यांचा लेख वाचा आणि विचार करा असे मोठ्याने सांगत दै. ऐक्य च्या प्रती सर्वांना वाटल्या. मी लोकांना भेटू लागलो. माणसे पटापटा जवळ येऊ लागली. त्यांचे दुखने सांगू लागली. कार्यक्रमाचा रंग पालटला. आम्हाला रोखण्याचा प्रयत्न सुरू झाला, पण व्यर्थ. आमचे चालूच. शेवटी प्रा. मच्छिंद्र सकटे यांनी माईकवरून संयोजकांना विनंती केली की दैनिक ऐक्यमधील प्रा. रघुनाथ केंगार यांच्या 'आता तरी होलार समाजाने जागे व्हावे.' या लेखावर जाहीर चर्चा व्हावी. या घटनेला नकार मिळालाच पण स्टेजवर जातिवाचक व शाब्दीक चकमक झाल्यावर आम्ही जाहीर निषेधाच्या घोषणा देऊ लागलो. प्रचंड घोषणा झाल्या. मंडपातील माणसांना हे नवीन असल्यामुळे ती उठून पळू लागली. पन्नास–साठ माणसांचा माझ्याभोवती गराडा पडला पण माझी भूमिका लेखावर जाहीर चर्चा झाली पाहिजे ही होती. मुंबईकरांच्या भूमिका न पटणाऱ्या. माणसांनी माझा विचार उचलून धरला. गोंधळ पुन्हा वाढला. परिस्थिती अवाक्याबाहेर जाऊन दंगलीची शक्यता वाटू लागल्यावर पोलिसांना स्टेजवरील, ओरडून सांगू लागले, "हावलदारसाहेब गोंधळ करणाऱ्यांना पकडून झोडत न्या." मग मात्र पुन्हा गोंधळ वाढला. लगेच प्रा. मच्छिंद्र सकटे ओरडले, "आम्ही चोर, लुटारु नाही. लोकशाहीत मतस्वातंत्र्य आहे. जर

पोलिसांनी हात लावला तर गंभीर परिणाम होतील." मग मात्र पंचवीस-तीस पोलिसांचे आमच्याभोवती कडे निर्माण झाले. पोलिसांना समजावून सांगत होतो. तिकडे फुले, आंबेडकरांच्या घोषणा चालूच होत्या. संयोजनाचा संघाच्या भूमिकेचा जाहीर निषेध चालूच होता. परिस्थिती अवाक्याबाहेर चालली होती. माणसे मंडपाबाहेर पडली होती. एवढ्यात मंत्रीमहोदय आल्यासंबंधी काहीजण ओरडून सांगून माणसांना बसवत होते. पण अपयश येत होते. इतक्यात मंत्र्याची गाडी मंडपाजवळ आली. गोंधळ थोडा कमी झाला. मा. ना. रामदासजी आठवले स्टेजवर बसले. आम्ही उभेच होतो. अवतीभोवती पोलिसांचे कडे होतेच.

प्रास्ताविक सुरू झाल्यावर पुन्हा त्या कड्यातून मी पुढे सटकलो. 'मला थोडे बोलायचे आहे. संधी मिळावी.' आठवलेना म्हणालो. पुन्हा फुले, आंबेडकरांच्या घोषणा सुरू झाल्या. संयोजनाचा व संघाच्या भूमिकेचा जाहीर निषेध सुरू झाला. मला लगेच पकडले. लगेच मा. ना. रामदासजी आठवले उठले. त्यांनी हाताने सर्वांना शांत रहायला सांगितले. मला स्टेजवर बोलविले. पुन्हा शांतता पसरली. मा. ना. रामदास आठवले व माझी स्टेजवर पंधरा मिनिटे चर्चा झाली. उलट-सुलट. शेवटी ते म्हणाले, "हे पहा प्राध्यापक, मी तुमच्या मताशी सहमत आहे. इथे तुम्हाला बोलायला संधी देता येईल पण पुन्हा गोंधळ होईल. कधी नव्हे तो होलार समाज एकत्र आला आहे. त्यांच्यापुढे वाद नको. तुम्ही मुंबईला या. आपण सर्वजण बसू. योग्य मार्ग काढू." तन-मन-धन अर्पण करणारा, दलित चळवळीतील अनुभवी, जेष्ठ, हाडाचा कार्यकर्ता व मंत्री म्हणून मा. ना. रामदासजी आठवले यांनी सांगितल्यामुळे नाईलाज झाला. मी स्टेजवर बसलो. पण माझा मूक आक्रोश सुरू झाला.

आजही होलार समाजात भटकत आहे. बैठका घेऊन मुले शिकली पाहिजेत. चप्पल सांधणाऱ्याना व्यवसायासाठी व टपऱ्यासाठी कर्ज मिळाले पाहिजे. अंधश्रद्धा सोडल्या पाहिजेत. शासनाकडून समाजातील जमिनी व विकास योजना पदरात पाडून घेतल्या पाहिजेत. अन्याय, अत्याचार झाल्यावर त्याचा पाठपुरावा केला पाहिजे. यासाठी डोळस, रचनात्मक व संघर्षात्मक कार्य करणारी संघटना बांधण्याचा प्रयत्न सुरू आहे. परिस्थिती अतिशय विकट आहे. फुले-आंबेडकरांच्या विचारावरचा विश्वास व अंगिकृत कार्यावरची निष्ठा यांच्या आधारे निश्चित मार्ग निघेल असे वाटते.

**– रघुनाथ केंगार**
मु. पो. नरवण,
ता. माण, जि. सातारा

# कोरडा

– मारुती बनसोडे

मी आईवडीलांना एकुलता एक मुलगा. आईवडील दोघेही निरक्षर माझ्या वडीलांना दोन रुपायांच्या पुढे पैसे सुद्धा ओळखता येत नाहीत. इतके मोठे अज्ञान आमच्या घरात. मलतेच दारिद्रय पण त्यातूनही मला आईवडीलांनी, कुणाची गुरे वळवण्यास न लावता, एकुलता एक पोरगा म्हणून शाळेत घातलेले. दररोज राबल्याशिवाय पोटाचा प्रश्न सुटणार नाही, या धास्तीने रात्रंदिवस काबाड कष्ट करणारे माझे आईवडील कसे तरी घर चालवत होते. मोठ्या बहिणीचे लग्न झालेले. लहान बहीण आणि मी दोघे शिकणारे. पण मी चौथीत असतानाच मला फेपरे येत होते. तसे ते दोन वर्षांपासून येत होते. आणि यावर काहीच उपाय नाही असे लोक म्हणत होते. पण एकदा काय झाले की शनिवारी रात्री फेपरे आले आणि दुसऱ्या दिवशी दुपारीही आले. त्या दिवशी माझ्याविषयी एका जाणत्याकडे बघितलं. तो बघणारा माणूस माझ्या पुढे बसल्यावर, त्याला सर्व कांही ते मीच सांगत होतो म्हणे. कारण मला तर काहीच कळत नव्हते. पुढे मला जेजूरीच्या खंडोबाचं आहे असे सांगितल्यावर माझ्या आईवडीलांचाबी विश्वास बसला, कारण आमच्या घराण्याचं कुलदैवत

खंडोबाच आहे. आमच्या थोरल्या चुलत्याच्या घरी खंडोबाचा देव्हारा आहे. मग माझं पट बांधण्याचे ठरलं. आमचा आप्पा दोन बोकड घेण्यासाठी, देवाचं करण्यासाठी एका शेतकऱ्याच्यात नोकरीला राहिला. नळदुर्गचे वाघे बोलावून घेऊन, बकरे कापून सर्व लोकांना जेवण देऊन रात्रभर जागरण, गोंधळ केला आणि पहाटे नंगर तोडले. माझ्या कानात गुरुनी काय मंत्र म्हणून फुंकला मला माहीत नाही. पण माझ्याजवळ इतका मोठा आवाज करण्यात आला. दोन तीन हलग्या मोठ्याने वाजत होत्या. आवाजाचा एकदम गोंगाट झाला होता. मला आंघोळ घालून नवे कपडे घातले.अंगावर भंडारा उधळला 'येळकोट येळकोट घे'अशा घोषणा कानात घुमू लागल्या. माझ्या तोंडावर गवतार ( गोमूत्र ) शिंपडण्यात आले. माझ्याभोवती वारु लोकांनी कडं केलं आणि मला जोरजोराने हेलकावे देण्यात आले. हालगीचा आवाज वाढत होता. घुंगरांचा आवाज कानात घुमत होता. माझं मन एकाग्र झालं. पूर्णपणे बेहोश झालो आणि त्या आवाजाच्या चालीवर नाचण्यास सुरुवात केली. जसा मी नाचत होतो तसा सर्व लोकांना आनंद झाला. पण इतका खर्च करून पोराला देवाला सोडले जात आहे. पण हा सोहळा बघण्यासाठी आई जवळ थांबू शकली नाही. कारण तिला मासिक पाळी आली होती. देवाला विटाळ होतो. म्हणून लोकांनी माझ्या माईला जवळ येऊ दिलं नाही. मात्र एका फर्लांगाच्या अंतरावरून ती बघत होती. मी नाचत होतो शेवटी गुरुनी मला शांत केलं. मला अनेक गोष्टी सांगण्यात आल्या, माझ्या कानात कायतरी पुटपुटून गुरूने कान फुकलं पण मला काय समजलं नाही. नंतर त्यांनी मला मांगाच्या घरचं खाऊ नको, वारकाच्या घरचं खाऊ नको, चांभाराच्या घरचं खाऊ नको असं सांगितले. विटाळशी अंटानी स्वयंपाक केलेला खाऊ नको नाहीतर बोद होईल असे म्हणत होते. माझं पट बांधायचं झाल्यावर गुरुनी गुरुदक्षिणा घेऊन ते नळदुर्गला निघून गेले.

पुढे दर रविवारी मी उठायचो आणि आंघोळ करून सकाळी सकाळी देवपूजा करायचो आणि हातात कोटंबा घेऊन माझ्या गल्लीतील वारी मागायचो. त्यावेळी मी चौथी–पाचवीचा. लहान असल्यामुळे अंगावर हाफ कपडेच असायचे. प्रत्येकाच्या घरासमोर जाऊन 'खंडोबाची वारी' असं म्हणत होतो. मग त्या घरातून 'वारु' आला म्हणून मला भिक्षा देत आणि माझ्या पायाही कुणी पडत होते. पाया पडणाऱ्यांना 'आशीर्वाद' द्यायचो आणि भंडारा लावायचो. मी लहान असताना फार निष्ठापूर्वक पूजा, अर्चा करायचो. पण एकदा फार विचित्र घटना घडली. गावात महाभारत चालू होतं. म्हणजे दररोज त्याचं वाचन चालू होतं. आज त्याचा शेवटचा कार्यक्रम म्हणजे जागरणाचा होता. गावात दोन – तीन महिन्यापासून वीणाही वाजविण्याचं काम चालू होतं. वीणा वाजविणारी ही सारी गावातील माणसे होती. त्यात माझ्या

वर्गातले माझे दोस्त पण होते. मुळे राजा, आलुरे संजय, येलूरे गीरजाप्पा ही पोरं पण वीणा वाजवत होती. दुसऱ्याच्या हातून वीणा घेताना त्याच्या पाया पडून वीणा घेतला पाहिजे अशी पद्धत होती. मग माझ्या पाया पडण्याची पाळी येऊ नये म्हणून त्यांनी पुढील प्रकार केला असावा. मी देवाचा भक्त असल्यामुळे मला फार नाद होता ते ऐकत बसण्याचा. थंडीचा महिना होता तरी पण मी जागरणाच्या कार्यक्रमास गेलो. रात्रभर थंडीत काकडत बसून राहिलो. रात्र उलटून गेली होती. पहाटेची चाहूल लागलेली होती. आमच्या शाळेचा चपराशी कुंटाफळे हा तुळजापूरचा भोपी होता. तो पण तिथे होता. मी त्याच्याकडं गेलो आणि म्हणालो," कुंटाफळे मामा मला वीणा वाजवायची आहे, देतील मलाबी चानस ? असे म्हणताच तो म्हणाला, 'वाजव की,' त्याला काय माहीत की आता इथे जातपात मानणार म्हणून. .तो शाळेचा चपराशी असल्यामुळे 'सब भारतीय मेरे भाईबहन ह' याचा प्रभाव त्याच्यावर जास्त होता. पण देवळात सारे याच्या उलटे. थंडीचे दिवस होते पण माझी वीणा वाजवण्याची महत्त्वाकांक्षा वाढू लागली आणि ठरविले मी वाजवणारच म्हणून.

मी त्याला पुन्हा विचारले,'मी आता काय करू'. एखाद्या माणसाला विचारून बघ अस म्हणाली. पण मीच म्हटलं आपण महाराचे अहोत मग वल्या पडद्यानी वाजविल्यास इटाळ व्हायचा नाही, म्हणून मी त्याच चपराश्याला सांगितलो 'वल्या पडद्यांन येतो.' 'जा मग अंघोळ करून ये जा' असं तो म्हणाला.

दिवस अतिकडक थंडीचे होते पण मनाने उचल खाल्ली होती की वीणा वाजवायची म्हणून मग देवळाच्या शेजारी पाण्याची टाकी आहे. तिथे पहाटे तीन साडेतिनच्या सुमाराला मी नळावर जाऊत कपडयासह अंघोळ केली आणि मंदिराजवळ अंगातलं पाणी गाळत उभा राहिलो.

बाकीचे सर्व लोक चादरी पांघरलेले कुणी मफलर्स बांधलेली. हे सर्व लोक माझ्याकडे आश्चर्याने बघू लागले. म्हारत्यानं अशी का अंघोळ केली असेही ते म्हण लागले, इतक्यात मी एका प्रतिष्ठित माणसाला विचारलं, 'मला वीणा वाजवायची आहे.' त्यावेळी त्या माणसाने मला चटकन सांगितलं, ' तू कसा वीणा वाजवीणार. तुला देता येत नाही ' माझ्या मनात अनेक विचार आले. तो बोलल्याबरोबर तर तोंडात मारल्यासारखे वाटले. अपराध्यासारखा बघत उभा राहिलो. त्या सर्व भक्तांना एकबार बघितलं आणि मान खाली घालून मी सरळ घरचा रस्ता धरला.

पहाटेची वेळ, थंडीचे दिवस वाऱ्याचा सुंय सुंय आवाज येत होता. त्यात माझं अंग थंडगार पडलेलं. घरात गेलो. माय झोपलेली होती. माईला हाक मारलो माय उटली आणि दार उघडून दिव्याची वात वर करीत झोपेच्या डोळयानीच मला बघीतले आणि म्हणाली अंघोळ केलास काय ? आता काय सांगावे कळेना, कारण मी माईला फार भीत होतो. तशातच मी सांगितले " मी वीणा वाजवली

आहे." माईला आनंद वाटला, पण मी माईला खोटं सांगितलो कारण माईचे समाधान मला करायचं होतं.

माय म्हणाली, असंच देवाला भजावं म्हणजे आपल्या आयुष्याचं कल्याण होतय. देवाची नजर माझ्या बाळावर हाय असे म्हणाली. पण माझ्या मनात त्या परमेश्वराबद्दल नको ते अपशब्द येऊ लागले. वीणा वाजवणाऱ्या त्या लोकांचा राग आला. मला नको म्हणणाऱ्या त्या माणसाला तर कधी दगड घालू की असे वाटू लागले. पण हे सारे विचार करीत मी कपडे बदलून घरात पडून राहिलो. मला गावात जायला लाज वाटू लागली, कारण माझ्या वर्गातली मुलं राजा, संजय गिरजाप्पा हे सारे वीणा वाजवतात आणि मला मात्र देत नाहीत याचं एक भयानक वाईट वाटलं होतं. पण हा अपमान मी सहन केला. आणि मनात म्हणालो जाऊ द्या ना का वाजवायला देईनात आपण आपल्या देवाच्या ठिकाणी चांगले नाचू म्हणजे हे सारे आपोआप आपल्याकडे बघतील असे वाटत होते.

मग दर रविवारी ठरल्याप्रमाणे आपल्या देवाची पूजा करायची वारी (भिक्षा) मागायची. लहान पोरं घेऊन खंडोबाची काठी करायचं, नाचत रहायचं, सुट्टीच्या महिन्यात तर आमच्या गावातील आम्ही सर्व वाद्ये आमची मोठी काठी गावातून वाजतगाजत मिरवायची आणि गावाच्याकडेला एका झाडाजवळ ठेवायची. तिथे दर रविवारी आम्ही वारु नाचत जायचो. देवाची पूजा करून तास दीड तास वाचायचो आणि मग आपल्या घरी परत यायचो. दर रविवारी एका वारुच्या घरी जेवण्यास सांगायचे. मी भंडारा दिला आहे. म्हणून गळचात वसारी ( कोरडा ) घालून जात असे. जेवण करून तिथे नाचायचं आणि मग परत घरी जायचं. एकंदर मी लहान, सातवी पर्यंत शिकल्याला, गाववाले मोठे माणसे की जे दारु पिऊन नाचायचे पण मी तसाच नाचत होतो. मला लोक फार आश्चर्याने बघायचे. बालब्रह्मचारी म्हणून पाया पडायचे. धनगरच्या बाया तर मला लय चांगलं नाचतय म्हणायच्या. हे नाचण्यासाठी अंगावर मारुन घेण्यासाठी ५० रुपयांची वसारी ( कोरडा ) आणलेली होती. तो कोरडा मी घेऊन नाचायचो. लोक मला फार बघायचे. त्यात वर्गातले पोरं-पोरीवी असायच्या. इतर बाया माझ्या माईला म्हणायच्या, ' गुणा, तुझं पोरगं लय चांगलं नाचतय. ' मग माईला आनंद वाटायचा. असे नाचायचे. कार्यक्रम करून आल्यावर माय माझी दृष्ट काढायची. हे सर्व मी सातवीपर्यंत शिकत असताना घडले.

एकदा मी वर्गात बसलो होतो. शाळेच्या बाजूच्या रानात एकजण हालगीवर खंडोबाचा हात वाजवू लागला. मग मी लगेच नाचायला सुरूवात केली. हालगी वाजली रे वाजली की झालं आमच्या अंगातच यायचं, म्हणजे आम्ही नाचायला सुरुच करणार. शाळेचा चपराशी भोपी असल्यामुळे तो माझ्या कानात ' येळकोट येळकोट घे ' खंडेराया महाराज की जय असा म्हणायचा आणि माझे अंगात

यायचं शांत करायचा. मग वर्गातले सर्व पोरं, पोरी माझ्याकडे आश्चर्याने टक लावून बघायचे.

एकदा तर माझी परीक्षा होती. पण गावात आमच्या वारू मंडळीचा कार्यमम असल्यासल्यामुळे, मी परीक्षा बुडवून गावत नाचत फिरलो. पण नापास झालो नाही. कारण मास्तरांना माहीत होतं, की याच्या अंगात येतय. ह्याला देवाला सोडलय, जाऊ द्या म्हणायचे.

दरवर्षी नळदूर्गला खंडोबाच्या जत्रेला आम्ही खंडाळा धरणावरून चालत यायचो, जत्रा करायचं मग त्याच मार्गे गावाकडे जायचं. पण जत्रंत फार मजा यायची खंडोबाच्या मंदिजवळ पाऊतका आहे. त्या पाऊतक्याजवळ आमची काही राहायची. तिथे रात्रभर जागरण. माझे पट बांधणारे गुरु आणि मुरळी (देवाला सोडलेली बाई) यांचं रात्रभर नाचणं चालायचं. मध्ये आम्ही वारू ही नाचायचो. हालगी वाजविता वाजविता मध्येच बंद जर केले तर सारे वारु एकदम हाय हाच्या असे ओरडायचे आणि स्वतःच्या हातातला कोरडा आपल्या हातावर मारून घेत असे. एखाद्याच्या अंगात हाल भरवायचं. म्हणलं की त्याला उभं करायचं आणि त्याच्या जवळ हालगी वाजवायचं. त्याच्या कानाजवळ "येळकोट येळकोट घे" असं म्हणायचं. घुंगरांचा आवाज काढायचं आणि त्याला वळवळीच नाचण्यास भाग पाडायचं. मग ह्या सर्व वातावरणात तो दंग व्हायचा आणि एकाएकी अंग हालवायचा. मग हाय हाय्या असा आवाज काढून हात पुढे करायचा. मग समोरच्या माणसांनी त्याच्या हातावर जोरात कोरडा टाकायचा. जोपर्यंत तो मार खायचा, तोवर मारत राहायचं. त्याची हौस संपली. जरा जोरात फटका बसला की आपोआप नाचायचा.

यात्रेवरून गावी आल्यानंतर परत एकदा गावातून काटीची मिरवणूक काढायचं. अंग नाचून नाचून ताटलेलं असायचं. मग त्या दिवशी झोपण्यासही उशीर व्हायचा. दुसऱ्या दिवशी सकाळी माझी माय मला अंघोळ दुधा–तुपाने, गोमुत्राने घालायची. (म्हणजे ते पाण्यात थोडे टाकायची) अंघोळ करताना मला वाटायचे की हे दूध–तुप खायाला मिळाले तर बरे झाले असते. पण अंधश्रद्धेच्या अधीन झालेली माय मला खाण्यास देण्यापेक्षा माझ्या डोक्यावर ओतायची. मला कसं तरी वाटायचं. असे होत होत माझी सातवी झाली. आणि पुढील शिक्षणासाठी माईने आप्पांनी सांगितले की अणदूरला बोर्डिंग आहे. तिथे गेलो तर बर होईल. पण त्या शाळेत नंबर लागतो हे अवघड होते. तरी पण आमचा नंबर बोर्डिंग मध्ये लागला. मला अणदूरला शिकायला आलो. अणदूरचे जवाहर विद्यालय हे तर खंडोबाच्या मंदिरातच आहे. माईला बरे वाटलं कारण देवाजवळ मारुती आता राहणार म्हणून, पण ती म्हणायची आता बोर्डींगच्या भाकरी खाऊन तुझ बोद होणार ! आता अंगात यायचं बंद होईल की काय असे म्हणायची.

नेमके तसेच झाले कारण मी अणदूरला आलो आणि हळूहळू माझ्यात बदल घडू लागला कारणं सुशिक्षित आणि चांगल्या गावात मोठ्या शाळेत आल्यामुळे अनेक विद्यार्थी एकत्रित राहायचो. मग विचारात बदल झाला. हे नाचणे वगैरे झुट आहे. आपण अंधश्रद्धेत आता घुटमळून पडायचं नाही. असे वाटू लागले. शाळेतही अनेक नामवंत वक्ते यायचे आपले विचार सांगयाचे. ह्यामुळे वैज्ञानिक दृष्टी येऊ लागली. पण दररोज अंघोळ करून खंडोबाच्या पाया मी पडतच होतो. कपाळाला भंडारा लावून मी वर्गात जात होतो. फरक एवढा झाला की मी नाचायचे चक्क बंद केलो. पण आई म्हटल्याप्रमाणे गावात अफवा झालीच मारुतीचं अंगात यायचं बंद झालं आहे. बोर्डींगच्या बाया मुसऱ्या अंगानेच भाकरी करूत घालतात. त्यामुळे कधी इटाळशीही असल्या तरी तसच भाकरी करतात यामुळेच नाचायच बंद झाले.

पण माझ्यात बदल झाला होता. खरे तर ते नाचणे आता नकोच नको वाटत होते. मला त्याची लाज वाटत होती. कारण हे सारे ढोंग आहे. अंगात वगैरे काही नाही. एखादा चित्रपट बघत असताना एखादा भयानक प्रसंग किंवा अति आनंदाचा प्रसंग असेल तर आपण आपले मन त्या पडद्यावर एकाग्र करतो. एकचित्तानं बघतो. तशा पद्धतीचे वातावरण इथे तयार केलं जातय आणि हे नाचतात म्हणून मी ते ढोंग सोडून दिलो. पण मात्र दरवर्षी बोरगावहून जत्रेसाठी नळदूर्गला यायचो मी. अणदरुहून जायचो. त्या दिवशी मात्र दिवसभर जेवण नसे. ज्यावेळेस मी जाऊन देवाला नीवद–नारळ करून येत असे. त्याच वेळी माय जेवण करायची. पण मी देवाला जाताना कोरडा गळयात नको म्हणायचो कारण वर्गातली अनेक पोरे यात्रेला आलेली असतात. बघितल्यावर मला लाज वाटायची, पण माय काही झाले तरी ऐकायचीच नाही. मग मी ते गळयात घालून देवाला जाऊन येई. मी म्हणायचो आता सारे तुझे तूच करायचं. त्यावेळी माय म्हणायची, अरे, खंडोबांमुळे तरी वाचलास. शाळा शिकलास म्हणजे हा लय शहाणा झालास काय ? असे म्हणायची. मग मी निमूटपणे राहायचो. पण नंतर चार पाच वर्षांत हळूहळू मी सर्वच बदलून गेलो आहे. ११ वी १२ वीत शिकत असताना तर अण्दूरचे प्रा. व्याळे सर हे अंधश्रद्धेच्या विरोधात फार बोलायचे. त्यांनी आतापर्यंत स्वत:चे पैसे खर्च करून १२ पोतराजांचे केस कापले आहेत. त्यांच्या सहवासामुळे आणि वैचारिक प्रभावामुळे मी सध्या अंधश्रद्धेच्या विरोधात कार्य करू लागलो. मी स्वतःचे अंधश्रद्धेपासून मुक्त झालोच. त्यामुळे आज मला इतरांना सांगण्याचा नैतिक अधिकार आहे. चालू वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जन्मशताब्दीचं असल्यामुळे, मी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी १०१ व्याख्याने देण्याचा संकल्प केला आणि तो यशस्वीरित्या पूर्ण होत आहे.

मी प्रत्येक खेड्यात जाऊन लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगतो आहे. कारण मी स्वतःचे उदाहरण त्यांना सांगतो की, शिक्षणामुळे आपल्यात वैज्ञानिक दृष्टी निर्माण होते. मग आपण अंधश्रद्धेपासून मुक्त होतो. असे सांगताना मी म. फुलेंच्या विचारांचा उपयोग करतो.

" विद्ये विना मती गेली,
मति विना निती गेली,
निती विना गती गेली,
गति विना वित्त गेले,–वित्त विना शूद्र खचले
इतके अनर्थ एका अविद्येने केले. "

असे शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगून पुढे अंधश्रद्धेवर सांगताना म्हणतो की आपण जे देवाला नवस बोलून बकरे कापित आहात त्याबद्दल त्यात देव आपणास काहीचं देत नाही. देतोच तर कर्ज देतो. मग मी त्यांना सांगतो "नवसाने मुल झालं तर नवरा करण्याची काय गरज आहे ? असा सवाल मी करतो. त्यांना सांगताना मी म्हणतो की मी शाळा शिकलो म्हणून अंद्धश्रद्धेपासून मुक्त झालो नाही तर असेच पाच–पन्नास दुसरे वारु मी निर्माण केलो असतो. तेव्हा तुम्ही कृपया कुठल्या देवाला पोरं, पोरी सोडू नका असे सांगतो.

. मी दरवर्षी चीवरीच्या जत्रेला जातो, तिथे जाऊन मी सर्व पोतराजांचा आणि नाचणाऱ्या सर्व बाचांचा मी सर्वे करतो. त्यात मला पुढील पोतराज आढळतात.' कांबळे, जाधव, गायकवाड, बनसोडे, मस्के, लोखंडे, देडे, सोनकांबळे इ. असे पोतराज सापडतात हे सर्व पददलित, कष्टकरी,अज्ञानी याच वर्गातले आहेत. पण मला कुलकर्णी, जोशी, देशमुख देशपांडे, चिपळूणकर, राजवाडे अशा नावाचे दिसत नाहीत. याचं कारणही तसंच आहे. त्यांच्याकडे शिक्षण आहे. ते सुधारलेले आहेत. त्यामुळे त्यांच्याजवळ अंधश्रद्धेला थारा नाही. पण हा समाज अज्ञान आहे. म्हणून इकडे ही भयानक परिस्थिती आहे. हे चित्र बदलण्यासाठी, समाजातील अज्ञान दूर करण्यासाठी, युवकांनी पुढे आले पाहिजे. या ठिकाणच्या मूठभर शिकलेल्या माणसांनी, प्रस्थापितांनी खालच्या वर्गातील म्हणजे मागासलेल्या लोकांकडे शिक्षण येऊच दिले नाही. त्यांना अज्ञानात ठेवले आणि स्वतःची पोळी भाजून घेतली. त्यामुळे त्यांनी अंधश्रद्धा नष्ट करण्याऐवजी अंद्धश्रेद्धेला खतपाणी घातले आहे. त्यामुळे मी आता ठरवले आहे. माझ्या आईबापांनी, मला जो कोरडा दिला आहे त्याचा उपयोग मी आता समाजातील अज्ञानी माणसाची पिळवणूक करणाऱ्याच्या पाठीवर कोरडा ओढण्यासाठी करणार आहे. त्याचा उपयोग मी आता शोषकांच्या पाठीचे चामडे काढण्यासाठी करणार आहे. त्याचा उपयोग मी आता गरीब तरुणांच्या आयुष्याची चेष्टा करू पाहाणाऱ्या मुठभर प्रस्थापितांच्या पाठीवर कोरडे ओढण्यासाठीच करणार आहे.

मी यातून एकच पोटतिडकीने सांगतो आहे की अज्ञानी माणसाला, बेसावध तरुणाला जागे करणे हे महत्त्वाचे आहे. स्वत:चे अस्तित्व समजले पाहिजे. अन्यथा या शिक्षणाचा काही उपयोग नाही असे मला तरी वाटते. म्हणून मी अंधश्रद्धेच्या विरुद्ध मोहीम चालू केली आहे. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या परिषदा पुण्यामुंबईसारख्या ठिकाणी चांगल्या सभागृहात भरवून अंधश्रद्धा कमी होणार नाही. दूरदर्शनवरून प्रात्यक्षिके दाखवून कमी होणार नाही. कारण ८० टक्के लोक खेडयात राहतात. त्यांच्याजवळ अठराविश्व दारिद्र्य आहे. त्यांना पोटाचा प्रश्न पडला आहे. ते लोक कुठला टी. व्ही. पाहणार ?

तेव्हा ही जबाबदारी पार पाडायची असेल तर खेडयात गेले पाहिजे त्या ठिकाणी अंधश्रद्धाविरोधी विविध उपक्रम साजरे केले पाहिजेत. म्हणूनच मी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी वर्षांत स्वत:पासून अंधश्रद्धा-निर्मूलनासाठी तयार झालो आहे. ग्रामीण भागात जाऊन मी सर्व ग्रामीण जनतेला अंधश्रद्धा किती वाईट आहे पटवून देत आहे. हा माझा कार्यक्रम सतत चालूच राहील.

**– मारुती बनसोडे**
मु. पो. बोरगाव (तुपाचे)
ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद ४१३ ६०२

●

# मागण्या अशा मांडतो

**– प्रकाश बन्सोड**

उमरेड तालुक्यातील मकरधोकडा गावात दि. १८–१०–९० ला झालेल्या प्रकरणाचा तपास करण्याकरिता भारतीय दलित पँथरचे अध्यक्ष प्रकाश बन्सोड, (नागपूर) मनोहर राऊत, रवी शेंडे, कुंडलिक मून, भाऊराव शेंडे, सदाशिवरावजी आरोटे व सुर्यकूल नाट्य निकेतनचे अध्यक्ष अशोक जांभुळकर यांनी दि. २१-१०-९० रोजी भेट दिली आणि गावातील लोकांशी चर्चा करून परिस्थितीचा तपास केला.

मकरधोकडा गावात दि. १८–१०–९० रोजी सायंकाळी ७ ते ७–३० च्या दरम्यान शिवसेनेच्या जातीय हल्ल्यात मारल्या गेलेल्या रमेश देवगुणे व जखमी झालेले रामलाल देवगुणे, दीपक देवगुणे प्रकरणात प्रकाश वासणिक, नारायण वासणिक (वय ५५ वर्षे) जगदिश गजभिये आणि देवगुणे बंधुना गुंड टोळीचा हात असल्याचे आरोप स्थानिक वर्तमानपत्रातून व पत्रपरिषदेतून शिवसेनेचे प्रा. ज्ञानेश वाकूडकर व उमेश झाडगांवकर यांनी केले आहेत. शिवसेना नेतेद्वयांचा हा आरोप वजा खुलासा निव्वळ जातीय अहंकारी व दलित–बौद्ध जनतेच्या स्वाभिमानावर क्रूर हल्ला आहे.

१) सेना नेतेद्वय शिवसेनेच्या जातीय हल्ला व खुनाच्या गुन्ह्याला समाज सुधारणेचे आवरण चढविण्याचे हेकेखोर प्रयत्न करताना सांगतात की, १९८७ ला

मकरधोकडा येथील जवाहर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती ढोके यांना खोलीत बंद करून त्यांचेवर अतिप्रसंग करण्याचे प्रयत्न केले. नेतेद्वय त्या प्रकरणाला हेतुपुरस्सर चुकीचा रंग देत आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की, शाळेत अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांकडून जबरीने शिक्षण शुल्क घेतले जात होते. गावकऱ्यांच्या मिळालेल्या तक्रारीनुसार प्रकाश वासनिक यांच्या नेतृत्वात नागपूरचे मागासवर्गीय विद्यार्थी संघटना व गावातील कार्यकर्त्यांचे एक शिष्टमंडळ, जबरन फीस वसुली प्रश्नासंबंधी चर्चा करायला गेले होते ( वस्तुतः दलित, आदीवासींना कोणतेही शैक्षणिक शुल्क भरावे लागत नसल्याचे महाराष्ट्र शासनाचे स्पष्ट आदेश आहेत.) पण श्रीमती ढोके मॅडम अशाप्रकारे खाजगी कमाई करीत होत्या. मुख्याध्यापिका ढोके मॅडम आणि कंपूने शिष्टमंडळाशी चर्चा न करता मग्रुरीची वागणूक दिली होती. चर्चा न झाल्यामुळे उच्च अधिकाऱ्यांना झालेल्या प्रकरणाची तक्रार करण्याचे सांगून शिष्टमंडळ परतले होते. श्रीमती ढोके मॅडम यामुळे घावरल्या व पोलीस स्टेशन उमरेड मकरधाकडा चौकीत शिष्टमंडळाविरुद्ध त्यांनी खोटी तक्रार केली.

२) मे १९८७ मध्ये मकरधोकडा गावातील श्री. नामदेवराव झाडे यांच्या मुलीच्या लग्नाची घटना नसून ती घडलेली घटना श्री. पजई यांच्याकडील आहे, ती अशी, अकोला येथील नवऱ्या मुलाची वरात गावांत आली होती. वरातीतील ५०–६० टारगट मुलांची टोळी सामील होती. हे टोळके दारू पिवून दलित वस्तीतील तरुण मुलींची छेड काढीत फिरत होती व दलित वस्तीतीतील कोणत्याही घरापुढे जावून त्यांना उद्धट भाषेत (शिवराळ) दारू घेण्यासाठी पिण्यासाठी रिकामे ग्लास व पाणी मागीत होते. सुरुवातीस काही लोकांनी गावचे पाहुणे म्हणून सहकार्य केले पण हा खेळ थांबण्यापेक्षा जेव्हा खूप वाढत गेलां व ह्या खेळाने अश्लीलतेचा उच्चांक गाठला तेव्हा दलित वस्तीतील म्हाताऱ्या स्त्री-पुरुषांनी त्या टोळक्यांला समजविण्याचा मनोमन प्रयत्न केला व त्यांच्या या चाळचाया विरोध केला तेव्हा त्याटोळक्याने समजावणाऱ्या म्हाताऱ्या मंडळींना हात, पाय, तोंड फुटेपर्यंत मारहाण केली होती, तेव्हाच पूर्ण दलितांना त्याचा प्रतिकार केला व या प्रकरणाची लेखी तक्रार मकरधोकडा चौकीत केली होती हे सत्य, शिवबांचे मारेकरी सैनिक ज्ञानेश व उमेश लपवीत आहेत; व दलितांना लुटारू व गुंड ठरविण्यासाठी खोटे बोलत आहेत, स्वाभिमानाचे व अस्मितेचे रक्षण करणे हा भारतीय घटनेने दिलेला जन्मसिद्ध अधिकार दलितांना नाही काय ?

३) श्रीमती कुसुम अंबादास डोंगरे नावाच्या मातंग स्त्रीची विवस्त्र करून गावभर धिंड काढल्याचा आरोप हा शिवसेनेच्या कार्यकर्त्यांच्या घृणीत कृत्याला लपविण्याचा प्रयत्न मात्र आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, कुसुम डोंगरे हिच्या पतीच्या लिखीत तक्रारीनुसार शिवसेनेचे कार्यकर्ते श्री. नसीम शेख यांचे नातेवाईक श्री. युसूफ शेख हे शिवसेनेच्या छत्रछायेखाली कुसुम डोंगरे हिच्याशी अनैतिक संबंध

ठेऊन होता. तक्रारीनुसार डॉ. आंबेडकर सांस्कृतिक युवा मंचाचे प्रकाश वासनिक व कार्यकर्ते अंबादास डोंगरे ( कुसुम डोंगरेचा पती ) याच्या सोबत त्याचे राहते घरी गेले. तेव्हा युसूफ शेख हा कुसुम डोंगरे हिचेशी अनैतिक चाळे करीतच होता. तेव्हा प्रकाश वासणिक यांनी गावांतील मान्यवर हिंदुंना बोलावले आणि त्यांच्या सांगण्यानुसार युसूफ शेख यास अंडरवेअरवर संपूर्ण गावभर फिरविले. कुसुम डोंगरे हिला नव्हे. त्यावेळेस ह्या कार्यात आताचे शिवसेनेचे कार्यकर्ते सामील झाले होते. त्यावेळेस प्रकाशची व दलित कार्यकर्त्यांची गावभर स्तुती करण्यात आलेली होती. पण आता शिवसेनेच्या चिथावणीने गावातील सभ्य हिंदुमंडळी काहीच बोलत नाही. मात्र ज्ञानेश व उमेश शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना पाठिशी घालून प्रकरणाला सांप्रदायिक रंग देत आहेत.

४) मकरधोकडा येथील सरपंच श्री. बबन बारसागडे (वामनराव बारसागडे नाही) यांना मारहाण किंवा विणा बेलखुडे ह्या युवतीला घरातून ओढून केलेली मारहाण तसेच श्री. नथ्थू वामन चौधरी ह्यांच्या पत्नीशी गैरवर्तणूक व श्री. विठ्ठल वाकडे यांना फासावर लटकविण्याचा प्रयत्न हे सर्व आरोप बिनबुडाचे व तथ्यहीन आहेत हे सर्व आरोप दलित कार्यकर्त्यांचे चारित्र्यहनन करण्याचे व बेशरमपणाचे चाळे आहेत या सर्व आरोपाबाबत पोलिसात कोणत्याही प्रकारची तक्रार वा केस नोंदविण्यात आलेली नाही.

रमेश देवगुणे याचा खून व बौद्ध वस्तीवर जातीय हल्ला करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा व तथागत बुद्धांचा पुतळा फोडण्याच्या गुन्ह्यातून स्वतःला (शिवसेनेला) वाचविण्यासाठी केलेले आरोप आहेत. या हल्ल्याच्या मागे पद्धतशीर व ठराविक स्वरूपाचे षडयंत्र आहे ते जाणून घेण्यासाठी त्याची पार्श्वभूमी व गतइतिहास समजणे आवश्यक असल्यामुळे ते जाणून घेणे आवश्यक आहे.

## दलित युवक संघटनेची स्थापना

मकरधोकडा हे गांव उमरेड तालुक्यातील असून गाव जवळपास ९७५ घरांचे आहे. यामधून हिंदू समाजाची ९०० घरे तर ७५ घरे बौद्ध, मातंग,चांभार समाजाची आहेत. गावची लोकसंख्या पाच हजार इतकी आहे पैकी ४५०० लोकसंख्या हिंदू आणि मराठी समाजाची असून बौद्ध, मातंग, चांभार समाजाची लोकसंख्या ५०० इतकी आहे. दलित समाजाच्या ५०० लोकांच्या जनसंख्येत १० पदवीधर, १८ बारावीपर्यंत शिकणारे तर मॅट्रीक पर्यंत शिक्षण घेतलेली २५ मुले–मुली आहेत तर हिंदू समाजाच्या ४५०० लोकसंख्येत ५ पदवीधर, १५ बारावी पर्यंत शिक्षण घेतलेले तर मॅट्रीक मुले–मुली २० आहेत दलित समाजातील सर्व लोक हातमजुरी करणारे आहेत पैकी फक्त ४–५ लोकांची स्वतःची ४–५ एकर शेती आहे. त्यामुळे इथला बहुतांश दलित ससाज सवर्ण मंडळीच्या शेतातील [illegible] म्हणून राबत असतो आणि लघुसिंचन प्रकल्प आहे.

१९८६ पासून विद्यार्थ्यांच्या व युवकांच्या विविध प्रश्नांवर काम करण्यासाठी विदर्भ प्रदेश मागासवर्गीय विद्यार्थी संघटनेशी संपर्क करून कार्याला सुरुवात केली होती. याच माध्यमातून विद्यार्थी आणि युवकांचा संपर्क नागपूर, उमरेड येथील नाट्य साहित्य आणि सामाजिक संघटना यांच्याशी येत गेला आणि विविध क्षेत्रात कार्य करण्याची सुरुवात झाली.

दलित रंगभूमीच्या माध्यमातून उमरेड येथे १९८७ ला एक नाट्य प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले होते. त्यात आजूबाजूच्या खेड्यातील सर्व समाजातील युवक–युवतींना मोठ्या प्रमाणात सामील करण्यात आले होते. तद्नंतर १९८८ ला उमरेड ते सेडेश्वर अशी एक प्रबोधनात्मक बैलबंडी जत्राही काढण्यात आली होती. ही बैलबंडी जत्रा जवळपास १० गावांमधून फिरत गेली होती त्यामुळे उमरेड तालुक्यातील बहुतांश खेड्यापाड्यांतून सांस्कृतिक परिवर्तनाची प्रक्रिया सुरू झाली आहे ही एक जमेची बाजू आहे. १९८९ च्या डिसेंबर महिन्यात मकरधोकडा येथे एक ' व्यक्तिमत्व विकास प्रशिक्षण शिबिर ' घेण्यात आले होते त्या शिबिराला गावातील सर्व समाजातील लोकांनी अन्नधान्यांपासून इतर आर्थिक मदत केली होती. या शिबिरात गावातील सर्व समाजातील विद्यार्थी–विद्यार्थिनी आणि सामान्य जनतेचा सहभाग होता. हे सर्व कार्य करत करतच ऑगस्ट १९८९ ला गावातील सर्व विद्यार्थी युवकांनी डॉ. आंबेडकर सांस्कृतिक युवा मंची स्थापना केली आणि मंचच्या माध्यमाने अंधश्रद्धा शिबिर, शारीरिक व बौद्धिक शिबिराचे आयोजन करून त्यात डॉ. भाऊ लोखंडे, बॅ. बगाले, डॉ. क्रिष्णा कांबळे, अॅड. अनिल वैद्य, डॉ. आटे, विमलसूर्य चिमनकर, ज्योती कोटमकर, पिल्लेवान गुरुजी, अशोक जांभुळकर, डॉ. थूलकर आणि ए. आर. मेश्राम इ. मान्यवरांचे मार्गदर्शन केले. विद्यार्थी नवयुवकांमध्ये वाईट व्यसनांचे बीजारोपन होऊ नये, समाजात स्वच्छता आणि सूव्यवस्था नांदावी या करता मंचाने अवैध धंदे बंद करण्याचा प्रयत्न करून शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगून वाईट मार्गाला लागलेल्या व्यक्तींना शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शिवाजी महाराज, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि लहूजी महारांच्या कार्यांची ओळख करून देऊन गावात समतेचे आणि बंधुत्वाच्या वातावरणाच्या निर्मितीला सुरुवात केली. परिसंवाद, परिचर्चा व प्रबोधनात्मक चर्चा घडवून विचारमंथनाची नवी प्रक्रिया सुरू केली होती. भ्रष्ट व वाईट वर्तणुकीच्या तथाकथित लिडरांचे खरे रूप जनतेसमोर उघडे करून आताचा मंडल आयोग व आरक्षण समर्थनासंबंधी लोकांना खरी माहिती देऊन जनमत तयार करायला सुरुवात केली होती. मंचाने सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्याची धुरा समोर नेण्याचे जिद्दीचे प्रयत्न सुरू केले. यातूनच आजूबा... खेड्यांतील व मकरधोकडा गावातील लोकांत डॉ. आंबेडकर सांस्कृतिक ... मंच

विषयी विश्वासहार्यता वाढत गेली आणि विविध गाऱ्हाणी घेऊन लोक या मंचाकडे येत गेली आणि मंचाने झालेल्या प्रत्येक अत्याचारत्रस्त व्यक्तीची गाऱ्हाणी सोडविण्याचा प्रयत्न केला नव्हे तर गाऱ्हाणी सोडवून समाजात समता आणि शांतता नांदेल याचा प्रयत्न सुरू केला.

परंतु उपरोक्त कार्यामधून सुरू केलेला परिवर्तनाचा हा प्रवाह तथाकथित गावगुंडाना आणि प्रस्थापित नेत्यांना कदापि सहन होणार नव्हता. या कार्यात हितसंबंधितांकडून अडथळेच–अडथळ टाकण्यात येऊ लागले. येणाऱ्या प्रत्येक अडथळ्यांना सामोपचाराने सोडवून पुढे जात असतानाच प्रतिगामी जातीयवादी प्रवृत्तींची डोकी उलट गतीने काम करू लागली. आणि त्यातूनच मकरधोकडा या गावात शिवसेनेचा जन्म झाला. गावात नांदत असलेल्या, समतेच्या बंधुतेच्या आणि शांततेच्या वातावरणात विरजण पडले. दिनांक १९–९–९० रोजी मकरधोकडा येथे प्रतिबंधक आदेश लागू असताना सकाळी १०.३० वाजता ठाणे येथील शिवसेना अध्यक्ष आणि उमरेड तहसील प्रमुख रमेश देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत सेनेच्या शाखेचे ध्वजारोहण करून जाहीर सभा घेण्यात आली. वक्त्यांनी दलित व अल्पसंख्यांक समाजाविरुद्ध सांप्रदायिक आग ओकली. लगेच जवळपास ५०० शिवसैनिकांचा जमाव बौद्धवस्तीवर हमला घेऊन आला. यात नागपूर व उमरखेड शिवसैनिक सामील होते ते बौद्ध महिलांना अपशब्दांनी बोलू लागले. डॉ. आंबेडकर व तथागत बुद्धांचा पुतळा फोडण्याच्या धमक्या देऊ लागले. दलित जनतेने याचा प्रतिकार केला व शिवसेनेचा डाव हाणून पाडला. हे सर्व मुंबई कायदा ३७ (१), (३) च्या अंतर्गत झाले. ( प्रतिबंधक आदेश दि. १८–९–९० ते २–१०–९० पर्यंत लागू होता .) उपरोक्त घटनेची लिखीत तक्रार एस. डी. ओ., तहसीलदार आणि पी. एस. ओ. उमरेडला दिनांक २०–९–९० ला करण्यात आली आहे. या सभेमुळे गावात निर्माण झालेल्या संवेदनशील परिस्थितीची पूर्ण माहिती पोलीस व नागरी प्रशासनाच्या उच्च अधिकाऱ्यांना लेखी स्वरूपात देण्यात आली होती व गावात शांतता आणि भयग्रस्त वातावरण दूर करण्यासाठी संरक्षणाची मागणी करण्यात आली होती.

दि. २१ पासून पोलीस बंदोबस्त गावात होता. फसलेला डाव शिवसेना नेत्यांच्या मनात सलतच होता. पुढे विजयादशमी होती. गावातील शिवसैनिक भाऊराव शिंदे (भराडी). भाकरू लडी, पुंडलिक राऊत, गुलाब माकडे, अशोक अहेर, पुरुषोत्तम बोंबडे आदींनी दलितांना धमकावणे सुरूच ठेवले.'विजयादशमीच्या दिवशी आम्ही बाबासाहेबांचा कागदी पुतळा जाळू तुमच्याने जे होते ते करून घ्या' आदी धमक्या व २९-९-९० ला शिवसेनेची जाहीर सभा घेण्यात आली. सभेत [illegible]ांना त्यांची जागा दाखऊन देण्याचे जाहीर आव्हान सभावक्त्यांनी केले. हे प्रति[illegible] आदेश असताना ( लागू ) झाले. यांनतर दि. ५-१०-९० ला सरपंच

श्री. बबन वारसागडे यांच्या अध्यक्षतेखाली शांतता समिती स्थापन करण्यात आली. आणि दि. ६-१०-९० ला पोलीस बंदोबस्त उठविण्यात आला. दलित निश्चित झाले मात्र जातीयवाद्यांना सुवर्ण संधी प्राप्त झाली. पुन्हा दि. ८-१०-९० ला आ. मनोहर जोशी, शिवसेना नेते यांनी मकरधोकड्याला भेट देऊन सांप्रदायिक वक्तव्य केले. यातून निर्माण होणाऱ्या धोक्याची पूर्वसूचना पोलीस व एस. डी. ओ. ना देण्यात आली येथून दि. १८-१०–९० च्या प्रकरणाच्या षडयंत्राची पूर्वतयारी सुरू झाली. शांतता समितीच्या अस्तित्वाला न मानता सेनेकडून दलितांना खुनाच्या व पाहून घेण्याच्या धमक्या देण्यात येतच होत्या. दि. १८-९-९० व २६-९-९०ला रामलाल देवगुणे यांस भरत बजारे यांच्या घरी बोलावून दलितांना साथ सोडून शिवसेनेत सामील होण्यासाठी धमकावणे सुरू केले. मात्र रामलाल देवगुणेने शिवसेनेच्या धमकीला जुमानले नाही. याची पुनरावृत्ती १४-१०-९० ला विठ्ठल वाकडे, बंडू वाकडे व भाऊराव शिंदे यांनी देवगुणे बंधूना पिक कापू न देण्याची तसेच पाहून घेण्याची धमकी दिली. चारच दिवसांनी १८-१०-९० ची ती काळरात्र आली. याच दिवशी मातंग समाजाच्या अभिमन्यू भावे याच्यावर प्रभू शिंदेच्या १५ वर्षीय मुलीचा विनयभंग केल्याचा आरोप ठेऊन सकाळी ११ वाजता त्याला त्याच्या शेतात गाठून हल्ला करण्यात आला. शेतात त्याच्यासोबत त्याचे दोन मोठे भाऊ, वहिनी, आई व कुमार माटे होते. त्यामुळे त्यांनी हा प्राणघातक हल्ला परतवला मात्र या हल्ल्यात अभिमन्यूच्या हाताचे बोट कापले गेले याचा रिपोर्ट देण्यास तो पो. स्टे. उमरेड येथे गेला आणि पोलिसांनी त्यालाच अटक केली या हल्ल्यासाठी २ आटोत आलेले १२ सशस्त्र हल्लेखोर नंतर मकरधोकडा गावाकडे परतले व गावात रमेशच्या खूनात सामील असलेल्या लोकांना सोबत घेऊन दलितवस्तीवर हल्ला करण्याचा कट शिजला.

कट करणाऱ्यांत अभिमन्युचे हल्लेखोर आणि रमेश देवगुणेचे मारेकरी पण सामील होते. कटाचा एक भाग म्हणजे ११–३० वाजता धाकट नागपूरे हातात बंदूक व सोबत पंचम नागपुरे, पर्बत शिंदेला घेऊन देवगुणेबंधूंच्या घरावर चालून आला. रमेश देवगुणेच्या आईच्या (सुभद्राबाई) छातीवर बंदूक रोखून धमकाविण्यात आले, 'साली चमारीन एकही घरकी है पर बहोत चढ गई, तेरे पोट्टे भी बहोत चढ गये, आज सालोंकी लाश गीराते है, साले ढेडों के साथ रहते हो क्या ?' देवगुणेबंधू शेतात काम करायला निघून गेले होते तोपर्यंत खुनांचे षडयंत्र पूर्णपणे काढून हल्लेखोरांची शस्त्रसज्जता पूर्ण झाली होती. सायंकाळी ६–३० वाजता सर्व हल्लेखोर मुख्य चौक, बसस्टॉप चौक व गावातील मोक्याच्या ठिकाणी गटवार तयारीत होते. ठीक ७ वाजता देवगुणेबंधू (रमेश, रामलाल, दीपक) शेतातून सोयाबीन कापून परतत होते. तिघेही बसस्टॉप चौकात येताच गुलाब माकडे,

पुंडलिक राऊत, पर्वत शिंदे, धाकट नागपुरे, नसीम शेख, भाऊराव शिंदे व अशोक लोहार यांच्या नेतृत्वात फरशे, लाठ्याकाठ्यांनिशी त्यांच्यावर ' खतम करो सालों को, मार डालो' म्हणत प्राणघातक हल्ला करू लागला. त्यात रमेश गंभीर जखमी झाला व रामलाल आणि दिपकही जखमी झालेत. तिघांना मकरधोकडा प्रा. आ. केंद्रात आणण्यात आले. तेथे डॉक्टर उपस्थित नव्हते, नर्स श्रीमती देशपांडे यांनी रमेश,रामलालला इंजेक्शन व पट्टी बांधली व त्यांना उमरेडला जाण्यास सांगितले. मकरधोकडा पोलीस चौकीत एकच पो. हेडकॉंस्टेबल श्री. काळे उपस्थित होते. त्यांनीही उमरेडला जा असे सांगितले. नंतर रमेश व रामलाल ऑटोंनी उमरेड पो. स्टेशनला आलेत. तेथे पी. एस. ओ. श्री. ठाकरे यांनी त्यांचे बयान घेतले. बयानात रमेश व रामलालनी सर्व हकीकत बयान केली व अजूनही न टळलेल्या भयंकर घटनेची पूर्वसूचना दिली. शिवसेना दलितवस्तीवर हल्ला करणार असल्याने पोलीस कुमक मकरधोकड्याला पाठविण्यास विनवणी केली पण त्यावेळपर्यंत कुठलीच पोलिसांनी हालचाल केली नाही मात्र पो.स्टेशनची फोनची घंटा वारंवार वाजत होती व पी. एस. ओ. श्री. ठाकरे सर्व पाहून घेऊ, फिक्र करू नका असे फोनवर बोलत होते. रमेशला औषधोपचार तातडीने देण्यापेक्षा सर्व संथगतीने चालू होते. उमरेडच्या हॉस्पिटलमध्ये देवगुणे बंधूला दाखल करून घेण्यास डॉक्टरांनी नकार दिला व केस मेमे हॉस्पिटल नागपूर येथे रेफर केली. नागपूरला जाण्यासाठी मात्र डॉक्टर अथवा पोलिसांकडून वाहन देण्यास नकार देण्यात आला व त्यांना स्वतःच नागपूरला जाण्यासाठी वाहनव्यवस्था करावी लागली. नागपूरला १०-४५ वाजता पोहचले. उपचार करून १२-३० वाजता वार्डात दाखल केले व रमेशचे दि. १९-१०-९० रोजी सकाळी १०-३० वाजता हॉस्पिटलमध्ये निधन झाले. एवढी या सर्व प्रकरणात का दिरंगाई करण्यात आली. पी. एस. ओ. श्री. ठाकरे व उमरेडचे डॉक्टरांनी निभावलेली भूमिका संशयास्पद आहे. रमेशला तातडीने वैद्यकीय मदत दिली गेली असती तर कदाचित एका दलित युवकांचा प्राण वाचला असता.

इकडे गावातील सर्व दलित युवक देवगुणे बंधुसोबत उमरेड, नागपूर असे फिरत राहिले. दरम्यान गावातील शिवसेनेच्या गुंडाना रान मोकळे मिळाले व त्यांनी दलित वस्तीवर १८-१०-९० ला रात्री ९ व १-३० वाजता व १९-१०-९० च्या पहाटे ४-०० वाजता हल्ला करून, दलितांचे घरांवर तुफान दगडफेक, डॉ. आंबेडकर व तथागत बुद्धांच्या पुतळ्याची नासधूस, पान दुकान, डॉ. आटेंच्या दवाखान्याची तोडफोड व सायकल शॉप, किरणा दुकान आदीवर कब्जा केला. पोलीस कुमक गावात आली आणि दलित वस्तीचे नुकसान दगडफेक, पुतळ्याची तोडफोड करण्यावरच निभावले व भयंकर अनर्थ टळला. दि. १९-१०-९० ला सकाळी ११ वाजता रमेशच्या मारेकऱ्यांपैकी पोलिसांनी गुलाब माकडे, पुंडलिक

राऊत व अशोक अहेरला अटक केली. पण शिवसेनेच्या मंडळीनी पोलिसांना शसस्त्र घेराव करून पोलीस व्हॅनची जाळपोळ करून नासधूस केली.

यावेळी ३ पोलिसांना जखमी करून गुन्हेगारांना सोडवून घेऊन गेलेत. रमेशच्या मारेकऱ्यांची व दलित वस्तीवरील जातीय हल्लेखोरांची अटक तब्बल तीन दिवसांनी २१–१०–९० ला करण्यात आली. या घटनेला कमकुवत करून घेण्यासाठी व शिवसेनेला वाचवण्यासाठी शिवसेनेचे जिल्हा व तालुक्यांचे नेते व आमदार मंडळी, नागरी प्रशासन, पोलीस प्रशासन व मुख्यतः दलितांवर दहशत कायम ठेवण्याकरीता अनैतिक दबावतंत्र वापरीत आहेत.

**आरोप :** पोलीस प्रशासन व नागरी प्रशासन यांना मकरधोकडा गावातील गंभीर परिस्थिती माहीत असतानासुद्धा ( दि. १८–९–९० ते ६–१०–९० पर्यंत पोलीस बंदोबस्त होता. )

१) दि. १९–१०–९० ते २९–९–९०ला शिवसेनेला गावात सभा का घेऊ देण्यात आली. २) तब्बल ११ दिवस पोलीस बंदोबस्त असणाऱ्या संवेदनशिल गावातील बंदोबस्त शांतता समितीवर लादून पी.एस.ओ.ठाकरे निश्चित होण्यामागे शिवसेनेला मदत करण्याचाच हेतू स्पष्ट होतो. ३) गावात खदखदत असलेल्या परिस्थितीची जाणीव वारंवार नागपूर जिल्हाधिकारी, एस. डी. ओ., डी. वाय. एस. पी., डी. एस. पी., तहसीलदार यांना माहीत असतानासुद्धा तक्रारीमध्ये सांगितल्या संभावित गुन्हेगारांवर प्रतिबंधीत कार्यवाही का करण्यात आली नाही.

मकरधोकडयाचे प्रकरण पोलीस व नागरी प्रशासनाच्या निष्क्रीयतेमुळे शिवसेनेनेच घडविलेले आहे.

**मागण्या :** १) मकरधोकडा प्रकराची न्यायालयीन चौकशी करण्यात यावी. २) मृतकाचे नातेवाईकाला १ लाख रुपये नुकसानभरपाई व जखमींना ५० हजार नुकसानभरपाई देण्यात यावी. ३) शिवसेनेचे आमदार मनोहर जोशी, प्रा. ज्ञानेश वाकूडकर, रमेश देशमुख, उमेश झाडगांवकर यांना मिसाखाली अटक करावी. ४) शिवसेनेवर बंदी घालण्यात यावी. ५) विदर्भ प्रवेशावर शिवसेनेच्या बाहेरील नेत्यांना बंदी घालण्यांत यावी.६)मृताकांचे पत्नीला सरकारी नोकरी देण्यात यावी. ७)गावांतील दलितांना(भूमीहिन)सिलींग व पडीत जमिनीचे योग्य वाटप तात्काळ करण्यात यावे. ८) हल्ल्यात मोडतोड झालेल्यांचे ताबडतोब पुनर्वसन करण्यात यावे. ९) डॉ. बाबासाहेब आंबेडकरच तथागत बुद्धांच्या पुतळा पुनःउभारणी करण्यासाठी गावांतील सर्व हल्लेखोरे गुन्हेगारांवर सामूहिक आर्थिक दंड लावावा. १०)दलितांना आत्मसंरक्षणासाठी शस्त्रे बाळगण्यासाठी परवाणे देण्यांत यावेत. ११) गावांतील दलितांवर घातलेला सामुहिक बहिष्कार घालणाऱ्याविरुद्ध अस्पृश्यता निवारण कायद्याखाली फौजदारीं गुन्हे दाखल करून संबंधितांना अटक करण्यात यावी.

**– प्रकाश बन्सोड**

●



❝ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मरणोत्तर
काळात दलित चळवळ जिद्दीनं वाटचाल
करत आहे. ही चळवळ केवळ भीमनगरपुरती
बंदिस्त न होता, ती तमाम शोषितांची युद्धयात्रा
होऊ पाहात आहे. भवितव्याची कसलीच हमी
नसतानाही समाजासाठी अहोरात्र राबणाऱ्या
कार्यकर्त्यांची आत्मनिवेदनं या संपादनात
संग्रहीत केली आहेत. हे संपादन म्हणजे एका
उग्र संघर्षाची नोंदवहीच. शरणकुमार लिंबाळे
यांनी तळातल्या कार्यकर्त्यांचा आवाज
या ग्रंथात जाणीवपूर्वक मांडला आहे. ❞